UNIVERSAL
LIBRARY

OU_192209

UNIVERSAL
LIBRARY

OUP—831—5-8-74—15,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M954.04 S46M Accession No. M459

Author સરદેસાઈ, ગો. સ.

Title મરાઠી રિયાસતી.

This book should be returned on or before the date last marked below.

HISTORY OF MODERN INDIA

PART II

MARATHA PERIOD

Vol. IV, Panipat.

1750-61.

BY

G. S. SARDESAI, B. A., Baroda

Printer Parbhulal Shivlal Thakkar,
Bharat-Vijaya Press, Modikhana,-*BARODA.*
1-12-22.

Publisher G. M. Virkar,
621 Girgaon Road, Bombay No. 4.

श्री सयाजी साहित्यमाला-पुष्प ६८ वें.

[इतिहास-गुच्छ].

हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास.

मराठी रियासत,

मध्य—विभाग ३,

पानिपत प्रकरण, (स. १७५०—६१).

लेखक

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए., बडोदें.

प्रकाशक

गणेश महादेव आणि कंपनी.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

मुद्रक—परभुलाल शिवलाल ठक्कर 'श्री भारतविजय प्रेस,'
मोदीखाना—बडोदें.

ता. १–१२–२२.

प्रकाशक—ग. म. वीरकर, मालक गणेश महादेव आणि कंपनी,
६२१ गिरगांव रोड, मुंबई नं. ४.

श्री.

जाहिरात.

आपल्या देशी भाषेच्या साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें श्रीमंत महाराजा साहेब सयाजीराव गायकवाड सेना-खासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस. आय्., जी. सी. आय्. ई., यांनीं कृपावंत होउन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे, तिच्या व्याजांतून श्रीसयाजी साहित्य-मालेंत विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

हा हिंदुस्तानचा अर्वाचीन इतिहास, मराठी रियासत, मध्य-विभाग ३ स्वतंत्र पुस्तक असून उक्त मालेंतील 'इतिहास-गुच्छांत' अडुसष्टावें पुष्प म्हणून रा. रा. गोविंद सखाराम सरदेसाई., बी. ए., यांचे कडून तयार करवून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर-शाखा,
विद्याधिकारी कचेरी,
बडोदें.
५-१०-१९२२.

ज. पु. जोषीपुरा.
भा. म.

नन्दशाथ के. दीक्षित.
विद्याधिकारी,
बडोदें.

गो. स. सरदेसाई कृत

ऐतिहासिक पुस्तकें.

१	मुसलमानी रियासत	रु. ४—०
२	मराठी रियासत (पूर्वार्ध)	रु. ३—८
३	" " मध्यविभाग १	रु. २-१२
४	" " मध्यविभाग २	रु. ३--०
५	" " मध्यविभाग ३	रु. २—४
६	ब्रिटिश रियासत नवीन आवृत्ति	रु. ३-०

गणेश महादेव आणि कंपनी,
६२१ गिरगांव रोड, मुंबई नंबर ४.

प्रस्तावना.

—:०:—

कौरव-पांडव संगर-तांडव द्वापरकालीं होय अती ।
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥

गडकरी.

उद्योग करूं लागल्यावर मराठी रियासतीचें काम कसकसे वाढत गेलें त्याची हकीगत पूर्वीच वाचकांस सादर केली असल्यामुळे ह्या भागाच्या प्रस्तावनेंत विशेश कांहीं सांगण्यासारखें नाही. पूर्वार्ध, मध्यविभाग, व उत्तरार्ध असे मराठ्यांच्या इतिहासाचे तीन भाग संकल्पित आहेत. पैकीं पूर्वार्ध, व मध्यविभाग १ (१७०७ ते १७४०), आणि मध्य-विभाग २ (१७४० ते १७६१), या पूर्वी प्रसिद्ध झाले असून त्याच कालखंडापैकी प्रस्तुत मध्य-विभाग ३ ह्यांत सन १७५० पासून १७६१ पावेतोंचा उत्तर हिंदुस्थानांतील मराठशाहीचा समग्र वृत्तान्त आला आहे. म्हणजे यांत मुख्यतः पानिपत प्रकरणाचा इतिहास देऊन नाना-साहेब पेशव्याच्या कारभाराचा समारोप केला आहे. विषयपूर्ततेसाठीं मराठ-शाहींतील कित्येक प्रसिद्ध ऐतिहासिक घराण्यांचे वृत्तान्त व उपलब्ध झाल्या तितक्या वंशावळीही ह्या भागांत दिल्या आहेत. आपला इतिहास अद्यापि बनावाच्या स्थितीत असून संशोधन व चर्चा सारखी चालू असल्यामुळें अद्यापि ह्यांत पुष्कळच भर पडण्याजोगी आहे. तत्राप प्रसिद्ध झालेल्या सामुग्रीचा शक्य तितका उपयोग मीं केला आहे. यांत अपूर्तता किंवा दोष राहिले असतील ते कृपा करून कळवावे, म्हणजे पुढील आवृत्तींत दुरुस्ती करितां येईल.

अभ्यासकांच्या सोईसाठीं प्रत्येक बाबतीचे आधार ठिकठिकाणीं दर्शविले आहेत. विशेष निर्देश न करतां जेथें कंसांत नुसता आंकडा येईल तेथें तो रा. राजवाड्यांच्या खंडाचा समजावा. पानपतचा संग्राम भूगोलिक परिस्थितींवरून यथास्थित कळण्यासाठी एक नकाशा देऊन त्यांत सदाशिवरावाचा मार्ग व शक्य तितकीं स्थळे दाखविली आहेत. हा नकाशा वाचकांस पसंत पडेल अशी आशा आहे.

ह्या कामी अनेक मित्रांनी स्वराष्ट्रेतिहासाची कळकळ बाळगून नानाविध कागद व माहिती देऊन मला जे साह्य केले त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहें. तसेंच बडोदें राज्याच्या शाळाखात्यानें या पुस्तकास उदार आश्रय दिला ह्मणून त्यांचेही मी फार फार आभार मानितों.

सन १७६१ पासून पुढील मराठशाहीच्या अखेरपर्यंतचा अवशिष्ट भागही यथावकाश वाचकांस देण्याची उमेद आहे.

ता. २० नोव्हेंबर १९२२, मु. बडोदे. **गोविंद सखाराम सरदेसाई.**

अनुक्रमणिका.

प्रकरण सव्विसावें.

उत्तरेकडील कारभाराचें बीज.

पृ.

१. प्रास्ताविक. १

२. बादशाही अहवाल. ४

३. रोहिल्यांचा पाडाव. १०

४. दिल्लींतील भानगडी. १५

५. बादशहा—वजिरांचे युद्ध व मराठ्यांची हेळसांड. ... २५

प्रकरण सत्ताविसावें.

मराठ्यांचा बादशाहींत शिरकाव.

१. रघुनाथरावाची पहिली स्वारी. २९

२. बादशहाची पदच्युति, शिंदेहोळकरांचा बेबनाव. ... ३५

३. ग्वाल्हेर व गोहद किल्ल्यांचा पाडाव. ४५

४. हिंगण्यांचा रुसवा. ४६

५. नागोरचा वेढा, जयाप्पाचा खून. ५०

६. गोविंदपंत बुंदेल्याचा कारभार. ६३

प्रकरण अठ्ठाविसावें.

अब्दालीचा पाठलाग.

१. अब्दालीची तिसरी स्वारी. ७१

२. रघुनाथरावाची लाहोरची स्वारी. ८०

३. रघुनाथरावाचा दिल्लींत मुक्काम. ८५

४. हिरोबाच्या भानगडी, शिंदे, हिंगणे, अंताजी माणकेश्वर. ८८

५. अटकेवरील झेंडे. ९३

प्रकरण एकुणतिसावें

अब्दालीकडून शिंदेहोळकरांचा पाडाव.

पृ.

१. शिंदेहोळकरांचे जूग फुटले. १०१
२. शुक्रतालच्या पुलाची भूलथाप. १०९
३. दत्ताजीचा अजब पराक्रम व वध. ११७
४. शिंदेहोळकरांची पोळजत्रा. १३०

प्रकरण तिसावें.

पानपतच्या घनघोर संग्राम.

१. पटदुरास सदाशिवरावाची नेमणूक. १३२
२. पानपत मोहिमेतील मुक्काम व प्रसंग. १३९
३. बऱ्हाणपूर ते आग्रा. १४०
४. दिल्ली कावीज [१·८·१७६०] १४९
५. दिल्लीचा मुक्काम, तहाची वाटाघाट. १५५
६. कुंजपुऱ्याचा पाडाव. १६६
७. पानपतावरील कुचंबणा. १७१
८. पौष शु. ८ ची प्राणाहुति. १८५
९. अब्दालीचे नफानुकसान. २०८
१०. पेशव्याची शेवटची स्वारी २१०
११. पानपतच्या संग्रामाचा निष्कर्ष. २१४
१२. पानपत नंतरची उत्तरेंतील परिस्थिति. ... २२७

प्रकरण एकतिसावें.

नानसाहेब पेशव्याची योग्यता.

१. पेशव्याचा मृत्यु. (२३-६-१७६१) २३२
२. कर्तबगारीचा अंदाज. २३९

पृ.
३ कौटुंबिक परिचय.... ... ... २५०
४. सामाजिक व धार्मिक परिचय. २५३
५. श्रावणमास दक्षिणा. २५५
६ पर्वतीचा देवदेवेश्वर २५७
७. पुण्य नगरींचें ऐश्वर्य. २५८

प्रकरण बत्तिसावें.

शाहूकालीन प्रसिद्ध घराणीं.

१. आनुवंशिक प्रयोजन. २६१
२. छत्रपतींचे चिटणीस, गोविंद खंडो २६३
३. अक्कलकोटकर फत्तेसिंग भोसले. . . २६८
४. पिलाजी जाधव. २७३
५. शंभुसिंग जाधव माळेगांवकर. २७८
६. नागपूरकर भोसले २७९
७. धार देवासचे पवार. २८२
८. बारामतीकर जोशी. २८५
९. पुरंदरे. २८७
१०. भगवंतराव अमात्य. २९०
११. कोल्हटकर. २९१
१२ दिल्लीचे वकील हिंगणे. २९२
१३. लाला कृपाराम.... ... ... २९५
१४. कायगांवकर दीक्षित पाटणकर. २९७
१५. यशवंतराव महादेव पोतनीस. २९९
१६. इचलकरंजीकर घोरपडे. ३००
१७. राजाजा. ३०१
१८. विठ्ठल शिवदेव विंचूरकर ३०२
१९. मालेगांवकर राजे बहादर. ३०३



SHRI GIRIJA RAMAN LITHO WORKS, BARODA 1928

श्री.

मराठी रियासत

मध्यविभाग ३.

पानिपत, स. १७६०-६१

प्रकरण सठिवसावें

उत्तरेकडील कारभाराचें बीज.

१ प्रास्ताविक २ बादशाही अहवाल.
३. रोहिल्यांचा पाडाव. ४. दिल्लीतील भानगडी
५ बादशहा-वजिरांचे युद्ध. व मराठ्यांची हेळसांड.

१. प्रास्ताविक —पानपतचा प्रसंग उत्तर हिंदुस्थानांतील महाराष्ट्राच्या समुचित कर्तृत्वाचा कळस होय एखाद्या उदात्त नाटकाप्रमाणे त्यास हळूहळू ंग भरत जाऊन शेवटाकडे अंत:करणवृत्तीना तो उचंबळून सोडतो. नाटकांत याप्रमाणें आरंभींच्या भागांत निरनिराळ्या व्यक्तींचें व घडामोडींचे स्वरूपोद्-ाटन करावे लागते, त्याचप्रमाणें पानपतच्या प्रसंगांतलेही आरंभीचे भाग स्पष्ट त्याशिवाय पुढील रंग मनांत यथायोग्य उतरणार नाही. सबब मराठ्यांचा त्तरेतील एकंदर उद्योग कसकसा बनत गेला, हे प्रथम सांगावयाचे आहे. ' उद्योगांत विविध व्यक्तींचा व पक्षांचा संबंध येतो. मराठ्यांकडील अनेक ार, दिल्लीतील बादशहा व उमराव, जाठ, बुंदेले, रोहिले, शीख वगैरे च्छु लोक, रजपूत राजे आणि अहंमदशहा अब्दाली व त्याचे अफगाण अनु-, इत्यादिकांचा या भागांत संबंध येणार आहे, म्हणून त्या सर्वांचे वर्तनोद्देशही ून घ्यावे लागतात.

शाहू छत्रपतींच्या मृत्यूपर्यंत मराठ्यांच्या उत्तरेकडील उद्योगाचे विवेचन पूर्वी आलें आहे. बाजीरावाने आपली दृष्टि सर्वथैव उत्तरेकडे ठेविली होती. नानासाहेबाचीही आरंभी तशीच दृष्टि होती. शाहूच्या मृत्यूनंतर मराठशाहीच्या कारभारास निराळे वळण लागले, आणि एक नवीन विघ्नही उपस्थित झालें. स १७५० च्या आरंभापासून स. १७६१ च्या जून महिन्यांत पेशवा पर्वतीवर मरण पावला, तेथपर्यंतच्या साडेअकरा वर्षांच्या काळापैकी पहिली तीन वर्षे पेशवा सातारच्या भानगडींत गुंतलेला होता, त्यामुळे उत्तरेतील उद्योगांत लक्ष घालण्यास त्यास सवड झाली नाही. शिंदे-होळकरच तिकडचा कारभार पाहत होते. शाहूच्या हयातींत मराठशाहीच्या कारभारास एक प्रकारचे नियंत्रण होते प्रतिपक्ष्याच्या ओढातार्णीत पेशव्यास एकाच दिशेकडे वाहतां येत नसे. परंतु रामराजाचे अंगी कर्तबगारी नसल्यामुळे पेशवा अनियंत्रित झाला आणि निजामशाही व कर्नाटक यांसंबंधी नजीकच्या भानगडींत द्रव्यार्जनाचे पाठीस लागून गुरफटून गेल्यामुळे, उत्तरेतील दूरच्या उद्योगाकडे त्याचे दुर्लक्ष झाले. या अनुसंधानानें पानपतचा प्रसंग अंगावर येण्यास आरंभापासून कसकशी कारणें बनत गेली हे नीट समजून घेणे अवश्य आहे.

या अकरा वर्षांतील कित्येक ठळक प्रसंग व त्यांचे काळ दृष्टीसमोर पाहिजेतः-

ता. १४.४.१७४८ महंमदशहा बादशहाचा मृत्यु व अहंमदशहाची स्थापना. सफदरजंग वजीर स १७५३ पावेतों.

ता. २१.५.१७४८ निजामुल्मुल्कचा मृत्यु

ता. १५.१२.१७४९ शाहूचा मृत्यु.

सेप्टेंबर-१७५२ गाजीउद्दिनाचा औरंगाबादेस खून.

ता ३.६.१७५४ अहंमदशहा बादशहा स्थानभ्रष्ट, दुसरा आलमगीर. याची स्थापना, वजीर मीरशहाबुद्दीन, मराठ्यांचे मदतीनें

ता १४.१०.१७६४ सफदरजंगाचा मृत्यु, मुलगा सुजाउद्दौला.

ता. १९.५.१७५८ अलीगौहर (शहाआलम) याचें दिल्लीतून पलायन.

ता. २८'११'१७५९ आलमगीर बादशहाचा खून.

ता १०'१'१७६० दत्ताजी शिंद्याचा पाडाव. वजीर मीरशहाबुद्दीन दिल्लीचे कारभारांतून निघून गेला

अहंमदशहा अब्दालीच्या स्वाऱ्याः-१ ली, जानेवारी-मार्च १७४८; २ री, जानेवारी-एप्रिल १७५१· ३ री, डिसेंबर १७५६-एप्रिल १७५७; ४ थी ऑगष्ट १७५९-मार्च १७६१

रघुनाथरावाच्या स्वाऱ्याः-गुजराथेवर २० १२ १७५२-जून १७५३; उत्तर हिंदुस्थानांत पहिली ३०'८'१७५३—ऑक्टोबर १७५५; लाहोरची अटकेपावेतों नोव्हेंबर १७५६--ऑक्टोबर १७५८.

सदाशिवरावाची पानपतची स्वारी-१४ ३'१७६०-१४ १ १७६१. २३'६'१७६१ पर्वतीवर पेशव्यांच्या मृत्यु.

---

१. **टीप**—पानपतसंबंधी संदर्भग्रंथ. उल्लेख नसेल तेथें आंकडे राजवाड्यांच्या खंडाचे समजावे.

का. सं.-भा. सा व भा सा कें. रघुनाथ यादवची बखर; प याः धा रा च.

भा. व.-पुस्तक १-२, बेंदल्यांची कैफीयत. शकावली वगैरे.

इ. सं.-ऐ. टि. २-३१. ३३, ४१, ४५ व ३-३३

ऐ. ले. सं पृ. १

पारसनीस-म. प्र बुंदेलखंड-एकत्रुटित बखर.

काशीराय बखर-Asiatic Researches vol. 3.

श्री. वि. आठल्ये-रिंगणगांवकर दप्तर-होळकरांची थैली पूर्ण, व सोनपतची बखर व कांहीं पत्रे,-सर्व अप्रकाशित.

वि. चि. वैद्य-दुर्दैवी रंगू.

ना. वि. बापट-पानपतची मोहीम.

Elliot vol. 8; Duff; Elphinstone; and Tates' Kingdom of Afghanistan (Times of India).

२. बादशाही अहवाल, मराठ्यांशीं चौथाईचा करार (१७५०) – पानपतावर मराठ्यांशी झगडणारा अहंमदशहा अब्दाली याने हिंदुस्थानावर पहिली स्वारी स १७४८ चे आरंभी केली आणि त्याच वेळी दिल्लीचा बादशहा महंमदशहा मरण पावून त्याचा मुलगा अहंमदशहा तख्तावर आला, ही घडामोड हिंदुस्थानचे इतिहासांत महत्त्वाची आहे औरंगजेबाचे वेळेस मोगल बादशाहीची वायव्य हद्द मध्य आशिया पर्यंत होती, ती नादीरशहाचे स्वारीनें आकुंचित होऊन सिंधु नदीवर आली पुढे इतर प्रांतांप्रमाणे पंजाब प्रांतही हातचा जातो की काय अशी धास्ती बादशहास पडली असतां, अब्दाली त्या प्रांतावर आला अहंमदखान दुराणी याचा जन्म स १७२४ चा असून तो नादीरशहाचे पदरी नोकर होता. १९ जून १७४७ रोजी नादीरशहा मारला गेला आणि अफगाणिस्तानचे राज्य अहंमदखानास मिळाले त्याने शहानवाजखान वामाझै यास वजीर नेमून त्यास शहावल्लीखान असा किताब दिला या वजिराच्या मदतीने अहंमदशहाचे पुष्कळसे उद्योग सिद्धीस गेले. प्रत्येक स्वारीत व उलाढालींत दोघे एकमेकाच्या विचाराने वागत पानपतावर व पुढेही हा शहावल्लीखान अहंमदशहाचा केवळ उजवा हात होता. सरदार जहानखान पोपलझै व शहापसंतखान हेही अहंमदशहाचे साह्यकर्ते असून त्यांची नांवे पुढे वारंवार येत असतात. नादीरशहाने कमाविलेली सर्व संपत्ति अहंमदशहास मिळाल्यामुळे त्यास पुढे येण्यास पैशाची अडचण भासली नाही, लगेच त्याचा जम बसला जवळच्या फौजेस बाहेर काम मिळाल्यास स्वदेशांतील बंडाळी मोडून आपली व्यवस्था सुरळीत लागेल, या हेतूनें त्याने प्रथम पेशावर हस्तगत केले. आणि पंजाबच्या अधिकाऱ्याकडून मदतीची मागणी येतांच तो लाहोरावर चालून आला.

नादीरशहाच्या स्वारीत वजीर खानडौरान मरण पावल्यावर कमरुद्दीनखान वजिरीचे काम पाहत होता. कमरुद्दीनखानाचाच कोणी आप्त शहानवाजखान पंजाबचा कारभारी असून, त्याचे व त्याच्या भावाचे जुळत नव्हते. या दोघां भावांच्या भांडणांत अदिनाबेग नांवाच्या इसमानें भर घातली. हा अदिनाबेग

महाकारस्थानी असून, अब्दालीस इकडे आणण्यास तोच कारण झाला हा मूळचा लाहोर जवळील सडकपुर गांवचा राहणारा. त्याच्या बापाचे नांव छन्नू. लहानपणी तो अलाहबाद, कानपूर वगैरे ठिकाणी फौजेंत नोकरी करून वाढला. पुढे लष्करी नोकरी न आवडून त्याने मुलकी खात्यात प्रवेश केला, आणि हिशेबी कारकुनी वगैरे कामांत प्रवीणता मिळविली. तेव्हां नोकरींत चढत चढत नादीरशहाचे स्वारीच्या वेळी तो पंजाबांत सुलतानपुरचा कारभारी होता सरहद्दीकडील कारस्थानाची त्यास चांगली वाकबगारी झाल्यामुळे सर्व अधिकाऱ्यांस त्याची जरूर लागत असे. तो स्वभावाने क्रूर व प्रसंगी वाटेल ते करण्यास कचरणारा नव्हता. (एल्फ्यट पु ८). स १७४७ त शहानवाजखान व त्याचा भाऊ यांचे पंजाबात भांडण लागले असता, अदिना-बेगाने अब्दालीशी खटपट करून त्याची मदत वडील भावास आणून दिली आणि इकडे हे कारस्थान वजीर कमरुद्दीनखानास लिहून पाठविले, त्याबरोबर वजिरानें त्या बंडखोर अधिकाऱ्याचा निषेध केला. परंतु अब्दालीने मात्र पंजाबावर स्वारी करण्याची संधि घालविली नाही. स. १७४८ च्या जानेवारीत पेशावराहून स्वारी उतरून त्यानें लाहोर व मुलतान हे प्रांत हस्तगत केले सुभेदार शहानवाजखान त्याजवर चालून गेला, परंतु ता. २० जानेवारी रोजी पराभव पावून त्यास पळून जाणे भाग पडले. ता. २२ रोजी अब्दालीने लाहोर हस्तगत केले. इकडून वजीर कमरुद्दीनखानही अब्दालीवर तावडतोब चालून गेला. तों अब्दाली पुढे येऊन सरहिद काबीज करून बसला होता. स्वतः बादशहा अर्धांगवायूने घोड्यावर बसण्यास असमर्थ होता, म्हणून त्यानें जयपुरचा ईश्वरसिंग, सफ्दरजंग, मीरमन्नू वगैरे मंडळी वजिराचे मदतीस पाठविली. परंतु अब्दालीपुढे त्यांचा जोर चालेना, तेव्हां वजिरानें शहाजादा अहंमद यास आपल्या मदतीस पाठविण्याविषयी बादशहास लिहिले. (का. सं. प या. ९२). शहाजादा तिकडे जाऊन स्वतंत्र होईल या भीतीनें बादशहा त्यास पाठविण्यास खुषी नव्हता. पण वजिराचे आग्रहावरून त्याने शेवटी शहाजाद्यास रवाना केले. शहाजादा आल्यावर ता. ३ ते १० मार्च पावेतों सरहिद येथे लढाई होऊन

अब्दालीचा पराभव झाला. परंतु १० मार्च रोजी कमरुद्दीनखान तंबूत निमाज पढत असता, एकाएकी तोफेचा गोळा लागून मरण पावला. इकडे त्यापूर्वीच अब्दाली सरहिंद सोडून परत निघाला असतां बादशाही फौजेने त्याचा धुव्वा उडवून दिला तेव्हां पंजाबचा कारभार कमरुद्दीनखानाचा मुलगा मूइनुन्मुल्क मीरमंनू यास ता. २-४-१७४८ रोजी देऊन अब्दाली तावडतोब ११ एप्रिल रोजी सिंधूवर आला आणि १५ मे रोजी कंदाहार येथे पोचला. कमरुद्दीनखान मेल्याची बातमी मागाहून त्यास कळली, तेव्हां आपण उगाच परत फिरलो असे त्यास वाटले. पुढील दोन वर्षे अब्दाली उत्तरेस व पश्चिमेस बंडखोरांचे पारिपत्य करून राज्याची व्यवस्था लावीत होता, म्हणून हिंदुस्थानाकडे आला नाही. ठट्ठा व काबूल हे दोन प्रांत पूर्वी नादीरशाहस दिलेलेच होते, सबब ते आपल्या हवाली करावे असे अब्दालीचे मागणे होते परंतु सरहिंदच्या लढाईनंतर शहाजाद्याने मीरमंनूच्या मदतीने अब्दालीस काबुलापर्यंत मार दिला, तेव्हां ज्यास्त प्रांत देण्याची जरूर राहिली नाही. मागे बादशहा मरण पावल्याची बातमी आली म्हणून पंजाबावर मीरमंनूची नेमणूक करून शहाजादा लगेच परत आला. रस्त्यातच त्याने बापाच्या मरणाचे वर्तमान ऐकून बादशाही पद धारण केले. [illegible] यास दक्षिणेतून बोलावून वजिरी देण्याचा विचार केला, इतक्यांत पुढे २१ मे रोजी निजामही मरण पावला. तेव्हां सादतखानाच्या बहिणीचा मुलगा मनसूरअली सफदरजंग यास अहंमदशहाने वजिरी व निजामाचा मुलगा गाजीउद्दीन यास बक्षीगिरी दिली. मात्र बादशहाची आई उधम व जनानखान्यावरील मुख्य जावेद याचे तंत्राने बादशहा वागूं लागला.

इकडे बादशाही शक्य तितकी आपल्या कबजांत आणण्याचा मराठ्यांचा प्रयत्न चालूच होता. स. १७४५ चे प्रथमार्धात पेशव्याने भेलशाचा स्वारी केली, तेव्हां दिल्ली दरबाराशी कांही नवीन करार ठरवून घेण्याचा त्याचा विचार होता. त्याचे वकील रंगिणे या गोष्टीचा पाठपुरावा दरबारांत करीत होते, आणि अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव वगैरे सरदार त्याच उद्योगावर होते. (ऐ. १८९) स. १७४८ त पेशव्याने नेवाईची स्वारी केली त्या वेळी

अब्दाली लाहोरावर आला तेव्हांच्या चढाओढीवर मराठ्यांची दृष्टि परिपूर्ण होती (का सं प. या ९२). नवीन वजिरास आपले लक्षांत आणण्या-संबंधाने पेशवा गमचंद्रबाबास लिहितो ' सफदरजंग यास निमरजाबंद करून आपले लगामी लावावयाचा विचार केला असे, म्हणून लिहिले ते कळले. तेणेप्रमाणे हा विचार उत्तम केला आह्मीही त्यास विचारानुरूप लिहिणे ते लिहून लगामी लावून घ्यावे, सकारपूर्वकाचे (रघूजी भोंसले ?) साह्य न करावे म्हणोन लिहिले असे ज्यांत आपल्या मनसुबियास व कर्तव्य-तेस उचित आणि उपयोगी, परिणाम उत्तम लोकोत्तर, योग्यतर लौकिक-कीर्तिस्पद, तेच करणे व कराल हा निशा आहे. सफदरजंग उमदा मनुष्य त्याचा स्नेह हरप्रकारे रक्षण करणें उचित. दुसरे, काही त्याचे हाती त्याशी निखालसता असलिया, कालगतीने कार्याचे स्पष्ट दर्शन होणार तो महा लाभ आहे यासाठीही स्नेह रक्षावा अप्रिय भाषण करून विग्रह वाढविणे उचित नव्हे. थोडासा तोटा जाहला तरी सोसून स्नेह रक्षणे उचित असे ' हे पत्र स. १७४८ च्या पावसाळ्यांतले किंवा किंचित् पुढचे असावे. या वेळी बादशहाशी कांही नवीन करार ठरला असावा असे अनुमान होते. (६ १९२ पृ २९३, बापूजी हिंगण्याचें पत्र ७- २ - १७४९) परंतु या सालच्या पावसाळ्यांत शाहू छत्रपति आजारी पडून, भावी व्यवस्थे संबंधानें सरदार चिंताग्रस्त होऊन साताऱ्यास जमा झाले, त्यांत एक वर्ष फुकट जाऊन स. १७५० च्या पावसाळ्यांत शिंदे होळकर उत्तरेत रवाना झाले, तेव्हां त्यांनी पुढें बादशाहीत नवीन कारस्थान रचिले

सफदरजंगाकडे वजिरी आल्याने रोहिल्यांचे प्रकरण उपस्थित झाले. हे पठाण गंगायमुनांच्या दुआबांत राहत असून इकडे बादशाही प्रदेशास व तिकडे अयोध्येच्या सुभ्यांतील अलाहबाद लखनौ या प्रांतांस भारी उपद्रव देत असत. त्यांची अनेक लहान राज्ये असून मुख्य ठिकाण बरेली होते. रोहिले सुनी पंथाचे व वजीर शिया पंथाचा असल्यामुळें दोघांच्या भांडणात धर्मद्वेषाची भर पडला. अलीमहंमद रोहिल्यानें मोगल अधिकाऱ्यांस ठार मारून स. १७४४ त स्वतं-

व्रता धारण केली, तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्यासाठी खुद्द महंमदशहा व सफदरजंग फौजेसुद्धां त्याजवर चालून गेले, (स. १७४५), परंतु त्यांचे हातून अलीमहंमदाचा पाडाव झाला नाही. सफदरजंगाने पुढे त्याजवर सारखी मोहीम चालविली होती आणि वजिरी प्राप्त झाल्यावर तर हा उद्योग त्याने नेटाने चालविला त्यासाठी त्याने मराठ्यांशी नवीन करार करून शिंदे होळकरांची मदत घेतली. स १७४९ त अलीमहंमद मरण पावला, तेव्हां त्याचा अल्पवयी मुलगा सादुल्लाखान याचा कारभार दुंदेखान व हाफीज रहमतखान हे दोन सरदार पाहूं लागले. अलीमहंमदास तीन मुलगे असून, दोघे अब्दाली जवळ कैदेत होते, तेव्हां तिसरा धाकटा मुलगा सादुल्लाखान यास हाफीजरहमतने गादीवर बसविले. ही गोष्ट ऐकून अब्दालीकडे असलेले दोघे मुलगे गादीवर हक्क सांगण्यास परत आले, तेव्हां त्या तिघांचा झगडा लागला. याचा फायदा घेऊन सफदरजंगाने रोहिलखंडांत स्वारी केली, आणि बहुतेक प्रांत जिंकून तेथे आपल्या तर्फेने नवलराय कायस्थ यास कारभारी नेमिले. परंतु रोहिल्यांनी नवलरायावर चाल करून त्यास ठार मारिले, तेव्हां स्वत: सफदरजंग पुनः रोहिल्यांवर चालून गेला असतां पराभव पावून मागे आला. अशा स्थितीत मराठ्यांची मदत घेतल्याशिवाय वजिरास गत्यंतर राहिले नाही. दुंदेखानाचा जांवई वजीरखान व त्याचा भाऊ सुलतानखान हेही या वेळेपासून रोहिलखंडांत वावरत असून मराठ्यांच्या मदतीने आपल्या जातभाईचा पाडाव होणार याजबद्दल वैषम्य बाळगीत होते.

महंमदशहाच्या मृत्यूनंतर बादशहाहीचा बचाव कसा होतो याची वजीर व इतर मुत्सद्यांना मोठी पंचाईत पडली. अदिनाबेग वगैरेच्या मार्फत अब्दालीची कारस्थाने चालत असून त्याची भीति सर्वांच्या डोळ्यांपुढे उभी होती. रोहिल्यांशीही अब्दालीचे कारस्थान होते. तेव्हां मोगल बादशाही उलथून जाऊन पुनः पठाणांचे राज्य दिल्लीस होणार असा रंग दिसूं लागला. 'पातशहात रोहिले पठाण घेऊं चाहत होते' (का. सं. प. या. ३६४). वजीर सफदरजंग न मीरबक्षी गाजीउद्दीन हे दरबारांत कर्ते पुरुष असून, त्यांस

पठाणांचें प्राबल्य नको होतें. गाजीउद्दीनचा ओढा मूळपासून मराठ्यांकडे असून वजिराचें मनही मराठ्यांसंबंधाने निर्विकारच होते. पठाणांची वृत्ति नेहमीच उचल्यासारखी असून, कसा तरी स्वार्थ साधण्यापलीकडे, त्यांचा विचार नव्हता. दोनशे वर्षे पराक्रमी मोगल बादशहांनी राज्य संभाळिले, ते हे पठाण व अब्दाली उलथून पाडणार अशी वेळ येऊन ठेपली, तेव्हां मराठ्याची मदत घेण्याशिवाय बादशहास आपल्या बचावाचा दुसरा उपाय राहिला नाही.

मराठ्यांचीही मदत घेताना बादशहाने मराठ्यांशी एक विशिष्ट करार केला. हा करार महत्वाचा असून तो. १-१ व ६-१९९ यांत दिलेला आहे पेशव्यांचे तर्फे जयापा शिंदे व मल्हारराव होळकर यांनी हा करार केला. ठठ्ठा, मुलतान (म्ह० सिंध), पंजाब, रजपुताना व रोहीलखंड एवढ्या प्रदेशावरील चौथाई बादशहाने मराठ्यास फौजेच्या खर्चासाठी करून दिली. त्यांतील मुख्य अट अशी होती की, अब्दाली, रोहिले, रजपूत राजे व सिंधचे अमीर यांनी मराठ्यांनी तंबी पोचवून त्यांजपासून पातशाहीचे संरक्षण करावे वरील प्रांतांपैकी दोन हिस्से सरकारांत व एक हिस्सा, फौज हजूरची, त्यास ठरविले. आणि प्रांताचा बंदोबस्त झाल्यावर चौथा हिस्सा मराठ्यांचा सरकारचे दरोगे व किल्लेदार मुदामतप्रमाणे प्रांतांत राहवे. भोगवटाप्रमाणे पातशाही बंदोबस्त ठेवून शहरच्या लोकांस आणि जहागीरदारांस राजी राखूं, नंतर आपली चौथाई घेऊं. यास 'श्री ईश्वर व मार्तंड व सांब साक्ष आहे. पोथी, बेलभंडार, तुळसी, गंगा प्रत्यक्ष साक्ष' बादशहाचा बोज राखण्यासाठी हा करार अर्जी व उत्तर या स्वरूपांत ठरला. करारांत छत्रपतींचे नांव नसून पेशव्यांचे आहे. सिंध पासून काशीपावेतो सर्व प्रदेशाचा बंदोबस्त राखण्याची जबाबदारी या कराराने मराठ्यांनी स्वीकारिली. कराराचा मुख्य रोख रोहिले व अब्दाली यांसंबंधी होता. रोहिल्यांस नरम करण्याचे काम शिंदे होळकरांनी लगेच अंगावर घेतलें. अर्थात् या करारानें अब्दालीस चीड येऊन तो मराठ्यांचे पाठीस लागला. बादशाही दरबारांत दोन पक्ष उत्पन्न झाले, एक मराठ्यांचा व दुसरा अफगाणांचा. अब्दालीकडील वकील व हस्तक दिल्लीस राहून त्यास

येथील इत्थंभूत बातमी कळवीत असत. रजपूत राज्यांतही मराठ्यांनी इतउत्तर उघड प्रवेश केला याचे कारणही हा करार होय. ह्या महत्वाच्या कागदाची मिति उपलब्ध नाही. तो केव्हा तरी स. १७५० त झालेला दिसतो. करार झाल्यानंतर त्याची उस्तवारी करण्यास पेशव्यास एकवार उत्तरेत जाता आले असते तर त्याचे पुढील परिणाम कदाचित् निराळे झाले असते. पेशवा सातारचे भानगडीत गुंतून राहिला; शिंदे होळकरांत वितुष्ट पडले. हिंगणे, अंताजी माणकेश्वर इत्यादि दुसऱ्या मंडळीचा बेबनाव झाला: 'कोणी तरी खासा इकडे एकवार येऊन व्यवस्था लावा,' असे सरदार लोक पेशव्यास लिहीत असतां, रघुनाथरावाशिवाय दुसरा कोणी कर्तबगार इसम तिकडे गेला नाही, त्यामुळे अब्दाली व मराठे यांची चुरस वाढत जाऊन पानपतचा प्रसंग पुढे उद्भवला, त्याचे बीज वरील करार होय.

३. रोहिल्यांचा पाडाव, फर्रुखाबादची लढाई.—(२१-३-१७५१). वरील करारा अन्वये शिंदे होळकरांनी रोहिल्यांवर स्वारी सुरू केली. जुलई महिन्यांत (१७५०) ते दक्षिणेतून निघाले. नोव्हेंबरांत होळकर अडाण्यास व जयापा कोट्यास पोंचले (६-२१३) सखाराम बापू व गोविंदपंत बुंदेले त्यांजबरोबर होते. २८-९-५० च्या पत्रांत होळकर लिहितो. 'गंगापार होऊन पठाणास तंबी पोहोचावयाचा विचार करून पुलाची तर्तद करवीत असो' (६-२०६) ही तयारी करण्यांत चारदोन महिने गेले. फेब्रुवारी १७५१ त 'मल्हारजी यमुनेपार होऊन, साप्रत विचार पठाणांशी युद्ध प्रसंग करण्याचा आहे' (३-३७५ A). मराठ्यांची फौज अंतर्वेदीत उतरली ही गोष्ट दरबारात पुष्कळांस आवडली नाही. (६-२०७ A)* रोहिल्यांनी अब्दालीकडे संधान करून त्याजकडून पंजाबावर स्वारी करविली. तेथील सुभेदार मीरमंनूने बादशहाकडे मदत मागितली. परंतु सफदरजंगाने मदत पाठविली नाही. बादशहा तर चैनीत निमग्न होता. २.३.१७५१ रोजी अब्दालीने

* **टीप:**—राजवाडे खं. ६ ले. १६६–२५२ चे आंकडे छापलेले नाहीत. हाताने घातले पाहिजेत. एल्यट पु. ८ पृ. ११६.

मीरमंनचा पराभव केला. त्या प्रसंगी मीरमनूंचा कारभारी कौरामल्ल मारला गेला तेव्हां ठठ्ठा, मुलतान, लाहोर व काबूल हे चार परगणे अब्दालास देऊन मीरमंनूने त्यास पुढे दिल्लीकडे येऊं न देतां परभारे वाटेस लाविले मागे त्याने आपला सरदार नासिरखान पंजाबांत ठेवून दिला ज्या प्रांताच्या बंदोबस्ताचा हमी मराठ्यांनी घेतली, तोच हस्तगत करून अब्दालीने या हमीची किंमत दिल्ली दरबारास प्रत्यक्ष दाखवून दिली

इकडे रोहिल्यांनी प्रयागकाशीपर्यंत हिंदु क्षेत्रांवर चाल करून धुमाकूळ उडवून दिला फेब्रुवारीचे अखेरास दीक्षित लिहितो 'ब्राह्मणभोजन होत होते एवढ्यामध्ये बापूजीपंत हिंगण्यांचे पत्र जे, पठाण प्रयागास आले, नवे शहर लुटले, बायका बंद नेल्या, काशीमध्ये मोठा आकांत झाला. दोन दिवस शहरात दिवा लागत नाही दहा दिवस काशीमध्ये मोठा आकांत जाहला ऐशी रुपये गाडीचे भाडे पाठण्याचे झाले. ओझ्यास मनुष्य मिळेना. मनुष्य निघोन ज्यास जिकडे वाट फावेल तिकडे गेले. तंव पठाणास वर्तमान कळले तेव्हां त्याने साता सावकारांचे नांवे परवाने पाठविले जे, तुम्ही कां पळता! मी पातशाही बंदा आहे. शहर लुटावयासी आलो नाही रयतेशी काय आहे! लोकांस दिलासा देऊन शहरांत सुखरूप राहणे तरी लोक बहुत गडबडून गेले आहेत. विश्वेश्वर काय करील ते खरे ' (३ ३७६) ही सर्व धामधूम फर्रुखाबादचा नबाब अहंमदखान बंगश याने उठविली होती काशीचा राजा बळवंतसिंग याने प्रयाग येथे अहंमदखानास भेटून, सात लक्ष दंड भरून काशीत स्वस्थता केली. पुढें रोहिल्यांचे व मराठ्यांचे युद्ध झाले.

' अहंमदखान बंगस बहादुरखां रोहिल्यास शरण जाऊन, त्यास दहा-बारा हजार स्वार व प्यादे घेऊन कुमकेस आणिले. सरदारांचा फौज व जाठांची व नवाब वजिराची फौज अशा गंगापार होऊन २० मार्च रोजी लढाई जाली. बहादुरखां रोहिला बुडविला पंनास साठ हजार फौज बुडविली. हजारो घोडी व हत्ती व तोफखाना पाडाव केले. बंगस घाबरा होऊन गंगा-पार पळून गेला.' हें वर्तमान पेशव्यास कळल्यावर त्याने सरदारांस मोठी

शाबासकी दिली. 'शाबास तुमच्या हिमर्ताची व दिलेरी रुस्तुमीची. दक्षिणच्या फौजांनी गंगायमुनापार होऊन पठाणांशी युद्ध करून फत्ते पावावे हें कर्म लहान सामान्य नव्हे. तुह्मी एकनिष्ठ कृतकर्मे दौलतीचे स्तंभ आहां. इरान तुरान पावेतो लौकिक झाला की वजीर पळाला असतां फिरोन फत्तेच्या मसनदीवर बसविला. या उपर स्वकार्य साधून आपले मुलखांत येणे योग्य आहे. (का. सं. प. या. १६२-१६३). साबाजी शिद्यासही असेंच पत्र आहे. 'आह्मी आगऱ्यापासून लांबलांब मजली करून दर्यागंज पर्यंत आलो. अद्यापि मल्हाररायाचे फौजेचा सुमार कळत नाही. सुरजमल्लाचा मुकाम पठारीवर आहे. वजिरांचा व सरदारांचा मुकाम कोठे आहे तें लिहिणें,' असे नारोशंकर विचारितो. (६-२२२). लढाईच्या बातमीचें १७ एप्रिलचे जयापाचे पत्र ७ जूनला पेशव्यास पोचले. त्यांत जयापा लिहितो, 'सादलखान पठाण लुटून फस्त केला. तदुत्तर अहंमदखान प्रयागाहून जलद स्वारीने फर्रुखाबादेस आला. त्याची बातमी कळोन मोर्चेबंदी करून राहिलो. पठाणांस सामान सरंजाम पलीकडून पोचत होता, त्यामुळे जेरीस न येत नबाब वजीर पांच कोस कनोजजवळ होते त्यांजकडून गंगेस पूल तयार करवून पार उतरून पठाणांस गांठून लुटून फस्त केला. अहंमदखान पठाण तेच रात्री मोर्च्यातून पळून गेला. त्याचा पिच्छा करून बुडविला. दत्ताजी शिंदे यांणी फार फार शर्थ केली. या उपरी वजिराशी काशी प्रयाग वगैरे क्षेत्रांचा मजकूर घातला आहे, (का. सं. प. या. ३६४) 'मनसूर अली वजीर यासी मदत होऊन पठाणावर चढाई केली. मग यमुनापार होऊन भागीरथीचे तीरीं पठाणांची गांठ पडली. दाणापाणी पलीकडून येत असे यास्तव दिरंग लागला. मग भागीरथीस पूल बांधून रा. गंगाधर यशवंत याजबरोबर फौज देऊन पलीकडे गेलों. उभयतां श्रीमंत अलीकडे पठाण होता त्याजवर राहिले. मग ईश्वरकृपें पलीकडील फौज मोडून तारांगण केलें. अलीकडे ही मोडला. खासा तीराउतानशीं पळोन गेला. मनसूरअलीनें काशीची व प्रयागाची क्रमणा केली. यंदां लष्करें देशास येतील.' (१२ मे, ३-३८३A). 'मल्हारजी फर्रुखाबादेकडे आहेत. नबाब शिद्याचरा

बहुत करतो. मोठें यश आलें. रोहिले नबाबाशी सख्य करून आवे ह्मणून मध्यस्थ पडले आहेत. नबाब ह्मणतो (पावसाळ्याची) छावणी अंतर्वेदीत करावी बहुधा छावणी होईलसे दिसतें. लूट सर्व हरिभक्तांही घेतली. तोफा कार्ल्यास पाठविल्या. गोविंदपंत, नारो शंकर, लक्ष्मण शंकर सर्व सांगातेंच आहेत गाजीपुऱ्यांमध्ये पठाण होते, त्यांची राजा बळवंतसिंगाशी लढाई झाली. राजाचा जय झाला, ते लुटून घेतले गाजीपुरांत याचा अंमल झाला.' (ता. १५ मे, ३'३८४) काशी प्रयाग, वगैरे हिंदूंची पवित्र स्थळे रोहिल्यांचे कबजांत होती, ती सोडविण्याचा पेशव्याचा फार दिवसांचा संकल्प असून त्या स्थळांस उपद्रव करणे ह्मणजे मराठ्यांच्या नाकांवर मिऱ्ये वाटण्याप्रमाणे होते. वास्तविक हीं स्थळे अयोध्येच्या सुभ्यांत मोडत असून त्यांची मागणी सफदरजंगाकडे मराठ्यांनी केलेली होती. वर सांगितलेला काशीतील उपद्रव व लढाया हीं स्थळे सोडविण्यासंबंधाच्या होत. ' मल्हारजीने छावणी अंतर्वेदीत केली. त्याचे चित्तांत कीं विश्वेश्वराची ज्ञानवापीजवळील मशीद पाडून देवालय करावे. परंतु ब्राह्मण चिंता करितात की हे मशीद प्रसिद्ध आहे. पातशहाचा हुकूम नसतां पाडील देऊळ करील, ह्मणजे ब्राह्मणांस मरण येईल जीवच घेईल. या प्रांतीं यवन विशेष प्रबळ आहेत. गंगा समर्थ. मना करावे तरी पाप देवाची स्थापना मना करावी हा दोष. परंतु ब्राह्मणांस संकट न पडे ते करावे, हे पुण्य विशेष. याजवर विश्वेश्वराचे चित्तांत येईल ते करील. मशीद पाडूं लागतील, तेव्हां सर्व ब्राह्मण मिळून श्रीमंतांस विनंतिपत्र पाठवितील ऐसा विचार झाला आहे.' (१८ जून १७५१, ३–३९७) स्वधर्माविषयींची ब्राह्मणांची ही कळकळ वाखाणण्याजोगी नाही असे कोण ह्मणेल !

वरील लढाईस फर्रुखाबादची लढाई असे म्हणतात. रोहिल्यांस याप्रमाणें पादाक्रान्त केल्यावर त्यांजपासून ५० लाख रुपये घेण्याचा करार होळकरानें करून घेतला, असें डफ् म्हणतो. हा फक्त त्या मोहिमेचा खर्च असावा. कारण रोहिल्यांपासून जिंकलेल्या मुलखाची चौटणी करून त्याची सनद पेशव्यानें शिंदे–

होळकरांस करून देण्यास बराच अवधि लागला. याबद्दलच्या सनदा मार्च १७५४ च्या आहेत. (ना. सा. रो. १.१८६-१८७).

या मोहिमेच्या परिणामासंबंधाने गोविंदपंत बुंदेले ता. १५ मे च्या पत्रांत, पठाणाच्या धांदलीने उत्तरहिंदुस्थानांत व्यापाराची व पैशाची गडबड किती उडाली आणि हुंड्या वगैरे कशा चालत नाहीत, याचे वर्णन करून, पुढे लिहितो. 'पठाण मारले गेले. याउपरी सुबत्ता होईल. पठाण मारले न जाते तरी आमचे अंमल न राहते. जमीनदार पठाण सुद्धां एक झाले होते. पठाणांचा मनसुबा पातशाही घ्यावयाचा होता. पातशाही हातांत न ये तर, पातशहास दबवून, वजिरास मारून वजीर, बक्षी व दिवाण आपण व्हावे, हा मनसुबा होता. श्री गंगातीरी बंदी बहुत केली, त्याचे फळ सध्या पावला. श्री. नानास्वामींचें पुण्य समर्थ आहे. इजतखान तरवाईवाला बेइमान पठाणास मिळाला होता, त्याचे सर्व स्वार मारले लुटले गेले. फजीत पावला. (३-१६०). पठाण व रोहिले दोनही फौजा मातबर बुडावितांच पातशहास मोठा वसवसा जाला जे, श्रीमंत नानाची फौज इकडे आली त्यामुळे हे पातशाही बुडवितात, मोडितात, तेव्हां आतां मराठ्यांहून आणीक कोणी मातबर नाही. त्यास वजिराचें वर्तमान तर वजिरांत कांहीच पीळ नाही. तिळमात्र मर्दुमी राहिली नाही, निर्मालिय जाला आहे. जर करितां श्री. नानास्वामी अगर भाऊस्वामी कोणी एकजण असते, तर आजी पातशाहीचा मामला हलका पडला होता. या समयी, मातबर कार्य करून घ्यावयाचा समय होता. पठाणांचे दंग्यामुळे श्री-काशीप्रयाग उजाड झाली, मातबर सावकार दिल्लीस गेले. मोठमोठी मातबर शहरे जयनगरसुद्धां लुटली मारली गेली. आश्विनमासीं गारा पडल्या, खरीप बुडाले: दुसऱ्याने फाल्गुनमासी पडल्या, रब्बी बुडाली. तमाम रयत पाटील पळतात. चवथाई वसूल या सालांत आला नाही.' १५ मे (३-१५८). एकंदरीत हें साल लोकांस फार वाईट गेलें (३.४१७). काशीकडील अनर्थांचा अहवाल स. १७५२ त सुद्धां अर्शाच वर्णिलेली आहे. (३.५४६). बहुधा रोहिल्यांना मदत या सर्व युद्धांत अब्दालीची असून, पठाण म्हणून जे

उल्लेख ठिकठिकाणी आहेत ते अब्दालीचेच होत. ' रा. खं. ६. २३१, २३३, २४६–२४८ व ५५०, ४८९, ४९३, ४९६, ५७१, ५७६ वगैरे कागद वरील मोहिमेचेच आहेत.

४. दिल्लीतील भानगडी व मराठ्यांच्या कारभाराची हेळसांड, (स. १७५१–५३).–मल्हारराव होळकराने वजिरास मदत करण्याचें पत्करून रोहिल्यांवर मोहीम काढिली, त्या वेळी ह्मणजे बादशहाशी नवीन करार केला तेव्हांपासूनच, मराठ्यांकडील या नवीन उद्योगाची उभारणी किती अव्यवस्थित होती, निरनिराळ्या सरदारांत अंतर्वमनस्ये कशी बोकाळली होती, आणि तडे गेलेल्या मडक्या प्रमाणे हा व्यूह किती त्वरेने कोसळून पडण्याजोगा होता, याची कल्पना खालील पत्रांतील उताऱ्यांवरून उत्कृष्ट येते. हे पत्र बापूजी महादेवानें दिल्लीहून आपल्या भावास ह्मणजे दामोदर महादेवास होळकराचे लष्करांत लिहिलेलें आहे. [६-५५६][1] 'स्वामीस लिहून पांच हजार स्वार तुह्मां समागमें (पेशव्यांकडून) येत असे करणें. तुह्मी ह्मणाल मल्हारबा देतील, तरं त्यांजला हितोपदेशी आहेत. पठाण व मल्हारबा व सुरजमलजी व वजीर अवघे एकवट झाले, तरी पठाण झुंज घेतल्याखेरीज राहत नाहीं. हे चांडाळ चौकडी मल्हारबास मारल्याखेरीज राहत नाही. आधी तर रजपूत या प्रकारचे पाठी लागले आहेत जे, दक्षणी होय ऐसा पाहिल्यास मारूनच टाकितात बोलावून मारतात, कौल देऊन मारतात, मेजबानीस बोलावून मारतात. या प्रकारचा त्यांचा विचार. तिकडून पठाण प्राणच घेतील किंवा देतील. मल्हारबा ह्मणतात, मजला हें करणें, अथवा हरद्वारास जाऊन गोसावी होणें. त्यासी याच राज्यांत पडल्यावर ना निजामुल्मुल्कचे काम होय, ना आपला लौकिक होय. या करितां

---

१ **टीप**–या पत्राची तारीख २३ जानेवारी १७५१ आहे. कारण याच साली ९ रबिलाखर सोमवारी पडतो. यांत सफदरजंग जयाप्पा व खंडेराव होळकर यांचे उल्लेख असल्यामुळें, त्यांच्या हयातींतलें हे पत्र असून, खंडेराव होळकर २४ मार्च १७५४ रोजी मरण पावला, त्याअर्वीचा सोमवारी येणारा ९ रबिलाखर १७५१ त येतो.

कोट कामे एकीकडे ठेवून निजामुल्मुल्कास नेऊन सुभेदारीवर बसवून अवघी दक्षिण सोडवून घेणे, यापेक्षां दुसरा विचार थोर नाही. हें तों कर्तव्य. परंतु मल्हारबा आम्हांसी खुनस राखितो, तरी, इतका तरी भ्रम आहे जे, आम्हांसी (बापूजी महादेव) त्याचा ऋणानुबंध नाहीं, दादासी (दामोदर महादेवासी) तरी आहे, त्यासी तो भ्रमही जात राहिला, आणि हा पुरताच दुश्मन जाला तर संकष्ट. या दुष्टांही त्यास आग्रहांत पाडून मारूंच म्हणतात. त्यास श्रीमंत स्वामीचे साहित्य करणें श्रीमंत स्वामीचा हुकूम बाविसा सुभ्यांवर आहे. त्यांत अंतर म्हटल्यास सुभेदारांही घेऊन पाडलें. फलाणीयांणीं सांभाळिले ऐसे म्हणतील. याच गोष्टीकरितां (आम्ही) सर्व श्रीमंत स्वामीचे हातीं ठेविले मुखत्यार होऊन आजच श्री. स्वामीशी अटकेपासून तो श्वेतबंध रामेश्वर पर्यंत ज्यांनी शत्रुत्व केलें, त्या सर्वांस अद्यापपर्यंत मित्रत्व तरी ठेविले आहे. आपला स्वामी साक्षात् सीताराम अवतार आहे. श्री याजहून विशेष ऊर्जित करो हिंदुस्थानच्या पादशहाजवळी यांचा अबतियार येथपर्यंत कीं जे चित्तास येईल त्यासी राज्य द्या लिहिल्यावर सुभेदाऱ्या राज्य घेतात, खाविंद कांहींच न करीत, यासी काय करावे ! पेशव्यांचे खात्रीस्तव हिंदुस्थानचे राज्य बादशहानें माधोसिंगास दिलें. कछवाहांचे (जयपुरवाल्यांचे) घर पेशव्यांचे बडिलांही हिंदुस्थान संपादन दिधलें, त्या पेशव्यांशी बिघडून रजपुतांही दक्षिणी मात्राशी दुष्मन केले. रावराजे दलेलसिंगास थोरल्या बाईंनी म्हणजे मातुश्री राधाबाईनीं सवाई जयसिंगाची कन्या मांडीवर घेऊन राज्य दिधलें, जे, माझे वंशीचा जो कोणी होईल तो तुमचे राज्याकडे पाहणार नाही. त्याचे पंनास हजार बाईची भेटी म्हणून देत होते. त्या रजपुतांही मराठ्यांसी चहूंकडे मारिलें. त्यासी तुम्ही आलियानें पठाणाचेंही यश येऊन, मल्हारबाची अबरू राहून खाविंद काम होऊन हेंही यश येते. इकडे तर रांडा देखील मराठ्यांवर शेर जाहल्या आहेत. दिल्लीत काय फजिती लिहितां पुरवत नाहीं. अहोरात्र हे चिंता लागली आहे जे, मल्हारबा फसल्यावरी काय करावें ! त्यास वाटतें आमचे मनसबे शेवटास जाऊं नयेत. रांगड्यांत मन मानेल

तें बोलून आपल्या मुखत्यारपणास डाग लाविताते. असो. आम्ही त्यांचीं लेकरें, ते वडील आहेत, विहित जाणतील तें करतील. आपण खाविंदाचे चाकर आहों, सांगतील चाकरी ती करूं. तीर्थी बसून भटपणही करूं तर अश्लाघ्य नाही. परंतु फारच आम्हांस ये समयी गांजिले तें ईश्वर जाणें. पातशहास लिहितात जे, हे आमचे दुश्मन आहेत, यांसी काढा, नाही तरी आम्ही मरूं किंवा मारूं. तर मल्हारबा येऊन (आमची) वकालत करीत असतील, तर यापेक्षां काय विशेष आहे! परंतु जीवच घेऊं म्हणतात. जर श्रीमंत स्वारीस हिंदुस्थान राखणें आहे, तर नर्मदेजवळी यावें. आजी पांच हजार स्वार दिल्लीत आला तर श्रीमंत स्वामीची रक्षण आहे. दोन हजार स्वारही न आले तर स्वरूपच जाईल. येविशीं श्रीमंत स्वामीस लिहून पाठवा. ज्या रीतीने लौकिक होईल व सयश पदरीं पडे तें करणें. जे उत्तम मसलत असेल ते करणें. हे आशीर्वाद. ' या पत्रावरून मल्हाररावाचें दुटप्पी वर्तन, रजपुतांचा संताप, बाळाजी पेशव्याची इश्रत, इत्यादि प्रकरणांसंबंधानें लेखकाचा अभिप्राय मार्मिक असून, तो पुढील घडामोडींचा सूचक आहे. पेशव्यानें स्वतः येऊन सर्व व्यवस्था केली पाहिजे होती, ती न केल्यामुळें उत्तरोत्तर बिघाड वाढत जाऊन त्याचा कळस पानपतावर झाला. मल्हारराव होळकरामुळें पानपत बुडालें असा जो पुढे कैक वर्षे दृढ समज सर्वत्र प्रचलित झाला, त्याचा प्रस्ताव या वेळेपासूनच कसा होत चालला हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

एकंदरीत मराठशाहीचें गाडें शाहू छत्रपतीच्या पश्चात् खडकाळ सडकेस लागलें. खुद्द पेशव्याला तर ही अटकळ थोडी बहुत होतीच. कारण रोहिल्यांवर जय मिळल्याबद्दल आभिनंदन करतांनाच, 'तुम्ही सत्वर निघून दाक्षिणेंत यावें, उगाच कामें वाढवीत पुढें पुढें जाऊं नये,' असें पेशवा तिकडील मडंळीस वारंवार लिहितो. निदान या सालीं किंवा पुढील साली पेशवा हिंदुस्थानांत गेला असता तर तिकडील कारस्थानांस निराळें स्वरूप आलें असतें. बुंदेले तर ही विनंति सालोसाल पेशव्यास करीत आला आहे. पेशवा उत्तरेंत मुळीच गेला नाही ही त्याची मोठी चूक होय. एकवार तो जाता तर

त्यास तिकडील प्रकार चांगले समजून आले असते. मात्र हे प्रकार तो जाणून नव्हता असें नाही. कारण तिकडील उद्योगाची जबाबदारी सर्वस्वी शिंदे होळकरांवर न टाकितां पेशव्यानें आतां स्वतःची फौज व दुसरे स्वतःचे सरदार तिकडे पाठविले आणि लवकरच त्यांनें रघुनाथरावास या उद्योगांत सामील केलें.

सन १७५० त चौथाईचा उघड करार मराठ्यांशी करून त्यांची मदत बादशहाने घेतली हें वर्तमान अब्दालीस समजतांच, रोहिल्यांचा पक्ष घेऊन त्यानें पंजाबावर स्वारी केली आणि मराठ्यांस त्यानें धाब्यावर बसविले; म्हणजे हा उपमर्द मुकाट्यानें सहन तरी करावा, नाहीं तर पंजाबपर्यंत स्वारी करून अब्दालीच्या हातून ते प्रांत परत सोडवावे, अशा थरास हे व्यवहार आले. मराठे-अब्दालीची चुरस अशा प्रकारे रंगत चालली. मात्र पुढील दोन तीन वर्षांत हें काम अंगावर घेण्यास मराठ्यांस फुरसत झाली नाही. वास्तविक दक्षिणेतील अल्प कारस्थानांच्या नादीं लागून नानासाहेबाने उत्तरेतील उद्योग बुडविला असें वाटूं लागतें. गाजीउद्दीन यास दक्षिणेत नेऊन निजामशाहीत दुफळी करण्याचा प्रयत्न केवळ स्वार्थासाठी पेशव्यानें अंगीकारिला. तो न करतां १७५२-५३ या सालीं पुनः जोराचा झगडा पंजाबपर्यंत केला असता तर कदाचित् या बाजूचा उद्योग कायमचा निगेस लागला असता. परंतु स. १७५२ सालीं शिंदे होळकरांस वर्षभर दक्षिणेत जावे लागल्यामुळे ५१ त केलेला रोहिल्यांवरचा उद्योग सर्व व्यर्थ गेला आणि रोहिल्यांस पुनः तयारी करण्यास अवकाश मिळून, स. १७५४ त रघुनाथराव तिकडे गेला तेव्हां पुनः सर्व मांडणावळ त्यास नव्याने हातीं घ्यावी लागली.

रोहिल्यांना जिंकण्याचें काम वजिरानें पार पाडलें हीं गोष्ट बादशहाला रुचली असें दिसत नाहीं. बादशहा स्वतःच्या तंत्रानें चालणारा नसून तो ज्यांच्या तंत्रानें चाले, त्यांस वजिराचें वर्चस्व मान्य नव्हतें. शिवाय कोणाहि एकाच इसमास किंवा पक्षास वरचढ होऊं न देतां, जरुरीप्रमाणें इतरांशीं संधान ठेवून बादशहा आपला बचाव करी. पठाणांच्या बाजूचे त्याचे सल्लागार त्यास दहशत घालीत, की सय्यदांच्या वेळेस ज्या प्रमाणें मराठ्यांच्या

मदतीनें वजीर प्रबळ झाला, तसाच प्रकार पुनरपि होईल. याच हेतूनें अब्दालीच्या स्वारीचा यत्किंचित् प्रतीकार स. १७५१ त बादशहाने केला नसावा. पुढें स. १७५२ त वाजिरावें व बादशहाचें बरेच वांकडें आलें. गाजीउद्दीनास घेऊन शिंदे होळकर दक्षिणेत गेले असतां मागें दिल्लींत बादशहा व वजीर यांची झटापट सुरू झाली. पेशव्यांचा सरदार अंताजी माणकेश्वर आज पंचवीस वर्षें दिल्लीत वावरत होता, त्याने दिल्लीतील स्थितीचें वर्णन ता. २८ मार्च १७५३ च्या पत्रांत पेशव्यास लिहिले ते असें. 'सुरजमल्ल जाठ चार महिने घरास गेला होता, त्यास वजिरांनी मागतीं दिल्लींत आपल्यापाशी घेऊन आले. दिल्लीतील वर्तमान तरी आज महिनाभर कमरुद्दीनखानाचा पुत्र खानखानान इंतिज्मुद्दौला व मीर शहाबुद्दीन इमादुन्मुल्क, व आणखी एक गृहस्थ तिघांनी मिळून एक विचार केला कीं, नबाब वजीर जबरदस्त जाहला. पातशहा त्याचे हुकमांत आहे, कोणाचे चालूं देत नाही. त्यास किल्यांत खलबतास बोलावून आणून ठिकाणी लावावें आणि खानखानास वजारत द्यावी. इमादन्मुल्क मीर बक्षी आहेच. आपलाच कारभार सर्व असावा. या गोष्टीचा विचार कोणास व आह्मांसही तिळमात्र कळों दिल्हा नाही. प्रातःकाळींच बापूजी महादेवांनीं पातशहाची चिठ्ठी मात्र दाखविली की फौज पांच हजार झाडून, मजला रुबरू पाहून, गणती घेणे. तयार होऊन येणें. याच समयीं बापूजी महादेवाची एक चिठ्ठी, याच कारभाराची, पातशहाची सापत्न माता मलकाजमानी तिनें धरून किल्यांतून वजिराकडे पाठविली कीं, तूं न येणें, तुजला दगा आहे. तेच समयीं वजीर पंचवीसहजार फौज व तोफखाना तयार करून आला कीं, ज्यांनी एवढा खेळ केला त्यांस ठिकाणीं लावूं, पातशहा कैदेंत ठेवूं, दुसरा महंमदशहाचा भाऊ आहे त्यास पातशहा करूं. तेव्हां तमाम शहरांत हंगामा झाला. पातशहांनी वारंवार सांगून पाठविलें कीं 'मोठा भरंवसा तुमचा (अंताजीचा) आहे. मी बाळाजी रायाचा आहें. आजी माझा जीव जतन करणें. मजला आजी जन्मांची चाकरी लाखा फौजेची पावली.' तेव्हां पातशहाचें समाधान केलें कीं, हजरत, आम्ही चाकर. मरून बरें म्हणूं.

आपली खातरजमा असों द्यावी. तोंवरी बापूंनीं कळों दिल्हें नव्हतें. मग बापू गळां पडिले कीं, आजी पातशहाचे व आमचे जिवाचे सोबती होणे. पातशहा जन्मवरी श्रीमंतांचा उपकारी होईल. त्यावरून मान्य करून झुंजास उभा राहिलों. त्या समयीं पातशहाचें लहान मोठे अमीर वजिरास सामील जाले. खानखानान, मीरबक्षी व आम्ही, तिघे मागें राहिलों. इतक्यांत नबाब वजिराची चिठी आली कीं सरदार शिंदे होळकर आमचे भाऊ. अंतर्वेद आम्ही दिल्ही तेव्हां करार की ज्याजवरी तुमची चढाई, त्याजवरी आमची, आमची त्याजवरी तुमची. ऐसा करार आहे. तुम्ही सरदार एक असाल तरी येणें. त्याजवरून आम्ही त्रिंबकपंत सुभेदार वजिराकडे पांच स्वारांनिशीं पाठविला जे हें कांहीं आम्हांस ठाउक नाही. आम्हीं यमुनास्नानास आलों. ते अकस्मात् पाहिले म्हणून उभे राहिलों. तेव्हां त्यानीं आमच्या गृहस्थाची चिठीच दाखविली. वजीर म्हणों लागला की तुम्ही माझे अहां. बरें, समजोन घेईन. एके दिवशीं तमाम हिंदुस्थानचा अंमल उठवीन. तुम्हीं मजशी बेइमानी केली. राजश्री पंतप्रधान व सरदार मजला बेइमान म्हणतील म्हणून चिठी दाखविली. त्याजवरून बहुतां प्रकारें वजिराचें समाधान केलें, की ' आजी पातशहास तुम्ही वाईट केलें तरी तुमचे पदरीं स्वामिद्रोह पडिला. मागें सख्यदाचें नांव घ्यावयास राहिलें नाहीं व तुह्मांस बरें वाईट तरी यांची पातशहात जाईल. शत्रु अब्दाली साठ हजार फौज अटकेवरी येऊन त्याचा येलची दिल्लीतच आहे, आणि हें काम काय करितां. ! कृपाकरून आपल्या ठिकाणास जावे.' त्यावरून वजीर आपल्या ठिकाणास गेले. पातशहा वगैरे आपआपले ठिकाणी बैसले. आम्ही ही आपल्या ठिकाणी आलों. दुसरे दिवशीं तों फौजेची तयारी मागती सर्वांची जाली. मागती पातशहाची चिठी आली कीं ' मी खावंद आहें. माझे चाकरीस पंत प्रधान यांनीं पाठविलें तरी साफ मजपाशी येऊन मरणें. मी आज़ वजिराचे दोन सुभे अयोध्या व प्रयाग आहेत ते बाळाजीरायास देतों. माझ्या कामास तुम्हीं येणें. नाहीं तर तुम्हांस वजिराकडे पाठविलें असलें तरी वजिराकडे जाणें,'

बापूचा कौल करार पातशहाचा पहिलाच होता कीं हे फौज पांच हजार तुमची आहे. तेव्हां बापूजी महादेवास सांगून पातशहाचे स्वदस्तुरचे दोन सुभ्याचे शिक्के करून घेवविले. पुढे होतां होईल तें पाहवें. वजीर मारून टाकावा तेव्हां ते सुभे खरे. असो. दुसरे दिवशीं वजिरांनी चिठी पाठविली की 'माझी वजारत तुह्मी करूं चाहतां. बरे तूर्त सनद आगऱ्याची सुरजमल्लास देतों. अंतर्वेद पठाणास देतों. श्रीकाशीचा अंमल तगीर (रद्द) करितों. पुढें रजपूत आह्मीं एक होऊन जे आह्मांस घडेल तें करितो.' त्याजवरून अर्जी केली कीं या प्रसंगी मी चाकर आहें. त्यांनीं मेळविले आह्मी गमाविलें, ऐसें न करणें. त्यांनीं सांगितलें, मजकडे येणें, जहागीर दहा लाख रुपयांची तुह्मांस देतों. त्याजवरून विनंती केली कीं आह्मी चाकर श्रीमंतांचे तैसे तुमचे, तैसेच पातशहाचे. सर्वांनीं आह्मांवरी कृपा करावी. तुह्मी उभयतां न भांडावे. पातशाही न बुडवावी. आह्मांस पातशहाकडेच असो द्यावें. चार दिवस आपण डेरे बाहेर देऊन राहवें. त्याजवरून त्यांनी अर्जीमाफीक डेरे बाहेर दिल्हे. आमचीं ताकीदपत्रें अंतर्वेदीच्या अमलाचीं दिल्हीं, तीं गोपाळ गणेश बर्वे याजकडे रवाना केलीं. कामांतील फितूर तोडला. हें वर्तमान बापूस सांगितलें. बापूंनीं साफ सांगितले जें, 'जर पांच स्वार तुमचे वजिराकडे गेले तरी पातशहा आमचा तुटतो. आह्मांस पुढें अयोध्या प्रयाग दोन सुभे घेणे. श्रीमंतांजवळ तुमचें घर बुडेल. आमचे आज्ञेप्रमाणें तुह्मी पातशहाची चाकरी करणें. वजिराचा पैका व जहागीर लागत नाहीं.' आह्मीं बापूस सांगितलें जे, उभयतांची समजाविशी करूं. उभयतांही आह्मीं राजी केले आहेत. परंतु बापूच्या व खानखानानच्या चित्तास येत नाहीं. याजमुळें नबाबही आपले डेऱ्यांत चाळीस हजार फौज जमा करितात. युद्ध होईल, दहा पांच हजार माणूस मरेल तेव्हां हे कलागत तुटेल. वजीर ही डोहणा भारी करील. कलागत कोण्या थरास जाईल पाहवें. अब्दाली अटकेवरी आहे. मीरमन्नू लाहोरीं आहे. पठाणाचा येलची आला होता तो यांचा घरकलह पाहून गेला आहे. वजीर फारच बिघडला तर अब्दालीसही आणील किंवा काय कळेना,

किंवा आह्मांकडे बिघडील पाहवें. अयोध्या व प्रयाग दोन सुभे वजिराचे आहेत, याशी मारल्या उपरी उत्तमच आहे. पाया करून घेतला आहे. चिंता काय ! सारांश, बापूजी महादेवाचे आज्ञेनें आहो. काशीचा अंमल करून घेतला, अंतर्वेद, आगरें राखिलें. पुढेही सरदार या प्रांतां येत तोवरी आपल्याकडील बंदोबस्त राखूं. वजिराचा व सरदारांचा फारसा घरोबा आहे. रात्रंदिवस त्यांची पत्रे यांस यांची त्यांस येत जात असतात. सरदारांचा व वकिलांचा फारसा मनोदय आहे की मागती गाजुद्दीखानाचे पुत्रास दक्षणेचा सुभा सांगावा. परंतु त्याजवळ दोन हजार फौज नाहीं. दक्षिणेची सुभेदारी स्वामींची आहे, ज्याजकडे स्वामी तोच सुभेदार. स्वामीच्या आज्ञेप्रमाणे सलावतजंगास सनद करून देववितों. आमचा जीव लहान आणि यंदांची चाकरी आह्मांवरी केवढी भारी पडली. हे चाकरी उभयतां सरदारांनीं करावी, ते सेवकानें केली. आमचा कारकून वजिराकडे जाऊन काशीचे परवाने घेतले, आगरे अंतर्वेदीच्या ताकिदी घेतल्या आणि गोड गोष्टी सांगितल्या. याजमुळें बापू आह्मांवरी श्रमी आहेत. वरकड पातशहास सोडून जातों तरी पैका व जहागीर तयार होती. परंतु वकिलांनी साफ सांगितलें कीं तुमचे चाकरीवरी आजी पातशहा राजी. श्रीमंतांचा लौकिक राहून दोन सुभे मिळतात, नाहीं तरी हें अपेश तुमचे माथां. त्यावरून वकिलाच्या सांगितल्यावरून पातशहाकडेच राहिलों. दिल्लीत आमची फौज पांच हजार आहे आणि स्वामीच्या फौजेचा नक्ष आहे त्याप्रमाणें दुसऱ्याचे फौजेचा नाही. चाकरीचा मजुरा तों जिवापेक्षां करून दाखविला, स्वामींची फौज येथें राहिली, त्यानें मौठासा लौकिक राहिला, आणि बंदोबस्त राहिला; पातशहा उपकारी जाला. आह्मीं आपले तोंडें स्तुति काय लिहावी. पातशहाच लिहितील. वकील (हिंगणे) आमची चाकरी लिहितील न लिहितील. आजी दिल्लीत फौज एक एक स्वार लाखाचा जाला, त्यांत मराठी फौज तरी बहुतच चहातात. पातशहापाशीं पैका नाहीं. मुलुख जो मागाल तो स्वामीस देईल, याप्रमाणें राजी करून ठेविला आहे. येथे पातशहानी आह्मांस सप्तहजारी केलें, साहेबनौबत

मरातीब दिल्हे: स्वामींनीं मात्र कृपा करून या साहेबनौबतीची आज्ञा केली पाहिजे, नाहीं तरी येथील येथें ठेवावयाची आज्ञा जाली तरी ठेवूं. 'पाऊण लाख रुपयांची तपशीलवार पुरवणी आलाहिदा लिहिली आहे. गोविंदबल्लाळावरील पाऊण लाखाची सनद जरूर पाठविणें.' [भा. व. ऐ. प. या., पु. १ ले. ५०] हें विस्तृत पत्र दिल्लीतील स्थिति चक्र दाखवितें. पुढें अंताजी माणकेश्वर व हिंगणे यांचा तंटा बराच विकोपास गेला, त्याचें बीज असे कीं, अंताजी थोडासा स्वतःची प्रौढी मिरविणारा असून तो परभारें वजिराशीं वगैरे उलाढाली करूं लागला हा प्रकार हिंगण्यांस सहन जाला नाहीं. स. १७५२-५३ त शिंदे होळकर दक्षिणेंत असल्यामुळें, एकटा अंताजी पेशव्याची पांच हजार फौज घेऊन पातशहाचे संरक्षणासाठी दिल्लीस होता. मराठ्यांचा अंमल उत्तर हिंदुस्थानांतून उठविण्याविषयीं अब्दाली कसा टपून बसला होता, याजा उल्लेख वरील पत्रांत आहे. अंताजीनें फौज बाजूविली तिला आगाऊ परवानगी घेतलेली नव्हती आणि तिच्या खर्चास पैसा नसून तारांबळ उडाली होती. पेशव्यानें अंताजीचा बंदोबस्त २०·१०· १७५३ रोजी करून दिला. [ना. रो. १·६९] अंताजी माणकेश्वराच्या कामगिरीचे उल्लेख ६.१४९, १८९, २०१ वगैरे ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत.

सन १७५२ नंतर पेशव्याचा जम दक्षिणेंत चांगला बसला, तेव्हां स. १७५३ त कर्नाटकाकडे नजर टाकण्या ऐवजीं त्यानें उत्तरेंत स्वारी केली असती तर वरील भानगडींचा बंदोबस्त त्यास करतां आला असता. विशेषतः शिंदे होळकरांचें भांडण मिटविलें पाहिजे होतें (३· ४३३). 'सांप्रत जयापाचे कागद येतात, त्यांत मल्हारबाची व त्याची चित्त शुद्ध नाही. ओड करून स्वतंत्र जाऊन उत्पात करावा असें दिसतें. याच प्रमाणें मल्हारबाकडील ही पत्रें येतात, त्यांतही भाव हाच आहे. जयापाचें केलें शेवटास न जावें. ऐसे परस्परें विरोध व परराज्यांतील कलहांचें मूळ आजीपासूनच लागलें आहे.'[1] (१·२). 'थालनेरांत राघोबा व मल्हारजी होते. ते तेथून कूच करून

१ टीप:—हें पत्र १०·६ १७५० चें आहे, २·६·१७५० चें नव्हे.

हिंदुस्थानांत गेले. पृथ्वीपतीकडील बोलावणें आलें कीं कोटि रु. देतों, आह्मांकडे येणें. त्यास हे पृथ्वीपतीकडेच जाणार. जयाजी शिंदा पुण्यांतच होता, त्यास सांप्रत निरोप दिल्हा. कोणीकडे जाणार कळत नाही.' [३·४३३, ३०·९·५३] सारांश, वजीर बादशहांचें अत्यंत वांकडे येऊन मराठे सरदारांस ते आपापल्या पक्षांत ओढीत होते; अब्दाली व रोहिले मराठ्यांचा सूड घेण्यास टपले असून, शिंदे व होळकर, अंताजी व हिंगणे, एकमेकांशी भांडत होते, अशा अत्यंत आर्णाबाणीच्या वेळी तडजोडीनें सुव्यवस्था लावण्याचें काम एकटा नानासा० करूं शकता; किंवा निश्चयाच्या धैर्यानें व जरबेनें एक सदाशिवराव करूं शकता. परंतु यांपैकीं एकही उत्तरेंत स्वतः गेला नाहीं; आणि अनभ्यस्त, अल्पवयी, व अनिश्चित रघुनाथरावाची तिकडे रवानगी झाली, या योगानें असेलला घोटाळा ज्यास्तच दुणावला हें पुढें व्यक्त होईल. 'यंदां आह्मांस चाकरी भारी पडली,' असें अंताजी लिहितो. ह्मणजे लहानावर मोठी जबाबदारी निष्कारण टाकली गेली. 'विजयादशमीनंतर स्वारीसाठी बाहेर निघणें होईल. जिकडे कार्य विशेष दिसेल तिकडे श्रीकृपेनें जाणें होईल,' असें स. १७५४ च्या सेप्टेंबरांत पेशवा जयापास लिहितो. [का. सं. प. या. ३५७]. ह्मणजे उत्तरेंतील कार्य त्यास महत्वाचें वाटलें नाहीं. जाग्यावर बसून लेखणीच्या जोरावर कारभार चालविण्याच्या घमेंडींत पेशवा स्वस्थ राहिला, त्याची अढल पुढें पानपतावर घडली[१].

---

१ टीप:—ह्या वेळच्या घडामोडींसंबंधानें खालील कागद स. १७५३ ते १७५६ सालचे कालनुक्रमाने दर्शनीय आहेत.

रा. खं. ६ ले. २७४, २७५, २८२, २८५, २९१, २९७–२९९, ३०२, ३२०, ३२१, ३२४, ३२८, ३३४, ३३९, ३४१, ३४३, ३५८, ३६२, ४८५, ४८६, ५१०, ५१४, ५२१, ५२२, ५२४–५२६, ५४१, ५४३, ५४५, ५५७, ५५८.

रा. खं. ३. ३९७, ३९८, ४१४, ४३२, ४३३, १४१, १४०, ४४६, ४५२, ४५४, १५१, १५२, १३७, १५६.

का. सं. प. या. ले. ३२, ३७६, ३८०, ३१. ३९३, ३३८, ३८२, ३५२, ३५१, ३८६ व ४५१.

५. **बादशहावजिरांचें युद्ध** (मे, जून १७५३).-रोहिल्यांचा पाडाव करण्यांत आरंभी जरी बादशहा व सफदरजंग वजीर यांचा एकं विचार होता, तरी मराठ्यांच्या मदतीनें वजीर वरचढ झाला असा संशय बादशहास येऊं लागला. सफदरजंग रोहिल्यांवर गेला असतां मागें बादशहाची आई ऊधमबाई व खोजा जावेद यांनीं वजिराचा अधिकार काढून घेण्याचा प्रयत्न चालविला. त्या दोघांचें अंतःसख्य असून, त्यांच्या दुष्कृत्यांची चर्चा राजधानींत उघड होत असे. बादशहा सर्वस्वी त्यांचे तंत्रानें वागून त्यानें खोजास मोठ्या पदव्या वगैरे देऊन योग्यतेस चढविलें. या कारणानें सफदरजंग दिल्लीस आल्यावर त्याचें व बादशहाचें उघड वैर जुंपलें. त्यांत बादशहास मदत मीरशहाबुद्दीनची होती. हा मीरशहाबुद्दीन थोरल्या गाजीउद्दीनचा मुलगा व निजामुल्मुल्काचा नातू १७-१८ वर्षांचा दिल्लीत मीरबक्षीच्या कामावर होता. त्याजवर प्रथम सफदरजंगाचे पुत्रवत् प्रेम होतें. गाजीउद्दीनचा दक्षिणेंत खून झाला ही बातमी दिल्लीस येतांच सफदरजंगानें बादशहाकडून मीरशहाबुद्दीनास बापाच्या जागीं कायम करून त्यास गाजीउद्दीनखान अमीरुलमरा इमादउन्मुल्क असे किताब दिले. मयत गाजीउद्दीनचे प्रेत दिल्लीस आणण्यांत आले, त्याबरोबर जड जवाहीर वगैरे एक कोटीची संपत्ति परत आली, ती शहाबुद्दीन यास मिळाल्यानें त्याचें सामर्थ्य वाढलें.

बादशहा सर्वस्वी खोजा जाबेद व ऊधमबाई यांचे तंत्रानें वागत असल्यामुळें सफदरजंगानें खोजास मेजवानीस आणून कपटानें ठार मारिले, (जुलई १७५२). त्यामुळें बादशहाचें व सफदरजंगाचें जोराचें वांकडे आलें. तेव्हां जाठाची मदत आणून बादशहाशीं लढण्याची त्यानें तयारी केली. माजी वजीर कमरुद्दीनखान यास दोन मुलगे होते, एक मीर मन्नू लाहोरच्या कारभारावर होता; व दुसरा इंतिजामुद्दौला खानखानान म्हणून होता, त्यास बादशहानें जवळ आणून कारभार चालविला. तेव्हां सफदरजंगानें वजिरी सोडून आपल्या अयोध्येच्या सुभ्यावर जाण्यास रजा मागितली, व ता बादशहानें आनंदानें दिली. या खबपटींत मीरशहाबुद्दीन बादशहाचे बाजूस होता, त्यामुळें अर्थात्

त्याचेंही सफदरजंगाशीं वांकडें आलें. सफदरजंग दिल्लींतून निघून जाईना, आणि बादशहास पदच्युत करून दुसरा इसम तख्तावर स्थापण्याचा विचार करूं लागला. तेव्हां उभयतांचें उघड युद्ध जुंपलें. १०·५·१७५३ पासून हें युद्ध कांहीं महिने थोडें बहुत चाललें. बादशहाचे बोलावण्यावरून नजीबखान रोहिलाही फौज घेऊन ३ जून रोजी दिल्लीस येऊन पोंचला. पंजाबांतून मीर-मन्नूने पांच हजार फौज पाठविली. ६ जून रोजीं बादशहा व वजीर यांची दिल्लींत लढाई झाली, पण निकाल असा लागला नाहीं. पुढें माधवसिंगाच्या मध्यस्थीनें तडजोड होऊन युद्ध थांबलें; आणि म्यानसानाग व मीरशहाबुद्दीन यांनीं राजधानींत कांही दिवस शांतता केली.

या युद्धांत दोनही पक्ष मराठ्यांस आपापल्या बाजूस वळवीत होते. शिंदे होळकर दक्षिणेंत असून अंताजी माणकेश्वर दिल्लींत होता, त्याची चलविचल झाली. तो हिंगण्यास लिहितो. 'सरदारांनीं आम्हांस पातशहाचे चाकरीस पाठविलें. फौज अडीच हजार. आम्ही ग्वाल्हेर प्रांतास आलों, तेव्हां तुमचीं पत्रें दोन चार आलीं कीं नबाब वजिराने नबाब बहादर (जावेद) मारिला. पुढें पातशहाशी दगाबाजी करणार, याजकारितां पातशहांनी बोलवूम सांगितलें कीं तुमची फौज पांच हजार सत्वर बोलावणे. करारप्रमाणें पांच हजार फौजेनिशी आपले सरदार चाकरीस बोलावणें. खुणी फौज आली तरी कार्यास येणार नाही. करारांत अंतर नसावें. [२१·३·१७५३ खं ६·२७४.] अंताजी जवळ फक्त अडीच हजार फौज होती, त्यास आणखी अडीच हजार ठेवावी लागलीं. तिच्या खर्चास वेळेवर मिळालें नाहीं त्यावरून हिंगण्यांचा व त्याचा तंटा माजला. 'हरएक विशी तुम्हां आम्हांत या उपरी प्रतरणा कामाची नाही. जें तुमचें बरें तें आमचें व आमचें ते तुमचे बरे. ऐशव्यांकडून रकम आणून तुमचें कर्ज फेडूं' असें अंताजीनें लिहून दिल्यावर हिंगण्यांनी त्याम कांही रकम दिली (६·२७५). पुनः अंताजीपंत स. १७५३ च्या एप्रिलांत लिहितो, 'आम्हांस नबाब वजिरानें दहा लाख रुपये देऊन आपणा-कडेस घेऊन जावयासी करार केलें. तुम्हीं साफ सांगितलें जे दहा लाख कामाचे

नाहींत, त्यांत श्रीमंतांचें नुकसान आहे, तरी त्याचा पैका टाकून पातशहाचे चाकरीस आमचे आज्ञेप्रमाणें एकनिष्ठ राहणें. त्यावरून आपण मान्य केलें. अतःपर वजीर आह्मांस पंचवीस लाख रुपये देईल तरी त्याजकडे जाणार नाहीं. तुह्मी पातशहाची एकनिष्ठ चाकरी सांगाल त्याप्रमाणें करूं.' अंताजी व हिंगणे यांचें वांकडे येण्याचें हें दुसरे कारण आहे. वजिराकडून लालूच घेऊन तो त्यास मिळण्याचे खटपटींत होता, व हिंगणे त्यास विरोध करीत होता. स्वार्थ साधेल तिकडे फुटण्याचा लहान मोठे मराठे सरदारांचा हा स्वभावच होय.

दिल्लीतील हे प्रकार पेशव्यास कळून त्यानें शिंदे होळकरांस ताबडतोब तिकडे जाण्याविषयी सांगितलें. परंतु त्यांच्यांत वैमनस्य असल्यामुळे ते लवकर निघाले नाहींत. ता. १३ जुलई १७५३ रोजी होळकर 'आमची हिंदुस्थानास जावयाची त्वरा आहे' असें लिहितो (६·२८५) इकडे हिंगणे व अंताजीपंत यांचा बेबनाव वाढतच गेला [६·५१०, ४८६]. हिंगणे पुनः लिहितो, 'पातशहाचे मातुश्रीने खानखानानचे वियमानें सलुखाचा डौल केलाच होता. त्या उपरी मीरबक्षीनें (मीर शहाबुद्दीन) खानखानास खरे करून आपले लगामी लाविलें व सलूख करूं लागले. सफदरजंगास सुभे अयोध्येचा खिलत पोंचला. पादशहा तों शपथ वाहतात कीं आह्मीं पाठविला नाही, उदईक सफदरजंग कूच करून सुभ्याकडे जाणार ह्मणून वार्ता आहे. पातशहाचे मातुश्रीने मीरबक्षीसवें रोहिल्यांशी आह्मांकडून लढाईचे पह्यावर आणून गुप्तरूपे खानखानाचे हवाला खिलत सुभ्याचा केलासा वाटतो. आह्मी लढाई करावयाचाच उद्योग करवितों. सफदरजंग मित्रभंग करून पळून जाणारसें वाटतें. सुरजमल रोहिल्यांचें पायदळ ठेवीत आहे. आपली भारी फौज सत्वर येती तर उत्तम होतें. लढाई आठ महिने थांबविली. कोठवर बुद्धिबळ चालेल.' (४·१०·१७५३, ६·५१४) 'पातशहा आह्मांस संशय येऊन ह्मणूं लागले की, जर तुह्मी आह्मांकडून लढाई करवितां, जर तुमचे खाविंद येऊन सलूख करवितील अथवा रुपये मागतील, तेव्हां आह्मी कोठून रुपये आणावे. यास्तव तुह्मी साफ आह्मांस लिहून द्या कीं श्री,

रघुनाथराव आल्यावर सलूख करणार नाहींत; व सख्य करणार नाहींत. मीर शहाबुद्दीनशी सामील होऊन सफदरजंगास व जाठास मारावें. नाहीं तर आह्मी आपल्याकडून वजिराची तकशीर माफ करून जाठासही वाटे लावूं. सुलूख सर्व तुह्मी घेतला. आतां हा किल्ला येऊन मागाल तेव्हां आह्मी काय करावें!' (६·५२१).[1] सप्टेंबर ता. २३ सं. १७५३ च्या पत्रांत खालील मजकूर आहे. 'होळकर राघोबादादांबरोबर हिंदुस्थानास कूच करून गेले. मनसूरअलीखानाशी व पातशहाशी युद्ध लागले आहे. यांस पातशहानें करोड रुपये देऊं करून मदतीस बोलाविलें व मनसूरअलाखानांही करोड रुपये देऊं करून बोलाविलें. त्यास पातशहाकडेच जातात. जयाजी शिंदे चांभारगोंद्यांत आहेत. सांप्रत वदंता शहरांत उठली कीं होळकरास दोन घाव लागले आहेत. कोणा पाटलाची बायको लेकाने घरांत घातली, ह्मणोन त्यानें मारलें, असे बोलतात.' [३·४३२ व ३३३] 'अंताजीपंतीं अकबर-महंमुदाशीं व पातशहाशी कलह लावून गेले. सांप्रत लढाई मोठी जाली.' [६·५४१] 'आह्मांस मीरबक्षी बोलावतो, जावें, परंतु कांहींच चव व जीव राहिला नाहीं. एकमूठ असते (एक जुटीनें वागते) तर आपले हाती कबज राहता. पूर्वी अंताजीपंतासाठी अडीच तीन लाख रुपये कर्ज घेतलें, त्याजबद्दल काय आज्ञा ते घेऊन त्याचे नांवें पत्र पाठवावे. श्री. नानासाहेबी साडेचार लाख रुपये अंताजी माणकेश्वरास द्यावयाची वरात पाठविली आहे, ती कशी आदा करावी?' खोजीम कुलीखानाने प्रस्तुत मोठा जुलूम शहरचे लोकांवर मांडला आहे. कित्येक साहुकार शहरांतून गेले. दुष्टबुद्धि व हिंदूंचा द्वेष आहे. आतांपासूनच याचा पाय दृढ न होई तो प्रसंग ध्यानांत असो द्यावा.' 'ऐसें न होय कीं नबाब वजीर अंताजीपंतासी बोलावून नेत. अगोदर आलेच नसते तर बरें होतें. आतां उठून गेले तर फौजेचा भ्रम उठतो.' [६·५२४ व ५२६]. 'नुपते कागद काळे करून नबाबानें दिल्हे आहेत. परंतु रुपये वसूल होणें कठीण आहे. आपली फौज पांच सात हजार या प्रांतीं आलिया-

१ टीप:-ले. २९७ व २९८ स. १७५४ मेचे याच प्रकारचे आहेत.

खेरीज येथील वसूल होणें संकट आहे. आपल्या फौजेची दहशत या लोकांस आहे. जमीनदारांनीं आह्मांस रुपये द्यावे कीं नबाबास द्यावेत? त्यांस जमीनदार दोनही गोष्टी करीत नाहींत, नबाबासही पैसा पाठवीत नाहींत आणि आह्मांसही पैसा देत नाहींत. धातुपोषणाच्या गोष्टी सांगत आहेत.' [६·५२२].

शिंदे होळकरांची इभ्रत व दहशत दिल्लीचे दरबारांत अतिशय होती. 'पातशहास सर्व प्रकारें आपल्याकडे मुतवजे जाणून, उभयतां सुभेदारांही चार दिवस वकील मुतलक करून, पठाणास आज्ञेत ठेवून, नबाबास सुभ्यास पोहोंचवावा. मग चार रुपये अधिक मिळवोत अगर कमी मिळवोत. आपला बोल वर राहून रसायनसें दिसेल. वजीर बुडाल्यावर कोण्ही तरी बरें ह्मणणार आहे! मित्रमित्र ह्मणून काम करून घ्यावें, कोठें न झुंजतां हिकमतीनेंच एक्या कामाचें, विना जोखीम, यत्न घेऊन, बाविसा सुभ्यांत हुकम करून दक्षिण हिंदुस्थान आपली करा; आणखी चौ दिवसां, गुंतेस कां, छुंथेस कां, ऐसें होईल. अयोध्येकडे गेल्यावर सफदरजंग लाखा स्वारांचा सरदार आहे.' [६·२९१]. या भानगडी मिटविण्यासाठी रघुनाथरावाची रवानगी झाली.

प्रकरण सत्तावीसावें.

मराठ्यांचा बादशाहींत शिरकाव.

१. रघुनाथरावाची पहिली स्वारी. २. बादशहाची पदच्युति, शिंदेहोळकरांचा बेबनाव.
३. ग्वाल्हेर गोहदचा पाडाव. ४. हिंगण्यांचा रुसवा. ५. नागोरचा वेढा, जगाप्पाचा खून,
६. गोविंदपंत बुंदेल्याचा कारभार.

१. रघुनाथरावाची उत्तरेंत पहिली स्वारी, (३०·८·१७५३–१७·८·५५). रघुनाथरावाच्या या स्वारीचा उपक्रम करितांना भाउसा०ची बखर लिहिणारा म्हणतो, 'बाळाजी प्रधान बीजेच्या चंद्राप्रमाणें चढते कळेनें

राज्य करीत असतां, पुढें विनाशकालें येणार भविष्य आलें. तेव्हां कलह लागण्यास कारण झालें कीं रघुनाथराव प्रथम स्वारी हिंदुस्थानचे स्वारीस पाठविले.' ह्मणजे या मार्मिक लेखकाच्या मतें पानपतच्या अरिष्टाची सुरुवात या वेळेपासून रघुनाथरावामुळें झाली. दिल्लीकडील कारभार बिघडत चालला व तो सुधारला पाहिजे ही गोष्ट पेशव्यास चांगली पटली होती. तेव्हां शिंदे-होळकरांशीं पुण्यांत समक्ष वाटाघाट करून त्यानें रघुनाथरावास त्यांजबरोबर पाठविण्याचें ठरविले. रघुनाथरावाच्या जन्म १·८·१७३४ चा असून, तो या वेळीं १९ वर्षांचा होता. या अवधींत त्याने विशेष कर्तृत्व कांहींच दाखविलें नसून उलट अव्यवस्थित स्वभावच प्रगट केला होता. [म. वि. २ पृ. २३]. स. १७५० च्या नोव्हेंबरांत तो एकदां उत्तरेंत गेल्याचें अनुमान होतें, [६·२१२, २१३]. त्याची पहिली मोठी स्वारी गुजराथेंत २०·१०·१७५१ पासून ७·७·१७५२ पर्यंत झाली. जुलई ता. ७ रोजी तो व दमाजी गायकवाड पुण्यांत होते (६ पृ. ७९). दुसरी स्वारी पुनः त्यानें गुजराथेत करून (१०·१२.१७५२–जून १७५३) २५·४·१७५३ रोजी अमदाबाद काबीज केलें. पण तोही पराक्रम त्याचा नव्हता. पेशव्याचा चुलतभाऊ सदाशिवराव हुशार होता. परंतु या व गुणामुळें तो कदाचित् पेशव्यास डोईजड बाटत असून, कौटुंबिक कारणाकरितां कांहीं तरी हेतूनें त्यानें रघुनाथरावास उत्तरेंत पाठविले असावें. आपल्या घरांतील एक खासा निरनिराळ्या दिशांकडील व्यवहारांवर देखरेख ठेवणारा बाहेर असला, ह्मणजे कारभार व्यवस्थित चालेल अशी पेशव्याची भावना असावी. शिवाय चुलतभाऊ सदाशिवराव जर इतका हुशार, तर सख्खा भाऊही तसाच किंवहुना वरचढ होईल, अशा कांही तरी कल्पनेनें रघुनाथरावाची रवानगी झाली. मात्र परिणामावरून ती योग्य झाली नाही असें स्पष्ट दिसतें. सर्व कुटुंबीयांस लहानपणापासून पराक्रम दाखविण्याची संधि देण्याचा पेशव्यांचा नेहमीचाच रिवाज होता. त्या धोरणानें रघुनाथरावास ही संधि देण्यांत आली. परंतु दिल्लीनील बिकट भानगडी उरकण्यास जास्त हुशार इसम तिकडे पाहिजे होता, हें पुढें दिसून येईल.

स. १७५३ ऑगस्ट ३० रोजीं अवशी चार घटका रात्रीस मुहूर्तानें बाहेर डेरे दिल्हे. (२ पृ. १२९१). सखाराम बापू, चितो विठ्ठल रायरीकर महिपतराव चिटणीस ही मंडळी बरोबर दिली. 'थालनेरीकडून भाद्रपद शु. १३ स (१३·९·१७५३) खासा स्वारी डेरेदाखल होईल. उभयतां सरदार सहवर्तमान फौजेनिशीं येत असों,' असें रघुनाथराव आपला मेहुणा गोपाळ गणेश बर्वे यास लिहितो. 'खानदेशांतून दादासा० दत्ताजी शिंदे व खंडेराव होळकर यांसह अजमीर प्रांतीं गेले. येथें लूट करून चौथ व सरदेशमुखी घेतली.' पुढें भरतपुरच्या जाटावर स्वारी झाली, ती सांगण्यापूर्वी जाठांचें थोडे पूर्व वृत्त देणे जरूर आहे.

जाठांचें पूर्ववृत्त व मराठ्यांशीं युद्ध[1].— भरतपूरचे जाठ हे दीगच्या दक्षिणेस ८ मैलांवर सिनासिनी ह्मणून गांव आहे तेथील राहणारे, यमुनेच्या दक्षिणेस आगरादिल्लीचा प्रदेश व्यापून होते. या प्रदेशांतील बादशाही अंमलदारांस लुटून ते सधन झाले. शहाजहान व औरंगजेब यांनीं त्यांस बरेच धाकांत ठेविलें. बहादूरशहाच्या वेळेस चूडामण जाठ प्रबळ झाला. थून किल्ल्याची मजबुदी करून चूडामणने बंडावा सुरू केल्यावर बादशहाने सवाई-जयसिंगास त्याजवर पाठविले. जयसिंगानें थूनला वेढा घातला, पण वीस महिने पर्यंत त्याचा कांहीं इलाज चालला नाहीं. स. १७१८ च्या मे महिन्यांत जयसिंग वेढा उठवून गेला. स. १७२३ त चूडामणनें आत्महत्या केली व त्याचा मुलगा हुकमसिंग गादीवर बसला. इकडे बदनसिग ह्मणून दुसरा एक प्रतिस्पर्धी उत्पन्न होऊन त्यानें जयसिंगामार्फत खंडणी भरून 'दीगचा राजा' असा किताब बादशहाकडून संपादन केला. कुंभेर व दीग या ठिकाणीं बदनसिंगानें मजबूत तटबंदी केली. भरतपूरच्या उत्तरेस दहा मैल कुंभेर, व कंभेरच्या वायव्येस दहा मैल दीग आहे. दीग बरोबर मथुरेच्या पश्चिमेस येते. बदनसिगास सव्वीस मुलगे होते. पैकी पांचवा सुरजमल्ल बापासारखाच पराक्रमी असून बापाचा कारभार पाहत होता. सवाई जयसिंगाचेंही सुरजमल्लावर पोटच्या मुलाप्रमाणें

१ टीप.—आधार—इ. सं. ऐ. च. २·१; भा. सा. च.

प्रेम होतें. स. १७५५ त बदनसिंग मरण पावून सुरजमल्ल गादीवर बसला. बारा वर्षे पावेतों हिंदुस्थानांतील घडामोडी व कारस्थानें सुरजमल्लास चांगलीं ठाऊक होतीं. जयपुरच्या ईश्वरसिंगास सुरजमल्लाचें साह्य होतें, आणि शिंदे-होळकरांनी स. १७४९ त जयपुरावर चाल करून माधवसिंगास गादीवर बसाविलें, तेव्हां अप्रत्यक्ष रीतीनें मराठ्यांस जाठांशीं लढण्याचा प्रसंग आला. मराठे चौथाई वसूल करूं लागले, त्यामुळेंही जाठांस वैषम्य वाटूं लागलें. रोहिल्यांशीं लढण्यांत सुरजमल्लाची मदत सफदरजंगास होती. पुढें बादशहा व सफदरजंग यांचें दिल्लीत स. १७५३ च्या में पासून जें निकराचें युद्ध सहा महिनेपावेतों चाललें, त्यांत वजिरानें आपल्या मदतीस सुरजमल्ल जाठास आणिले. जाठानें दिल्लीस वेढा घालून कांहीं काळ पावेतों बादसहास त्राहि त्राहि करून सोडिलें. अंताजीपंतही वजिरास मिळण्याचे बेतांत होता. परंतु त्यास हिंगण्यांनीं कसेंबसें थांबवून धरिलें. सहा महिनें झगडून कांहीं लभ्यांश नाहीं असें पाहून वजीर लखनौस आपल्या सुभ्यावर निघून गेला. इतउत्तर दिल्लीच्या भानगडींत लक्ष न देतां तो वस्तुतः लखनौस स्वतंत्र राज्य समजून वागूं लागला. इकडे सुरजमल्ल जाठही भरतपुरास परत आला, तेव्हां जाठाची प्रथम खोड मोडणें हें बादशहाचें व मीरशहाबुद्दीनचे निकडीचें काम होऊन, त्यासाठी पूर्वीच्या कराराप्रमाणें मदतीस फौज पाठविण्याविषयी बादशहाचीं लिहिणीं पेशव्यास सारखी येत होतीं. तेव्हां रघुनाथराव व सरदार मोठ्या फौजांसह विजयादशमीस निघून प्रथम जाठांवर चालून आले. त्यांच्या मदतीस दिल्लीहून बादशहानें आपला तोफखाना वगैरे पाठविला. मराठ्यांच्या फौजा केव्हांही स्वारींत आल्या ह्मणजे खंडण्या वसूल करीत येत. डिसेंबरांत रघुनाथराव माळव्यांत उतरला. 'माधवसिंग जयनगरास आले. सरकारची फौज जयनगरासमीप आठ दहा कोशांचे अंतरानें आहे.' [५·१·१७५४, १·२०]. प्रथम रघुनाथराव, खंडेराव होळकर व दत्ताजी शिंदे यांसह अजमीर प्रांतांत गेला. तेथें रजपुतान्यांतील खंडणी वसूल करून ते सर्व कुंभेरीस जानेवारी १७५४ त आले. जाठ खंडणी भरपूर देईना, कुंभेरीच्या किल्ल्यांत राहून लढूं

लागला, त्याजला नरम करण्याविषयीं मीरशहाबुद्दीनचीही निकड होती. सबब रघुनाथरावानें कुंभेरीस वेढा घालून जाठांशी युद्ध चालविलें. हें युद्ध जानेवारी-पासून १७ मेपावेतों चार महिने चाललें (१·३५). भाऊसाहेबांचा बखरकार ह्मणतो, (पृ. ५), 'ढोलपुरपावेतों खंडण्या घेत मराठ्यांच्या फौजा आल्यावर जाठांचा मुलूख लागला, तेव्हां सुरजमल्लाचा कारभारी रूपराम कटारे (कोठारे) चौघरी येऊन भेटला. क्रोड रुपये खंडणी दादासाहेब मागूं लागले. वकील चाळीस लक्षपर्यंत देण्यास कबूल झाला. तें न ऐकतां कुंभराच्या रोखें चालिले. सुरजमल्ल फौजबळें, द्रव्यबळें चांगला सामर्थ्यवान होता. भरतपूर, दीग, रामगड व कळवण-दुर्ग हे असाध्य, यांचा बंदोबस्त करून आपण कुंभेरींत बळ बांधोन राहिला; आणि दादासाहेबांकडे पांच गोळ्या व दारू पाठवून कळविलें कीं, चाळीस लक्ष रुपये देतों ते घेण्यांत यावे, नाही तर युद्धास उभे राहवें. दादांनीं विषाद वाटून कुंभेरीस मोर्चे लाविले. परस्परें मार होऊं लागला. रेतीचे रानामुळें सुरुंगास यत्न नाहीं. मोहरा इरेस पडला, आंतून कोणा सलूयास येईना. असा दीड महिना झाला. एके दिवशी खंडेराव होळकर (अहल्याबाईचा नवरा) केवळ बेहोष होता, तो भोजन करून मोर्चात निशाणापाशीं आला, तों एकाएकीं जे-जालेची गोळी लागून मोर्चात ठार झाला.' खंडेराव होळकराचा जन्म स. १७२३ च्या दसऱ्याचा असून याबेळीं तो ३० वर्षाचा होता. [देवी अहल्याबाई, पुरुषोत्तमकृत]. एकुलता एक मुलगा गेलेला पाहून मल्हारावाचें देहभान सुटलें. लहानथोरांनीं येऊन समाधान केलें. उत्तरक्रियेकरितां रघुनाथरावानें दहा हजार रुपये लगेच दिले. तेरा दिवस कृत्य होऊन दानधर्मही चांगलाच झाला. मल्हाररावानें त्वेषानें प्रतिज्ञा केली कीं, ' सुरजमल्लाचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरीच जन्मास आल्याचें सार्थक. नाहीं तर प्राण-त्याग करीन.' हें वर्तमान जाठास समजतांच घाबरा झाला. तीन महिने झाले, सर्व सरंजाम संपत आला. सबब रूपराम वकील व ज्येष्ठ स्त्री अनसूया यांस बोलावून मसलत विचारली. अनसूयेनें सुचविलें, जयाजी शिंद्याचेमार्फत यत्न करावा.

इकडे मीरशहाबुद्दीननें दिल्लीहून येऊन ३ मार्च रोजीं मल्हाररावाची भेट

घेऊन भरतपुरास वेढा दिला. तेव्हां दिल्लीस बादशहा व वजीर खानखानान यांनीं मीरशहाबुद्दीनचे विरुद्ध खटपट चालवून आंतून जाठाशीं पत्रव्यहार सुरू केला. हें मीरशहाबुद्धिनास कळतांच त्यानें दिल्लीचे सभोंवार लुटालूट आरंभिली. तेव्हां जाठास मदत करण्याकरितां स्वतः बादशहा फौज घेऊन येऊं लागला. परंतु त्या फौजेवर मल्हाररावानें छापा घालून तिचा फडशा उडविला. या छाप्यांत मराठी फौजेनें स्त्रियांचीही फार अब्रू घेतली, हें जयाप्पास न आवडून त्यानें लुटींत भाग घेतला नाही [नातूकृत महादजी शिंदे पृ. २९].

सुरजमल्लानें रूपराम कटारी याचा पुत्र तेजराम यास जयाजी शिंद्याकडे पाठवून कोणत्याही प्रकारें आपला बचाव करण्याविषयी विनंति केली, तेव्हां जयाप्पानें जाठास मदत करण्याचें वचन दिलें. हा प्रकार मल्हाररावास कळल्यावर त्याचें व जयाप्पाचें पूर्वी बनत नव्हतेंच, त्यांत आतां भयंकर वितुष्ट पडलें. अशा स्थितींत रघुनाथरावानें चार मंडळी एकत्र जमवून सल्ला घेतला. सखाराम भगवंत बोकिल हा गृहस्थ पुरंदरचा राहणारा बरेच वर्षांपासून पेशव्याजवळ काम करून हुशार म्हणून नांवाजलेला, या वेळीं मुद्दाम पेशव्याने रघुनाथरावाबरोबर दिला होता. त्यानें निक्षून सांगितलें, 'शिंद्यांकडून सरकारच्या अहिताची गोष्ट कदापि होणार नाही. तेव्हां शिंद्यांचे मार्फत तूर्त साधेल तसा तह करून घ्यावा, याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.' म्हणोन तोच मनसबा निश्चयांत आणिला. जयाप्पानें कचेरीस येऊन कळविलें, कीं आजचे समयीं खंडणी घेऊन पुढें मसलत फत्ते करावी. पदरीं फौज भारी, एक जागां राहिल्यास निभावणी कठीण.' तेव्हां विचाराखालीं कित्येक दिवस गेले. इतक्यांत मारवाडच्या गादीविषयीं तंटा लागून रामसिंगाचे वकील मदत मागण्यास जयाप्पा शिंद्याकडे आले. तेव्हां शिंद्यानें रघुनाथरावास कळविलें, 'सर्वांनीं एक जागां राहून मसलत बुडबावी हें ठीक नाहीं. पदरीं फौज भारी यांस काय द्यावें ! सबब आम्हीं मारवाड प्रांतीं निघोन जातों.' असें सांगून नगारे वाजवून, मोर्चे उठवून गोटांत आणिले. हें पाहून होळकरास अति चीड आली. परंतु नाइलाजास्तव तो जाठाशीं सलूख करण्यास कबूल झाला. तेव्हां

जयाप्पाचे मार्फत जाठानें साठ लक्ष खंडणी भरून तह केला. ता. १७ मे १७५४ रोजीं तह पुरा होऊन मराठ्यांनीं दुसरे उद्योग हातीं घेतले. जाठाचा पाडाव केल्याचें वर्तमान रघुनाथरावानें सफ्दरजंगास मोठ्या डौलानें कळविलें (१·३५). रूपरामानें खंडणी भरून तह घडवून आणिल्याबद्दल त्यास दर शेंकडा २ रु. देत जाण्याचा करार १७·२·१७५५ रोजीं पेशव्यानें केला. (ना. रो. १·२२५).

२. बादशहाची पदच्युति, शिंदेहोळकरांचा बेबनाव.—शिंदे-होळकरांचें भांडण कैकवर्षें धुमसत होतें, त्याचा आतां उघड वैरभाव बनला. या दोन आधारस्तंभांचें वैर हें नुसते पानपतच्या अरिष्टाचें नव्हे तर एकंदर मराठशाहीच्या नाशाचेंच आद्य कारण आहे. या वितुष्टाचा पूर्व रंग मागें दाखविलाच आहे. [म. वि. पृ. २ ७१]. कुंभेरीपुढें तमाम फौजा, कांहीं एक प्राप्ति न करतां, होळकराचे हट्टास्तव, चार महिने घोळ घालून बसल्या, त्यांतून प्रत्यक्ष बादशहा मनांतून जाठासच अनकुळ, हा प्रकार जयापास पटला नाहीं. त्यांनें जाठास शरण आणवून प्रकरण मिटविलें ही गोष्ट होळकरास आबडली नाही. त्यांत प्रतिज्ञाभंग झाल्याचें होळकरास दुःख झालें. होळकरास मीरशहाबुद्दीन पाहिजे तसा वळवीत असून, मूळ कराराच्या विरुद्ध मराठ्यांचें वर्तन होतें, हा प्रकारही शिद्यास रुचत नव्हता. अशा अडचणींत कांहीं तरी तडजोडीचा मार्ग काढून, राज्यकार्य साधण्याचे कौशल्य रघुनाथरावांत नसल्या-मुळें, दोघांचे दोन मार्ग झाले. जयापानें मुख्य उद्योगांतून आपलें अंग काढून मारवाडची कामगिरी अंगावर घेतली. रघुनाथरावास पेशव्यानें दोन कामें सांगितलीं होतीं, १ काशी प्रयाग वगैरे तीर्थस्थानें मुसलमानांच्या हातून सोडवावयाचीं, आणि २ अंतर्वेदींत रोहिल्यांपासून जिंकलेल्या प्रदेशांत सुरळीत अंमल चालू करावयाचा. जयापा शिंदे फुटून गेल्यामुळें हीं दोनही कामें अपूर्ण राहिलीं. या वेळीं अंतर्वेदीचा बंदोबस्त झाला असता तर रोहिले मराठ्यांस भारी झाले नसते आणि पानपतचा प्रसंग आला नसता. रघुनाथरावाच्या पहिल्या बायकोचे भाऊ गोपाळराव व कृष्णराव गणेश बर्वे अंतर्वेदीच्या बंदो-बस्तास असून. त्यांचे हाताखालीं बाबूराव महादेव दातार होता. गोपाळराव

बर्वे पानपतानंतरही कैक वर्षे त्याच बाजूस होता (का. सं. प. या. २९, ३०, ५०, ४५१). अंतर्वेदींत सफदरजंगानें मराठ्यांचा जम बसूं दिला नाहीं. बादशहाशीं झगडण्यांत मराठ्यांनीं आपणास मदत केली नाहीं म्हणून त्याचा मराठ्यांवरचा विश्वास उडाला, आणि इतउत्तर तो व त्याचा मुलगा सुजाउद्दौवला हे कधीं त्यांजवर विश्वास ठेवून वागले नाहींत. आपली वजिरी जाण्यास मराठे कारण झाले असें त्यांस नेहमी वाटे. काशीतही बाबूराव महादेवास सफदरजंगानें पुष्कळ त्रास दिला. क्षेत्रें सोडविण्याचें काम जयाप्पानें अंगावर घेतलें होतें. परंतु बर्वे व दातार त्या कामीं मदत मागूं लागले तेव्हां मारवाडांत अडकून पडल्यामुळें, हीं तीर्थे सोडविण्याचें काम तसेंच राहिलें. 'श्री. दादासाहेबांनीं लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. सत्वरींच मारवाड प्रांतीचें काम विल्हेस लावून तुम्हांकडे अंतर्वेदीतून अविलंबेंच येतां. जे जे मवासी करीत आहेत त्यांचें पारिपत्य यथायुक्त करून श्रीक्षेत्रास अंमल खुलासा करणें, हे गोष्ट चित्तांत फारशी आहे.' 'दादास्वामींस लिहिणें म्ह० ताकीदपत्रें पाठवितील. येथून पत्रे पाठविलियानें काय होणें. जेव्हां त्या प्रांतें फौज येईल, तेव्हां सारेंच उत्तम होईल.' (१. ३१, ३२, ३७, ३९, ४३, ४४.) असा हा जयाप्पाचा पत्रव्यवहार रामाजी अनंताचे हातचा आहे.

मराठ्यांच्या प्रचंड फौजा उत्तरेंत आणण्याचे मुख्य काम मीरशहाबुद्दीननेंच केलें होते. बिचारा बादशहा नामधारी होता. दिल्लीच्या शेजारीं या फौजा मोठ्या तयारीनें आलेल्या पाहून रजपूत, जाठ वगैरे सर्व भयभीत झाले. जाठानें अंतस्थ संधान लावून बादशहास या अरिष्टाची कल्पना आणून दिली. मीरशहाबुद्दीन जेव्हां बादशाही तोफखाना घेऊन दीग, भरतपुर वगैरे किल्ल्यांस वेढे देऊन बसला, तेव्हां बादशहास पस्तावा होऊन त्यानें सफदरजंगास पुनः परत बोलाविलें. मराठ्यांना घरांत आणून हा मोर बादशाही बुडविणार अशी दरबरांत भावना झाली. रजपूत राजांनीं सुद्धां अशाच तक्रारी बादशहाकडे आणिल्या. जयपुरचा माधवसिंग व जोधपुरचा रामसिंग आणि सुरजमल्ल जाठ हे या पक्षांत सामील झाले. खुद्द बादशहा वजीर खानखानास

घेऊन, मीरशहाबुद्दीनचे मदतीचे मिषानें, पण वस्तुतः त्याचे विरुद्ध, सिकंदऱ्या-पर्यंत चालून आला. आजूबाजूचे लोक त्यांस येऊन मिळूं लागले. मीरशहा-बुद्दीन व मल्हारराव होळकर, वरील वातमी समजतांच ५० हजार फौज घेऊन दिल्लीवर चालले. हे आतां दुसरा इसम बादशाही तख्तावर बसविणार अशी बातमी बादशहास पोंचते, तोंच त्यांचे गोळे बादशाही छावणीवर पडूं लागले. तेव्हां बादशहा घाबरून साहिबा जमानीसह घाईघाईनें दिल्लीकडे परतला. बादशहाचेंच पत्र मीरशहाबुद्दीनच्या हातांत पडलें, तेव्हां त्यास बादशहाचें सर्व कपट कळून आलें; आणि लगेच मीर व होळकर बादशहाच्या पाठलाग करीत दिल्लींत घुसले. बादशहाचा तोफखाना व सामान मराठ्यांच्या हातांत पडलें. मलिका अज्जमानी व साहिबा महाल व इतर बायका यांस होळकरानें पकडिलें. [एल्यट ८. पृ. १४२]. बादशहाची फौज मागें राहिली होती, तिला मीरशहाबुद्दीननें आश्वासन देऊन आपल्याकडे वळविलें, आणि मलिका अज्जमानीची भेट घेऊन तिचें सांत्वन केलें. तिच्या बरोबर मल्हारराव व मीरशहाबुद्दीन कांहीं वेळपर्यंत पायीं चालत गेले. हे प्रकार मे महिन्याचे आरंभीं घडत असतां, पश्चात् जयाप्पा व सखारामपंत बोकील यांचे सल्ल्यानें रघुनाथरावानें जाठाशीं तह करून कुंभेरीचा वेढा उठविला. दिल्लींतील भान-गडींचें कांहीं वृत्त ६·४७३, मे १७५४ च्या पत्रांत आहे.

मलिका अज्जमानी ऊर्फ बादशहाबेगम ही मोठी कारस्थानीं बाई दक्षिणेंतील ताराबाईप्रमाणेंच मोगल बादशाहींत सुप्रासिद्ध होती. ती फर्रुख-सेयरची मुलगी व महंमदशहाची बायको, स. १७८८ पावेतों जिवंत असून, स. १७८७ त गुलाम कादरानें शहाआलमचे हाल केले त्यांत ती सामील होती. बादशहाची आई ऊधमबाई ही दुर्वृत्त असून मूळची नायकीण होती. तिच्या केबळ अर्ध्या वचनांत अहंमदशहा राहत असल्यामुळें, तिला दूर करावें असें मलिका अज्जमानीच्या मनांत बरेच दिवस होतें, आणि तिनेंच पुढें बादशहासही तख्तावरून काढण्यास मीरशहाबुद्दीनास मदत केली. होळकर व शहाबुद्दीन यांच्या फौजांनीं बादशहास दिल्लींत कोंडिलें. वजीर खानखानान

बादशहास सोडून गेला, तेव्हां बादशहानें मीरशहाबुद्दीनची समजूत करण्याकरितां दरवाजे उघडून त्यास आंत घेतलें. मीरनें वाड्यांत मोठा दरबार भरवून खालील भाषण केले. 'बादशहास राज्य करण्याचें चातुर्य नाही. त्याच्या हातून मराठ्यांचा बंदोबस्त होत नाहीं. मित्रांशीं त्यानें विश्वासघात केला आहे. तर याला पदच्युत करून तयमूरचा दुसरा लायक वंशज तख्तावर स्थापणें हेंच योग्य आहे.' हा बेत एकदम अमलांत आला. बादशहा व ऊधमबाई यांचे डोळे काढून त्यांस त्यानें कैदेंत टाकिलें, आणि जहांदरशहाचा मुलगा अजीजुद्दीन[1] यास आलमगीर असे नांव देऊन तख्तावर बसविलें (३ जून १७५४). याच वेळीं खानखानानची वजिरी जाऊन ती मीरशहाबुद्दीन यास मिळाली. [मु. रि. पृ. ८४७]. या सर्व कृत्यांत होळकराची फौज सारखी मीरशहाबुद्दीन बरोबर होती. बादशहाचें संरक्षण करण्याऐवजीं मराठे त्यास काढून टाकतात ,हा प्रकार सर्व मुसलमानांस अत्यंत चीड येण्याजोगा झाला आणि मराठ्यांची इभ्रत नाहींशी होऊन त्यांजविरुद्ध मुसलमानांचें कारस्थान वाढत गेले. नवीन बादशहाचें वय या वेळीं ५५ वर्षांचें असून, त्यास पांच मुलगे होते. वडील मुलगा अलीगौहर हाच शहा आलम होय. मलका अज्जमानीला होळकरानें पकडिलें, तेव्हां तिचें सर्व जडजवाहीर त्यानें हस्तगत केले. होळकरास या मदतीबद्दल ४० लाखांची रक्कम ठरली असून, त्याबद्दल मीरशहाबुद्दीन जामीन होता. तूर्त मराठ्यांच्या मदतीनें तिने आलमगीर यास गादीवर बसविल्यावर पुढें ती मराठ्यांच्या विरुद्ध वागून नजीबखानाचे मार्फत अहंमदशहा अब्दालीस सामील झाली, आणि तिनें त्याचा मुलगा तयमूरशहा यास आपली मुलगी चंदाजमानी दिली, तो प्रकार पुढे येईल. ही बाई दक्षिणेतील ताराबाईची एक आवृत्तिच होय एवढे तूर्त ध्यानांत ठेविले पाहिजे.

---

१ टीप.—बादशाहीतील भानगडी समजण्यास सोबतचा उत्तर कालीन मोगलवंश दृष्टीसमोर पाहिजे. (From Irvine's Later Mughuls). वंशावळींत बादशहा झालेल्या पुरुषांस आंकडे घातले आहेत.



१ मीर्झा अब्दुल्ला अलीगौहर ऊ. शहाआलम ज. १४·६·१७२८ मृ. १८·११·१८०६.

रघुनाथरावाचा पोकळ कारभार.—रघुनाथरावानें प्रथमच १४ ा रोजीं फौजमहंमदखान रोहिल्याच्या मुलुखाची वांटणी केली (ना. रो. १. ५). पुढें ३०.५.१७५४ रोजीं रघुनाथरावास हिंगण्यानें कळविलें, 'सार्वभौम ा वजीर दुसरा करावा हा भाव सर्वांचा आहे' (६.२९९) ता. १ जून ोजीं रघुनाथराव, हिंगणे वगैरेनीं एकत्र विचार केला (६.३०२). पावसा-्यांत फौजेची छावणी दिल्लीस झाली, त्या वेळीं छपरांस सामान पुरविण्यासंबंधीं ६. ३०५–३०६ चे कागद आहेत. हिशेबासंबंधानें रघुनाथरावानें ले. ३१० त हिंगण्यास झाडलें आहे. ले. ३११ त्याच संबंधाचा आहे. दिल्लीचें कार्य ाटोपल्यावर पुढें लाहोरपर्यंत जाऊन अब्दालीचा अंमल उठवावा, अशी ीरशहाबुद्दीनची टोंचणी मराठ्यांस होती. परंतु या प्रसंगीं रघुनाथरावानें पुढें ंजाबाकडे जाण्याचें कबूल केलें नाहीं (६–३२०). मराठे दिल्लींतच ठाणें देऊन ासले आणि खर्च मोठा चालू राहिला ही गोष्ट मीरशहाबुद्दीन वगैरेंस आव-ली नाहीं. 'वजिराचा आमचा करारमदार ठरला आहे तो आहेच, त्यांत यांनीं अंतराय न करावा. खानखानास घेऊन आम्ही गंगास्नान करून नयनगरावरून देशास जाऊं. एताद्विषयीं वजिरांनीं चित्तांत वसवास न धरावा. आम्हीं त्याचा स्नेहच हा काळपर्यंत राखिला. पुढें चित्तापासून राखणार. खानखाना आम्हां समागमें राहिल्या, वजिरांनीं वसवसा किमपि न धरावा. आम्ही स्नेह धरतों त्याप्रमाणें त्यांनीं धरावा. मग लाहोरास जावयाची तज-वीज. खिलत पाठवून द्यावा, म्हणजे फौज देऊन खानखानान व समशामुद्दौला यांस कुरुक्षेत्रीं पावते करूं.' (६ ३२०,३२१). या दोघांना मराठ्यांचा आश्रय होता, त्यांस वजीर आपल्या ताब्यांत मागत असतां वरील बोलाचाली झाली. शेवटीं खानखानास व बादशहास वजिरानें ताब्यांत घेऊन दोघांसही मारून टाक-लेंच. या भानगडी वर्षअखेर चालू होत्या. (६.३२५). एकंदरींत जूनपासून डिसेंबरपावेतों सहा सात महिने मराठ्यांच्या फौजा दिल्लींतच तळ देऊन होत्या. हा जो दिल्लींत मराठ्यांनीं आपला जम बसविला, तेणें करून त्यांची दहशत बहुधा सर्वत्र चांगली बसली खरी, परंतु त्याबरोबर त्याजविषयीं द्वेषभावही उत्पन्न झाला.

तसेंच सर्व ठिकाणचे बुभुक्षित सरदार, भटभिक्षुक, शेटसावकार वगैरे आपापले अर्थ साधून घेण्यांत दंग झाले. पेशव्यांच्या फौजा जातील तिकडे जय हा ठेवलेलाच, त्यांस देवच साह्य आहे अशी समजूत बाहेर झाली. एक गृहस्थ दीक्षितांस लिहितो, ' दिल्लीचा पैका वसूल होत आहे. सार्वभौम नवे जुने झाले हें वर्तमान तुह्मांस कळलेंच असेल. बाळकृष्ण दीक्षित येथें आले आहेत. श्रीमंतांची भेट झाली. आपले आज्ञेप्रमाणें श्रीमंतांस विनंति व मल्हारबा, गंगोबा यांस सांगोन जें होईल तें करून घेऊं. शिंदे मारवाडांत गेले तेही कार्यसिद्धि करतील. ' (१·८·१७५४, का. सं. प. या. ३२). एकंदरीत मराठ्यांच्या उमेदी या वेळीं उच्च शिखरास पोंचल्याचा भास त्या वेळच्या कागदपत्रांवरून होतो. ऑक्टोबर अखेरीस बाळकृष्ण दीक्षित लिहितो, ' काशींतून स्वार होऊन श्री. दादांचे भेटीस गेलों. सर्वांशीं ओळखी भेटी झाल्या. चाळीस दिवस दिल्लींत होतों. श्रीमंतांनीं बहुत स्नेह कृपा केली. कांहीं मेळवावें ह्मणोन गेलों नाहीं. दिल्ली शहर पाहवें निमित्य गेलों. रघुनाथपंत दादांनीं आह्मांस पालखी, मोत्यांचा चौकडा व तीन हजार रुपयांचा गांव दिल्हा; बादशहाकडून पंधरा हजार रुपयांचे गांव काशी अलीकडे नेमून घेतले. काशीच्या राजानें हें आधीं मान्य केलें आहे. ' (का. सं. प. या. ३१ व ११·८९). दिल्लीस बसून अंतर्वेदींत व काशी प्रयागकडे आपला अंमल बसविण्याचें काम रघुनाथराव करीत होता. सफदरजंगासही पत्रें जात येत होतीं (१·३४–३६). दिल्लीच्या या भानगडींत जयाप्पा यत्किंचित् लक्ष घालीत नव्हता (१·३९); मात्र मारवाडचें काम आटोपतांच काशीप्रयाग बंगालकडे अंमल बसविण्यास तो जाणार होता. इतक्यांत इकडे १७ ऑक्टोबर १७५४ रोजीं सफ्दरजंग वारला [खं. १ टीप ९७ पृ. ७८], तेव्हां त्याचा मुलगा सुजाउदौला यास सलामालकीचीं पत्रें पाठवून रघुनाथरावानें त्याचा गौरव केला (१·४१, ४३, ४४). दिल्ली येथील कामकाजाचा निर्गम जाहला असें १० नोव्हेंबरास रघुनाथराव कळवितो (१·४२). काशीकडील उद्योगाचा निभाव होईना आणि सुजाकडून तिकडे उपद्रव होऊं

ागला, तेव्हां ' तूर्त तुह्मीं श्रीक्षेत्रास असणें, पेस्तर तिकडील बंदोबस्त होणें ो मनोदयानुरूप होईल ' असें १७५५ च्या २० जानेवारीस रघुनाथरावानें ाबूराव महादेवास कळविलें (१·४५, ४६). ह्मणजे पुढील उन्हाळ्यांत ादे सुद्धां आपण सर्व फौज घेऊन काशीकडील भाग उरकावा असा त्याचा त होता. या स्वारीत दिल्लीकडील रिवाज पाहून चहा घेण्याची इच्छा घुनाथरावास झाली. ' चहा घ्यावयासी प्याले, सगी उत्तम, लवकर न ापेत असे दोन पाठवून द्यावे ' (६·३१८), असें तो हिगण्यास लिहितो.

सन १७५४ च्या अखेरीस अंतर्वेदींत मराठ्यांचा अंमल बसला. ' रोहि-ठ्यांची मामलत झाली. वसूल आला त्याची वांटणी होऊन, जयाप्पांचे ांटणीचा ऐवज हुंडीनें पाठविला आहे. प्रस्तुत गवाल्हेरच्या कामासाठीं यमुना-ारास आलों. सत्वरच तिकडे (म्ह० जयप्पाचे मदतीस मारवाडांत) येत ासों. सुभेदार सांभरच्या सुमारें आहेत. ' असें होळकराचा गंगाधर यशवंत याप्पाचा कारभारी रामाजी अनंत यास स. १७५५ च्या जानेवारींत लिहितो. गोहदच्या राण्याचें प्रकरण वाढलें नसतें तर रघुनाथराव मार-ाडांत जाणार होता. पुढे फेब्रुवारींत रघुनाथरावाने गया व कुरुक्षेत्र ातशहापासून सरकारांत घेतली. त्यांची कमावीस त्यानें दामोदर महादेव हिगण्यास सांगून हरदू ठिकाणी आपले तर्फेने कमावीसदार पाठवून ऐवज ारकारांत पावता करण्याची ताकीद दिली (६·३२८ व ना. रो. १. ७९). ाथुरा, वृंदावन, गढमुक्तेश्वर,[1] पुष्पावतीवर, पुष्कर इत्यादि हिंदूंचीं तमाम ावित्र स्थळें रघुनाथरावानें हस्तगत करून तेथें आपला अंमल चालू केला. ६·५५७). स. १७५५ च्या जानेवारीपासून जूनपावेतो रघुनाथराव या र्व क्षेत्रांच्या ठिकाणी फिरत होता. (राजवाडे २ पृ. १३५ व भा. व. ाकावल्या). क्षेत्रें हस्तगत होण्यासंबंधाने कर्मठ ब्राह्मणांचे तोंडास पाणी कसें ुटत होतें हें रघुनाथरावाने दीक्षितास लिहिलेल्या खालील पत्रावरून दिसतें.

' कै. बाजीरावांनीं दिक्षितांस प्रांत मथुरा देऊं केले ह्मणोन तुह्मां विदित

---

१ गढमुक्तेश्वर दिल्ली मुरादाबाद रेल्वेवर स्टेशन दिल्लीचे पूर्वेस ५४ मैल.

केलें, त्यास प्रांत मथुरा हस्तगत झाल्यावर दहा गांव नेमून देऊं. श्रीकृष्ण द्वारका क्षेत्र आपणाकडे हस्तगत झालें आहे, तेथें शंभर ब्राह्मण–भोजन नित्य घालावें ऐसे चित्तांत असून त्या प्रांतीं गांव नेमून द्यावे म्हणोन तुम्ही विदित केलें, त्यास पुण्यास गेल्यावर पांच हजारांचे गांव सरकारांतून नेमून देऊं.' (२०·३·१७५४. का. सं. प. या. २७). हिंदुपद पातशाहीच्या उभारणीचे हे एक विशिष्ट अंग असून, पानपतावर सुद्धां कुरुक्षेत्राकडे जाण्याचें सदाशिवरावाचें प्रयोजन हेंच होतें.

दौलतीचें कर्ज वारावें, हा या रघुनाथरावाच्या स्वारीचा मुख्य उद्देश पेशव्यानें ठरविला होता. 'गुदस्तां तुम्ही निरोप घेऊन गेलां, तेव्हां कर्ज वारावयाचा निश्चय होता. जाठाचा मनसबा भारी पडून शेवटी पैका न मिळाला. दिल्लींत मातबर ऐवज मिळावा, ऐसे असतां घराऊ पेचांपाचांमुळे (आपसांतील चुरशीमुळें) तेंही नीट न जालें. मनांत होतें की हिंदुस्तानांतून एकदां चाळीस पन्नास लक्ष रुपये यावे. येतांच कर्ज वारावे. परंतु अर्थ न घडला. तुम्हींही अंगीकृत प्रतिज्ञात पक्षासाठीं चिरंजीवांजवळून गेला. याउपर लहानमोठे सरदारांवर पंचविसां लक्षांची बेरीज करून सांगितलें. ते बेरीज सर्वांही उत्साहें कबूल केला. एवढा क्षयरोगासमान कर्जरोग दूर जालिया उत्तम आहे. बहुतांनी अवलंबिलें स्वामिकार्य सहजांत सिद्धीस जाऊन न करी तोच मात्र दोषस्थान होईल.' [का. सं. प. या. ३८०] हे पत्र पेशव्यानें ३ सेप्टेंबर १७५४ रोजी जयाजीस लिहिलेलें असून, त्याच मजकुराची आवृत्ति अनेकवार झालेली आहे.

एकंदरींत दिल्लीच्या राज्यक्रान्तीपलीकडे रघुनाथरावाचे हातून या स्वारीत विशेष कांही घडलें नाही. त्या राज्यक्रान्तीतही आठ महिने, पंनास हजार फौज, मोठा खजिना, हिंगण्यांचें, शिंदे होळकरांचें व बादशाही उमरावांचे वांकडें, इतक्या गोष्टी खर्ची पडल्या. पुढें जानेवारीपासून जून पावेतों कांही क्षेत्रें ताब्यांत आली, परंतु जयाप्पा मारवाडांत अडकून पडला, शेवटी जून महिन्यांत त्याचा खून झाला, त्याची मदत किंवा विचारपूस रघुनाथरावानें

होळकराचे संगतीस लागून केली नाहीं. शेवटीं हा सर्व बोजा पेशव्यावर येऊन पडला आणि शिंद्यास सोडवून आणण्यांत वर्ष सहा महिने फौजा गुंतून राहिल्यामुळें, दिल्लीच्या उमरावांस अब्दालीशीं कारस्थान करण्यास फावलें. अब्दालीनें फिरून स. १७५७ त दिल्ली मथुरापावेतों येऊन रघुनाथरावानें दीड वर्षांत केलेलें सर्व काम तीन महिन्यांत उखडून टाकिलें, अर्थात् हिंदूंच्या पवित्र क्षेत्रांची रड पेशव्यांचे हातून कधीच मिटली नाहीं. सरदार आवरत ना, व हातून कामही कांहीं घडेना, तेव्हां पेशव्याचें निकडीचें बोलावणें आल्याचें निमित्त करून (६·३४३) रघुनाथराव परत निघाला. दुसरा पावसाळा दिल्लीस काढण्याचें त्याच्या जिवावर आलें, आणि विठ्ठल शिवदेवाकडे दिल्लीचा कारभार सोंपून आपण १०·८·१७५५ रोजीं पुण्यास दाखल झाला. नानासाहेब पुढें लगेच सावनूरचे स्वारीस निघाला, त्याजबरोबर आपल्या कामाचा झाडा देण्याकरितां रघुनाथराव कर्नाटकांत गेला. 'दादास्वामी जाठावर आले परंतु मन कोणी घालून, मेहनत करून त्याजला जेर न केलें. सुरजमल्ल स्वामीस ठावका आहे. आपसांत चित्त शुद्ध नाही याजकरितां तो शेर जाला. श्रीमंत स्वामीचा बदनक्ष झाला. चार हजार घोडे, दोन हजार उंट, चार हजार बैल (मराठ्यांकडील) वाणियांचा सुरजमल्लानें नेला. असा बदनक्ष कधींही न जाला. जर श्रीमंत यजमान स्वामी, श्री. भाऊस्वामी येतात तर नक्ष राहतो. श्रीमंत आलियावर पातशहा वजीर समागमें दोन हजार तोफ घेऊन येतील. दोन महिन्यांत जाठ फडशा होईल. करोड रुपयांचा मुलुख सुटेल. आह्मीच देशास येतो. भेटीनंतर सार्धत विदित करूं.' (३·१५१). ही रघुनाथरावाच्या स्वारीची फलश्रुति गोविंद बल्लाळानें ता. ४·९·१७५५ रोजीं पुण्यास लिहून कळविलेली मार्मिक आहे. रघुनाथनावानें काम कसें बिघडविलें हें त्यावरून दिसतें. इतकें कळल्यावरही पेशव्यानें उत्तरेकडे लक्ष न देतां सावनूरची वाट धरिली. 'जिकडे कार्य बहुत तिकडे जाणें होईल' (का. सं. प. या. ३५७) हा स्वतःचा नियम त्यानें भंगिला. एकदम सर्व दिशांस उद्योग सुरू झाल्यानें फौजेची जरूर सर्वत्र भासूं लागली,

तिचा पुरवठा करणें जड पडूं लागलें. सुजाउदौला मराठयांचे नाशाविषयीं उद्युक्त झाला. 'काशींत आपली फौज राहील तोंपावेतों भय नाहीं. फौज दूर गेली कीं नबाबाचा चणारडी (चुनारगड) काशीच्या उरावर आहे. मोठें भय आहे. काशीच्या राजानें श्रीमंतांस व वडिलांस लिहिलें आहे. ब्राह्मणांस वांचवून आपलें होईल तर उत्तम आहे. काशी लुटूं पाहतो. राजा आहे ह्मणून वांचलों आहों. अयोध्येकडे श्रीमंतांच्या फौजा उतरल्यानें सर्वही कामें होतील. या कामास अंतर तरी लक्ष ब्राह्मण मरतील. यशही मोठें होईल.' ता. १७·१०·१७५५. (३·३९८).

३. ग्वाल्हेर व गोहद किल्ल्यांचा पडाव—सन १७५५ च्या आरंभी रघुनाथराव मारवाडांत जयाप्पाचे मदतीस जाणार होता. मे महिन्यांत तो ग्वाल्हेरीस होता (३·४५२ व ४५४). परंतु जाठ, रोहिले, सुजाउद्दौला, इत्यादि मंडळींनीं त्यास बिलकूल चैन पडूं दिलें नाहीं; आणि सर्वच कामें अर्धवट टाकून त्या सालच्या उन्हाळ्यानंतर रघुनाथराव परत देशी आला. आपण हिंदूंची पवित्र स्थानें सोडवून घेतली, एवढी सुद्धां प्रौढी मारण्यास सुजानें त्यास जागा ठेविली नाही. सुजा बापापेक्षां ज्यास्त खोल व मराठयांचा थोडा ज्यास्त द्वेष करणारा होता. मराठयांस आपला अंत लागूं न देतां साराच कपटाचा खेळ त्यानें आरंभिला. अनेक प्रकारें काहूर उठवून रघुनाथरावानें केलेले काम त्याने हस्तें परहस्ते विसकटून टाकिलें. जाठांनींही त्याच संधीस उचल घेतली. ग्वाल्हेर व त्याच्या ईशान्येस सुमारें तीस मैलांवर असलेला गोहद हे दोन किल्ले जाठांचे असून गोहदच्या राण्याच्या ताब्यांत होते. 'गोहदकर राणा बळावला आहे, त्याचे पारिपत्य जरूर करावें. शत्रु लहान आहे सा न म्हणावा,' [का. सं. प. या. ३९३] असें १५·११·१७५४ रोजीं पेशवा शिद्यास लिहितो. या वेळीं शिंदे मारवाडांत नागोराकडे होता. 'विठ्ठलशिवदेवांनीं ग्वाल्हेरीस मोर्चे लाविले होते, त्याजवर किल्लेदारानें गोहदवाला राणा भीमसिंग जाठ याजकडे अनुसंधान करून किल्ला त्यास द्यावासा केला. भीमसिंग येऊन मराठयांचे मोर्चे उधळून देऊन आपण

किल्ल्यांत दाखल जाला. किल्ला भीमसिंगानें घेतला. विठ्ठलराव दो कोशांवर आहेत. भीमसिंगानें ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत दंगा करावयाचा विचार केला आहे, त्याचें पारिपत्य होईल तरीच बंदोबस्त उत्तम आहे. सारांश, जाठावर दादास्वामी आले, परंतु मन घालून, मेहनत करून, त्याजला जेर न केलें.' [३·१५१]. 'विठ्ठल शिवदेव कुंभेरीचे वेळ्याचे समयीं रघुनाथरावाबरोबर होते. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांची बायको वारली. तेव्हां काल्पीस जाऊन दुसरें लग्न करून परत दिल्लीस स्वारीनिशीं जातांना ग्वाल्हेरीस मुकाम पडला. त्यांचे स्वार दाणावैरणीसाठीं हिंडत असतां जाठांची गांठ पडली. त्यांनीं ते लोक कैद करून ठेविले. ते सोडविण्याकरितां विठ्ठल शिवदेवानें आपला वकील राजाकडे पाठविला. त्याचा जाठाचे कारभाऱ्यांनीं उपमर्द केला कीं आह्मां शूर जाठांचे मुलखांत शिरून उपद्रव करितां, हें तुमच्या नाशास कारण आहे. माफी मागाल तर ब्राह्मण ह्मणून सोडवून देऊं. त्यावरून दिल्लीहून फौज व तोफखाना आणवून लढाईस आरंभ झाला. निकरावें युद्ध चालून महादजी शितोळे यानें जाठ राजास घोड्यावरून खालीं पाडिले, आणि विठ्ठल शिवदेवानें त्याचा शिरच्छेद केला. मग किल्ला सर करून त्याजवर पेशव्यांचें निशाण चढविलें. भीमसिग जाठाचा पुत्र राजा गिरिधर शरण आला, त्यास गोहद येथें जागा देऊन ग्वाल्हेर व त्याखालील मुलूख पेशव्यांचे ताब्यांत घेण्यांत आला.' त्याची सनद ७·६·१७५५ ची आहे (ना. रो. १·८३ व ८४). किल्ला सर केल्याची बातमी १६·८·१७५५ रोजीं पेशव्यास आली. विठ्ठल शिवदेव दिल्लीस जाऊन तेथून रघुनाथरावाबरोबर दाक्षिणेत येऊन सावनूरच्या स्वारींत सामील झाला [२·१३५]. एकंदरींत रघुनाथरावानें या स्वारींत दिल्ली, लाहोर, रजपुताना, लखनौ, काशी पावेतों सर्व प्रदेशांत वैर मात्र जोडून ठेविलें.

४. हिंगण्यांचा रुसवा.—महादेवभट हिंगण्याचा स. १७४४ त खून झाल्यावर त्याचे चार मुलगे दामोदर, बापूजी, पुरुषोत्तम व देवराव दिल्ली व इतर ठिकाणीं वकिलातीच्या कामावर होते. वरील स्वारींत या हिंगण्यांचा रघुनाथरावाशीं बेबनाव झाला, त्याचें कारण समजत नाहीं. हिंगण्यांनीं रघुनाथरावास

मेजवानी दिली, त्या वेळी ' दादासा० कोणते ? ' असें विचारीत ते पंक्तीतून फिरले, ह्मणजे त्यांच्या डोळ्यांवर द्रव्याचा धूर आला होता, अशी आख्यायिका आहे. यावरून त्यांच्या द्रव्यावर रघुनाथरावाचा डोळा असावा असें अनुमान होतें. तीस वर्षांच्या पिढीजाद अनुभवानें हिंगण्यांची इभ्रत व ऐपत दिल्लींत फार मोठी असून, शत्रुमित्रांवर छाप बसवून मराठशाहीचा पुरस्कार करण्यांत ते दक्ष होते. राजधानींतील पक्ष, घडामोडी, निरनिराळ्या व्यक्तींचे स्वभाव-विशेष व कावे इत्यादिकांचा योग्य विचार करून चौकसपणाने ते आपला मार्ग ठरवीत असत. फौजेच्या खर्चास अंताजीपंत पैसा मागूं लागला, तो हिंगण्यांनी दिला नाही तेव्हां अंताजीनेंच रघुनाथरावाचे मन बिघडविलें असावें. हिंगण्यांचीं कित्येक पत्रें मोठीं त्वेषाचीं आहेत. (६·५४५). होळकरहिंगण्यांच्या हिशेबाचे कागद १७५२ ऑक्टोबरचे आहेत. (६·२५८, २६९ व २७३). सखाराम भगवंत लिहितो ' अंतर्वेदींचे महाल तुम्हांकडे आहेत, तेथील हिशेबाविशीं दोन चार पत्रें पाठविलीं, त्यांचे उत्तर आलें नाही. तुम्हांसही एकदां रुबरू सांगितलेंच होते. तीन साले हिशेब नाहीं, तरी पत्र पावतांच आजतागाईत हिशेब लवकर येत तें करणें. दोचौ रोजांत पाठविणें. तुम्ही कदाचित् म्हणाल, वसुलाचे दिवस आहेत, तरी मागील हिशेब मागेंच व्हावे, दोन दोन तीन तीन वर्षे कोठें हिशेबाचा गुंत राहिला आहे की काय ! हे गोष्टी फटकाळ आहे. पत्रदर्शनी हिशेब येत तें करणे. या उपरीही तपसील लिहिला तरी उत्तमच आहे !' [स. १७५४ ची अखेर, ६·३३४ व ४७१]. यानंतर भांडण विकोपास जाऊन ता. २० मे १७५५ रोजी रघुनाथरावानें चार कलमें हिंगण्यांच्या कसुरीचीं त्यांस लिहून कळविली (६·३३९), त्यांत हिशेब न देणें व वर्तनाची मगरुरी अशा दोन बाबतीं दाखल आहेत. अशाच मतलबाचें पत्र महिपतराव चिटणीस रघुनाथरावाबरोबर होता त्यानेंही जून १७५५ त हिंगण्यास लिहिलेलें आहे. (६·५४५,५५६). हिंगण्यांचे सवाल जबाब एकत्र पाहण्यास मिळत नाहींत, परंतु ले. ४९९ आर्जवाचाच असून त्यांत हिंगण्यांची मागणी दाखल आहे. ले. ३८३ चें पत्र जरी स. १७५८ सालचें

आहे, तरी त्यावरून रघुनाथरावाचा हिंगण्यांवरील राग चांगला व्यक्त होतो. हे खरमरीत पत्र सदाशिवरावानें दामोदर महादेवास लिहिलेलें येणें प्रमाणें:—

" तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. कारभारी यांणीं पेचपाच केल्यावरून दादासाहेबीं इतराजी केली. दबऊन मागती करार केल्याचा विस्तार लिहिला तो कळला. ऐशास येविशींचें उत्तर तीर्थरूपांनी लिहिलें आहे त्यावरून कळेल. सारांश, तुम्हांकडे अंतरें आहेत ऐसें सरदारांनीं व बहुतांनीं सांगितलें, तथापि तितकीही क्षमाच जाली. अलीकडे तों बापूजी-महादेवांनीं पेचपाच वकिली रीतीनें बहुत केले. आम्ही दूर आहों, लिहिणार आपले मतलबानुरूप लिहितात म्हणावें, तर प्रत्यक्ष चि० रा० दादाखावंद तिकडे गेले, त्यांचे प्रत्ययास आले. त्यांनी लिहिलें व बहुतांनी लिहिलें असतां, तुम्ही आपलेकडे अंतर नाहीं म्हणतां ? थोरथोरांनीं खावंदाशीं पेचपाच केले त्यांचा परिणाम कधींच लागला नाहीं, तेथें तुमचा विषय बुनियाद किती ? तुमच्या बापांनीं निष्ठापूर्वक चाकरी केली, यास्तव तुम्हांस तुमच्या बंधूंस वकिलात सोपिली असतां, बापूजी महादेवांनी पाया सोडून बेपायाच वर्तणूक केली, त्यांत तुमचें कल्याण नाहीं. अतःपर तीर्थरूपांच्या आज्ञेप्रमाणें व चिरंजिवांचें मर्जीनुरूप वर्तलियास कल्याण असे. अन्यथा तुम्हांस न कळेसें काय ? एतद्विषयीं बापूजी महादेवास उत्तम प्रकारें सांगून, ज्यांत खावंदाची सेवा घडे, तुमच्या सेवेचा मुजरा होय, चिरंजीव तुम्हां उभयतांची तारीफ करीत ते केलीयास सर्वही गोष्टीनें तुमचें बरें येथून व परमेश्वरापासून आहे. हें पुरते समजोन पाया धरून निष्ठापूर्वक वर्तणूक करणे. चिरंजिवांनीं बोलाविलें असून बापूजी मनास येईल ते वल्गना करून न आले. असो, पुढे आज्ञेप्रमाणें सेवा करून दाखविणें. यांतच तुमचें कल्याण आहे. '

एकंदरींत मनुष्य जोडण्याची अष्टपैलू हातोटी जी नानासाहेबांत होती व जिच्या योगानें सर्व प्रकृतींच्या माणसांकडून त्यानें योग्य तीं कामें करून घेतलीं, ती रघुनाथरावांत नसून या वेळे पासूनच दीर्घसूत्री सखाराम बापूची त्यास जोडी मिळाली, हें एक पुढील अवनतीचें बीज होय.

हिंगण्यांबरोबरील तंट्यास मूळ कारण अंताजी माणकेश्वर असून, पैशावरून अंताजीशी हिंगण्यांचा तंटा स. १७५० पासूनच वाढत गेला (६·४७९). कुंभेरीहून दिल्लीवर चाल करण्याचे प्रसंगी हा तंटा कळसास पोंचला होता. दामोदर महादेव पेशव्यास लिहितो, 'पातशाही तोफखाना (कुंभेरीवर) आणाबयाची आज्ञा श्रीमंतीं केली, त्यास येथून तेथे लिहावें, अर्ज करावा, तो वकील पदरचा करितात ऐसे अंताजीनीं सांगावें, तेणेंकरून काम होणेस दिरंग पडावी. अंताजीपंताचे सांगितल्यावरी हा मजकूर व्हावासा नाहीं. परंतु अंताजीपंत सखारामपंत व्याही; सखारामपंत श्रीमंतांचे दिवाण, श्रीमंत बज्यास्वामीच ! असा प्रकार तेथे दर्शवून अंताजीपंस बोलतील तें आमचें बोलणें समजावें, ऐसें सखारामपंतीं त्यांचे निदर्शनास आणून दिल्हे. याजकरितां आतां आम्हांस आज्ञा न करावी. 'तीर्थरूपांनी जीवच स्वामिसेवेवरी खर्च केला आहे व आम्हांसही स्वामीच्या कल्याणावांचून दुसरें करणें नाहीं. हे निष्ठाच स्वामीचे चित्तांत येऊन सेवकाचा मजुरा दिसेल. अन्यथा दुसऱ्यानें सांगावें ऐसें नाही. सर्व निदर्शनास येईल.' असें पत्र आल्यावर पेशव्यानें त्यांस परत लिहिले, 'तुमचे वडिलाने स्वामिकार्य करून या पदवीस आले; व तुम्ही त्याच गोष्टीवर चित्तापासून राहोन, उमदी कामें उत्तम प्रकारें करून चिरंजीवाची मर्जी राखोन राहिल्यानें सर्व प्रकारे तुमचे ठायीं दुसरा कार्यविचार नाहीं, तरी कळतच आहे' (६.४८५). हें पत्र पुण्याचे २१ मे १७५४ रोजीं दिल्लीस पोचलें. म्हणजे तोफखान्याच्या भानगडी कुंभेरच्या वेढ्याच्याच होत. सखाराम बापू व अंताजीपंत व्याही आणि रघुनाथराव भोळा, सखारामबापूच्या मुठींत, हा प्रकार पुष्कळांस जाचक झाला. ह्या संबंधाचा अश्लील लेख बापूजी महादेवाने आपल्या भावास लिहिलेल्या एका पत्रांत वाचण्यास मिळेल (६·५४५, नोव्हें० १७५४).

होळकर हिंगण्यांचे तंत्रानें वागत असून (६·५५७), शिंदे दूर होतांच रघुनाथरावास वाटेल तसा नाचवून त्यानें दिल्लीत आपली तात्पुरती छाप बसविली. 'मुख्य गोष्ट सुभेदार यशस्वी. खाविंदाच्या प्रतापें आमित्र हतवीर्य

करोन, कार्यभाग संपादून बहुत यश मिळविलें. रजपूत बहुत मत्त होते, परंतु थंडे झाले, त्यांमध्ये हुरूप राहिला नाहीं,' असे होळकराचा कारभारी गंगाधर यशवंत हिंगण्यास लिहितो. (११·६·१७५५, ६·३४१). प्रत्येक सरदाराजवळच्या कारभाऱ्यांचीं नांवें लक्षांत ठेवून पत्रें वाचलीं असतां, अंतस्थ धाग्यांचा उलगडा होतो. सदाशिवराव, नानासाहेब, शिंदे वगैरे कित्येक थोडे पुरुष मात्र दुसऱ्याचे तंत्राने वागणारे नव्हते.

५. **नागोरचा वेढा,** (मार्च १७५४–फे०१७५६), **जयाप्पाचा खून** (३०·६·१७५५).–मारवाड्च्या राज्यांत जोधपुरच्या पूर्वेस अजमीर व मेडता, आणि उत्तरेस नागोर ही मोठीं शहरें होतीं. तेथील राज्य अजितसिंग यास दोन मुलगे, अभयसिंग व बखतसिंग. अभयसिंगास ढोकळसिंग म्हणजे 'विनाशकर्ता' असें टोपणनांव होते. अभयसिंग १७५० त मरण पावल्यावर त्याचा मुलगा रामसिंग यास बाजूस सारून बखतसिंगानें राज्य घेतलें, [३०·८·१७५१, ६·२३०]. तेव्हांपासून रामसिंग जयाप्पा शिंद्याची मदत आणून राज्य परत मिळविण्याच्या खटपटीस लागला. परंतु तीन वर्षेपावेतों जयाप्पास रामसिंगाचे मदतीस जातां आलें नाहीं. 'आठ व रजपूत यांनीं एकी करून बखतसिंगाचे कुमकेस फौज पांच सात हजार पाठविली आहे. रामसिंगाचें नेस्तनाबूद करून, दक्षिणायांच्याही पुढे जाठ शेखाच्या गोष्टी सांगतो, तो अडचां हजारांच्या अंताजी पंतास काय मोजणार !" असें हिंगणे लिहितो (६·४८६,१२·७·१७५३). म्हणजे स. १७५३ त मराठे जाठावर चालून येणार त्यापूर्वीच वरील कारस्थाने घाटत होतीं. रामसिंगाचा पक्ष घेऊन त्यास मदत करावी अशी हिंगण्यांचीही खटपट होती. ता. २३ ऑक्टोबर रोजी हिंगणे शिंदे होळकरांस लिहितो, 'महाराजे रामसिंग यांजकडून जगन्नाथ पुरोहित व राजा सामंतसिंग आपल्या (तुमच्या) समीप आले आहेत. कित्येक कामकाजानिमित्य विनंति करतील ती मान्य करावी. थोड्या गोष्टीनें व शिष्टाचाराने काम होत असलिया कां चुकावें ? व आपण केव्हां चुकलों ! पांच सातशें स्वार व एखादा नामी सरदार यांच्या समागमे द्यावा. हेच

आपलें काम बजावून घेतील. तमाम रजपूत बखतसिंगाकडोन फुटोन आले व येतात. आपणांस सहजांत यश येतें, याजकरितां लिहिलें असे. करणार आपण समर्थ आहेत.' [६'४६२]. यावरून ही मसलत मूळ हिंगण्यानेंच सुचविली, मात्र तिची पूर्ण माहिती त्यास नव्हती. या प्रस्तावावरून पुढें जयाप्पास मारवाडांत पाठविल्याबद्दल रघुनाथरावासच सर्व दोष देतां येत नाहीं. 'बापूजी महादेवानें रामसिंगानिमित्त बहुत कांही जोर मारिला, परंतु बखतसिंगासीं टिका सरदारांनीं पाठविलीच. सारांश, सरदार ज्यासीं टिका देतील तोच टिकेल. आजचे समयास जें सरदार चाहतील तेंच होऊन येईल. जयु पुरोहित येथे सरदारांसमीप गेले. त्यांनीं सन्मान केला. त्यावरूनच बखतसिंगाचे रजपूत तुहिले जाहले. सरदारांचा रोख मारवाडाकडे जाहिला, तमाम रजपूत उठोन रामसिंगास सामील जाहल्याविरहित राहणार नाहींत, ऐसा रंग दिसतो.' (६'३२४). मारवाडची कारणापुरती वंशावळ. (पहा मु० रि० पृ. ८८६) अजितसिंग.

अभयसिंग ऊ. ढोकळसिंग मृ. १७५० बख्तसिंग मृ. १७५३. ईडरचा राजा रामसिंग [जयपूरच्या ईश्वरसिंगाचा जांवई]. विजयसिंग मुलगी=ईश्वर०

रामसिंग हा जयपूरच्या ईश्वरसिंगाचा जांवई. उलट पक्षीं बखतसिंगाचा एक भाऊ ईडर येथे राज्य करीत होता त्याची मुलगी ईश्वरसिंगास दिलेली होती. स. १७५३ त रामसिंग व बखतसिंग अजमीर येथें असतां ईश्वरसिंगाच्या बायकोनें चुलता बखतसिंग याची भेट घेऊन, त्याजला विषप्रयोग करून ठार मारिलें. टॉड म्हणतो, 'बखतसिंग शूर व शहाणा होता. जगला असता तर मराठ्यांचें प्राबल्य त्यानें राजस्थानांत होऊं दिलें नसतें.' येणेंकरून रामसिंगास गादी मिळण्याची आशा होती, परंतु तो केवळ अनली बेहोष असें जाणोन बखतसिंगाचा मुलगा बिजेसिंग २० वर्षांचा होता त्यानें राज्यलोभें त्यास धुडावून, नागूर, बिकानेर, मेडतें व झालूर अशीं भारी संस्थानें हस्तगत केलीं. फक्त अजमीर मात्र रामसिंगाकडे राहिलें, तेथेंही उपद्व

भारी. तेव्हां चेतराम वकिलास आणून विचार केला. वकिलानें त्यास हिमत दिली. प्रस्तुत गनिमाची फौज कुंभेरीस आहे. होळकराचे हातून कार्य करून घ्यावें, तरी ते बिजेसिंगाचे स्नेही नेकजाद एक जयाजी शिंदे आहेत त्यांस पगडीभाई करून कार्य करावे. ह्मणोन चेतरामास मथुरा येथें शिंद्यांकडे पाठविले. ' दुर्बळ ह्मणोन तुह्मांस शरण आलों, आतां अभिमानाचे धणी तुह्मी आहां.' असे चेतरामाने जयाप्पास कळविलें. तो जयप्पानें सुरजमल्लास होळकराचे तडाक्यांतून बचावण्याचा असाध्य अंगीकार आधीच केला होता, त्यांत हें दुसरें बोलणें आलें. लगेच जयाप्पानें रघुनाथरावाची गांठ घेऊन आपला हेतु कळविला; आणि संवत्सर प्रतिपदेस ह्मणजे २४·३·१७५४ रोजी कूच केले. त्या वेळी रामसिंगाने जयाप्पाकडून बलपत्र ह्मणजे मदत करण्याचा लेखी करार करून घेतला, त्यावर शिंद्याकडील १६ प्रमुख सरदारांच्या सह्या होत्या. [टॉड पु. २ पृ. १०७ व भा. सा. ब.].

जयाप्पा मारवाडावर चालून आला असें पाहून बिजेसिंग नागूर सोडून चार कोस राहिला, आणि फौजेची तयारी जंगी करून लढाईस सिद्ध झाला. तेव्हां त्यांजपुढें आपला निभाव कसा लागतो याची जयाप्पास मोठी चिंता उत्पन्न झाली. जन्मादारभ्य मल्हारराबाचे जुगांतून निघालो; आतां अपेश आली तर तोंड काय दाखवावें ! तेव्हां दत्ताजी शिंदे भीम बहादर व लहान थोर सरदार यांणीं हिमत दिली; आणि युद्धच करण्याचा निश्चय केला. त्यांनीं आपल्या फौजेचे दोन भाग करून दत्ताजी व जयाप्पा यांणीं दोन बाजूंनी बिजेसिंगावर चाल केली. तेव्हां मोठ्या प्रळयाचें युद्ध झालें. मार खात खात रजपूत दोन कोस मागे हटले; परंतु आपला जय झाला ह्मणोन परम खुशाली केली; मराठे थकल्यामुळे रजपुतांस वेढाक्यास अवसान राहिलें नाहीं.' (भाऊसाहेब ब०). जयाप्पा ऑगस्टांत मेडत्यावर आला. ' तेथून बिजेसिंगावर संताजी बावळे, शेट्याजी खराडे, भोईटे, पागा मिळोन पंधरा हजारांनिशी चाल केली. बिजेसिंगाची फौज ५०।६० हजार व भारी सामान असतां आह्मांकडील फौजेनें टक्कर दिली. तेव्हां इकडील मोड होऊन निघाले. पालख्या,

नगारे, निशाणें, चवऱ्या, अब्दागीर, झरझऱ्या आदिकरून त्यांनीं नेलें. यांस अवसान होईना. बेलाशक मागें लष्करांत आले. त्यावरी फौजेचें कूच करून दोन तीन मजला मेडत्याकडे जयाप्पांनी चालोन घेतले. राठोडांनीही चालोन घेतलें. प्रात.काळपासून तृतीय प्रहर पर्यंत लढाई जाली, परंतु हत्यार लागेना. तेव्हां सारी फौज जयाप्पाजवळ ठेवून जनकोजी शिंदे यानें दोन हजार निवडक धारकरी घेऊन चालोन घेतलें, आणि फौज दुभागून पार निघोन गेले. त्यावर जयप्पांनीं हत्यार लावतांच राठोडांची फौज मोडून ताराज केली. जनकोजास तीन जखमा तिराच्या व सांगेच्या लागल्या. महत्तर यश आले. बिजेसिंग एक दिवसांत चाळीस कोस नागोरास पळोन गेला. सलतानत सर्व हस्तगत जाली. मग कूच करून नागोरास मोर्चे देऊन शिकस्त केला. इकडे बिजेसिंगाने आपला सासरा जयपुरचा माधोसिंग याची मदत मागितली. [का. सं. प. या. ले. ४५१].

जयाप्पाच्या या नवीन उपक्रमानें पेशव्याचे बेत ढांसळले. बरेच दिवस झाले तरी जयाप्पाकडील कांहीच वर्तमान त्यास कळेना. त्यासंबंधी नाना प्रकारचे प्रश्न विचारून पेशवा लिहितो, 'सर्व अर्थ विस्तारें निरंतर लिहीत जाणें. मोठा मनसबा, मारवाडी रजपूत अयाप गर्विष्ठ, त्यांसीं प्रसंग एकाएकीं तुह्मांवर प्राप्त झाला आहे. त्यास तजबिजेने दमवून, युक्तीनें समय पाहून जरब देऊन स्वकार्यासिद्धि करावी. श्रीकृपेनें सरदारी व शिपाईगिरी व दाव उपाय जाणणें सर्व गुण तुह्मांस आहेत. तदनुरूप साध्य असाध्य विचार करून कार्य करणें. जोधपूर निंमे राज्य यावेसें विचार जाहलिया उत्तम आहे. दाटून सर्वच घ्यावयासाठी कलह-वृद्धि न करावी. हा थोरांचा संप्रदाय आहे. युद्धावांचून साम न होयसेंच असलिया, सावधतेनें आपले रीतीनें त्यास आयास आणून नम्र करून कार्य संपादावें. विलंबावर पडलें तरी निरंतर सविस्तर अर्थ लिहीत जाणें.' [३.९.१७५४, का. सं. प. या. ३७६].

वर सांगितलेल्या एक दोन लढाया बहुधा स. १७५४ च्या सेप्टेंबर ऑक्टोबरांत झाल्या असाव्या; आणि त्यानंतर जयाप्पानें नागोराउ वेढा देऊन

बिजेसिंगास कोंडून घरिलें. कालक्रमानुसार या बेळच्या व्यवहारांचा तपशील ठरविण्यास साधन नाहीं. वेढ्याची मोर्चेबंदी करण्यांस बराच वेळ गेला. रेतीचा प्रदेश, म्हणून सुरुंगाचा यत्न चालेना. परस्पर तोफांचा भडिमार होऊं लागला. सात आठ महिने झाले, तरी दुर्ग साध्य नाही. म्हणोन रामसिंग व जनकोजी यांस समागमें दहा हजार फौज देऊन मेदत्यास मोर्चे लाविले. बारा महिने झाले. मोहरा इरेस पडला. तिकडे पुण्यास पेशव्यास चिंता उत्पन्न झाली मल्हारराव्याच्या तेडीने हें प्रकरण अंगावर आलें असे त्यास वाटलें. 'हरप्रकारें मल्हारबास आपले मार्गेत राखून तहरह करून मोकळे होणें. तुमचे विशीं येथें तिळमात्र दुसरा अर्थ नाही. सर्व प्रकारें समाधान असों देणें.' असे पत्र ३१·७·१७५५ चें पेशव्यानें जयाप्पास पाठविलें. [का. सं. प. या. ३८२]. या पत्रापूर्वीच ३०·६·५५ रोजीं जयाप्पा मारला गेला होता.

इकडे बिजेसिंगानें मल्हारराव्याचे बळावर हा युद्धप्रसंग अंगीकारला होता. परंतु एक वर्ष झालें तरी मल्हारराव्याकडून मदत येईना, तेव्हां त्यानें आपले वकील मदत मागण्यासाठीं मल्हारराव्याकडे पाठविले. मल्हारराव्याने उत्तर केलें, 'आम्ही एका खावंदाचे चाकर. उघड तुमची कुमक करतां येत नाहीं. परस्परें रजवाडयांस पत्रें देऊन कुमक करतों.' त्याप्रमाणें माधवसिंग जयनगरकर वगैरे मंडळीस पत्रे पाठविली; आणि सांगितले की तुम्हास कोणी मदत न करी तरी, कांही मोगलाई मसलत करून तुम्ही यश संपादावें." असे सांगोन बिजेसिंगाचे वकील मल्हारराव्यानें परत पाठविले. 'चवदा महिने झाले. परंतु जयाप्पा केवळ कुबेर, रोजमुरा व अजबाब पाहून सर्वास खर्ची पाचती केली. लोक आराम राखिले. तमाम एकदील. अवधिबांची ओढ की बिजेसिंगाचे पारिपत्य करावे. तिकडे नागुरांत बिजेसिंगास धीर निघेना. सवावर्ष झाले आतां कोंडून कोठवर राहवें, मोगलाई मसलतीनें होईल ते करावें, म्हणोन तीन मारेकरी सिद्ध केले, आणि चार घटका रात्रीस बाहेर लावून दिल्हे. चार घटका दिवसास ते जयाप्पाच्या लष्करांत पोहोंचले. देवाचे

डेऱ्यापुढें जयाप्पाचें स्नान चाललें होतें. नजीक घोड्यांची पागा होती. मारेकरी भिकाऱ्यांचा कंगाल वेष घेऊन घोड्यांपुढें दाणे वेंचीत होते. स्नान आटपून चौरंगावर उभे राहून मुखावर धोतर घेऊन क्षणभर डोळे चोळात असतां मारेकऱ्यांनी एका टाकीच दोहीकडून कुऱ्हीस सुऱ्यांचा मार केला. लगेच जमिनीवर आले. नजीक अग्निदाग्न्या होता त्याने कब घालून एक धरिला, तो डेरियापुढे व पायेंत गडबड जाहली. ससेहोलपट होऊन एक ठार जाहला; आणि एक प्राण घेऊन नागपुरांत परत गेला. त्यानें बातमी कळविताच बिजेसिंग एकदम मराठ्यांवर चालून आला. दत्ताजी भावन बंधू-जवळ येऊन धायमोकलून रडत असतां जयाप्पा त्यास बोलला, हे क्षात्रधर्मास उचित नाही. मला कांहीं होत नाहीं, तूं शत्रूचा समाचार घे त्याबरोबर दत्ताजीने निकराचा हल्ला करून मारवाडी भाषें सारोन गांवांस घातले. परत येतो तों जयाप्पाचा प्राण गेला. दत्ताजीचा शोक आवरे ना. तेव्हां रामाजीपंत भाऊ दिवाण व लहान थोर सरदारांनी समजन करून जयाजीच्या देहाचे सार्थक केलें. जनकोजी जवळ नव्हता. त्यानें त्याच दिवशी मेडते सर केलें होतें. तोही लगेच येऊन पोहोचला. मग मृतपुत्रांचा शोक किती वर्णावा! तेरा दिवस उत्तर-क्रिया व दानधर्म बहुत केला. ज्येष्ठ वद्य ७, ता. ३०-६-१७५५ रोजी जयाप्पाचा खून झाला. ताउस सरोवर ह्मणे मोराचे सरोवर येथे त्याची छत्री आहे.[1]

हे वर्तमान लोकांस कळलें. मल्हारराबास कळून बाह्यार्थ श्रमी झालें कीं 'आमचें जूग विसकळीत झालें.' पुण्यास वर्तमान समजून 'बहुत श्रमी झाले की एक बाजू खचली. बरे जनकोजी शिंदे आहेत, त्यांस सवाई जयाजी करून दाखवूं, चिंता नाही.' ह्मणोन समाधानीची पत्रे दत्ताजीस व जनकोजी यांस पाठविली. मल्हारराव दक्षिणेंत वाकडगांवास निघून गेले. जयाप्पाच्या मृत्यूचें पत्र रामाजी अनंतानें २५ जुलईस पेशव्यास लिहिलें, तें २६ आगस्टला

---

१ **टीप**—या खुनास प्रोत्साहन होळकराने दिलें, असा जो हा उल्लेख आहे, तो जनकोजीनें अंताजीपंतास लिहिलेल्या पत्रांत का. सं. ५. या. ४५१ यांत बिलकूल नाही, हें ध्यानांत ठेवण्याजोगे आहे.

त्यास पोंचलें. लगेच चार दिवसांनी पेशव्याने जबाब लिहिला. 'जयाजी शिंदे यांस दगा होऊन निधन पावल्याचा मजकूर लिहिला तो कळोन बहुत श्रम जाले. ईश्वरें मोठी अनुचित गोष्ट केली. उपाय नाही. जयाप्पासारखा उमदा सरदार दगाने मृत्यु पावावा ऐसे नव्हते. असो. दत्ताजी शिंदे मर्द खबरदार आहेत. तुम्ही व सर्व सरदार शाबूद आहां. जनकोजीचे समाधान करून उपस्थित मनसुबा सिद्धीस पाववून, शत्रूचे पारिपत्य, तहरह उत्तम प्रकारे होय तें करणें. दत्तवाचा स्वभाव शिपाइगिरीचा आहे, यास्तव रागे करून असमर्थी अस्थानी निकडीस प्रवर्ततील, त्यास समजावून गोड बोलूनच सांगत जाणें. आपा असतां बोलत होते, त्याप्रमाणे झालें तर तह करणे. परंतु ते सांप्रत चढी लागले असतील. यास्तव हर तजविजीने संभाळून राहणे. दोन चार मिळून जमा होऊन आले तर तीन महिने पावेतो गनिमी तऱ्हेने सांभाळणे. फौजा तिकडे आलियावर श्रीकृपेने उत्तमच होईल. तिळमात्र उदास नसतां सेवा करणें.' [का. सं. प. या. ३५२]. नंतर दुसरें पत्र ता. १८ सेप्टेंबरास लिहिलेलें पेशव्याचें दत्ताजीस आलें तें असे. 'बिजेसिंगास उत्तम प्रकारे तंग केलें आहे, वरकड कोणाच्यानें त्याची कुमक करवत नाही, स्वामीनी त्याचे वकिलास साफ सांगोन निरोप द्यावा, कै. आपांचा अभिमान शेवटास नेलियानें, लौकिक व स्वामि-कार्य सर्वांस जय, म्हणोन लिहिलें, त्यास आपांनी जें अवलंबिलें तें आम्हांस सर्व प्रकारे करणें. परंतु हा राजकार्य प्रसंग आहे. आपांसहा येथून बुद्धिवाद चार पांच महिने मागें लिहीत गेलें, ती पत्रे तुम्ही पाहिलीच असतील. दूरपथ, दोन वर्षांनी हिंदुस्थानांतून फौज (परत) आली, एकाएकी तयारी करण्यास उशीर लागतो, त्यांस नाइलाज. श्रीकृपें दिडा महिन्यांत पांच सहा हजार फौज येऊन पावेल. मागाहून खासाही बोस हजार फौजेनिशी येतच आहे. तुम्ही अनलंबिले कार्य ते अगत्य आम्हांस करणे. परंतु होणारानुरूप आपांनीं हातेर बोडिले. शिपाइगिरीची रीत केली. सरदारगिरीचा प्रकार न केला. तेव्हां प्रथम भारथी लढाई मारिली. त्या उपरी नव्या दबाबांत तूट सोसून, सलूख हर प्रकारें, पुढील संकट दूरंदेशीनें जाणून, करून मोकळे जाले असते तर

आज प्रयाग अंतर्वेद व अलीकडील खेचीचा मुलूख सोडविणें वगैरे कामें सरकार किफायतीची होऊन गेलीं असतीं. परंतु होणारास इलाज वाहीं. तुम्हींही आज पावेतो शिपाइगिरी केली. आतां सरदारीची रीत धरून तजविजीनेंच कांहीं कामें करावीं. जरूर संकट पडेल तेथेंच नेटून शिपाइगिरी करावी. तुमचा अभिमान ईश्वरास आहे; आणि मजवर ईश्वरी कृपा आहे तोंवर साहित्यास कधीं चुकणार नाहीं. ती पिढ्यांचे एकनिष्ठ सेवक, कामाचे असतां, तुमचा अभिमान नसावा हे कधीही या घरांत घडणार नाहीं. सर्व प्रकारे समाधान चित्ताचे करून अष्टपैलूचे रीतीनें जसा जे समयी प्रसंग पाहाल तसा मनसबा करीत जाणें. बिजेसिंगाचा वकील पंनास लक्ष रुपये द्यावे, रामसिंगास पोटापुरती जागा द्यावी, ऐसें बोलत होता. आम्ही ते गोष्ट मान्य केलीच नव्हती. सांप्रत हा प्रसंग जाहला, याजमुळें आम्ही साफच त्यास जाब दिला की आम्हांस याउपर तह करितां अनुकूल पडत नाहीं. तुह्मी जाणे, ह्मणोन निरोप दिला. तेथे ते आतां चढी लागले असतील. मध्यस्थ मारले गेले, सबब मध्यस्थांसही कोणी शिरत नसेल. अद्याप त्यांनी रामसिंगास पंधरा विसांची जागा दिल्ही, व तुमचा खर्च फिरोन दहा लाख जाजती दिले, तर घेऊन सलूख करून या संकटांतून सुटावें, हे राज्यभार अष्टपैलूपणास उचित आहे. तेथील प्रसंगारूप करणें.' हें पत्र नानासाहेबाच्या राज्यकारभारनैपुण्यास शोभेसें आहे. (का. सं. प. या. ३५१). बिजेसिंगाचा वकील वर्षभर तरी पुण्यास बसून होता (वरील ३६१). नशापाने मल्हारराव्याच्या चुरशीनें हे मारवाड प्रकरण उगाच अंगावर घेतले, अशा कागाळ्या पेशव्याकडे गेल्या होत्या, असें यांत ध्वनित आहे. पेशव्यानें याजबद्दल यत्किंचित् हयगय न करितां शिंद्यांच्या मदतीची सिद्धता करून दिली. 'जयाप्पांनी मारवाडच्या मनसुबियाचा अंगेज केला, त्यास आयुष्य असतें तरी, त्यांचे तेच सिद्धीस नेते. तथापि त्यांच्यामागें दत्ताजींनीं आव घातला तो प्रकार सिद्धीस पावावाव पावावा, यापेक्षां दुसरें अधिक न जाणतां, अंताजी माणकेश्वर ग्वाल्हेरीहून रवाना केले ते अविलंबेंच येऊन पावतील, ह्मणे स्वारीची तयारी होत आहे. दसरा झाल्यावर चाळीस पंनास हजार फौजेनिशीं येणें होईल.

रजपुतांमध्यें जाठाशीं राजकारण राखूंच, एकाशीं स्नेह तर एकाशीं बिघाड, एकदांच सर्वांशी कज्जिया करूं नये, . तूर्त तोडाने वरकडांशी कारच गोड बोलून राजकारण राखावें, जे समयोचित दिसेल ते करणें.' [२०.९.१७५५, का. सं. प. या. ३८६]. यांत उल्लेख केल्याप्रमाणे पेशवा स्वतः जर उत्तरेत जाता तर सर्व कारस्थानांचे पुढील स्वरूप बहुतांशीं बदललें असतें, यांत संशय नाहीं. परंतु पेशव्यास एकदां कोणाकडून तरी पुष्कळशी द्रव्यप्राप्ति पाहिजे होती. · नभापाचे मारवाडांतील स्वारीने दौलतीचे कर्ज एकदांचे वारेल अशी पेशव्यास मोठी आशा होती, ती त्याच्या मृत्यूने निष्फळ झाल्यावर, पेशव्याने स्वतः स.१७५५ चे दसऱ्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत जाण्याचा बेत रहित करून, केवळ द्रव्याच्याच इच्छेने पुनरपि कर्नाटकांत सावनूरची वाट धरिली. होळकरानें व रघुनाथरावानेही त्यास बहुधा अशीच सल्ला दिली असावी; आणि हे खरें असेल तर हिंदुस्थानांत शिंद्याचा उत्कर्ष नसावा, अशी कांहीं तरी भावना होळकराची असावी, असें मनांत येऊं लागते. खरें झटलें तर सर्वांआधीं होळकराने आवून जाऊन शिंद्याचा पाठपुरावा केला पाहिजे होता. स. १७५५ त होळकरानें कांहीं एक महत्त्वाची कामगिरी केलेली आढळत नाहीं. उत्तरेत शिंद्यांस कुचंबत टाकून दक्षिणेत होळकर सावनूरचे स्वारीस गेला. या सर्व बनावावरून पुढील अरिष्टाचा दोष बराचसा मल्हारराबाचे माथीं येतो.

स. १७५५ च्या एप्रिलांत रघुनाथराव हिंदुस्थानांत असतां पेशवा व अंताजी माणकेश्वर यांचा भेट नाशीक येथे झाली, त्या वेळी अंताजीस पेशव्याने हिंदुस्थानांत रवाना केले आणि रघुनाथराव सांगेल ती कामगिरी करण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें अंताजी तिकडे जात असतां, फौज न ठेवतां खोटी गणती दाखवून अंताजी पैसे उपटतो, असा संशय येऊन, रस्त्यांत पेशव्याचे हुकमानें दोन बेळां फौजेची झडती मुद्दाम खात्रीच्या माणसांकडून करण्यांत आली, ती कमी न भरतां बरोबर सात हजार भरली, असे अंताजी लिहितो. रघुनाथराव परत येत असतां माळव्यांत अंताजीचा व त्याची भेट झाली. रघुनाथरावानें अंताजीस अंतर्वेदीत गोपाळराव गणेशाच्या मदतीस जाण्याचा हुकूम केला. शिंदे

वर्षभर मारवाडांत पेंचांत सांपडले असतां, त्यांचे मदतीस अंताजीस न पाठविलें, आपल्या मेव्हण्याकडे जाण्याचा हुकूम केला, यावरून शिंद्याचे व रघुनाथरावाचें बरेंच बिनसलें होते असे दिसे. जुलई ऑगस्टांत अंताजीचा मुक्काम काल्पी-जवळ यमुनातीरीं होता. त्यापूर्वीच दोन महिन्यांत जयाप्पाचा खून झाला होता. सेप्टेंबरांत दत्ताजी व जनकोजी यांस पेशव्यांचीं पत्रें पोंचल्यावर, त्यांनीं अंताजीस पत्र पाठवून मारवाडांत आपल्या मदतीस बोलाविलें. पेशव्यासही तसें कळविण्याबदल त्यांनी अंताजीस लिहिलें. या पत्रांत मारवाड स्वारीचा सायन्त वृत्तान्त शिंद्यांनीं अंताजीस कळविला. तेव्हां रघुनाथरावाचा हुकूम मानावा की शिंद्यांचे ऐकावें, असे द्विधाचित अंताजीचें झालें. इतक्यांत मारवाडांत जाण्याविषयी पेशव्याचा निक्षूनीचा हुकूम अंताजीस आला. 'मालवर सरंजामानिशी मारवाडांत जाऊन, साम दाम दंड भेद युक्तीस पडेल तसें करून, शिंदे ग्रांस काढून घेऊन येणे.' तेव्हां गोविंदपंत बुंदेल्याकडून वीस लाख कर्ज घेऊन विजयादशमीचे मुहूर्तानें (१४·१०·१७५५) अंताजी फौजेची जमवाजमव करीत मारवाडांत गेला. रस्त्यांत किरवली व बुंदीकोटा येथील फौजा राठोडांच्या मदतीस येत होत्या. त्यांस पैका भरून अंताजीनें मागे वळविलें. जयनगरचा माधोसिंग बिजेसिंगांचे साह्य हरप्रकारें करीत होता. सबब अंताजीनें जयपूरचा मुलूख लुटून त्यास तंबी पोंचविली. जयपुरचा सरदार अनिरुद्धसिंग याची व शिंद्यांच्या फौजेची लढाई होत होती, त्यांत ऐन वेळीं अंताजीची मदत आल्यामुळें शिंद्याचे फौजेस मोठा धीर आला. मोठ्या शिकस्तीनें लढाई करून अनिरुद्धसिंगास मराठ्यांनीं अडविलें, तेव्हां माधोसिंगानें घाबरून त्यास परत बोलाविलें, आणि अनिरुद्धसिंग अंताजीचे छावणीत तहासाठीं गेला. नंतर जयपूरची फौज परत पाठवून अंताजी व अनिरुद्धसिंग शिंद्यांचे भेटीस नागोरास आले. भेटी झाल्यावर सर्व फौजांनीं नागोरावर मारा सुरू करतांच बिजेसिंग मोठ्या हिंमतीनें पुनः चालून आला. त्यांत त्याचा पूर्ण पराभव होऊन त्यानें तहाची बोलणी लाविली. परंतु बिजेसिंगास काढून रामसिंगास संपूर्ण राज्य दिल्याशिवाय दत्ताजी तह करीना,

त्याबरोबर जरब बसून बिजेसिंग मराठे सांगतील त्याप्रमाणें तह करण्यास कबूल झालां. [illegible]नाच्या मार्फत तह ठरला. फार ओढून धरूं नये, असें अंताजीनें दत्ताजीस सुचविलें. राज्याच्या [illegible]टण्या जाल्या. एक सरकारची, एक बिजेसिंगाची व एक रामसिंगाची. सरकारची नजर दोन क्रोड दरबार खर्च व कांही अंताजीचे, मिळोन पांच कोट ऐवजाची निशा घेतली. नागोरास रामसिंगानें [illegible] झालार येथें बिजेसिंगानें राज्य करावे, जोधपूर किल्ला सरकारांत ठेवावा, याप्रमाणे करारांत आणून बिजेसिंगाची व शिंद्याची भेट करविली. परस्परें बहुमान जाला. रामसिंग व बिजेसिंग यांची भेट होऊन किलाफ तोडिला. रामसिंग हाडे बुंदीकोटकर, गोपाळसिंग करोलीकर व अनिरुद्धसिंग वगैरेंच्या भेटी शिंद्यांशी झाल्या. जयपुराकडून दोन कोट गुन्हेगारी घेतली. [का. सं. प. या. ४५१]. ह्या उत्कृष्ट लेखावर मिति नाहीं हें त्यास मोठे वैगुण्य आहे. फेब्रुआरी १७५६ च्या सुमाराचें हे पत्र असावें. अंताजीच्या या लेखांत आत्मश्लाघेची झांक ठिकठिकाणी मारते, हें ह्या लेखावरून दिसून येईल. होळकरासंबंधानें एक अक्षरही यांत नाहीं; कदाचित् होळकर व रघुनाथराव एक विचाराचे असल्यामुळे अंताजीनें त्याजबद्दल कांहीच उल्लेख केला नव्हता असें वाटते. ' एक कोट रुपये खंडणी घेऊन, नागुरापासून अलीकडे मुलूख अजमीर, मेडतें, बिकानेर हीं ठाणी रामसिंगास दिली. खंडणी व मुलूख हस्तगत झाला, त्यापैकी निमा रामसिंगास देऊन निंमा शिंद्यांनीं आपणाकडे ठेविला. ठाण्यांचा बंदोबस्त करून मजल दरमजल उज्जनीस आले. [भा. सा. ब] अजमीर कायमचे घेऊन मराठ्यांनी तह केला. (टॉड.) शेवटी रामसिंगास गादी मिळाली नाही. तो स. १७७३ त जयपूर येथें मरण पावला.

रामसिंग अत्यंत दुर्दैवी होता. राज्य मिळविण्याकरितां त्यानें २१ लढाया मारल्या. आरंभींचा त्याचा दुष्ट स्वभाव विपन्नावस्थेनें शेवटीं पुष्कळ नरम झाला. त्याची हुशारीच पाहिली तर अप्रतिम होती, परंतु लहर आली म्हणजे तो काय कराल याचा नेम नसे. जिवास जीव देणारे त्याचे कित्येक साथीदार होते, म्हणूनच त्यानें पुष्कळ वर्षे टिकाव धरला. विजयसिंह

गादीवर आला तेव्हां तो अल्पवयी व अज्ञानी होता. मराठ्यांबरोबर लढण्यांत राज्य व त्याचे खजिने भिकेस लागले. फार वर्षांच्या युद्धांत शेतकी, व्यापार व उद्योग सर्व बसले आणि रामसिंह पुष्कळ वर्षें जिवंत राहिल्यामुळें त्याची भारती मनावर राहून विजयसिंहास कांही एक उपयुक्त काम करतां आलें नाहीं.

स्वारीस एकंदर खर्च तीन कोट रुपये आला. परंतु हाताखालच्या लोकांचे नुकसान शिंद्यांनीं होऊं दिले नाहीं. उज्जनीस येतांच बुंदीचा राजा मरण पावला आणि त्याचे स्त्रियेनें आपल्या अल्पवयी मुलास गादीवर बसविण्यासाठीं शिंद्यांची मदत मागितली. ती मदत केल्याबद्दल अल्पावकाशांत ४० लाख रुपये दक्षाजीस मिळाले. तेणेंकरून नागोरच्या स्वारीचे कांहीं कर्ज फिटलें. ' संस्थान कोटें येथून चाळीस लाख खंडणी केल्याचा मजकूर लिहिला, त्यांत सरकारचा नजराणा पंधरा लक्ष रुपये, पैकी साल मजकुरीं दहा लक्ष व पांच लक्ष पेस्तरसालीं द्यावे. याप्रमाणे करार केला आहे म्हणोन लिहिलें, ऐशास सांप्रत सरकारांत ऐवजाची निकड बहुतच आहे. दहा लक्ष रु. सत्वर पाठविल्यास फारच उपयोगास पडतील. वरकड मारवाड प्रांतें ऐवज जमा झाला असेल तो देशास येतेसमयीं समागमें घेऊन यालच यंदां पैक्याची अगदि फारच ' [का. सं. प. या. ३५०], असें पेशवा जनकोजी शिंद्यास १७८५६स. लिहितो. म्हणजे या वेळीं शिंदे दक्षिणेंत दाखल झाले नव्हते, पुढें लवकरच आले (का. सं. पदा. ३४९). बरसातींत शिंदे उभयतां दक्षिणेंत चांभारगोंड्यास आले. तेथे नानासाहेब व सदाशिवराव यांनीं मुद्दाम जाऊन त्यांच्या भेटी घेऊन समाधान केले. मारवाडांत जिकलेला सर्व मुलूख शिंद्यांकडेच पेशव्यानें ठेविला. पुढे तीस वर्षांनीं रजपुतान्यावर मोहिमा करतांना हा पूर्व इतिहास महादजीचे मनांत डांचत होता हें सांगणे नकोच. मल्हारराव होळकर शिंद्याचे भेटीस चांभारगोंड्यास जाणार होता, परंतु शिंद्यांनी त्याची भेट घेण्याचें साफ नाकारिलें. ' आतां त्यांची भेट स्वर्गी ' असा जबाब दिला. ह्या दोन मोठ्या सरदारांचे हाडवैर जुंपलें हे भावी विनाशाचें पूर्व चिन्ह होय;

वैगुण्यच समजलें पाहिजे. एकंदर स्वारीत प्रत्येकानें आपली शिकस्त केली. सर्व लोक अत्यंत छातीने व एक विचाराने जिवाची पर्वा न धरितां लढले. रजपूत लोकांचा जमाव भारी, व इतर सरदारांकडून तावडतोब मदत आली नाहीं, म्हणून दोन वर्षें कुचंबणा झाली; आणि हाच प्रकार पुढें तीन चार वर्षें हळूहळू बळावत गेला, त्यामुळें बाजू मराठ्यांच्या अंगावर आली. फौजा, पैसा, सामुग्री इत्यादि गोष्टी वेळेवर व भरपूर मिळाल्या नाहीत, म्हणून त्यांचा मोड होत गेला, बाकी कुचराई अशी कोणींही केलेली नाहीं; ही गोष्ट त्यांच्या शौर्यास मेहमीच भूषणावह आहे.

रजपूत लोक म्हणजे धर्मानें व जन्मानें मराठ्यांचे जातभाईच होते. विशेष जरूर नसतां पेशव्यांचें काम वारण्यासाठीं पैसे मिळविण्याच्या हेतूनें दुसरीं उपयुक्त कामें सोडून जयाप्पानें रजपुतान्यावरची वरील स्वारी हातीं घेतली. यांत त्याचा तर फायदा झाला नाहींच, उलट रजपूत जातभाई मराठ्यांचे कायमचे वैरी बनले; आणि स्वधर्मीयांवर शस्त्र धरल्यानें मराठ्यांच्या मूळच्या उच्च हेतूंचा विपर्यास झाला. होळकराच्या चढाओढींत जयाप्पा शिंद्यानें हें प्रकरण उगीच अंगावर घेतलें. रघुनाथरावास राज्यकारस्थान किंवा मुत्सद्देगिरी ठाऊक असती तर त्याने असा प्रकार होऊं दिला नसता. यासाठींच नानासाहेब उत्तरेत येता तर तिकडील कारस्थानांस योग्य वळण लागून कदाचित् पानपतचा परिणामही भिन्न झाला असता असें वाटूं लागलें. रजपुतान्याच्या ऐवजीं प्रयाग काशी वगैरे हिंदूंची पवित्र स्थळे सोडविण्याचा उद्योग जयाप्पानें अंगीकारिला असता तर मराठ्यांचें ध्रीद लोकांच्या निदर्शनास आलें असतें. एकंदरीत शिंदे होळकर या दोन मुख्य सरदारांचे भांडणांत पुढील नाशाचे बीज आहे, ही गोष्ट येथें प्रत्ययास येते.

या स्वारीनें रजपूत मराठ्यांचें वैर मात्र कायमचेंच जुंपलें. पामपत्ताच्या मसलतींची वाताहत होत असतां, रजपूत मजा पाहत तटस्थ राहिले, जुसली धान्यमामुग्री सुद्धां त्यांनी मराठ्यांस पोचविली नाहीं, यावरून बाजीरावाचे वेळचा रजपूतमराठ्यांचा स्नेह लयास जाऊन, अलीकडे त्याचा किती विपर्यास

झाला, हेंही या मारवाडच्या स्वारीवरून उघड होतें. शौर्य व हिंमत हे शिंदे घराण्याचे उज्वल गुण वरील प्रकरणांत अत्यंत निदर्शनास आले, आणि त्याबद्दल केवळ त्यांच्याच वंशजांस नव्हे तर अखिल मराठी राष्ट्रास सदैव अभिमान वाटेल यांत संशय नाहीं. मारवाडांत शिंद्यांची फुरंधणा होऊं लागल्यानें उतरेंतील मराठ्यांच्या एकंदर उद्योगाची बरीच हानि होऊं लागली. 'जवाजीस कष्ट झाला हे वर्तमान जमीनदारांस कळतांच मन मानेल त्याप्रमाणे ते लबाडया करूं लागले. (३·१३७) जयनगरास माधोसिंगानें गोविंद तिमाजीस जिवे मारिलें. घरदार लुटलें, आणीकही मारिले. तमाम राजेरजवाडे लबाडीस आले,' (३·१५२), असें गोविंदपंत बुंदेले लिहितो. पुढील उपक्रम समजण्यासाठीं गोविंद बल्लाळाच्या हालचाली कोण होत्या हें आधी येथे पाहिले पाहिजे.

६. **गोविंदपंत बुंदेल्याचा कारभार.**—रा. राजवाडयांनीं या गृहस्थाच्या कर्तृत्वाचा भाग अत्यंत हिडिस दाखविला असून, त्यामुळे त्यांचे पानपतचें विवरणही विपर्यस्त व सदोष झालें आहे. गोविंदपंत कदाचित् आपमतलबी असेल, पण तेवढ्यावरून पानपतच्या अपयशाचा बराच मोठा वांटा राजवाडे त्याच्याच माथीं मारतात ते बरोबर नाहीं. त्याच्याहीपेक्षां ज्यास्त मतलब मल्हारराव दरोरे दुसऱ्या अनेक व्यक्तींच्या ठिकाणी होता; आणि बुंदेलच्या ठिकाणी तो नसता तरी तेवढ्यावरून पानपतचा परिणाम निराळा झाला असता असें म्हणतां येत नाहीं. याकरितां या गृहस्थाचा उद्योग यथातथ्य दाखविणे जरूर आहे. 'स. १७३३ त गोविंदपंतास बुंदेलखंडाचा सुभेदार केलें म्हणून कोठेंकोठे लिहिलेलें आढळतें, ती निवळ गप्प होय' हें राजवाड्यांचे विधान [१ प्र. पृ. ५४] साफ चूक आहे. त्याच सालीं पंताच्या उद्योग उत्तरेंत सुरू होऊन, तिकडेच त्याची पुढील अठ्ठावीस वर्षें सारखीं खर्च झाल्यामुळें, त्याच्या इतका तिकडील माहीतगार दुसरा इसम नव्हता. तो मूळचा कारकुनी पेशाचा असून प्रसंगाने शिपाईगिरीचें काम शक्तीबाहेर त्याजवर पडल्यामुळें त्यास यश आलें नाहीं. राजवाड्यांचा पहिला खंड प्रसिद्ध झाल्यावर, तिसरा व सहावा हे खंड बाहेर आले, त्यांत पंताचीं शंकडों नवीन पत्रें छापलेलीं

पाहतां, त्याजबद्दल अनुकूल ग्रह उत्पन्न होतो. पोरी, चिजा, उंची कापड वगैरे हिंदुस्थानांतून पेशव्यांस गोविंदपंत पुरवीत असे. गोविंदपंताचा धाकटा भाऊ पुण्यास कारभार पाहत असे.[1] उत्तरेकडील कमाईचा पुष्कळसा पैसा गोविंदपंत दक्षिणेंत पाठवी. स. १७४० च्या सुमारास त्यास चांगली कमाई झाली. दोन लाखांपासून चौदा लाखांपर्यंत सालाची रसद गोविंदपंत पेशव्यांकडे भरीत असे. ही रसद नियमितपणें भरण्याबद्दल त्याचा मोठा लौकिक होता. स. १७४९-५० साली पेशव्यांनीं त्यास पालखी व अब्दागीर अशी नेमणूक करून दिली. [१-१३२ व टीप १८२]. रोहिल्यांचे युद्धापासून गोविंदपंताचे कमाविशींत दंगे उत्पन्न होऊन वसुलास अडचण पडूं लागली; आणि हा घोटाळा उत्तरोत्तर वाढून त्याचा मानपतावर कळस झाला. अर्थात् यांत मुद्दाम लबाडी केल्याचा आरोप सिद्ध होत नाही. तो आपल्या अडचणी भावास वारंवार लिहितो. (३-१५५). दक्षिणेतील घडामोडींचा तपास ठेवण्याचा गोविंदपंतास मोठा हव्यास होता, त्यावरून प्रसंग येईल तशी पाठ फिरविण्याचा त्याचा हेतु बहुधा असावा असें दिसतें. सर्व कारस्थनांची माहिती ठेवून, कोणाशीही विकोपास न जातां सावधगिरीनें वागून, आपला मार्ग सुधारावा असा त्याचा परिपाठ व स्वभाव दिसतो. थोडा बहुत संशयी व कपटीही असावा असें भासते. 'पैसा कोठीलही वसूल होत नाहीं, जान विकत नाहीं, असें परम संकट आहे. ताराबाईनी संभाजी राजांशी पैगाम केला आहे कीं काय तें लिहिणे. ताराबईजवळ फितुरांत कोण कोण आहेत, श्रीमंत कोणीकडे जाणार, काय मनसुबा तो लिहिणे. (३-१६३). सबंगाईमुळें पैसा वसूल होत नाहीं. रयत बटाई घ्या म्हणते, नाही तर पळोन जातात, पैसा उगवत नाही. बुंदेलखंडी चार लाख रुपये कर्ज देणें तें अद्याप वारत नाही. शहरीं देणें तें तसेंच. श्रीकाशींत हुंडी केली, तेथे ऐवज तूर्त न मिळे, म्हणून कर्ज तेथें घेणें लागलें. ऐसा प्रसंग ईश्वरें आणिला. धरणीं चारणीं सावकाराचीं

१. वंशावळ पहा, मराठी रियासत, म. वि. १ पृ. ३८८.

होऊं लागलीं. अशी गत कधी न जाली' (३·१६५, १२·१·१७५१). श्रीमंतांस वगैरे गौरवून पत्रें लिहून तो त्यांची मर्जी सांभाळण्यांत मोठा कुशल होता. 'श्रीमंतांचें पुण्य समर्थ, ह्मणून गायकवाड, दाभाडे, ताराबाई विल्हेस लागले. नासिरजंग मेला.' हिंदुस्थानच्या व्यवस्थेस फौज किती व कशी पाहिजे याचा स्पष्ट इशारा बुंदेल्यानें सदाशिवरावास २४·२·५५ च्या खालील पत्रांत दिला आहे. 'हिंदुस्थान प्रांती हंमेशा मातबर फौज पाहिजे, तरच बंदोबस्त राहील. बुंदेलखंडापासून अंतर्वेदीपावेतों रखवाली पाहिजे. मातबर जागा, रांगडे लोक हरामजादे, तेव्हांच फिसाद करतात. दिल्लीत बंदोबस्त नाहीं. तेथें गडबड जाली ह्मणजे सर्व रजवाड्यांची नजर फिरते. दादास्वामीही देशीं जाणार. सरदारही समागमें जातील. आह्मांजवळ फौज नाहीं. हंमेशा वीस हजार इकडे छावणी असावी. फौज येईल तेव्हांच बंदोवस्त करून आह्मी देशास येऊं. सबब मातबर फौज अविलंबें सत्वर रवाना करावी. कैदेनें राहत, सरकार कामावर चित्त देत, जागजागां गांव न लुटीत असे लोक पाठवावे. नाही तर नित्य लूट करितां हैराण करितात ऐसे न पाठविणें. हिंदुस्थान प्रांती फौज नसलिया बंदोबस्त राहणार नाहीं, पैसा वसूल होणार नाहीं, हयगय जालिया फजिती आहे,' [इ. सं. ऐ. टि. २·४५]. यापेक्षां जास्त स्पष्ट व जोराचा इशारा कोणता द्यावयाचा. दिल्लीतील कारभार आपसांतील चुरशीने बिघडला. रघुनाथरावाचे स्वारीनें बदनक्ष ह्माला. स्वतः नानासाहेब अगर भाऊसाहेब यांपैकी कोणी तरी येऊन व्यवस्था न केल्यास सर्व उद्योग फसेल, असें पंताने सदाशिवरावास निक्षून लिहिलें (४·९·१७५५, खं. ३·१५१). पुनः स. १७५६ त बुंदेले सदाशिवरावास लिहितो. 'उभयतां सरदारांत पेंच दिसतो. सुरळीतपणें वर्तणूक होणार नाही. आपसांत कटाक्ष वाढेलसें दिसतें. या प्रांतीं स्वामी आलियाविना बंदोबस्त व सरकारी कार्य होणार नाहीं. याजमध्यें सर्व आहे. स्वामी सर्वज्ञ आहेत. ज्याची फिकीर त्याजला असते. सरदारांत आपसांत चित्त शुद्ध नाहीं, याजमुळें मनसुबा सिद्धीस जाणार नाहीं. एकानीं एक ह्मणावें,

दुसऱ्यांनीं दुसरेंच ह्मणावें. यांत मनसबा कसा सिद्धीस जाणार ! याजकरितां स्वामींनीं श्री. नानास्वामी सुद्धां दिल्लीस यावें, आपलें कार्य मातबर, पातशहांत व वजिरांत अनायासें (कलागत) लागली आहे. त्याजमुळें सरकारी कार्य जें ह्मणावें तें होणार. द्रव्य मुलूख घ्यावे. असा समय कधीं येणार नाहीं; आणि स्वामीखेरीज सरकारी कार्य मातबर होणें नाहीं. जालें तर, बंदोबस्त होणार नाहीं. असे पेंच आहेत. श्री. नानास्वामी व आपण येऊन बंदोबस्त करून जाल तरीच सरकारी कार्य होईल, आणि स्वामीचा हुकूम राहील असें आहे. कितेक वर्तमान पत्रीं लिहितां नये. भेटीस येतों, सांप्रत विदित करीन. स्वामी सर्वज्ञाण आहेत ' [३·१४९]. इतकें स्पष्ट व कळकळीचें, इतकें निष्ठेचें व राष्ट्रकार्याचें पत्र फार वर्षांच्या अनुभवी सरदाराकडून आलें असतां, उभयतांपैकीं एकासही उत्तरेंत जाण्याची बुद्धि झाली नाहीं, हें भावी अनर्थाचें लक्षण समजलें पाहिजे. नानासाहेब व सदाशिवराव या दोघांच्याही कर्तृत्वाबद्दल गोविंदपंतास खात्री होती; आणि रघुनाथरावास उत्तरेंत पाठवूं नये, असाही बुंदेल्याचे लिहिण्याचा रोंख होता (३ पृ. ३८). रघुनाथरावाचा मेहुणा गोपाळ गणेश बुंदेल्याचे कारभारांत ढवळाढवळ करूं लागला, त्यावरूनही त्या उभयतांचें वांकडें आलें असावें असें दिसतें. ' मी चाकर बारगीर स्वामीचा आहें. कराकुडा येथें मेहनत केली, जिवाकडे न पाहिलें, आणि मोगलांशीं झुंजलों. मातबर जागा स्वामीचे घरीं आली. जर जागा गोपाळराव यास देणें होती, तर मजला बोलावून हजर ठेवून जे आज्ञा करणें ते करावी होती. मी हुकमी स्वामींचा. आह्मांस उजूर काय ! परंतु कराकड्यांत माझी प्रतिष्ठा स्वामींनींच बसविली. स्वामीचे जोरानें वजीर रजवाडे यांजला मी खातरेस आणीत नाहीं. अबरूनें जालियास स्वामींचाच नक्ष राहतो. श्री. दादास्वामींची आज्ञा ती आह्मांस प्राणादाखल आहे. त्यांत उजूर करीत नाहीं. आह्मी चाकर स्वामीचे कमाऊ आहों. स्वामींचे चार पैसे खराब करावयाचे नाहीं. मजला मोठी उमेद आहे, स्वामींची चाकरी उमदेपणें करावी, आणीक जागा मुलुख स्वामीचे घरीं आणून घालावा हे आहे. माझी नालीस

नाना प्रकारें स्वामीस लिहिणार लिहितात. आह्मांस एक स्वामीची कृपा, वशीला वगा ह्मणावा तर स्वामीखेरीज नाहीं. बकुल्लाखान पातशाहींत नामी सरदार होता, त्याजला परम संकटें, परम उपायें, जिवाकडे न पाहतां, बुडविला. त्यास मराठा सरदार हें कर्म करिता तर जमिनीवर न मातां. आह्मी स्वामींचे ब्राह्मण आमची शिफारस कोण करणार ! आज दोन लाख रुपयांचा तोफखाना स्वामींस मिळवून दिला. कुरा व कडा अठरा परगणे, लहान थोर स्वामींचे घरीं आले. पातशहा कोठील, वजीर कोठील, जे जागा घेतली ते स्वामींनीं कोणास दिली ! कांहीं नादानी आह्मांपासून न जाली. आह्मी कानधरली शेळी आहों. हुकमी आहों. खावंदांची अहर्निशीं सेवा एकनिष्ठपणें करावी हें जाणतों. सेवेशीं येऊन तपशीलवार वर्तमान विदित करीन, तेव्हां स्वामी ऐकोन संतोषी होतील. आमचे श्रमाचें सार्थक होईल.' (३·१३७, १३·९·१७५५). या पत्रावरून रघुनाथरावानें उत्तरेच्या स्वारींत केवढी अव्यवस्था केली हें दिसून येतें. शिंदे होळकरांचें भांडण विकोपास गेलें. बुंदेले, अंताजी माणकेश्वर, हिंगणे वगैरे झाडून सारे जुने फार वर्षे उद्योग केलेले सरदार नाराज झाले. पातशहा, वजीर, सुजाउद्दौला वगैरे नरम न होतां मराठ्यांचे विरुद्ध जोराचीं कारस्थानें करूं लागले. रजपूत व जाठ मराठ्यांचे वैरी बनले. हिंदूंचीं पवित्र स्थळे उपद्रव पावलीं, असे एकना दोन किती तरी घोटाळे रघुनाथरावानें माजविले. उलट दक्षिणेंत नाना व भाऊ या दोघांनीं दमाजी, रघूजी, निजाम, बुसी, ताराबाई, संभाजी व कर्नाटकांतील तमाम लोक जे भारी उपद्रव करीत होते त्या सर्वांस नरम करून आपल्या लगामीं लाविलें. ह्मणूनच गोविंदपंत हळहळे, कीं या दोघांनीं अगर एकानें तरी एकवार तिकडे जाऊन सर्व भानगडी मिटवाव्या. रघुनाथरावाची अव्यवस्था पेशव्याचे कानीं घालण्यासाठीं बुंदेले स्वतःच पुण्यास जाणार होता (३·१५६). त्याजविरुद्धही पुष्कळशा कागाळ्या पेशव्यांकडे गेल्या असून, समक्ष भेटींत आपण स्वामींस सर्वथैव राजी करूं अशी त्यास खात्री होती. परंतु स. १७५६ च्या श्रावणापर्यंत त्यास निघतां आलें नाहीं (३·१/५७).

१७५६ च्या आरंभीं त्याला रजपूत बुंदेल्यांवर जावें लागलें त्याचा प्रकार असा.

मराठ्यांनीं रोहिलखंड जिंकल्यावर त्या प्रांतास अयोध्येचा वजीर व रोहिले दोघेही त्रास देऊं लागले. गोपाळराव बर्व्यांचे हातून त्यांचा बंदोबस्त होईना, तेव्हां गोविंदपंतास तें काम सांगण्यांत आलें. यमुनेच्या अलीकडचा प्रदेश त्याच्याच ताब्यांत होता, आणि त्यास लागूनच पलीकडे करा, कुडा, इटावा, सकुराबाद वगैरे परगणे जिंकण्याचें काम रघुनाथरावाच्या हुकुमानें पंतानें स्वीकारिलें. पुढें पानपतावरही अंतर्वेदींतील कामगिरीच पंतास जाचक झाली. ता. ११·१·१७५६ रोजीं पंत रघुनाथरावास लिहितों. ' अंतर्वेद प्रांतीं वजिरांनीं फिसाद करून, तमाम दक्षणी अंमल उठवावा, म्हणून सय्यद अलीअस्कर याजला पाठविलें. सकुराबाद परगण्याच्या सनदा शिरपाव देऊन रवानगी केली. जमीनदार सर्व जाऊन त्यास मिळाले. यामुळें तमाम अंतर्वेदींत दंगा जाला. गवार जात जागजागां लुटूं लागले, पैसा कोणी देईना. सर्वांस वारें लागलें. आम्हीं जेतपुरास बुंदेल्यांकडील कार्य करावें, तों अंतर्वेदींत दंगा झाला म्हणोन वर्तमान आलें, तेव्हां कूच करून यमुना उतरून इटावेस आलों. पौष शु. ८ भृगुवारीं (९ जानेवारी) मोगलांवरी गेलों. मोगल भारी झाला. निदानची गोष्ट येऊन पडली, मरावें कीं मारावें, दुसरा विचार नाही. स्वामींचे चरणांचें चित्तांत स्मरण करून दोन घटका शर्थ केली. अस्करअली व त्याचा पुत्र हौद्यांतच जिवें मारले. दुसरे ५०।६० सरदार मारले. दोन हजारपावेतों माणूस कापलें. सामान सर्व लुटलें. आमचे जीव या समयीं वांचावेसे नव्हते. पण स्वामीच्या प्रतापेंकरून शत्रूचा नाश जाला. जास्त फौज आलियाखेरीज आम्हीं काय करावें. सलूख जालियाविना रयत पैसा न देई. याजकरितां दोन लाख रुपये इजारा कुराबाबत आणीक देऊन सलूख केला. पुढें आपली जबरदस्ती जालियावर पंनास लक्षांची जागा सोडवून घ्यावी. जालें वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. [१]'

१. टीप:—हें पत्र रा. श्री वि. आठवले यांजकडून रिंगणगांव दप्तरपैकीं मिळालें. शोडक्यांत गोषवारा येथें दिला आहे.

अंतर्वेदींतील कामगिरीमुळें पंतास इच्छेप्रमाणें रघुनाथरावाचे पाठोपाठ पुण्यास जातां आलें नाहीं. सेप्टेंबर ५६ त तो लिहितो, आतां लवकरच निघतों [३·१४४]. पुढें डिसेंबरांत तो देशीं गेला, असें अंताजी माण० २१·५·५७ स लिहितो. [इ. सं. ऐ. टि. २·३१]. स १७५७ चे आरंभीं तो पुण्यास आला, तेव्हां रघुनाथराव पुनरपि उत्तरेचे स्वारीस गेला होता. मिळून उत्तरेंतील भानगडींची समक्ष वाटाघाट स. १७६० पर्यंत झालीच नाहीं.

स. १७५५–५६ पर्यंत गोविंद बल्लाळाचे कामाबद्दल पेशव्याकडे यत्किंचित् तक्रार गेलेली नव्हती. उलट शिंदे होळकरांचे बरोबरीनेंच त्याचाही तिकडील अनुभव असल्यामुळें, त्याची लोकांत व मराठे मंडळांत मोठी मान्यता होती. गोपाळ गणेशानें व हरि विठ्ठलानें मात्र रघुनाथरावाच्या स्वारीनंतर पेशव्याकडे कांहीं कागाळ्या नेल्या (खं. ३·१५०, १५२, १५५), त्याही निव्वळ आपमतलबाच्या होत्या. तेव्हांपासून पुढें त्याची पैशाची तारांबळ उडाली; आणि पैसा वेळेवर पाठवीत नाहीं, असा त्याजवर पेशव्यांचा आरोप आला. परंतु वसूल येत नव्हता, जिकडे तिकडे दंगेधोपे माजले, अब्दालीच्या स्वाऱ्यांनीं लोक फार हवालदील जाले, अशा स्थितींत शिंदेहोळकरांसारख्यांची सुद्धां जर पैशाची ओढ नेहमीं असे, तर गोविंदपंताचीही तशीच असल्यास नवल नाहीं. असेच जबाब गोविंदपंतानें वारंवार दिले आहेत.

जर्नादनपंताची बायको सगुणाबाई काशीयात्रेस गेली असतां तिच्या खर्चास नव्वद हजार रुपये देण्याविषयीं पेशव्यानें गोविंदपंताकडे वरात केली. गोविंदपंत दक्षिणेंत गेला असून त्याचा मुलगा बाळाजी गोविंद कामावर होता, त्यानें ही वरात स्वीकारली नाहीं. सबब रघुनाथरावानें त्यास खालील खरमरीत पत्र ता. १३·३·५७ चें स्वारींतूनच लिहिलें [खं. १·६०]. 'ऐवज आह्मांकडे नाहीं, आह्मांस अनुकूळ न पडे, आह्मी सरकारचे चाकर नाहीं, गोविंदपंताचे चाकर, याप्रमाणें नाना प्रकारच्या बयादा सांगितल्या. पंचवीस हजार रुपये दिले, बाकीचा ऐवज नाहीं ह्मणोन जाबसाल केला. ऐशास तुह्मीं ऐवज न दिला ही गोष्ट उत्तम न केली. तुह्मी मातबर मामलेदार,

हरप्रयत्न करून ऐवज द्यावा; न दिला ही फार वाईट गोष्ट केली. तर पत्र पावतांच बाकीचा पांसष्ट हजार ऐवज झांशीस बाईकडे पावता करणें. अंतर केल्यास खावंदाची परिछिन्न अवकृपा तुह्मांवर होईल.' उत्तर हिंदुस्थानांत धामधुमीमुळें वसूल होत नव्हता, ही गोष्ट पेशवे लक्षांत घेईनात, त्यामुळें सरदारांचें व त्यांचें बिनसत गेलें, याचा मासला वरील पत्रांत दिसतो.

गोविंदपंत दक्षिणेंत आला असतां, वाईनजीक कृष्णातीरीं सहस्रधारातीर्थासमीप श्रीवाकेश्वराचें प्राचीन स्थान होतें, त्याचा जीर्णोद्धार त्यानें करून बावधन गावांत देवासाठीं कांहीं इनाम जमीन करून घेतली (३·१४२). पेशव्यास भेटून दुसरीं काय काय कामें त्यानें केलीं, त्याचा उल्लेख सांपडत नाहीं. परंतु उत्तर हिंदुस्थानांतील एकंदर परिस्थिति पेशव्याचे कानावर घालून, तिकडील व्यवहारांची व्यवस्था लावण्यास काय केलें पाहिजे, हें त्यानें पेशव्यास स्पष्टपणें सांगितलें असावें. निदान अंताजी माणकेश्वर, हिंगणे व नारोशंकर वगैरे मंडळींना कैद करून आणण्यापर्यंत पेशव्याला पाळी आली, तसा कांही एक प्रकार गोविंदपंताचा झाला नाहीं, उलट त्याचा योग्य गौरव करून पेशव्यानें त्यास लवकरच परत आपल्या कामावर पाठविलें, आणि पानपत अखेरपर्यंत पेशव्याची व सदाशिवरावाची गोविंदपंतावर मोठी भिस्त होती, यावरून त्याचा कारभार त्यांस चांगला पसंत होता, असें म्हणतां येतें. गोविंदपंत स. १७५७ च्या आरंभीं दक्षिणेंत आला, त्यापूर्वीच रघुनाथराव पुण्याहून निघून हिंदुस्थानांत माळव्याकडे गेला होता, तेव्हां रघुनाथरावाच्या नाकर्तेपणाबद्दल त्यानें विशेष तक्रारी पेशव्याजवळ केल्या नसाव्या. कारण तशी खात्री पेशव्याची पटती तर या वेळींच सदाशिवराव हिंदुस्थानांत आला असता. रघुनाथरावाच्या या लाहोरच्या स्वारींत मराठ्यांच्या बाजूने अव्यवस्थेची व धांदलीची अगदीं कमाल झाली, हा प्रकार पुढें व्यक्त होईल. गोविंदपंताला हे प्रकार आवरण्याचें बिलकूल साधन नव्हतें आणि रघुनाथरावानेंही त्याला लगेच हिंदुस्थानांत बोलावून घेतलें.

प्रकरण २८ वें.

अब्दालीचा पाठलाग.

१ अब्दालीची तिसरी स्वारी. २ रघुनाथरावाची लाहोरची स्वारी.
३ रघुनाथरावाचा दिल्लींत मुक्काम. ४ हिशेबाच्या भानगडी, शिंदे, हिंगणे,
५ अटकेवरील झेंडे. व अंताजी माणकेश्वर.

१. अब्दालीची तिसरी स्वारी (१७५६ नोव्हें०—५७ एप्रिल). स. १७५५ च्या पावसाळ्यांत रघुनाथराव होळकरासह दक्षिणेंत आला. मागाहून शिंदे बदनक्ष होऊन १७५६ च्या अखेरीस आले, तेव्हां लगेच दिल्लींत मराठ्यांचे विरुद्ध प्रचंड कारस्थानें चालू झाली. अंताजीपंत दिल्लीचे बंदोबस्तास होता. ता. ५·३·५६ रोजीं दीक्षित लिहितो. ' वजीर सुजाउद्दौला फरुखाबादेस आले. बरोबर हरिभक्त, पठाण, रोहिले सर्व आहेत. रोहिल्यांपासून साठ लाख घेऊन त्यांचा मुलूख निंमे हरिभक्तांस व निंमे पठाणास दिल्हा. काशीची सनद वजिरानें दिल्ही, तेथें गोपाळराव बर्वे दोन हजार फौज घेऊन जात आहेत. दामोदरपंत हिंगणे यांनी काशींत तुला केली ' [३·४७१]. स. १७५६ च्या पावसाळ्यांत मराठ्यांच्या फौजा दिल्लींत नाहींतसे पाहून, विरुद्ध पक्षानें हिंवाळ्याच्या आरंभींच अब्दालीस हिंदुस्थानांत आणिलें. ही खटपट करणारा मुख्य इसम नजीबखान रोहिला होय. हा प्रथम मीरशहाबुद्दीनचे वशिल्यानें पुढें आला. मराठ्यांच्या साह्यानें शहाबुद्दीनानें बादशहास कबजांत घेऊन सर्व आटोप केला, हा प्रकार बादशहास व मलिकाजमानी वगैरे बायांस दुःसह होऊन, त्यांनीं नजीबखानास हाताशीं धरून शहाबुद्दीनचा पाडाव आरंभिला. नजीबखानाची जहागीर दुआबांत सहारणपुरचे सभोंवार गंगानदीस लागून होती.

पंजाबचे कारभारावर मागील स्वारींत अब्दालीनें मीरमन्नूस नेमिलें होतें. स. १७५४ च्या जानेवारींत अब्दाली मुलतानपर्यंत येऊन परत गेला (Tate). स. १७५४ च्या अखेरीस मीरमन्नू लाहोरास एकाएकीं घोड्यावरून पडून मरण पावला. लगेच अब्दालीनें मीरमन्नूच्या अल्पवयी मुलाचे नांवानें लाहोर व मुलतान या दोन सुभ्यांचा अंमल नेमून कच्चा कारभार मुलाच्या विधवा आईकडे सांगितला; आणि तिच्या मदतीस अदिनाबेगची नेमणूक केली. परंतु तो अल्पवयी मुलगा मरण पावला आणि बाईवर तिचेच अधिकारी उठले. पंजाबांत गडबड होऊन शीख लोक एकएक प्रांत बळकावूं लागले. पंजाब जिंकून परत घेण्यास ही संधि चांगली आहे असें वाटून मीरशहाबुद्दीननें स. १७५६ च्या आरंभीं लाहोरकडे स्वारी केली. मीरमन्नूच्या मुलीशीं लग्न करण्याचें ठरवून त्यासंबंधांत त्यानें सासूशीं पत्रव्यवहार सुरू केला, आणि लग्नाचें निमित्त करून बाहेर पडला. बरोबर शहाजादा अलीगौहर होता. लुधियाना येथें अदिनाबेग पुढें येऊन या मंडळीस भेटला. त्याच्या साह्यानें मीरशहाबुद्दीननें लाहोरसमीप आल्यावर सय्यद जलालुद्दीनखान यास लग्नाच्या निमित्तानें पाठवून त्याजकडून मीरमन्नूची स्त्री व मुलगी यांस रात्रीं निजल्या ठिकाणींच पकडून आपल्याजवळ आणिलें. मीरशहाबुद्दीनचा हा विश्वासघात पाहून मीरमन्नूच्या विधवेस अत्यंत त्वेष आला. तिनें त्यास मनमुराद शिव्या दिल्या, आणि अशा कृत्यांनीं अब्दाली चिडून जाऊन तो हिंदुस्थानचा संहार करील असा शाप मुद्धां दिला. पुढें अलीगौहर यानें मध्यें पडून उभयतांची गोडी करून दिली; आणि मग मीरशहाबुद्दीननें मीरमन्नूच्या मुलीशीं लग्न लाविलें. पुढें तीस लाख रुपये घेण्यावें ठरवून पंजाबचा सुभा मीरशहाबुद्दीननें अदिनाबेगच्या हवालीं केला, आणि सर्व मंडळी परत दिल्लीस आली. मीरशहाबुद्दीन यास धाकटा गाजीउद्दीन असें म्हणतात, त्याच नांवानें पुढें या शहाबुद्दीनचा उल्लेख करण्यांत येईल.

इकडे या सर्व गोष्टींची खबर अब्दालीस जातच होती, त्यांत नजीबखान व मलिकाजमानी यांनीं भर घालून अब्दालीस हिंदुस्थानांत येण्याचें पाचारण

केलें. पंजाबप्रांत हातचा गेला व आपण केलेली व्यवस्था मोडली, या गोष्टींनीं चिडून जाऊन अहमंदशहा अब्दाली स. १७५६ च्या नोव्हेंबरांत काबुलहून निघून डिसेंबरांत लाहोर हस्तगत करून स. १७५७ च्या जानेवारींत दिल्लीवर आला. तेथून पुढें आगऱ्यापावेतों येऊन व मथुरा लुटून, फौजेंत महामारीचा उपद्रव झाल्यामुळें एप्रिल महिन्यांत परत स्वदेशीं गेला.

भाऊसाहेबांच्या बखरींत मलिकाजमानी व गाजीउद्दीन यांचें कारस्थान नाटकी आविर्भावानें वर्णिलें आहे. दिल्लीजवळ यमुनानदीचे बेटांत सालीमगडच्या किल्ल्यांत मलिकाजमानी व चंदाजमानी वगैरे स्त्रिया जनानखान्यांत राहत होत्या. गाजीउद्दीन वजिराकडून ह्या स्त्रियांस खर्चास वगैरे भरपुर न मिळाल्यामुळें त्यांनीं नजीबखानास भेटीस बोलाविलें, आणि मराठ्यांचे हातीं सर्व सत्ता जाऊन, बादशाही बुडते, याचा विचार मोठ्या काकुळतीनें त्यास विचारितां त्यांनीं आणभाक करून, पूर्वी निजामुल्मुल्कनें ज्याप्रमाणें नादीरशहास आणिलें, त्याप्रमाणें अहंमदशहा अब्दालीस आणून त्याचे हातून मराठ्यांचा बंदोबस्त करावा, असा घाट रचिला. लखनौचा सुजाउदौला व मारवाडचा बिजेसिंग राठोड, यांजकडेही त्यानें संधान रचिलें. 'जयनगरचा माधवसिंग याचा दोंही डगरीवर हात असून, सुरजमल्ल जाठ तों आपला नव्हे. अब्दालीचा पुत्र तयमूरशहा ह्यास चंदाजमानी द्यावी, वाजिरी सुजास देऊन बक्षीगिरी मजला द्यावी' असें नजीबानें सुचविलें; आणि त्याप्रमाणें अंमलांत आणण्याचें ठरून, नजीबानें सर्व मंडळीकडे आपले हेर पाठविले; आणि आपला भाऊ सुलतानखान ह्यास अब्दालीकडे रवाना केलें. ह्या सर्व गोष्टी इतक्या गुप्त रीतीने झाल्या कीं, गाजीउद्दीनास त्यांची वार्ताही कळली नाहीं. त्याप्रमाणें अब्दाली ऐशीं हजार फौजेनिशीं दिल्लीवर चालून आला. हिंगणे बंधु होळकरास लिहितात. 'स. १७५५ च्या नोव्हेंबरांत अब्दाली अटक उतरून मातबर फौजेसहित (ता. २० डिसेंबरास) लाहोरास दाखल होऊन, जलूस बहुतसा करून, जागजागीं आपले नायब रवाना केले, व करीत जातो. जमीदारही जाऊन भेटतात. अदिनाबेग, सदिलाबेग, जमालुद्दीनखान हे त्रिवर्ग आधींच

सरकोन लाखीजंगकडे गेले. सन्मुख देखील न आले. सरहिंदेस बहादुरखां बेलाचांचा नायब लक्ष्मीनारायण होता, तोही माघारा आला. जंमूच्या राजानें झुंजाची तयारी केली आहे हें पठाणांनीं ऐकोन, त्याजवर दहा हजार फौज रवाना केली. जलालाबाद, अदिनानगर, नूरसाहाल, जालंधर या स्थळीं अब्दालियाचा अंमल जाला. जागाजागां सरदारांच्या नेमणुकी होत जातात. ब्यास व सतलज यांजमधला प्रदेश खोजे अब्दुल्ला यास दिधला. येथें कोणीं मर्द माणूस नाहीं, हेंही त्यास कळून चुकलें. मनुष्यमात्र आपले स्थळीं चिंताक्रान्त. त्यास एक धास्ती आपल्याकडील कीं मातबर फौजेनिशीं सुभेदार आल्याखेरीज राहणार नाहींत. दिल्लीवाले कितेक सरदार त्यासी भेटले आहेत. अंताजी माणकेश्वर ता. ३१ डिसेंबरास येथें येऊन दाखल जाले. ३ जानेवारीस त्यांची मुलाजमत झाली. विना आपली स्वारी या प्रांतीं येत नाहीं तों कालपर्यंत, हिंदुस्थानचा बंदोबस्त होत नाहीं व अबरू व सलतनत राहत नाहीं. वजिरांनीं वस्त्रें भूषणें पाठवून त्याचा शिष्टाचार चालविला आहे. हिंदुस्थानावर फिरोन न यावें ऐसे करार मदार झाले असतां, बदमामली करून हिंदुस्थानची मोहीम करूं इच्छितां, हें तुम्हांस विहित नाहीं, अतःपर माघारें फिरोन जावें, ऐसा बोध त्याचा वजीर शहावल्लीस बोलावून केला. समशेरबहादरास पाचारिलें आहे. मातबर दक्षणी फौज आलियानंतर बाहेर निघणार.' (२०·१·३७५७, ६·३६५).[1] यानंतर दुसरे दिवशीं अंताजी माणकेश्वर पेशव्यास लिहितो. 'अब्दाली लाहोर घेऊन दिल्लीस दाखल झाला. दिल्लींतील फौज, नजीबखान वगैरे सरदार, बापूजी महादेव वकील वगैरे मिळोन, अगोदर सहा कोस दिल्ली राहतां, जाऊन भेटले. आम्ही पुढें सडे-स्वारीनिशीं गेलों. दोन लढाई मातबर जाहल्या. परंतु फौज त्याची भारी, तीस कोस नित्य घोडा धावतो. दिल्लींतील फौज त्यास सामील. पातशहा वजिरापाशीं चार हजार स्वार राहिले नाहींत. एक आमची फौज बारा हजार मात्र. त्यापैकीं हिंदुस्तानची चार हजार ती दळाची शोभा. वरकड आठ हजार

१. टीपः—पत्रांतील तारखा मुहाम समजुतीकरितां इंग्रजी दिल्या आहेत.

देशची. सारा पेंच आह्मावरी पडला, तेंव्हां आम्ही कूच करून फरिदाबादेस आलों. बारा कोस फौजेनें आमचा पाठलाग केला. वजीर त्यांस भेटला. त्यानीं नजरबंद केलें. दिल्लीस द्वाही त्याची फिरली. पातशहा किल्यांत स्वाधीन आहेत. हिंदूंचे पूर्ण द्वेषी. दिल्लीतील फितुऱ्यांसुद्धां लाख स्वार त्याजकडे जमा जाला. सुरजमल्लाकडे वरचेवरी पत्र पाठवितो. पातशहा रात्रंदिवस ह्मणे कीं, हे पातशहात बाळाजी रायाची आहे. त्याचे सरदारांस सत्वर बोलावून हें काम सिद्धीस नेणें. आमचे घरांत कवडी नाहीं. आह्मांजवळ राहिला मुलूख आहे तोही घेणें. त्यास आह्मी आपले प्रयत्न बहुत केले. समशेरबहादरांस नारोशंकर हरोळ जाले आहेत. वकिलांकडे निराळा जाबसाल लाविला, आणि समशेरबहादरांस ग्वालेरीसच गोवून, आमचे सरंजाम लुटून सत्यानाश करविला. इकडे येऊं दिल्हें नाहीं. आपण आला नाहीं. नारोशंकरांनी नामदींकरून जो घात केला, तो त्याची शिरच्छेदच करावासा केला. हे बापू वकील मात्रागमनी. दिल्लींतून दामोदर महादेव तिघे भाऊ कबिले, पैका, हत्ती, खजाना, भारी घेऊन पळून गेले. एक बापू व त्याची कलावंतीण सडी दिल्लीत आहे. आतां मोठी आशा आह्मांस दोन. नादीरशहाप्रमाणें मागती हेच पातशहा व वजीर स्थापून माघारा गेला, तरी महाल पाया कायम होईल. याजकरितां मरत फिरतों. नाहीं तरी पातशहा वजिरावेंच वाईट जालें तरी आमची सरकारची मुलुखाची अंमल झाडून उठेल. त्याची कांहीं तजबीज जाठ व आपण मिळोन करावी, ह्या दोहों कामासाठीं दिल्ली भोंवतीं फिरतों. नाहीं तर तमाम राजे अमीर शंभर कोस पळाले, धरणीकंप जाला, तेथें आमची कथा काय? अब्दालीशीं तीन झुंजें आमचीं मात्र जाली. राजे माधोसिंग व बिजेसिंग परिच्छिन्न अब्दालीच्या पक्षांत, दक्षिणीयांपासून मुलूख सोडविणार त्याच संमतांत बापू वकील. सुदस्तां कर्जे घेऊन आह्मीं काम केलें. सालमजकुरीं गोविंद बल्लाळ देशीं गेले. त्यांच्या पुत्रांनीं कवडी न दिली. याउपरी श्रीमंतांनीं माझे श्रमावरी कांहीं तरी दृष्टि द्यावी. बापू वकील सर्वथा लबाड आहे., सुरजमल्लाचें अवसान

ठिकाणीं नाहीं. नारोशंकर परम दुष्ट, सारे मिळोन अंतर्वेद राखावयासी येतील तन्ही उत्तम, नाहीं तर कांहीं बरें नाहीं ' (इ. सं. ऐ. टि. २·३१). ता. २८ जानेवारीस दिल्ली हस्तगत करून अब्दालीनें बादशाहीपद धारण केलें. (Imp. Gaz.)

अब्दाली दिल्लीवर येऊं लागला, तेव्हां वजीर गाजीउद्दीनास मोठी चिंता उत्पन्न झाली. नजीबखान व अंताजी हे दोघेच काय ते थोडीं बहुत फौज बाळगून त्याजपाशीं होते. त्यांस सल्ला विचारतां नजीबखान अब्दालीवर म्हणून चालून गेला, तो लबाडी करून तिकडे अब्दालीसच जाऊन मिळाला. आपला एवढा भरंवशाचा हस्तक शत्रूस मिळालेला पाहून, गाजी फार घाबरून गेला आणि अंताजीपंतास बोलावून त्याजकरवीं त्यानें दिल्लीचा थोडा बहुत बंदोबस्त करविला. इतक्यांत अब्दाली येऊन पोंचला. ता. २८ जानेवारी रोजीं त्यानें आलमगीर पातशहाची भेट घेतली. अंताजी पराभव पावून पळून गेला. पुढें शहरांत कांहीं गडबड झालेली ऐकून अब्दालीनें कत्तल करण्याचा हुकूम दिला. साडेतीन घटकांत अठरा हजार मनुष्यांची कत्तल झाली. शहराचा चिंधीचोळा करून दोचौ रोजांत त्यानें दिल्लीचा किल्लाही हस्तगत केला. मलिकाजमानी अब्दालीस सामील होती. बादशहाचा भाऊ अज्जुद्दीन याची मुलगी होती, तिचें लग्न अब्दालीनें आपला मुलगा तयमूरशहा याजबरोबर केलें [एल्यट पृ. ८·२६७], आणि आलमगीर यास किल्ल्यांतच कैद करून ठेविलें. तसेंच मीरशाहाबुद्दीन यासही कैद करून आपल्याबरोबर घेऊन, एक महिना दिल्लींत काढल्यावर, तो दक्षिणेस जाठाचा मुलूख लुटण्यासाठीं निघाला. मीरशहाबुद्दीनचा शिरच्छेद करावा म्हणून नजीबखानानें पुष्कळच आग्रह केला, परंतु अब्दालीनें ती गोष्ट मानली नाहीं. रस्त्यांत जाठाचा बालमगड किल्ला हस्तगत करून प्रांतांतील फौजेची कत्तल उडविली. नंतर पुढें जातांना दिंदूंचें पवित्र स्थान मथुरा आलें, त्याजवर त्यानें जहानखानाचे हाताखालीं मोठी फौज रवाना केली. हें ठिकाण मराठ्यांनीं नुकतेंच हस्तगत केल्यामुळें त्यांचा अंमल उठवून देण्याचा अब्दालीचा मुख्य उद्देश होता.

दिल्लीहून कृष्ण जोशी लिहितो. 'पठाण दिल्लींत येऊन अमिरांचे घरावर चौक्या बसवून कुल द्रव्य घेऊन रयतीस उपद्रव फार दिला. तीस कोट वित्त जमा करून पुत्रासमागमें लाहोरावरून आपल्या देशास रवाना केलें. पुढें दिल्लीतून बाहेर निघून बालमगडाजवळ आले. तेथून कुच केलें ते मथुरेजवळ गेले. आंत पांच हजार जाठ होते त्यांनीं युद्ध उत्तम प्रकारें घेतलें. परंतु पठाण भारी, कटून मेले; आणि दोन हजार जाठ पळून गेले. मथुरेंत दीड प्रहर लूट झाली. पंचवीस लक्ष वित्त घेऊन मथुरेहून फौज गोकुळ वृंदावनास आली. तेथें बैरागी दोन चार हजार नागे जमा होऊन युद्ध घेतलें. दोन हजार बैरागी व दोन हजार पठाण लढून मेले. गोकुळनाथ बचावले. तेथून पठाण कूच करून आगरियाजळ आला. किल्लयास मोर्चे लावून किल्ला हस्तगत केला. गाजुद्दीनखान किल्लयावर जाऊन किल्ला घेतला. शहरांत द्वाही पातशहाची फिरविली. तेथून पठाण आठ कोस पुढें आला. सर्व रैयत पळून नारो शंकर व समशेर बहादर यांचे लष्करांत आले. पठाण आगऱ्यास आल्याचें समजतांच या मराठे फौजा कूच करून झांशीच्या रोखें आल्या. समागमें रयत आली होती ती याच उभयतांनीं लुटून घेतली. मोठा विश्वासघात केला. पंचवीस लक्षांचे वित्त घेतलें. पठाणाचा नायब दिल्लींत आहे. माळव्यांत दक्षिणेंत येणार. जाठ आपल्या गर्डीत भयभीत आहे. दादासा० व होळकर जावदे[1] जवळ आहेत. लाख रुपये खंडणी घेतली. जावद परगणा व राणीखेडा लुटून फस्त केले. दहा बारांचें वित्त मिळालें. तेथेंच मुक्काम करून आहेत. समागमें फौज चाळीस हजार आहे. जर पठाण झांशीस आला तर कठीण आहे. त्याजवर प्रस्तुत कोणी जावें असें दिसत नाहीं. अंताजी माणकेश्वरानें लढाई चांगली घेतली; आपलीशी करून पळून आले. अंताजीपुत्र पडला, परंतु पठाणास हात चांगला दाखविला. बापूजीपंत वकील दिल्लीहून मथुरेस व तेथोन नारोशंकरचे लष्करांत आले. त्यांचे बंधु दामोदर महादेव झांशीस होते. कांहीं भ्रम झाला होता, त्यांचा काळ जाहला. श्रीमंत नानासाहेब जाऊन पठाणाचें

१. टीप:—जावद उदेपूरच्या पूर्वेस सुमारें ७५ मैल.

धारपत्य करतील तर उत्तम आहे, नाहीं तर पठाण माळव्यांत आला तर बहुत खराबी आहे. पुढें जें श्रीस कर्तव्य असेल तें होईल.' (३·४·१७५७, १·६३). गाजीउद्दीन अब्दालीचे कैदेंतून मथुरा येथून यमुनेंत उडी टाकून पोहत पळून आग्र्यास गेला अशी हकीगत सांपडते. म्हणूनच अब्दाली आगऱ्यावर आला. आगऱ्याचा किल्ला मजबूद व समृद्ध होता. तेथील किल्लेदारानें वजिरास आंत घेतलें. वजीर पळाल्याची बातमी कळतांच अब्दाली आगऱ्यावर आला. परंतु किल्लेदारानें तोफा व बंदुका यांचा विलक्षण मारा करून त्यास परत फिरविलें. तो मार्च महिना संपत येऊन, रघुनाथराव व मल्हारराव होळकर दक्षिणेंतून चालून येतात, अशी बातमी येतांच अब्दाली परत फिरला. प्रथम जाठावर हल्ला करण्याकरितां तो कुंभेरीकडे चालला. तेव्हां सुरजमल्ल जाठानें दहा लक्ष खंडणी भरून त्याची समजूत केली. पुढें उष्णतेनें व महामारीनें त्याच्या लोकांचे हाल होऊं लागल्यामुळें त्यानें परत फिरण्याचा निश्चय केला. मिळालेली लूट देशी पोंचविण्यास त्याचे लोक अत्यंत उतावीळ झाल्यानें त्यास परत फिरणें भाग पडलें. ता. १६·३·५७ रोजीं पेशवा लिहितो, ' समशेर बहादर, नारोशंकर, अंताजी माणकेश्वर, जाठ वगैरे एक करून अब्दालीस ठांसून राखणें. पैसे घेऊं न देणें. दादा व मल्हारबा मातवर फौजेनें तिकडे येतच आहेत. (६·३६७-६८). परंतु हे दोघे त्वरेनें पुढें चालून आले नाहींत. अब्दाली जरा एकाएकींच परत स्वदेशीं गेला. मग महामारीनें त्याचे लोक अस्वस्थ झाले ह्मणून तो गेला असो, अथवा मराठे चालून येतात, त्यांजबरोबर सामना टाळण्यासाठीं गेला असो. चैत्रपर्यंत ह्मणजे ता. १८ एप्रिल पावेतों अब्दाली मथुरेवर होता. [१·७०]. फेब्रुवारींत रघुनाथराव इंदुरास आला, आणि तसाच जोर करून होळकरासह तो लगेच पुढें आला असता तर मार्च एप्रिलांत अब्दालीस गांठून त्यांनीं त्यास साफ बुडविलें असतें. या वेळीं सदाशिवराव किंवा दत्ताजी शिंदे असता तर ही गोष्ट त्यांनीं तात्काळ केली असती; परंतु रजपुतांकडील नसतीं लफडीं अंगावर घेऊन चार महिनें रघुनाथरावानें फुकट घालविले, आणि

अब्दाली निघून गेल्यावर वरातीमागून हें राघोबाहोळकरांचें घोडें दिल्लींत मिरवत आलें. 'राघो भरारी' व 'होळकराची पोळ्यात्रा' या शब्दांचा अर्थ एकच असून, त्यांनींच कित्येक राष्ट्रसेवेचे प्रसंग फुकट घालविले आहेत.

परत जातेवेळीं जवळजवळ एक महिना अब्दाली दिल्लींत होता. मलिका-जमानीच्या आग्रहास्तव त्यानें तिची मुलगी चंदा-जमानी हिच्याशीं स्वतःचें लग्न केलें. [एल्यट पु. ८]. ह्या लग्नाच्या योगानें मराठ्यांचे विरुद्ध लढून अब्दाली बादशाहीचें संरक्षण करील अशी या मंडळीची अटकळ होती. गाजीउद्दीन आगऱ्याहून अंतर्वेदींत फर्रुखाबादेस जाऊन अब्दालीच्या प्रतीकाराचा थोडा बहुत यत्न करीत होता, (एल्यट पु. ८). त्यास अब्दालीनें आश्वासन देऊन भेटीस बोलाविलें. कारण नजीबाचे भरंवशावर राहिल्यास आपला सर्वस्वी घात होईल अशी त्याची खात्री झाली. पुढें दिल्लीस जसा तसा तात्पुरता बंदोबस्त त्यानें केला. म्हणजे गाजीउद्दीन यास वजिरी दिली, नजीबखाना-जवळ पांच हजार फौज ठेवून, व अमीर-उल्-उमराव असा किताब देऊन त्याजकडे बादशहाचे बंदोबस्ताचें काम नेमिलें. अशा रीतीनें ह्या दोघांच्या ओढाताणींत आपलें वजन कायम राहील अशी अब्दालीची योग्य अटकळ होती. ता.२७ मार्चला दिल्ली सोडल्यावर अब्दुस्समदखानास त्यानें सरहिंद येथें दहा हजार फौजेनिशीं ठेवून, लाहोरास तयमूरशहा व जहानखान यांची स्थापना केली. अदिनाबेगास त्यानें प्रथम घालवून दिलें, परंतु पुढें त्यानेंही त्यांची मदत करण्याचें कबूल केलें. अशी व्यवस्था करून अब्दाली आपले राज्यांत निघून गेला.

सुजाउद्दौल्यास वजिरात द्यावी, आणि तयमूरशहास तख्तावर बसवावें, ह्या दोन गोष्टी अब्दालीच्या पूर्व उद्देशांपैकीं राहिल्या, त्या त्यानें जाण्यापूर्वी पूर्ण कराव्या, असें नजीबाचे मनांत होतें; परंतु मोगल पातशाही मोडून ही पठाण पातशाही व्हावी या संबंधानें अब्दालीचा निश्चय होईना. त्यास नजीबखा-नाचा विश्वास पटेना आणि हीं राहिलेलीं कामें पुढील वर्षी पुनः येऊन पुरीं करूं, असें सांगून तूर्त त्यानें वेळ मारून नेली.

२. रघुनाथरावाची लाहोरची स्वारी(नोव्हें० १७५६–आक्टो०५७).— सन १७५६ सालच्या नोव्हेंबरांत अब्दाली काबुलाहून इकडे येण्यास निघाला, त्याच वेळीं रघुनाथराव व होळकर दक्षिणेंतून दिल्लीवर जाण्यास निघाले. त्यांजबरोबर कारभारी सखारामपंत बोकील व जनार्दन बल्लाळ ऊ० बाबा फडणीस हे होते. ह्या फडणिसाचा काळ स्वारींत झाला. [का. सं. श. पृ. १६]. त्याचा पुत्र बाळाजी ऊर्फ नाना फडणीस यास फडणिशीचीं वस्त्रें २९·११·१७५६ रोजीं मिळालीं; म्हणजे बहुधा त्याच दिवशीं रघुनाथराव स्वारीस निघाला असावा. [रा. श. पृ. १४२]. चिंतो विठ्ठल रायरीकर व महिपतराव चिटणीस, हेंही स्वारी बरोबर होते. फौज फारशी मोठी नव्हती. शिंद्याचें व होळकराचें पटत नव्हते. दत्ताजी व जनकोजी नुकतेच रजपुतान्यांतून भागून आलेले असल्यामुळे त्यांस लगेच पुनः पेशव्यानें स्वारीस पाठविले नाही. शिवाय त्या स्वारीचे हिशेबाची भानगडही पेशवे शिंद्यांमध्यें तुटत होतीं, त्याचा उल्लेख पुढें येणार आहे. सारांश, एप्रिल पावेतों दिल्लीचे बाजूस राहून आणि अलीकडच्या प्रदेशांत धुमाकूळ उडवून अब्दाली परत गेला, तरी मे अखेरपावेतों रघुनाथराव दिल्लीस पोंचला नाहीं. यास कारणें काय असतील तीं असोत. रघुनाथरावाजवळ फौज फारशी नव्हती. फौजेची जमवाजमव करीत त्यास जावयाचें होते. शिवाय त्याजवळ पैसाही नव्हता. मराठ्यांची नेहमींचीच चाल कीं बाहेरचा पैसा बाहेर काढावयाचा. ही एक अडचण खरीच, परंतु त्यांतूनही रघुनाथरावाचे अंगीं तडफ असती तर त्यानें अब्दालीला तेव्हांच गांठलें असतें, परंतु मल्हाररावास अब्दाली पुढें जाण्याचें धैर्य नव्हते किंवा इच्छा नव्हती, म्हणून हजार लचांडें काढून त्यानें रस्त्यांत उशीर लाविला. मल्हाररावाचा हा नेहमीचाच खेळ असून, रघुनाथराव कर्धीच स्वयंप्रकाश नसल्यामुळें दोन वर्षांच्या ह्या मोठ्या स्वारींत कांहींच लभ्यांश झाला नाहीं. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, उत्तरेंतील गोंधळ दृष्टीसमोर असतां, पैशाशिवाय व फौजेशिवाय भावासच अब्दालीवर रवाना करून स्वतः पेशवा स. १७५७ चे आरंभीं श्रीरंगपट्टणच्या स्वारीस निघून गेला.

सदाशिवराव व इतर मुख्य सरदारही तिकडेच गेले.

चाळीस वर्षे उद्योग करणारे मराठे, काबुलाहून चालून येणाऱ्या अब्दालीस इतके भितात, याचा अर्थच समजत नाहीं. आपल्या घरापासून तो इतका दूर व मराठे आपल्या घरांत, व्यवस्थेनें व एक जुटीनें ते वाघते तर अब्दालीची पुढें येण्याची प्राज्ञा नव्हती. याच धारणेनें पुढें सदाशिवराव त्याजवर चालून गेला आणि 'अब्दालीचें कांपरें तुह्मास इतकें कां भरलें' असें टोंचून मल्हारराववास बोलला. दामोदर महादेव स. १७५७ चे फेब्रुवारींत मरण पावला; आणि पुढें रघुनाथराव व मल्हारराव अब्दालीचा रोख सोडून पश्चिमेस रजपुतान्यांत शिरले. अडचणीच्या प्रसंगांत मराठ्यांस प्रथम लूट द्यावे, यावरून पळपुटे ह्मणून त्यांस नांव मिळाले तें खोटें नाहीं असें वाटूं लागलें. सर्व मिळून अब्दालीवर एकदम चालून जाते तर दिल्ली कायमची सुटली असती, पण त्यास तशाच मित्रयाचा सेवा पति पाहिजे होता. रघुनाथराव किंवा मल्हारराव यांचे हातून हे काम होणारें नव्हतें.

ता. १६-२-१७५७ रोजीं रघुनाथराव इंदुरास पोंचला. होळकर अगोदरच पुढें गेला होता. 'आजी इंदुरास आलों. होळकरांची भेट जाली. पुढें दरमजल दिल्लीस जात असों. अब्दाली दिल्लीस आला यास्तव चहूंकडून राजे व जमीनदार व रांमडे लोकांच्या नजरा फिरल्या. सांप्रत एखादा मनसुबा करून मुलूख अथवा रुपये मिळवावयाची सोय दिसत नाहीं. अब्दालीचे पारिपत्य होईल तेव्हांच वरकड दबतील. त्यांचें पारिपत्य करावें तरी फौज अद्यापि जमा जाहली नाहीं. आह्मी, विठ्ठल शिवदेव, मल्हारबा, समशेरबहादर, अंताजी माणकेश्वर, नारोशंकर मिळोन पंधरा सतरा हजार फौज आहे. ज्यास्त फौज न आलिया जातां येत नाहीं. रुपये पावावयास दिवस लागले. महिना दीड महिन्यांत पोंहचतील. जर अब्दाली दिल्लीस राहिला अथवा अजीकडे आला, तर गांठ पडेल. तमाम राजे व सुजाउद्दौला वगैरे सर्वांचीं राजकारणें त्याजपाशीं आहेत. जाठ तर झुंजूं लागला. सांप्रत मनसुबा भारी आहे. फौजही त्याची भारी आहे कवच शिपाई आहे. पारपत्यास

भारी सामान असावें. यास्तव जर दतबाची स्वानगी इकडे लवकर जोंहली तरी जमाव लवकर पडेल' [१.५२]. म्हणजे शिंदे आल्याशिवाय पुढें पाऊल घालण्यास मल्हारराव किती तयार होता, हें यावरून दिसतें. शिंद्यांनीं मात्र मल्हारराव्याच्या मदतीची अपेक्षा कोणत्याही प्रसंगांत ठेवलेली नाहीं. ' विजेसिंग माधोसिंग यांचे वकील नेहमींच त्याजपाशीं आहेत. फौजा जमा व्हावयास फाल्गुन अखेर लागेल. तूर्त जयनगरचे रोखें जात आहो. खंडे होऊन गांठ घालावी हा विचार आहे गोष्ट तूर्त सर्व प्रकारें भारीच आहे. आपली फौज बेदील हैं आपणास विदितच आहे.' हे दीर्घसूत्री सखाराम बापूचे त्याच तारखेचे पत्र रडत राऊत घोड्यावर बसविल्याप्रमाणें भासतें. मराठे व अब्दालीचे पठाण यांचा सामना कोणत्या स्वरूपांत होणार हे यावरून सहज अनुमानितां येते. मराठ्यांस हिंदुपद पातशाहीचा हा एक खेळच वाटत असावा. ता.२६ फेब्रुवारीस पुनः रघुनाथराव तेच रडगाणें सदाशिवरावास लिहितो. ' ईश्वरी दया व स्वामींचा प्रताप ' एवढ्यावरच त्याची भिस्त होती. ' फौज आमची फार करून आली नाही, मल्हारबाची मुदलींच थोडी आहे. दत्ताजी शिंदे, जानोजी व मुधोजी भोसले व गोविंद बल्लाळ वगैरे लहान थोरांची स्वानगी सत्वर करावी. होळकर व शिंदे उत्पन्नानें बरोबरीचे सरदार असतां, होळकराची फौज एवढी थोडी कां! याचे उत्तर इतकेंच कीं, होळकर आंतल्या गांठीचा व डोईजड होता, पैसा राखून होता. त्यास जाब विचारण्याची शक्ति पेशव्याचे अंगीं या वेळीं नव्हती. पुढे माधवराव पेशव्याने हा जाब त्यास विचारला. ' आपल्या मुलखांतील चौकशीचा मजकूर मनांत आहे. परंतु हा मनसुबा शेवटास नेल्याखेरीज आमचे विचारें कोणास दुखवूं नये. अब्दालीचें पारपत्य झाल्यावर नारोशंकरची चौकशी करूं' (१.५४). ' लक्ष्मण शंकर पुरते लबाड ठरले. सबब त्यांची जप्ती करून जे सांपडेल तें साधणे, म्हणोन आज्ञा, त्याप्रमाणें नर्मदेचे तळावरूनच जप्ती केली. परंतु त्यांचें सामान व घोडी नारोशंकरपाशी आहेत' [१.५९]. नागपूरकर भोसले, नारोशंकर वगैरे सरदार पेशव्याशी अनुरक्त नसून स्वतंत्र

पंथ पहात होतें; आणि त्यांस एका लगामीं ठेवणें पेशव्यास अवघड पडूं लागले होतें. तां. ११ जूनचे सुमारास रघुनाथराव दिल्लीचे बाजूस पोंचला असें १·६६ वरून दिसतें. तेथें बिजेसिंगाचे वकील येऊन भेटले आणि शिंद्यांची व आपली गोडी करून द्यावी, रामसिंगास राज्य देऊं नये, असें पुनः त्यांनीं बोलणें लाविलें; आणि मल्हाररावाचे मध्यस्थीनें रघुनाथरावानें त्यांत मन घातलें. म्हणजे दोन वर्षें शिंद्यांनीं विलक्षण खटाटोप करून मिळविलेलें यश नाहींसे करून टाकण्याचा प्रसंग या दोघांनीं आणिला. 'आम्हीं सांगूं तें बिजेसिंग ऐकणार व दत्तबांनीही ऐकावें. लटका कज्जा कशास करावा! दत्तबांनीं मात्र ओढून धरूं नये. ओढून धरल्यास पुनः खर्चाखालीं येतील. दोघांचा सलूख व्हावा हें उत्तम,' असे रघुनाथरावानें पेशव्यास कळविलें. होळकराचा विघातक भाव खालील पत्रांत व्यक्त होतो. 'अब्दाली दिल्लीहून माघारा गेला, तेव्हांच आह्मी मल्हारबास ह्मणत गेलों कीं, माधवसिंगाची मामलत कशीबशी विल्हेस लावून दिल्ली व लाहोर दोनहीं सुभे जप्त करा. परंतु यांणी लटकींच लचांडें काढून तीन महिने लांबविले. आह्मांस भक्षावयास नाही, कर्जही न मिळे ऐसे झाले. सांप्रत मल्हारबाशिवाय मामलत माधवसिंगाशी जी साधेल ती करून पुढें जाणार. येथील कारभार ओढला. लटकींच लचांडें फार काढावीं. तंपशीलें फारच आहेत. स्वभाव (मल्हारबाचा) स्वामीस वाकीफ आहेच. स्वामींनीं फिकीर न करावी' [१·६७]. ह्मणजे बिजेसिंग व माधवसिंग यांच्यासंबंधानें नसतीं लचांडें उपस्थित करून व पूर्वी झालेले निकाल पुनरपि जरूर नसतां उकरून काढून, मल्हाररावानें राज्यघात सुरू केला; आणि रघुनाथरावाबरोबर न जातां तीन महिने फुकट घालविले. यावरून होळकराचा भाव व्यक्त होतो. रघुनाथरावानें पुढें केलेला उद्योग असा. 'आमची फौज चैत्र वैशाखांत आली व चैत्रपर्यंत अब्दाली मथुरेवर होता, यामुळें आह्मांस एखादा मनसुबा करावयास न फावलें. अंतर्वेदींतील उठलेला अंमल बसविण्याकरितां सखाराम भगवंत, विठ्ठल शिवदेव, अंताजीपंत, व गंगाधर यशवंत ऐसे वीस हजार फौजेसह

अंतर्वेदीत पाठवून बंदोबस्त केला. वैशाख व ज्येष्ठ दोन महिने आह्मांस रिकामे सांपडले. त्यांमध्यें पहिली गडबड वारली; जयपुरचे ११ लक्ष घेतले. आह्मांस रुपयांची ओढ भारी आहे. स्वामीनी ऐवज देववावा.' [१·७०, १२·७·१७५७]. 'अब्दाली मार्गशीर्ष पौषांत आला, तरी मनसुबा भारीच आहे. दत्ताजी शिंद्यांची रवानगी करावी; कारण अब्दाली न आला तरी काशी बंगाला ये प्रांतीं स्वारी केलियास चार रुपये आकारतील. कपाळ स्वामींचें थोर आहे, प्रयत्न आमचा आहे, वरकड हिंदुस्थानांत कोठें जीव दिसत नाहीं. जाठांत जीव आहे, पण मोठा काबूकार आहे. दोन जहिने माधवसिंगाचें प्रकरण चाललें आहे. मल्हारबा न ऐकत. लटके आपले घराऊ हिशेब काढून मामलत न करीत. आह्मांस कर्ज देखील भक्षावयास न मिळे. रोज गांज मारून खावे, झुंजल्याखेरीज दाण्या नाहीं, रुपया नाहीं, कर्जही न मिळे. तेव्हां आह्मी मल्हारबास टाकून मामलती रगडून केली. कष्टी जाले. अकरांपैकीं सहा लक्ष आले, त्यांपैकीं त्याची वांडली दोन लक्ष देयें पडली. सारांश, मल्हारबा ज्या त्या कारभाऱ्यांत ओढतात. आह्मी सोशितों. पुढें समजावीसही करूं. दत्तबा आलियानें परस्पर वर्म असतें, यामुळें ओढणार नाहीं. **आपल्यांत दुही पडते, तेव्हां शत्रूंचें बळ फावतें.** ऐसे हजारों पेंच होतात, ते कोठवर लिहावे. संकलित लिहिले आहेत, [१२·७·१७५७, १·७१]. या प्रत्यक्ष रघुनाथरावाच्या लिहिण्यावरून मल्हारराव होळकराच्या वर्तनाची कल्पना चांगली होते. प्रसिद्ध झालेले हे सर्व लेख योग्य संदर्भाने वाचले म्हणजे प्रत्येक इसमाच्या कर्तृत्वाचा अंदाज होत जातो. मल्हारराव्याप्रमाणेंच, हिंगणे, अंताजी, मारोशंकर वगैरे कित्येक गृहस्थ मतलबी व थोडें बहुत राज्य विघातक वर्तन करीत होते, त्यांचा बंदोबस्त अल्पवयस्क रघुनाथरावाचे हातून होणें शक्य नव्हतें. तें काम पेशवा स्वतःच करूं शकता. जून व जुलई हे दोन महिने रघुनाथरावाचे माधवसिंगाचे प्रकरणांत गेले. 'तूर्त आम्ही दिल्लीस श्रीमंतांचे लष्करीं आहों. दादोस्वामी जयनगरास होते तेही एक दोन रोजीं दिल्लीस येतील,' [१·७२].

एकंदरींत पैसा व अव्यवस्था ह्या दोन मुख्य अडचणी मराठ्यांच्या होत्या. वर जो प्रकार वर्णिला आहे, तोच बहुतेक पानपतअखेर म्हणजे पुढे चार वर्षे चालला.

३. रघुनाथरावाचा दिल्लींत मुक्काम (जुलई १७५७–मार्च ५८).—स. १७५७ च्या ३० एप्रिलचें व २ मेचें वर्तमान. 'अब्दाली दिल्लीपलीकडे गेला. गाजुद्दीन अंतर्वेदींत रोहिल्यांसी मिळोन आहे. दोन शहाजादे समागमें आहेत. नजीबखान दिल्लीस आहे,' असें वर्तमान होळकरास हिंगण्याने कळविलें, त्यावर होळकर लिहितो, 'जयपुरचें मामलतीमुळें गुंता जाला आहे. येथील निर्गम करून सत्वरीच ह्या प्रांतें येत असो' (६.५७७). 'अब्दाली दरमजल लाहोराकडे गेला. गाजुद्दीन व अहंमदखान बंगश मैनपुरीवर एकत्र होते. तेथून पत्रें आलीं कीं सांप्रत एक जण सत्वर येणें. त्याप्रमाणें येतों. पातशहाशी व वजिराशीं चित्तशुद्धि नाहीं. पातशहानीं नजीबखानाकडून फौज ठेविली आहे, त्यांजकडून वजिरास शिक्षा करणार असा रंग दिसतो. जयपुरचा गुंता उरकून जलदीनेच येत असो,' असें मल्हारराव हिंगण्यांस लिहितो, (३०.४.१७५७, ६.५७८). या वेळीं नजीबखान दिल्लीत प्रबळ होऊन, त्याचा पाडाव करण्याचा उद्योग मीरशहाबुद्दीन करीत होता; आणि त्यासाठी होळकर व रघुनाथराव यांस वारंवार पत्रें पाठवून, तुह्मीं त्वरा करून आमचे साह्यास यावे असे तो लिहित होता. ते मेऊन दाखल होतांच त्यांनीं मीरशहाबुद्दीनास आग्र्यांतून काढून आपल्याबरोबर घेतलें आणि नंतर दिल्लीवर चाल करून एक महिन्यांत किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. मीरशहाबुद्दीनने नजिबाची बक्षीगिरी काढून ती लगेच अहंमदखान बंगश यास दिली. बादशहा व नजीबखान मराठ्यांचे हातांत सांपडले. शहाजादा अलीगौहर यास मात्र बादशहाने युक्तीनें दूर ठिकाणीं बंगालसाठीं पाठवून दिलें. हे प्रकार स. १७५७ च्या जुलई ऑगष्टांत झाले. अब्दाली गेल्यावर दिल्लीचा बंदोबस्त नजीबखान करीत होता. इतक्यांत रघुनाथरावानें मीरशहाबुद्दीनचे संमतीनें विठ्ठल शिवदेवास दिल्ली काबीज करण्याकरितां

पाठविले. पंधरा दिवस नजीबखान झुंजला. शेवटीं विठ्ठल शिवदेवानें सर्वांस पकडून दिल्लीचा कबजा घेतला. त्यानंतर तेथेंच मराठ्यांच्या फौजा कित्येक महिने तळ देऊन राहिल्या. विठ्ठल शिवदेवास बादशहाकडून पोषाख, जवाहीर व उमदेतुल्मुल्क हा किताब आणि चांदवड तालुक्यांत जहागीर मिळाली. या वेळीं नजीबखान रघुनाथरावाचे कबजांत सांपडला असतां, यास मारून टाकावा, जिवंत ठेविल्यास नाहीं नाहीं त्या उलाढाली करून हा आपला नाश करील, अशी पुष्कळांनी त्यास सल्ला दिली. आतां आपण जिवंत सुटत नाहीं आणि आपला वाली अब्दालीं जवळ नाही असें पाहून 'कसेही करून आपला बचाव करावा,' ह्मणून अंतस्थ रीतीनें त्यानें आपला वकील मल्हाररावाकडे पाठविला, की, 'मी तुझा धर्मपुत्र आहें, शरण आलेल्याचा बचाव करणें आपणास उचित होय.' ही विनंति मल्हाररावाने मान्यकरून स्वतः रघुनाथरावाकडे जाऊन, भीड खर्चून, पदर पसरून मागणें मागितलें की, 'याचा बचाव करा.' रघुनाथरावाचे मनांत त्यास जिवंत सोडावेंसें नव्हते. परंतु मल्हाररावाची भीड उलगडेना, तेव्हां मान्य करणें प्राप्त झालें. नजीबखानास किल्ल्यांतून काढून मल्हारबानें आपणा जवळ ठेविला.' [भा. सा. ब. पृ. ३५]. वरील प्रकार केवळ बखरकाराची गप्प नव्हे आहे. 'नजीबखान रोहिला गंगाकिनाऱ्यानें शुक्रतालावरती उतरला आहे. राव मल्हारजीला आपले बाप ह्मणून ह्मणवीत व स्नेहाचा रावता दृढ करीत आहेत. त्यांनी आपला मामला अंतस्थ रीतीनें फैसल करून बहुतेक घेतल्यासारखाच आहे. श्री. दादासाहेबांचें लक्ष खानाच्या दुपट्टी वर्तनाकडे गेलें आहे. मल्हारजीची मुलाखात झाल्यावर सुवेळीं यासंबंधीं खलबत होणार आहे [१·४८–१·२·१७५८]. पुनः आलमशहास तख्तीं बैसवून, वजिरी गाजुद्दिनास देऊन, पूर्वयतप्रमाणें बंदोबस्त करून कुरुक्षेत्रास येऊन पोंचले. ऑगस्ट १७५७ पासून मार्च १७५८ पावेतों आठ महिने तरी रघुनाथरावाचा मुक्काम दिल्लींत होता. या अवधींत त्यानें काय कामें केली याची स्पष्टता होण्यास साधन नाहीं. हिंगणे, अंताजी माणकेश्वर, नारोशंकर वगैरे सरदार गैरकाबू झाले होते, त्यांस

वठणीस आणणें व अब्दालीचा पाडाव करणें हीं दोन मुख्य कामें करण्याची त्यास पेशव्याची आज्ञा होती. पैकीं अब्दाली तर मराठ्यांचें नांव ऐकूनच परत गेला, अशा समजुतीनें सरदारांच्या बंदोबस्ताशिवाय दुसरें काम त्यास राहिले नाहीं. अब्दालीच्या मनांत मुद्दाम हेाऊन मराठ्यांशीं सामना करावा असें नव्हतें. मुख्य काम भागतांच आपला शह ठेवून तो परत गेला. हिंदुस्थानचें राज्य त्यास हवें होतें असें दिसत नाहीं, आणि दिल्लीदरबाराची व हिंदुस्थानच्या परिस्थितीची जी माहिती त्याम आढळली, त्यावरून अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानावर राज्य करणें त्यास शक्य वाटलें नाहीं. तो स्वतः कडक शिस्त राखणारा व कसलेला सेनापति होता; आणि सर्व गोष्टी चौकसपणानें अनभावून पाहत होता. सन १७४७ च्या पहिल्या स्वारींत तो पराभव खावून परत गेला. १७५१ च्या दुसऱ्या स्वारींत, लाहोर व मुलतान हे दोन प्रांत जिंकून परत गेला. १७५७ च्या तिसऱ्या स्वारींत आग्र्यापर्यंत प्रदेश लुटून व बादशहावर शह बसवून तो परत गेला; रघुनाथरावाशीं सामना करण्यास तो थांबला नाहीं. स. १७६० चे आरंभीं दत्ताजीशीं सामना करून त्याने मराठ्यांचे पाणी पूर्णपणे जोखलें; आणि मुसलमानांचे राज्य हिंदुस्थानांतून नष्ट होऊं द्यावयाचें नाहीं, परंतु स्वतः मोकळे राहून साधेल तितका स्वतःचा फायदा करावयाचा, आणि विशेषतः पंजाबप्रांत सतलजपावेतों आपल्या सत्तेखाली ठेवावयाचा, एवढीच त्याची हाव होती. कायमच्या निकालाचीच तो तरी खटपट करीत होता. जयाची त्यास खात्री होती, मुसलमानांचें त्यास पाठबळ होतें, परंतु हिंदुस्थानचे राज्य घेण्याची त्यास हाव नव्हती. शेवटच्या स्वारीत दीड वर्ष हिंदुस्थानांत राहून पानपतावर पुष्कळ वाताहत झाल्यामुळें, हिंदुस्थानचा नाद त्याने कायमचा सोडिला.

दिल्लींत राहून रोहिल्यांचा कारभार व्यवस्थित करण्याचा प्रयत्न रघुनाथरावानें केला. पुरुषोत्तम महादेवास त्यानें त्या कामावर पाठावलें. ऑक्टोबरांत हिंगणे लिहितो. 'हाफीज रहमतखानाचा तोफखाना श्रीगंगापार गेला. फरुखाबादेंतही फौज तादृश नाही. दहा पंधरा हजार फौजेनें सर्व

मुलूख तूर्त हस्तगत होईल व एक करोडांची मालमत्ता मिळेल. कर्तव्य असेल तर सत्वर आज्ञा करणे' [६.३७२]. कमरुद्दीनखानाचा मुलगा 'खानखानास लाहोरास घेऊन जावें म्हणून सुभेदारांची आण वाहून घेतली आहे. लाहोरास रा. बापूजी महादेवांनी खानखानास बरोबर घेऊन जाण्याची तयारी करावी. खानखानास बाहेर घेऊं न द्यावा. बजिराच्या चौक्या खबरदारीनें वाटेस बसवाव्या,' असे रघुनाथराव लिहितो [६.३७४, २३. ११. १७५७]. स. १७५८ च्या जानेवारींत मल्हारराव हिंगण्यास लिहितो, 'याउपरी आम्हांस दिवसगतीनर आकावयासी अनुकूळ पडत नाही. श्रीमंतांचीही चिठी आली आहे. याउपरी विलंब न लावितां कामकाजाचा गुंता उरकून जलद येणें. जे याद करावून मोकरर करून दिली, त्यापैकीं एक गोष्ट उणी अधिक केलेली कार्यास येणार नाही. तसेच असेल तर तुम्ही साफ उठोन येणे. विलंबाखालीं घालूस न राहणे ' [६.३७५]. याप्रमाणें कांही तरी बाद्राबाटी पातशाहीच्या चालू होत्या. मल्हारजी होळकरानें नजीबखानाचें अमल्य भरून त्यास आपल्यापेक्षां अंतर्वेद प्रांतांत कुरुक्षेत्रापासून बुंदेलखंडच्या सरहद्दीला चाळीस लक्षांची मामलत देऊन त्याचे स्वाधीन केली [२. पृ. १४६].

४. हिशेबाच्या भानगडी (स. १७५७-५९). शिंदे-होळकर सरदारांचें पारपत्य करण्याचे काम रघुनाथरावानें थोडें बहुत केले. पण त्यांतही मुख्य इसम जो होळकर त्याच्या वाटेस जाण्याचे त्यास धैर्य झालें नाहीं. आठ महिने सर्व सरदारांसह एका ठिकाणी बसून होणाऱ्याजोगें काम त्यानें कांहीच केले नाही. उलट बजिरास ही मराठ्यांची बैठक दिल्लीत अवजड वाटून त्यानें पंजाबप्रांत सोडविण्याची त्यांस भर दिली, तेव्हां स.१७५८च्या एप्रिल व मे महिन्यांत अटकेपावेतो जाऊन, पुढील बंदोबस्त पक्का न करतांच रघुनाथराव परत निघाला तो स. १७५८ सालच्या दसऱ्यास पुण्यास दाखल झाला. या प्रकरणाचा कच्चा तपशील आतां सांगावयाचा आहे.

रघुनाथरावाच्या पहिल्या स्वारींतील अव्यवस्थेनें व मारवाडांतील अनर्थामुळें पेशव्यास पैशाचा पेंच पुष्कळच पडला. शिंदे दुःखी कष्टी, झणून

कांसही दुखावित्याची सोय राहिली नाही. ता. ७-९-१७५६ रोजीं दत्ताजी आपला कारभारी रामाजी अनंत यास लिहितो, 'श्री. पंतप्रधानांनीं आज्ञा केली होती कीं, घरास आल्यावर शिलक किती, लोकांचें कर्ज काय जालें, त्याचा खर्च कैसा केला, याचा ताळेबंद लिहून पाठविणें, त्याप्रमाणें ताळेबंद तयार करून पाठविला आहे. तो श्रीमंतांस दाखवून जाब घेऊन आज्ञा मागोन येणें' [का. सं. प. या. ३४९]. 'ताळेबंद दाखवून झाल्यावर आज्ञा घेऊन सत्वरच येणे. आम्ही गुंजाळचा घाट उतरून गंगातीरास जातों,' असे पुनः आठ दिवसांनी दत्ताजी लिहितो [सदर ३४७]. पुढें हा ताळेबंद पेशव्यास पोंचला, पण बिलकूल पसंत पडला नाहीं. पेशवा लिहितो, 'हिशेबाची याद पाठविली ते पावली. हिशेब ऐसा असत नाहीं. सात सालां वेगळी झडती असावी. कारकून तैनात खाऊन हिशेब नीट करीत नाहीत. यास्तव परिच्छिन्न कारकुनांस ताकीद करून वेगळ्या झडत्या तयार करविणें.' असे पत्र आल्यावर दत्ताजी लिहितो. 'स. १७५१ पासून तीन सालां झडत्या तयार होत्याच; पुढील तीन सालांच्या झडत्या नाहींत, निमित्य कीं आमची छावणी तीन साले मारवाडप्रांती झाली. तेथें महालचे हिशेब आले नव्हते. शिलेदार वगैरे लोकांची तीनसाली समजाविशी होणें होती, ती स्वामींची भेट सिद्धटेकावर झाली तेंपावेतों होतच होती. सबब झडत्या तयार करावयास आणखी सहा सात महिने पाहिजेत. श्रींगोंद्यास आल्यावर जे शिलक होती व कर्जे लोकांची घेतली होतीं, ते जमा धरून खर्च जाला तो अखेर सालपावेतों लिहून पाठविला. तो कांहीं हिशेब नव्हे हें तर यथार्थच आहे. आम्ही चाकर लोक आहों. वावगी वर्तणूक करूं अगर न करूं हें सर्व स्वामी जाणतच आहेत. झडत्या तयार झाल्यावर सेवेशीं पाठवूं. कारकुनास बेमुलाहिजा आज्ञा केली आहे.' [२१-९-१७५६, का. सं. प. या. ३७१]. आमच्या घरांत शिलक काय आहे अथवा नाहीं. हें तुम्ही पुरतेपणीं जाणतच आहां, लोकांचीं देणीं तैशींच राहिलीं आहेत. श्रीमंतांपासून खर्चास मागितलें, परंतु यावयाचा भूनमान करितात, म्हणोन

पेशवे केले त्यास दिल्हें तर फारच उत्तम जालें. नच देत तर आम्ही चाकर लोक आहों. खावंदांसी बळ कोठवर करावें ! कर्जबाम झालें तर ते गोष्टीची चिंता खावंदांसच आहे. कर्ज होईल तें तेच वारतील ' [सदर ३४८]. हिशेबाची अशाच प्रकारची तक्रार नागपुरकर भोसल्यांशीही याच वेळेस चालली होती [३४६]. वास्तविक अनेक कामे पेशव्याने एकदम अंगावर घेतल्यानें कर्ज अतोनात झाले. ही अव्यवस्था त्यानें वेळींच मोडली नाहीं किंवा त्यास मोडतां आली नाही हें भावी संकटानें एक कारण होय. पैठणच्या ब्राह्मणांस शिंद्यांकडून कांही प्राप्ति होती, ती वेळेवर पोचली नाहीं, म्हणून ते उपास करूं लागले, तेव्हां ब्राह्मणांची समजूत कशी तरी करावी असे पेशव्यानें दत्ताजीस लिहिलें [का. सं. प. या. ३६१],

हिंगणे.--इकडे शिंद्यांचे हिशेबाची भानगड चालत असतां हिंगणें, संताजी माणकेश्वर, नारोशंकर इत्यादि सरदारांचा शिरजोरपणा उतरविण्याचा पेशव्याचा प्रयत्न चालूच होता. ता. १२-७-१७५७ रोजी रघुनाथराव पेशव्यास लिहितो, 'बापूजी महादेव व दामोदर महादेव वगैरे वकिलांचें पारपत्य करावें, जप्ती करावी, कां कीं ते हुजूर येत नाहींत व चाकरी यथास्थित करीत नाहीत म्हणोन आज्ञा. त्यास यांचे पारपत्य करणें अगाध नाहीं. हुजूर न येण्यास एक सबब होता, धोंडीबा नाईक नवाळे यांजपासून मागील खारींत आम्ही कर्ज दहा लक्षपर्यंत घेतलें, त्यास परगणे तोडून वसूल करून धोंडीबा नाईक यास देणे, म्हणोन चाकरी त्यांस सांगितली होती. ते वसूल करीत होते. मध्ये वजिरांनी लबाडी करून थोडे बहुत रुपये परगण्यापैकी घेतले, त्या बखेड्यांत हिंगणे होते. सारांश, लबाड तर आहेतच, परंतु हरामखोरी अंगी लावून घ्यटल्यास नाहीं. त्यांस पकडण्याचें कांही मोठें संकट नाहीं. शंभर राऊत दिल्लीहून धरून आणितील. सांप्रत दामोदर तर वारले. थोडे बहुत अन्याय आहेत, त्याप्रमाणे पारपत्य करावेंच लागेल [१-६९]. त्यानंतर ता. ४ ऑगस्ट रोजी बापूजी हिंगणे देऊं केलेल्या दंडाची व्यवस्था सांगून आपल्या भावास लिहितो. ' मी श्री. दादासाहेबांसपागमे

आहें. त्याहीं आज्ञा केली कीं पुण्यास गेल्यावरही आह्मी श्री. स्वामींचे भेटीस येणें. सहा लक्ष रुपये सावकाराचे काढून भरले. दीक्षितांनीं घरें, वस्तभाव सर्व लिहून घेतलीं. स्वामींचें ओझें डोईवरी आहे तोंवरी सर्व बहुत विचारानें करणें. जोंपर्यंत त्यांची कृपा होऊन कामकाजाचा बंदोबस्त होय तोंपर्यंत प्राप्ति नाही व सावकाराचा पैसा देणे असें संकट आहे'. [६·३८८] रघुनाथरावानें हिंगण्यास बहुतेक लुटल्याचाच हा प्रकार दिसतो. एक लाख अंताजी माणकेश्वराकडून घेऊन हिंगण्यांनी भरले; व वस्तभाव विकून मोठ्या संकटानें इतर रकमेची कशी तरी भरती केली (६·३८९–३९०, ३९१). हिंगणे पुण्यास येऊन आपल्या तक्रारी कळविणार होता, परंतु तुह्मी हुजूर यावयाची उतावळी नकरणे, असें रघुनाथरावानें त्यास पुण्याहून कळविलें [६·३९२]. वर्ष सहा महिने असेच हिंगण्यांचे अत्यंत चिंतेंत गेले. स. १७५९ पासून शिंदे उत्तरेंत येऊन पूर्वीच्या व्यवस्थेंत फरक होऊं लागला, जनकोजी शिंदे मोठ्या आस्थेनें सर्व मंडळींचा परामर्ष घेऊन राज्याचे काम दक्षतेने चालवूं लागला. पुरुषोत्तम महादेव बहुधा जनकोजीपाशीच असे. ता. १९·३·१७५९ रोजीं हिंगणे धाकट्या भावास लिहितो. 'श्रीकृपा फार समर्थ आहे. चिंता न करणें' [६·३९९]. हा धाकटा बंधु दिवाकर महादेव पुण्यास होता तो नारोशंकराबरोबर श्रीमंत स्वामीचा निरोप घेऊन हिंदुस्थान प्रांती स. १७६० चे आरंभीं येणार होता [६·४००]. पुण्यास जाऊन त्यानें आपलें मागणे पेशव्यास लेखी दिलें तेच बहुधा खं. ६ ले.४९९ त दाखल आहे.

अंताजी माणकेश्वर.—हिंगण्याचा बंदोबस्त राघोबानें केला, तसा व अंताजी माणकेश्वराचाही स. १७५८तच केला. त्या सालचे आरंभी जनकोजी शिंदे हिंदुस्थान प्रांती गेल्यावर त्यांस खालील पत्र पेशव्यानें लिहिले. 'अंताजी माणकेश्वर परिछिन्न दादांनीं मनापासून येथील आज्ञेप्रमाणें बोलाविलें असें असतां हरप्रकारें उशीर लावून राहतात. आम्हांस लिहितात कीं, दत्तबांनी राहविलें. सांप्रत तुमच्या लिहिल्यावरून दिसोन आलें कीं लबाडी करून राहतात. हरप्रकारें ऐवज हाताखालीं घालून हात उगवणार. अबरूचा,

प्रामाणिकतेचा दरकार त्यांनीं टाकिलासें दिसतें. वास्तव पत्रदर्शनीं तिळमात्र मुलाहिजा न धरितां हुजूर यावयाविशीं सख्त ताकीद करावी. न येत तर परिछिन्न बोलावून आणून कैद करून त्यांस हुजूर पाठवावें. तिळमात्र मुलाहिजा करूं नये. मागें हवाले घेतलेला सर्व ऐवज ताकीद करून उगवावा. या सालचा वजिराकडील किंवा कोणताही ऐवज अंताजीचे हातीं न जाय तें करावें. तो ऐवज जमा करून हुजूर पाठवून द्यावा. पत्रदर्शनीं न येत तर अंताजीस कैद करून पाठवावे' [२१-३-१७५९, का. सं. प. या. ३३७]. पुढें अंताजीस पकडून दक्षिणेत पाठविले की काय तें समजत नाहीं. स. १७५९ चे अखेरीस तो पुण्यांत असून सदाशिवराव त्याचे हिशेब तपासीत होता (३-२३३). 'अंताजीस वारंवार हुजूर बोलाविलें असतां येत नाहींत. वजिराकडे पंनास लाखांचे हिशेब काहून तेथेंच गुंतले. कित्येक लबाड्या करतात. त्या तुमचे प्रत्ययास येऊन त्यास ठेवून घेतां. मेरट वगैरे परगणे मध्येंच खातात. वजिराजवळ बारा हजार फौजेचा हजिरी लटकीच देतात, ही चौकशी तुम्ही करीत नाहीं, अपूर्व आहे. याउपर त्यास पत्र पावतांच हुजूर पाठविणे. सुप्रयुक्त आले तर बरे, न आले तर घरावे, लुटावे. माल सर्व सरकारांत लाघावा. एक पैसा त्यास न द्यावा. हुजूर आला तर त्याच्या एक लेख हशार राउतानिशीं ठेवावा. वजिराजवळ चाकरीस फौज पाहिजे ती दुसरी नेमून द्यावी, परंतु अंताजीस ठेवूं नये. कांहीं एक मुलाहिजा न धरितां कैद करून पाठविणें. तुम्ही कारभारी, भिडेस न पडणे जाणिजे [२-५-५९, का. सं. प. या. ३८७]. मेरट वगैरे महाल अंताजीकडे होते. ते दूर करून सात लक्ष रुपये सरकारांत देण्याच्या करारावर डिसेंबर १७५८ तं ते बापूजी महादेवाकडे देण्यांत आले [६-४७१]. हिंगण्यांची बसलेली तीस वर्षांची घडी या वेळी इतकी बिघडली, की 'येथील वकिलातीचे ऐसें स्वरूप जमावलें कीं वकिलातीचें स्वरूपच न राहिलें. येथें ते ऐसे असतात कीं पेशव्यांच्या वकिलातीचा माणूस दहा दहा वीस वीस रुपये मागत फिरतो. जो कोणी शंभर रुपये दरमहा चाहेतो येथें मिळणार नाहीं. दिल्लीचा रंग

आपणास ठाऊक आहे ' [६.५१३]. एकंदरीत अव्यवस्थेची कमाल झाली होती, ती सर्व सदाशिवरावानें तोडिली. त्यानें हिंगणे व अंताजी माणकेश्वर यांच्या प्रकरणांचा तपास करून निकाल लावून दिला [३.२३३]; आणि लगेच पुढें स. १७६० चे आरंभी अंताजीपंत आपल्या कामावर रुजू झाला. सदाशिवराव दिल्लीस असतां हे सर्व सरदार रेशमासारखे मऊ येऊन त्याच्या केवळ भजनीं होते, हें पुढें दिसून येईल.

गोविंदपंत बुंदेल्यावरही पेशव्याचा रोष होता. परंतु पंतानें विशेष नर्दळीस न येतां १७५७ त पुण्यास जाऊन समक्ष समजूत घातली. पश्चात् रघुनाथरावानें दिल्लीत असतां, प्रीतिसिंग, हिंदुपत व क्षेत्रसिंग बुंदेले यांचे रुडे बाळाजी गोविंदाचे मार्फत तोडिले [३.१६४; १.७९, १२९, १३०, २५१, २५६, २५७; का. सं. प. या. ११०, ना. रो. १.८९, २३०, २३७).

५. **अटकेवरील झेंडे**, (स. १७५८ एप्रिल, मे).–सटरफटर प्रकरणें हातीं घेऊन आठ नऊ महिने रघुनाथराव मोठ्या फौजेनिशीं-दिल्लीत घोळ घालून बसला, यामुळें नानाप्रकारचे तोटे झाले. फौजेच्या खर्चास पैसा खर्च होऊन, त्याचा बोजा दिल्लीच्या व आसपासच्या लोकांवर व पातशाहीवर बसून ते सर्व बसल्यांकडून त्रस्त होऊन गेले. मराठ्यांची ब्याद एकदां कशी निघून जाते असें त्यांस झालें. व्यक्तिविषयक भानगडींचा तपास रघुनाथरावानें चालविल्याजुळें रिकामपणांत चहाडखोरांचे मात्र फावलें. होळकर नजीबखानास बचावण्याचे बादास लागून, राज्याचा मुख्य उद्योग बाजूस राहिला. ज्या द्रव्यलक्षीं ओघ दक्षिणेकडे चालविण्यासाठीं पेशव्याची धडपड चालू होती, तिचाच अभिलाष सर्व लहान मोठ्या सरदारांस सुटून, जो तो स्वतः चा लाभ साधण्यास प्रवृत्त झाला. सर्वस्व खर्ची घालून राष्ट्रकार्य करण्याची खरी प्रवृत्ति ह्या वेळीं एकट्या शिंद्यांशिवाय दुसऱ्या कोणाही सरदाराचे ठिकाणीं राहिलेली दिसत नाहीं. म्हणूनच पुढील दोन वर्षांत सर्व उद्योगाचा भार एकट्या शिंद्यांवर पडला; आणि मल्हारजीसारखा पराक्रमी पुरुष पानिपतच्या

बंदोबस्त झाला म्हणजे रोहिल्यांच्या अंतर्गत चळवळी जागच्या जागींच दबल्या असत्या. परंतु मुख्य द्वार उघडें ठेविल्यामुळें अंतर्वेदींत किंतीही व्यवस्था केली तरी ती अपुरीच होती. ही उघड गोष्ट मल्हारराव्यासही सुचली नसेल असें नाहीं, परंतु त्यास नजीबखानानें अगदी भारून टाकिलें होतें. सर्व पक्षांकडून भरपूर द्रव्य मिळवून मल्हारराव स्वतःच्या मतलबांत सावध होता. अर्थात् दिल्लीतील लोकांच्या अब्दालीच्या कारस्थाने जोराने चालू राहिली. हा प्रकार लाहोर येथें अदिनाबेगास कळून चुकला. अब्दालीने अदिनाबेगास घालवून दिलें होतें. परंतु अब्दाली निघून जातांच तो परत आला आणि पंजाबप्रांत स्वतः परत घेण्याच्या उद्योगास लागला. त्यासाठी प्रथम त्यानें शीखांस तयमूरशहाबर उठवून त्यांजकरवीं लाहोरास वेढा घातला; आणि दिल्लीत खटपट करून रघुनाथरावास लाहोरावर आणिले. तिकडे अब्दालीशी व इकडे मराठ्यांशी वेळ पडेल त्याप्रमाणे संधान ठेवणे, हाच अदिनाबेगाच्या नेहमीचा उद्योग होता.

तयमूरच्या मदतीस ठेवलेला जहानखान धूर्त होता. अदिनाबेगाचीं संधानें ओळखून, आरंभीं त्याच्याशीं जहानखानानें गोडी दाखवून त्याचा सन्मान केला आणि प्रांताचा कच्चा कारभार त्याजकडेस सोंपिला. परंतु हें सख्य फार दिवस टिकले नाहीं. अदिनाबेगाचा व जहानखानाचा बेबनाव होऊन बेग उत्तरेकडील प्रदेशांत पळून गेला; आणि तेथून शीखांची मदत मिळवून त्याने जहानखानाच्या हस्तकांशीं लढाई केली, एक सरबुलंदखान मारला गेला; आणि दुसरे दोघे मुरादखान व सर्फराजखान पळून लाहोरास गेले. शीखांनी सर्व प्रदेश बेचिराख करून टाकिला [एल्फ्ट]. या घडामोडींवर अब्दालीची नजर होती. 'अब्दाली काबुलेस आहे. त्याचा मुक्काम जहानखान बादकच्चे पातशाह्यावर गेला होता, तो शिकस्त खाऊन आला. नजीर शहाबलीखानही शिकस्त खाऊन आला. कांहीं फौज अटक उतरोन या तीरास आली होती. शीखांशीं लढाई जाली. शीखांनी मारून वाटेस लाविलें' [मार्च १७५८, ६.३७८]. ता. २० एप्रिल रोजीं बापूजी महादेव

सरहिंदहून लिहितो. 'हल्लीं शहा अब्दाली लाहोराहून कूच करून सडेस्वारीनिशीं सरहिंदेनजीक शीखांशीं लढाई मारून कंदाहारास गेला म्हणोन वृत्त आलें. नजीबखानानें शतद्रूचे मुक्कामीं जाऊन मुलाजमत करून माघारा दिल्लीस आला,' (६·३८२). हें लिहिणें बिनचूक असेल तर अब्दाली पुनः एकदां या सालीं सरहिंदपर्यंत येऊन परत गेला असें होतें. शीखांच्या लढाईची हकीकत ले. ३८४ तही आहे. शीखांच्या मदतीनें आपला कार्यभाग होत नाहीं असें पाहून अदिनाबेगानें रघुनाथरावास पंजाबांत आणिलें.

रघुनाथराव मल्हाररावास बरोबर घेऊन एप्रिलांत लाहोरावर आला. बापूजी महादेव बरोबर होता [६·४९९, १·१२३]. नजीबखान वगैरेंच्या मार्फत मल्हाररावानें अब्दालीशीं कांहीं तोडजोडीचें बोलणें चालविलें असावें असा कित्येक कागदांवरून अजमास दिसतो. 'शहा पिसोरास आला. दरकूच लाहोरास येणार आहे. त्यास आजवर शहावल्लीखानाची मर्जी या गोष्टीवर राखली होती कीं श्रीमंतांशिवाय शहाशीं एकोपा करावा; आणि येथील लहान मोठे यांस एकीकडे करावें. फिरूनही शहावल्लीखानांनीं याकूबअल्लीखानास ताकीद लिहिली कीं, तुह्मी सुभेदारांपाशीं जाऊन, ज्यांत त्यांची खुषी व जगतांचें बरें होय ते गोष्ट करणें. परस्परें मित्रत्व होय कीं त्याचे मुलखास आपली फौज कार्य पडलिया बोलावीत, व आपल्यास पाहिजे तर त्याची बोलावून घ्यावी. लहान मोठे हिंदुस्थानचे अमीर, सरदार, पातशहासुद्धां, यांस कळलें कीं, उभय पक्षीं एकोपा पुरता झाला म्हणजे हेही सर्व दबतील; व मुलूख यांचे हाताखालें दबला आहे तो सुटेल. मग इकडे एकएकाचें निरनिराळें पारपत्य करावें' [६·४९८]. अशी वाटाघाट अब्दालीशीं त्याचा वजीर शहावल्लीखान याचेमार्फत चालू असल्यामुळें लाहोरवर चालून जाण्यास रघुनाथरावानें विलंब केला असें दिसतें. अशा आडमार्गानीं जाऊन मुख्य कार्य बाजूस टाकण्यांत मल्हाररावाचें नैपुण्य व्यर्थ होतें.

अदिनाबेगाशीं संगनमत करून रघुनाथराव लाहोरावर गेला. सरहिंद येथें अब्दालीच्या तर्फेच्या अब्दुस्समदखान रोहिल्याबरोबर लढून त्याचा

रघुनाथरावानें पकडिलें. पुढें लाहोर येथें मराठ्यांशीं लढण्याचें आपणास सामर्थ्य नाहीं. असें पाहून, जहानखान तयमूरशहास घेऊन पळून स्वदेशीं गेला. रघुनाथरावानें अटकेपर्यंत त्यांचा पाठलाग करून सर्व सामानसुमान, संपत्ति व सिंधुनदीपर्यंतचा प्रदेश हस्तगत केला; आणि पाऊण कोट रक्कम घेण्याच्या करारानें पंजाब प्रांत अदिनाबेगाच्या स्वाधीन करून पर्जन्य सुरू झाल्यामुळें रघुनाथराव ताबडतोब परत स्वदेशीं आला. ' लाहोर फत्ते जाली, जहानखान पळून गेला, त्यामागें फौजा गेल्या आहेत, ' अशी बातमी राघोबानें सर्व मोठमोठ्या स्वकीय व परकीय सरदारांस स.१७५८ चे एप्रिलांत लिहून पाठविली (का. सं. प. या. ३७७). अदिनाबेग पुढें १५.९.१७५८ रोजीं मरण पावला आणि पंजाबांत पुनः गडबड उडाली. (एल्यट, व. का. सं. प. या. ३८८). ' कुरुक्षेत्रास तीर्थविधि उरकून, तुळादानें करून, सरहिंदेस पोंचले. श्रीमंतांचा काळ उत्कर्ष. अब्दुस्समदखान कत्तलबाज लाहोराकडे पळून जाऊं लागला, त्यास (होळकराच्या) पेंढाऱ्यांनींच लुटून टाकिला. मजल दरमजल शतद्रु, व्यासगंगा, चिनाब उतरून लाहुरास पोंचले. तेथील सुभा संदीपबेग होता तो दुराणीनें मारून त्याची स्त्री, मूल कैदेंत ठेविलीं होतीं, त्यांस सोडवून पांच हजार फौजेनिशीं त्यास चाकरीस ठेवून, त्याचा दिवाण लक्ष्मीनारायण कायस्थ बरा कर्ता मनुष्य होता, त्याचे स्वाधीन लाहूर, पंजाब, मुलतान अटकेपर्यंत मुलूख करून ढाला माघाऱ्या दिल्या. पेंढारी व लष्कर कुबेर झाले. रघुनाथराव व मल्हारराव यांणीं मोठें यश संपादिलें,'[भा. सा. ब. पृ. ३६]. ता. ४.५.१७५८ रोजीं रघुनाथराव पेशव्यास लिहितो. 'लाहोर, मुलतान, काश्मीर वगैरे अटके अलीकडील सुभ्यांचा बंदोबस्त करून अंमल बसवावा, त्यास, कांहीं जाला, कांही होणें तोही लवकरच करितों. तयमूर सुलतान व जहानखान यांचा पाठलाग करून फौज लुटून घेतली. थोडीशी झडत पडत अटकेपार पिशावरास ते पोंचले. अब्दाली इराणावर चालून गेला, त्याची फौज इराणच्या पातशहानें लुटून घेतली. अब्दाली कंदाहारास आला. इराण्याची फौज पाठलाग करीत आली आहे. जबरदस्तखान व मुकर्रबखान या प्रांतींचे

सरदार व जमिनदार अब्दालीचे जबरदस्तीमुळें त्यास रुजू होते, तेही बदमजेन हंगामा करितात. हल्लीं रफीक होऊन, सेवा करून दाखवूं, अब्दालीस तंबी करूं, ऐशा त्यांच्या अर्ज्या आल्या आहेत. अब्दालीचा धर सुटला आहे. सारांश, त्याचा जोर तिकडून होतो ऐसें नाहीं. तिकडून इराणचे शहानें जेरदस्त केलें, इकडून जोरा पोंचवून सरकारचा अंमल अटकेपार करावा. त्याचा पुतण्या व दौलतेचा वारस स्वामीपाशीं देशास आला, तो स्वामींनीं आम्हांकडे पाठविला होता. त्यास अटकेअलीकडे थोडीशी जागा बसावयास देऊन अटकेपार काबूल पिशावरचा सुभा देऊं. अब्दालीच्या फौजेवर अब्दुल-समदखान सरहिंदेंत होता, तो सरकारांत पाडाव आहे, तो व आणखी या प्रांतींची फौज, इराणी, मोगल देऊन मशारनिल्हेची रवानगी करितों. हे तिकडील पैरवी करितील, स्वामीचे पुण्यप्रतापें अब्दालीस जोरा पोंचवून तंबी करितील, पारिपत्य उत्तम प्रकारें करून अटकेपार अंमल बसवितील. लाहोर प्रांतीं रेणको अनाजी व रायाजी सखदेव ऐसे ठेविले. गोपाळराव गणेश यांचाही पैगाम आहे, तेही राहतील. इराणचे पातशहाचे स्वदस्तुरचे कागदही आम्हांस व मल्हारबास आले होते, कीं लौकर कंदाहारेस यावें, आणि याचें पारिपत्य करून अटकेची हद्द करावी. परंतु आम्ही तरी काबूलचा सुभा अब्दुल रहीमखान स्वामींनीं पाठविला, त्यास देतों. फौज वगैरे थोडें बहुत साहित्यही करितों. काबूल व कंधार हे अटकेपारचे सुभे हिंदुस्थानाकडे अकबरापासून आलमगीरपावेतों होते, ते आम्ही विलायतेंत कां द्यावे ? यास्तव तूर्त येथें सुभे देतों. त्यांसही (इराणचे शहास) या सुभ्यांची दरकार नसेल. तो इराणचा अंमल करील. आम्ही कंधारपावेतों अंमल बसवून, तूर्त त्यास गोडच जाब पाठविणार आहों. जंबू काश्मीर वगैरे तमाम वकील आले आहेत. मामलत थोडी बहुत अटके अलीकडील करीत आहों. पलीकडील तूर्त होत नाहीं. खटपट मात्र होईल. तूर्त तांतडीमुळें जें होईल तें करितों. पुढील स्वारीस जो कोणी सरदार मातबर येईल तो बंदोबस्त करील. मुलूख दोहों करोडींचा

वसुली, परंतु जमीनदार मवास मोठमोठे आहेत. आम्ही नांवास मात्र खंडणी करितों. जेथें पंचवीस लक्षांचा मुलूख तेथें एक दोन लक्ष येणेंच कठीण आहेत. तूर्त माघारे फिरावयाचा डौल स्वामीचे आज्ञेवरून धरिला आहे, याजमुळें जें होतें तेंच करितों, तटीं लावीत नाहीं. तूर्त अदिनाबेगावरच सारा यखतियार दिल्हा आहे; त्यासच कमाविसीनें लाहोर मुलतान दिल्हें आहे. यंदां तर सारें शिबंदीखालींच जाईल, शिबंदी वारतांच कठीण पडेल. दोन तीन वर्षांनीं कांहीं सोईस लागेल. स्वामींस कळावें' (इ. सं. ऐ. स्फू. ले. ११ स. १९१६]. रघुनाथरावानें सरहद्दीचा बंदोबस्त कसा केला, याचें हें थोडक्यांत चांगलें वर्णन आहे. पेशव्यानें ताबडतोब परत बोलावल्यावरून त्यास पंजाबचा बंदोबस्त अपुरा टाकून दक्षिणेंत जावें लागलें. नानासाहेबास या बाजूची परिस्थिति बिलकूल माहीत नव्हती. परत न जातां मराठे सरदार ठांसून पंजाबांत बसले असते तर अब्दाली वाढला नसता. इराणी व मराठे या शत्रूंच्या मध्यें तो चिरडून जाण्याच्या अगदीं बेतांत होता. हल्लींच्या इंग्रजांप्रमाणें त्या वेळींही मराठ्यांची बादशाही हाव सिंधू-पलीकडे कशी गेली हें ध्यानांत ठेवण्याजोगें असून, या संधीस मल्हारराव होळकरानें तरी परत जाण्याचें कांहीं एक कारण नव्हतें. अंताजी मा० लिहितो, 'सेवकास स्वामींनीं कृपा करून पत्र (१८ एप्रिलचे) पाठविलें तें पावलें. वर्तमान लाहोरच्या फत्तेचें, शत्रूचे पारिपल्याचें व तिकडील मुलूख काबीज केल्याचें लिहिलें तें सविस्तर वाचून परम आनंद झाला. तो पत्रीं कोठवरी लिहावा. हिंदुस्थानांत कीर्त लौकिक मातबर जाली. कुल राजे, उमराव, सुभे यांस दहशत पडली. सारे हिंदुस्थानचा सूड अब्दालीपासून एक स्वामींनीं घेतला. तेणें करून यशाचे पर्वत जाले. स्वामी यशस्वीच आहेत. याचा विस्तार सेवकास लेखन करावयास सामर्थ्य कैचें! हें वर्तमान वजिरांनीं ऐकोन बहुतच हर्ष मानिला. स्वामी अवतारी पुरुष आहेत. त्यांची स्तुत मनुष्यांनीं काय करावी! सेवकास आश्रा स्वामीचे पायांखेरीज दुसरा कोठेंही नाहीं. जरी स्वामींची छावणी लाहोर प्रांतीं जाली, तरी वजीर पातशहास घेऊन

छावणीस आपल्याजवळ घेऊन येतो. वजीर व लहान मोठे सर्व म्हणतात कीं, खासा छावणी न जाली तर पठाण मागतीं लाहोर प्रांतीं पावसाळा येतील. ऊभेंच लोक म्हणतात तें सेवेशीं लिहिलें. करणें न करणें यरुल्यार खावंदांचा. वजीर व पातशहा यावयाचा निश्चय कोणे प्रकारचा तो निवडून सेवकास आज्ञा लिहावी, त्याप्रमाणें त्यांस घेऊन विठ्ठल शिवदेव सेवेशीं येतील. त्याप्रमाणें कृष्णराव (काळे) ही येतील. सर्व विनंति करतील (५.५.१७५८. का. सं. प. या. ३४१). यावरून रघुनाथरावानें घाईघाईनें पंजाबांतून परत न जातां, तेथेंच छावणीस राहणें किती जरूर होतें हें चांगलें दिसून येतें. दक्षिणच्या घोड्यांस अटकेवर सिंधूचें पाणी पाजून तेथें मराठ्यांचा भगवा झेंडा त्यानें रोविला, येणें करून त्यास 'राघो भरारी' हें भपकेदार नांव मिळून, त्या दिमाख घमेंडींत अखिल महाराष्ट्र कांहीं काळ दंग झालें, आणि हिंदुपद पातशाहीचें शिवछत्रपतीचें ध्येय सिद्धीस गेलेंसें वाटून धन्यवाद सुरू झाला. मराठे हिंदुस्थान सगळें पादाक्रान्त करणार अशी भावना लोकांत पसरली. परंतु यांतील पोकळ-पणा लवकरच निदर्शनास आला.

प्रकरण २९ वें.

अब्दालीकडून शिंदेहोळकरांचा पाडाव.

१ शिंदेहोळकरांचें जूग फुटलें. २ शुक्रतालच्या पुलाची भूलथाप.
३ दत्ताजीचा अजब पराक्रम. ४ शिंदेहोळकरांची पोळजत्रा.

१ शिंदेहोळकरांचें जूग फुटलें.—जयापा शिंद्याचा खून झाला तेव्हां आमचें जूग फुटलें ' असे उद्गार मल्हाररावानें काढिले ते यथार्थ होते. रघुनाथरावाच्या स्वाऱ्यांत शिंदेहोळकर कुंभेरीच्या प्रसंगाशिवाय बरोबर असे कधीं नव्हते. स. १७५६ त दत्ताजी व जनकोजी शिंदे दक्षिणेंत आले ते स. १७५८ च्या जानेवारींत सिंदखेडची मोहीम आटपल्यावर उत्तरेत निघाले.

त्या सालच्या उन्हाळ्यांत दत्ताजी स्वतःच्या लग्नासाठीं श्रीगोंद्यास होता, तो पुढें चार पांच महिन्यांनीं मागाहून जनकोजीस मिळाला. जनकोजी प्रथम उज्जनीस जाऊन तेथून जमवाजमव करून बुंदीवाड्यांत गेला. तेथें हरगडावर गुमानसिंग गिराशियाचा पाडाव करून, खेचीवाडा, राजगड, पाटण व बुंदीकोटा येथील खंडण्या घेऊन जयनगरच्या राज्यांत आला. माधवसिंगाकडून वीस लाख खंडणी घेऊन पुढें बरसातीच्या छावणीचा विचार करणार तों उदेपुरच्या राण्यानें शिवपुरची गडी काबीज करण्याकरितां जनकोजीचें साह्य मागितलें. सबब 'पावसाळ्याचे दोन तीन महिने शिवपुरापुढें जनकोजी राहिले. मारवाडांतील गुंता विशेष केला नाहीं. श्रम बहुत, फळादेश स्वल्प. डोंगर कोरून उंदीर काढावा. अनृत भाषण करणें हें तों त्या लोकांचा स्वभावधर्म परंपरागत आहे. बिजेसिंगाकडील पैका घेणें बहुत. त्यांजमध्ये त्यांजला संशय पूर्व दोषांचा बहुत. मग कांहीं वाट केली, त्यामुळें त्यांचा दिल खुलासा जाला; आणि पुढें आणखी कामावरी दृष्टी देऊन, त्या प्रांताच्या आग्रहास न गुंतोन दिल्लीकडे येणें झालें,' (इ. सं. ऐ. टि. २·४१). पावसाळ्यांत रघुनाथराव लाहोरचे स्वारीहून परत येत असतां जनकोजीनें सामोरा जाऊन रस्त्यांत त्याची भेट घेतली. मल्हारराव‌ाचे मध्यस्थीनें नजीबखानानें कार्यभाग बिघडविला, सबब कसेंही करून प्रथम तुह्मी नजीबखानाचें पारिपत्य करा, असें या भेटीत रघुनाथरावानें जनकोजीस विनवून सांगितलें. 'क्रोड रुपये शिबंदी वाढली तरी पुरवेल. एवढी जोड आम्हांस द्यावी, आम्हींच पारपत्य केलें असतें, परंतु मल्हारराव‌ांनीं धर्मपुत्र ह्मणून अगत्य धरून आपले तर्फेनें अंतर्वेद प्रांत कुरुक्षेत्रापासून कुंजपुरा देखील चोवीस लक्षांची मामलत त्याचे स्वाधीन केली. माधवसिंग जयनगरकर, बिजेसिंग मारवाडी वगैरे बहुत धर्मपुत्र मल्हारराव‌ास आहेत. या धर्मपुत्रांचा फलादेशही भोगीत आले.' असें सांगून रघुनाथराव स्वदेशीं आला. मागून मल्हारराव‌ही इंदुरास येतांना जनकोजीस रजपुतान्यांत भेटला. रघुनाथराव‌ाचे व जनकोजीचे भेटींत घडलेला विचार पुसून काढावा एवढाच मल्हारराव‌ाचा

देश होता. प्रथम जनकोजी भेटच घेईना तेव्हां मल्हारराव आपण होऊन एकदम जनकोजीकडे आला. पुढें उभयतांचा समागम ८–१५ दिवस झाला. मांत एकदंर कारस्थानांचा उभयतांनीं विचार केला. मल्हारररावानें आग्रहानें सांगितलें कीं, नजीबखानाचे साह्यानें भागीरथीस पूल बांधून अयोध्येचें राज्य जेंकावें. नबीजखानास राखावा. त्याचें पारिपत्य केलीया पेशवे अटकेपासून रामेश्वरपर्यंत जासुदां हातीं पैसा आणवून एकछत्री राज्य करतील'[1] असा कानमंत्र देऊन आणि पालकपुत्र तुकोजी होळकर यास दोन हजार फौजेनिशीं जनकोजीजवळ ठेवून मल्हारराव परत आला. पेशव्यांनीं स्वतः येऊन आपला ग्रह उत्तरहिंदुस्थानांत बसविला, ही गोष्ट होळकरास रुचली नाहीं. उत्तरहिंदुस्थानांतील कारभारांत आपण म्हणजे शिंदेहोळकरांनींच मुख्त्यार असावें, त्यांत पेशव्यांनीं दखलगिरी करूं नये, असा मल्हाररावाचा कटाक्ष होता. पुढें दत्ताजी शिंदे आपली नवी स्त्री भागीरथीबाई व जनकोजीची काशीबाई यांसह उत्तरेंत येतांना रघुनाथरावास भेटला. दत्ताजीबरोबर नारोशंकर होता. त्यांसही रघुनाथरावानें जनकोजीसारखाच उद्योग सांगितला. थोड्या वेळानें मल्हाररावाची व दत्ताजीची उजनीस भेट झाली, तेव्हांही पूर्वीचाच बुद्धिवाद त्यानें दत्ताजीस शिकविला. जनकोजीस हा बुद्धिवाद पटला नव्हता, परंतु दत्ताजीस पटला. मागाहून विठ्ठल शिवदेव विंचुरकर रघुनाथरावाचे स्वारींतून दक्षिणेंत येतांना दत्ताजीस भेटला. विठ्ठल शिवदेवाचें मत होळकरासारखेंच होतें. एकंदरींत रघुनाथरावाच्या स्वारींत सरदारांचीं मनें अनेक विकल्पांनीं बिघडून कोणताही मनसुबा निर्वेध चालणें अशक्य झालें. रेवाडीनजीक जनकोजी व दत्ताजी यांच्या भेटी होऊन ते दिल्लीस पोंचतात त्यापूर्वीच पंजाबांत अदिनाबेग मृत्यु पावून तिकडे गडबड उडालेली शिंद्यांस कळली. जनकोजीचा कल रघुनाथरावाचे सांगीप्रमाणें नजीबखानाचें पारिपत्य करण्याचा होता, परंतु दत्ताजीस तो विचार मानवला नाहीं. स. १७५८ च्या डिसेंबरांत उभयतां शिंद्यांचा मुक्काम दिल्लीस यमुना-

१ टीप–या प्रवादास बखरींशिवाय अस्सल कागदांचा आधार उपलब्ध नाहीं.

तीरीं मज्मूच्या टिळ्यावर होता. फेब्रुवारी सं. १७५८ पावेतों निरनिराळ्या वाटाघाटी चालल्या; आणि पेशव्यास लिहून पुढील उद्योगाची दिशा शिंद्यांनीं ठरविली [का. सं. प. या. ३८८, ३७३, ३६२]. मार्चांत दिल्ली सोडून सरहिंदवरून शिंदे एप्रिलांत लाहोरास गेले [सदर ३८७], आणि तिकडील कार्यभाग विल्हेस लावून ता.१३.५.५९रोजीं यमुनातीरावर रामड्याचे घाटीं आले. 'गंगापार होऊन बंगाल पटणें प्रांतीं जाण्याचा उद्देश धरून मजल दरमजल गडमुक्तेश्वरास जातात' (इ. सं. ऐ. टि. २.४१). या कार्यक्रमाचा थोडा ज्यास्त खुलासा केला पाहिजे.

स. १७५८ चे आरंभी पेशवा हिंगण्यास लिहितो. ' दिल्लीतील व पठाणांकडील बारीक मोठें वर्तमान लिहिलें तें कळलें. येथील कूल अर्थ व कर्तव्य पदार्थांचा भाव लिहिणें तो लिहिला आहे. तदनुरूप पैरवी गुप्त मंत्र राखोन करावी. पठाणांकडील मुलूख आह्मांकडे किती आला, त्याचा तनखा काय, तूर्त वसूल काय, यंदां नक्त ऐवज हातास किती येईल तो अजमास लिहिणें. वजिरांनीं आजपावेतों ऐवज किती दिला, बाकी त्यांजकडे किती राहिला, ते कधीं येणार हाही अर्थ सर्व लिहिणें. दिल्लीत लबाड्या फार आहेत; वजिराशीं, गाजुद्दीनखानाशीं सोय पडे, जाबेतखान इकडील आहेत त्यांचे साहित्यांत आहेत, ते त्यांचे साहित्यास लागत ऐसें गुप्त रीतीनें करून, वजनदार मनसबा होऊन येई तें करणें. तुह्मांकडे साताआठांचे परगणे फारच चांगले आहेत. त्यांपैकीं जरूर तर्तूद करून पांचसहा ऐवज वैशाखअखेर येऊन पावे तें करणें. नाहीं तर दुसऱ्यांकडे सनद होईल. येथें ओढ फार आहे (६.४९७). हिंदुस्थानांतील स्वारीनें दौलतीचें कर्ज वारणें हाच पेशव्याचा मुख्य हेतु असून तोच तो सर्व सरदारांस वारंवार लिहीत होता. स. १७५८ च्या ऑक्टोबरांत रघुनाथराव हिंगण्यांस लिहितो. ' गाजुद्दीनखानाचे सांगण्यावरून चार पांच प्रकारचे मनसबे लिहिले ते कळले. रोहिले पठाणाचा मजकूर अवगत जाहला' [६.३७२]. हे मनसबे ता. ५.१२.५८ रोजीं पेशव्यानें शिंद्यास कळविले. ' दत्ताजी व जनकोजी शिंदे कोठें आहेत, काय मनसुबा करितात तें वरच्यावर

कळवावें. वाजिराचा अगत्यवाद चि०दादांस आहे. त्याचा पक्ष घरून (१) नजीबखानाचें पारिपत्य करावें; (२) लाहोरचा नवा मुलूख सोडविला तेथें अदिनाबेग मृत्यु पावला, तेथील बंदोबस्त दत्ताजींनीं जाऊन अगत्य करावा; (३) बंगाल्याकडील काम मातबर असून पैका मेळवावयाची जागा आहे. लाहोरचा बंदोबस्त झाल्यावर सुजाउद्दौला सोबती करून भारी फौजेनिशीं जाऊन पटण्याकडील व बंगाल्याचा मुलूख सोडवावा. ठीक पडल्यास वाजिरास समागमें न्यावें. दत्तबा चित्तावर घरतील तें करतील. तसेंच (४) सुजापासून काशी प्रयागची नजर व आणखी कित्येक बाबती त्याजकडे लावून पैका साधेल तरी साधावा; एक लाहोरचा बंदोबस्त असल्यास हें करावें. सारांश, सरकारच्या कर्जास पैसा मातबर मिळे तें करावें (का. सं. प. या. ३८८). एकूण नजीबखानाचा बंदोबस्त, लाहोरचा बंदोबस्त, बंगाल प्रांत सोडविणें आणि तीर्थस्थळें कबजांत घेणें, असे हे चार मनसबे होते. रघूजी भोसल्याचे पश्चात् बंगाल प्रांत हातचा गेल्यासारखा होता, इंग्रजांनीं ह्लासी जिंकून तिकडे आपला प्रवेश केला होता, परंतु त्या प्रांतावरील आपला गह गमावूं नये अशी हिंदुपद पातशाहीच्या हेतूच्या सांगतेची पेशव्याची भावना होती. अटकपासून बंगाल समुद्रापावेतोंचा प्रदेश ताब्यांत राखण्याची ताकद एकट्या शिंद्यांची बिलकूल नव्हती. तशांत तिकडील पैसा दाक्षिणेंत आणून कर्ज वारण्याची पेशव्याची मनीषा व्यर्थ होती. शत्रूंचा पाडाव होऊन स्थिरता झाल्याशिवाय पैसा वसूल होत नसतो. तशांत होळकर, विठ्ठल शिवदेव वगैरे सरदार मनांतून या उद्देशास विरोधी होते. होळकराचे बुद्धिवादानें शिंद्यांचे मनाची चलबिचल झाली. हे सर्व प्रकार पेशव्यास माहीत होते, प्रत्यक्ष रघुनाथराव सर्व पाहून गेला होता. पेशवा या वेळीं पुण्यांत स्वस्थचित्त होता; आणि स्वतः एकवार शिंद्यांबरोबर उत्तरेंत आला असता तर, निदान पानिपतचें अरिष्ट तरी बऱ्याच अंशीं टळलें असतें असें वाटूं लागतें.

स. १७५८ चे अखेरीस दिल्लीस पोंचल्याबरोबर दत्ताजी व गाजीउद्दीन यांचें सोफांचे प्रकरणावरून सडकून भांडण झालें. अटक, फतेलष्कर, किल्ले-कुशाद

अशा तीन नामांकित तोफा दिल्लीत बादशहाच्या होत्या, त्या दत्ताजीनें आपल्यासाठीं मागितल्या. वास्तविक या तोफा उपयोगापेक्षां वैभवाची खूण म्हणून दिल्लींतून हालवूं नयेत अशी गाजीउद्दीनची इच्छा होती. या तोफा नेऊन बिजेसिंगाचें नागोर साफ उडवून द्यावें असा दत्ताजीचा मनोदय होता. शेवटीं एक तोफ समागमें घेऊन दत्ताजी स. १७५९ च्या मार्चांत पंजाबांत गेला. अटक तोफ उज्जनीस पाठवीत असतां चंबळ नदींत अडकून राहिली, आणि तिसरी मुळीं जाग्यावरून हाललीच नाही (भा. सा. ब.). दत्ताजीनें कुरुक्षेत्रास आठ मुक्काम केले. तेथे तुलादानें वगैरे करून तो सतलजवर आला. अदिनाबेगाचा हस्तक संदीपबेग म्हणून होता, त्यास दत्ताजीनें सरहिंदचे बंदोबस्तास ठेविलें. संदीपचा मुलगा व लक्ष्मीनारायण येऊन भेटले. त्यांच्याशीं वाटाघाट करून साबाजी शिंदे व त्र्यंबक बापूजी या सरदारांस त्यानें अटकेपर्यंतच्या मुलखांत ठेविलें. पंजाबांतील बुआबाचा कारभार अदिनाबेगाच्या विधवेकडे सोंपिला; आणि आपण परत फिरून एप्रिल महिन्यांत कुंजपुऱ्यानजीक मुक्काम केला. चित्तांत योजना कीं नजीबखानाचे साह्यानें भागीरथीस पूल बांधून सुजावर चाल करावी. जनकोजी, नारोशंकर व अंताजी माणकेश्वर यांस दत्ताजीचा विचार पसंत पडला नाहीं. त्यांचे मनांत पेशव्याचे लिहिल्याप्रमाणें प्रथम नजीबखानाचें पारिपत्य करावें असें होतें. दत्ताजी आपले मनसुबे बिघडवितो असें मनांत येऊन ता. २३·२·१७५९ रोजीं पेशवा लिहितो, ' दत्ताजी शिंद्यांचा मारवाडचा पैका उगवावयाचा विचार काय केला तो लिहिणें. लाहोर, बंगाल, पटणें हे तीन मनसुबे शिंद्यांस मातबर आहेत. अदिनाबेग मृत्यु पावला आहे, तर लाहूरचा बंदोबस्त यथायोग्य करावा. बंगाल्यास क्रोड दोन क्रोडी पैका मिळे अशी जागा आहे. भारी पैका मिळवून कर्जाचा परिहार करून फौज ताजी करावी असा विचार झाला पाहिजे. मातबर फौजेनिशीं उभयतांनीं जाऊन पटणे हस्तगत करून तेथें छावणी करून राहवें. तेथून बंगाल्याचा मनसुबा करावा. चिरंजीव दादा बाजतबरसाद हिंदुस्थानास येतील. तदोत्तर त्यांनीं बंगालची स्वारी करावी. बंगालची मामलत चुकवावयास वकील

तुह्मांकडे आला तर पंनाससाठ लक्षांखालीं चुकवूं नये. प्रस्तुत पटणें काबीज करावें. सुजाकडून काशी, अयोध्या, प्रयाग घ्यावे. चिरंजिवांजवळ काशी, अयोध्या द्यावयाचा करार सुजानें केलाच आहे. प्रयागचा मनसुबा सोहलतीनें होईल तरी करावा. दिल्ली प्रांती नारोशंकर अथवा आणखी कोंणी दोन तीन हजार फौज ठेवावी. अंताजी माणकेश्वरास परिच्छिन्न हुजूर पाठवावा. त्यांची भीड न धरणें. मोघम चौकसी करूं नये. चौकसी करणें तर फारच सक्तीनें खावंदगिरीने करावी. मळमळींत कांहीं न करणें. येथें कर्ज सत्तर लाख देणें आहे. पंनास लाख कर्ज तुह्मीं फेडावें. कोणी किती फेडावयाचें त्याची वांटणी वगैरे ध्यानांत न आणतां खामखा कर्ज फेडावें. जातें समयीं दतबा बोलोन गेले', (का. सं. प. या. ३७३). पुनः ता. २१-३-१७५९ ला पेशवा लिहितो. 'वजीर मीरशहाबुद्दीनचा विचार सुधा नाहीं. सुजास वजिरी दिल्यास पंनास लाख रुपये देतो. आज्ञा जालिया लाहोराहून आल्यावर करूं व सरकारचें कर्ज फेडूं. ' ह्मणून लिहिलें तें कळलें. ऐशास कर्ज फेडावें हें आपणांसच योग्य आहे. परंतु मरिशहाबुद्दिनास आपणच स्थापिलें. त्यापासून करारांत अंतर पडल्यास मुलाहिजा धरण्याचें प्रयोजन नाहीं. करारांत अंतर नसेल तर काहूं नये, सुजास वजिरी देणें तर काशी प्रयाग हीं दोन स्थळें घ्यावी; रोख रुपये घ्यावे, तरच सुजास वजिरी द्यावी. रुपये द्यावयास दोनतीन वर्षे लावील तर न द्यावी. कारण तो पैकेकरी जबरदस्त, फौज तोफखाना मोठा, जाठाशी त्याचा स्नेह, यामुळे सत्वरच भारी होतील. मोगल लोक फावले मार्गानी आह्मांशी वांकडे वर्तावयास अंतर करणार नाहींत. तथापि पंनास लाख रोख हातास येत. काशी प्रयाग येत, तरी करावें. परंतु त्याची रीत संस्थानिकपणाची दिसते. गंगेपलीकडील संभाळून असावें, दिल्लीचे खटपटीत जीव राहिला नाही, निरंतर तुमचे आझेंत चालावें, अब्दालीचा शह फावले मानीं दिल्लीवर आहेच. पहिला दिल्लींत ऐवज मातबर होता, मुलूख फार होता, पातशहाचा दबाब होता, यास्तव मनसूरअली वजिरीसाठीं झटत होता, आतां पातशाही

बेदबकरीची, खजिना नाहीं, मुलूख नाहीं, यास्तव सुजाचें राजकारण खरें लटकें याचा पुरता शोध जाठाचे मार्फतीनें करून, आपणाकडील इतबारी शहाणा सुजाकडे पाठवून, रागरंग पाहून पंनास लाख रोख व प्रयाग हातास येत असेल तर वजिरी द्यावी. नजीबखानास बक्षीगिरी दिल्यास तीस लाख रुपये देतो ह्मणोन लिहिलें. ऐशास, नजीबखान पुरा हरामखोर बाट आहे. गुदस्तां दादाशीं त्याशीं कांहीं मजा राहिली नाहीं. तो दिल्लींत प्रविष्ट जालीया, अब्दालीचें ठाणें बसलेंसें जाणावें. बेइमान हरामखोर आहे. त्यास वाढविणें सर्पास दूध पाजण्याप्रमाणें आहे. फावले मानीं त्याचें पारिपत्यच करावें. सुजा प्रयाग न देई, बेरीज मात्र बोलावी, रुपये द्यावयास तीन वर्षें लावावीं, असें करूं लागला तर गाजुद्दिनाशीं जे जे करार चिरंजिवांनीं केले, ते कायम करून, ते आपण एक होऊन असावें. बाजतबरसाद वजीर पातशहास घेऊन नीट बंगालच्या सुमारें जावें. रोहिले जमीदार बहुत करून सामील होतील. वजीर तुह्मीं एकदील होऊन बंगालचा रोंख धरावा, तों इकडून चिरंजीव प्रयागाजवळ बुंदेलखंडच्या मार्गे येतील, तुह्मी वजिरासह अंतर्वेदींतून यावें. असा भारी शह पडल्यावर भारी नजर व काशी प्रयाग दिल्यास, बादशहा व वजीर यांस समजावून सुजास बक्षीगिरी द्यावी हा दुसरा प्रकार. वजीर न येई तो तुह्मींच सुजास मेळवून घेऊन काशी प्रयाग घेऊन बंगाला पटणें निमें देऊं करून दोघांनीं मिळून सोडवावा हा तिसरा प्रकार. या तीनही मनसब्यांत जो पक्का बनेल तो करावा. दिल्लींत लहान वकील लबाड फार बोलत असतात. उगीच गोष्ट फुगवून राजकारण अडकवून पाडावें, निशेस ठिकाण नाहीं, तुमचा सरळ कारभार, यास्तव हरएक राजकारण पक्के निशेचें कोणतें, शोध पुरता घ्यावा. तूर्त तुह्मी लाहोर प्रांतीं गेलां, तिकडेही काम फार आहे. यामुळें उशीर लागेल, छावणीही त्या प्रांतें होईल. तेव्हां हा मनसबा बाजतबरसाद जाईलसें वाटतें. तथापि लाहोरकडील बंदोबस्त सत्वर होऊन तुह्मी छावणीस, दिल्ली आसपास आलां तर हीं कारणें रूबकार घडून येतील ' (का. सं. प. या. ३६२). परंतु हे बेत सिद्धीस गेले नाहींत, त्याचीं कारणें पुढें दिसून येतील.

२. **शुक्रतालच्या पुलाची भूलथाप** (मे–नोव्हेंबर १७५९). पेशव्याचे हे मनसुबे कागदावरच राहिले. गाजीउद्दीनानें मराठ्यांची मदत घेऊन नजीबखानास उखडण्याचा चालविलेला प्रयत्न बादशहास रुचला नाहीं. दोन बलाढ्य उमरावांस एकमेकांविरुद्ध लढवून तो आपला निभाव कसा बसा लावीत होता. बादशहाचा वडील पुत्र मीर्झा अब्दुल्ला अलीगौहर याजवर बादशहाची मोठी भिस्त होती. उत्तर मोगलशाही डोळ्यांनीं भरपूर पाहिलेला हाच शहाजादा पुढील शहाआलम बादशहा होय. याचा जन्म ता. १४·६·१७२८ व मृत्यु १८·११·१८०६. बादशहा वृद्ध व पैशाच्या अडचणींनी गांजलेला होता. मराठ्यांनीं व ठिकठिकाणच्या अंमलदारांनीं सर्व राज्य ग्रासून टाकिल्यामुळें वसूल बंद पडला. गाजीउद्दीनानें सर्व राजकुटुंबावर सक्त पेहरवी ठेविली होती. ता. १९·५·१७५८ रोजीं त्यानें अलीगौहर यास त्याचे राहते वाड्यांतच प्रतिबंधांत ठेविलें; पण बादशहानें त्यास युक्तीनें त्याच दिवशी सोडवून बाहेर पाठविलें. तो ठिकठिकाणीं हिंडत गेला. रोहिल्यांनीं त्यास मदत केली नाहीं, तेव्हां बरेली, फैजाबादवरून प्रथम अलाहबादेस व तेथून पुढें बहार प्रांतांत गेला. (Imp. Gaz. II. 410). नंतर बादशहानें त्याची नेमणूक बंगालच्या सुभ्यावर केली. सुजाउदौला व काशीचे बळवंतसिंग यांची मदत त्यास नजीबखानाचे मार्फत मिळाली. शहाजाद्याची ही चलती पाहून गाजीउद्दीन घाबरला आणि दत्ताजीच्या मदतीनें आपला बंदोबस्त करूं लागला. दत्ताजीला बंगाल्यावर स्वारी करण्यास पेशव्यानें सांगण्याचे हें आणखी एक कारण होतें. पण दत्ताजीस बंगाल्याकडे जाण्याची सवड होण्यापूर्वीच अलीगौहर व सुजा यांनीं स.१७५९ चे मार्चांत पाटणावर चाल केली. फ्रेंच सेनापति जीन लॉ हाही त्यांचे मदतीत आला. परंतु पटणाचा कारभारी रामनारायण यानें क्लाइव्हची मदत घेऊन शहाजाद्यास पराभव करून परत फिरविलें (जानेवारी–एप्रिल), तेव्हां पुढें तो अलाहबादेकडे सुजाचे आश्रयास राहिला. प्रयाग, काशी वगैरे ठिकाणें कबजांत घेण्यास मराठे उत्सुक होते, तितकाच सुजा तीं सोडण्यास नाखूष होता. कारण मुसलमानी अंमल नाहींसा झाल्याची ही एक खूणच होती. हीं ठिकाणें मराठ्यांचे कब्जांत कधींच आलीं नाहींत.

दत्ताजी शिंदे लाहोरचा बंदोबस्त करून परत आला, तेव्हां मराठ्यांचा अंमल दिल्लींत कायम होणार अशी वेळ आली, म्हणून नजीबानें व बादशहानें अब्दालीस निकडीचीं पत्रें लिहून त्यास त्वरेनें हिंदुस्थानांत बोलाविलें; आणि इकडे दत्ताजीस गंगेवर पूल बांधून देण्याच्या गुळचट थापा देऊन स्वस्थ बसविलें. नजीबखानाचा बंदोबस्त करण्याविषयीं दत्ताजीस पेशवा लिहून लिहून थकला. पण दत्ताजीस केवळ भुरळ पडल्यासारखें झालें. (१) पंनास लाख घेऊन सुजास वजिरी देणें; (२) अंताजी माणकेश्वरास दिल्लींतून काढणें; (३) तीस लाख घेऊन नजीबखानास स्वस्थळीं स्थापणें, (४) किंवा आपण होऊनच पातशाहीचा बंदोबस्त करणें; यांपैकीं कोणते प्रकार कसे करावे तें शिंद्यांनीं विचारिल्यावरून पेशवा लिहितो. 'वजीर मीरशहाबुद्दीन सर्व आपल्या लक्षांत आहेत, त्यांजकडून करारांत अंतर नाहीं, सबब सुजास वजिरी देऊं नये. वजिराकडून अंतर पडेल व सुजाकडून पंनास लाख मिळतील तर सुजास वजिरी देण्यास हरकत नाही; नजीबखान बाट, अर्धा, अब्दाली, त्याचें राजकारण न करावें. सुजाउद्दौला व जाठ एक झाल्यास भारी होईल, सबब आहेत वजीर तेच फार उपयोगी. अंताजीपंतास जरूर हुजूर पाठविणें. कर्जाची चिंता दत्तबांस असेलच.' रामराव नीळकंठ ह्मणून पेशव्याचा कोणी हस्तक होता, त्यानें ता. १३ मे रोजीं दिल्लीहून एकंदर हकीकतीचें विस्तृत पत्र पेशव्यास लिहिलें तें वाचण्यालायक आहे (इ. सं. ऐ. टि. २·४१). 'लाहूर प्रांताकडील ऐवजाचा कांही वसूल आला. दहा लक्षांच्या हुंड्या सेवेसीं पाठविल्या त्या पावल्याच असतील. बाकी ऐवज देणें तो श्रावण-अखेर येईल, तो वरचेवर आपणाकडे येत जाईल. तुर्की घोडे कांही मिळविले आहेत ते खजाना समागमें पाठवितील. अंताजीपंतासंबंधानें दरबारांत स्वभावगुणाकरितां विश्वास पडत नाहीं. सबब हुजूरच पाठवितात. तेथें आल्यानंतर जें कर्तव्य तें करतील. दत्तबांचा एक हेतु हाच की खावंदांस ऐवज पाठवावा. यांत आपली अभिलाषबुद्धि नाही. त्यांचें चित्त स्वामी-चरणीं एकानेष्ठ, कायिक, वाचिक, मानसिक सर्व प्रकारें आहे. लाहोर

प्रांतीं आलिया उपर अदिनाबेग मृत्यु पावला, त्याची स्त्री व दत्तपुत्र घेतला आहे तो भेटीस यजमानांच्या आले. त्यांच्या माथां चौदा लक्ष ठराविले. त्यांचा तालुका लाहोर व जालंधर दादासाहेबांनीं दिल्हा तोच करार केला. परंतु लाहोर प्रांतीचा मुलूख बहुत, पलीकडे अटक कंदाहारपर्यंत मोकळा पडला. पठाणाचा मार्ग. जंबूचे राजे पहाडी आहेत त्यांस अंगीं लावून घेऊन कामकाज घ्यावें. शिखांचा दंगा या प्रांतीं बहुत. फौजेचें बळ पाहिजे. नेहमीं पंधरा हजार फौज, एक मातबर सरदार मर्द माणूस, तिकडे पाहिजे. सांप्रत साबाजी पाटील शिंदे त्या प्रांतीं आहेत. त्यांचे मदतीस नारो शंकर यास ठेवण्याची आज्ञा. त्याप्रमाणें त्यांस सांगितलें. साहेबांच्या हुकमाचें खातरजमेचें पत्र यावें. आज्ञेप्रमाणें वर्तणूक करतील. सांप्रत लाहोर प्रांताचा बंदोबस्त चरितार्थ मात्र केला आणि यथास्थित करणें तो सेवेसीं विनंति लेखन केली. हल्ली शिंदे गंगापार होऊन, बंगाल पटणें या प्रांतीं जावें हाच उद्योग धरून गडमुक्तेश्वरास जातात. मातबर पैका आज्ञेप्रमाणें कर्जाच्या उपयोगी पडे ऐसे कार्य योजोन जात आहेत. उभयतांच्या चित्तांत रात्रंदिवस निदिध्यास हाच की मातबर काम करून खावंदांचा संतोष करावा. हेच चित्तीं रात्रंदिवस जपमाळ आहे. तो सुदिवस इच्छितात. वजिरास समागमें घ्यावयाकरितां अंताजीपंत त्यांजकडे गेले आहेत. सर्व सिद्धिप्रद कार्य करणार महाराजांचा पुण्यप्रताप समर्थ आहे. श्रुत होय ही विज्ञप्ति.' शिंद्यांची ही राजनिष्ठा अत्यंत स्मरणीय आहे.

स. १७५९ त अंताजीपंत एकदांचा पुण्यास गेला. या सालच्या डिसेंबरांत सदाशिवराव त्याच्या कारभाराची झडती घेत होता (३·२३३). अर्थात् दत्ताजीबरोबर तो रोहिलखंडांत नसावा. परंतु अंताजी व त्याचा पुत्र ताल्या आक्टोबरांत दत्ताजीबरोबर रोहिलखंडांत असल्याचा उल्लेख भा. सा. ब. त आहे.

एप्रिलांत दत्ताजीचा मुक्काम कुंजपुऱ्यावर असतां नजीबखान त्यास येऊन भेटला. त्या भेटींत त्या कपटी खानानें शुक्रतालावर गंगेस पूल बांधून देण्याचें कबूल करून उभयतांनीं मिळून सुजा.वर स्वारी करण्यास सुचविलें. जनकोजीस

ही सूचना आवडली नाहीं, पण दत्ताजीनें ती अंमलांत आणण्याचें ठरविलें. गोविंदपंत बुंदेल्यानेंही दत्ताजीस दुजोरा दिला. या वेळीं खानाकडून लांच घेऊन पंतानें त्याचा बचाव केला असें बखरकार म्हणतो (भा. ब.). नजीबखान आयता हातांत आला आहे त्याचा आतां पक्का बंदोबस्त करावा असा जनकोजीचा आग्रह होता, त्याचा दत्ताजीनें अव्हेर केला. नजीबखानानें दत्ताजीस आशेस गुंतवून सहा महिनेपावेतों त्यास कांहीं करूं दिले नाहीं, आणि आंतून सर्व मुसलमानांशीं जोराचीं कारस्थानें करून नोव्हेंबरांत अब्दालीस दत्ताजीवर आणून त्यास कैचींत पकडिलें. गंगानदी हरद्वारावरून दक्षिणेस वाहत येते; तेथून सुमारें साठ मैलांवर मिरापुराजवळ पालखीच्या दांडीसारखें नदीस मोठें वांकण असून त्या वांकणावर शुक्रताल गांव आहे. या ठिकाणी नदीत मोठ-मोठे उंचवटे असून नांवांचा पूल बांधण्याची सोय होती. कुंजपुऱ्यावर यमुना उतरून जून महिन्यांत दत्ताजी गडमुक्तेश्वरास आला. तेथें महिना पंधरा दिवस मुक्काम करून सर्वांनीं तीर्थविधि केले. 'शिदे जसे रणशूर तसेच दानशूर, ईश्वरें अनुकूल दिलें तसे दानधर्म केलें.' एक महिन्यांत पूल तयार होतांच शुक्रताल येथें जावयाचें असा दत्ताजी व नजीबखान यांचा करार होता. बरसाद असल्यामुळें पूल तयार होऊं शकत नाहीं असा जबाब नजीबाकडून दत्ताजीस गडमुक्तेश्वरीं आला. तेव्हां दत्ताजीनें त्यास उलट कळविलें कीं, पूल तयार होत नसेल तर तुह्मीच आह्मांस येऊन सामील व्हावें. ही गोष्ट नजीबानें साफ नाकारिली; आणि पुलाचा कबजा घेऊन तो गंगेपली-कडे बंदोबस्तानें राहिला आहे, असें दत्ताजीस कळतांच, त्याचें कपट उमजून दत्ताजी लगोलग जुलईत शुक्रतालावर आला. नजीकच हस्तनापूर हें ओसाड गांव भारतीय काळचें होतें. शुक्राचार्यांनीं परिक्षितीस भागवत ऐकविलें म्हणून गांवाचें नांव शुक्रताल पडलें अशी दंतकथा आहे. हल्लीं तेथें एक वृक्ष व तीर्थ-कूप मात्र साक्षीस आहेत. त्या ठिकाणीं नजीबखानाचा वकील चेतराम येऊन त्यानें साफ दांडगाईचें उत्तर दत्ताजीस कळविलें. तेव्हां ज्यास्त काल हरण करितां दत्ताजी लगेच नजीबावर चालून आला. तीन चार महिने शुक्रतालच्या

पुलावर मराठे व रोहिल्यांची मोठी झटापट चालून राहिली. उभयतांनीं लोफखान्याची व हातघाईची शिकस्त केली. चढते घोड्यांनिशीं चालोन जाणें तों केवळ असाध्य. कोसपर्यंत उभे राहूं देईनात. खळ्यांचा आश्रय करून तोफांचा व बाणांचा मार देऊं लागले. मागें सरून मिरापुरास डेरे केले. रोहिल्यांचीं अंतर्वेदींतील तमाम ठाणीं घेतली. तेव्हां लोक पळून उत्तरेस तराईत जाऊन राहिले. शुक्रतालच्या गढीत भाद्रपद मासपर्यंत गोळागोळी होत गेली. एके दिवशी गढींतून रोहिले चालून आल्यामुळे जनकोजी व दत्ताजी साथीदारांसह आवेशाने रोहिल्यांत घुसले. जनकोजीची घोडी ठार झाली. हातावर तलवारीची व कानास भाल्याची जखम लागली. दत्ताजीस-ही भाल्याची जखम व गोळी कातरती लागली. लोकांनी दोघांसही उखळून बळे ओढून नेलें. शिंद्यांचे साडेसहाशे खासे मनुष्य कामास आले. बाराशें घोडे ठार पडले, दोन अडीच हजार जखमी झाले. एक सरदार जिवाजी शिंदे व त्याचा मुलगा हणमंतराव ठार पडले. लष्करांत जिकडे तिकडे प्रलय, परंतु नजीबखानास चैन पडूं दिलें नाहीं. तों दसरा आला [१·१०·१७५९, भा. सा. ब. पृ. ५०]. 'नजीबखानाची फौज पुलावरून पलीकडे गेली व त्यानें पूल राखिला' [२·१५३].

चार महिने मेहनत करून नजीबखान जेरीस येईना, तेव्हां गंगेस वर उतार पाहून पलीकडे फौज नेऊन मागून त्यास चेपण्याचा विचार शिंद्यानें केला. सुजाउद्दौला आपणास आडवा येणार नाहीं असें दत्ताजीस वाटत होतें; परंतु हा त्याचा अदमास चुकला. ता. २१·१० रोजीं दत्ताजी हरद्वारास आला. मिरापुरच्या सय्यदांस वश करून त्यांचे साह्यानें जेतागुजर याजकडून हरद्वारास उतार काढून गोविंदपंत, अंताजीपंत व पुत्र तात्या, जिवाजी व नाईकजी भोईटे, व तुकोजी होळकर यांस वीस हजार फौजेसह ता. २२ आक्टोबर रोजीं दत्ताजीनें गंगापार केलें. ही फौज जलालाबादपावेतों आली तों सुजाची फौज व रोहिले सरदार सामन्यास आल्यामुळें, तें सर्व परत फिरून ता.७ नोव्हेंबरच्या पूर्वीच गंगे अलीकडे आले (१·१४१). दत्ताजी बहुधा

रोहिले सरदार व सुजाउद्दौला यांजबरोबर चाललेल्या सलुखाच्या वाटाघाटी केवळ वेळ मारून नेण्यापुरत्या कपटाच्या होत्या. अब्दाली आल्याबरोबर पूर्वीचें सर्व मान एकदम फिरलें. नोव्हेंबर ७ पासून एक महिना पुनः शुक्रतालावर दत्ताजीनें नजीबाचा पाडाव करण्याची शिकस्त करून पाहिली. गंगेपार गेलेल्या फौजा परत आल्या. गंगेचें पाणी उतरल्यामुळें त्या कदाचित् पुनः हरद्वाराकडेच परत उतरल्या नसतील. उमरावगीर गोसाव्यामार्फत सुजास वळविण्याचीही दत्ताजीने शिकस्त केली. एक कोट रुपये मिळवून पेशव्यांचें कर्ज फेडावयाचें याशिवाय दुसरा ध्यास दत्ताजीस नव्हता. सुजानें त्यास आशेस गुंतवून एक महिना शुक्रतालपुढेंच अडकवून ठेविलें. यामुळें दत्ताजीचा सर्वस्वी घात झाला. पाठीमागून अब्दाली व पुढें रोहिले यांच्या कैचींत तो अचूक सांपडला. या वेळीं प्रसंग पाहून मागे सरकून त्यानें ताबडतोब दक्षिणेस जयपुरकडे निघून यावयास पाहिजे होते. परंतु शत्रूस भिऊन पळाल्याचा दुर्लौकिक पदरीं घेण्यापेक्षां मृत्यु पत्करण्याचा निश्चय करून, दत्ताजी दोनही शत्रूंशीं टक्कर देण्याच्या इरादानें, सर्व लहान थोर मंडळींच्या सल्लयाचा अव्हेर करून, दिल्लीच्या बाजूसच चिकटून राहिला. 'दिल्ली उजाड झाली. साबाजी शिंदे व अब्दाली यांची लढाई होऊन हे दरमजलीनीं येथे लष्करी दाखल झाले. सर्व हिंदुस्थान गडबडलें आहे. काल सुरजमल्ल जाठाकडील फौज पांच हजार आली. मल्हारबाकडे सांडणी स्वार व काशीद गेले. तेही सत्वरच येतील. सुजातउद्दौले व रोहिले एक झाले. परंतु गंगापार होऊन त्यांजला येववत नाहीं'. [ता. १० डिसेंबर १७५९, १.१४२-१४३]. एक दोन दिवसांनंतच शुक्रताल सोडून दत्ताजीस मागें अब्दालीचे मुकाबल्यास वळणें भाग पडलें. 'आह्मी येथून बिदा जालों,' असें ता.१२ डिसेंबरास बुंदेले लिहितो. 'येथे फौज फार जमा जाहली. लाहोराकडून तमाम फौज आली. पातशहा वजिराचे कविले आम्यास गेले. पातशहा वजीर येथें येतात. मार्गी दंगा झाला. माणूस निभावत नाहीं. कजिया फार झाला' (१.१४४). ता. ११ डिसेंबरास दत्ताजीनें शुक्रताल सोडून अब्दालीकडे मोर्चा वळविला. कुंज-

पुलावर मराठे व रोहिल्यांची मोठी झटापट चालून राहिली. उभयतांनीं तोफखान्याची व हातघाईची शिकस्त केली. चढते घोड्यांनिशीं चालोन जाणें तों केवळ असाध्य. कोसपर्यंत उभे राहूं देईनात. खळ्यांचा आश्रय करून तोफांचा व बाणांचा मार देऊं लागले. मागें सरून मिरापुरास डेरे केले. रोहिल्यांचीं अंतर्वेदींतील तमाम ठाणीं घेतलीं. तेव्हां लोक पळून उत्तरेस तराईत जाऊन राहिले. शुक्रतालच्या गढींत भाद्रपद मासपर्यंत गोळागोळी होत गेली. एके दिवशीं गढींतून रोहिले चालून आल्यामुळें जनकोजी व दत्ताजी सार्थीदारांसह आवेशाने रोहिल्यांत घुसले. जनकोजीची घोडी ठार झाली. हातावर तलवारीची व कानास भाल्याची जखम लागली दत्ताजीस-ही भाल्याची जखम व गोळी कातरती लागली. लोकांनीं दोघांसही उखडून बळे ओढून नेलें. शिंद्यांचे साडेसहाशे खासे मनुष्य कामास आले. बाराशें घोडे ठार पडले, दोन अडीच हजार जखमी झाले. एक सरदार जिवाजी शिंदे व त्याचा मुलगा हणमंतराव ठार पडले. लष्करांत जिकडे तिकडे प्रलय, परंतु नजीबखानास चैन पडूं दिलें नाहीं. तों दसरा आला [१·१०·१७५९, भा. सा. ब. पृ. ५०]. ' नजीबखानाची फौज पुलावरून पलीकडे गेली व त्यानें पूल राखिला ' [२·१५३].

चार महिने मेहनत करून नजीबखान जेरीस येईना, तेव्हां गंगेस वर उतार पाहून पलीकडे फौज नेऊन मागून त्यास चेपण्याचा विचार शिद्यानें केला. सुजाउद्दौला आपणास आडवा येणार नाहीं असे दत्ताजीस वाटत होतें; परंतु हा त्याचा अदमास चुकला. ता. २१·१० रोजी दत्ताजी हरद्वारास आला. मिरापुरच्या सय्यदांस वश करून त्यांचे साह्याने जेतागुजर याजकडून हरद्वारास उतार काढून गोविंदपंत, अंताजीपंत व पुत्र तात्या, जिवाजी व नाईकजी भोईटे, व तुकोजी होळकर यांस वीस हजार फौजेसह ता. २२ आक्टोबर रोजी दत्ताजीनें गंगापार केलें. ही फौज जलालाबादपावेतों आली तों सुजाची फौज व रोहिले सरदार सामन्यास आल्यामुळे, ते सर्व परत फिरून ता.७ नोव्हेंबरच्या पूर्वीच गंगे अलीकडे आले (१·१४१). दत्ताजी बहुधा

रोहिले सरदार व सुजाउद्दौला यांजबरोबर चाललेल्या सलुखाच्या वाटाघाटी केवळ वेळ मारून नेण्यापुरत्या कपटाच्या होत्या. अब्दाली आल्याबरोबर पूर्वीचें सर्व मान एकदम फिरलें. नोव्हेंबर ७ पासून एक महिना पुनः शुक्रतालावर दत्ताजीनें नजीबाचा पाडाव करण्याची शिकस्त करून पाहिली. गंगेपार गेलेल्या फौजा परत आल्या. गंगेचें पाणी उतरल्यामुळें त्या कदाचित् पुनः हरद्वाराकडेच परत उतरल्या नसतील. उमरावगीर गोसाव्यामार्फत सुजास वळविण्याचीही दत्ताजीने शिकस्त केली. एक कोट रुपये मिळवून पेशव्यांचें कर्ज फेडावयाचें याशिवाय दुसरा ध्यास दत्ताजीस नव्हता. सुजानें त्यास आशेस गुंतवून एक महिना शुक्रतालपुढेंच अडकवून ठेविलें. यामुळें दत्ताजीचा सर्वस्वी घात झाला. पाठीमागून अब्दाली व पुढें रोहिले यांच्या कैचीत तो अचूक सांपडला. या वेळीं प्रसंग पाहून मागें सरकून त्यानें ताबडतोब दक्षिणेस जयपुरकडे निघून यावयास पाहिजे होतें. परंतु शत्रूस भिऊन पळाल्याचा दुर्लौकिक पदरीं घेण्यापेक्षां मृत्यु पत्करण्याचा निश्चय करून, दत्ताजी दोनही शत्रूंशीं टक्कर देण्याच्या इरादानें, सर्व लहान थोर मंडळींच्या सल्लयाचा अव्हेर करून, दिल्लीच्या बाजूसच चिकटून राहिला. 'दिल्ली उजाड झाली. साबाजी शिंदे व अब्दाली यांची लढाई होऊन हे दरमजलीनीं येथे लष्करी दाखल झाले. सर्व हिंदुस्थान गडबडले आहे. काल सुरजमल्ल जाठाकडील फौज पांच हजार आली. मल्हारबाकडे सांडणी स्वार व काशीद गेले. तेही सत्वरच येतील. सुजातउद्दौले व रोहिले एक झाले. परंतु गंगापार होऊन त्यांजला येववत नाही'. [ता. १० डिसेंबर १७५९, १.१४२-१४३]. एक दोन दिवसांतच शुक्रताल सोडून दत्ताजीस मागें अब्दालीचे मुकाबल्यास वळणें भाग पडलें. 'आह्मी येथून बिदा जालों,' असें ता.१२ डिसेंबरास बुंदेले लिहितो. 'येथें फौज फार जमा जाहली. लाहोराकडून तमाम फौज आली. पातशहा वजिराचे कविले आम्यास गेले. पातशहा वजीर येथें येतात. मार्गी दंगा झाला. माणूस निभावत नाही. कजिया फार झाला' (१.१४४). ता. ११ डिसेंबरास दत्ताजीनें शुक्रताल सोडून अब्दालीकडे मोर्चा वळविला. कुंज-

पुऱ्यानजीक यमुना उतरून फौजा अलीकडे आल्या. तेथें गिलचा कुरुक्षेत्रावर आल्याची खबर पोंचली, तेव्हां मुलें, माणसें व जनकोजी शिंदे यांस दिल्लीस पाठवून सडे होऊन अब्दालीस गांठावें ह्मणोन पानपताकडे चालले. हाताखालच्या सरदारांस जोर देऊन लढण्याची शिकस्त करण्यास सांगितलें. ता. २१ डिसेंबर रोजीं बुंदेले लिहितो, 'आह्मी यमुनापार उतरलों. अब्दाली कुरुक्षेत्राहून पंधरा कोसांवर आला. दत्ताजी सडी फौज घेऊन त्याजवर गेले. जनकोजी शिंदे, गाजुद्दीन वजीर व आह्मी राहिलों. अब्दाली न रेटे, तर बुनगे घेऊन आह्मी व रूपराम कटारे दिल्लीवरून चमेलपार करून देऊं. अब्दाली व पाटील बावा यांची लढाई आज अगर प्रातःकाळीं होईल. ईश्वर ज्यास यश देई, त्यास सुखें देऊं[1] (१·१४७). नजीबखानास इकडे असाच गुंतवून अब्दालीची व त्याची गांठ पडूं देऊं नये आणि अब्दालीला एकटाच गांठून त्याचा फडशा उडवावा असा विचार दत्ताजीनें तारांबळींतच केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं.

३. **दत्ताजीचा अजब पराक्रम व वध,** (१०·१·१७६०).—पावसाळ्यांत दत्ताजी रोहिलखंडांत लढत असतां बादशहानें व नजीबखानानें निकडीचीं पत्रें अब्दालीस लिहून त्यास त्वरेनें मदतीस बोलाविलें. अशीं बादशहाचीं स्वदस्तुरचीं पत्रें वजिराचे हातांत पडलीं, तेव्हां अब्दाली आल्यावर पुढें आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून ता. २८ नोव्हेंबर १७५९ रोजी वजिरानें बादशहास साधूचे दर्शनासाठी ह्मणून वाड्याचे बाहेर आणून त्याचा शिरच्छेद करविला आणि मूहि—उल्—मिलात् नांवाचा कामबक्षचा पुत्र होता त्यास शहाजहान सानी[2] असें नांव देऊन तख्तावर बसविलें. परंतु त्या

---

१ **टीप.**—शेवटच्या वाक्याचा सरळ अर्थ, 'ईश्वर कोणास यश देतो पहावें' असा असतां, गोविंदपंताला दत्ताजीच्या पराजयाची पर्वा नव्हती, असा अर्थ राजवाडयांनीं काढिला आहे [१ टीप २१२], तो बरोबर दिसत नाहीं.

२ बहादुरशहाचा मुलगा रफीउश्शान होता, त्याचा मुलगा रफीउद्दौला हाच शाहाजहान सानी असें अबिंद्न सांगतो. एल्फिन्स्टन सांगतो, कामबक्षाचा मुलगा.

घालून दत्ताजीचे समजुतीस पाठविलें. त्यांनीं जाऊन मागें हटण्याविषयीं किंवा निदान कबिले तरी चमेलीपार लावून देण्याची भीड घातली. बरीच भवति न भवति झाली. अपयश घेऊन नानासा०स व भाऊसा०स तोंड काय दाखवावें, हें एकच त्यांचें उत्तर. शेवटीं भागीरथीबाईची प्रसूति नजीक आलेली पाहून, दत्ताजीनें जनकोजीस सांगितलें, 'तुह्मी बाया घेऊन मागें जा. आह्मी येथेंच राहतों.' परंतु जनकोजीनें जाण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां रूपराम कटारी यासमागमे बायकांस देऊन वाटेस लाविलें. दत्ताजी व जनकोजी यमुनेच्या घांटीं अब्दालीवर चालून जाण्याच्या इराद्यानें राहिले. तेव्हां यमुना उतरून मराठ्यांनीं आपल्यावर चालून येऊं नये, ह्मणून अब्दालीनें कांहीं फौज यमुनेवर मराठ्यांचे समोर पाठविली. उभय फौजा एकमेकांचे पुरतेपणीं दृष्टीस पडल्या. गिलच्यांनीं पलीकडच्या कांठचे अनेक भाग उदध्वस्त केले. दत्ताजीनें घांटावरून नदींत हत्ती घालून ठाव पाहिला, परंतु ठाव लागेना. उलट अब्दालीचे लोक नदी उतरून अलीकडे येऊं लागले. तेव्हां जानराव बाबळे व मालोजी शिंदे यांस घांट राखण्यास दत्ताजीनें नेमिलें. पुढें दत्ताजीचें मन दुराणीस पाहून भडकल्यासारखें झालें. नामी नामी हत्ती त्याजपाशीं होते. त्यांस अंदू घालून एकदम अब्दालीशीं लढण्याचा त्यानें हुकूम सोडिला. वजिरानें अशी घाई न करण्याविषयीं पुष्कळ सांगितलें, पण तें त्यानें मानलें नाहीं. हत्तीवर घटका वाजत होती. तीन घटका दिवस आला. तेव्हां संक्रांतीचा तिळगूळ वांटून, सामानसुमान सिद्ध करून अब्दालीवर चालून गेले. हा संक्रान्तीचा दिवस ता. १०·१·१७६० होय.

स. १७४८ पासून दिल्लीसंबंधानें मराठे अब्दालीची झोंबाझोंबी कसकशी रंगत गेली, हें आपल्या डोळ्यांसमोर आहे. गाजीउद्दीननें मराठ्यांची मदत आणावी आणि विरुद्ध पक्षानें अब्दालीस आणावें, हा खेळ कैक वर्षे चालला होता. उभयतांचा उघड व समरासमोर सामना होण्याचा योग हा पहिलाच होय. ता. १०-१-१७६० रोजीं रघुनाथराव बुंदेल्यास लिहितो, 'मल्हारबा व तुम्ही (दत्ताजीवरोबर) एकत्र असतिया पत्रांनीं. वाणित्व उत्तम रीतीनें होईल. पत्रांत

पुऱ्यानजीक यमुना उतरून फौजा अलीकडे आल्या. तेथें गिलचा कुरुक्षेत्रावर आल्याची खबर पोंचली, तेव्हां मुलें, माणसें व जनकोजी शिंदे यांस दिल्लीस पाठवून सडे होऊन अब्दालीस गांठावें म्हणोन पानपताकडे चालले. हाताखालच्या सरदारांस जोर देऊन लढण्याची शिकस्त करण्यास सांगितलें. ता. २१ डिसेंबर रोजीं बुंदेले लिहितो, 'आह्मी यमुनापार उतरलों. अब्दाली कुरुक्षेत्राहून पंधरा कोसांवर आला. दत्ताजी सडी फौज घेऊन त्याजवर गेले. जनकोजी शिंदे, गाजुद्दीन वजीर व आह्मी राहिलों. अब्दाली न रेटे, तर बुनगे घेऊन आह्मी व रूपराम कटारे दिल्लीवरून चमेलपार करून देऊं. अब्दाली व पाटील बावा यांची लढाई आज अगर प्रातःकाळीं होईल. ईश्वर ज्यास यश देई, त्यास सुखें देऊं[1] (१·१४७). नजीबखानास इकडे असाच गुंतवून अब्दालीची व त्याची गांठ पडूं देऊं नये आणि अब्दालीला एकटाच गांठून त्याचा फडशा उडवावा असा विचार दत्ताजीनें तारांबळींतच केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं.

३. दत्ताजीचा अजब पराक्रम व वध, (१०·१·१७६०).—पावसाळ्यांत दत्ताजी रोहिलखंडांत लढत असतां बादशहानें व नजीबखानानें निकडीचीं पत्रें अब्दालीस लिहून त्यास त्वरेनें मदतीस बोलाविलें. अशीं बादशहाचीं स्वदस्तुरचीं पत्रें वजिराचे हातांत पडलीं, तेव्हां अब्दाली आल्यावर पुढें आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून ता. २८ नोव्हेंबर १७५९ रोजीं वजिरानें बादशहास साधूचे दर्शनासाठीं म्हणून वाड्याचे बाहेर आणून त्याचा शिरच्छेद करविला आणि मूहि-उल्-मिलात् नांवाचा कामबक्षचा पुत्र होता त्यास शहाजहान सानी[2] असें नांव देऊन तख्तावर बसविलें. परंतु त्या

---

१ टीप.—शेवटच्या वाक्याचा सरळ अर्थ, 'ईश्वर कोणास यश देतो पहावें' असा असतां, गोविंदपंताला दत्ताजीच्या पराजयाची पर्वा नव्हती, असा अर्थ राजवाड्यांनीं काढिला आहे [१ टीप २१२], तो बरोबर दिसत नाहीं.

२ बहादुरशाहाचा मुलगा रफीउश्शान होता, त्याचा मुलगा रफीउद्दौला हाच शहाजहान सानी असें अबिदुन सांगतो, एलिफस्टन सांगतो, कामबक्षचा मुलगा.

घालून दत्ताजीचे समजुतीस पाठविलें. त्यांनीं जाऊन मागें हटण्याविषयीं किंवा निदान कबिले तरी चमेलीपार लावून देण्याची भीड घातली. बरीच भवति न भवति झाली. अपयश घेऊन नानासा०स व भाऊसा०स तोंड काय दाखवावें, हें एकच त्यांचें उत्तर. शेवटीं भागीरथीबाईची प्रसूति नजीक आलेली पाहून, दत्ताजीनें जनकोजीस सांगितलें, 'तुम्ही बाया घेऊन मागें जा. आम्ही येथेंच राहतों.' परंतु जनकोजीनें जाण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां रूपराम कटारी यासमागमें बायकांस देऊन वाटेस लाविलें. दत्ताजी व जनकोजी यमुनेच्या घांटीं अब्दालीवर चालून जाण्याच्या इराद्यानें राहिले. तेव्हां यमुना उतरून मराठ्यांनीं आपल्यावर चालून येऊं नये, ह्मणून अब्दालीनें कांहीं फौज यमुनेवर मराठ्यांचे समोर पाठविली. उभय फौजा एकमेकांचे पुरतेपणीं दृष्टीस पडल्या. गिलच्यांनी पलीकडच्या कांठचे अनेक भाग उदध्वस्त केले. दत्ताजीनें घांटावरून नदींत हत्ती घालून ठाव पाहिला, परंतु ठाव लागेना. उलट अब्दालीचे लोक नदी उतरून अलीकडे येऊं लागले. तेव्हां जानराव वाबळे व मालोजी शिंदे यांस घांट राखण्यास दत्ताजीनें नेमिलें. पुढें दत्ताजीचें मन दुराणीस पाहून भडकल्यासारखें झालें. नामी नामी हत्ती त्याजपाशीं होते. त्यांस अंदू घालून एकदम अब्दालीशी लढण्याचा त्यानें हुकूम सोडिला. वजिरानें अशी घाई न करण्याविषयी पुष्कळ सांगितलें, पण तें त्यानें मानले नाहीं. हत्तीवर घटका वाजत होती. तीन घटका दिवस आला. तेव्हां संक्रांतीचा तिळगूळ वांटून, सामानसुमान सिद्ध करून अब्दालीवर चालून गेले. हा संक्रान्तीचा दिवस ता. १०·१·१७६० होय.

स. १७४८ पासून दिल्लीसंबंधाने मराठे अब्दालीची झोबाझोबी कसकशी रंगत गेली, हें आपल्या डोळ्यांसमोर आहे. गाजीउद्दीनने मराठ्यांची मदत आणावी आणि विरुद्ध पक्षानें अब्दालीस आणावें, हा खेळ कैक वर्षे चालला होता. उभयतांचा उघड व समरासमोर सामना होण्याचा योग हा पहिलाच होय. ता. १०-१-१७६० रोजीं रघुनाथराव बुंदेल्यास लिहितो, 'मल्हारबा व तुम्ही (दत्ताजीवरोबर) एकत्र असलिया पठाणांचें पारिपत्य उत्तम रीतीनें होईल. पठाणांत

कांहीं बल नाहीं. त्यांनीं मागील वर्षी दहशतही खादली आहे. तुम्ही तेथें शहाणे आहां. हरकसे चार दिवस रंग राखालच ' (१. १५२). अटकेच्या स्वारींत रघुनाथरावानें पंजाबांत असलेल्या अब्दालीच्या फौजेची अनायासें तिरपिट उडविली, त्यावरून आपण त्याचें अवसान जोखलें असें रघुनाथरावास वाटलें. पण हा त्याचा अदमास साफ चुकला. स्वतः अब्दाली कसलेला सेनापति असून युद्धाचे डावपेंच मराठ्यांहून ज्यास्त जाणत होता. स. १७५८ च्या उन्हाळ्यांत इराण्यांनीं त्यास हैराण केलें होतें, पण या सालीं त्याच्या सर्व अडचणी मिटून हिंदी मुसलमानांचें उत्कृष्ट साह्य मिळाल्यानें त्यास जोर आला होता. रघुनाथरावाच्या चुकीच्या अंदाजामुळेंच पेशवा, होळकर व प्रत्यक्ष दत्ताजी थोडे बहुत निर्धास्त राहिले. होळकर तर दत्ताजीचे मदतीस आलाच नाहीं, आणि बुंदेलेही युद्धकर्मांत असला नसला सारखाच. स्वतः दत्ताजी व त्याचे सरदार कसलेले व जिवास जीव देणारे होते.

डिसेंबरच्या अखेरीस बुंदेले लिहितो, ' अब्दाली भारी आहे. त्यास स्वामींनीं मल्हारबास पत्रें पाठवून ते लौकर येत तें करावें, व एक साळसूद सरदार दहा हजार फौजेसह, मुलूख कौलीं न लुटी ऐसा ग्वाल्हेरसमीप पाठवावा. जमीनदारांनी हरामजादगी केली. ऐन हंगामींच बखेडा झाला, ' (१ १'५७). मुसलमानांचा जोर पाहून बुंदेलेसुद्धां मराठ्यांवर उठले. वसूल येईनासा झाला. २सद पांचविणें मुष्किलीचे झालें. माधवसिंगानें मल्हाररावास गुंतवून ठेविलें. बिजेसिग उघडपणे मुसलमानांस साह्य करूं लागला. गोविंदपंताचे कुचराईसंबंधीं राजवाडे अवास्तव बनाव दाखवितात. परंतु पेशव्यास त्याजबद्दल बिलकूल संशय नव्हता. ता. २९-१-६० रोजी पेशवा पंतास लिहितो, ' अब्दाली आल्यामुळें उभयतां शिंदे रोहिल्यांचा कारभार ठेवून गेले. तेच समयीं मल्हारजी होळकरास सामील करून जावयाचें होतें. तें न केलें. मल्हारबांनीं आधीं काम कोणतें करावें, मग कोणतें करावें. माधोसिंगाचा मजकूर काय ! जेव्हां झटलें तेव्हां त्याचें पारिपत्य करतां येईल. तो विचार मल्हारबांनी न केला. दत्ताचा तों ईश्वराच्या घरचे

यमुनेच्या कांठीं दत्ताजीचें शव दहन केलें. तीन हजार रुपये दानधर्म खैरात वांटली. जनकोजीचा पाठलाग कांहीं वेळ शत्रूनीं केला, परंतु तो हस्तगत झाला नाहीं, कारण पुढील सालच्या संक्रातीच्या आहुतीसाठीं त्यास आणखी एक वर्ष इहलोकीं कंठावयाचें होतें. पळत असतां त्यास वेदना अत्यंत होत होत्या. दत्ताजी पडल्याची खबर त्यास नव्हती. बायका वगैरे अगोदरच पुढें चोवीस कोसांवर गेल्या होत्या त्यांस येऊन जनकोजी मिळाला. त्या वेळीं बायका माणसांच्या भेटींत केवढा कल्लोळ व आकांत उडाला असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. दिवाण रामाजी अनंत दाभोळकर व रूपराम कटारी यांनीं सर्वांची समजूत केली, आणि शत्रूच्या भीतीस्तव रेवाडीचे रोखें चालले. धरण फुटल्यासारखें झालें. भागीरथीबाईस महिने भरल्यामुळें पळवेना. तेव्हां कुसाजी शिंदे यास तिच्याबरोबर मागें ठेवून, बाकीची मंडळी दिल्लीहून ऐशीं कोस कोटपुतळी[1] येथें आली. नारोशंकर, साबाजी शिंदे वगैरे मागाहून हळूहळू येऊन सामील झाले. इकडून मल्हारराव होळकरही त्याच ठिकाणीं येऊन शिंद्यांचे मंडळींस भेटला.

अशी ही दत्ताजीच्या वधाची थोडक्यांत हकीकत आहे. नाटकें व कांदबऱ्या लिहिणारांस ह्या प्रसंगांत मुबलक साहित्य सांपडेल. भा. सा. बतील वर्णन अत्यंत हृदयद्रावक आहे, परंतु त्यांत अतिशयोक्तीचा कांहीं भाग आहे. 'ता. २० जमादिलावल (१० जानेवारी) बदाऊंच्या[2] घांटीं युद्ध झालें. पाटिलबावांस मानेवर गोळी लागली म्हणून पत्रें २५ जमा दिलावलीचीं पुरुषोत्तमपंताची आली. सावकारी पत्रांतहीं पाटील युद्धांत गोळी लागून राहिले, असा मजकूर गोविद विश्वासरावाचे पत्रांत आहे. पाटीलबुवा राहिले, आपले फौजेचा भणाण झाला. जनकोजीबाबा कोटपुतळीनजीक सांवर धरून राहिले. तों मल्हारजी होळकर ह्या मुक्कामीं फौजेसुद्धां आले. उदईक भेटी होतील. अब्दालीनें तयमूरशहा पातशहा बसविला. त्याची द्वाही फिरविली. गाजुद्दीनखान लष्करीं आले, याप्रमाणें वर्तमानें आलीं. याजवरून यजमान फार श्रमी' [१·१६५]. दत्ताजी रणांत पडल्यावर

१. अलवारच्या वायव्येस ३० मैल, दिल्लीच्या नैर्ऋत्येस ८० मैल पाटणजवळ.
२ महाजहानाबाद येथें बावळीच्या मैदानावर.—Dr. Burgess.

'बचेंगे तो औरभी लढेंगे', अशा प्रकारचा कुत्बशहा व दत्ताजी यांचा संवाद होऊन, त्याचें शीर कुत्बशहानें कापून नेलें, वगैरे बखरींतील भाग काल्पनिक दिसतो. मोठमोठ्यांचे युद्ध प्रसंगांत असे प्रवाद नाना प्रकारें प्रचलित होतात; आणि या दोन वर्षांच्या पानपतच्या संग्रामांत जो प्रचंड संहार झाला, त्यांत असे प्रकार किती उठले याची गणतिच नाहीं. [रा. खं. १ टीप २३९]. गोबिदपंत बुंदेले बदाऊंच्या घांटावर लढत होता. 'आह्मी बुनगे पावावयास आलों,' असें तो लिहितो [१·१६२]. त्यावरून दत्ताजीस सोडून तो आपल्या जहागिरीवर गेला, असें राजवाडे ह्मणतात तें खरे नाही. 'होणार बलवत्तर तें जालें. मल्हारबाही आज आले. हे दिल्लीकडे जातील व आह्मी रेवाडीपासून इटाव्याकडे येऊं.' असें १२ जानेवारीस गोविदपंत बुणगे घेऊन पळत असतां लिहितो. (१·१५३). कोटपुतळीहून मंडळी चमेल उतरून सबळगडास आली, त्यांस पोंचविण्यास गोविंदपंत होता. 'सबळगडाजवळ चमेल उतरून बुनगे पाठविले. काल मध्यरात्रीं भागीरथीबाई प्रसूत होऊन पुत्र जाला. सबब मुक्काम केला. उदईक पंचमीस कूच करून दर मजलीं येतों, फार श्रम जाले, असे गोविंदपंत ४·३·६० ला जर्नादनपंत एरंड्यास लिहितो. [१·१६२].[1] ह्मणजे सबंध वर्ष पंत मोहिमेवर होता, ह्मणून हिशेब समजून देण्यास जाण्याची त्यास फुरसतच झाली नाही. कुचराई करून हिशेब समजून देण्यास गेला नाही, असें राजवाडे ह्मणतात तें बरोबर नाही.

चंवळ नदीवर दशपिंड करून नदी उतरून मंडळी सबळगडास[2] आली. नदीवर तेरावा दिवस केला.' (भा. सा. ब.) दत्ताजीची उत्तरक्रिया कोटपुतळीसच झाली असावी. उत्तरक्रिया व भागीरथीबाईची प्रसूति भा. सा. बखरकारानें वाचकांचे मनावर परिणाम करण्यासाठी एकत्र आणिली आहे. भागीरथीबाई ४ मार्चला प्रसूत झाली. मुलगा फार दिवस जगला नाहीं.

१. या लेखाची ता. ४ मार्च आहे, ४ फेब्रुवारी नव्हे.

२. सबळगड कुवारी नदी जवळ ग्वालेरशिवपुर रेल्वेवर स्टेशन ग्वालेरपासून ३२ मैलांवर आहे.

पुनरावृत्ति झाली. दत्ताजीस मदत न केल्यामुळें होळकराची एका अर्थी पत जाऊन पानपताच्या अरिष्टाचें कारणही पुढें त्याच्याच माथीं मारलें गेलें. असें हें दत्ताजीच्या मोहिमेचें तात्पर्य आहे.

गोविंदपंत बुंदेल्याच्या उद्योगाचाही रा. राजवाड्यांनीं निष्कारण विपर्यास केला आहे. स. १७५८ त पेशव्याची रजा घेऊन तो बहुतेक शिंद्यांचे बरोबरच उत्तरेंत गेला, तेव्हांपासून १७६० चे अखेरीस मारला जाईपर्यंत तो सारखा सरकारी मोहिमांत खपत होता. तो मूळचा कमाविसदार असून लढवय्या नव्हता, हें सदैव ध्यानांत ठेविलें पाहिजे. स. १७५७ त पुण्यास असतां सदाशिवरावानें हिशेबाबद्दल त्यास पुष्कळ ताणिलें. तो स्वतः पैसे कमावतो व धन्यास कांहीं देत नाहीं, असा त्याजवर आरोप होता. दंग्या-धोप्यांमुळें वसूल होत नाहीं अशी त्याची रड होती. सर्व हिशेब चोख दाखवून आपला खरेपणा सिद्ध करण्यास तयार आहों, असें त्यानें पेशव्यास कळविल्यावर त्यांनीं हिशेब तपासण्याकरितां त्रिंबक कृष्ण कानिटकर व जनार्दन आपाजी एरंडे हे दोन आपल्या भरंवशाचे इसम त्याजबरोबर हिशेब घेण्यास हिंदुस्थानांत पाठविले. ६.५७९ चें ता. २९.८.५८ चें पत्र पंतानें माळव्यांतून लिहिलें, त्यांत या हिशेबाच्याच बाबती आहेत. पुढें ठिकाणीं गेल्यावर शत्रूचा शह वाढत गेला; आणि अंतर्वेदींतील दत्ताजीची व्यवस्था त्यास लावावी लागल्यामुळें हिशेब देण्याचें काम नाइलाजानें लांबणीवर पडलें. ता. २५.७.५९ रोजी तो लिहितो, 'ऐथील वर्तमान तर लोकांनीं हद्द केली आहे. महंमदखान पांच हजार अर्जबाब मागतात, तेव्हां पार उतरून येणार. त्याचप्रमाणें पराशर दादाजीही अडोन बसले. लोकांनी गवगवा केला आहे. लाख रुपये आज येथें द्या तेव्हां पुढें पाय घालूं, असे नाना प्रकारे पेच देऊन घेऊन आम्ही दिक्क झालों. सेगर नदीपार जालों, तेव्हां मागून आले. आज तीन रोज झाले, पाराजीपंतांनीं मोठा अडथळा केला. सर्वांचें एक चित्त असतें तेव्हां कार्य होतें. रुसव्याखालींच दिवस गेले. पुढें काम कधीं व्हावें. मी उमरगडीं[१]

१ टीपः—अंतर्वेदींतून यमुनेला मिळणारी एक नदी. इच्या कांठीं मथुरेच्या पूर्वेस उमरगड व त्या पलीकडे फर्रुखाबाद ऊ० फरीदगड.

'बचेंगे तो औरभी लढेंगे', अशा प्रकारचा कुत्बशहा व दत्ताजी यांचा संवाद होऊन, त्याचें शीर कुत्बशहानें कापून नेलें, वगैरे बखरींतील भाग काल्पनिक दिसतो. मोठमोठ्यांचे युद्ध प्रसंगांत असे प्रवाद नाना प्रकारें प्रचलित होतात; आणि या दोन वर्षांच्या पानपतच्या संग्रामांत जो प्रचंड संहार झाला, त्यांत असे प्रकार किती उठले याची गणतिच नाहीं. [रा. खं. १ टीप २३९]. गोबिंदपंत बुंदेले बदाऊंच्या घांटावर लढत होता. 'आह्मी बुनगे पावावयास आलों,' असे तो लिहितो [१·१६२]. त्यावरून दत्ताजीस सोडून तो आपल्या जहागिरीवर गेला, असें राजवाडे ह्मणतात तें खरे नाहीं. 'होणार बलवत्तर तें जालें. मल्हारबाही आज आले. हे दिल्लीकडे जातील व आह्मी रेवाडीपासून इटाव्याकडे येऊं.' असें १२ जानेवारीस गोविदपंत बुणगे घेऊन पळत असतां लिहितो. (१·१५३). कोटपुतळीहून मंडळी चमेल उतरून सबळगडास आली, त्यांस पोचविण्यास गोविदपंत होता. 'सबळगडाजवळ चमेल उतरून बुनगे पाठविले. काल मध्यरात्री भागीरथीबाई प्रसूत होऊन पुत्र जाला. सबब मुक्काम केला. उदईक पंचमीस कूच करून दर मजलीं येतों, फार श्रम जाले, असे गोविदपंत ४·३·६० ला जर्नादनपंत एरंड्यास लिहितो. [१·१६२].[1] ह्मणजे सबंध वर्ष पंत मोहिमेवर होता, ह्मणून हिशेब समजून देण्यास जाण्याची त्यास फुरसतच झाली नाही. कुचराई करून हिशेब समजून देण्यास गेला नाहीं, असें राजवाडे ह्मणतात तें बरोबर नाही.

चंवळ नदीवर दशपिड करून नदी उतरून मंडळी सबळगडास[2] आली. नदीवर तेरावा दिवस केला.' (भा. सा. ब.) दत्ताजीची उत्तरक्रिया कोटपुतळीसच झाली असावी. उत्तरक्रिया व भागीरथीबाईची प्रसूति भा. सा. बखरकारानें वाचकांचे मनावर परिणाम करण्यासाठीं एकत्र आणिली आहे. भागीरथीबाई ४ मार्चला प्रसूत झाली. मुलगा फार दिवस जगला नाहीं.

१. या लेखाचा ता. ४ मार्च आहे, ४ फेब्रुवारी नव्हे.

२. सबळगड कुवारी नदी जवळ ग्वालेरशिवपुर रेल्वेवर स्टेशन ग्वालेरपासून ३२ मैलांवर आहे.

पुनरावृत्ति झाली. दत्ताजीस मदत न केल्यामुळें होळकराची एका अर्थी पत जाऊन पानपताच्या अरिष्टाचें कारणही पुढें त्याच्याच माथीं मारलें गेलें. असें हें दत्ताजीच्या मोहिमेचें तात्पर्य आहे.

गोविंदपंत बुंदेल्याच्या उद्योगाचाही रा. राजवाड्यांनीं निष्कारण विपर्यास केला आहे. स. १७५८ त पेशव्याची रजा घेऊन तो बहुतेक शिंद्यांचे बरोबरच उत्तरेंत गेला, तेव्हांपासून १७६० चे अखेरीस मारला जाईपर्यंत तो सारखा सरकारी मोहिमांत खपत होता. तो मूळचा कमाविसदार असून लढवय्या नव्हता, हें सदैव ध्यानांत ठेविलें पाहिजे. स. १७५७ त पुण्यास असतां सदाशिवरावानें हिशेबाबद्दल त्यास पुष्कळ ताणिलें. तो स्वतः पैसे कमावतो व धन्यास कांहीं देत नाहीं, असा त्याजवर आरोप होता. दंग्या-धोप्यांमुळें वसूल होत नाहीं अशी त्याची रड होती. सर्व हिशेब चोख दाखवून आपला खरेपणा सिद्ध करण्यास तयार आहों, असें त्यानें पेशव्यास कळविल्या-वर त्यांनीं हिशेब तपासण्याकरितां त्रिबक कृष्ण कानिटकर व जनार्दन आपाजी एरंडे हे दोन आपल्या भरंवशाचे इसम त्याजबरोबर हिशेब घेण्यास हिंदु-स्थानांत पाठविले. ६.५७९ चें ता. २९.८.५८ चें पत्र पंतानें माळव्यांतून लिहिलें, त्यांत या हिशेबाच्याच बाबती आहेत. पुढें ठिकाणीं गेल्यावर शत्रूचा शह वाढत गेला; आणि अंतर्वेदींतील दत्ताजीची व्यवस्था त्यास लावावी लागल्यामुळें हिशेब देण्याचें काम नाइलाजानें लांबणीवर पडलें. ता. २५.७.५९ रोजीं तो लिहितो, 'ऐथील वर्तमान तर लोकांनीं हद्द केली आहे. महंमदखान पांच हजार अर्जबाब मागतात, तेव्हां पार उतरून येणार. त्याचप्रमाणें पराशर दादाजीही अडोन बसले. लोकांनीं गवगवा केला आहे. लाख रुपये आज येथें या तेव्हां पुढें पाय घालूं, असे नाना प्रकारें पेच देऊन घेऊन आम्ही दिक्क झालों. सेगर नदीपार जालों, तेव्हां मागून आले. आज तीन रोज झाले, पाराजीपंतांनीं मोठा अडथळा केला. सर्वांचें एक चित्त असतें तेव्हां कार्य होतें. रुसव्याखालींच दिवस गेले. पुढें काम कधीं व्हावें. मी उमरगडीं[१]

१ टीपः—अंतर्वेदींतून यमुनेला मिळणारी एक नदी. इच्या कांठीं मथुरेच्या पूर्वेस उमरगड व त्या पलीकडे फर्रुखाबाद ऊ० फरीदगड.

तांच हिशेबाचें काम चालेल (१·१३३). पुनः ता. १८·९·५९ रोजीं पंतानें आपल्या मुलास कळविलें, 'जनार्दनपंत आपले चित्तीं संशय मानून रुमाल ठेवून गेले हें कळलें. त्यास आह्मी त्यांसीं दुसरा विचार धरीत नाहीं. कायदे-कानूंन त्यांची काडी इतकी तफावत करीत नाहीं. ते आपले करकून ठेवणार, पुखरूप ठेवोत, आह्मांस त्यांचें वाईट काय! ज्यामध्यें त्यांचें समाधान तें आह्मांस करणें. एक दोन रोजांत आह्मी उमरगडीं येतों' (१·१३४). रोहिल्यांची मोहीम संपली नाहीं, व गोविदपंत मोकळा झाला नाहीं. तेव्हां एरंडे व कानिटकर त्रासून पुण्यास जाऊं लागले [१·१३७], म्हणून पंतानें त्यांची आर्जवें करून त्यांस ठेवून घेतलें [१·१३८]. 'मजला साफ पैशास तफावत करणें नाहीं. दरबारांत नानाप्रकारे नालिशी चुगली करितात. येथून येतांच पैसान पैसा ठिकाणी लावीन. दरबारचा रंग पाहिला. खावंद चौकशी करूं लागला. आतां पैशाचा लोभ धरून मिळविली अब्रू कां गमवावी. आह्मीं भवसमुद्री पडलों आहों. पार करणार ईश्वर आहे. तूर्त जावयाची उतावळी सर्वथा न करणें ' [१·१३८–१३९]. गोविंदपंताचे विरुद्ध काढलेले मुद्दे ले. १४१ त नमूद आहेत. ले. १४२ व १४३ त पंतानें आपली सर्व परिस्थिति मोकळ्या मनानें लिहिली असून, तिजवरून त्याच्या ओढाताणीबद्दल कळवळा उत्पन्न होतो. पुढे अब्दाली अकस्मात् आला, आणि गोविंदपंताचें येणें लांबलें. त्यानंतर दत्ताजी शिंदे मारला जाऊन वाताहत झाली, त्या भानगडीत पंताचे हिशेब तसेच राहिले. स. १७६० च्या मार्चांत जनार्दनपंत एरंड्यास पेशव्यानें तावडतोब पुण्यास बोलवून घेतलें. एप्रिलांत सदाशिवराव पानपतचे स्वारीस निघाला आणि पुढें त्यास गोविंदपंताचा उपयोग घटकोघटकी पडूं लागला आणि अखेरपर्यंत हिशेब देण्यास त्यास सवड आली नाहीं. गोविंदपंतावर काढिलेलीं कलमे इतर पुष्कळ सरदारांस लागू होतीं; आणि सवड झाली त्यांस पेशव्यांनी जाब विचारिले. राजवाड्यांनीं एकट्या गोविंदपंतावर आग पाखडून, त्याचें अक्षर वाईट, त्यास शुद्ध लिहितां येत नव्हतें, असले अप्रयोजक आरोपही त्याजवर केले आहेत [खं. १ टीप २११].

४. शिंदे होळकरांची पोळजत्रा (मार्च-जून १७६०).—पुढें दक्षिणेंतून फौजा येईपर्यंत गनिमी काव्यानें अब्दालीस जेर करण्याचा उपक्रम शिंदेहोळकरांनीं आरंभिला. ते मारवाड प्रांताकडे गेले, तिकडे गिलचांनीं पाठलाग करतांच हे पानिपत कर्नूलकडे गेले. तिकडे दुराणी येतांच हे दिल्लीस आले. मागोमाग दिल्लीस दुराणी येतांच हे आगऱ्यास आले. अविध आगऱ्यावर येतांच हे जयनगर प्रांतीं आले. गनीम केवळ सडे, कावा करून गिलचा जेरीस आणावा म्हणोन उपाय केले. परंतु दुराणीची हिंमत भारी. गनीमच दमास आले. त्या वर्षी सुबत्ता फार होती. हरभरे, गहूं, व गाजरें पुष्कळ, ह्मणून अन्नाची परवा नव्हती. फाल्गुन शुद्ध १५ मेस [१ मार्च] सिकंदऱ्यावर यमुना उतरून तें शहर लुटलें. लष्करांत सामानाची इतकी चंगळ झाली कीं, सर्वांनीं हुताशनी-पूजन करून अन्नपाणी चापून केलें. पुढें अब्दाली आपणांवर चालून आल्याची खबर जाटांकडून लागतांच, सर्वांनी भिळून त्याजबरोबर सामना करावा असें होळकराचें म्हणणें होतें. परंतु जनकोजीनें सांगितले, 'आमच्या फौजेनें दहशत खाल्ली आहे. सबब तुम्हीच युद्ध करा, आम्ही निघून जातों.' तेव्हां गंगाधर यशवंतास लढाईवर पाठवून स्वतः होळकर व शिंदे आगऱ्याजवळ यमुना उतरून तेथील किल्ल्याच्या आश्रयास आले. ता. ८ मार्च रोजी होळकर लिहितो, 'सांप्रत बलवड्यास आलों. एक दों रोजांत कूच करून दिल्लीच्या सुमारें जात असों. अमित्राचें उत्तम रीतीनें पारपत्य होईल. चिंता नाहीं' [६.४०१]. त्यानंतर ता. १ एप्रिलास खालील मजकूर दक्षिणेतून लिहिलेला आढळतो. 'महादजी सिंकदरा मारून चौकोसांवरी राहिले असतां अब्दालीची फौज आल्याची आवई आली. हे खबरदार होऊन, गंगाधरपंत, आनंदराव राम व सटवाजी खराडे यांस फौज देऊन पाठविलें. आपण एकीकडे दहा कोस आले. गंगाधरपंत यमुना उतरून आगऱ्यापाशीं फतियाबाद येथें राहिले. मागाहून मल्हारबाही आले. अब्दाली मथुरेवर आहे. आगऱ्यास येणार. गोष्ट शिंद्यांस व होळकरांस तोलेसी दिसत नाही. श्रीमंतांचें प्राक्तन थोर. प्रसंग विलक्षण दिसतो. [६.४०३].

शिंद्यांचा अभिमान पाहून होळकरासही शहास गुंतणे प्राप्त आलें. एरवीं होळकर मतलबी, ते इतके खराब न होते (भा. ब.). गंगाधर यशवंत व अब्दाली यांच्या फौजेची पळापळीची लढाई एप्रिल व मे या दोन महिन्यांत खूपच झाली. सटवाजी खुराडे, संताजी वाघळे, महिपतराव दिवाण वगैरे सरदार गंगाधर यशवंताचे हाताखाली अंतर्वेदींत अब्दालीचे मुकाबल्यास राहिले. त्यांना दुराणीनें गांठून चकमक सुरू केली. सुमारें हजार पांचशें मनुष्य पडल्यावर, होळकरी फौजेचा धीर सुटून पळण्यास सुरवात झाली. मराठे पळतात हें गिलच्यांस पक्कें ठाऊक होते. म्हणून अगोदरच त्यांच्या पळण्याच्या वाटेवर त्यांनीं फौज ठेविली होती. तिनें या पळत आलेल्या शिपायांची रांगोळी उडविली, व शेंकडों लोक मारिले. पळ आगऱ्यास पोंचतांच मल्हाररावानें व शिंद्यानें पुन्हां आगरा सोडून जयपूरचा रस्ता धरिला. पाठीमागें दुराणी लोक होतेच. याप्रमाणें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं मल्हाररावाच्या फौजेची दोन महिने चांगली पोळजत्रा होऊन लोक आगऱ्यास आले. एक लेखक ह्मणतो, अब्दालीचा भला मोठा खजिना व रसद अफगाणिस्तानांतून येत होती ती अडविण्यास होळकर गेला असतां, शिकंदरा येथें अब्दालीच्या १५ हजार स्वारांनीं त्याजवर एकाएकी छापा घातला. तेव्हां होळकर तीनशें लोकांनिशी जीव घेऊन पळून गेला, आणि त्याचें सामान अब्दालीस मिळालें. पुढे जूनचे आरंभीं यमुनेस पाणी चढून उतार बंद झाला, तेव्हां अब्दालीनें अंतर्वेदींत यमुनेच्या पलीकडे दिल्लीहून सुमारें तीस मैलांवर अनुपशहर येथें पावसाळ्याची छावणी केली. मराठी पत्रांत या छावणीचे नांव कोळजळेश्वर असें आहे. इकडे शिंदेहोळकरांनीं त्याच वेळीं केरोलीच्या बाजूस तळ दिला. वरील लढाईंत होळकराचे सटवाजी खराडे व महिपतराव दिवाण पडले. सटवाजीचा मुलगा शिवाजी मोठा दंड भरून सुटून आला. 'मराठ्यांचा हर्ष उडून गेला. बहुत फिकिरींत पडले, काळ फिरला, जेरीस आले. अब्दालीचा शह सोडून दक्षिणेंत येतां येईना. जाठ मात्र जयाजी शिंद्याचा कुंभेरीवरील उपकार स्मरून वरचेवर साह्य करीत होते.' बाकी सर्व रजपूतसुद्धां मराठ्यांवर उठून त्यांचा बदनक्ष झाल्याबद्दल आनंद मानूं लागले.

वजीर गाजीउद्दीन दत्ताजी पडल्यावर जाठाचे आश्रयास गेला. परंतु तेथें निभाव न लागल्यामुळें दक्षिणेंत येऊन निजामशाहींत व इतर ठिकाणीं कैक वर्षें रानोमाळ गरीब स्थितींत भटकत राहून स. १७९० त सुरत येथें मरण पावला.

प्रकरण तिसावें.

पानपतचा घनघोर संग्राम.

१. पटदुरास सदाशिवरावाची नेमणूक. २. मोहिमेंतील मुक्काम व प्रसंग.
३. बऱ्हाणपुर ते आग्रा. ४. दिल्ली कांबीज [१·८·१७६०].
५. मुक्काम दिल्ली, तहाची वाटाघाट. ६. कुंजपुऱ्याचा पाडाव.
७. पानपतावरील कुचंबणा. ८. पौष शु. ८ ची प्राणाहुति.
९. अब्दालीचें नफा नुकसान. १०. पेशव्याची शेवटची स्वारी.
११. पानपत संग्रामाचा निष्कर्ष. १२. पानपतोत्तर परिस्थिति.

१. पटदूरची वाटाघाट, सदाशि०ची नेमणूक(७ ते १४ मार्च १७६०).– उत्तरेंतील मराठ्यांचा सगळा उद्योग अब्दालीनें झपाट्यासरशीं उखडून दिला, या अनर्थाच्या बातम्या पेशव्यास उदगीर येथील संग्रामाच्या ऐनभरांत जानेवारी फेब्रुवारींत पोंचल्या. शिंदे, होळकर दोघे मिळून अब्दालीस नरम करतील, निदान दक्षिणच्या फौजा येईपर्यंत त्यास अडवून तरी धरितील, अशा अटकळीवर पेशवे निश्चिंत होते. रघुनाथरावासच तिकडे पाठविण्याचा बेत नोव्हेंबरपासूनच नक्की झाला होता. इतक्यांत निजामाचें प्रकरण एकाएकीं हातघाईवर येऊन, आठ पंधरा दिवसांत तें उरकून पुढील विचार करावयाचा, तों त्या प्रकरणांत नोव्हे०पासून दोन तीन महिने गेले. तेवढ्या अवधींत दत्ताजीच्या वधाची हृदयद्रावक बातमी येऊन पुष्कळांच्या तोंडचें पाणी पळालें. जयाजी व दत्ताजी हे दोन पुरुषव्याघ्र राष्ट्रकाजांत कामास आले याबद्दल अभिमान व उद्वेग वाटून, अब्दालीचा सूड घेण्याची प्रवृत्तिही कित्येकांच्या

मनांत उचंबळली. पेशवा अहंमदनगरास असून सदाशिवराव, विश्वासराव व व फौजा उदगिरावर होत्या. त्यांस त्वरेनें पेशव्यानें परत बोलाविलें, आणि हिंदुस्थानचे वाटेवर पटदूर येथें शके १६८१ च्या रंगपंचमीचे दिवशीं (७ मार्च १७६०) सर्वांच्या गांठी पडल्या. नगर, उदगीर व पटदूर यांचा जवळ जवळ त्रिकोण होतो. नगराहून जालनाचे उत्तरेस जाधवांचें सिंदखेड असून तेथून जवळच पूर्णानदीचे कांठीं पटदूर आहे. या ठिकाणीं एक आठवडा अहोरात्र कडाक्याची वाटाघाट होऊन सदाशिवरावास उत्तरेंत पाठविण्याचा निश्चय पेशव्यानें केला. ता. १४ मार्च रोजीं सदाशिवराव पटदुराहून शिवा-लिखिताच्या मुहूर्तानें निघाला, तो बरोबर दहा महिन्यांनीं ता. १४ जानेवारीस पानपतावर गारद झाला.

सदाशिवरावाच्या रवानगीसंबंधानें खालील उल्लेख आढळतात, 'उदगीरहून पुण्यास जावें त्यास, अब्दाली दिल्लीवर चढाई करून आला, त्याजकरितां पातशहाचा फर्मान नानासा० स फौजेविशीं आला, त्याजवरून भाऊ सा० व विश्वासराव यांची रवानगी फौजसुद्धां केली ' [खं. ४ पे. ब. ५३]. रघुनाथ यादवानें चिटणिसांच्या दफात्यांवरून गोपिकाबाईसाठीं मुद्दाम तयार केलेली पानपतची बखर ता. १०·१·१७६३ रोजीं सुरू होऊन १८·२·६३ रोजीं पुरी झाली, अर्थात् ती विशेष ग्राह्य दिसते. तींत असा मजकूर आहे, ' नानासा०स बुद्धि जाहली कीं भाऊसाहेबांस हिंदुस्थानांत रवाना करावें. ते समयीं महा-दाजीपंत पुरंदऱ्यांनीं विनंति केली कीं, भाऊसाहेबांस एकंदर पाठवूं नये. भाऊसाहेबांचे कारभाराचा हावभाव दुसरे कोणास येणार नाहीं. सर्व राज्याचा भार त्यांजवर आहे. ते समयीं नानासाहेबांनीं उत्तर केलें. ' भाऊसाहेबांचे चित्तांत स्वारीस जाणेचें आहे. याजकरितां त्यांस पाठवितों. त्यांचाही मानस फार दिवस आहे.' तेव्हां पुरंदरे बोलले, ' चिमाजीआपांनीं पराक्रम बहुत केला, त्यांचे चिरंजीव भाऊसाहेब लढाईस मागें हटणार नाहींत. शत्रूस पराभवितील किंवा आपण कैलासवासी होतील, त्यांत सहस; अन्यथा नाहीं. याजकरितां, त्यांस पाठवूं नये. त्या समयीं गोपिकाबाईनीं अनुमोदन दि-

की त्यांस रवाना केलें पाहिजे. सबब दृढ निश्चय करून मागील पराक्रम मनांत आणून, अब्दालीस अटकेपार घालवावा हा भाऊसाहेबांचे मनांतील निदिध्यास पाहून, त्यांस व विश्वासरावांस पाठविलें पाहिजे, अशी मसलत करून समागमें प्रमुख नामांकित सरदार देऊन रवानगी केली.' नानाफडणीस या वेळीं अशक्त व लहान होता, तो यात्रेच्या निमित्तानें बायको व मातुश्रीसह स्वारी-बरोबर गेला. भाऊसाहेबांची त्याजवर विशेष ममता होती [का. सं. प. या. ५३]. ता. १६ मार्च रोजीं बाबूराव खेर शिंदखेडाहून गोविंदपंतास लिहितो. 'श्रीमंत अहंमदनगराहून पटदुरास आले. तेथें मोगलांचा उपमर्द करून भाऊसाहेब आले. उभयतां श्रीमंतांच्या भेटी फाल्गुन वद्य ५ स झाल्या. दूर स्वारीस जावयाचें म्हणून या रंगपंचमीच्या दिवशीं तमाम सरदारांसह पटदु-रास रंग खेळण्याचा मोठा समारंभ करण्यांत आला. पुढें आठ रोजपर्यंत खलबत होऊन हिंदुस्थानचे रवानगीचा प्रकार जाहला. श्री. भाऊसाहेबांनीं जावें असा सिद्धान्त होऊन पटदुराहून वा. ११ स कूच करून शिंदखेडास आले. तेथून फाल्गुन वा. १३ स डेरे दाखल जाले. नंतर दोन चार रोज मुक्काम करून, हिशेब अजमास मनास आणून, दरमजलीनें येऊन पोंचतात. पाऊण लाखपर्यंत फौज जमा जाली आहे. पन्नास हजार फौज बरोबर येत आहे, पंचवीस हजार देशीं राहिली. त्रिवर्ग निजामबंधू लबाडी करावयास चुकणार नाहींत म्हणून दादासाहेब पंचवीस हजार फौजेनिशीं ज्येष्ठ मास-पर्यंत गंगा तीरीं राहणार. नानासाहेब दरमजल पुण्यास जाणार. कर्नाटकांत विसाजी कृष्ण बिनीवाले यांची रवानगी झाली. भाऊसाहेबांची सलाबत पुण्य-प्रताप भारी आहे. अब्दालीचें पारिपत्य होतें, कांहीं चिंता नाहीं. समागमें मुत्सद्दी बळवंतराव गणपत, नाना पुरंदरे, महिपतराव चिटणीस, लक्ष्मणराव बक्षाळ, भवानीशंकर, ऐसे येत आहेत. थोरले श्रीमंतांपाशीं सखारामपंत व कृष्णराव पारसनीस ऐसे राहिले' [१.१६८.१६९]. यशवंतराव पवार, आपाजीराव आटोळे, अंताजी माणकेश्वर, समशेर बहादर, नारोशंकर, विठ्ठल शिवदेव वगैरे पुढें येऊन सामील झाले. इब्राहीमखान गारदी बरोबरच होता (खं. २ पृ. ११५).

पानपतच्या भयंकर परिणामाची मीमांसा पुढें कैक वर्षे व अद्यापपावेतों चालू राहून अनेक आख्यायिका, प्रवाद, व कल्पना यांची भर पडून मूळचें सत्य पुष्कळसें लोपून गेलें आहे. रघुनाथराव कर्ज करून आल्याबद्दल त्याचें व सदाशिवरावाचें कडाक्याचें भांडण होऊन, पेशव्यानें सदाशिवरावास मुद्दाम या स्वारीस पाठविलें आणि गोपिकाबाईनें नवऱ्याचें मन वळवून त्याचे जोडीस विश्वासरावास दिलें, असे अनेक प्रवाद आहेत. वास्तविक प्रकार विशिष्ट आधारांनीं सिद्ध होईल तेवढाच जमेस धरून बाकीचा मनांतून सर्वथैव काढून टाकिला पाहिजे. पेशव्यांनीं सर्व साधक बाधक गोष्टींची शांतपणें निरनिराळ्या इसमांशीं वाटाघाट करूनच सदाशिवरावास या स्वारीवर मुख्य नेमिलें. रघुनाथराव कर्ज करून आला एवढ्याचमुळें तो नालायक ठरला असें नाहीं, तर गेल्या सात आठ वर्षांत उत्तरेंत जी अव्यवस्था माजली तीस मुख्य कारण रघुनाथरावाचा नाकर्तेपणा हें या वाटाघाटींत आजपर्यंतच्या कागाळ्यांवरून पूर्ण सिद्ध झालें. मात्र त्याची उघड चिकित्सा या प्रसंगीं सदाशिवरावानें केली. सर्वांस धाकांत ठेवून अनेक भानगडी मिटविण्याचा उरक सदाशिवरावासच होता. युद्धकला, हिशेब, लेखनचातुर्य, धाक इत्यादि बाबतींनीं असलें मोठें काम अंगावर घेण्यास त्याच्या इतका लायक इसम महाराष्ट्रांत दुसरा नव्हता. पेशव्यानें त्यास खर्चासाठीं एक कोट रुपये व मुबलक साहित्य दिलें, याबरून नुसत्या कर्जावरून रघुनाथरावास बाजूस सारिलें हें संभवत नाहीं. पेशव्याचें वैभव या वेळीं उच्च प्रतीचें असून त्यास पैशाची अडचण नव्हती. स्वारीस निघाल्याबरोबर एक एक प्रकरण सदाशिवराव किती नेटानें उरकूं लागला आणि हरएक कामाची व्यवस्था लावण्यांत त्यानें किती श्रम घेतले हें पाहिलें म्हणजे त्याच्या उद्योगाची हद्द वाटते. उलट पक्षी रघुनाथरावासंबंधीं खालील उल्लेख उपलब्ध आहे. 'दमाजी गायकवाड छावणीस गेले. प्रस्तुत दरबारी कारभार दादासाहेबांकडे आहे. दोन प्रहर-पावेतों स्नानसंध्या. तृतीय प्रहरीं कारभार करणार. लोकांचा परिणाम कैसा लागतो ! भाऊसाहेब सर्वज्ञ होते' [२०.३.१७६०; ऐ. ले. सं. १.१४].

सदाशिवराव स्वारीस निघाल्यावरचें हें पत्र आहे. 'रघुनाथरावाच्या नाकर्तेपणाबद्दल नानासाहेबास व भाऊसाहेबास वीट आला व कोणत्याही महत्त्वाच्या कामगिरीवर त्यास पाठविण्यांत अर्थ नाहीं अशी त्यांची खात्री झाली. ही खात्रीपूर्वी अनेकांच्या मनांत होती, ती पटदूरच्या वाटाघाटींत उघड झाली' [१. प्र. पृ. ५९ व टीप २५४]. ज्याच्यापुढें शिंदे होळकरांचा निभाव लागला नाहीं, त्या अब्दालीचा पाडाव करण्यास तशाच निग्रहाचा व रुआबदार इसम पाहिजे होता. अब्दालीसमोर जाण्याचें रघुनाथरावानें आजपर्यंत युक्तीनें टाळिलेंच होतें, आणि पटदुरास त्यानेंही बहुधा हातपाय गाळले असावे. तूर्त कांहीं दिवस पडतें घेऊन मार्गें सरून राहवें, आणि अब्दाली निघून गेल्यावर मग पुढें जाऊन पुनः आपला जम बसवावा, असा एक विचार होता, तो सदाशिवरावासारख्या मानी व शूर पुरुषास बिलकूल पसंत पडला नाहीं. अब्दाली आपल्या हद्दींत चालून आला आहे, अशा संधीस त्याजवर एकदम चाल करून त्यास साफ बुडवावा, आणि कैक वर्षें रेंगाळत राहिलेला मराठशाहीचा उद्योग तडकाफडकी पुरा करावा, अशी योजना होती. शेवटीं उलट परिणाम झाला एवढ्यावरून ती अविचाराची होती असें म्हणतां येत नाहीं. दोनही पक्षांस लहान मोठे गृहस्थ पटदूरच्या वाटाघाटींत होते. सखाराम बापूचा पाठिंबा रघुनाथरावास होता, तर महिपतराव चिटणीस, नाना पुरंदरे, बळवंतराव मेहेंदळे वगैरे सदाशिवरावाच्या बाजूस होते. मात्र उत्तरेंत प्रत्यक्ष मोहिमा केलेले मोठे अनुभवी सरदार तेथें कोणीच नव्हते. सदाशिवरावांत वैगुण्य होतें तें हें की, तो रागीट व आग्रही स्वभावाचा असून, तडजोडीनें वागण्याचा त्याचा कल नसे. तसेंच त्यास उत्तर हिंदुस्थानांतील माणसांची व व्यवहारांची बिलकूल वाकबगारी नव्हती. त्याचा कर्नाटकांतील व निजामाकडील मृदु, वातावरणाचा अनुभव कडव्या पठाणांशीं वागतांना उपयोगी पडणारा नव्हता. यासाठीं स्वतः पेशवा त्याजबरोबर मालव्यापर्यंत गेला असता तर ज्यास्त उपयोग झाला असता असें वाटतें. विश्वासरावास पाठविण्याचें प्रयोजन केवळ त्यास नवीन अनुभव

देण्याचें पेशव्यांचे रिवाजास अनुसरूनच होतें. नुकताच त्यानें उदगीरच्या मोहिमेंत चांगला विजय संपादिला असून, सदाशिवरावाबरोबर राहून त्यानें पुढें राज्यकारभारांत सर्व ठिकाणचा अनुभव मिळवावा, अशी अपेक्षा होती.

मराठमंडळास अब्दालीची दहशत एवढी मोठी पडली होती कीं, त्याजपुढें सामना करण्यास कोणाचाच पाय जोराने निघेना. प्रत्यक्ष सदाशिवरावाची भावना मात्र अगदीं निराळी होती. सरदार कुचराई करितात, हूल उठल्याबरोबर पळत सुटतात, आपमतलबाकडे मन ठेवून राष्ट्रकार्य बुडवितात, तर हिंगणे, बुंदेले, अंताजी माणकेश्वर, नारोशंकर, होळकर इत्यादि मंडळींस वठणीस आणून हातीं घेतलेला उद्योग निकरानें तडीस नेण्याची हिंमत धरून सदाशिवराव बाहेर पडला. हें काम करण्यास तोच तेवढा समर्थ असून सर्वानुमतें त्याचीच नेमणूक झाली. मात्र अंगावर बाजू आली असतां, थोडी माघार घेऊन वेळ निभावून नेण्याचें कसब त्यास नसल्यामुळें, हट्टास पेटून हा घातही करून घेण्यास चुकणार नाहीं, याजबद्दल मात्र पेशव्यास मोठी चिंता होती. याच कारणास्तव प्रयाणसमयी निरोप घेतांना पेशव्यास व छावणींतील तमाम लोकांस मोठें दुःख झालें. ' निघते समयीं गोपिकाबाईनीं विश्वासरावास भाऊसाहेबांचे हातीं दिले. उभयतांस असें झालें कीं, आजच आपण यांस अंतरलो. तमाम लष्कर निरवानिरव करून, एकमेकांचे गळां पडोन निघाले. चांगली फौज, चांगले हत्ती, सरस घोडीं, उंची वस्त्रें, व खजिना घेऊन निघाले. नानासाहेब पुण्यास जाते जाले ' (भा. सा. ब.). एवढी मोठी स्वारी पूर्वी कधीं झाली नव्हती.

स्वारीस निघतांना सरदारांचे रुसवे काढून त्यांचें समाधान करण्यांत आलें. दमाजी गायकवाड अधीं गुजराथ गेल्यापासून डाव्या हातानें मुजरा करीत असे. पानपताहून आल्यावर सगळी गुजराथ देण्याचें अभिवचन सदाशिवरावानें त्यास दिलें, तेव्हां दमाजी पूर्ववत् उजव्या हातानें मुजरा करूं लागला. दमाजीची निष्ठा या वेळीं पेशव्यावर फारच चांगली बसली होती (इ. सं. ऐ. टि. २ ले. ३९). गनिमी काव्यानें पळत सुटल्यास आपल्या तोफखान्याचा

निभाव लागणार नाहीं, अशी हरकत इब्राहीमखानानें दाखविल्यावरून, 'निदानीचा प्रसंग पडला तरी तुह्मांस सोडून निघणार नाहीं, तुह्मी गाडून उभे राहल तेथें मीही उभा राहीन, ह्मणोन त्यास बेलभंडार देऊन त्याजपासून साजकरोटी घेतली. सदाशिवरावाच्या पुढील वागणुकीची मीमांसा करितांना वरील सर्व प्रकार ध्यानांत ठेविले पाहिजेत. एकंदरींत स० रा० स पाठविण्याचा निश्चय पेशव्यानें आवेशाच्या भरांत किंवा बायकोच्या शिकवणविरून केलेला नाहीं.. .अशा प्रकारच्या अनेक बाबतींचा निरास रा. राजवाड्यांनीं पहिल्या खंडांत केला असून त्यांतील महत्त्वाचे मुद्दे सर्व येथें स्वीकारिले आहेत. स्वारींत ब्राह्मण, प्रभु, मराठे वगैरे सर्व जातींचें लोक एक दिलानें सामील झाले होते, यावरून जातिभेदामुळें पानपतचा प्रसंग बुडाला हें ह्मणणें खरें नाहीं. निघाल्याबरोबर स०रा०नें ता.१५·३·६० रोजीं बुंदेल्यास लिहिलें, 'अब्दालीची गरबड झाली, यास्तव लवकर फौजा याव्या, त्यास मोगलांवर जरब बसून कारभार निर्गमांत आला. जहागिरीत अंमल बसला. कोठें कोठें बसणें त्याचा गुंता नाहीं. बऱ्हाणपुरांत अंमल जाहला. शहर हवालीं जहालें. एक दोन स्थळें हवालीं होणें तीं होतील. इकडील मोगलांची गरमी राहिली नाहींच, भागानराकडे जातील. त्यास चिरंजीव रा. दादांनी यावें, परंतु तीर्थरूपांची आज्ञा आम्हींच जावें ही जाहली. त्यावरून फाल्गुन वद्य ११ ता. २५ रजबीं हिंदुस्तानास यावयास निराळे जाहलो. चिरंजीव विश्वासराव बरोबर आहेत. त्यास अब्दालीकडील खबर वरचेवर कळली पाहिजे. तुमच्या ताळुक्याचा बंदोबस्त कसा आहे तें सर्व लिहिणे. मल्हारबा, जनकोजी शिंदे यांजकडील बातमी जलदीनें येत नाही तरी तेथें कोणी ठेवून पाठवीत जाणें. सुजाउद्दौला सर्व प्रकारें स्नेह राखितात. सरदारांनी व चिरंजिवांनी त्यांचे ठायीं ममतेंत अंतर केलें नाही. या दिवसांत त्यांणीं सरदारांचे विचारें अब्दालीचें पारिपत्य करावें, हेच त्यांस उचित आहे. त्यांणी अब्दालीस सामील होणें; अब्दालीची नड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें हें अयोग्य. याचा विचार काय केला असे ! पुढें मातबर फोजेनिशीं खासा स्वारी जलदीनें येऊन पोंचेल, तरी याचा विचार लिहिणें.

त्यांजकडील कोणी इतबारी मातबर वकील हुजूर यावा हें जरूर व्हावें. लिहिल्या-अन्वयें तर्तूदही व्हावी. तुह्मांकडील दोन तीन सालांचे हिशेबाचे झाडे तयार असावे; व यंदां अब्दालीचे गडबडीमुळें रुपया प्रथम मिळणें लांब आहे, त्यास खर्चास रुपयांची तर्तूद जहाली पाहिजे. बाकी किंवा साल मजकूरचा ऐवज कांहीं पुढील ऐवजापैकीं, याप्रमाणें वीस लाख रुपयांपर्यंत तर्तूद करून माळव्यांत पोंचतांच ऐवज कांही येई, कांहीं पुढें येऊन पोहोंचे हें जरूर करणें. रजवाडे व रजपूत उपयोगी असे फौजेनिशीं सामील व्हावे असें करावें. मुख्य गोष्ट बातमी फार जलद चांगली पोंचविणे. तिकडील राजकारणें चार असतील तींही राखून ठेवणें. फार फार कामें करून दाखवावीं हे तुमची उमेद. याप्रमाणें करणें व कराल हा भरंवसा आहे' (१.१६७). या पत्रावरून स० रा० ची तडफ व काम करण्याची शैली व्यक्त होते. या वेळीं सदाशिवराव व अब्दाली यांचें वय अनुक्रमें ३० व ३६ वर्षांचें होतें.

पानपत मोहिमेंतील मुक्काम व प्रसंग, [१४·३·६०—२३·६·६१]—

१४·३·६० गुरुवार प्रयाण; ४·४·६० बऱ्हाणपुरास दाखल.
१०·४·६० हंडिया येथें नर्मदेवर: २८·४·६० सिहोर, भोपाळ, सिरोंज, ओरछा.
१४·५·६० अरुण, मालन, पहारी; २२·५ कालेधार, खेचीवाडा,
अरुण येथें अहिरांचें बंड. नरवर, ग्वालेर.
३०·५ ग्वालेर मुक्काम २ जून प० ४·६ चंबळवर मुक्काम.
८·६ चंबळ पल्लीकडे. गंभीर नदीस पूर, व १५ दिवस तेथें कुचंबणा.
३०·६—४·७ गंभीर नदीचा उतार; ६·७ रविवारीं शिंदे होळकरांच्या भेटी,
१६·७ मथुरा, ३०·७ दिल्ली. मुचकंद तीर्थावर.
१·८ दिल्ली काबीज, मुक्काम १५·१० पा०. १०·१० जवानबख्ताची स्थापना.
१५·१० कुंजपुऱ्यावर चाल; १७·१० कुंजपुरा काबीज.
१९·१० विजयादशमी कुंजपुऱ्यास. २५·१० अब्दाली बागपतावर यमुना
२८·१० कुंजपुऱ्याहून परत गणोर: उतरून अलीकडे आला.
१·११ पानपतावर तळ; २·११ अब्दालीचा एक पराजय;

१५ नोव्हें.–१५ डिसें. अब्दालीवर चढाई करण्याची संधि मराठ्यांनीं घालविली.
२३·११ जिनकोजीकडून अब्दालीचा मोड. ७·१२ बळवंतराव मेहेंदळे कडून पराभव.
२२·१२ गोविंदपंत बुंदेले मृत्यु. २७·१२ पेशव्याचें पैठणास दुसरें लग्न.
१५·१२ ते १४·१ मराठ्यांची उपासमार. ४·१२ पराशर दादाजीचा मृत्यु.
१४·१·१७६१ पानपतचा शेवटचा संग्राम; २४·१ भेलशास पेशव्यास खबर.
४·२·६१ पावेतों सदाशिवरावाचा नक्की शोध पेशव्यास लागला नव्हता.
२१·३ पेशवा परत निघाला. ३·६·६१ पेशवा पुण्यास दाखल.
१८·६ पर्वतीवर मुक्काम. २३·६·६१ पर्वतीवर पेशव्याचा मृत्यु.
पुढील हकीकत समजण्यास हें टांचण उपयोगी पडेल.

गोविंदपंत बुंदेल्याकडे हिशेब घेण्यास पेशव्यानें जनार्दनपंत एरंडे यास पाठविलें. पंत गारद झाल्यावर त्याचे सर्व कागद घेऊन एरंडे परत आला. ते कागद जसेच्या तसे रा. राजवाड्यांस स. १८९७ साली मिळाले आणि लगेच त्यांनीं पहिल्या खंडांत छापून प्रसिद्ध केले; आणि पानपतच्या प्रसंगाची साधार चर्चाही केली. या पत्रांवरून स० रा० च्या सर्वव्यापी उद्योगाची व दक्षतेची खात्री पटते. एका बुंदेल्यास गेलेलीं त्याचीं पत्रें इतकीं आहेत, तर पेशव्यास व दुसऱ्या हजारो इसमांस त्यानें किती तरी पत्रें लिहिलीं असलीं पाहिजेत.

३. बऱ्हाणपुर ते आगरा.—ता. २ एप्रिल रोजीं सदाशिवरावानें गोविंदपंतास लिहिले, ' स्वारी एक दोन रोजी बऱ्हाणपुरास दाखल होईल. तुह्मांकडे बाकीचा ऐवज येणें त्यास पंचवीस लाखांची तर्तूद करून सत्वर ठेवणें; व पांच सहा लाख पुढें आह्मांकडे पाठविणें. वरकड आपल्या ठाण्यांचा बंदोबस्त कसा आहे, तिकडील मंडळी इकडील लक्षानें कोण आहेत, कोणाचें राजकारण कसें आहे, किंवा सारेच तिकडे आहेत, तें तपशीलवार लिहिणें. तुह्मींही युक्ति प्रयुक्तिने राजकारण राखून जे इकडे नसतील ते हाताखालीं घालणें. हिंदुपत वगैरे बुंदेले यांणीं दारूगोळा सरंजाम घेऊन फौजेसुद्धां हुजूर चाकरीस यावेंच हेंही करणें. जरूर डाक बसवून बातमी पाठवीत जाणें. आह्मी मजल दरमजल मधील वाटेनें (ह्मणजे उजाीकडे किंवा पश्चिमेस न जातां),

येतों. आठा रोजीं नर्मदेपार होऊं [१·१७१]. नर्मदापार झाल्यावर ता. १८ एप्रिलला सदाशिवरावानें गोपाळराव गणेशास पत्र लिहून (इ. सं. ए. टि. २·३३). त्यांत पुढील सर्व व्यवस्था व बेत सविस्तर कळविले. गोविंदपंतास धीर देऊन सुजा व पातशहाजादा अलीगौहर यास त्यानें आपल्याकडे वळविण्याविषयीं सांगितलें. त्यानंतर ता. २८ एप्रिलला सिहोराहून बुंदेल्यास पत्र गेलें तें असें, ' तुमचें पत्र प्रविष्ट झालें. अब्दालीमुळें दंगा फार, फौज मातबर आली म्हणजे दबाबानें जाईल, अथवा राहिली तर मातबर झुंज होईल. पन्नास हजार फौजेनिशीं जलदीनें मदत आली म्हणजे इकडील-ही बंदोबस्त होईल, अब्दाली हावभरी झाले आहेत, यामुळें फौजेनें आब टाकला, म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास आम्ही मातबर फौज व तोफखाना गाडदीसुद्धां सिहोरास आलों. इकडील संस्थानिक जमा करून नरवरच्या सुमारें येतों. पुढें जिकडे सोय दिसेल तिकडे जाऊं. माधोसिंग, बिजेसिंग व कोटेवाले राणाजी या सर्वांकडे पत्रें देऊन वकील पाठविले आहेत. सर्व मंडळी इकडील व तिकडील दोही राजकारणांवर आहेत. परंतु आमचे येण्यामुळें एक पक्ष धरून जमा होतील. हे सर्व एक होऊन, मल्हारबा, जाठ यांसहित अब्दालीचें पारिपत्य करावें हाच विचार आहे. त्यास तिकडील बंदोबस्त उत्तम प्रकारें राखून तुम्ही हुजूर यावें. दतियाचे पेचामुळें इकडे यावयास फावेना, तर तिकडील बंदोबस्त उत्तम राखावा. हिंदुपतीकडे शहाणा मातबर कारकून पाठवून त्यास फौजसुद्धां सत्वर लावून देणें' [१·१७४]. पुढे ता. २८ एप्रिलच्या पत्रांत ' चांगले प्यादे मर्द माणूस तीन हजार, झुंजाचे उपयोगी पडे असे, तलाश करून ठेवून पाठविणे. सुजाउद्दौला व फर्रुखाबादवाले अनुकूळ होत असें राजकारण करणें. तिकडे शह असल्यास तुम्हांस राहवें लागेल. शहाणे आहां. ऐवजाविषयी खराबीच लिहिली येते, शत्रू प्रबल यास्तव जरूर तर्तूद करणें, तपशील लिहून न पाठविणे' (१७६). ता. २ मे १७६० रोजीं बुंदेल्यास लिहितो, ' अब्दालीच्या लष्करांतून बातमी यावयाची तुम्हीं तजवीज केली, हें फार उत्तम केलें, त्यास येथें आलियावरी पैका काय

मिळाला, बराबर खर्च त्याचा किती आहे, खासा फौज त्याचे देशची किती, कोण कोण सरदार, किती जुमलेदार, बरकंड रोहिले किती, पायाचे माणूस किती, तोफा किती, कशा आहेत, मुलकांत अंमल कोणत्या जागां कसा आहे, तें कुल वर्तमान बारीक बारीक कळावेंसें जरूर करणें. सटवाजी खराडे व त्याचे पुत्र यांचा शोध करवून बातमी कळाविणें' (१·१७८).

शिंदेहोळकर अब्दालीची दहशत खाऊन स्वस्थ बसले, तेव्हां गोविंदपंत हाच कायतो एकटा इसम उत्तरेंत वावरत होता. तो मूळचा कारकुनी पेशाचा मनुष्य, वसुलाच्या कामास धाक दपटशा दाखविण्यापुरती फौज ठेवून काम करी; परंतु स०रा०नें त्याजवर शक्तीबाहेरची कामें टाकिलीं. तोही वयानें मल्हाररावाचेच जवळ जवळ होता. 'जेथें जातील तेथें माघार घेण्याचाच ह्या दोन म्हताऱ्यांचा विचार' (राजवाडे). पावसाळ्याचे सुरवातीस शिंदेहोळकर करोलीच्या बाजूस छावणी करून राहिले, तेव्हां अब्दाली यमुना उतरून आग-ऱ्याचेही पुढें त्यांचे पाठीवर आला होता, परंतु उन्हाळा न सोसून किंवा दूर जाणें धोक्याचे वाटून अब्दाली अंतर्वेदींत कोळजळेश्वर[1] येथें छावणी करून राहिला. पूर्व प्रघातास अनुसरून उन्हाळ्यांत तो परत जाईल अशी अटकळ होती, परंतु ती खरी ठरली नाही.

ता. ६ मे रोजी स०रा० सुजास कळवावयाचा निरोप पंतास लिहितो. 'हे तयमूरशहाची पातशाही, याचा बंदोबस्त पंतप्रधान करतील. तुह्मीं या गोष्टींत न पडावें, रोहिल्यामुळें हावभरी न व्हावें. पुढे भारी पडेल याचा पुरता विचार करवा. बादजफत्ते दिल्लीतील पातशाहीचा बंदोबस्त तुमचे आमचे विचारें होऊन येईल, तोच केला जाईल' [१·१७९]. 'सुजाकडे मलिकाजमानी गेली आहे ह्मणोन वर्तमान आलें, त्यास त्या उभयतांस पत्रें लिहून पाठविलीं आहेत, तीं त्यांस द्यावीं. सुजास लिहिलें आहे कीं, 'तुह्मीं अब्दालीस साफ लिहून आह्मांकडे तयारी करून यावें. पुढें एक होऊन अब्दालीचें पारिपत्य करून पातशाहीचा बंदोबस्त तुमचे

१ मथुरेच्या पूर्वेस यमुनेच्या कांठी उमरगड म्हणून इटावा परगण्यांत गांव आहे, त्याम लागनच जळेश्वर हल्ली हातरस व तंडला यांच्या दरम्यान रेल्वे स्टेशन आहे.

आमचे विचारेंच होऊन येईल.' या समयीं तुमची कारीगारी काम करून दाखवावयाची आहे. मलकाजमानी तेथें असेल तरी तीस हें पत्र देऊन तिचाही भावगर्भ कळवावा. आह्मीं सिरोंजेस आलों. अहिरांनी फार लबाडी केली. वास्तव कांहीं फौज पाठविली. खेचीवाड्यांतील बाकीच्या रकमा कांहीं उगवून नरवरावरून पुढें जातों. सरदारांचें लिहिलें येईल तसे सारे एक जागां होऊं. माधवसिंग दोहींकडे, राजकारण तिकडेच फार; आह्मांकडे येऊं ह्मणतात. बोलावूं गेलें. बरकडांसही पत्रें गेलीं. येतील ते जमा करीतच आहों. सुजाचें काम ठीक करणें. वरचेवर बातमी चहूंकडील वर्तमान व अब्दालीकडीलही वरचेवर लिहीत जाणें. पेशजी लिहिल्याप्रमाणें दहापासून तीस लाखपर्यंत तर्तूद जरूर करणें. नवीन दोन तीन हजार प्यादे चांगले ठेवून पाठविणें' [१·१८०]. 'पाराशर[1] दादाजी यांच्या फौजेनें शिकस्त खादली, लुटली, नागवली, शिलेदार उठ उठोन जातात, ह्मणोन रा. रखमाजी दादाजी यांनीं विनंति लिहिली, तरी मशारनिल्हेस हुजूर पाठवून देणें,' असें नानासाहेबानें पंतास ता. ७ मे रोजीं लिहिलें [१·१८१]. बुंदेलखंड, अहीरवाडा, खेचीवाडा, रजपुताना, अंतर्वेद येथील बहुतेक राजे व लोक पेशव्यांचे विरुद्ध होऊन पंतास वसूलही देत नव्हते. ता. १४ मे रोजी सदाशिवरावानें लिहिलें, 'अंतर्वेदीतून नावा कुल जमा करून एक जागा कोणाचा उपद्रव नावेस न लागे ऐसे ठिकाणी ठेवणें. स्वारीपुढें आलियावरी आज्ञा होईल त्या ठिकाणी आणावयास येतील. तुमच्या जिल्ह्यांत असतील त्या कुल दक्षिण तीरीं आपले जबरदस्तीखाली जमा करणें. स्वारी अरुण प्रांत खेची येथें आलो. नरवरच्या सुमारे ढवलपुरचे घांटें उतरोन गिलच्यांचे पारपत्यास जातों. हिंदुपत वगैरे बुंदेले येत ते करणें, पैका जरूर पाठविणें. सुजाउद्दौलाचा पुरता भाव शुद्ध पाहून लौकर येतसे करणें. रोहिल्यांकडे तुमची डांक बसलीच आहे, फौज कोण सरदाराची किती, रमजान

---

१. टीप.—दादोपंत वाघ पेशव्यांचा सरदार, साताऱ्याचे बंदोबस्तास पेशव्यानें फौज ठेविली. तिचा मख्य. त्याचा मलगा पाराजीपंत बंदेल्याचे दिमतीस होता.

झाल्यावर उमेद कोणती याची बातमी येईसें करणें. नजीबखान तों अब्दालीच आहे. त्याखेरीज वरकड रोहिले फुटतील तर फोडावे; अहंमदखान बंगसाची निष्ठा तुह्मी फार लिहीत होतां, ते प्रस्तुत जाऊन तेथें मिळाले, त्यांनी व हाफीज रहमतखानांनीं इकडील आश्वासन घेऊन, त्याचा बुद्धिभेद करून माघारें कुच करवावें, आपण निराळें व्हावे, यांत ते वांचून, अब्दाली-नजीबखानांचें पारिपत्य होईल. ते निष्ठा राखतात यास्तव सूचना असावी. करतील तर उत्तम, न करतील तर सरदार जाठ आह्मी एक जालियावर त्यांस पुरते भारी आहों. परिणाम त्यांनी आपला पाहवा. नजीबखान तर मूळच आहे. त्याचें बोलणें प्रमाण नाहीं' [१·१८६]. या गोष्टी बऱ्याच अशक्य कोटींतील होत्या. मलिकाजमानी व नजीबखान यांनी सर्व मुसलमानांची जूट करून अब्दालीची व्यवस्था लावून दिली होती. त्यानें दिल्ली हस्तगत करून मराठी फौजांस ढवलपुर पलीकडे हांकून दिलें होतें. सुजा वैगेरे मंडळी मराठ्यांनीं गाफील राहवें ह्मणून गोड थापा देऊन मनांतील कपट दाखवीत नव्हती; आणि जवळ अब्दाली छातीवर बसलेला असतां त्यांना उघडपणें मराठ्यांस मिळणें शक्यही नव्हतें. मुसलमानांस चार महिने चांगली सवड मिळून सरहिंदपासून थेट काशीपावेतों संपूर्ण प्रदेशांत त्यांनी आपला जम चांगला बसविला होता. आदल्या सालीं पीक उत्कृष्ट येऊन सर्वत्र सुबत्ता होती, त्यामुळें धान्याची, पैशाची व युद्धसामुग्रीची हरएक तजवीज त्यांस निर्वेध राखतां आली. अशा स्थितींत चंबलच्या पलीकडे गेल्याबरोबर मराठ्यांचा पाया सुटत चालला; आणि ते ज्यास्त ज्यास्त शत्रूच्या घेऱ्यांत येत चालले. अर्थात् (१) शत्रूच्या ताब्यांतील मुलखांतून गोविंदपंतानें वसूल पाठविला नाहीं, (२) धान्याची रसद पोंचविली नाही, (३) नांवा तयार ठेविल्या नाहींत, (४) सुजास आपल्या बाजूस वळविलें नाहीं, आणि (५) अब्दालीस व रोहिल्यांस अंतर्वेदीतून पायबंद दिला नाहीं, हे पांच आरोप राजवाड्यांनीं पंतावर आणिले आहेत. परंतु वरील परिस्थितींत प्रत्यक्ष सदाशिवराव तरी हीं कामें करूं शकला असता की नाहीं याचा संशयच वाटतो. यमुनेच्या पलीकडे इटावा वैगेरे दक्षिण बाजूची

कांहीं थोडी ठाणीं मराठ्यांचीं होतीं तीं पंतानें व जाठांचीं कांहीं फौज पावसाळ्यापूर्वीच पलीकडे गेली होती तिनें सांभाळून धरलीं हेंच मोठें भाग्य समजलें पाहिजे. रजपूत व जाठ हे तरी मनापासून मराठ्यांचें हित चिंतिणारे नव्हते. दोन बलवान शत्रूंच्या दरम्यान असली लहान मंडळी नेहमींच दोन दगडांवर हात ठेवून असावयाची. खरें झटलें तर शिंदे होळकरांच्या पाडावाने मराठ्यांचा अंमल सर्वत्र उठला होता, आणि प्रथम अब्दालीस हांकून दिल्याशिवाय तिकडून कांहीं एक लभ्यांश होण्याजोगा नव्हता. कराकुडाचा कारभार गोपाळ गणेश बर्वे व गणेश संभाजी खांडेकर[1] यांजकडे होता, परंतु हे दोघे गोविंदपंताहूनही भित्रे व अकुशल होते. एकंदरींत अंतर्वेदींतील मराठ्यांचा अंमल केवळ नामधेय असून फक्त कराकुडाचा लहानसा भाग पंत संभाळीत होता. गंगा यमुना अलाहाबादेजवळ संगम पावतात, त्यांच्या अंतर्गत जो हल्ली फत्तेपुर जिल्हा आहे, त्यासच कराकुडा झणत. तो व त्यावरचा कोळजळेश्वरपर्यंतचा सुभा गोविंदपंत सांभाळीत होता. त्याच्या पुढचा उत्तरेकडील सर्व अंतर्वेद प्रांत हिमालयाच्या पायथ्यापर्यंत रोहिले व अब्दाली व्यापून बसले होते. ता. ५ मेला स०रा० लिहितो [१·१८७], 'रामगड जाठाचा घेऊन पुढें अंतर्वेदींत अंमल करणार म्हणों, तर आम्ही सिरोंजेस आलों. मातबर फौज व तोफखाना गाडदी व दोनही फौजा सरदारांच्या व जाठ इतके येथें गाडून उभे राहून चालून घेऊं, तेव्हां अब्दालीच्यानें दम धरून उभें राहणें व तोफांचे माराखाली बाहेर येणें कळतच आहे. सुजाउद्दैला सर्व प्रकारें स्वामीची फत्ते इच्छितात म्हणोन लिहिलें. तर हेंच त्यास योग्य आहे. सरदारांनीं त्याजकडे वकील त्यांची निशा व्हावी झणोन पाठविले आहेत, तेही पोंचले असतील. अंतर्वेदीतील अंमल जबरदस्तीने राखला तसाच राखावा. आमचे येण्याची आवई तेथें गोलियानें ते घाबरे होऊन आपला देश जवळ करावयाची तजवीज करीत असतील, त्यास बारीक खबर राखून लिहिणें, बंगल्याकडील खबर राखोन लिहीत जाणें. बंदोबस्ताची खातरजमा असेल तर तुम्ही फौजसुद्धां चमेली कांठी येणें.' केवळ आवईनें अब्दाली निघून जाईल अशी

१ टीप.—होळकर थैली,—(श्री. वि. आठल्ये).

समज होती ती बरोबर नाहीं. ठांसून सामना करण्यासाठींच तो बंदोबस्तानें होता. अशीं अनेक पत्रें पंतास लिहिलेलीं आहेत. सर्व फौजा चमेलीवर एकत्र व्हाव्या असा स०रा०चा बेत होता. 'ऐवजाचा बोभाट लिहिला तो खराच आहे, परंतु तूर्त ओढ फार असल्यामुळें पांच सात लाख सत्वर पावते करणें.' [१·१८८]. अलीगौहर यास पातशहा करून सुजास त्याची वजिरी द्यावी असें बोलणें कायम करण्याकरितां श्यामजी रंगनाथ यास स०रा०नें सुजाकडे वकिलीस पाठविलें. 'अब्दालीची लष्करची बातमी तपशीलवार लिहून पाठविली ती कळली. याच प्रकारें बारीक मोठें वर्तमान लिहिणें.' (१·१९१). इटाव्याच्या ठाण्यास रोहिल्यांनीं येऊन वेढा घातला असें सदाशिवरावास परस्पर कळलें. हें एकच महत्वाचें ठाणें गोविंदपंतांचें असून, त्याचेखालीं कुरा येथें ठाण्यांत गोपाळराव बर्वे होता. ठाणें मजबुदीनें राखण्याबद्दल सदाशिवरावानें मेच्या अखेरीस ग्वाल्हेरहून पंतास लिहिलें. ता. ३० मे रोजीं सदाशिवराव ग्वाल्हेरीस पोंचला. ग्वाल्हेरहून आग्रा ७२ मैल. आग्र्यापर्यंत पोंचण्यास ता. १० जुलई आली. 'रोहिले दहा हजार फौज आहे, तोफा नाहींत. उगेच आवईनें ठाणीं पळतात, हें कामाचें नाहीं. तर्तूद करोन इटावें राखणें, पंधरा रोजांत तर्व फौजा एक होऊन फडशा होईल. तुमची बातमीचीं पत्रें वारंवार आलीं तीं पावलीं. अंताजी माणकेश्वराची कमावीस दूर करून तुम्हांस जप्ती सांगितली आहे, तरी जप्ती करून ऐवज सरकारांत जमा करणें.' [१·१९४ व अ).

सदाशिवराव मोठ्या फौजेनिशीं चालून येतो असे समजतांच अब्दाली व रोहिले यांनीं जोरानें उचल केली. 'नजीबखान व अब्दालीचा जहानखान वाढोन आले त्यांचे पारिपत्याची तजवीज होऊन येईल. तुम्हीं आपले ठाणेदारांस ताकीद करून, निकड पडल्यास चांगले तऱ्हेनें झुंजत, केवळ दुरील आवईनें ठाणीं टाकून पळोन न जात, ऐसें करणें. ठाणें टाकून पळतील, त्यांचें पारिपत्य उत्तम प्रकारें करावें. झुंजून मरावें हेंच बरें आहे, तेव्हांच इकडील ही कुमक चांगली पोहोंचून शह बारेल. आम्ही ढवळपुरचे खालीं चार पांच कोशांवर चमेल उतरून सरदारांकडे जाऊं. सरदारही मथुरेचे सुमारें येतील.

सर्व मिळोन यमुनापार होऊं अगर तुम्हांअडे फौज पाठवूं. इत्याद्यासारखे ठाण्यांतील कमावीसदार पळतात अपूर्व आहे.' जूनचे आरंभीं हाफीज रहमतखान येऊन स० रा० स भेटला. नुसत्या थापा देऊन त्यास बेसावध करण्यापलीकडे त्याचा उद्देश नव्हता. तिकडे अब्दालीनें अलीगौहरास पातशाही देऊं करून वजिरी सुजास दिली आणि मराठ्यांचे विरुद्ध बळकट कारस्थान केलें. यावरून सुजाचा हेतु कळतो. त्याचे मातुश्रीचा व गोविंदपंताचा घरोबा होता. म्हणून तिच्या मार्फत सुजास बोध करावा असें स० रा० नें पंतास लिहिलें [१·१९६]; आणि यमुनापार होण्यास नांवा पाहिजेत त्या सर्व जमवून तयार ठेवाव्या असें त्यानें पंतास व यशवंतराव कोन्हेरास लिहिलें (१·१९८ व३·२२३). नांवासंबंधानें एकट्या पंतावरच सदाशिवरावाची भिस्त नव्हती. इतरांसही त्यानें अनेक ताकिदी दिल्या, परंतु शत्रुमुलखांत तजवीज होऊं शकली नाहीं. ता. १०·६·१७६० रोजीं सदाशिवराव लिहितो. ' आम्ही चमेल उतरलों. आग्रें १८ कोस आहे. एक दों दिवसांत सरदार व आम्ही एक होऊन यमुनापार उतरावयाची तजवीज करणार. नजीबखान व जहानखान यांणीं इटाव्याहून कूच केलें, कोळेकडे येतात अशी खबर आहे. तुम्ही, गणेश संभाजी, बाबूराव कोन्हेर, अब्दाली कोळेहून यमुना उतरून अलीकडे येऊं लागले तरी, अंतर्वेदींत सर्वांनीं उतरून पायबंद द्यावा. कदाचित् दिल्लीकडे चालला तरी सहजच ठाणीं सुटतील. सुजाउद्दौल्यांनीं त्याकडे न जावें, दम धरावा.' [१·२००]. ११ जुनला ऐवज न पाठविल्याबद्दल सदाशिवरावानें पंतावर ताशेरा झाडला आहे. हाफीज रहमत नुसता सदाशिवरावासच भेटला नाहीं, तर अब्दालीच्या मार्फत सरदारांशीही राजकारण करीत होता. सलुखावर घालवून, एकदम आपणावर मराठ्यांचा हल्ला न यावा, एवढीच अब्दालीची या वेळीं खटपट होती. या वेळींच त्वरा करून यमुनापार फौजा झाल्या असत्या तर कदाचित् अब्दालीचा नाश झाला असता; कारण त्यांचीं सर्व कारस्थानें अद्यापि परिपक्व झालीं नव्हतीं, आणि नजीबखानाचें व त्याचें पैशावरून बरेंच वांकडें आलें होतें. ' अब्दाली उपरी, किती दिवस पुरवेल,

आम्ही नेहमीं आहों, सर्व अर्थ नरम गरम होऊन सुजाचें जाणें अब्दालीकडे न होईं तें करणें' [१९ जून, १·३०४]. शिंद्यांकडून भिकारीदास नांवाचा वकील सुजाकडे होता. सुजाकडील कारस्थान गोविंदपंताचे मार्फत जुळेना, तेव्हां सदाशिवरावानें रामाजी अनंत व नारोशंकर यांस सुजाकडे पाठविलें, परंतु तेही कांहीं उपयुक्त करूं शकले असे दिसत नाहीं [१·२०८]. कोळजळेश्वराच्या वरती राहून अब्दालीनें नजीबखान व जहानखान यांस मराठ्यांचीं ठाणीं मारण्यास व सुजास घेऊन येण्यास पाठविलें. मराठ्यांची फौज आगऱ्याजवळ येतांच, नजीबखानास इटाव्यास राहणें धोक्याचें वाटून तो परतला. पुढें अब्दाली-ही आगऱ्याचे बाजूस मराठ्यांचे समोर यमुनेच्या पलीकडे येऊन त्यांजवर नजर ठेवूं लागला. [१ टी. २९०]. या वेळीं गोविंदपंत इटाव्याचे पूर्वेस कनोज फफुंदच्या बाजूस होता. सदाशिवरावाची व त्याची भेट अशी झालीच नाहीं. मरण पावल्यावर त्याचें शीर मात्र अब्दालीनें सदाशिवरावाकडे पाठविलें. या सालीं पावसाळा जरा लवकर सुरू होऊन नद्या सर्व भरून गेल्या. त्यामुळें सबंध जून महिना सदाशिवरावाचा फुकट गेला. ता. ८ जुनला तो चंबळच्या उत्तरेस गेला, आणि पुढें आगऱ्यास पोंचण्यास जवळ जवळ महिना लागला. गंभीर नदी पलीकडे मुचकुंदतीर्थावर (भा. सा. ब.). रविवार ६ जुलईस त्याची व सरदारांची भेट झाली [१·२१७ अ]. सरदारांच्या गांठी पडल्यावर दोन्ही फौजा एकवटल्या, आणि सर्वांस प्रेमाचें मोठें भरतें आलें. दत्ताजी पडल्याबद्दल जनकोजीची दरबारांत समजूत करून, त्यास मोठ्या सन्मानानें सदाशिवरावानें सरदारीचीं वस्त्रें दिली. अशा दरबारांत पेशव्यांच्या ठिकाणीं विश्वासराव मुख्य असे. विश्वासराव व जनकोजी यांची अप्रतिम जोडी पाहून प्रेमपूर उत्पन्न झाल्या शिवाय राहत नसे. दोघेही समवयस्क व सुंदर असून, स्वभावानें गोड, विनयशील, सदाचरणी व अभिमन्यूसारखे शूर होते. ते एकमेकांस जीवश्चकंठश्च समजत.

पावसामुळें गंभीर नदीस पाणी फार येऊन वाटेंत मुक्काम झाले. ही लहानशी नदी चंबळचे उत्तरेस दहापंधरा कोशांवर तिला समांतर अशीच वहात,

बाणगंगेसह पुढें यमुनेस मिळते. १० जुलईपर्यंत सदाशिवराव आगऱ्यास पोंचला नव्हता. पण पुढें आगऱ्यास न थांबतां सरदार व जाठ यांसह १६ जुलईस सर्व फौज मथुरेस दाखल झाली. आगरा ताब्यांत घेऊन तेथें मुलें माणसें ठेवण्याची सिद्धता करून मग मथुरेस गेला असे बखरींत आहे. मध्यंतरीं सुजाउद्दौला अब्दालीकडे जातो, शहाजादा कोणाकडेच न जातां बाहेर तटस्थ राहणार, अशी बातमी पंतानें सदाशिवरावास दिली. हिशेब व पैसे पाठविण्याबद्दल पंतास तगादा होताच. सुजा अब्दालीस मिळाल्याची खबर कळतांच 'त्याचे प्रदेशांत थेट काशीपर्यंत दंगा उसळून द्यावा व तुह्मीं अंतर्वेदींत रोहिल्यांवर यावें, आम्ही इकडून यमुना उतरून त्याजवर येतों,' असें सदाशिवरावानें पंतास लिहिलें. आगऱ्याचे समोर यमुनेपार सकुराबादचें ठाणें अब्दालीनें घेतलें होतें तेंही परत घेण्यास सदाशिवरावानें सांगितलें. जाठांची कांहीं फौज यमुनेपार येऊन तिनें हें ठाणें हस्तगत केलें [१० जुलई १·२१६], आणि येथून जाठाची मदत पुढें गोविंदपंतास होतच होती (१·२४४). मात्र सदाशिवरावाला गंभीर नदी ओलांडण्यास महिना लागला व यमुनेस उतार नव्हताच. यामुळें आरंभींचा अब्दालीवर एकदम चालून जाण्याचा बेत त्यास सोडून द्यावा लागला, आणि प्रथम दिल्ली घेऊन नंतर अब्दालीस कोंडावें असा बेत ठरला. असें करण्यांत मराठे आपल्या पायापासून दुरावत गेले.

४. **दिल्ली काबीज** (१·८·१७६०).—आग्रा येथें बायकामुलें ठेवण्याचा बंदोबस्त करून सदाशिवरावानें मथुरेकडे चाल केली तेव्हां नदीपलीकडून अब्दालीही फौज घेऊन तयारीनेंच चालूं लागला. यमुना दुथडी भरून जात असल्याकारणानें एकमेकांस भिडण्याविषयीं दोघांचाही नाइलाज होता. याच सुमारास म्हणजे ता. १० जुलै रोजी (?) सुजाउद्दौल्यानें आपलें वजन या दोघांच्या सामन्यांत अब्दालीच्या बाजूस टाकिलें. ही गोष्ट नजीबखानाच्या कारस्थानानें सिद्ध झाली. नजीबखान कानपूर बिठुरापर्यंत सामोरा जाऊन सुजाउद्दौलाचें मन त्याच्या आईच्या विरुद्ध आपल्याकडे वळवून त्यास घेऊन अब्दालीच्या फौजेस मिळाला. सुजाचा दर्जा फार मोठा, त्याप्रमाणें त्याचें

मानमरातब ठेवला जाईल अशी हमी नजीबखानानें घेतली होती, त्याप्रमाणें अब्दालीनें सुजाचा मान राखिला. मराठ्यांच्या व मुसलमानांच्या फौजेंत तफावत होती ती सुजा आल्यानें भरून निघाली असें म्हणतां येईल. मथुरेस आल्यावर याच वेळीं अधिक श्रावणमास असल्यानें सर्वांनी तेथील यात्रा स्वस्थपणें व निर्विघ्नपणें सिद्धीस नेली. समोरच्या तीरावर अब्दाली होता, त्याची यत्किंचित् पर्वा कोणास वाटली नाहीं. मथुरावृंदावनांतील तीर्थांचें व देवदर्शनांचें सुंदर वर्णन नानाफडणिसानें केलें आहे (का. सं, प. या. ५३). याच ठिकाणीं भरतपूरचा राजा सुरजमल्ल जाठ शिंदे होळकरांच्या मध्यस्थीनें सदाशिवरावाच्या भेटीस आला. त्यास एक कोस सामोरें जाऊन सदाशिवरावाने त्याचा बहुमान केला, आणि हत्ती घोडे वगैरे नजर करून त्याची मदत संपादन केली. एकमेकांस अंतर न देण्याविषयीं उभय पक्षीं यमुनेच्या उदकाने आणभाक झाली. जाठानें आपली फौजही बरोबर आणली असून मराठ्यांच्या सर्व फौजेस रसद पोंचविण्याची त्यानें हमी घेतली. येणेंप्रमाणें सदाशिवराव व अहंमदशहा अब्दाली यांनीं दिल्लीच्या पटावर बुद्धिबळाचा प्रचंड डाव आरंभिला.

ता. १६ जुलईस स० रा० लिहितो. 'पुढील कर्तव्यार्थ करीतच आहों. पलीकडे उतरावें तर नदीस पाणी फार, त्यांत दोन तीन हजार जाठ फौज पार उतरली. मानाजी पायगुडे वगैरे सरकारी पथके उतणार. हे पलीकडील ठाणीयांचा बंदोबस्त करतील. अब्दाली मातबर फौज घेऊन इकडील शहारास येणार. यास्तव तुम्हीं फार सावध राहणे. ठाण्यांचा बंदोबस्त उत्तम ठेवणें.' [१.२१७]. मथुरेस गेल्यावर यमुनेस उतार मिळेना, तेव्हां सर्वांनी मिळून प्रथम पुढें जाऊन दिल्ली काबीज करण्याचा विचार ठरविला. सरदारांच्या भेटी होऊन पुढील उपक्रम ठरला तो हाच होय. सदाशिवरावानें मोठी फौज घेऊन ग्वाल्हेरच्या पुढें येऊं नये म्हणून कडाख्याचे वाद विवाद सरदारांचे व त्याचे वर्णिलेले आहेत ते सर्व काल्पनिक व संग्राम होऊन गेल्यावर रचलेले दिसतात. एवढा मोठा प्रलय पानपतावर झाला, तेव्हां पुढें कैक वर्षे नानातऱ्हेच्या आफवा व कल्पना पसरल्या व आधुनिक ग्रंथकारांनीं त्या जशाच्या तशा स्वीकारिल्या, त्याचा हा

परिणाम असावा. मोठ्या फौजा इकडे तावडतोब पाठवा, कोणी तरी खास आला पाहिजे अशी जोराची मागणी बुंदेले वगैरे मंडळीकडून पेशव्यांकडे जात होती; आणि शिंदे होळकरांचें व बुंदेल्यांचें नेहमीं मतैक्य होतें. जनानखान्या ग्वाल्हेरच्या पुढें आणूं नये अशी मात्र सरदारांची सांगणी होती. जनानखान्यामुळें दत्ताजी शिंद्याचा घात झाला आणि स०रा०चाही घात होण्यास हेंच मोठें कारण झालें. मात्र हा जनानखाना अगदीं लहान १०।५ बायकांचा होता.

मथुरेस आल्यावर लगेच दिल्लीवर जाऊन तें शहर काबीज करण्याचा विचार सदाशिवराव व सरदारांनीं ठरविला. त्यासाठीं शिंदे होळकर व बळवंतराव गणपत मेहेंदळे पुढें ता. २२ ला दिल्लीवर गेले. त्यांनीं लगेच शहर घेतलें ' किल्ला ही सत्वरच घेतील. आम्हीही मजलदरमजल तेथें जातों, अब्दालीचे मनांत देशांत जावें, लढाई एकंदर पाडूं नये, एक वाटा त्याची देशची फौज गेली, दोन वाटे राहिली आहे, सुजाचें मतें आपले हातें अब्दालीचा व श्रीमंतांचा तह करावा, म्हणजे आम्ही सर्व ठीक करून अब्दालीस देशीं लावून देऊं, अशीं पत्रें सुजाचीं पंतास आलीं व पंतानें त्याजबद्दल सदाशिवरावाकडे खुलासा विचारला, तेव्हां दिल्लीस गेल्यावर खुलासा देऊं असें सदाशिवरावानें पंतास कळविलें. (ता. २८ जुलई, १·२२२). दिल्लींत पठाणांची फौज एक हजारापर्यंत होती. दुराणीचा वजीर शहावल्लीखान याचा भाऊ, याकूबअलीखान त्यांचा मुख्य होता; आणि दत्ताजी शिंदे पडल्यावर तें शहर व किल्ला अब्दालीनें हस्तगत केला होता. सरदारांनी व बळवंतराव मेहेंदळ्यानें शहर हस्तगत केलें. त्यानंतर लगेच मराठ्यांचे शें पन्नास लोक किल्ल्यांत शिरले, परंतु ते लुटीस गुंतल्यामुळें किल्लेदारांनीं सावध होऊन बाहेर काढिले. तेव्हां मराठ्यांनीं किल्ल्यास मोर्चे लाविले. खंदकावर मोर्चे कायम करून इब्राहीमखानानें तीन तोफांचा मार दिल्हा. युरोपीय तोफखान्याच्या जोरापुढें एक एक बळकट बुरूज धडाधड कोसळून पडूं लागले, तेव्हां अब्दाली पलीकडे समोर होता, परंतु मदत करतां येईना. किल्ला खालीं करून दिल्यावर याकुबअलीस व सर्व मुसलमान कुटुंबांस मराठ्यांनीं सुरक्षित बाहेर जाऊं दिलें. ते ३ ऑगस्ट रोजीं अब्दालीस

मिळाले. 'जागा फारच बेश, मजबुदीची आहे. सुजाउद्दौले जवळच यमुनेच्या पैल तीरीं येऊन उतरले आहेत, गोड बोलतात. होईल वर्तमान तें लिहिलें जाईल.' 'ऐवजाविशीं वारंवार लिहून भागलों. पैक्याची तर्तूद होऊन येईना हें कामाचें नाहीं.' सुजाची उमेद अब्दालीस कळली. दिल्ली घेतल्यामुळें कमर तुटली. लढाई तर पाण्यावर तहकूब आहे. तोंपर्यंत फुटाफुट करणें ते करितों.' (ता. २ ऑगस्ट १७२४) दिल्ली काबीज केल्यावर मुसलमानांची जूट फोडण्याचे मार्गास सदाशिवराव लागला. तूर्त दोन महिने मुक्काम दिल्लीस करून हेंच काम त्यानें केलें, परंतु तें सिद्धीस गेलें नाहीं. अब्दालीस हाकलल्याशिवाय जूट फुटणारी नव्हती.

दिल्ली हस्तगत केल्याबद्दल मराठ्यांस व विशेषतः सदाशिवरावास अवर्णनीय आनंद झाला. मराठ्यांच्या सार्वभौमत्वाविषयीं हुजत घालणाऱ्या अब्दालीच्या डोळ्यांदेखत हिंदुस्तानची सार्वभौम राजधानी सदाशिवरावानें हस्तगत केल्याने मराठ्यांच्या पराक्रमाची परीक्षा सहज झाली. हिंदुपद पातशाहीचा झेंडा पांचशें वर्षांच्या मुसलमानी राजधानीवर सदाशिवरावानें रोविला. इब्राहीमखानाच्या तोफखान्याचा प्रभाव सर्वांच्या प्रत्ययास आला. ज्या हिमतीने, व मर्दुमकीनें सदाशिवराव दक्षिणेंतून चालून आला, त्याचें मर्म पाहणाऱ्यांच्या निदर्शनास आलें. विश्वासरावास पुढें करून सदाशिवरावानें किल्ल्यांत प्रवेश केला, व झपाट्याने तेथील सर्व मिळकत, जागा व मनुष्यें आपल्या ताब्यांत घेतली. किल्ल्यांतील व्यवस्था व शोभा पाहून सदाशिवरावाचें मन प्रसन्न झालें. तोफखान्याच्या जोरावर ही जागा पाहिजे तितके दिवस लढविता येईल असें त्यास वाटलें. इब्राहीमखान, मल्हारराव, जनकोजी, दमाजी, समशेरबहादर, यशवंतराव वगैरे लहान थोर सरदारांसह सदाशिवराव व विश्वासराव यांनीं सर्व जागा तपासून पाहिली. दिल्ली शहर प्रथमच पाहून यांना मोठी धन्यता वाटली. दरबार भरून सदाशिवरावानें, सर्वांकडून विश्वासरावास नजरा करावविल्या. लुटीनें मराठी फौज समृद्ध झाली, कोणी गरीब म्हणून राहिला नाहीं. नारोशंकर यास राजे बहादर अशी किताब देऊन शहरांतील व किल्ल्यांतील कुल बंदोबस्त व अंमल त्याजकडे दिला. त्याचे हाताखालीं पांच हजार फौज ठेविली.

या विजयानें अब्दालीच्या फौजेची स्थिति अगदीं उलट झाली. आपण अब्दालीस मिळालों याबद्दल सुजाउद्दौल्यास पश्चात्ताप वाटूं लागला. नजीबखानाच्या नादीं लागून आपण व्यर्थ संकटांत पडलों असें सर्वांस वाटूं लागलें. अहंमदखान बंगश, हाफीज रहमतखान इत्यादि रोहिले सरदारही मराठ्यांचे शत्रुत्व केल्याबद्दल हळहळ मानूं लागले. अब्दालीचे अफगाण पठाण स्वदेशीं निघून जाण्यास उत्सुक झाले. अशा स्थितींत सुजास फोडून घेतला म्हणजे अब्दाली आपोआप निघून जाईल अशा समजुतीनें सदाशिवरावानें तो प्रयत्न चालविला. भवानीशंकर नांवाचा सुजाचा वकील सदाशिवरावाजवळ होता, त्याच्यामार्फत हा उपक्रम सुरू झाला. रोहिले सरदारांनाही गोविंदपंतास जाऊन मिळण्याबद्दल सदाशिवरावानें सूचना केली. अब्दालीनेंही तहाचें बोलणे सुरू केले. परंतु मराठे या वेळीं जोरांत असल्यामुळे त्यांनीं त्याच्या म्हणण्याकडे लक्ष दिलें नाहीं. सुजास व रोहिल्यांस अलग करून अब्दाली व नजीबखान या दोघांस लोफखान्याच्या माऱ्याखालीं रगडून टाकूं अशी सदाशिवरावास धमक होती. स्यानें या वेळी तह केला नाहीं, ही त्याची दुसरी चूक असें किल्येक प्रतिपादितात तें बरोबर नाहीं. कारण अब्दालीचा कायमचा बंदोबस्त करून हिंदुपद पातशाहीचा निकाल लावण्यासाठीं व दहा पांच वर्षें रेंगाळत चाललेला खेळ एकदम जोरानें पुरा करण्यासाठींच सदाशिवराव मुद्दाम जय्यत तयारीनें आला होता; आणि दिल्लीच्या पुढें जाऊन त्यानें आपला पाया तोडून घेतला नसता, तर हलके हलके तो अब्दालीला सहज जिंकूं शकला असता. यापुढें त्याच्या हातून झालेल्या चुका उत्तरोत्तर दाखविण्यांत येतील, परंतु दिल्ली काबीज करीपर्यंत त्याचा कोणताही डाव चुकलेला नव्हता, असें निःसंशय म्हणतां येतें. तसेंच पूर्वेकडून गोविंदपंतानेंही या वेळपर्यंत सर्व मंडळींस बरेच धाकांत ठेविलें होतें, हेंही सिद्ध आहे. दिल्लीच्या पुढें न जातां यमुनेस उतार झाल्यावर इटाव्याच्या बाजूस जास्त फौज पंताच्या मदतीस जाती, तर त्यांनीं हुसकून लावलेला दुराणी सहज भाऊसाहेबाचे कचाट्यांत आला असता.. असो. अडीच महिन्यांच्या मुकामांत दिल्लीस सदाशिवरावाच्या पुढें दोन मुख्य प्रश्न होते, एक

अब्दालीच्या सोबत्यांस फोडणें, व दुसरा दिल्लीच्या पातशाहीची व्यवस्था लावणें. सेनापतीच्या कामांत अब्दाली सदाशिवरावाहून वरचढ होता, प्रत्यक्ष लढण्यांत त्याचे लोक मराठ्यांहून ज्यास्त दमदार होते, आणि त्यास आजूबाजूच्या लोकांची सहानुभूतिपूर्वक मदत होती. तितक्याच अंशानें या तिन्ही गोष्टी मराठ्यांस जाचक होत्या. निरनिराळ्या सरदारांच्या अंतःकरणांत खासगी विरोध पूर्वी कितीही असले, तरी त्यांमुळें प्रत्यक्ष कृतींत या वेळी वैगुण्य आलें नाहीं. सर्व असामी सदाशिवरावाचे हुकूम मनोभावानें अमलांत आणीत होते, आणि अंतर्वैमनस्यामुळें पानिपतचा संग्राम उद्भवला असला, तरी तो त्यांमुळें बुडाला असें म्हणतां येत नाहीं.

तसेंच विश्वासरावास पातशहाच्या गादीवर बसविल्याबद्दलचा आरोप आहे, तोही निराधार होय. आपण स्वतः दिल्लीस बादशहा व्हावें अशी हाव पेशव्यास नव्हती. तयमूरच्या घराण्यांतील कोणी तरी लायक इसम दिल्लीच्या सिंहासनावर ठेवून त्याचा कारभार आपल्या तंत्रानें व्हावा, एवढाच बाजीरावाच्या वेळेपासून पेशव्यांचा खटाटोप होता. खून झालेला बादशहा आलमगीर यानें आपल्या संरक्षणार्थ मुद्दाम सदाशिवरावाचे नांवानें ता. २०·८·१७५९ रोजीं फर्मान[1] पाठविलें होतें, (भा. इ. मं. त्रै. मा. अं. १), त्यांतील आशेस दृष्टीसमोर ठेवून स० रा० वर्तत होता. शहा आलम यास दिल्लीस आणण्याची पुष्कळ खटपट केली. परंतु अब्दाली व मराठे यांचे युद्धाचा निकाल लागेपर्यंत आपण दिल्लीस येत नाहीं असें त्यानें साफ कळविलें. किल्ला हस्तगत झाल्यावर सदाशिवरावानें दरबार भरवून विश्वासरावास नजरा करविल्या, त्याचा विपर्यास छद्मी नजीबखानानें मुद्दाम करवून विश्वासरावास बादशाही पद दिल्याचा पुकारा केला. ही गोष्ट पुढें सदाशिवरावास कळली तेव्हां मराठ्यांचा वकील शिवभट साठे अलीगौहरजवळ होता, त्याचेमार्फत खटपट करून, अलीगौहरचा मुलगा जवानबख्त यास दिल्लीस आणून त्यास वलीअहद म्हणजे 'युवराज' नेमण्याचा समारंभ १०·१०·६० रोजीं स०रा०नें केला. अब्दाली स्वतः

---

१ या फर्मानाची तारीख १४·१०·१७५४ नसून २०·८·१७५९ आहे.

किंवा त्याचा पुत्र तयमूरशहा दिल्लीचें तख्त घेण्यास उत्सुक होते असे दिसत नाहीं. बाबरानें स्थापिलेली चकत्यांची (झगताईची) बादशाही मोडून पठाणशाही व्हावी या गोष्टीस मलिकाजमानी किंवा इतर मंडळी बिलकूल अनुकूल नव्हती; आणि इराणच्या हद्दीपासून दिल्लीपर्यंत आपला पाया लांबविण्यांत अब्दालीस सुरक्षितता वाटत नव्हती. गाजीउद्दीन जाठाचे आश्रयास होता, त्यास आणून वजिरी द्यावी अशी जाठ व होळकर वगैरेंची शिफारस होती. परंतु सुजास अब्दालीकडून फोडण्याच्या आशेनें स०रा०ने वजिरी तूर्त त्यासच दिली. या कृत्यानें जाठ रुसून मराठ्यांस सोडून गेला असें सांगण्यांत येते, परंतु त्यास आधार नाहीं. इतर आफवांप्रमाणें हीही मागाहून निघालेली कल्पना असावी.

५. **दिल्लीचा मुक्काम, तहाची वाटाघाट** (१·८–१०·१०·१७६०).– इकडे गोविंदपंताचे मागें एरंडे व कानेटकर यांचा लकडा चालूच होता. 'पठाणाकडील काम नासो अगर होवो, तुम्हीं येणें असें असेल तर तसेंच लिहिणें. अगर त्या शहावर फौज ठेवून आठ रोजांत येणें. नवबा रोज लागणार नाहीं तर तसेंच लिहिणें. जर फौज पुढें जाईना, तर पठाण कसे दबतात; आणि फौज घेऊन पुढें जावें तर एरंडे श्रमी. याजकरितां दोनही पेच आहेत.' (९·८·६०, १·२२५). पंताची अशी तारांबळ असतां अब्दाली व स० रा० यांजमध्यें तहाची बोलाचाली सुरू झाली. सुजाचे मतें आपले व नजीबखानाचे मध्यस्थीनें सल्ला व्हावा, हाफीज रहमत, अहंमदखां, गाजुद्दीन हे त्यांत नसावे ' (१·२२६). ' आम्ही अब्दालीकडे आलों म्हणून कांही श्रीमंतांनी वसवसा न धरावा. सर्व प्रकारें त्यांचें कार्य होय तेंच करीन ' अशा गोडगोड थापा सुजा देत होता [१·२२७]. सदाशिवराव त्याचें कपट ओळखून होता. नागपुरकर भोसल्याचा बंगाल्यांत शिवरामभट साठे म्हणून एक वकील स. १७५३ अगर त्याचेही पूर्वीपासून होता (खं. ३ ते ४३६, ४३९, ४४२, ४४३, ४५०), तोच पटणास या वेळीं अली गौहरजवळ जाऊन राहिला होता, त्याच्यामार्फत गोविंदपंताचें बोलणें पुढील तहाविषयीं चालू होतें. गोविंदपंताने सदाशिवरावास लिहिलें, ' मजला किरकोळ वसाता न कराव्या. ऐवज नाहीं. मुलखांत बखेडा

आला आहे. बंदोबस्त करून मीच सेवेशीं हिशेब घेऊन येतों. तेथें आल्यावर जे आज्ञा होईल तेकरीन.' [सदर] सर्व सरदारांचा, मुख्य धन्याचा व एकंदर मोहिमेचा सर्वच बोजा एकदम गोविंदपंतावर कसा पडला हें ले. २२९ वरून दिसतें.

एकंदरीत मराठ्यांच्या फौजा अडीच महिने दिल्लींत तळ देऊन बसल्यामुळें उभयपक्षांची मोठी कुचंबणा सुरू झाली. यमुनेच्या अलीकडे मराठे व पलीकडे पठाण यांनीं त्या पावसाळ्यांत सर्व मुलुख खाऊन व लुटून फस्त केला. दोघांचेंही सामर्थ्य समसमान असल्यामुळें, पुढें काय प्रकार होणार याची उमज कोणासच पडेना; आणि जे सामान्यतः तटस्थ म्हणून होते त्यांची मात्र अतिशय त्रेधा उडूं लागली. कारण दोनही पक्ष शक्तीच्या जोरावर त्यांजवर जुलूम करूं लागले, म्हणून एक निश्चय मनाचा करून कोणत्याही पक्षास मिळण्याचें धैर्य त्यांस होईना. दिल्ली मध्यबिंदु कल्पून तेथून सुमारें शंभर दीडशें मैल अंतराच्या परीघांत समाविष्ट होणारा प्रदेश या दोन समसमान शत्रूंच्या बावरानें अगदी त्रस्त होऊन गेला. एकमेकांचे साथीदार फोडण्याचे प्रयत्न सारखे चालू राहिले, त्यांत आरंभीं मराठ्यांचे पक्षास ज्यास्त वजन असून, पुढें पुढें तें पारडें उलट फिरूं लागलें. ता. १७ ऑगस्टला सदाशिवराव लिहितो, 'अब्दालीची फौज कांहीं फुटून येणार, त्यांचा करार तुम्हांजवळ जमा व्हावें, एक लाख खर्चास देऊन इकडे आणावें, त्यांत फौजही फुटते' (१·२३१). गंगानदीला सोरमचे घांटावर पूल बांधून नांवा ठेवाव्या म्हणजे अब्दालीकडे जमा झालेले रोहिले पुलावरून उतरून स्वदेशीं जातील अशी युक्ति सदाशिवरावानें गोविंदपंतास सुचविली. नावांचे पूल बांधून नदी ओलांडण्याचा प्रघात अद्यापि उत्तर हिंदुस्थानांत चालू आहे. ता. २१ ऑगस्टची स्थिति येणें प्रमाणें. 'अब्दालीची फौज दिल्ली घेतल्यामुळें फार घाबरी झाली. रोहिले फार करून गेले व जाणार. नजीबखान मात्र हिंमत दाखवितो. सुजाउद्दौला जाऊन फसले आहेत. पुरतेंच त्यांचें पारिपत्य होईल,' असें गोविंदपंत लिहितो. त्यावर सदाशिवरावानें कळविलें, 'तुम्ही कनोजेपुढें रोहिल्यांच्या मुलखांत गंगातीरीं येऊन पार उतरावयाची आवई घालणें आणि तुम्हीं गंगातीरीं

राहणें म्हणजे यांस पायबंद लागेल; आणि जे दुदिले (दोन दिलाचे) झाले आहेत ते यास सोडून जातील. शिदाप्पाशेट वीरकर हा सदाशिवरावाचे फौजेबरोबर सामान पुरविणारा व्यापारी असून देवघेवीचें काम त्याचेमार्फत चालत असे [१·२३४]. ता. २९ ऑगस्टला गोविंदपंत आपलेकडील वर्तमान लिहितो. 'आम्ही मौजे मही घेऊन सेगर नदी घेऊन दरमजलींनीं तालगांवीं ईसन नदीवर आलों. पाऊस अतिशय, चिखल झाला. नद्या भरल्या व जलमय सर्व झालें. परंतु तसे भिजतच तालगांवीं आलों. पठाणास कळतांच वकील पाठवून सलूख केला. इतक्यांत अहंमदखान बंगसाची पत्रें आम्हांस आलीं कीं मी सर्वस्वी तुमचा आहें. तुमचे भरंवशावर कनोज वगैरे ठाणीं एका मतलबाकरितां बसाविली होतीं. बिबीनेंही त्यास लिहिलें. दुसरे दिवशीं तिरव्यावर आलों. पाहोन घाबरे झाले. कौल घेऊन समरसिंग बघेला भेटीस आला. ठाणें सरकारचें बसलें. हटिया वगैरे ठाणीं तमाम खालीं झालीं. आतां बिठुरास जाऊन स्नान करून उमरगडीं येऊं. सुजाउद्दौले जाऊन अनुपशहरा भेटले. बहुत शिष्टाचार अब्दालीनें दिल्हा. दुसरे दिवशी वाजिरीचा शिरपाव देऊं लागला, तेव्हां त्यानें विनंति केली. पातशहा कोण व मी वाजिरी कोणाची करावी! त्याजवर रात्रीस सर्व लहान थोर जमा करून अब्दालीनें मसलत केली कीं आपणास येथें राहणें नाही. मराठ्यांचा जोर दिवसेंदिवस होऊं लागला, त्यास कोणाचें ऐकूं नये, सलूख करून आपले देशास जावें. हें वर्तमान बोलत आहेत,' [१·२३६]. सुजाची भेट घेण्याकरितां मुद्दाम अब्दाली कोळजळेश्वराहून अनुपशहरास गेला. सुजाचा विचार कोणत्याच पक्षास उघडपणें मिळण्याचा नव्हता. अब्दालीचें व त्याच्या वापाचें उघड वांकडें होते. तथापि नजीबखानाच्या मध्यस्थीनें व अब्दालीनें आदर दाखविल्यावरून सुजा प्रस्तुत अब्दालीस मिळाला [एल्फिन्स्टन]. गंगा नदीवर मंडी घाट आहे येथें सुजाची गांठ नजीबखानानें जाऊन घेतली; आणि सुजास घेऊन तो अनूपशहर येथें अब्दालीचे भेटीस आला. तेथून पुढें सर्व मंडळी हळूहळू दिल्लीचे समोर सिकंदरा येथें आले. त्या वेळीं नदीस पूर असल्यामुळें त्यास

अलीकडे येतां येईना. ता. २ सेप्टेंबर रोजीं सदाशिवराव पंतास लिहितो. 'आम्हीं प्रस्तुत दिल्लीत नारोशंकर यास ठेवून बंदोबस्त केला आहे. रोहिले, अब्दाली सुजाउद्दौले यांचीं राजकारणें तहाचीं आलीं आहेत. त्याचा बनाव बसतो न बसतो हें पहात बसल्यानें ठीक नाहीं, याजकरितां कुंजपुऱ्याकडे जाणार आहों. येथील बंदोबस्त केलाच आहे. आम्ही तिकडे गेल्यानंतर तेही त्यारोखें सहजांत येतील. आपला मुलूख पाठी पडोन, लढाई पडली तरी तिकडेच पडेल, तुम्हीं तूर्त इकडे न येणें. गोपाळराव गणेश व तुम्हीं कनोज जवळ गंगा किनारा धरून पलीकडील दबाबास जाऊन राहणें. म्हणजे रोहिल्यांवर दबाब पडेल. अहंमदखान बंगस, सादतखान वगैरेचीं राजकारणें आलीं आहेत कीं आम्ही निघोन गोविंदपंताजवळ जमा होऊं. ऐवजासंबंधानें सहा महिने लिहितां भागलों. तरी तर्तूद करणें' [१·२३७]. या वेळीं अब्दाली उलटून गोविंदपंताचे अंगावर जाण्याचा मोठा संभव होता आणि त्याजबद्दल सावध राहण्यास सदाशिवरावानें पंतास इशाराही दिला होता [१·२३८]. पंत लढाईत गुंतल्यामुळें मुलखाची लावणी व आबादानी बिघडली, त्याचा अर्थ विपरीत करून लोकांनीं सदाशिवरावास कळविलें की, लावणी कमती करून खावंदांस तोटा दाखवावयाकरितां मुद्दाम पंत असें करतो, त्याजबद्दल सदाशिवरावानें पंताची कानउघाडणी केली आहे [१·२३९]. 'कमाविशीचा मामला, सबब उपज कमी यावी अशा डौलानें हयगय करतां म्हणोन बारीक बारीक शोध करतां विदित झालें. मक्ता होता तेव्हां मेहेनत लावणी करीत होतां, आतां कमावीस जाली, आमचें येणें झालें, आतां लावणी पाडून तोटा नजरेस पडेसा करावा, असा शब्द न येई, सरकारचें काम होय तें खातरजमेनें करणें. ऐवज जरूर पाठविणें, इकडे न येणें, [१·२४१]. तुम्हीं फौज सुद्धां सोरमच्या घांटाजवळ जाऊन राहणें. पलीकडे सुजाउद्दौला व रोहिले यांच्या मुलुखांत आवई घालणें. अब्दालीस रसद जाते, ती लाग भाग पाहून मारावी, लुटावी, त्याप्रमाणें गोपाळराव गणेश व तुम्हीं मिळोन लिहिल्याप्रमाणें करावें. तुम्ही आतां केवळ महालकरी नव्हां, सरदारा सारखी तुम्हां बराबर फौज आहे. जाठचेही

लोक जवळ कुमकेस आहेत. रात्रंदिवस सडे फोजेनें गनिमी करावी' असें १८ सेप्टेंबरला सदाशिवराव पंतास लिहितो [१·२४४], सेप्टेंबर महिन्यांत अब्दालीची हालत कशी होती, हें खालील मजकुरावरून दिसतें. 'चार रोजांखाली सुजातउद्दौले अब्दालीजवळ गेले. अब्दालीनें त्यांजला सांगितलें, तुम्ही मातबर, दोन करोड रुपयांचा मुलूख तुम्हां खालें. मी हैराण, मजवर शिपायांची तलब चढली. याची तजवीज करून देणें. हें ऐकून सुजा सखेद जाले. शहावल्लीखानाकडे गेले, कीं मी तुमचे इमानावर आलों, आतां हे काय! वजीर शहावल्लीखान बोलला, तुम्ही लुच्चयांचे सांगीवरून आलां. आम्ही तुम्हांस इमान पाठविलें नाहीं. नदी उतरून तुम्हांवर कोण येत होता? जसे आलां तसे शहास राजी करा'. त्याजवर फजीत होऊन डेरां आले. नजीबखानानें अब्दालीस सांगितलें, 'मी सुजास घेऊन आलों. आतां रुपये घेणें तेव्हां सोडणे.' हें वर्तमान ऐकून सुजा व नजीबखान यांस बिघाड झाला. एक करोड रुपये सुजाजवळ मागतात, हें वर्तमान घनसुंदरदामानें लिहिलें आहे., सुजानें घनसुंदरदासास कळविलें, मजला नजीबखानानें फसविलें. श्री. भाऊसाहेबांनीं, सरदारांनीं, गोविंदपंतांनीं व माझे आईनीं सर्वांनीं सांगितलें कीं तुम्हीं न जाणें. त्यांचें न ऐकोन या कुंटणाचे बोलास लागोन आलों, फजीत पावलों. अब्दालीचे लष्करीं गडबड झाली, सर्व लहानथोर मराठ्यांशीं सलूख करून आपले देशास जावयाचा मनसुबा करितात. लढाईची हिंमत त्यांत राहिली नाहीं. दहा हजार घोडे उंट खेचर अनुपशहरीं मेले, नित्य मरतात. स्वामीचें दैव थोर सर्व उत्तमच होईल.' [१·२४६]. त्याच वेळीं कपिलाषष्ठीचें महापर्व [बहुधा भाद्रपद वा. ३० ता. ३० सेप्टेंबर], असून त्यासाठीं गंगास्नानास पंतानें आपले मुलगे व जनार्दनपंत यांस आपले जवळ बोलाविलें. (१·२४७). गोविंदपंतास पत्र लिहिण्याचें काम तरी दररोज मोठेंच होतें. अब्दाली, रोहिले, सुजा वगैरे मंडळीचीं कारस्थानें व हालचाली पंतासच चांगल्या समजत होत्या, आणि सर्व प्रकार विस्तारपूर्वक तो सदाशिवरावास, दक्षिणेंत नानासाहेबास, बुंदेल खंडांतील आपल्या हस्तकांस व इतर मंडळीस व राजे

रजवाड्यांसही लिहीत होता. [१·२५३] या वेळीं सदाशिवरावानें शिंदे किंवा तशाच योग्यतेचा दुसरा सरदार पंताचे मदतीस पाठविला असता तर बरेंच काम झालें असतें. इकडे प्रस्तुत सर्व भार पंतावर येऊन पडला, आणि तिकडे सदाशिवरावाजवळ सर्व फौज व सरदार रिकामे राहिले.

इकडे तहाची वाटाघाट चालली होती, तिचा फलितार्थ प्रथम सांगितला पाहिजे. सेप्टेंबर ता. १८ रोजीं खालील पत्र दिल्लितून पिलाजी जाधवाचा मुलगा सटवाजी जाधव यानें पेशव्यास लिहिलें. 'इकडील वर्तमान तरी वरचेवर श्री. भाऊसाहेब यांच्या पत्रांवरून निवेदन होत असेलच. श्रीमंतांचा मुक्काम सालेमार बागासांनिध आहे. गिलच्यांचा मुक्काम यमुनेपलीकडे आहे. गिलच्यांचे वकील श्रीमंताकडे येतात, यांचेही त्यांजकडे जातात. जाबसाल लागले आहेत. आपला दबाब भारी, श्रीमंत जें करणें ते उत्तमच करतील; आणि श्रीकृपेनें व आपल्या पुण्यप्रतापें सर्व गोष्टींचें यशच येईल' [६·४०४]. या शब्दांवरून मराठ्यांची हुरूप केवढी होती, व त्यांचा सदाशिवरावाचे ठिकाणी केवढा भरंवसा होता, हें निदर्शनास येते. सटवाजी जाधवासारखा त्रयस्थ गृहस्थ हें लिहितो, यावरून सदाशिवरावावर सरदार सर्व नाराज झाले होते वगैरे प्रवाद पाठीमागून अपजयानंतर उठलेले होत.

विश्वासरावास पातशहा केल्याची व आणखीही पुष्कळ खोटी बातमी पसरवून नजीबखानानें मराठ्यांचें नांव मुसलमान मंडळींत पुष्कळच खराब केलें. त्यांत पैशाची अडचण भरून काढण्याकरितां सदाशिवरावानें दिवाणी—आमचें छत तोडून त्या चांदीचे रुपये पाडले, या क्षुल्लक परंतु हृदयक्षोभक गोष्टीची भर पडली. छतास बोटभर जाडीचा चांदीचा पत्रा असून वर सोन्याचें काम केलेले होतें. छत तोडून रुपये केले ते तीन लाख झाले असें बखरकार म्हणतो, व १७ लाख झाले असें मुसलमान इतिहासकार लिहितात. दागदागिने वगैरे सर्व मिळून १७ लाख झाले असावे. कांहीं असलें तरी या कृत्यानें लौकिकांत पातशाहीची अप्रतिष्ठा होऊन मराठ्यांचे विरुद्ध मुसलमान मंडळी साफ चिडून गेली. जाठ, होळकर वगैरे कित्येक इसम छत तोडूं नये म्हणून सांगत होते,

ताजाकलम—पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर खालील महत्त्वाचें पत्र सदाशिवरावानें दिल्लीहून दक्षिणेंत लिहिलेलें रा. विनायक लक्ष्मण भावे, ठाणें, यांजकडून उपलब्ध झाले. त्यावरून तहाच्या उभयपक्षी अटी व त्या वेळची परिस्थिति चांगल्या कळून येतात. तसेंच सदाशिवराव दुराग्रहानें वागत नसून शिंदे होळकरांशीं त्याचा बेबनाव नव्हता हेंही सिद्ध होतें. हे पत्र पृ. १६१ चें आरंभीं वाचावें. पाठीमागें अक्षराचा नमुना छायाचित्रांत दिला आहे.

" चि. रा. धोंडो मल्हार यांसी सदाशिव चिमणाजी. आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुमचे पत्र आले ते पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कळले. येसे व निरंतर साकल्य पत्री लिहीत जाणे. इकडील वर्तमान तरी, फौज सरदारसुद्धा दिल्लीस आलो. किला घेऊन आंत सरकारच्या बंदोबस्त केला. सुज्यातदौले व नजीबखान वगैरे रोहिलेसुद्धां अबदाली यमुनेपलीकडे येऊन मुकाम करून राहिले आहेत. नदीस पाणी फार. सुज्यातदौला नजीबखान यांचे विचारे सलुखा वा पैगाम लागला. त्याचे मते सरंदेची हद्द अब्दालीची करून द्यावी, पातशाही बंदोबस्त आपले हवाला करावा; वजिरी वक्षीगिरी सुज्यातदौले मागतात; वक्षीगिरी नजीबखान मागतो. नदीमुळे उभयतां सैन्याचा मोकाबला होत नाही, तो पैगामही आहे. आमचे मते अटकची हद्द, पातशाही बंदोबस्त सर्वांचे पूर्ववतप्रमाणें राखून चालवावें याप्रमाणे सलुखाचे करावे त्यात कांही आमचे जाहलियाशिवाय तह होत नाही. बोलतां चालतां होईल ते पाहो. केवळ आमच्याच चित्तानरूप घडणे, अगर त्याचे चित्तानरूप होणे, हे कसे होईल? यास्तव जसे बनेल तसे करावे लागेल. होईल तें लेहून पाठवूं. नदीपायाब जाहालिया लढाई प्राप्त होईल. (येथून पुढील अक्षर खुदाचे). सरदार दोघेही बहुत साफ आहेत. कारभारी यांस तो संतोषच आहे. सर्व पेच पोटाचा, बाहेरील कजियामुळे न मिळे[3] कर्ज. सावकारी बंद. दोनही फौजा ह्या हरदू सरदारांची फौज मोडलीयामुळे, त्यांची सलावत आहे. यदांचे येणे व बाहेरील मसलत भारीच आहे. सर्व आशीर्वादे करून परिणामास जाईल. लढाइ न पडतां सर्व प्रेत्न, आवरू राहून, होतील ते करू. सेवटी नेटानें सर्व येकत्र जमून लढाई करूं. ईश्वर बरेच करील आपले वर्तमान शरिराचें वगैरे लिहिणे तीर्थरूपांचे शरीर उत्तम जालें म्हणजे सर्व मनसबे उत्तम. येविशी वर्तमान लिहति जाणे. छ ६ सफर बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद. "

---

१ शिंदे होळकर. २ सरदाराचे, रामाजी अनंत व गंगाधर यशवंत. ३ येथे मोडीतील कांही शब्द संदिग्ध वाटतात, ते वाचकांनी लावून वाचावे. ४ अब्दालीची. ५ नानासाहेबाचे ६ ता. १६ सप्टेंबर स. १७६०



परंतु सदाशिवरावानें तें मानलें नाहीं. आलेल्या नडी कोणत्या ना कोणत्या उपायानें त्यास भागवाव्या लागल्या.

आपल्या कचाटींत पूर्णपणें अब्दालीस आणून त्याजकडून योग्य अस्सा कायमचा तह व बंदोबस्त करून घेण्याचे सदाशिवरावाचे प्रयत्न चालू असतां, सेप्टेंबर महिना खलास होत आला. अलीकडच्या महिना पंधरा दिवसांत अब्दालीची बाजू बरीच खालावली होती; आणि महिनाभर यमुना उतार देणार नाहीं हा अजमास खरा ठरत। तर सदाशिवरावानें त्यास नरम केलें असतें. औरंगाबादचा राहणार पंडित भवानीशंकर यास सुजाकडे बोलाचाली करण्यास सदाशिवरावानें पाठविलें असून, उलट पक्षीं दिल्लीचा रहीश देवीदत्त हा सुजाचा वकील सदाशिवरावाजवळ होता. या देवीदत्ताबरोबर दुसरा एक इसम काशीराय नांवाचा असून त्यानेंच पानपतानंतर एकंदर प्रकारणाची हकीकत मुसलमानींत लिहिली ती काशीरायाची बखर म्हणून हल्लीं प्रसिद्ध आहे. ही बखर एशियाटिक रीसर्चिसच्या तिसऱ्या पुस्तकांत इंग्रजी भाषांतररूपानें प्रसिद्ध होऊन पुढें या इंग्रजीचें भाषांतर मराठींत विविधज्ञान विस्तार मासिकांत प्रसिद्ध झालें. वरील वकिलांच्या मार्फत होत असलेल्या वाटाघाटी सुजाकडून नजीबखानास व अब्दालीस कळत होत्या. ऑक्टोबर महिन्यांत हे त्रिवर्ग एकत्र होऊन पुढील विचारास लागले. या सर्वांचा सूत्रचालक नजीबखान होता. कोणत्याही रीतीनें या वेळीं मराठ्यांचा पाडाव केला नाहीं तर त्यांचा पगडा कायमचाच पातशाहींत बसला म्हणून समजावें, कदाचित् थोड्या दिवसांत ते आपलाच ब्राम्हण पातशहा दिल्लीस बसवितील, पुनः त्यांचें पारिपत्य करण्याची अशी संधि प्राप्त होणार नाहीं, असे विचार चालून शेवटीं भवानीशंकराबरोबर आपला खोजा याकुतखान यास सुजानें सदाशिवरावाकडे पाठवून खालील निरोप कळविला. 'रघुनाथ, दत्ताजी व मल्हारराव यांनी व त्यांच्या फौजांनीं सर्व राजे व रोहिले सरदार यांची सर्व प्रकारें धूळधाण उडवून दिल्यामुळें, त्या सर्वांनीं आपल्या बचावाकरितां अब्दालीस हिंदुस्थानांत आणिलें. त्यांनी पेरलेल्या बीजास आतां फळें येऊं लागलीं आहेत. तथापि आपल्या सल्ल्या

करण्याची मनापासून इच्छा असेल तर, आपला आमचा पूर्वापार स्नेह मनांत आणून, उभय पक्षांत स्नेह घडवून आणण्याची खटपट मी करीन.' याप्रमाणें सरहिंद पावेतोंचाप्रदेश अब्दालीनें मागितला. ही गोष्ट सदाशिवरावानें कबूल केली नाहीं आणि तह फिसकटला [काशीराय]. एल्फिन्स्टन व एल्यटच्या इतिहासांत याचाच अनुवाद आहे.

दिल्लीस रिकामें कुचंबत बसण्यांत अर्थ नाहीं असें सदाशिवरावास वाटूं लागलें. या वेळीं तहाची वाटाघाट जोरांत चालू होती. परंतु युद्ध चालू असतां, तहाच्या योजनेस तोंडजबानीनें जोर कधींच येत नसतो. त्यास मनगटाचा दट्या मागून अवश्य पाहिजे, तो दट्या बरोबर न लागल्यामुळें तहाची खटपट निष्फळ झाली. गोविंदपंताकडून अंतर्वेदींतून शत्रूंवर शह बसला नाहीं व थोड्या फौजेनें तो बसणें शक्यही नव्हतें. तेव्हां अब्दाली अडचणींत सांपडला आहे, वगैरे बातम्या येत होत्या त्या खऱ्या नव्हत्या. मराठ्यांनीं दिल्ली घेतली ही बातमी मात्र हिंदुस्थानांत पसरून, त्यांचा गौरव लौकिकांत होऊं लागला. मोगल पातशाहीचें मुख्य ठिकाण अब्दालीच्या हातून मराठ्यांनीं हिसकावून घेतलें या गोष्टीनें मराठ्यांचा दरारा वाढला. ह्या योगें त्याचे साथीदार डळमळूं लागले. त्याच्या सैन्यांत स्वदेशीं परत जाण्याविषयीं कुरकूर सुरू झाली. रोहिले सरदार व इतर लहानमोठे गृहस्थ अब्दालीच्या सामर्थ्याबद्दल साशंक होऊन त्याच्यापासून विभक्त होण्याच्या खटपटीस लागले. सुजालाही अब्दालीस मिळाल्याचा खेद वाटूं लागला. अब्दालीनें सुजावर मारेकरी घातले व तो खर्चाकरितां पैसा मागूं लागला, तेव्हां सुजाला त्याचा अगदीं वीट आला. अलीगौहरनेंही त्याजकडे येण्याचें नाकारिलें. बादशाही मिळवून देण्याच्या नजीबखानाच्या थापा जागच्या जागीं राहिल्या; लूट व पैसाही मिळेना. तेव्हां त्यानें सलुखाचें बोलणें करण्यास वकीलही पाठविले. परंतु मनाप्रमाणें तहाचा जम बसण्यास अवधि लागेल असें पाहून, सदाशिवरावानें त्याच्या म्हणण्याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. या वेळीं सदाशिवरावाची [illegible] प्रत्येक बाबतींत अब्दालीच्याहून श्रेष्ठ होती. दिल्लीचा कबजा, फौजेची

तयारी, उत्कृष्ट तोफखाना, मोठमोठ्या शूर सरदारांचें साह्य, व सर्व गोष्टींची सुबत्ता हे प्रकार त्यास अनुकूल असून, दत्ताजीच्या वधाचा सूड घेण्याची सोत्कंठ ईर्षा त्याच्या मनांत होती. तेव्हां अब्दालीला अडचणींत गांठून त्याचा समूळ फन्ना उडविण्याचा त्याचा मानस होता. अब्दालीनें मनाप्रमाणें तह केल्यास त्यास स्वदेशीं सुखरूप जाऊं द्यावयाचें, नाहीं तर अंतर्वेदींत गांठून किंवा अलीकडे आल्यास एकदम हल्ला करून, त्याचा पाडाव करण्याचा सदाशिवरावाचा बेत होता.

परंतु तह त्यास नको होता असें मात्र नाहीं. सदाशिवराव गर्वानें फुगून गेला होता, तो कोणाचेंच मानीत नव्हता, वगैरे अपवाद पश्चात् बुद्धीचे केवळ असत्य आहेत. पराभव झाल्यावर खरी स्थिति समजण्याची ज्यांस शक्ति नाहीं अगर साधनें नाहींत, त्यांनीं मनाचें समाधान करण्याकरितां, किंवा काशीरायासारख्या मराठ्यांच्या द्वेष्ट्यांनीं त्यांची मानखंडना करण्याकरितां या गर्वाच्या फाजील कल्पना मागाहून सदाशिवरावाच्या माथीं मारल्या आहेत. काशीरायाची बखर वाचून तो केवळ मुसलमानांचा हेरच असावा असें वाटल्याशिवाय राहत नाहीं. तह घडवून आणण्यास मागून चापती लावली पाहिजे, हें तत्त्व सदाशिवराव ओळखून होता; आणि दिल्ली काबीज होऊन तेथील व्यवस्था लागतांच त्यानें पुढें कुंजपुऱ्यावर जाऊन अब्दालीचा मार्ग अडविण्याचा उपक्रम सुरू केला. ता. २ सेप्टेंबरच्या पत्रांत त्यानें हा इरादा व्यक्त केला आहे. त्यापूर्वीच कांहीं दिवस तो घाटत असला पाहिजे. अब्दालीस अडविण्याचा मुख्य मार्ग म्हणजे पूर्व पश्चिम दोहींकडून त्यास आवळून मध्यें कोंडणें. दक्षिणच्या बाजूनें यमुना नदी भरून चालली असून आगऱ्यापासून तों थेट कुंजपुरा ताब्यांत आल्यावर तेथपर्यंत दक्षिणच्या बाजूनें अलीकडे येण्यास त्यास वाव नव्हताच. तेव्हां पूर्वेकडून गोविंदपंतास मदत पाठवून त्याजकडून अब्दालीस हूसकून आपल्या अंगावर पुढें आणणें हाच मुख्य उपाय सदाशिवरावास होता. परंतु यमुना भरलेली असल्यामुळें पलीकडे गोविंदपंतास मदत पोंचणें शक्य नव्हतें, तेव्हां कुंजपुऱ्याचे बाजूनें सहारणपुरावरून त्याजवर चालून त्यास मार्गे रेटीत

आणणें हाच त्याच्या पाडावाचा मुख्य उपाय होय, असें सर्वांच्या विचारानें सदाशिवरावाने ठरविलें असावें. अशा इराद्यानें त्याने कुंजपुऱ्याकडे चाल केली. ही चाल करण्यांत बळवंतराव मेहेंदळ्यास तो पुढें करी, होळकर वगैरेंच्या गनिमी पद्धतीचा सल्ला तो घेत नव्हता. कांहीं असलें तरी कुंजपुऱ्यावर जाण्यांत मोठीशी चूक सदाशिवरावाने केली असे म्हणतां येत नाहीं, मात्र आपली बचावाची सलंग बाजू शाबूद राखणे हे त्याचें मुख्य काम होतें; आणि बागपतावर अब्दालीस उतार मिळाल्याने सदाशिवरावाची बाजू कशी तुटली, तो प्रकार पुढे सांगण्यांत येईल.

प्रस्तुत दिल्लीपासून कुंजपुऱ्यापर्यंतची यमुनेच्या पश्चिम कांठावरील मुख्य ठिकाणें खाली सांगितलेली ध्यानांत ठेविली पाहिजेत. दिल्लीपासून उत्तरेस यमुनेच्या पश्चिम कांठानें बागपत २० मैल, सोनपत २६ मैल, गणोर ३६ मैल, संभाळकिया ४५ मैल, पानिपत ५४ मैल, व कुंजपुरा ७८ मैल; दिल्लीहून खालीं मथुरा ९० मैल, व आग्रा १२० मैल, म्हणजे आगऱ्यापासून कुंजपुऱ्यापर्यंत जवळ जवळ दोनशे मैलांचा नदीकांठ सदाशिवरावास राखावयाचा होता. दिल्लीच्या उत्तरेकडील जी ही नवीन ७५ मैलांची वाढ झाली, ती थोडीशी मराठ्यांच्या आवरशक्तीच्या बाहेर झाली. निदान सर्व उतार संभाळले पाहिजे होते.

कुंजपुऱ्यावर जातांना सदाशिवरावाने प्रथम ता. १२ व नंतर ता. १४ ऑक्टोबर रोजी आपला पुढील उपक्रम खाली लिहिल्याप्रमाणे गोविंदपंतास कळविला. 'तुम्हांस तिकडे मोठ्या कामास जावयाविशी वारंवार लिहिले, परंतु अद्याप गोपाळराव गणेश व तुम्ही गेला नाही. कोठे किरकोळ जमीदारांचे गढीगांव घेत बसलां, हे ठीक नाही. या उपरी लौकर तिकडे जाऊन पेशजी लिहिल्याप्रमाणे गडबड करून धुंड उडविणे. या गोष्टीस हयगय एकंदर न करणे. यमुनेचे पाणी फार, या करितां आम्ही दिल्लीवरी बसोन उपयोग नाही. यास्तव कुंजपुऱ्यास अब्दुस्समदखानाचे पारिपत्य करावयास जात आहों. नाना पुरंदरे व आपाजी जाधवराव यांस दिल्लीस पाठविले. त्यांनीं ता. ३० सफरीं (ता. १० आक्टोबर) अलीगौहर याचे नांवचे गजाशिक्के केले. शहरांत

द्वाही फिरविली. त्याचे पुत्रास बाहेर काढून वलीहद केलें. सर्व आलमांस खुशाली झाली. लोकांनी नजरा केल्या. शिक्के चालू झाले. मोठा समारंभ केला. आम्ही कुंजपुऱ्याकडे गेलो. अब्दाली इकडेच कूच करून आलीया उत्तमच झालें. दिल्लीकडील मुलूख मागे मोकळा राहील, लढाई इकडेच पडेल. कदाचित् ते इकडे न येतां तिकडे तुमचे रोखे जाहले तरी बरेंच आहे. आम्ही पाठीवरी यमुना उतरून अंतर्वेदीतून येऊन पारिपत्य करूं. कुंजपुरेवाला ठरत नाहीं. डावा डौल होऊन दमवायाच्या मुद्यावरी आहे. ठरला तरी मोर्चे लावून यथास्थितच पारिपत्य करूं. तुम्हीं तिकडे सत्वर जाऊन पोहोचणे. केवळ छोट्या मोठ्या कामास गुंतोन न राहणे. गनिमी मेहनत करून रोहिले व सुजा यांचे प्रांतांत धामधूम होई असें करणे. अब्दाली आम्हांकडेच येईल. तिकडे आला तरी पाणी आहे, तो आहे. चार रोजांत कुंजपुऱ्याचें पारिपत्य करून सारंगपुराकडे उतरून नजीबखानाचे विल्हे लावून पुढे अब्दालीचे पाठीवर येऊं. ऐवज लवकर येऊन पावेसा करणे. अलीगोहरचा शिक्का दिल्लींत पडला, त्याची चिठी पाठविली आहे, त्याप्रमाणें लिहून पातशहाची जरब मोडून याचे नांवें करणें [१·२५८]. ' लवकर जाऊन सर्व कामें यथास्थित करणें.— ग्वाल्हेर आग्रा मथुरेवरून ऐवज दिल्लीस येई ते करणे. जाठ वल्लभगडास आहेत, तिकडून रसदेचा वगैरे पेंच पडावयाचा नाही. त्याची फौज पुत्र हुजूर येणार. ते तेथें राहून पलीकडे पायबंद द्यावा. तिकडून तुम्हीं फौजसुद्धां जाऊन शहावरी असावें. इकडे यमुनेचें पाणी हलके होतांच अब्दालीचें पारिपत्य यथास्थित करावें असा डौल आहे. त्याजकडून तहाचें राजकारण अद्याप आहे, परंतु मळमळीत आहे, ठीक नाही. येथील मर्जीनुरूप जाहल्याशिवाय तह होणार नाहीं. प्रस्तुत आम्ही दिल्लीहून दोन मजली कुंजपुऱ्याचे सुमारें आलों. पुढे जाऊं. अलीगोहरचे पुत्र बाहेर काढून वलीहदी शुक्रवारचे मुहूर्तें केली. आपले ताब्दुम्यांतही शहाआलमचा गजशिक्का चालविणे. महिनाभर फौज उतरायाजोगें पाणी होत नाहीं. कुंजपुऱ्यास समदखानाचें पारिपत्य करूं, अब्दाली तिकडे आला

तर उत्तम, न आलिया फिरोन घेऊं. लिहिल्याप्रमाणें तुम्हीं शह देणें. जाठ आपलाच आहे. वसवास नाहीं ' [१-२५९].

'जाठ आपलाच आहे, वसवास नाहीं,' व 'जाठची फौज जवळ कुमकेस आहे' (१·२४४), या विधानांवरून व पराभूत मराठ्यांस पुढें जाठानें भरपूर साह्य केले, यावरून जाठ स०रा०वर रुसून चालता झाला, हा समजही खोटा ठरतो. मात्र ' रसद पोचविण्यास जाठ तुम्हांस त्रास देणार नाहीं ' (१·२६४), या स०रा०च्या इशाऱ्यावरून लोकांत त्या वेळी जाठ रुसून गेल्याचा प्रवाद उठला होता असें दिसतें. दोन प्रबळ शत्रूंच्या या तीव्र झगड्यांत इतरांप्रमाणे जाठासही अमुकच एका पक्षाकडे उघडपणें सामील होण्याची बुद्धि नव्हती, एवढाच प्रकार फार तर म्हणतां येतो. 'इकडे भाऊ, तिकडे अब्दाली, दोनही सबळ अनुष्ठानी, दोहोची सुकृतें सध्यां ताजव्यांत घातलीं आहेत. न्यूनपूर्ण थोडक्याच दिवसांत दिसोन येईल. तो पावेतों आम्ही आपले जागां दम बांधोन स्वस्थ राहवें, असा जाठानें निश्चय केला ' (भा. सा. ब. ९६), हीच वस्तुस्थिति खरी दिसते. कबिले ग्वालेरीस ठेविले नाहींत, मीरशहाबुद्दिनास वजिरी दिली नाही, सभागृहांतील छताची चांदी काढून त्याचें नाणें केले, आणि दिल्लीचा बंदोबस्त जाठाकडे दिला नाहीं, हीं चार कारणें जाठाचे रुसव्याची काशीरायाने दिली आहेत. पुष्कळ असामी आपापल्यापरी स०रा० स सल्ला देत होते, सर्वांच्याच सूचना ऐकणें त्यास शक्य नव्हतें. डाव फसल्यावर मागाहून ' मग मीं, सांगितलेच होतें, ' असें जो तो म्हणणार, हल्लीं सुद्धां अशा मोठ्या भानगडीच्या मोहिमांत बजबजपुरी कशी माजते, हें सर्व ध्यानांत ठेवून त्या वेळच्या स्थितीचा अंदाज केला पाहिजे.

६. कुंजपुऱ्याचा पाडाव (१७·१०·१७६०).—दिल्ली सोडून दहा वीस कोस पुढें आल्यावर कांहीं तरी आकस्मिक कारण घडून नाना पुरंदरे व आपाजी जाधव यांस सदाशिवरावानें परत पाठवून त्यांजकडून आश्विन शु० १,—१०·१० रोजीं दिल्लीस वलीअहदीचा समारंभ करविला [१·२५८–५९]. सेप्टेंबरांतच कुंजपुऱ्याची मोहीम ठरून कांहींनीं पुढें जाऊन बागपत सोनपत वगैरे

ठाणीं हस्तगत केलीं. बळवंतराव मेहेंदळे लिहितो, 'कुंजपुऱ्यास जाण्यास पाणिपतपावेतों येऊन पोंचले, व लोकांस तफावत आहे. नदीस पाणी आठ चार दिवस उतरावयास पाहिजेत. गिलच्यांची फौज दिल्लीजवळ पलीकडे ये कांठीच आहे. कूच करून पलीकडले तीरानें येणार होते. प्रस्तुत लष्करांत खर्चाची निकड फारच आहे. आम्हांसारख्यांनी वस्ता मोडून खादल्या. सर्वही पेच श्रीमंतांचे प्रतापें वारतील. एक भाऊसाहेबांची हिंमत व लोकांवर उत्तम दृष्टि आहे, येणेंकरून फत्तेच आहे' [१२ ऑक्टो०, इ. सं. ए. टि. १·१४]. कुंजपुऱ्यावर शिंदे, होळकर व विठ्ठल शिवदेव पुढें गेले. मध्यें सदाशिवराव मागें तोफखाना व पिछाडीस दमाजी गायकवाड आले. हें नाक्याचें ठिकाण मराठ्यांनीं काबीज करण्यांत अब्दालीचा स्वदेशी जाण्याचा मार्ग बंद होऊन त्याचा पाया तुटणारा होता. येथूनच त्याचे स्वदेशाशीं दळणवळण होतें. मरा०च्या फौजा कुंजपुऱ्यावर आलेल्या ऐकून अब्दाली गडबडला. त्यानें कांहीं फौज मदतीसाठी यमुनेच्या पूर्वतीराने रवाना केली, आणि मदत येईपर्यंत कसाबसा टिकाव धरा, असें पत्र अब्दुस्समदखानास पाठविले. तें पत्र सहज गल्या मराठ्यांचें हातीं लागलें, तेव्हां दोन तीन दिवसांत त्वरा करून इब्राहीमखानाच्या तोफखान्याकडून जोराचा मारा देवविला आणि तीन टोळ्यांनीं तीन बाजूंनी चढाई करण्यांत लढाई मोठी निकराची झाली. शिंदे तर दत्ताजीच्या मरणाचा सूड घेण्यासाठीं टपलेले असून सर्वांनीच मोठी शिकस्त केली. दामाजी गायकवाडाने हरहर महादेव असा घोष करून तोफांनीं पडलेल्या भगदाडांतून घोडे घातले. त्याबरोबर झटक्या सरशीं शहर व किल्ला हस्तगत झाला. कुत्बशहा व अब्दुस्समदखान दमाजीच्या फौजेस जिवंत सांपडले. दमाजीनें त्यांस हत्तीवर बसवून सदाशिवरावाकडे रवाना केलें. त्याला पाहून सदाशिवरावास दत्ताजीच्या वधाची आठवण झाली आणि लगेच त्यानें त्या दोघांचा शिरच्छेद करविला. यामुळें अब्दालीच्या पक्षास अत्यंत चीड आली, आणि इतउत्तर युद्धाचा रंग पालटला. पाडाव केलेल्या शत्रूस ठार मारल्याचीं उदाहरणें मराठ्यांचे हातून सहसा घडलेलीं नाहींत;

आणि या प्रसंगींही वरील दोघां सरदारांस मारूं नये असा शिंदे होळकर आग्रह करीत असतां त्यांचें न ऐकून, दहशत बसविण्याकरितां म्हणून वरील कृत्य सदाशिवरावानें केलें. कसेंही असले तरी तें गैर होय. मात्र यावरून अब्दालीच्या आजपर्यंतच्या कौर्याची यथास्थित फेड जशास तसें न्यायानें करावयाचा निश्चय सदाशिवरावाचा दिसून येतो. पूर्वीच्या स्वारीत रघुनाथरावानें अब्दुस्समदखानास पकडल्यावर दंड घेऊन सोडून दिलें होते. अशा प्रकारें उभय पक्षी निष्ठुरता वाढत गेल्यामुळें, शेवटच्या संग्रामानंतर अब्दालीने पाडाव झालेल्या मराठ्यांस बिलकूल दया दाखविली नाही. 'उपरांत कुंजपुऱ्याचें वस्त्रहरण केलें. लूटही बेमुबलक सांपडली. किल्यांत नजीबखानाचा व्याही व जांवई होता. तो मुलांमाणसांसह पकडला. द्रव्याचे आशेनें बोटास पलिते लावून त्यांचे हाल केले. तेव्हां पंधरा लक्ष रुपयांची मालिस्त दाखविली. कामाठी व बेलदार लावून कुंजपुऱ्याचा किल्ला व शहर पुन्हा ढांसळून टाकिला. सर्वांना यशप्राप्तीचा संतोष झाला [भा. सा. ब.]. कुंजपुऱ्यावर पांच सात हजार फौज व पांच सात हजार प्यादा लुटला, यामुळें अब्दालीचे लष्करांत दहशत पडली. कित्येक लोक उठून जातात' (१·२६०). एकंदरींत कुंजपुऱ्यांत पुष्कळ लूट मराठ्यांस मिळाली. त्या लुटींत दत्ताजी शिंद्याचा हत्ती जन्हेरगज आठ दहा महिन्यांपूर्वी पाडाव करून नेलेला पुनः शिंद्यांस परत मिळाला.

रविवार ता. १९ ऑक्टोबर स. १७६० रोजीं विजयादशमीचा दिवस मोठ्या विजयानंदानें कुंजपुरा येथे मराठी फौजांनीं साजरा केला. सदाशिवरावाच्या भाग्याचा तारा या दिवशीं परमोच्च बिंदूस पोंचला होता. सार्वभौम सत्तेचा खरा निदर्शक म्हणजे पराक्रमी सरदारांची जूट व जय्यत तयारीनें हिंमतीस चढलेली प्रचंड फौज या दोनही गोष्टी सिद्ध असून, शिवाय धनधान्याची समृद्धि असल्यामुळें मराठ्यांच्या आनंदास पारावर काय असणार! या दिवशी फौजेची गणती करून मोठ्या थाटानें सदाशिवरावानें सर्व सरदारांसह सीमोल्लंघनसमारंभ केला. दरबारांत सर्वांनीं विश्वासरावास

नजरा केल्या; तोफांचे आवाज सुटले. जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला. आश्विन शु. ८, ता. १७ ऑक्टोबर रोजीं सदाशिवरावानें कुंजपुरा घेतला, ही गोष्ट २३ ऑक्टोबरास नाना पुरंदऱ्यानें दक्षिणेंत कळविली. 'दिल्लीचा बंदोबस्त करून श्रीमंत कुंजपुऱ्यास आले. अब्दालीकडील दहा हजार फौज, समदखान, कुत्बखान होते, त्यांजवर हल्ला करून झुंज झाले. मोडले, गोठ लुटला. तसेंच हल्ला करून गांव घेतला. लोकांस लूट पुरती घोडा, उंट विगेरे मिळाले. दाणादुणा लष्करास मिळाला. आपल्याकडील सर्व ब्राह्मण मराठे मंडळी खुशाल आहे. तुम्ही झुंजाच्या खबरी भलत्या ऐकाल, घाबरे व्हाल, मातुश्री चिंता करतील यास्तव लिहिलें आहे,' [६.४०५].

इकडे गोविंदपंताला सांगितलेल्या कामगिऱ्या अशक्य कोटीतल्या असल्यामुळे, बहुतेक कागदावरच राहिल्या. एवढेंच भाग्य समजावयाचें कीं तो स्वतः आपलें स्थान सोडून परत बुंदेलखंडांत पळून आला नाहीं. अब्दाली त्याजवर चालून जाता तर तो परतही आला असता. तत्रापि तो आपल्या स्थानास चिकटून राहिला, येणेंकरून त्या बाजूने अब्दालीला अलीकडे येण्याचा मार्ग बंद राहिला. अब्दालीला हुसकून गोविंदपंतानें आपल्या अंगावर आणून सोडावे असें सदाशिवरावाने शेकडों वेळां लिहिलें. 'तुम्ही व गोपाळराव गणेश एकत्र होऊन जलदीनें सुजाचे मुलखांत हंगामा करणें व रसद न चाले तें करणे. शेंपन्नास राऊत प्यादे येतील जातील त्यांस लुटून मारून टाकीत जाणे. असे लिहीतच गेलों, परंतु तुम्ही गढ घेत बसलां हें काय ! या उपरी पत्रदर्शनीं जाणें. नेहमीं मुलकांत फिरावें. रसद वाट मारावी, गांव लुटावा, माणसें मारावीं, दहशत बसवावी, हेंच नित्य करावें. वाटेचे गांव व रस्ते असतील त्यांस दहशत पडोन बेचिराख होय तें करावें. वारंवार लिहितों, परंतु तुमचेकडून त्यास उपसर्ग होत नाहीं. पायबंद बसत नाहीं. तरी या उपरी उशीर न लावणें. अब्दाली कूच करून बागपतेवर चार कोस कांहीं फौज उतरूं लागली. लौकरच त्याचें पारिपत्य होईल. तुम्ही तिकडून गनिमी तऱ्हेनें उगळा लावावा. अब्दाली अलीकडे आला. तुम्ही पुढें येऊन त्याच्या वाटा मारा-या. सत्वर

लिहिल्याप्रमाणें करणें, [ता. २५ ऑक्टोबर, १७६०]. परंतु गोविंद-पंताच्या लहानशा फौजेकडून पावसाळ्यांत शत्रूच्या भर अंगावर चालून जाणें शक्य नव्हतें. पुढें पानपतावरून प्रत्यक्ष सदाशिवरावसुद्धां शत्रूवर चालून जाऊं शकला नाहीं.

ता. २५ ऑक्टोबरच्या पत्रांतच अब्दाली बागपतावर यमुना उतरूं लागल्याची सदाशिवरावास खबर होती. यमुनेच्या पूर्वतीरानें त्यानें कुंजपुऱ्याचे मदतीस फौज पाठविली, पण ती पोंचण्यापूर्वीच ते स्थळ काबीज होऊन आपल्या सरदारांचा शिरच्छेद झाला व नजीबखानाचा व्याही व जांवई हस्तगत झाले, ही बातमी येऊन अब्दाली अतिशय चिडून गेला, आणि मराठ्यांवर चालून येण्यासाठी उतार पाहतांना बागपतासमोर छाती इतक्या पाण्याचा गचक्या उतार त्यास मिळाला. चांदीच्या मोठ्या पत्र्यांवर कुराणांतील कांही वाक्यें लिहून ते पत्रे त्यानें यमुनेंत सोडिले, [एल्यट पु. ८ पृ. १४६]. नदीत हत्ती उभे करून त्यांजवरून सर्व जड सामान व तोफा पलीकडे नेण्याचा हुकूम केला; आणि स्वतः तंग सोडलेला आपला घोडा यमुनेंत घालून पलीकडे गेला. अशा रीतीने तीन चार दिवसांत सर्व फौज त्यानें पलीकडे नेली. या प्रयत्नांत पुष्कळ लोक मृत्युमुखी पडले. पण त्याची त्यानें क्षिति केली नाहीं. बागपतावर मराठ्यांची थोडी फौज होती, तिनें अब्दाली अलीकडे येतांच पळून कुंजपुऱ्याचा रस्ता सुधारला. अब्दालीनें येथे फौजेची गणती केली. त्यांत स्वतःची, २४ हजार स्वार व वीस हजार पायदळ, सुजाउद्दौल्याची सुमारें तीस हजार, व सर्व रोहिले सरदार मिळून तीस हजार, अशी एकंदर एक लाखावर फौज भरली. शिवाय तोफा दोन अडीचशें होत्या. सोनपतापासून गणोरावरून सराई संभाळकियापावेतों अब्दालीची छावणी झाली. नदी उतरतांना मराठी फौज अब्दालीवर मारा करण्याऐवजी आपण होऊन मागें सरकली, तेव्हांच अब्दालीनें मराठ्यांचें पाणी ताडले. अशा अडचणींतच त्यास गांठलें पाहिजे होतें. त्याचा स्थीरस्थावर होण्यापूर्वीच स०रा०नें त्यास कां गाठलें नाहीं तें समजत नाहीं. आयताच अंगावर येतो हें बरें असें त्यास वाटलें.

कुंजपुऱ्याहून पुढे जात असतां सदाशिवरावास अब्दाली यमुना उतरल्याची बातमी कळली. लगेच पुढील मसलतीची भरपूर वाटाघाट त्यानें सर्व प्रमुख मंडळीशीं केली. त्यांत मल्हाररावाचा उद्देश गनिमी काव्यानें अब्दालीस हैराण करण्याचा असून इब्राहीमखानाचा सल्ला, खंदक मोर्चे वगैरे तयार करून, बंदोबस्ताची छावणी करावी आणि मग अब्दालीस हैराण करावें, असा पडला. उन्हाळ्यांत गनिमी काव्यानें अब्दालीशीं लढतांना शिंदे होळकरांची पोळजत्रा कशी उडाली हें सदाशिवरावाचे डोळ्यांसमोर असल्यामुळें आणि कवाइती तोफखान्याचा प्रभाव त्यानें अनुभविलेला असल्यामुळें, त्यानें इब्राहीमखानाची योजना स्वीकारिली. ता. १ नोव्हेंबर रोजी स०रा० लिहितो, 'अब्दाली यमुना बागपताजवळ उतरला व गणोरास आला. खासा स्वारी कुंजपुऱ्याहून पानपतास आली. त्याजवर तीन दिवस गणोरास होते. तेथून संभाळकियास (मागें) आले, तेथून दोन अडीच आजी आले. फार आवळून चालतात. कही लांबवूं देत नाहींत. चाळीस पन्नास कोस धावतात तें नाहीं. अंतर थोडकें आहे. त्याचे आमचे बातमीची गोळागोळी होती. याप्रमाणें तीन दिवस होने. दाणा दोन अडीच शेर गिलच्यांचे लष्करांत आहे. हिंमत फार आहे. तरी यास मिळणार. त्यास लढाई लवकरच होऊन येईल. तुम्ही जलदी यमुनेपलीकडून (अलीकडे) येऊन बागपतपर्यंत धुमामा चालवून, त्यास रसद न पोंचे, फौजेस शह पडे तें करावें. आतां गिलच्याचा पेंच तिकडे नाहीं, यास्तव लांबलांब मजलीने येणें. दोन चार हजार सडी फौज निवडून बागपतावर यमुना पारून यावें. रसद मारावी. गडमुक्तेश्वर, शामळी[1] वगैरे नजीबाचे प्रांत जाळावे. इरे धरून थडकून येऊन काम करावे' [१.२६१]. थोड्या फौजेनिशीं अब्दालीचे तोडावर बागपतावर यमुना उतरणें पंतास शक्यच नव्हतें. रसद मारण्याचे काम त्यास शक्य होतें व अब्दालीस या वेळीं रसद पोंचत नव्हती, यावरून तें काम गोविंदपंत थोडें बहुत करीत होता.

७. पानपतावरील कुचंबणा. (नोव्हें.-जाने. १७६१).—ता. २५

१. **टीप**—दिल्लीच्या उत्तरेस ५४ मैल सहारणपुर रेल्वेवर स्टेशन

ऑक्टोबरास पानपतावर अब्दाली यमुना उतरूं लागला, तेव्हां तो होऊन आपल्या अंगावर आल्याबद्दल स० रा० स समाधान वाटलें आणि आतां आपण त्यास खास बुडवूं अशा हिंमतीनें स० रा० परत फिरून गणोरापर्यंत त्याचे अंगावर चालून आला. या ठिकाणीं अब्दालीचें खरे तेज कळून स० रा० चपापला, आणि आपणास वाटलें होते तितके काम सोपें नाही, अशी खात्री होऊन, बचावासाठीं लगेच मागे सरून, पानपत पाठीशी घालून, तेथें कबिले सुरक्षित ठेवून, इब्राहीमखानाच्या सल्ल्यानें, फौजेस फांकूं न देतां आवळून धरून खंदकाच्या[1] आंत बंदोबस्त करून राहिला, म्हणजे अब्दालीचा पाया तोडण्याऐवजीं त्यानेंच आपला पाया तोडल्याचें स० रा० च्या प्रत्ययास आले. मात्र त्याची व सर्व फौजेची हिमत जबरदस्त असून सरंजाम व रसद मुबलक असल्यामुळें अब्दालीस बुडविण्याची त्यास खात्री होती. 'मराठी फौज शेर झाली, या उपरी अब्दालीचें पारिपत्य सत्वरच होईलसें दिसतें,' असे ता ३ नोव्हें० चें पत्र आहे [१·२६२]. पंतास ता. ४ नोव्हेंबरचे पत्रांतील मजकूर.–'आजपर्यंत रिकाम्या गोष्टी लिहीत गेलां, निदर्शनास एकही येत नाहीं. तरी मातबर ऐवज आविलंबें रवाना करणे. अब्दालीची आमची गांठ पाणिपताजवळ पडली आहे. तोफखान्याचा आराबा रचून लढाई करावयास तयारी केली आहे. त्याच्याने इकडे तिकडे जाववत नाही व कांही करवत नाही. दीड पावणेदोन कोसांची तफावत आहे. पेंढारी व लुगारे राऊत, नित्य उंटे, घोडी, तट्टे,

---

१. **टीप**:—पानिपत शहर व त्याचे दक्षिणेकडील पसीनम हे दोन गांव आंत धरून सभोंवार ५० हात रुंद व १२ हात खोल असा खंदक खणून इब्राहीमखानानें छावणीची योजना सिद्ध केली. मातीचे ढीग, मोर्चे व खंदक ऐवढे मोठे होते की स. १८७२ त आपण ते पाहिले असल्याचें सर डेन्झिल इबेट्सन लिहितो. दोन छावण्यांच्या दरम्यान रणखांब उभारलेला असून तेथें दोहोंपक्षाकडील योद्धे एकमेकांस पाचारण करून द्वंद्वयुद्धें करीत. लढाईचे सुरवातीपूर्वी अब्दालीचा डेरा नुरपूर पसीनम येथें व सदाशिवरावाचा काळा आंबा म्हणून ठिकाण दाखवितात त्या खालीं होता.

बैल, आघाडी पिछाडीवरी जाऊन गोटापासून घेऊन येतात. तुम्हीं या गोष्टी भयाच्या मनांत न आणितां, सत्वर ऐवज आगरियावरून दिल्लीस रवाना करणे. तेथें आलियावरी घेऊन जाऊं. पटपटगंजावरी[1] त्यांचे पिछाडीस येणें. त्यांची रसद लुटणें, दबाब पाडणें म्हणजे चहूंकडून घाबरा होईल. जाटाच्याने तुह्मांस अटकाव होत नाही. वेडें वांकडे तो करणार नाहीं. गोपाळराव गणेश सुद्धां सामील करून सुजा व रोहिल्यांचा अंमल उठवावा' [१·२६४]. ता. ५ नोव्हेंबर रोजी कृष्ण जोशी पानपतावरून दक्षिणेंत लिहितो, 'श्रीमंतांनी महाष्टमीस समदखान कुत्बशहा मारून दहा हजार सेना लुटून, कुंजपुरा घेऊन लुटला. गढी खणून जमिनीबरोबर केली. श्रीमंतांस भूमिगत सात लक्ष रुपये सांपडले. तेथून कूच करून कुरुक्षेत्रास चालिले होते. इतक्यांत अब्दाली बागपतापाशी यमुना पायाब उतरून सोनपतास आला. हे वर्तमान श्रीमंती ऐकतांच माघारे फिरोन यवनाचे सन्मुख फणिपथास आले. नित्य थोडथोडें युद्ध होत आहे. श्रीमंतांही चोहोंकडे तोफखाना पसरला आहे. यवनास थोर भय जाहले आहे, पुढे येववत नाही. आमचे सैनिक यवनाचे समक्ष उभे राहून, नित्य शे पन्नास यवन मारून, उंट घोडी आणितात. दोन हत्ती पेंढारी यांणी काल आणिले. यवनाच्या सैन्यांत रसद बंद झाली आहे. यामुळे पीठ तीन शेर, चणे चार शेर, व तूप अर्धा शेर याप्रमाणें महर्घ आहे. आमचे सैन्यांत गहूं सोळा शेर व चणे बारा शेर व तूप अडीच शेर याप्रमाणें संवगाई आहे. आणखी दोन चार दिवसांत यवन चालोन तोफांवरी येईल तर क्षणमात्र बुडेल. न ये तर आमचे लोक जाऊन युद्ध करणार. वरकड सर्व शुभ चिन्हे होतात. सर्व सैन्यास उत्साह आहे की, अब्दाली व नजीबखान व सुजा आठ चौ रोजांत क्षयास जातील. अब्दाली शहानशा बहुत युद्धें केलेला, परंतु दो कोसांवरी येऊन आठ दिवस बसोन कांही पराक्रम नाही, त्याजमुळें आमची फौज बहुत शेर आहे. अब्दालीनें स्वदेशास जावें तर मार्ग नाहीं, युद्ध करावें तर परिणाम नाहीं, उगेंच

१. टीप.—बागपताच्या समोर यमुनेच्या पूर्व कांठावर.

बसावें तरी भक्षावयास नाहीं, याप्रमाणें विचारांत पडला आहे. मागाहून सविस्तर होईल तें लिहूं' [१·२६५]. या पत्रानंतर दोन दिवसांनींच हा कृष्ण जोशी गोळा लागून मरण पावला. दीक्षितांचेंही पत्र याच प्रकारचें आहे. 'मोगलांच्या लष्करांत रुपयास शेर दीड शेर अन्न व हारिभक्तांच्या लष्करांत १४·१५ शेर आहे. मोगल अंतरीं भयभीत आहे' [३·५०७]. हें पत्र ता. ५·१·१७६१ चें आहे.

अब्दालीस पायबंद बसेना तेव्हां पंतास स० रा०नें ज्यास्त उत्कंठेचीं पत्रें लिहिली. नारोशंकर लिहितो, 'अशा समयास आणीक सर्व कामे एकीकडे ठेवून रात्रीचा दिवस करून दाखवावयाचा प्रसंग असतां, ढील करतां यास काय म्हणावे ! तुम्हांपाशी दहा हजार फौज असोन पंचवीस लाख रुपये खात असतां लटके बहाणे करून मुलखांत रहावें हे गोष्टी तुम्हांस योग्य नाहीं. हा सेवक लोकांचा धर्म नव्हे. तरी आपण या समयी दरोबस्त फौजा व जमीदार समागमें घेऊन गोपाळराव गणेश वगैरे त्या प्रांतींचे श्रीमंतांचें अन्न खाऊन दौलत कमावितां. सर्वांनी जमा होऊन सत्वर यावे. एक दोन रोजांत युद्ध तुंबल होऊन श्रीस करणे तें होईल. परंतु श्रीमंतांचे हिमतीस तारीफ कोठपर्यंत लिहावी ! सफेजंगीस कांही बाकी नाहीं. बुणगे, कबिले सर्व बराबरच आहेत. ऐसें निदान आरंभिलें आहे. आम्ही किल्ले मजकूरचा बंदोबस्त करून दीड हजार फौजा मोगलांचे लष्करावर जवळ कनोजीस ठेवून, घोडीं, उंटें आणितात, व हजार स्वार प्यादा उतरोन धामधूम मांडिली. रसदही बंद करविली आहे. अशा समयीं आपण रात्रीचा दिवस करून आलीया श्रीमंतांस बहुतच समाधान वाटेल' [१·२४३]. ता १५ नोव्हेंबर रोजीं असेंच निकरावें पत्र पंतास लिहिलें (१·२६८). परंतु या पत्रांचा कांहीं एक उपयोग नव्हता. ता. १५ नोव्हेंबरपावेतों सदाशिवरावाला अब्दालीवर चालून जाण्याची उत्कृष्ट संधि होती. वास्तविक या संधीचा उपयोग करून तो कां चालून गेला नाहीं यांचेंच आश्चर्य वाटतें. कुंजपुऱ्यावरून कुरुक्षेत्राच्या मार्गानें औरंगपुरावरून सदाशिवराव आपल्यावर चालून येईल, आणि आपणास कोंडून

धरील, तर तसा प्रसंग चुकविण्याकरितां आणि मराठ्यांचा फन्ना उडविण्याच्या भरपूर इराद्यानें अब्दाली बागपतावर यमुना उतरला. त्या वेळीं तो कोणत्याही तऱ्हेनें भागलेला, किंवा दुर्बल नव्हता. सर्व मुसलमान एक होऊन एक जुटीनें त्यास मदत करीत होते. सर्वच प्रदेश मराठ्यांवर उठलेला असून, त्यांचा नाश तिकडचे सर्व रहीश इच्छित होते. यमुनेचा पूर कमी होईपर्यंत थोडे दिवस त्यास धान्याची वगैरे महर्घता वाटली असेल, परंतु त्यानें आपले सर्व मार्ग व वाटा व्यवस्थित बंदोबस्तानें आपल्या कबजांत ठेविल्या होत्या, आणि लवकरच यमुने पलीकडून हर एक प्रकारची मदत सुजा व रोहिले त्यास करूं लागले, तेव्हां त्याचा दम चढत गेला. हा प्रकार उमजून आरंभींच त्याजवर सदाशिवराव चालून जाता तर थोड्या बहुत संकटानें कां होईना, मराठे परत आपल्या मूळ पायाच्या प्रदेशांत येऊं शकले असते. कुंजपुऱ्यावर जाऊं नयें असें जाठाचें सदाशिवरावास आग्रहाचें सांगणें होतें तें त्यानें मानलें नाहीं. सदाशिवराव कुंजपुऱ्यास गेला नसता तर अगर लगेच तेथून परत दिल्लीस येता तर अब्दालीला कुचंबूनच परत जावें लागलें असते. त्यास निघून जाण्याची वाट मराठ्यांनी न ठेवल्यामुळे त्यांच्या अंगावरच येणे त्यास भाग पडलें. अशा रीतीनें अंगावर आल्यावर लगेच त्याजवर चालून जाण्यांत मराठ्यांचा फायदा झाला असता. परंतु एक तर अब्दाली इतक्या बंदोबस्तानें राहत असे कीं दरखेपेस मराठे चालून आले असतां, त्यांस त्याने मागें हटवावें. अशा स्थितींत उपासमार होऊन तो टेंकीस येईल अशी सदाशिवरावाची अटकळ होती, परंतु तीही उत्तरोत्तर निष्फळ ठरली.

नोव्हेंबर ता. १ पासून जानेवारी ता. १४ पावेतों अडीच महिन्यांच्या काळांतील उभयपक्षांकडील हालचालींची तपशीलवार माहिती मिळेल तर या मोठ्या झगड्याचें स्वरूप लष्करी व इतर दृष्टीनीं स्पष्ट करून दाखवितां येईल. तशी माहिती मिळत नाहीं याजबद्दल मनास मोठी तळमळ लागते. हरहमेश थोडथोड्या चकमकी झडत होत्या, पण त्यांतल्या त्यांत कार्तिक शु० १५ [२२-११] रोजीं जनकोजीचें, कार्तिक व० ३० [ता. ७ डिसेंबर] रोजीं

बळवंतराव मेहेंदळ्याचें, व मार्गशीर्ष शु. १५ [ता. २२ डिसेंबर]. रोजी गोविंदपंत बुंदेल्याचें, अशीं तीन रणें बरींच महत्त्वाचीं अब्दालीशीं झालीं. पहिल्या दोहोंत मराठ्यांचीच सरशी झाली. दुसऱ्या दोहोंत बळवंतराव व गोविंदपंत मारले गेले. नोव्हेंबर अखेर मराठ्यांची स्थिति उत्कृष्ट होती, आणि उपासमार करून अब्दालीस बुडविण्याच्या नादास न लागतां, जोराचा हल्ला करून अब्दालीशीं ते लढते तर ते त्याचा पराभव करूं शकते, निदान दिल्लीशी आपला पाया सलंग करून आणि दक्षिणेंतून आलेली ज्यास्त मदत घेऊन, ते अब्दालीस हांकलूं शकले असते. डिसेंबरपासून मराठ्यांची स्थिति खालावत जाऊन अब्दालीची सुधारत चालली; बागपतावरील उतार निर्वेध ताब्यांत राहिल्यामुळें पलीकडून त्यास भरपूर रसद मिळत राहिली आणि हळू-हळू सर्व बाजूंनी मराठ्यांचा पुरवठा अब्दालीनें तोडिला. असे होतां होतां शेवटचे दोन आठवडे मराठ्यांची स्थिति इतकी बिकट झाली की निराशेनें शत्रूवर जाऊन पडण्यापलीकडे दुसरा मार्ग त्यांस राहिला नाही. शेवटच्या क्षणापर्यंत वाट पाहण्याचे कारण नव्हतें. शेवटच्या महिन्यांत पानपतावरून लिहिलेली; कोणाचींच पत्रे उपलब्ध नाहीत. नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांत स० रा० ने पंतास लिहिलेलीं पत्रेंही उपलब्ध नाहीत. यावरून बहुधा ती अब्दालीनें पकडून घेतली आणि त्यांचा स्वतःचे फायद्यासाठी भरपूर उपयोग केला. दक्षिणेतून मदत येऊन आपली सुटका होईल अशा आशेवर स० रा० वाट पाहत बसला असावा. दक्षिणेत बातमी पोचती तर जी फौज माळव्यांत आली तीच पुढे त्वरेने येऊन दोन फौजांच्या मध्यें अब्दालीचा नाश झाला असता. पाराशर दादाजीनें ४ जानेवारीस पानपतावर खजिना पोंचविण्याचा उद्योग केला तो सफल झाला नाहीं.

नोव्हेंबर व डिसेंबर या दोन महिन्यांतली स्थिति सांगणारे नाना फडणिसाचें खालील पत्र उपलब्ध आहे [२८·१२·६०, १ पृ. ३७५]. ' चिरंजीव मोरोबा दादा यांप्रतीं बाळाजी जनार्दन आशीर्वाद, १९ जमादिलावलपावेतों पाणिपत एथें सुखरूप असों. इकडील मजकूर पूर्वी कुंजपुऱ्यास लढाई जाली.

अब्दुस्समदखान वगैरे मारले, त्याजवर अब्दालीची गांठ पडली, कृष्ण जोशी संगमेश्वरकर यांस गोळा लागून देवाज्ञा झाली. त्या अलीकडील मजकूर. यांणीं तोफखान्याचा आराब पसरून खंदक खणून पाणिपत गांव पाठीशीं घालून, सज्या फौजा तोफांचे मागें उभ्या, याप्रमाणे बंदोबस्ताने राहिले आहेत. बुणगे गांवाचे पुढें फौंजेचे मागे ठेविले आहेत, नित्य गोळागोळी होती. सभोवत्या त्याच्या फौजा आहेत. त्यापाशीही चाळीस पन्नास तोफ चांगली आहे. साठ हजारपर्यंत फौज आहे. एके दिवशी सरदारांकडील बाजूकडे त्याची फौज वाहून आली. त्याची यांची लढाई चांगली झाली. शिद्यांकडील लोकांनी त्यांना गोठांत नेऊन घातले. सहाशेपावेतों माणूस जखमी व ठार त्याजकडील जाहले. याजकडीलहीं दोन अडीचशें पर्यंत जखमी व ठार झाले. अस्तमान झाले यास्तव लढाई राहिली. त्यानंतर पंधरा दिवशी २८ रबिलाखरी (७·१२·१७६०). श्रीमंतांकडील मोर्चावर चालून चार पांच हजार आले. वरकड फौज त्यांचे पाठीमागेच उभी होती. त्यांची याची लढाई होऊं लागली लढाईस आरंभ होतांच अस्तमान झाले. ते दिवशी बळवंतराव गणपत यांस छातींत गोळी लागली. तसेच घोड्याखाली पडले. तो त्यांजकडील माणसे धावली. त्यांतील एकाने तोंडावर तरवारीचा वार केला. दुसऱ्याने गळा कापून, शीर नेऊं लागले, तो पांच सात राऊत धावून सोडविले. गळा अर्धा कापला होता, तसेच आणून दहन केले. समागमें स्त्री अग्निप्रवेश केली. त्या दिवशी त्यांजकडील दीड हजार माणूस ठार आमच्या आराब्यापुढे पडले होतें, त्याचे पुढें किती होतें हे कळलेच नाहीं. अवशीची तीन घटका रात्रपावेतों लढाई झाली. आपल्याकडील दीडशेपावेतो ठार व पांच सातशेंपावेतों जखमी जाहले. ही लढाई फार चांगली झाली होती, परंतु बळवंतराव याचा प्रकार असा झाल्यामुळें ते सर झाले. त्यावर गोविंद बल्लाळ यांस पूर्वीपासून पत्रें जात होतीं कीं अंतर्वेदींत उतरून अब्दालीची रसद बंद करणे. त्यावरून ते दिल्लीच्या सुमारें आले. नारोशंकरचीही कांहीं फौज मदतीस घेतली; व पुढें रसद मागवी तो अब्दालीनें दहा हजार फौज निवडक

पाठवून दगा केला. कोणी लढले व कोणी पळाले. गोविंद बल्लाळाचें शीर कापून श्रीमंतांकडे पाठवून दिले. मग दहन झालें. गोविंदपंताकडील वगैरे तीन चारशें फौज ठार झाली. बाबाजी गोविंद पळोन नारोशंकराजवळ दिल्लीस आले. मोठे दगेबाज सबब आराब पसरून खंदक खणून मोगलाई रीतीने राहिले आहेत. दोन महिने यांची लढाई होते. अद्यापि लढावे हाच निश्चय उभय पक्षी झाला आहे. ईश्वर काय परिणाम लावील तो खरा. मनसबा भारी पडला आहे. पैसा नाहीं. महागाई फार, यामुळे लष्कर गलबलले आहे. आपले बुणग्यांत गोळे जातात. बहुत काय लिहिणे.' 'तीन युद्धे मातबर झाली. दोनही फौज कायम आहेत. पठाणाकडील थोडें बहुत माणूस मारले गेले. कांहीशी शिकस्त खाऊन चार कोस मागे सरला. अब्दालीचा कमजोर आहे. मुलखांत धामधूम बहुत आहे. काळ बरा नाहीं. ईश्वर लज्जा राखील ते खरी. या वर्षी पीकपाणी बरे आहे. रबी चांगलीच आहे.' [३·५०९]. हे १८·१·१७६१ चे पत्र काशींतून लिहिलेले आहे. खं. ३·५११ चे पत्रही असेच असून त्यांत गोविंदपंता प्रमाणेच गोपाळ गणेश बर्वे हाही रसद मारीत असतां, पराभव पावून पळून गेला असा मजकूर आहे. ता. २४ डिसेंबरचें रामाजी अनंताचे खालील पत्र पाहतां, त्या वेळी मराठ्यांची अगदी निकृष्ट स्थिति होती असें दिसत नाहीं. 'इकडील मजकूर तरी, आजदोन मास मोगलांशीं लढाई होत आहे. दोन लढाया उत्तम जाहल्या, ते समयीं मोगलांचा मोड झाला, श्रीमंतांची फत्ते जाहली. एक बळवंतराव गणपत स्वामीच्यावरी खर्चले एवढी गोष्ट ईश्वरें वाईट केली. त्यांचे स्त्रीनें आपले सार्थक केले. गोविंद बल्लाळ यांस अंतर्वेदींतून नजीबखानाच्या मुलखांत रसद बंद करावया निमित्त बोलाविलें होतें. ते येऊन मेरटेस पावले. रसद बंद कांहीशी केली. हें वर्तमान गिलच्यांस कळतांच पांच सात हजार फौज यमुना उतरोन पाठविली. गाजुद्दीन-नगराजवळ कांहींसें युद्ध झालें, नेव्हां सोसेनासें पाहिलें, मग निघाले. गोविंदपंताचें ठिकाण अद्याप लागलें नाहीं.' [इ सं. ऐ. टि. ३·३३].

ता. २२·११·१७६० रोजीं जनकोजीनें अब्दालीवर जी चढाई केली, ती

मेहेंदळ्याच्या चुरशीनें अंगीकारिली, आणि सदाशिवरावानें हुकूम केला असतांही मेहेंदळे जनकोजीच्या मदतीस गेला नाही, असें बखरकार म्हणतो, तें खरें वाटत नाहीं. वरील पत्रांत त्याचा उल्लेख नाही, आणि हुकमाची अवज्ञा यत्किंचित् सहन करण्याचा सदाशिवरावाचा स्वभाव नव्हता. वरील लढाईत जनकोजीचा व रोहिल्यांचा सडकून सामना झाला. शेंकडों स्वारांचे व घोड्यांचे मुडदे पडले. रोहिल्यांचे असंख्य लोक कापून व त्यांच्या तोफा हिसकून घेऊन त्यांस शिंद्यानें परत त्यांच्या गोटांत घातलें. रात्र झाल्यामुळें जयाची वाद्ये वाजवीत जनकोजी छावणींत परत आला. या लढाईपासून अब्दालीनें चांगलीच शिकस्त खाल्ली. आपणास पुढें निभावण्याची फारशी आशा नाही असें पाहून बायकामुलांस मारून पळून जाण्याची सुद्धां त्यानें तयारी केली. [एल्यट पु. ८.१५६]. जनकोजीच्या विजयानंतर दोन आठवडे पर्यंत महत्त्वाची हालचाल उभय पक्षीं झाली नाही. तिकडून गोविंदपंतानेंही अब्दालीची रसद बहुतेक बंद पाडिली, तेव्हां फौजेस हिमत चढाविण्याकरितां कार्तिक व. ३० स [७.१२] कांहीं निवडक अफगाण व रोहिल्यांच्या तुकड्या छावणीच्या मध्यभागावर म्हणजे पेशव्याच्या फौजेवर चालून आल्या. अमावास्येच्या दिवशी अंधार पडल्यावर मराठ्यांस पेचांत धरण्याचा अब्दालीचा विचार असावा. ही आयती चालून आलेली संधि साधून आज शत्रूशी दोन हात करून सर्वांस आपला पराक्रम दाखवावयाच्या निश्चयानें बळवंतराव मेहेंदळे हुजरातीचे वीस हजार स्वार घेऊन समोर येणाऱ्या मुसलमानांवर चालून आला. सायंकाळी चार वाजता लढाईचें तोंड लागलें. तास दोन तास गोळागोळी होऊन मग तोफांचा मारा सुरू होऊं लागला. या वेळीं मराठ्यांचा तोफखाना बरोबर नव्हता. तोफांच्या मारापुढें कच खाऊन लोक परत येऊं लागले, तेव्हां बळवंतरावानें स्वतः मोठा नेट करून आपल्या लोकांस परत फिरविलें; आणि हरहर महादेव अशी गर्जना करून आपण सर्वांच्या पुढें होऊन लोकांस गिलच्यांच्या अंगावर घातलें. त्या हातघाईत बळवंतरावास गोळी लागली, आणि तो खालीं पडला, त्या वेळीं त्याचें शीर कापून नेण्यास मुसलमान धावले असतां अकलूज येथील खंडेराव नाईक

निंबाळकर यानें बळवंतरावाच्या प्रेतावर पडून तें शत्रूंच्या हातीं लागूं दिलें नाहीं. मुसलमानांची फौज अगदीं मराठ्यांच्या खंदकाजवळ आलेली पाहून शिंदे-होळकरांनीं आपल्या फौजा हुजरातीचे मदतीस पाठविल्या. तेव्हां दोन तीन हजार पठाण कापले गेल्यावर शत्रूची फौज मागें फिरून आपल्या छावणींत गेली. बळवंतराव मेहेंदळे याचा शेवट ऐन तारुण्याच्या भरांत असा हृदयद्रावक झाल्याबद्दल मराठ्यांच्या छावणींत मोठा शोक झाला.

बळवंतराव उ० रामचंद्र गणपत मेहेंदळे हा सदाशिवरावाचा श्यालक असें मध्यविभाग १ पृ. १५७ वर लिहिलें आहे तें बरोबर नाहीं. सदाशिव-रावाच्या बायका दोन उमाबाई व पार्वतीबाई. दोघीही मेहेंदळ्यांकडच्या नव्हत. पार्वतीबाई कोल्हटकरांकडची. बळवंतराव मेहुणा असून त्याच्या तंत्रानें सदाशिवराव वागे, या दोनही गोष्टी काल्पनिक होत. बळवंतराव नाना फडणिसाचा मातुल होय.

तिसरा महत्त्वाचा प्रसंग मार्गशीर्ष शु. १५ (२२ डिसे.), चा गोविंदपंताचे मृत्यूचा. पंतानें अब्दालीस कसा शह दिला होता त्याचा तपशील ६.५३२–५३८ यात सांपडतो. हा शह उडविण्यासाठीं शिकारीचें निमित्त काढून शहावल्लीखानाचा पुतण्या आताईखान यास अब्दालीने दहा हजार निवडक स्वारांनिशी गुप्त रीतीनें यमुनेपार गोविंदपंतावर रवाना केले. तीन चार प्रहरांत वीस पंचवीस कोसांची दौड करून दिवस मावळण्याच्या सुमारास गाजुद्दीननगराजवळ आताईखानानें गोविंदपंतास गांठिले. बांड्या रंगाचें होळकरी निशाण पुढे करून हे स्वार त्याजवर आले, तेव्हां ते शत्रू असतील असे पंतास वाटले नाहीं. जवळ येतांच त्यांनी कापाकापी सुरू केली. शत्रू किती आहे याचा अंदाज न लागल्या-मुळ पंताची फौज कांहीं लढली व कांहीं पळाली. स्वतः पंत व त्याचा मुलगा पळून गेले. पळतांना पंत घोड्यावरून पडला, त्याबरोबर शत्रूंनी त्याचें शीर कापून घेऊन ते अब्दालीस दिलें. बुंदेल्याचे दोन तीन हजार लोक मारले गेले. दुसरे दिवशीं अब्दालीनें तें शीर सदाशिवरावाकडे पाठविलें. सदाशिवरावानें पंताचे मुलास समाधानीचीं पत्रें पाठवून बुंदेलखंडांतील व्यवस्था दक्षतेनें ठेवण्या-

विषयीं लिहिलें [१.२७२]. या दिवसापासून मराठ्यांच्या फौजेची छबी मावळली. गोविंदपंत अब्दालीची रसद मारण्याचें काम चांगलें करीत होता, हें काशीरायाच्या बखरीवरून उघड होतें. या कामांत मराठ्यांचा हातखंडा होता. दररोज सकाळीं पुष्कळशा झुंडी लहान मोठीं तट्टें बरोबर घेऊन दूरपर्यंत चहूंकडे हिंडत; आणि लांकडे, गवत, धान्य, मिळेल तेथून पैदा करून सायंकाळी छावणींत परत येत. गोविंदपंताचे मृत्यूनंतर हा प्रकार त्वरेनें बदलला.[1] पानपतावर कोंडले गेल्यावर रसद मिळविण्याचे शक्य ते प्रयत्न करण्यांत सदाशिवरावाने कसूर केली नाहीं. गवत आणण्यास कही बाहेर जाई, त्याजबरोबर हजार हजार स्वारांच्या टोळ्या तो रसद आणण्यास पाठवी. तसेंच लमाणांचे तांडेवाल्यांस बोलावून आणून त्यांस उत्तेजन व मदत देई; आणि जो कोणी हिकमतीने लमाण आणून पोचवी, त्यास कडी, तोडे वगैरे देऊन त्याचा सन्मान करी. पश्चिमेकडचा रस्ता खुला होता, परंतु तिकडे अरण्य व झाडी फार होती. गिलच्यांची हिंमत वाढत गेली तेव्हां त्यांनी हा पश्चिमेकडचा रस्ताही बंद करून टाकिला. मराठ्यांच्या सर्व बाजूंस गिलच्यांच्या टोळ्या फिरूं लागल्या आणि बाहेर पडेल त्यास बेलाशक तोडूं लागल्या. अशा विपन्न स्थितींतही सदाशिवरावाच्या तोंडून गैरहिमतीचें अक्षर निघालें नाहीं. खजिन्यांतील नाणे सर्व खलास झाले, तेव्हां बरोबरचें चांदी गोन्याचे सर्व सामान काढून फौजेत नवी टांकसाळ उभी करून रुपये व मोहरा पाडण्याचा क्रम सुरू केला. एका बाजूस बादशाही शिक्का कायम ठेवून दुसऱ्या बाजूस भा. ज. म. म्हणजे भाऊशाही, जनकूशाही व मल्हारशाही, अशा अक्षरांचा ठसा होता. परंतु हीं नवीन नाणी सुद्धां पंधरा दिवसांत खलास झाली. पानपत गावांत होतें नव्हतें ते सर्वच मराठ्यांनी घेतले, आणि आजूबाजूचा पांचपंनास मैल परीघाचा प्रदेश त्यांनीं सर्व खाऊन टाकिला. अब्दालीच्या छावणीवरही अनेक वेळां

---

१ टीप.—खं. १ प्र. पृ. ६८ वर व इतरत्र गोविंदपंतावर व एकंदर कऱ्हाडे जातीवर रा. राजवाड्यांनीं निष्कारण आरोप करून जी निंदा केली आहे, तिने इतिहास विषयास वैगुण्य येतें, म्हणून त्याचा उल्लेख मुद्दाम टाळिला आहे.

छापे घालण्यास स० रा० नें कमी केलें नाहीं. सोनपत पानपतच्या पश्चिमेकडून बिकानेरच्या मुलखांत जाण्यास मध्यें कांटेरी झुडपांचें दाट जंगल असल्यामुळें त्या बाजूनें निघून जाण्यास मराठ्यांस मार्ग नव्हता. उत्तरेस कुंजपुऱ्याकडून व यमुनेच्या कांठानें मराठ्यांस कोणत्याही प्रकारची मदत मिळूं नये असा सक्त बंदोबस्त अब्दालीनें केला, तेव्हां मात्र मराठ्यांचे हाल सुरू झाले.

अशा स्थितींत सुटकेच्या नाना प्रकारच्या सूचनांचा खल सारखा चालूच होता. नानासाहेबास पत्रें जात असल्यामुळें तिकडून दुराणीवर शह येईल, निदान आपणास रसद तरी येऊन पोचेल, अशी सदाशिवरावास अखेर पर्यंत आशा होती. पण त्याची पत्रेंच बाहेर पोचलेली दिसत नाहींत. तापट स्वभावमुळें स० रा० स समोर कोणी उलट बोलत नसेल, तथापि लहान मोठ्या सर्व मंळळीचा सल्ला घेऊन सर्वांशीं पूर्ण वाटाघाट त्याने केली नसेल हें संभवत नाहीं; आणि कितीही दिमाखाचा मनुष्य असला तरी सर्वस्वनाशाचा प्रसंग आल्यावर, तो कोणाचेंच ऐकणार नाहीं हेंही संभवत नाहीं. त्याचें धैर्य अलोट असल्यामुळें, जनानखाना तसाच ठेवून पळून जाणें, अगर त्यांस स्वहस्तानें कापून काढणें किंवा अब्दालीस शरण जाऊन स्वाधीन होणें, असले लांछनकारक मार्ग त्यानें पसंत केले नाहींत, किंवा अखेरपर्यंत त्याने हिंमत सोडिली नाहीं. उत्कृष्ट फौज, सरदार व जम्यत तोफखाना आणि सर्वांची अप्रतिम हिंमत यांचे योगानें आपण आलेला प्रसंग निभावून नेऊं, अशी त्यास अखेरपर्यंत खात्री वाटत होती. इब्राहीमखानासं वचन दिलेलें असल्यामुळें पळून जाण्याचे विचारास थारा देतां येईना. एकदां कांहीं मंडळींनी पळून जाण्याचा बेत केला असतां इब्राहीमखानाने आपल्या तोफा त्यांजवर रोखून त्यांस थांबविले.

इकडे सुजाचे मार्फत अब्दालीशीं तहाची वाटाघाट बंद पडली नव्हती. 'पूर्वीही सल्याचें राजकारण हंमेशा येतच होते. मल्हारबा वगैरेंचें मत होतें कीं सल्ला करावा. पण भा० सा० ऐकेनात (६·४०९). दुराभिमानास प्रवर्तले. महागाई भारी. माणसे घोडीं खाया विना उठलीं.' सदाशिवरावाची व एकंदर फौजेची ही विलक्षण हिंमत पाहून अब्दालीस सुद्धां आतिशय

अचंबा वाटला. गनिमी काव्यानें लढणारे मराठे आपणा पुढें ठांसून उभे राहणार नाहींत अशी त्याची समजूत होती. इब्राहीमखानास मराठ्यांकडून फोडून आपल्या बाजूस आणण्याचा त्यानें अतिशय प्रयत्न केला. एवढा हा इसम आपले पदरीं असता तर इराणपासून दिल्ली पर्यंतचे सर्व बंडावे आपण लगेच मोडले असते असें तो म्हणे. वास्तविक मराठ्यांची व अब्दालीची सारखीच कुचंबणा होती; आणि दोघांचाही स्वदेशाचा मार्ग एकमेकांकडून अडविलेला होता. अब्दालीस थोडी बहुत रसद मिळत होती; बाकी एवढें साहस करण्यासारखें त्यास कांहीं साधावयाचें नव्हतें. नजीबखान मध्यें नसता तर कांही तरी तडजोडीचा सलूख होऊन ही पकड सुटली असती. जयाप-जयाचें पारडें दोनही बाजूंस सारखें खाली वर होत होतें. एकदम जोराचा हल्ला करून प्रतिपक्षाचा पाडाव करून निभावून जाऊं अशी उमेद एकासही नव्हती, कारण दोघांचाही बंदोबस्त अगदी परिपूर्ण होता. अशा स्थितींत जानेवारींत मराठ्यांची उपासमार होऊन गळ्याशीं आल्यावर निकरानें अब्दालीवर घुसून जाण्याशिवाय दुसरा मार्ग मराठ्यांस राहिला नाहीं. कांहीं खटपटीनें रजपुतांकडून व जाठाकडून त्यांस थोडी अन्नसामुग्री आली, परंतु ती लगेच खल्लास झाली.वीस लाख खजिना दिल्लीत येऊन पडला होता, पण पुढें तो येण्याची सोय नव्हती. तेव्हां पारांजीपंत वाघ व गोविंदपंताचा पुत्र असे भग्न फौज घेऊन दिल्लींत असतां खजिना आणण्याविषयी सदाशिवरावाचीं पत्रे निकडीचीं आल्यावरून ता. २-१-१७६१ रोजीं पाराशर दादाजी तीनशे स्वार घेऊन व प्रत्येकापाशीं पांचपांचशे रुपयांची एकेक थैली देऊन दिल्लीहून पानपताकडे निघाला. बंदो-बस्ताकरितां आणीक ५०० स्वार बरोबर होते. ता ४ रोजी ते रात्री वाट चुकून अब्दालीच्या लष्करांत गेले, कारण त्याच दिवशी अब्दालीची कांहीं फौज नेहमीची जागा सोडून दिल्लीचे बाजूस आली होती. रात्रीचे वेळी हे मराठे स्वार पेटलेल्या शेगटीजवळ शेकत बसले असतां ते मराठ्यांचा खजिना घेऊन चालले आहेत अशी मुसलमानांस खबर लागतांच, त्यांनीं एकदम कापाकापी सुरू केली, तेव्हां बराचसा खजिना शत्रूचे हातीं लागला. कांहीं थोडा भाग मात्र

सदाशिवरावाचे लष्करांत येऊन पोचला. [खं. १ टीप ३२४). पाराशर दादाजी त्या प्रसंगांत मारला गेला की जिवंत आला याचा पत्ता लागत नाहीं. इतकें झाले तरी सदाशिवरावाची हिंमत खचली नव्हती, आणि त्याच्या फौजेची अगदीं निकृष्टावस्था होत आहे, हा प्रकार अब्दालीसही ठाऊक नव्हता. रोहिले व सुजाउद्दौला हे त्यास वारंवार आग्रह करीत कीं, एकवार निकरानें हल्ला करून निघून जावें. त्यावर अब्दालीने एवढेच उत्तर द्यावें की लढाईचें एवढे काम सर्वथैव माझ्या मर्जीवर ठेवा. इतर सर्व व्यवहार तुम्ही पाहिजे तसे करा. आपल्या छावणीच्या समोर कांहीं अंतरावर त्याने एक लाल तंबू ठोकिला होता, त्या ठिकाणी तो दररोज सकाळी नमाज पढण्यास व सायंकाळीं भोजनास येत असे. दिवसभर घोड्यावर बसून सारखा हिंडत राही. रोज पन्नास साठ मैलांपेक्षां त्याचा फेर कधी कमी होत नसे. रात्री पांच हजार स्वारांचा जाप्ता तो शत्रूंवर नजर ठेवण्यास पाठवून देई, आणि अशाच दुसऱ्या टोळ्या आपल्या छावणीच्या सभोवार फिरतीवर ठेवी. तुम्ही खुशाल स्वस्थपणें झोपीं जा, अशी सूचना त्याने आपल्या दोस्तांस देऊन ठेविली होती. 'पानिपतकरी अडीच महिने मोर्चेबंदी करून राहिलो. सड्या फौजा पुढें, मागे बुणगे, याप्रमाणे मोर्चे बांधून, तोफा पसरून राहिलो होतो. एक लढाई कार्तिक शु. १५ मेस व दुसरी वा ३० स झाली. दोनही लढायांत दोहींकडील फौजा कायमच होत्या. गिलचा आमचे लष्करा भोवता फिरोन रसद बंद केली. वैरण जाळली. यामुळे लष्करांत काळ पडला, दोन अडीच शेर दाणे झाले. लोकांस अन्न न मिळे. घोडी तो बहुत लोकांची मेलींच होती. राहिली तीही पोटामुळें तुटली होतीं. निदानीचा प्रसंग जाणोन पौष शु. ८ स बुधवारी हल्ला केला' [६.४०६]. सदाशिवरावाची कुचंबणा होऊं लागली तेव्हां तो काशीरायास वारंवार पत्रे लिहून तह करण्याची खटपट निकरानें करूं लागला. अब्दालीस हा प्रकार काशीरायाने कळविला, तेव्हां त्यानें जबाब दिला, तहाची वगैरे भानगड मी जाणत नाही. मी फक्त लढाईकरितां आलों, आणि तेवढें काम मी करीन.' सुजाउद्दौल्ला वगैरे मंडळींच्या मनांत

तह घडवून आणावा असें होतें. परंतु अशी कांहीं व्यवस्था जुळण्याच्या बेतांत आली म्हणजे नजीबखान ती साफ मोडून टाकीत असे. तो म्हणे, मराठ्यांची कौज शाबूद असतां तह करून अब्दाली निघून गेल्यावर मागाहून ते पुरेपूर सुड घ्यावयास चुकावयाचे नाहीत. दिवसेंदिवस मराठा छावणीची अगदी दुर्दशा होत चालली. हजारो जनावरें मरून लहानशा जागेत भयंकर दुर्गंधि सुरू झाली. भुकेने सर्वांचे प्राण कासावीस होऊं लागले. प्रत्येकाच्या डोळ्यांसमोर भावी परिणामाचे चित्र मूर्तिमंत उभें राहूं लागले. जिवावर उदार होऊन पुष्कळ टोळ्या हरप्रयत्नानें सामान आणण्यासाठीं बाहेर गेल्या, त्यांस पठाणांनी साफ कापून काढिले. शेवटी काहीच उपाय राहिला नाही, तेव्हां सर्वांनी येऊन सदाशिवरावाची विनंति केली कीं आम्हांस आतां असे भुकेने मारूं नका. शत्रूंशी दोन हात करून तरी एकदांचे मरूं द्या. शनिवार ता. १०·१·१७६१ रोजीं मकरसंक्रांतीचा दिवस सर्वांनीं आनंदान साजरा केला. पुढें दोन दिवस मराठ्यांना आपापली शक्य ती व्यवस्था लावून, बुधवार पौष शु० ८ शके १६८२ रोजी पहांटेच शत्रूवर चाल करून निघून जाण्याचा बेत ठरविला. सर्व बाजूंस मोठमोठे सरदार तसेच समोर व बाजूंना तोफखाना असा गोल बांधून, मध्ये कबिले घेऊन लढत लढत शत्रूचा फळी फोडून निघून जावे असा सर्वानुमते निश्चय झाला. जवळ जवळ मध्यरात्री पर्यंत व्यवस्था लाविल्यावर रात्रीच एक शेवटची चिठ्ठी सदाशिवरावाने काशीरायास लिहिली. 'आतां पात्र कांठोकांठ भरले. एक बिंदुही ज्यास्त राहणे शक्य नाही. तेव्हां सलुखासंबंधाने काय तो निकाल तात्काळ करावा.' बुधवार ता. १४·१·६१ रोजी पहांटे ही चिठ्ठी काशीरायानें सुजाकडे आणिली. त्याचा विचार होऊन काशीराय अब्दालीकडे त्याच्या तंबूंत जातो तो, मराठे सज्ज होऊन चालून आले अशी बातमी अब्दालीस आली. 'आजचा दिवस दम खा, मग याचा निकाल करूं,' असा जबाब अब्दालीने दिला तो स० रा० स वाटेंतच मिळाला. पण त्याचा आतां उपयोग नव्हता.

८. पौष शु. ८ ची प्राणाहुति.—पानपतच्या या शेवटच्या संग्रामाचा दिवस

बुधवार पौष शु. ८ शके १६८२, १४ जानेवारी १७६१ होय. उजाडतांच मराठ्यांच्या फौजा आपणांवर चालून आलेल्या मुसलमानांस दिसल्या. इब्राहीम-खानाने स० रा० स प्रणाम करून आजपर्यंत खाल्लेल्या अन्नाचें चीज आज कसें करून दाखवितो पहा असें म्हणून, तोफांस सरबत्ती दिली. तेव्हांपासून पुढें एकंदर लढण्याचा प्रकार कसकसा बनत गेला, त्याचा योग्य तपशील लष्करी दृष्ट्या समाधानकारक असा मिळत नाहीं. सबब रणांगणावर हजर असलेल्यांचीं पत्रे आहेत, तीं प्रथम देऊन, मग त्यांत बखरींतून भर घालणें बरें. नाना फडणिसाने लिहिलेली हकीकत विस्तृत व खुलासेवार आहे ती अशी (का. सं. प. या. ५३). 'श्रीमंतांचे बुद्धीस भावी अर्थ तेणेंकरून विपर्यास पडला. आप्त बळवंतराव व नाना पुरंदरे वगैरे अनाप्त जाले. जे शहानवाजखानी, भवानीशंकर वगैरे अनाप्त ते आप्त झाले. त्यांचे वाक्याचे ठायी विश्वास, तेणेंकरून आपली रीत युद्धाची सोडून यवनाची रीत धरिली. परस्परें युद्ध होत असे. शत्रूचे गोळे प्रत्यही राहुटीवरून जात. मातुश्री व स्त्री भयभीत होत, कीं कसे होईल! ते समयीं मातुश्रीस विनंति करीत गेलों, ईश्वरी लक्ष असावे. त्यांत बळवंतराव युद्धांत पडले. या दोन माहिन्यांत मनुष्यें पशु बहुत मेले. अन्नाची महर्गता, दुर्गधी एकेच ठिकाणी, असे श्रम पाहिले. थोरले युद्ध उदयीक होणार, तो पूर्व दिवशी संकेत कीं पराजय आपला जाहला तरी शत्रूचे हातीं आपलें व श्रीमंतांचें कुटुंब लागूं देऊं नये. आपणच नाश करवावा. आपण तर वांचत नाहीं असा सिद्धान्त करून श्रीमंतांनीं याचीही योजना केली. दुसरे दिवशी तयार होऊन प्रातःकाळचे दोन घटिका दिवसास युद्धास गोळागोळीचा प्रारंभ झाला. श्रीमंत अति बुद्धिवान, धैर्यवान्, शूर, कृतकर्मे, गर्व मात्र विशिष्ट, परंतु तर्तूद फारच सैन्याची वगैरे केली. शेवटीं निशाणाजवळील तर्तूद एकीकडे जाऊन, शत्रूची मुख्य स्थानीच गांठ पडली. मी श्रीमंतांसंनिध ईश्वर स्मरण किंचित् करून असें. तों विश्वासराव यांस गोळी लागली, पडले. ते हत्तीवर श्रीमंतांनी घालून उभेच राहिले. तो पठाण पाय उतारा आंत येऊन मिसळले. तोडातोडी होऊं लागली; आणि डावे

बाजूचे मातबर सरदार चौघड्याचे धनी देखील पूर्वीच पळाले. उजवे बाजूचेही होळकर शिंदे निघोन निशाण निघालें. दोन तीन शत पायदळ होतें. श्रीमंत दिसेनासे झाले. तेव्हां ईश्वरें बुद्धि दिली. माघारे फिरलो. प्रथम युद्धांत बापूजीपंतीं (हिंगणे) बोध केला, माघारे फिरावे. त्यांस उत्तर केले कीं अशा समयीं श्रीमंतांस सोडणें ठीक नाहीं. परंतु पुढे याप्रमाणें जहालें. लक्ष सैन्य असतां एकही त्या समयी श्रीमंतांस आप्त न जाहला. बहुत दिवस अन्न भक्षिलें. कृपा पुत्रवत् केली. चांगला काळ होता तेव्हां केंसास धका लागल्यास प्राण देऊं अशा प्रतिज्ञा. परंतु ईश्वरघटित विपरीत काळ, त्यांत सोबती कोण होतो! सर्व सुखाचे सोबती, निदान कोणी नाही. सर्व वाताहत जहाले. मी सायंकाळचे दोन घटका दिवसास पाणिपतांत आलों. तेथे परमेश्वरे वाट दाखवावयापुरते रामाजीपंत (दाभोळकर) उभे होते. सांगूं लागले, घोडे वस्त्रे टाकून द्यावीं. शुद्ध लंगोटी लावून बसलों. रात्र जहाल्यावर चाललो. तों एका कोसांत तीन चार वेळ टोपीवाल्यांनी शरीरास हात लावून झाडा घेतला. दर खेपेस समागमेचे दहावींस तोडून टाकीत. त्यांत मी राहिलो हे सत्ता ईश्वराची. परंतु बापूजीपंत, रामाजीपंत (आमचे बरोबर) राहतच गेले. असे जातां दहा बारा कोश पश्चिमेस गेलो. तों तेच शत्रु येऊन रामाजीपंत व बापूजीपंत यांस जखमी भारी केले. पडले. मी एकटा राहिलो, तो गवतांत ईश्वरे माझें रक्षण केलें. पुढे दो कोशांवर मागती दृष्टीस पडले. तो मागती तृणांत जाऊन बसलो. तों जवळ येऊन काढूं लागले. मग गेले. पाणिपतावर शक्ति बहुत क्षीण, पण पादचारी अभ्यास नसतां, सोळा सत्रा कोस अन्नोदकाव्यतिरिक्त आलो. क्षुधा तिसरे प्रहरी लागली, तेव्हां बोरीचा पाला सांपडला तो खाऊन पाहिला. तो तोंडांत जाईना. तसाच सायंकाळीं एका ग्रामाबाहेर आलो. तों एका बैराग्याने पीठ आणून दिले. त्याची भाकर खादली ती अमृतप्रमाण लागली. नंतर निद्रा केली. प्रातःकाली दुसरे गांवास गेलों. एका साहुकारानें भोजन घातले. तों शत्रूचे स्वार गांवांत आले. तेव्हां पायउतारा होऊन चाललों. असे सात दिवस समागमेची मंडळी सुद्धां रेवडीस आलों.

तेथें बालोराव म्हणून चौघे भाऊ माझें नांव ऐकून असत, त्यांनीं घरीं नेऊन भोजनाचें साहित्य दिल्हें. तेथें सात दिवस राहून एक लग्न निघालें त्याबरोबर दीग भरतपुरास निघालों. वाटेंत कृष्णंभट वैद्य आले. त्यांनी सांगितलें स्त्री विरोजी बारावकर यांणा सांभाळून आणिली, ती नारोपंत गोखल्यांचे घरीं आहे. तेथें गेल्यावर भोजन क्षिरीचे घातलें. आनंद झाला. मग गाडी करून स्त्रीसह डिगेस आलो. तेथें पुरुषोत्तम महादेव वानवळे याचे गुमास्त्याचे बिऱ्हाडास होते, त्यांजकडे गेलो. तेथें महिनाभर होतो. वस्त्रे वगैरे भोजनाचे साहित्य चांगले केले. तेथून मातुश्रीचा शोध फार केला. घरचा खिजमतगार बराबर होता, त्याने सांगितले की घोड्यावरून पडून जखम लागून मेली.* पुढे ढवळपुरावरून ग्वालेरीस सगळे लष्कर पळून पार्वतीबाई, नानापुरंदरे, मल्हारजी होळकर, सारे होते तेथे आलो. पुढें लष्कराबरोबर येत असतां श्रीमंत नानासाहेबांचे दर्शन ब्रह्माणपुरावर जहाले. त्यांचे शरीर फार क्षीण, मर्जी बेतऱ्हा, बहुतांच्या अबृ क्षणां जातात. परंतु मजवर सदयतेनें लोभेकरून वर्तमान पुशिले, सांगितले. तीनचार दिवस बरोबर राहिलो. गोपिकाबाई व नारायणराव यांस देवी आल्या. करितां त्यांसहवर्तमान नर्मदातीरी राहिलों. परस्परे उभयतांचे चित्तही ठीक नाही हे कळले. कालवैपरीत्यें न घडावयाचे तेही घडले. तदनंतर या मर्जीत कसे होईल जाणून निरोप घेतला की टोक्यास पुढें जातो. जावे म्हणून आज्ञा दिली. टोक्यास येऊन राहिलो. श्रीमंतही मागाहून तेथेंच येऊन राहिले. एके दिवशी प्रदोष तेथे पडला. ते दिवशी श्रीमंत थोरले राव यांचें श्राद्ध. मला भोजनास बोलाविले. गेलो. एकीकडे माधवराव व एकीकडे मला बसविले. दुसरे (म्ह० नूतन) स्त्रीकडून वाढविले. नंतर आज्ञा घेऊन कांही दिवस गंगातीरी राहिलों. श्रीमंत पुण्यास गेल्यावर शेवटील समय, लवकर यावे ह्मणून पत्रे आली. तो पारनेराअलीकडे वर्तमान ऐकिले की कैलासवास केला. '

---

* **टीप**–नाना फडणिसाची आई रखमाबाई ही बळवंतराव मेहेंदळयाची बहीण. हिला एकच मूल झालें तो नाना फडणीस होय. जन्म १२·२·१७४२.

फेब्रुवारी २१ चें उज्जनीचें पत्र. 'भा०सा० व जनकोजी शिंदे दोघे मात्र कांही थोडीशी फौज घेऊन जे समयीं लढाई जाहाली, ते समयीं झुंज मातबर जाले. गिलचे मारले गेले चाळीस हजार, दोन मातबर सरदार पडले. सावकारी खबर आहे की मलकाजमानीचा जांवई उमरशहा, गिलच्याचा लेक, झुंजांत ठार झाला. तोफेचा गोळा लागून मारला गेला. नजीबखानास भारी जखम लागली, एक भुज उडोन गेली. वरकड आणखी सरदार मेले. लढाईच्या समयीं हेव (मराठे) चालोन गेले. लष्करांत खावयास अन्न मिळेना म्हणोन चालोन गेले. लढाई जाली, ते समयीं यांनीं तों त्यांचा मोड केलाच होता. परंतु भा० सा० हत्तीवरून उतरले, ते समयीं आपलेकडील सरदारांनीं मागें पाहिले, तों सरदार (भाऊ साहेब ?) दिसेना. गिलच्यांकडील फौज दोन हजार रूसून आलेली भा०सा०नीं ठेविली होती, ती इब्राहीमखान पडलेला पाहून माघारी पळोन वुणग्यांत आली. तेणेंकरून वुणग्यांत भ्रम पडला कीं गिलच्यांचा जय जाला. यामुळे वुणगे लुटले गेले. विश्वासराव दिसेनात म्हणोन श्रीमंत भा०सा० हत्तीवरून उतरले इतकाच फेर पडला. यामुळे त्यांनीं मोड खाल्ली. नाही तर फत्ते जहाली होती. मोडलेले सर्व एका जागां भिडेवर जमा झाले.' [इ. सं. ऐ. टि. १·१४].

दुसरे एक नाना फडणिसाचे पत्र. 'तीन प्रहर युद्ध चाललें तो विश्वासराव गोळी लांगून पडले, हे वर्तमान लोकांस समजतांतच धीर सुटला. कोणी-कोणाचें ऐकेना. जीव बचावण्यासाठीं धूम पळत सुटले. मातुश्रीची चुकामूक झाली. शोधार्थ माणसें पाठविलीं. पैकी एकाने येऊन बातमी सांगितली कीं शत्रूंचे हातीं पडूं नये म्हणून तिने एका माणसास सांगून आपला वध करविला. पळालेले लोक कांहीं मारवाडाकडे, काहीं जयनगरकडे व कांही जंबुरकडे गेले, कांहीं भागीरथीपार निघाले. चाळीस हजार लोक कापला गेलीं. घोडा साठ हजार होता, पैकीं सहाएक हजार जिवंत राहिला. तोफा सामान वगैरे सर्व गेलें. तमाम फौज उखळून गेली. नारोशंकर दिल्लीचे बंदोबस्तास होता. जवळ सात आठ हजार फौज, व सरकारी खजिना पांच लाख, आणि शिंदे

व सावकारांचा खजिना पांच सहा लाख असा होता. तो सर्व ऐवज तसाच टाकून, पानपतचें वर्तमान कळतांच, फौजेसह दिल्लीतून त्वरेनें पळून गेले. दिल्ली जागा चांगली मजबूद, आंत तीन चार महिने पुरेल इतका दारूगोळा व पोटगी भरपूर होती. त्यावरून त्यांस तेथें निर्भय व सुराक्षित राहतां आले असतें. नारोशंकर पळून न जाते तर पानपतावरून आलेल्या फौजेस आश्रय मिळून तेथेंच सर्वांस ठांसून राहतां आलें असतें. गिलचे कांहीं त्यांच्या पाठलागास आले नव्हते. नारोशंकरानें पळ काढिल्यामुळें अब्दालीने सात दिवसांनीं येऊन दिल्लीचा कबजा घेतला. सुरजमल्ल व माधोसिग यांचे वकील येऊन त्यास भेटले. नंतर तो त्वरेनें स्वदेशी निघून गेला ' [४·३·१७६१,– मार्क्डोनेल क्र. ना. फ. च. पृ. १७२].

पिलाजी जाधवाचा मुलगा सटवोजी जाधव पानपतावर होता त्यानें धाकटा भाऊ सुभानबा यास लिहिलेली पळाची हकीकत मनोरंजक आहे. त्याचे ता. ९·२·१७६१ चें पत्र (६·४०६). ' पौष शु० ८ स पुढे फौजा, त्यापुढें तोफखाना बुणगे पाठीवर, समागमे घेऊन निघोन मोगलांवर चालून जाऊन झुंज उत्तम प्रकारें केले. अडीच तीन प्रहरपर्यंत झुंज चांगलेंच झालें. राजश्री विश्वासराव यांस गोळी लागून ठार झाले. इब्राहीमखान गारदी यास गोळ्या लागून ठार जाले. वरकडही किल्येक लोक कामास आले. आपले फौजेनें शिकस्त खादली. ज्यास जिकडे सोय पडली तिकडे निघाले. कोणी कोणास मिळाले. मल्हारजीबाबा हजार दोन हजार फौजेनिशी निघाले. दिल्लीत नारोशंकर पांच सात हजार फौजेनिशीं निघोन सौ. पार्वतीबाई दोन चारशे स्वारांनिशी निघाली होती, त्यांची मल्हाररावांची गांठ पडली, त्यांजला ते संभाळून घेऊन चमेलीपार भदावरच्या मुलखांत गेले. वरकड फौज बाळोबाच्या मुलखांतून ज्यास जिकडे वाट फुटली तिकडून निघाली. वाटेनें गांव मातबर. गांवोगांव राउतांचा भरणा. दोन रोज रात्रंदिवस गवारांचें झुंज पुरवले. घोडी थकोन गेलीं. कोणाचें घोडें निभावलें नाहीं. तमाम फौज पाय उतारां झाली. आम्ही मागाहून गाड्यांत व डोल्यांत बसून हळूहळू कुंभेरीस आलों. तेथून भरतपुरास जात होतों तों, ५ कूर सुरजमल्ल सामोरे येऊन भेटले. फिरोन

ते व आम्ही समागमें कुंभेरीस आलों. तेथून मल्हारजीबावांकडे पत्रें लिहून पाठविली आहेत. दो चौ रोजांनीं त्यांचे उत्तर आले म्हणजे, येथून स्वार होऊन सिपरीस जाऊं. पार्वतीबाई व मल्हारजी होळकर जिवानिशीं मात्र गेलीं. भाऊसाहेब कोणीकडे गेले त्यांचें अद्यापि ठिकाण नाहीं. जनकोजी शिंद्याचेंही ठिकाण नाही. वरकड सरदार कोणी पुढें गेले, कोणी अद्याप मागेंच आहेत. सारांश आपले फौजेचा विध्वंस झाला तो लिहितां पुरवत नाही. ईश्वरी सत्तेने होणार ते झाले. सिपरीस गेल्यावर सर्व सरंजाम नवा केला पाहिजे. तुम्ही कोणेविशीं काळजी न करणे. आपले ठायीं सावध राहणे.' खालील पत्र २१ फेब्रुवारीचे राजा अनुपगीर गोसावी याचे नानासाहेबास असून त्यांत विश्वासराव व सदाशिवराव यांच्या अंत्यक्रियेचा उल्लेख आहे (६.४०७). झुंजांत [illegible] रायाशी दुराणी घेऊन आले. त्यांसमागमे बापू हिंगणे होते. ते वर्तमान दुसरे दिवशी तृतीय प्रहरी सुजाउद्दौल्याकडे आलें. त्यांनी रायांचे लोथ आपणांजवळ आणविलें, आणि आज्ञा केली कीं याचे सार्थक यथासांग करणे. तेव्हां आपले डेऱ्यास घेऊन आलो. गणेश वेदांती, गणेश शंकर उज्जनकर, काशीराज वकील व वेणीप्रसाद समागमे होते. तितक्यांत दुराणीचा नशेकची येऊन लोथ परतोन नेले. तिसरे दिवशी शुक्रवारी वर्तमान कळले कीं रणभूमींत स्वामिकार्यानिमित्त थोरथोर सरदार कामासी आले. त्यांसी नबाब-साहेबासी सांगून रणभूमीवर शोध केला. त्यांपैकी एका शरीरास मस्तक नव्हते. त्या शरीराखाली सात मोर्ता सांपडले. त्याचे चिन्ह उजवे पायावर केश नव्हते. कमरेस कट्यारीची जखम होती. सरकारचे खिसमतगार बलराम व वाघोजीनाईक व गणेश वेदांती वगैरे कारकून मंडळी या सर्वांनीं पाहिलें. तेव्हां संताजी वाघांनीं उभयतांनीं हस्तीवर घालून आणिले. मग चंदनादिक विधी करविले. गणेश वेदांतीनें अस्थी भागीरथीसी पाठविल्या. आपणाशीं संदेह निर्माण जाला असेल तर जाठाकडे कांहीं फौजा गेल्या आहेत, त्याची बातमी आणून वकिलांचे पत्रावरून विदित केलें पाहिजे (म्ह० संशयनिवृत्ति केली पाहिजे).' पत्राचे खालीं. ' गणेश शंकर याचे नमस्कार. वर्तमान पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून सर्व विदित होईल.'

याच बाबतीत काशीराज शिव म्हणजे बखरकर्ता काशीराय याने नाना पुरंदऱ्यास लिहिलेलें ता. ३ मार्चचें पत्र असें. ' येथील वर्तमान तों आपणास कल्पत्तच आहे. श्रीमंत भाऊसाहेब व रावजीचें साहित्य केले म्हणून लिहिलें, त्यास त्यांही तों उभय लोक साधन केले. खेरीज पुण्य की योग ऐसा आला असतां चंदनादि संस्कार ब्राम्हणहस्ते जाला. आम्ही असतां न होय तर कोणे कार्यास यावे ! आणीक सेवा न घडली. ईश्वरे हाच वाटा आम्हांस नेमिला होता. भगवादिच्छेस उपाय काय ! गृहस्थ मंडळीचे साहित्यास लिहिले, त्यास आपणाकडील सखोपंत व खंडोपंत वगैरे होते व आणीकही गृहस्थ मंडळी पांचचार शत व पांचसात हजार मनुष्ये आपले सैन्याचीं होतीं. नबाबास उत्तम प्रकारें विनंति करून जें साहित्य व आपलें दास्य, तें करून, फतुराबादेपुढें जठवाडयाकडे मार्गस्थ केले. सुखरूप सेवेशी पावालियां सविस्तर सांगतील. नबाबखानास या प्रसंगामुळें बहुत खेदावह झाले. परंतु उपाय काय ! भगवत्सत्ता खरी. श्रीमंतांचा व नबाबसाहेबाचा स्नेह अविच्छिन्न, अकृत्रिम आहे तोच आहे. या कलेवरास पोष्य वर्गांत जाणून सदैव कृपा पत्रीं सांभाळ करीत जावा ' (६.४०८). यावरून सुजाउद्दौला वगैरेचे अब्दालीशी पुढे मुळींच जुळले नाही. उलट ते पूर्ववत् पेशव्यास आदर दाखवूं लागले. सुजाने व काशीरायानें मराठ्यांकडील मृतांचे और्ध्वदेहिक व जिवंतांचा परामर्ष योग्य प्रकारे केला. तसेच नारोशंकर दिल्लीत ठांसून राहता व पेशवा लगोलग पुढे आला असता तर, अब्दाली तेव्हांच स्वदेशीं निघून गेला असता वगैरे प्रकार व्यक्त होतात.

सुभानबा जाधवास लिहिलेलें दुसरें एक पत्र महत्त्वाचे आहे. ' बुधवारी पौष शु० ८ स मजबुदीनें चालोन गेले. गिलचा गनीम भारी व कट्टा, तथापि आपले फौजांनीं बरीच शर्थ केली. निदानीं शिकस्त खाल्ली, मोड झाला. त्यास जिकडे सोय फावली त्या मार्गे तो निघाला. बहुत लोक आपले फौजेचे मारले गेले. आपले पन्नास हजार घोडे गिलच्यांनीं व गांववाले गवारांनीं घेतले. ऐसी कधींही जाली नव्हती. ईश्वरी क्षोभ हेंच खरें. लोक पायउतारा, अंगा-

वरी पांघरूण नाहीं असे विपत्तीने आले. नारोशंकर व बाळोजी पलांडे दिल्लींत होते, दोनचार हजार फौज होती, ते पुढील पुढें निघाली. मागोन मल्हारराव होळकर आले. हे लढाईतून अगोदरच निघाले होते. यांजवळ प्रस्तुत आठ दहा हजार फौज आहे. होळकर व आम्ही एक जागां ग्वालेरीस आहों. भरतपुरास सुरजमल्ल जाठांनी फार संगोपन केलें. पंधरा वीस रोज तेथें राहिलो. बहुतच त्यांणीं आदर केला कीं, मी तुमचे घरचा, तुमचा चाकर, हें राज्य तुमचे, ऐसे प्रकारे हात जोडून बोलावे. ऐसे थोर माणूस ! त्याणी आपले राऊत व मातबर सरदार बराबर देऊन ग्वालेरीस लष्करास पोचविलें. माणसांचे हाल मोठे झाले. कुल सरंजाम अवघे लष्करचा गेला. तेथे आम्ही आपले निवडून काय लिहावें ! श्रीकृपेनें व वडिलांचे पुण्येंकरून जिवानिशी शाबूद आलो. मुलखांतील तमाम जमीदार बदलले आहेत. धुंदी झाली आहे. श्री. पंतप्रधान सिरोजेवरी आले. आम्हांस पत्रें आलीं कीं तुम्ही व मल्हारजी व त्रिंबक नाना पुरंदरे ऐसे जाऊन गोहदवाल्याचा बंदोबस्त करणे. अब्दालीकडूनही सलूचाचे राजकारण मागती आले आहे ' [६·४०९].

मार्च १९ चे नाना फडणिसाचे पुरुषोत्तम महादेवास पत्र, ' काल पार्वतीबाईनी कूच करून श्रीमंतांकडे सिरोजेस चालली. आम्ही व नाना पुरंदरे समागमेंच आहों. सुभेदार, बाबूजी नाईक, सदाशिव रामचंद्र वगैरे ग्वालेरीस राहिले. श्रीमंतांचे दर्शन जाल्यावर जे होणें ते होईल. परंतु सुरजमल्लाकडे त्यांचें चित्त फार दिसोन आलें. जें करणें ते सुभेदारांचे अनुमतें करितात यास्तव कठीण दिसते. भगवदिच्छाप्रमाण' [६·४१०]. 'श्रीमंत रा. मल्हारराव होळकर यांजपाशी ग्वालेर नजीक पछोरावर[1] आहेत. बाबूजी नाईक, सदाशिव रामचंद्र, त्रिंबक शिवदेव, व गोपाळराव बाबूजी, विठ्ठल शिवदेव असे पंचवीस तीस हजार सडी फौज आहेत. गोहद प्रांतें संचारितात. गिलच्याचे मुलखांत लाख फौज इराणी आली, गिलच्याची पातशहात घेतली, याजमुळें तो

१. टीप.–सिरोंज व ग्वालेरच्या बरोबर मध्यावर.

दिल्लीहून ११ साबानीं जातो [११ साबान=८·३·१७६१]. सुजा यमुनापार होऊन अयोध्येस चालला. लबाडी करावयास नजीबखान व माधवसिंग आहेत. परंतु त्यांच्यानें चमेली अलीकडे येववत नाहीं. मलूख करावयाबद्दल मल्हारजीकडे आले आहेत. त्यांच्या मुद्याप्रमाणे तह झाला म्हणजे करतील. कुंभेरीहून पत्रें जाठाची व बापूजी महादेवाचीं आली. या उपरी ईश्वरे दिवस उत्तम आणिले आहेत. नष्टचर्यास कांहीं बाकी राहिली नव्हती. परंतु उगवते दिवस आलेसें दिसते' [६·४१२, २७ मार्च]. त्याच तारखेचे दुसरे पत्र सुभानजी जाधवराव यांस, 'श्री. सौ. पार्वतीबाई व नाना पुरंदरे व दमाजी गायकवाड, नारोशंकर मिळोन मल्हारराव[जी]प्रमुख चाळीस हजार जमाव जाला होता. गिलच्यांवर व नजबिखानावर सलावत पडली. वकील सलुखास येत होते. श्रीमंत नाना सा० धारेंजे[श्वरी] व खेचीवाडयांत जानोजी भोसले व गोपाळराव गोविंद पंधरा हजार फौज होती. परंतु लोकांस रोजमुरा न मिळाला. ऐवज श्रीमंतांनी न पटविला. यास्तव पार्वतीबाई, नाना पुरंदरे व नारोशंकर [ग्वाल्हे]रकडून सिप्रीस आले. प्रांतांत धुंदी जहाली. तहशील बंद जाली. आम्ही बहुत रदबदल केली. ते साफ म्हणतात कीं तुम्हांस अद्याप आशा या गोष्टीची आहे कीं काय? अगदी मुलूख खराब केला आहे. हा कारभार मागे राखिले. झांशीकर बाबूराव कोन्हेर याचे हाल काय झाले त्याचा विचार आठवर लिहावा! बाबूराव कोन्हेर यांचे भाऊ (यशवंतराव ?) शेवडियावर पडले. याच काळांत धीर धरून आपले जागे रक्षिले' [६·४१३]. नाना फडणवीसाची मातुश्री पानपतावरून पुढे कोठें गेली कळलें नाहीं, तिचा तपास लावून ती कळविण्याबद्दल त्याने पुरुषोत्तम महादेवास पत्र लिहिले (६·४११), परंतु ती घोडयावरून पडून मरण पावल्याची खबर मागाहून आली [६·४१५ मा. सं. प. या. ५३]. सदाशिवराव भाऊ व जनकोजी शिंदे हयात असल्याची बरेच दिवस गवगवा होता (६·४१४; ३·५२०). 'विश्वासराव अभिमन्यु पाणें रण भेदून कैलासवासी झाले. चिरंजीव भाऊ व जनकोजी शिंदे ज[ा]च्या मुलखांत आहेत.

दहा पांच बातम्या आल्या. शोधास माणसे कारकून गेले. लौकरच त्यांचे हातचें पत्र घेऊन येतील. इब्राहीमखान पाडाव झाले. सरदार व लोक मारले गेले. युद्धच आहे. यश अपयश ईश्वराधीन. असो, चिंता काय ! पुढेंहो जे तर्तूद होणें ते होते' (३·५१७, मार्च १७६१). पेशव्याच्या या शब्दांवरून त्याचा धीर व्यक्त होतो. भाऊसाहेब व जनकोजी यांच्या हातची म्हणून कांहीं पत्रे घेऊन माणसें सुद्धां पेशव्याकडे आली होती (३·५१८). बाबूजी नाईक व दुसऱ्या पुष्कळांस त्यांचे तपासास पेशव्याने पाठविलें [का. सं. प. या. १७५]. परंतु पुढे लवकरच संशयनिवृत्ति तात्पुरती झाली. जनकोजी शिंदे हयात असल्याचा संशय मे महिन्यापर्यंत चालू होता [६·४१४]. अर्थात् या घोटाळ्यामुळे मुख्य काम तहकूब राहिलें.

जाठानें ज्याप्रमाणे मराठ्यांचा उत्कृष्ट परामर्श घेतला, त्याचप्रमाणे काशीत दक्षणी मंडळीचा सांभाळ तेथील राजा बळवंतासिंग यानें केला. 'राजे यांणी परामृष केला म्हणून श्रींत बहुतांची अब्रू राहिली. आमच्याविषयी (दीक्षितांविषयीं) तों सर्वांस सांगितले जे, माझी आणि बाळकृष्ण दीक्षित यांची भिन्नता नाही. ब्राम्हणभोजन आदिकरून सर्व गोष्टींचा आपण समाचार घेत असे. सर्व मुत्सद्यांस सांगितले जे, मी कै. नारायण दीक्षितांचा लेक, मला त्यांचे वृत्त चालविणें जरूर. ज्याप्रमाणें दीक्षिताचे वेळी साहित्य लोकांचें होत असे, त्याप्रमाणे करीत जाणे; आणि त्याप्रमाणे दोन महिने चालविलें. सर्वत्र वडिलांचे पुण्येंकरून निर्वाह होतो.' असे बाळकृष्ण दीक्षित गोविंद दीक्षितास लिहितो [२०·४·६१, ३·५१९]. 'भगवत् कृपेकरून श्रीमंतांचें राज्य कायम आहे.' अशी शेखी २३·२·६१ ला नारोशंकर मिरवितो [१·२८२]. म्हणजे पानपतानें मराठ्यांचा दम बिलकूल खचला नाहीं हें उघड आहे.

येथवर दिलेले उतारे अस्सल पत्रांतले पानपत संग्रामाची व तदुत्तर स्थितीची योग्य कल्पना सुचवितात. आतां याची पूर्तता बखरींच्या आधाराने करितां येते. भाऊसा०चे कैफीयतींत खालील वर्णन या संग्रामाचें आहे. 'प्रथम बिठ्ठल शिवदेव, यशवंतराव व माणिकराव कापरे कांहींसे वाहून पुढें

गेले, त्यांजवर जुंज मांडिलें. तेव्हां ते कचरून माघारे तोफखान्यांत येऊन राहिले. तों दमाजी गायकवाड यांजवर गिलच्यानें येऊन कांहींशी मारामार केली. तेही माघारे फिरले. डावे बाजूकुडे मुक्कामीं गोटाचे गोट राहिले होते. त्याप्रमाणें पतकें होतीं. त्यांजवर खासा अब्दाली त्या जुंजावर डावेकडे होता त्याणें जुंज भारी केलें. कुल आपणांकडील पतकें माघारीं फिरलीं. हलके बहुत जाले. इब्राहीमखान गारदी याजवर खासा खुरानशहा व रोहिला याणें चालोन घेतलें. एक रंजक उडाली. इकडील लोक बहुतेक पडिले. हटला नाही. तसेच नेट धरून मारीत आले. इब्राहीमखान गारदी याजवर चाल पडली, कुमक कोणी केली नाही. तथापि हुजरातचे लोक एकत्र होऊन संधान साधिले. तोफा सुटत होत्या. लढाई मातबर एक प्रहर केली. इकडे उजवे बाजूस शिंदे, होळकर याजवर सुजाउद्दौला व गोसावी वगैरे यांणी येऊन (धाव) घातले. जुंज मातबर होऊं लागलें. मध्यें भाऊसाहेब व कांहींसे लोक व रावसाहेब हे उभयतां घोडियांवर संभाळून होते. भाऊसाहेब परी घोडीवर, रावसाहेब दिलपाक घोड्यावर होते. चहोंकडून लोक सांभाळोन होते. जुंजाचे तोड लाविले. मारामार होत होती. मातबर लोक पडो लागले. इतक्यांत रावसाहेब यांस छातीमध्ये गोळी लागोन ठार जाले. हे भाऊसाहेब यांणी पाहून अवसान सोडिलें. बहुतेक शोक करूं लागले. मुडदा उचलून हत्तीचे अंबारीमध्ये घातला; आणि भाऊसाहेबी निश्चय केला की, या उपरी गिलचा खाशानिशी मारीन; ऐसे जहाले; आणि लोकांस ताकीद करून जुंज लागले. हाणा हाणा ऐसें मुखें बोलून सर्वत्रांस ताकीद करूं लागले. बरोबर समशेर बहादर होते. ते घेऊन पुढें जाऊन तीन वेळां मागें हटविलें. त्यांजवर चहूंकडोन गिलच्याने मार तोफांचा व गोळ्यांचा व शरांचा केला. तेव्हां लोकांनी हिमत धरून भाऊसाहेबांबरोबर सरसावून शिपाईगिरी बहुत केली. रोहिला माघारा फिरविला. हल्ला करून मोड करून माघारा फिरविला. गिलचा खाशा पळ काढून यमुनापार दाखल जाला. शिपाईगिरी भाऊसाहेबांची म्हणावी तैसी जाली कीं, ज्याचें नांव शिपाईगिरी. विश्वासराव पडिले. डावे बाजूचे लोक कचरून माघारे फिरले. अशा मध्यें सांभा-

कून रोहिला माघारा सारिला. अब्दाली पळून नदीतीरी गेला. लढाईची शर्त केली.

'विठ्ठल शिवदेव यांजकडेस पेशजी गिलचे चाकर दोन हजार ठेविले, त्यांस इशारतीस भगवें फडकें दिलें होते. ते डोईवर बांधून फिरत होते. जे समयीं विश्वासराव पडिले ही खबर लष्करांत बुणगियांत जाली, तेव्हां लष्कर गडबडलें होतेंच. गिलचे चाकर यांणी भगवे फडके टाकून दिलें आणि बुणगियांत आवई घातली की, लुटूं लागले. बुणग्याने पळ काढिला. बुणगे पळतात हे पाहून विठ्ठल शिवदेव याणींही पळ काढिला. आधी रावसाहेबांचें वर्तमान ऐकून दहशत खाल्लीच होती. बुणगे पळतात हे पाहून ते पळाले. डावी बाजू रिकामी होत चालली. रोहिला याजकडील लोकांनीं लुटीची धुमाळी मांडिली. इकडे जुंज भाऊसाहेबांकडे होतच होते. उजवे बाजूस शिंदे होळकर यांजकडे जुंज होतच आहे. मारामारी होतां होतां भारी खणाखणी झाली. रावसाहेबांचें वर्तमान ऐकून जनकोजी शिंदे व मुकुंदजी शिंदे यांणीं मोठी मर्दुमकी करून मारामारी करीत भाऊसाहेबापाशी आले, तों इब्रामखान गारदी यांजवर झूट पडली. त्याणें जिवाचा निधडा करून शिपाईगिरी म्हणावी तैशा जिवाची तमा न धरतां केली. कित्येक गारदी वेतांत आले व कित्येक ठार जाले. हुजरातीचे लोक जवळचे पळों लागले. तोफखाना बंद जाला. जातीनिशी तरवार सीमेपरती केली. खान जाऊन गिलच्यांचे लष्करांत मिळाला. दहा पांच ठार केले. भोंवता वेढा गिलचांचा पडला. अंगावर जखमा भारी पडल्या. ऐसें असतां लढतच होता. प्रयत्न न चाले तेव्हां हत्यारें राहिली. धरून नेला. तेव्हां हें वर्तमान श्रीमंतांस कळले. मल्हारजी होळकर याचे बाजूवरही मातबर जुंज जालें. रेटत नाहींसे जालें, तेव्हां दोही बाजू सोडून निघाले. भाऊसाहेबांचे हेच तोंडीं कीं, हाणा हाणा. हेंच करीत असतां, जातीनिशीं मोठा हिय्या केला. बहुत जुंज मातबर केलें तें कोठवर लिहावे ! सरकारचे मुत्सद्दी तमाम बिलकूल एकीकडे पळूं लागले. सोनजी भापकर यासीं भाऊसाहेब बोलिले कीं, " सोनजीबाबा, हा समय निघावयाचा नव्हे. तुमचा भरंवसा बहुत धरिला होता. उभे राहावें. " तेव्हां ते बोलिले कीं,

"कुललोक पळतात, त्यांजला माघारे फिरवितो. साहेबांस टाकून आम्हीं कोठें जावे ?" ऐसें म्हणून लोक फिरवावयास गेला तो तिकडेच गेला. तेव्हां मुकुंदजी शिंदे म्हणों लागले की, 'महाराज, क्षात्रधर्माची शर्थ झाली ! याजउपर निघावे हें उत्तम आहे.' तेव्हां भाऊसाहेब बोलिले की, मुकुंदजीबावा, आतां कुणीकडे जावे ? काय तोंड दाखवावे ? रावसाहेबांकडे पाहावे." तेव्हां मुकुंदजी शिंदे यांणी घोडियावरून उडी टाकिली. जातीने हत्यार करवलें तेथवर केले. मातबर मराठे धर्माची शर्थ करून ठार झाले. जरीपटक्याचे निशाणाजवळ अगोदर दाटी झाली होती. तेव्हां हत्तीवरून उतरून घोडियावर घातले होते. निशाण गुंडाळून पळूं लागले, तेव्हां भाऊसाहेबी शहाजणे वाजवावयास आज्ञा केली. फत्ते जाली, शहाजणें वाजतात, याजकरितां तरी लोक माघारे फिरतील या अर्थी शहाजणे वाजवूं लागले. परंतु ज्यांणी पळ काढला त्यांपैकी कोणी माघारा फिरला नाही. भाऊसाहेब व जनकोजी शिंदे व शे पन्नास लोक व रायाचे मुडद्याचा हत्ती इतका बाकी राहिली. त्यांजभंवता वेढा भारी पडला. तेव्हां युद्ध बहुत केलें. पूर्वी भारती अतिरथी महारथी जुज झाले, त्याप्रमाणे भाऊसाहेबांही लढाईची शर्थ केली. पुढे कांही इलाज चालेनासा जाला. त्यानंतर भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गती काय झाली ती कोणी पाहिली नाही. रावसाहेबांचे मुडद्याचा हत्ती व भाऊसाहेबांची बसती घोडी ऐसी सुजातउद्दौवला याजकडे गेली. प्रातःकाळचे प्रहर दिवसानंतर जुज लागले, तो तीन प्रहर हाणा मारा हेंच चालले. पृथ्वीने रक्त प्राशन केले.'

पेशव्यांच्या सरकारी बखरीतील उल्लेख अल्प परंतु मार्मिक आहे तो असा. "पातशहाचा फर्मान नानासाहेबांस फौजेविशी आला, त्यावरून भाऊसाहेब व विश्वासराव यांची रवानगी फौजेसुद्धां केली. दिल्लीस जाऊन पुढे अब्दालीची गाठ कुरुक्षेत्रीं सोनपत पानपतजवळ पडून लढाई होतां अब्दालीस मोडले. त्या समयांत विश्वासरावास अंबारीत गोळी लागोन कामास आले. हें वर्तमान अब्दालीस कळतांच चालोन घेतले, तेव्हां फौज पळों लागली. मल्हारजी होळकर वगैरे सरदार निघाले, ते समयी भाऊसाहेबांवर लगट केला, लोक पडले व जखमी झाले. भाऊसाहेब, जनकोजी शिंदे व यशवंतराव पवार यांचें

ठिकाण लागलें नाहीं ' [४ पृ. ५३]. यांत सर्व प्रकार थोडक्यांत सफाईनें वर्णिलेला सर्वस्वी प्रमाण धरून चालण्यास हरकत नाहीं. मराठ्यांचा पाडाव झाला, असे यांत म्हटलेले नसून, अब्दालीस मोडले, आणि विश्वासरावाच्या मृत्यूने दम सुटून गोधळ उडाला नसता तर, त्या दिवशी मराठ्यांचाच जय होता, असा याचा आशय आहे. मराठ्यांचा संहार झाला, पाडाव झाला नाहीं, हाच तात्पर्यार्थ पूर्वीच्या पत्रांवरूनही निघतो.

तमाम फौजेचा गोल बांधून शत्रूचे अंगावरून लढत लढत निघून जाण्याची कल्पना फार चांगली असून, ती शेवटपर्यंत तशीच अंमलांत आली असती तर मराठ्यांचा बहुधा बचावच झाला असता. मराठे गोल बांधून आपल्या अंगावरून निघून जातील असा अब्दालीचा अंदाज नव्हता. परंतु त्याची फौज लढण्यासाठी आंवळून उभी राहिलेली पाहून, त्याच्याशी समोर लढूनच आपण निघून जावें, अशी मसलत, जवळ आल्यावर, सदाशिवरावानें करून, रात्रीं मनसबा केला, तो राहविला. विनाशकाली विपरीत बुद्धि निर्माण झाली. फौज जमून नव्हती. नवीन योजना सर्वास कळण्यास अवधिच मिळाली नाहीं. एकाएकी मसलत बदलल्याबद्दल इब्राहीमखान गार्दी यास अत्यंत चीड आली. क्षणभर त्याने भाऊसाहेबांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, परंतु सत्तेपुढे शहाणपण नाही अशी स्थिति होऊन, सर्वस्वी घात झाला, असें त्याच वेळीं इब्राहीमखानास वाटले. भाऊसाहेबांच्या बखरीतील हा प्रसंग वाचण्यालायक आहे आणि तो विश्वसनीय दिसतो. ' निशाणाजवळील तर्तूद राहिली ' असें नाना फडणीसही म्हणतो. ठरलेली मसलत बदलून नवीन हुकूम करणें झाल्यास, तो सर्व फौजेस यथास्थित कळेल अशी योजना प्रथम केली पाहिजे, ती सदाशिवरावाने केली नाही. तितका अवकाशच मिळाला नाही. वास्तविक सदाशिवरावाचे मन सर्वस्वी गोंधळून गेलेलें होते. चिंता व जिवापाड मेहनत यांच्या योगाने त्यास झोप सुद्धां बहुधा बिलकूल नसे. अर्थात् आपण करतो काय याचे त्यास भान न राहून, फौजेत एकच गोंधळ उडाला. प्रत्येकानें आपापल्या कल्पनेप्रमाणें त्या दिवशी लढण्याची शिकस्त केली, परंतु

सर्वांमध्यें एकात्मता असावी लागते ती मात्र बिलकूल राहिली नाही. अब्दालीस पाहून, आगाऊ ठरलेली व्यवस्था एकाएकीं बदलणें, व विश्वासराव पडल्यावर एकदम देहभान विसरून रणांत आवेशानें घुसणे, या दोन अक्षम्य चुका सदाशिवरावाने केल्या. त्याच्या ठिकाणी अनेक बहुमोल गुण होते, परंतु बिकट प्रसंगी शांत चित्त ठेवण्याचा सेनापतीचा एक मुख्य गुण सदाशिवरावांत नव्हता, ही गोष्ट पेशवाही जाणून होता. कुशल सेनापतीने इतक्याही अडचणींतून निभावणूक केली असती.

' प्रातःकालचे दोन घटका दिवसास युद्धास प्रारंभ झाला,' (नाना फडणीस) आणि ' अडीच तीन प्रहरपर्यंत युद्ध चांगलेच झाले' (सटवोजी जाधव). घटका व प्रहर फौजेस कळविण्याची तजवीज त्या वेळी हत्तीवर अवश्य असे, यावरून वरील अंदाज केवळ काल्पनिक मानण्याचें कारण नाही. जानेवारी ता. १४ ला दोन घटका दिवस म्हणजे सकाळी आठांचा सुमार, तेव्हांपासून सात तास तरी युद्ध चालल्यावर म्हणजे तिहींच्या सुमारास विश्वासरावास गोळी लागली; आणि अर्ध्या तासांत पळ सुरू झाला. आदल्या रात्रीं बहुधा सर्वांसच अलोचन जागरण झालेलें, सकाळी चार पांच वाजल्यापासून तयारी करून व खाणेपिणे आटपून दहा पांच मैलांची मजल मारून आल्यावर, आठ वाजतां लढाईस तोंड लागलें, तेव्हां पासून तीनचार वाजेपर्यंत कोणास तोंडांत पाणी सुद्धां घालण्यास सवड झालेली नाहीं. अशा प्रसंगांत दमलेल्या फौजा परत घेऊन नवीन ताज्या दमाच्या पुढें करावयाच्या व सर्वास योग्य विश्रांति द्यावयाची, असा सामान्य प्रघात असतो, परंतु पानपतावर अशी कांहीं एक योजना नव्हती, आणि सर्वच लोक निकरावर येऊन निघालेले होते. अब्दालीनें मात्र ताज्या दमाचा दहा हजार कतलबाज[1] रिसाला मागे ठेविला होता, तो आयत्या वेळी पुढें आणिला, तेव्हां मराठ्यांचा धीर सुटला.

काशीरायाचे बखरींत व अन्यत्र संग्रामाचे वेळी फौजेची रचना दाखविणारा नकाशा दिलेला आहे. अब्दालीची फौज यमुना पाठीशीं घालून

१ कझलबाजी हें स्थळाचे नांवावरून झालेले विशेषण, असें एक ग्रंथकार म्हणतो.

पश्चिमामुख होती. रेटींत नेऊन तिला यमुनेंत बुडवूं अशी सदाशिवरावाची अपेक्षा होती. कारण यमुनेचे पात्र रुंद असल्यामुळे अल्पावधींत सर्व फौज पलीकडे सुरक्षित नेणें शक्य नव्हतें. सदाशिवरावांनें गोल मोडला नसता तर बहुधा इब्राहीमखानाच्या तोफांनीं मराठ्यांस सुरक्षितपणें दिल्लीच्या टापूंत आणून सोडिलें असतें. फौजांची व सरदारांची रचना खालीलप्रमाणे होती:—

मराठे पूर्वाभिमुख.	गिलचे पश्चिमाभिमुख.
१ इब्राहीमखान गारदी.	१ बरखुरदारखान.
२ दमाजी गायकवाड.	२ अमीर बेगखान.
३ सटवोजी जाधव.	३ दुंदेखान.
४ विठ्ठल शिवदेव.	४ हाफीज रहमतखान.
५ विश्वासराव व स० रा०	५ अहंमदखान बंगश.
६ समशेर बहादर.	६ वजीर शहावल्ली व आताईखान.
७ यशवंतराव पवार.	७ सुजाउद्दौला.
८ मल्हारराव होळकर.	८ नजीबखान रोहिला व कलंदरखान.
९ जनकोजी शिंदे.	९ शहा पसंदखान.

स्वतः अब्दाली फौजे मागे राहून जरुरीप्रमाणे पाठपुरावा करीत होता. दहा हजारांचा कझलबाज रिसाला त्यानें मुद्दाम मागे राखून ठेविला होता. उभय दळांची लगट झाल्यावर बारा एक वाजेपर्यंत निकराचा संग्राम चालून, इब्राहीमखानानें बरखुरदारखान वगैरेंचा, पेशव्यांच्या हुजरातीने वजीर शहावल्लीखानाचा, व शिंदे होळकरांनी नजीबखानाचा इतका फडशा उडविला, कीं आतां थोड्या वेळांत आपला शेवट होणार अशीच भावना शत्रुफौजेची झाली. स्वतः अब्दाली मात्र शांत वृत्तीने जरूर त्या तजविजी करीत होता. आरंभी इब्राहीमखानाच्या तोफांचे गोळे शत्रूंच्या डोक्यावरून जाऊं लागले, तेव्हां इब्राहीमखान कांहीं वेळानें हातांत स्वतः निशाण घेऊन बागनेटांनी निकरानें शत्रूंवर चालून गेला, त्याबरोबर समोरच्या रोहिल्यांचा साफ फन्ना उडाला. तेणें करून वजिराची उजवी बाजू खचून, मोकळी जागा सांपडतांच पेशव्यांच्या हुजरातीनें

वजिरावर चाल केली. त्याचा पुतण्या आताईखान पडला; आणि स्वतः वजीर पायउतारा होऊन पेचांत आला. काशीरायानें हें वर्तमान सुजास कळविले, परंतु सुजानें मदत केली नाही. वजिराचे लोक हार खाऊन पळूं लागले असें मागे अब्दालीने पाहून, पळून येणाऱ्या लोकांस एकदम छाटून टाकण्याचा हुकूम त्याने दिला; आणि त्यांस परत फिरवून संग्रामांत लोटिलें; आणि अशा रीतीने दोनही दळे व विशेषतः मराठे श्रमाने व तृषेने अगदीं थकून गेलेले पाहून, अब्दालीने दोन वाजण्याच्या सुमारास आपला ताजा रिसाला पुढे आणिला, आणि अगदी मोजक्या क्षणी व मोजक्या जागी फिरून जोराचा मारा केला. त्याबरोबर पुन· निकराचें कंदन झाले. कोणीही हार म्हणून घेईना. असा तास अर्धातास गेला. इतक्यांत मराठ्यांची फौज एकाएकी रण सोडून पळूं लागल्याचें मुसलमानांनां पाहिले. याचे कारण इकडे विश्वासरावास गोळी लागून तो गतप्राण झाल्याची वार्ता फौजेंत पसरली, त्याबरोबर लोकांचा धीर सुटला, आणि लढाईचे काम सोडून जो तो आपल्या बचावाचे विचारास लागला. सदाशिवरावाचें भान तर अगोदरपासूनच बहुतेक नाहींसे झालेले होते. पुढें विश्वासराव पडल्यावर आतां नाना सा० स तोड काय दाखवावें अशा आवेशानें कोणाचेही न ऐकतां तो शत्रूंत घुसला. त्या वेळी सर्व मारा हुजरातीच्या निशाणावर येऊन ते निशाण हातचे जाऊं द्यावयाचे नाही म्हणून सदाशिवरावानें लगट केली. 'तोंडास खरस आली. हाणा मारा म्हणावयाचें राहिलें. कोणी ओळखीचा आला तरी तोडाने मात्र हुंकारा देऊन मानेची संज्ञा दाखवीत. ब्रह्मांड कोसळले पण हिमत हरली नाही. यांप्रमाणें पराक्रमी दुसरा होणें असाध्य, हजार वारांशें मात्र जाग्यावर उभे राहिले. ते समयीं सोनजी भापकर भाऊचे मागे रिकीबींत पाय देऊन उभा राहिला. सभोवता वेढा पडला. आंत रवंदळारवंदळ क्षणभर बहुतच केली. त्यांत भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गत कैशी झाली न कळे उभयता कोणीही दृष्टीनें पाहिले नाहीत.' ही झोबाझोबी अब्दालीच्या कत्तलबाज रिसाल्याशी झाली. खरे म्हटलें असतां, मराठ्यांच्या बाजूस जो तो आपापल्या बुद्धीप्रमाणें लढला,

सर्वांचा मिळून एक हेतु धरून लढणे झालेंच नाही. श्रमानें व जखमांनीं असंख्य लोक व्याकुळ झाले. स्वतः इब्राहीमखान घायाळ होऊन शत्रूंचे हातीं पडला. त्याचा मुलगा व भाचा मारले गेले. यशवंतराव पवार गोळी लागून पडला. समशेर बहादर जखमी झाला. असा प्रकार झाल्यावर तीन चार वाजण्याचे सुमारास आतां आपला निभाव लागत नाही असे पाहून, मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव, दमाजी गायकवाड वगैरे मंडळीनी रणांतून आपला पाय काढिला, त्याबरोबर सर्वत्र पळापळच सुरू झाली. 'विश्वासराव व सदाशिवराव दोघेही युद्धाची व्यवस्था पाहत होते. बहुतेक यशस्वी झाले. अफगाण बहुतेक मोडले. शहावल्लीखानाची फौज सर्व गारद झाली. एक वाजतां त्यास ताजी मदत आली म्हणून तो बचावला. तीन वाजतां विश्वासरावास गोळा लागून घोड्याखाली पडला, तेव्हां त्यास हत्तीवर घालून बसविण्यांत आले. नंतर पुनः निकराचा झगडा कांहीं वेळ झाला. परंतु सकाळपासूनच्या श्रमाने मराठ्यांचा दम पुरला नाही; आणि एकाएकी अंगांत कांपरें भरल्यासारखें होऊन ते रण सोडून पळूं लागले. अफगाणांनी पाठलाग करून त्यांस क्रूरपणाने कापून काढिले.' [Tate's Afghanistan].

पळणाऱ्या मराठ्यांचा पाठलाग शत्रूंनी जोराने केला. अशा वेळीं जिंकणाऱ्या पक्षास एक प्रकारचा आवेश चढत असतो. तावडीत सांपडले त्यांची त्यांनीं एक जात कत्तल चालविली. रात्र पडेपर्यंत पानपतच्या बाजूस मोठीच कापाकापी झाली. प्रत्येक अफगाणाने आपल्या भावाबहिर्णीच्या किंवा इतर नातेवाइकांच्या नांवाने मुद्दाम जितके मारवले तितके लोक मारले. रात्र होऊन शहाच्या तंबूवर जयाची नौबत वाजूं लागली, तेव्हां मराठ्यांच्या खंदकाबाहेर पहारे बसवून शत्रू आपल्या छावणीत परत गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळी मराठ्यांच्या छावणीत जे पुष्कळ लोक जिवंत सांपडले, त्यांपैकी बायकांमुलांस गुलाम करून, पुरुषांचा अत्यंत क्रूरपणाने कत्तल केली. यांपैकीच कांही इसम सुजाउद्दौल्याने तीन लाख रुपये दंड भरून धर्मार्थ सोडून दिले. साताऱ्याजवळच्या आरले गांवचा कुळणर्णी नारो भगवंत इब्राहीमखानाच्या तोफखान्याकडे कारकून

होता, तो या कत्तलीसाठी उभा करण्यांत आला असतां, एका अफगाणाच्या कृपेनें वांचून परत आला. तो स्वतः पुढें वृद्धापकाळीं आपली सुटकेची हकीकत ग्रँट डफ यास सांगत असे. त्याचा उल्लेख डफनें पानिपतचे प्रसंगांत केला आहे. दक्षिण व पश्चिम दिशेने होळकर वगैरे कांहीं मंडळी सावधगिरीनें व वेतावेतानें निभावून परत येत होती. वऱ्याच लोकांनीं हाच रस्ता घेतला; आणि याच फौजेंत हळूहळू इतरत्र पळालेले लोक सामील होऊन प्रथम जाठाच्या राज्यांत येऊन नंतर ग्वाल्हेरीवर जमा झाले. पार्वतीबाईच्या संरक्षणार्थ होळकरानें विसाजी जोगदंड यास नेमिलें होते. परंतु तो इमानास जागला नाहीं. जानू भिंताडया नांवाचा दुसरा ऐक इसम होता, त्यानें अनेक अनर्थांतून बाईस वांचवून ग्वाल्हेरवर सुखरूप आणिलें. त्याबद्दल पुढे जानू भिताडयास एक गांव इनाम मिळाला (भा. व. श. पृ. ४२). पार्वतीबाईबरोबरच विश्वासरावाची बायको लक्ष्मीबाई या संकटांतून बचावून दक्षिणेंत आली, ती पुढें पुण्यास वारली) [का. सं. प. या. पृ. ५४१]. पार्वतीबाई, होळकर, नानापुरंदरे, महिपतराव चिटणीस (धा. रा. च). वगैरेनीं जाठाचे मुलखांतून ग्वाल्हेरीस व भिंड येथें येऊन तेथें एक माहिना मुक्काम केला. पळाचे लोक आले, त्या सर्वांस वस्त्रे व पांच रुपये खर्चास जाठाचे राणीनें दिले. तेथून नानापुरंदऱ्यानें भाऊसाहेबाचे शोधास बैरागी पाठविले. परंतु ठिकाण लागलें नाहीं.

लढाईच्या दुसऱ्या दिवशी रणांगणावर पुष्कळ मोठमोठ्या पुरुषांचीं प्रेतें पडलीं आहेत अशी बातमीं समजल्यावरून, अशीं प्रेतें शोधून काढून त्यांस अग्नि देण्याच्या विचारानें शेषधर पंडित, गणेश पंडित (वेदांती ?) वगैरे सदाशिव रावाचे माहितगार इसम बरोबर घेऊन सुजाउद्दौला आपले घोडयावर बसून पुष्कळ वेळ समरभूमीबर फिरला. यशवंतराव पवाराचें शव त्यास सांपडले. पुढें एका डिगाखालीं प्रेताच्या अंगावरील तीन चार रत्नें चमकली ती पाहून वरील गृहस्थांनीं तें प्रेत बाहेर काढिलें. त्याच्या पायांवर व पाठीवर जखमांचे वण होते त्यांवरून हे प्रेत सदाशिवरावाचें होय असें त्या मंडळींनीं ओळखिलें, आणि पुढें काशीरायानें दुराणी शहाची परवानगी आणून त्यास अग्नि दिला.

अंताजी माणकेश्वर, बाजी हरि, नाना पुरंदरे, व मल्हारराव होळकर असे रात्रौ दिल्लीचे सुमारें चालले असतां दांडग्यांच्या हुल्लडींत फरुखाबादच्या जमीनदाराचे हातून अंताजी माणकेश्वर ब बाजी हरी ठार झाले. सुजाउद्दौल्याचा सरदार उमरावगीर गोसावी याने विश्वासराव, तुकोजी शिंदे, संताजी वाघ व यशवंतराव पवार असे चार मुर्दे तीन लक्ष रुपयांस सोडवून त्यांस ब्राम्हणांकडून विधियुक्त अग्निसंस्कार केला. नारोशंकर दिल्लीचे किल्ल्यांत असून जवळ चाळीस लाख रुपये खजिना होता. तोही गुरुवार ता. १५ रोजीं सायंकाळी निघून गेला. बरोबर गंगोबा तात्या होळकराचा दिवाण होता. खजिना सुद्धां नारोशंकरानें तसाच मागें टाकिला. दिल्लींतील बकाल बायका देखील लष्कराचे लोकांस मारूं लुटूं लागल्या. पुढें मथुरेहून जाठाचे मुलखांत आले. जाठाने हिंदुधर्मास जागून तमाम मुलुखांत स्वार पाठवून अन्नवस्त्र देऊन सर्वांचा संभाळ केला. भरतपुरास जाठाची बायको होती, तिने धर्म बहुत केला. भरतपुरास पावल्यावर तीस चाळीस हजार लोकांस आठ रोजांचे अन्न व ब्राम्हणांस दूध, पेढे, मिठाया वगैरे दिल्या. आठ दिवस सर्वांस आरामासाठी राहवून घेतले. शहरांस ताकीद केली की ज्यास जसें अनुकूळ पडेल, तसें जागा व अन्न द्यावें. कोणा छळूं नये. याप्रमाणे जाठाने एकंदर दहा लक्ष रुपये खर्च केला. तेणें करून बहुत लोक जगले. घायाळ शमशेर बहादर कुंभेरीस (दीग येथें?) आला. सुरजमल्लानें त्याची निगा चांगली केली. परंतु भाऊ भाऊ असा शोक करून तो लवकरच मरण पावला.

एकंदरीत या संग्रामांत प्रचंड संहार झाला. मराठ्यांची एक सबंध पिढी कापली गेली. दक्षिणेत बहुधा एक घर मृत्यूशिवाय राहिले नाही. काशीराय म्हणतो, चांदी सोने, हिरेमाणकें, ५०० हत्ती, पंनास हजार घोडे एक हजार उंट, दोन लक्ष बैल आणि तंबू वगैरे प्रवासाचा अजबाब असे पुष्कळच सामान पानपतचे छावणींत अब्दालीस मिळाले.

त्या छावणीच्या जागेत हल्लीं दोन सतीचे चबुतरे आहेत. पैकी एक लक्ष्मीबाई मेहेंदळे इचा होय. दोन मोठ्या विहिरी जवळ जवळ आहेत, त्यांचेंच

पाणी लष्करास पोंचत होते. म० रा० च्या तंबूच्या जागेस 'काळा अंबा' असे नांव असून, बहुधा तेथें अंब्याचें झाड असावें. सदाशिवराव लढाईत पडला त्या स्थलावर हल्ली एक लहानसे स्मारक सरकारानें उभारले आहे [य. रा. गुप्ते].

पेशव्याच्या घरांत विश्वासरावासारखा सुंदर पुरुष झाला नाहीं. पहिला बाजीराव सुरूप होता आणि त्याचीच छाया त्याच्या या नातवावर पडली होती. विश्वासराव केवळ मदनाचा पुतळा दिसत असे. पानपतच्या समर-भूमीवर पडलेलें त्याचें शव जेव्हां अहंमदशहा अब्दालीने पाहिले, तेव्हां तोही त्याचें सुखरूप व तेज पाहून फार हळहळला असे सांगतात. तो मुर्दा पहावयास संपूर्ण दुराणी लष्करांतील आबालवृद्ध जमा झाले व त्याचे सौंदर्य पाहून प्रत्येकास कौतुक वाटलें, असें बखरकार लिहितो.

दुर्दैवी रंगूंत सदाशिवरावाची योग्यता येणेंप्रमाणे वर्णिली आहे (पृ. १०७, १५९, १७९). सदाशिवराव शरिरानें उंच व मजबूद दिसे. तालीम व नमस्कारांच्या अभ्यासाने त्याचे शरीर घटलेलें होते. त्याच्या-सारखा हुशार, सावध व चतुर मुत्सद्दी पेशव्यांच्या कुळांत कोणीच जन्मला नाहीं. तो जितका हुशार तितकाच शूर व साहसी होता. शिपायाचे व कारकुनाचें अशी दोनही कसबें त्यास अवगत होतीं. त्याच्या स्वभावांत हट्ट व गर्व नसता तर, त्याने पेशवाईस हिंदुस्थानच्या सार्वभौम पदास पोंचविले असतें. दक्षिणेतून निघाल्या [illegible] पुढचा धोरणे बांधून रोज हिंदुस्थानां-तील प्रमुख लोकांस तो दहा पांच पत्रें पाठवी. ज्या मुलखांतून तो जाई, त्यांत लुचे कोण त्याचा बारकाईनें शोध करून तेथून निघण्यापूर्वी त्यांचा बंदोबस्त करी. लढाईच्या प्रसंगी फौजेच्या मागे पायबंद नसावा, हे लढाईचें धोरण त्याने चांगलें ध्यानांत ठेविले. फौजेला धान्याचा पुरवठा करण्यांतही त्याने हयगय केली नाहीं. फौजेंतील प्रत्येक पथकाच्या तर्तुदीची व्यवस्था तो स्वतः पाहत असे. तो अत्यंत निरलस होता. पंहाटेस उठून स्नान संध्या व हजार नमस्कार उरकून लगेच सर्व कामें स्वतः करूं लागे व निकाल ताबडतोब करी. त्याच्याच तालमेंत विश्वासराव

तयार होत असून तोही शूर व शहाणा होत चालला होता. त्यास आयुष्य असतें तर त्यानें इतिहासांत आपलें नांव चिरस्थायी करून ठेविलें असते. सदाशिवरावाचा क्रोध मात्र अनावर होता. वास्तविक त्याच्याठायीं हा मोठा दोषच होता. खऱ्या माणसास क्रोध बहुधा आवरत नसतो. पण राजकारणांत पडलेल्या माणसाने क्रोधाचे वारें बिलकुल आपणास शिवूं देतां नये. एवढा दोष सोडला तर त्याचे सर्व गुण राज्याला पोषक असेच होते. शिंदे होळकरांच्या फौजांनी गिलच्यांची धास्ती खाल्ली होती, परंतु सदाशिवरावास शत्रूची धास्ती अशी कधींच वाटली नाहीं. गिलच्यांस मारूं ही त्याची हिंमत अगदी अखेरच्या वेळेपर्यंत कायम होती. त्याचा सरंजामही तसाच होता. इब्राहीमखानाच्या तोफखान्याची करामत शिंदे होळकर किंवा गिलचे यांस माहीत नव्हती. हुजरातीचे निवडक स्वार व इब्राहीमखानाचीं कवायती पलटणें ब तोफखाना यांच्या जोरावर आपण सर्व शत्रु पादाक्रांत करूं अशी [illegible] खात्री होती. बलाढ्य शत्रूंसमोर पर्वताप्रमाणें छातीठोक उभें राहण्याचे त्याचे धैर्य, पोटच्या पोरासारखी त्याची फौजेची जपणूक, सर्व हिंदुस्तानाची सूत्रें आपल्या हातांत ठेवून चालविण्याची त्याची धमक, कामामधील त्याची जबरदस्त उरक, त्याचें निर्लोभ व करारी आचरण, आणि त्याच्या भव्य व तेजस्वी स्वरूपाने दुसऱ्यास नमवून सोडणारा त्याचा दरारा या गुणांच्या जोरावर या स्वारींत तो यश मिळविणार, अशी लोकांची खात्री होती. त्याच्या हातून चुका झाल्या, परंतु शेवटी यश मिळालें असते तर या चुका केवळ सत्क्रियाच भासल्या असत्या. होळकरास त्याने कधीही अयोग्य रीतीचे उत्तर केले नाही, सर्व प्रमुख मंडळींची नेहमी सल्ला घेऊन, स्वतःच्या विचाराने काय करणें तें तो करीत असे. युद्धशास्त्राची विशिष्ट माहिती नसल्यामुळे डावपेंचांत जरी त्याची चतुराई विशेष नसली, तरी निश्चय व शौर्य हे गुण त्याचे अंगीं भरपूर होतें. फौजेची त्याजवर अत्यंत भक्ति असून याची त्यांजवर जरबही तशीच होती. सर्व शिपाई त्याजकरितां प्राण देण्यास तयार असत.'

पानिपतच्या मोहिमेसंबंधानें सदाशिवरावाच्या स्वतःच्या फौजेचा खर्च

दरमहा सहा लाख रुपये म्हणजे दहा महिन्यांचा खर्च साठ लाख व शेवटच्या चार महिन्यांतील महागाईबद्दल आणखी चाळीस लाख मिळून एक कोट रुपये झाला, असा रा. राजवाड्यांचा अंदाज आहे (खं. १ टीप २८७). स्वतंत्र सरदार आपले खर्च आपण भागवीत. परंतु त्यांचीही शेवटी शेवटी तारांबळ उडून कांहीं दिवस सर्वांचेंच ओझे सदाशिवरावावर पडले. शिवाय उत्तर हिंदुस्थानांतील तमाम मुलखाचा वसूल स्वतःच कमाविसींनें उगवून आणण्याची व्यवस्था सदाशिवरावाने केली, आणि त्याजबद्दल नानासाहेबासही वैषम्य वाटलें, असे उल्लेख आहेत. सर्व फौजांचा मिळून एक वर्षाच्या या मोहिमेचा खर्च जवळजवळ तीन कोटी झाला, असा बखरीचा अंदाज आहे तो फारसा चूक वाटत नाहीं. ह्या खर्चाचें मोठेंसे ओझे पेशव्यांस वाटले नाहीं.

९. अब्दालीचें नफा नुकसान.—नुसती प्राणहानि सोडून दिली तर पानपतच्या ह्या संग्रामांत अब्दालीचे कांहीं कमी नुकसान झालें नाहीं. त्याच्या दीड वर्षाच्या मोहिमेत लढाईचे पुष्कळच प्रसंग झाले, त्या सर्वांत मिळून पुष्कळ लोक प्राणांस मुकले. शेवटच्या दिवशी सुद्धां त्याचा संहार कांहीं थोडा झाला नाहीं. मात्र त्यानें रोहिल्यांस पुढें केले; त्यामुळे रोहिले बहुतेक सर्व कापले गेले. सुजाउद्दोला थोडासा अंग चोरून वागला. एकंदरींत हिंदुस्थानांतील या उद्योगापासून लभ्यांशापेक्षां नुकसानच ज्यास्त अशी त्याची खात्री झालेली दिसते. होळकराचा निघून जाण्याचा सल्ला न ऐकतां नारोशंकर दिल्लीस नेट करून राहता, आणि ग्वाल्हेरपर्यंत आलेल्या दक्षिणच्या फौजा पुढें चालून येत्या, तर अब्दाली बहुधा पानपतावरून परभारेंच स्वदेशी गेला असता, असे सटवाजी जाधव, नाना फडणीस वगैरेचे उल्लेख वर दिलेच आहेत. दिल्ली सोडून मराठे पळून गेले असें पाहून पानपतच्या संग्रामानंतर सातवे दिवशी अब्दाली दिल्लीस आला, राजधानीचा कबजा घेऊन सुजास वजिरी व नजीबखानास बक्षीगिरी देऊन, तेथें त्याने स्थिरस्थावर केली. सुमारें दीडदोन महिने अब्दालीचा मुक्काम दिल्लीत झाला. परंतु या अवधींत साथीदारांचें व त्याचें सडकून वितुष्ट

आलें. सुजाउद्दौला त्यास सोडून गेला. नजीबखानानें आपले वकील पेशव्याकडे सलुखास पाठविले. लवकरच पेशवा स्वतः येऊन सर्व बंदोबस्त करील अशी दिल्लींत समजूत झाली. 'भगवत्कृपेंकरून श्रीमंतांचें राज्य कायम आहे' [१.२८२]. याउपरी ईश्वरें दिवस उत्तम आणिले, उगवते दिवस आलेसें दिसते' [६. ४१२]. 'युद्धच आहे, यशापयश ईश्वराधीन असतें,' अशी सर्वत्र आशामय भावना होऊन, अब्दालीस पुढील मार्ग संकटमय वाटूं लागला. हिंदुस्थानची पातशहात मिळविण्याची त्यास हाव असलीच तर ती, त्याच्या दुराणींनी दिल्लींत प्रचंड बंडावा उपस्थित केला, त्यामुळें साफ नाहींशी झाली. दोन वर्षांचा तुंबलेला पगार एकदम चुकवून देऊन स्वदेशीं चलावें, अशी त्यांनी निकराची मागणी केली. ती अमान्य करितांच सर्व फौजेनें दिल्लींत बंड केले. लोकांची समजूत कांहीं केल्या होईना. अब्दालीच्या छावणींत एकच गोंधळ उडून गेला. हा प्रकार पाहून सुजाउद्दौला अब्दालीस सोडून अयोध्येंत निघून गेला. पैशाची अडचण मिटविण्यासाठीं अब्दालीनें नजीबखानास निकड लाविली, तेव्हां मोठ्या शिकस्तीनें त्याजपासून चाळीस लाख रुपये अब्दालीस मिळाले. मध्यंतरी इराणी फौजेनें अफगाणिस्तानावर चाल केल्याची खबर आली, तेव्हां अनेक विवंचनांनी त्रासून अब्दालीनें ता. २२.३.१७६१ रोजीं शालिमारची आपली छावणी उठवून स्वदेशीं प्रयाण केलें. [Tate].

सतलज पावेतों आपले राज्य असावें अशी अब्दालीची आकांक्षा होती. परंतु याच सुमारास पंजाबांत शीखांचा जोर वाढूं लागला, तोंपेंकरून मराठे व शीख असे दोन शत्रु त्यास उत्पन्न झाले. शीखांनी लाहोर काबीज केल्याचें ऐकून स. १७६१ च्या अखेरीस अब्दाली पुनः पंजाबांत आला. लाहोर शहर त्यानें परत हस्तगत केलें आणि ५.२.१७६२ रोजी लुधियाना नजीक त्यानें शीखांचा पराभव केला. परंतु तो निघून गेल्याबरोबर पुनः शीखांनीं सर्व पंजाब प्रांत परत मिळविला; तेव्हां दोन शत्रूंशीं सामना करणें धोक्याचें वाटून, मराठ्यांशी त्यानें आपलें भांडण मिटविलें. नाना सा० पेशवा वारल्यावर

मराठ्यांचेही उत्तरेंतील उद्योग थोडे मंदावल्यामुळें उभयतांची गोडी सहजच झाली. दिल्लीतून हिंगण्यांचे मार्फत कांहीं दिवस वाटाघाट चालून अब्दालीचे वकील गुलराज व आनंदराम दक्षिणेंत पेशव्यांकडे आले. फेब्रुवारी व मार्च स. १७६३ त हे वकील सुमारें एक महिना इकडे होते. त्यांजबरोबर करार झाला कीं, 'ती० कैलासवासीयांच्या वेळेस ज्याप्रमाणे अंमल होता, त्याप्रमाणें परगणियांत अंमल शहानीं ताकीद करून देवावा याप्रमाणें जाल्यास वाकिलांस चाळीस हजारांची जहागीर अंतर्वेदींत देण्याचा करार' पेशव्यानें लिहून दिला. [८.३.१७६३–मा. पे. रो. १.१, ६, ७; व इ. सं. ऐ. टि. १.५६]. या वाकेलांचा बंदोबस्त पेशव्याने अहंमदनगरास ठेविला होता. पेशव्यास त्यांनीं अब्दालीकडील पोशाख आणिले आणि पेशव्याने भद्रगज हत्ती अब्दालीस नजर केला. याप्रमाणें मराठ्यांशी गोडी झाली, पण शीखांनी मात्र त्याचा पंजाबांतून साफ उठाव केला. एकदां स. १७६७ त तो पंजाबांत आला. पण त्यामुळें लभ्यांश कांहीं झाला नाहीं. अशा प्रकारे हिंदुस्तानच्या इतिहासावर चिरंतन परिणाम घडविणारा हा प्रसिद्ध पुरुष वयाचे ४८ वे वर्षी ता. १९.१०.१७७२ रोजी काळपुळीच्या विकारानें चमननजीक मरण पावला. त्याचा मुलगा तयमूरशहा बापासारखाच उपद्व्यापी होता. गादीवर येतांच त्यानें वजीर शहावल्लीखानास ठार मारिले. अति मद्यप्राशनानें विकार होऊन तयमूरशहा १८.५.१७९३ रोजी मरण पावल्यावर त्याचा मुलगा जमानशहा गादीवर बसला, त्याचा संबंध पुढें इंग्रजी कारभाराशीं येतो.

१०. पेशव्याची शेवटची स्वारी [जानेवारी—मार्च १७६१].— निजामावर नजर ठेवण्याच्या इराद्याने या सालीं पेशवा दसऱ्यानंतर ता. २२ ऑक्टोबर रोजी बाहेर पडून डिसेंबर अखेर नगराचे वाजूस राहिला. १४.११.६० चें पत्र (३.२१०) सदाशिवरावाचें पेशव्यास गेले त्यांत पानपतावर फौजांचा समीपता झाल्याचा मजकूर आहे. त्यानंतर पत्रें न आल्यानें पेशव्यास चिंता उत्पन्न झाली आणि अनेक लोकांस तिकडे त्यानें निकडीचीं पत्रें लिहून खबर विचारिली. विश्वासरावाचें एक पत्र आहे तें असें. 'फौजेत रसदेची

व पैशाची तूट पडल्यामुळे फार हलाकी आहे. गिलचे यांचा पेच भारी पडला आहे. तरी या समयी ५० हजार फौज व एक क्रोड खजिना यांची मदत सत्वर न आल्यास निभावणी कठिण आहे. केवळ अगतिक म्हणोन पत्र लिहीत आहे. मी आपल्याकरितां लिहीत नाहीं. माझ्यासारखे पुत्र आपल्यास आणखी आहेत व होतील, परंतु भाऊसा० सारखा बंधु मिळणार नाहीं.'[1] ता. २० नोव्हेंबरास फौजेची मुळींच हलाखी नव्हती, तथापि महादेवा पुरंदऱ्याने एकदम मदतीस जाण्याविषयी पेशव्यास आग्रह केला. हा पुरंदरे चतुर व अनुभवी गृहस्थ क्षयाचे व्यथेनें याच नोव्हेंबरांत मरण पावला [भा. व इ.]. अक्कलकोटकर फत्तेसिंग भोसले सुद्धां ता. २० नोव्हेंबर रोजीं मरण पावला. डिसेंबर २१ रोजी पेशव्याचा मुक्काम राक्षसभुवनावर होता. २७ डिसेंबरास त्यानें पैठणास दुसरें लग्न केले. मुलगी नारोबा नाईक वाखरे देशस्थ सावकाराची केली. नांव राधाबाई. पुढे लगेच पेशवा उत्तरेंत निघाला. बरोबर जानोजा व मुधोजी भोसले, बाबूजी नाईक, गोपाळराव गोविंद पटवर्धन, सदाशिव रामचंद्र, यमाजी शिवदेव, विठ्ठल विश्राम, इत्यादि मंडळी होती. रघुनाथरावही प्रथम बरोबर होता, परंतु तो ९ जानेबारीस सखाराम बापूसह निघून निजामास आणावयास गेला [ऐ. ले. सं. १-२६], तो पुढें एप्रिलांत पुण्यास आला. भेलसा येथें पानपतच्या सावकारांचा कासीद पौष शु. १३ स (१९·१·६१) निघालेला सहावे दिवशी म्हणजे ता. २४ जानेवारीस भेटला, त्याजवळ एक कागद मिळाला, त्यांत मजकूर कीं, 'दोन मोती गलत. दसवंस अश्राफत; रुपयोकों गणति नहीं.' मागाहून हळू हळू ज्यास्त मंडळी येऊन दररोज नवीन नवीन हृदयद्रावक बातमी पेशव्यास कळत गेली. एकदां ऐकावे भाऊसाहेबाची फते झाली, पुनः ऐकावें मोड झाला. अशा स्थितींत वास्तविक प्रकार समजण्यास पुष्कळच कालावधि लागला. महिना दोन महिने तर खऱ्या खोट्या अनेक बातम्या कानावर येऊन पेशव्याच्या व एकंदर मंडळींच्या

१ टीप.–हें पत्र बखरीचे आधारावर रा. चिं. वि. वैद्य यांनीं बनवून त्यास २०·११·१७६० ही मिति जोडली आहे.

मनाचा असा कांहीं गोंधळ उडाला कीं, खरोखरच वेड लागण्याची पाळी आली. दररोज किंबहुना दरघटकेस कोणी तरी नवीन इसम किंवा वर्तमान येऊन ऐकणारांच्या मनांत आशा व निराशा यांचे भयंकर काहूर उठत असे. प्रत्येकास कांहीं तरी थोडी हकीकत ठाऊक, समग्र कोणासच ठाऊक नाहीं. या घोटाळ्यानें मनाची त्रेधा होऊन मुख्य उद्योग राहिला. बाबूराव व यशवंतराव कोन्हेर हे भोसल्यांचे दोन सरदार झांशीस होते त्यांस पेशव्यानें बरीचशी पत्रें लिहिलेली आहेत. 'खासा स्वारी हिंदुस्थनांत सत्वर होणार, बरोबर मातबर लेफखाना आहे, तर बैल चांगले मजबूद, तयार ठेवावे; तमाम राजेरजवाड्यांस लिहून सामील होणें' [२२·११·१७६०; ३·१९७, २२७]. माळव्यांतच त्यांस भेटावयास बोलावून, पेशव्याने तोफा, सामान वगैरे जमा करविलें [३·१९८, १९९, २०६, २१४; ऐ. ले. सं. १·२८], आणि पुढें चाल ठेविली.

'प्रस्तुत सर्व मंडळी बरोबर आहे. दिल्लीकडे जावयाचा निश्चय आहे. भाऊसाहेबांवर येऊन बेतली आहे. भाऊसाहेबांची हिमत मोठी जे, साठ कोसांवर मराठी फौज उभी राहत नव्हती ते नेऊन झुंजावयास लाविली. ईश्वर त्यांस यश देईलच,' [९· १· १७६१, ऐ ले. सं. १· २६]. नासासाहेबानें नेहमीच्या स्थितींत दिल्लीवर जाण्याचा हा निश्चय अंमलांत आणिला असता. परंतु दररोज नव्या नव्या बातम्या येऊन, त्याचे हृदय विदीर्ण झाले. भाऊसाहेबासारखा पराक्रमी भाऊ व विश्वासरावासारखा सुलक्षणी मुलगा गेल्याचें ऐकून त्याचें हृदय खचले. त्यांत परत आलेल्या मंडळींत वृद्ध मल्हारराव त्यास भेटला. मल्हाररावाची वृत्ति तर नारोशंकरासही दिल्लीवर टिकूं देत नव्हती. तेव्हां त्याच्या सल्ल्याने पुढें जाण्याचा बेत पेशव्याने रहित केला. पानपतांचें वर्तमान वेजेसारखे हिंदुस्थानभर पसरलें. ठिकठिकाणचे मराठे अंमलदारांस भीति उत्पन्न झाली. 'लखनौस खुशाली झाली. नाना प्रकारच्या कंड्या पिकूं लागल्या. हुंड्या कोणी स्वीकारीना, [३·५१२]. 'गनीम सर्व एकत्र होऊन मथुरेवर जमा झाल्याची वार्ता आहे. हा काळ बहुत कठिण दिसतो. परिणाम काय होईल तो पहावा' [३·५१०, ५१३, ५१५]. 'भाऊ, जनकोजी शिंदे

अजमिराकडे आहेत. प्रांतांत रांगड्यांनी मोठी धुंद मांडली आहे. लोकांनी धीर सोडिले. ठाणीठुणीं राहणें संकट जाहे. स्वामीचें आगमन होऊन बंदोबस्त झाला तरी ठाणी राहतील. नक्ष होईल. यवनही बहुत हलकेंत आला आहे.' असें ता. २३·२·६१ रोजी बाबूराव कोन्हेर पेशव्यास लिहितो [३·२०१]. लगेच नानासाहेबने सिहोराहून जबाब लिहिला. ' भाऊकडील लढाई बिघडली हे खबर येऊन रांगडे लबाडी करावयास चुकणार नाहीत. तरी तुम्हीं जागांची मजबुदी ठेवणे. तुम्ही तपशीलवार मजकूर लिहिला तो यथार्थ, परंतु प्रस्तुत फौजांनी गिलच्यांवर जाऊन जोर करणें कळतच आहे. जमीनदारांचे पारिपत्य करण्याकरितां फौजा रवाना केल्या आहेत.' [३·२०६]. पेशव्यानें महिपतरावास पाठवून बाबूराव कोन्हेरकडून चार तोफा झांशीच्या आणविल्या [३·२०७]. चहूंकडून आकाश कोसळलें तरी नानासाहेबाचा धीर सुटला नव्हता.

सदाशिवराव ज्या वाटेनें गेला त्याच वाटेने नाना सा० ही माळव्यांतून ता. ७ फेब्रुवारीपर्यंत भेलशास मुक्काम करून पुढें सिहोर, सिरोजवरून ग्वालेरच्या अलीकडे पछोरापर्यंत गेला. या ठिकाणी राहून ठिकठिकाणच्या कारभाराची व्यवस्था त्यानें लाविली. पुढें जावें कीं परत फिरावे या संबंधानें या ठिकाणी पुष्कळ भवति न भवति झाली. पुष्कळांचा विचार पुढें जाऊन सर्व काम पुरें करावें असाच होता. नारो शंकरास दिल्लींतून पळून जाण्याचें कांहीं एक प्रयोजन नव्हतें. पूर्वीच्या अब्दालीच्या स्वारींत तो असाच पळून गेला, त्या नामर्दाबद्दल त्याचा शिरच्छेदच केला पाहिजे, असें अंताजी माणकेश्वर म्हणे [इ. सं. ऐ. टि. २·३१]. एकादा युरोपीय सेनाध्यक्ष दिल्लींत अशा स्थितीत असता तर तो अगदीं शेवटच्या क्षणापर्यंत तेथून हालला नसता. परंतु मल्हारराबाची सल्ला पुढें जाण्याची नव्हती. नानासाहेबाचा मुलगा माधवराव हा जवळ होता परंतु लहान होता. पेशव्यास हिंमत देणारा व अधिकारानें मसलत सांगणारा एकही इसम पूर्वीच्यां पैकीं राहिला नाहीं. शिवाय स्वतः त्याची प्रकृति अत्यंत क्षीण होत चालली होती. तो दिल्लीपावेतों गेला असता तर पानपताच्या अरिष्टाचा बचपा भरून अपयश धुऊन निघालें असतें. 'होळकर,

विठुल शिवदेव, नारोशंकर वगैरे मंडळी भेटली, सर्व वृत्तान्त निवेदन केला. श्रीमंतांनी ऐकोन बहुत खेद केला. त्यांचा निश्चय की दिल्लीस जाऊन गिल-च्याचे पारिपत्य करावें. अशी विचारणा करून बंदोबस्त करीत असतां, गोपिकाबाईनी बहुत बोध करून माघारे फिरविले फाल्गुन शु. २ (२२ मार्च). रोजी परत निघाले. 'पुढें जावयाचा निदिध्यास प्रधान पंत यांणी धरिला. श्रीप्रयागी जावें, तेथें नावेमध्यें बसोन नाव बुडवावी ऐसें चित्तभ्रमेकरून बोलो लागले. तेव्हां सर्वांनी, चिन्ह ठीक दिसत नाही, ऐसा निश्चय करून, पुढें कूच झालें, ऐसे समजावून, दर मजल पुण्यास येऊन पावले.' [धा. रा. च. पृ. २९]. निघण्यापूर्वी त्यानें त्या बाजूची प्रकरणे बरींच विल्हेस लाविली. प्रकृति अस्वस्थ पाहूनच गोपिकाबाईने परत येण्याचा आग्रह धरिला. नानासाहेबांचें वजन स. १७५४ त १७८ पौंड होते तें या वेळी ११४ झालें. भाऊ भाऊ ऐसा शोक रात्रंदिवस करीत जूनचे आरंभी स्वारी पुण्यास दाखल झाली. जनकोजी व सदाशिवराव यांच्या मृत्युसंबंधानें संशयनिवृत्ति पुढें पुष्कळ दिवस झाली नाहीं. मात्र इब्राहीमखान गारदी घायाळ होऊन पकडला गेला, त्यास अब्दालीनें मारून टाकिलें; आणि महादजी शिंदे घायाळ होऊन बांचला, हें कळलें.

मुसलमानांच्या पदरी सुद्धां बोलाचाली करण्याच्या वकिलीच्या कामावर हिंदु लोकच असत हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. बरखुरदारखानाचा दिवाण मोतीलाल खत्री, नजीबखानाचा मेघराज, भाऊसाहेबाचा बाबू पंडित, हीं नावे काशीराय देतो. राजा वेणीबहादूर हा सुजाउद्दौल्याचा दिवाण त्या वेळीं सुप्रसिद्ध होता.

११. पानपतच्या संग्रामाचा निष्कर्ष. (१) **कागदपत्रांचा अभाव.**— या अवाढव्य झगड्यांत अनेक प्रसंग इतके विचित्र व भयंकर घडून आले कीं, त्यास प्राचीन काळच्या महाभारतासारखें प्रचंड स्वरूप आलें आहे. सदाशिवराव भाऊ, जनकोजी शिंदे, इब्राहीमखान गारदी, इत्यादि अनेक पुरुषांचा हृदय-द्रावक अंत व एकंदर प्रसंगांत घडलेला विलक्षण संहार, यांच्या योगानें या झगड्याचें स्मरण महाराष्ट्राच्या मनांतून कधींही लुप्त व्हावयाचें नाहीं. अलीकडील

संशोधनांत वीस वर्षांपूर्वी रा. राजवाड्यांनीं या प्रकरणाची चर्चा केली, तेव्हां-पासून आणखी कांही नवीन पुरावा बराच पुढे आला आहे; तरी अद्यापि न उलगडलेले भागही पुष्कळ आहेत. सदाशिवरावाची एकट्या बुंदेल्यास दहा महिन्यांत लिहिलेली पत्रें जर तीनशें सांपडतात, तर असंख्य सरदारांस, रजपूत वगैरे रजवाड्यांस व खुद्द पुण्यांत पेशव्यांस किती तरी पत्रें त्याने लिहिलीं असली पाहिजेत. पेशव्यास स्वारींतून अनेकांनी लिहिलेली पत्रें पुण्याच्या दप्तरांत शाबूद आहेत की नाहीत कोणास ठाऊक ! शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे लहान मोठ्या सरदारांनीं, त्यांच्या हस्तकांनी, सटवोजी जाधव, नाना फडणीस, किंवा कृष्ण जोशी यांच्यासारख्या इतर असंख्य लोकांनीं, दक्षिणेंत आपापल्या यजमानांस किवा नातेवाईकांस या दहा महिन्यांत पुष्कळच पत्रें स्वारींतून लिहिली असलीं पाहिजेत. काळजीपूर्वक शोध होईल तर काळाच्या तडाख्यांतून वांचलेले कित्येक कागद अद्यापि सांपडण्याचा संभव आहे. महाराष्ट्राबाहेर रजपूत, जाठ, बुंदेले राजे वगैरे लोकांना त्यांच्या हस्तकांनीं ठिकठिकाणांहून कांही तरी वर्तमाने, आपापल्या मतलबापुरती तरी, त्यांच्या भाषांत अवश्य लिहिलेलीं असली पाहिजेत. याशिवाय ऊर्दू भाग तर सर्वथैव अज्ञातच आहे. निरनिराळे मुसलमान सरदार, मोगल दरबारांतील नाना व्यक्ति, अब्दाली, सुजाउद्दौला, नजीबखान इत्यादिकांनीं आपापसांत अनेक पत्रे लिहिली असलीं पाहिजेत. म्हणजे अर्व्हिनने जसा स. १७०७–३९ पावेतोंचा मोगल बादशाहीचा सार्थत इतिहास लिहिला आहे, तसा पानपतच्या काळाचा तपशीलवार इतिहास अस्सल कागदांवरून अद्यापि कोणीं लिहिलेला नाहीं. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, आपणांस जी काय माहिती आज उपलब्ध आहे, ती सर्व एकतर्फी मराठ्यांचे बाजूची असून, विरुद्ध बाजूची हकीकत पन्नास वर्षांपूर्वी लिहिलेल्या एल्फिन्स्टनच्या ग्रंथापलीकडे बिलकूल बाहेर आलेली नाहीं. इंग्रज व्यापाऱ्यांचा पत्रव्यवहारही अद्यापि अज्ञातच आहे. सारांश, यासंबंधानें एकंदर संशोधन कोठे, कसे, व किती व्हावयास पाहिजे तें यावरून कळून येईल. मात्र पानपत प्रकरणांत मराठी गद्याचे कित्येक अप्रतिम मासले हल्लीं सुद्धां एकवटलेले दिसतात.

एवढ्या मोठ्या प्रकारणासंबंधाने संपूर्ण अथवा थोडा बहुत तरी तपास माधवराव पेशव्याने केला नसेल हे संभवत नाही. त्यानें पुनः दिल्लीवर आपल्या फौजा पाठविल्या, तेव्हां मागील व्यवहारांची तपासणी अवश्य झाली असली पाहिजे. माधवरावाने होळकरास तंबी दिली, नारो शंकरासारख्या अनेक कुचर मंडळींचा झाडा घेतला, तेव्हां, 'मोडलेल्या झुंजाची शिफारस कशास लिहावी !' 'आयुष्यापुढे कोणाचा उपाय नाही !' असे जबाब या मंडळींनी माधवरावास दिलेले उपलब्ध आहेत. त्यांवरून आणि पुष्कळांचा उत्पन्न त्याने खालसा केली यावरून, त्या खरमरित पेशव्याने पुष्कळ तपास केला होता यांत संशय नाहीं. ते कागद कधी तरी बाहेर येणें शक्य आहे काय ? खारांश, हल्लीचे या प्रसंगाचे वृत्तान्त पुष्कळसे अपूर्ण आधारावर रचलेले असून बरेचसे कल्पनेनें सजविलेले आहेत, एवढें तरी वाचकांनी सदैव ध्यानांत बाळगिले पाहिजे. तसेंच न्यायाधीशाची निष्पक्षपात बुद्धि जागृत ठेवूनच या प्रकरणावर अभिप्राय दिले पाहिजेत. बखरकारांचा कल कल्पनेच्या भरारीत अद्‌भुत वर्णनांनी वाचकांचे चित्त उद्दीप्त करण्याचा केव्हां केव्हां दिसतो. सदाशिवरावानें मोगल दिवाणखान्याचें छत फोडिलें, सुजावर फाजील विश्वास टाकिला, जाठास दुखविलें, शत्रूकडील बातमी ठेविली नाही, गर्वाच्या ताठ्यांत अनेकांची हितकर सल्ला झुगारून दिली, वगैरे कारणे निव्वळ काल्पनिक नसलीं तरी निदान अतिशयोक्तीचीं तरी असावीं. एवढ्या मोठ्या प्रकरणांत असे प्रकार हल्लींच्या व्यवस्थेच्या व टापटिपीच्या काळांतही जर अपरिहार्य आहेत, तर त्या वेळच्या संबंधानें बोलावयासच नको. काशीराय तर उघड उघड मुसलमानांचाच पक्षपाती दिसतो. बहुतेक लोक परिणामावरून निकाल देतात. अब्दालीवर समोर आघात करून आदले साली घडलेला दत्ताजी शिंद्याच्या मृत्यूचा पुरेपुर सूड घेणें व दहा वर्षे भिजत पडलेला हिंदुस्थानांतील उद्योग तडकाफडकी विरहेस लावणें, या निश्चयानेंच पटदुरास संपूर्ण वाटाघाट करून स. १७६० च्या ता. १४ मार्च रोजीं सदाशिवराव स्वारीस निघाला. हा हेतु त्या वेळीं सर्वस्वी सिद्धीस गेला नाहीं एवढ्याबरून, सदाशिवरावाच्या वर्तनांतील

कित्येक क्षुल्लक मुद्द्यांस नसतें महत्त्व देणें वाजवी नाही. पानपतच्या संग्रामास नुकतीच एकशे साठ वर्षें पुरीं झालीं, तरी त्या अपयशाची जबाबदारी कोणावर किती येते, हा अद्यापि मोठ्या वादाचा मुद्दा होऊन राहिला आहे. त्याची शहानिशा करितांना पुढील कारणें स्पष्ट होतात.

(२) **अपजयाचीं पूर्व कारणें.**—या मुद्द्याचा विचार करितांना पानपतचा संग्राम दोन भिन्न दृष्टीनीं ध्यानांत ध्यावा लागतो. प्रथम, असा आणीबाणीचा प्रसंग मुळीं उत्पन्न होण्याची कारणें काय ? व दुसरी, एकवार भयंकर पेच येऊन पडल्यावर त्याची योग्य निभावणी कां झाली नाही ? इ. स. १७५० त शिंदेहोळकरांनी बादशहाशी विशिष्ट करार करून, सिंधुनदीपासून बंगालच्या उपसागरापावेतोंच्या प्रदेशाची चौथाई संपादन केली; म्हणजे एवढ्या विस्तृत प्रदेशांतील बादशहाच्या शत्रूचे निवारण करण्याची जबाबदारी शिंदेहोळकरांमार्फत पेशव्यानें आपल्या अंगावर घेतली 'ही जबाबदारी तुम्ही कशी पार पाडतां ती पाहूं !' अशा भावनेनें मुसलमान पक्ष अब्दालीस पुढें करून मराठ्याशीं झगडूं लागला. तेव्हांपासून मराठ्यांनीं दिल्लीस जाऊन बंदोबस्त करावा, आणि त्यांची पाठ वळली म्हणजे अब्दालीने आंत येऊन मराठ्यांची व्यवस्था मोडून टाकावी, असा खेळ दहा वर्षे चालून, त्यांत अब्दाली व मराठे यांची अपरिहार्य पकड उपस्थित झाली. तिचा निकाल पानपतावर लागला.

वरील करारानें आपण केवढी जबाबदारी अंगावर घेतली याची जाणीव अगदी कंठावर येईपर्यंत पेशव्यास असावी तशी नव्हती. स. १७५० पासून दोन वर्षें तो सातारच्या भानगडीत गुंतलेला असून, त्यानंतर त्याने आपले लक्ष दक्षिणेंत कर्नाटकच्या कारभारांत घातलें आणि उत्तरेचा कारभार सर्वस्वी अनभ्यस्त व नालायक अशा रघुनाथरावावर सोंपविला. (१) स. १७५० नंतर स्वतः पेशवा एकदांही उत्तर हिंदुस्थानांत गेला नाहीं. एकवार जर तो तिकडे स्वतः गेला असता, तर किंवा निदान स० रा० बरोबर तो पानपतच्या मोहिमेवर जाता तर, तिकडील व्यवहार त्यानें असे निकरावर येऊं दिले नसते, असें त्याच्या इतर कर्तबगारीवरून खास अनुमान होतें. (२) स. १७४६

पासून शिंदे-होळकरांचें वांकडें होतें तें उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलें. हिंगणे, अंताजी माणकेश्वर, बुंदेले, विठ्ठल शिवदेव, नारो शंकर वगैरे उत्तरेंत वावरणारे सरदार आपआपसांत भांडून मुख्य कारभार बिघडवीत होते, त्यांस ताळ्यावर आणण्याची ताकद रघुनाथरावाचे अंगी बिलकूल नव्हती. उलट त्यानें तिकडील कारभारांत आपल्या नालायकीनें ज्यास्तीच गोंधळ उडवून दिला; संधि आली असतां अब्दालीवर चालून जाण्याऐवजीं, अब्दाली स्वदेशी निघून गेल्यावर, मागाहून अटकेपर्यंत पोकळ झेंडे फडकावून, कांहीं एक बंदोबस्त केल्याशिवाय परत येऊन, अब्दाली दहशत खाऊन पळून गेला, अशी भलतीच समजूत स्वतःच्या बढाईत त्यानें पेशव्याची करून दिली. यामुळें पेशवा निर्धास्त राहिला. (३) रघुनाथरावास कोणत्याही वादांत स्वतः निर्णय देण्याची ऐपत कधींच नव्हती, त्यामुळें हाताखालचे लोक आपआपल्या दृष्टीनें त्यास जें सांगत त्यास होस हो म्हणून तो वेळ मारून नेई. आतां एकास एक सांगावें आणि पुढच्या क्षणीं दुसरा त्याचे उलट सांगणारा आला की त्यासही हो म्हणावें. अशा अनिश्चितपणामुळें त्याचा लोकांवर धाक किंवा दाब मुळीच बसत नसे. (४) काशी प्रयाग वगैरे हिंदूंचीं तीर्थस्थळें मुसलमानांचे हातून सोडविण्याची पेशव्याची आज्ञा बाजूस ठेवून, रघुनाथरावानें जयाप्पास नागोरचे स्वारीत जाऊं दिलें. तिकडे जयाप्पाचा खून होऊन प्रकरण इतकें अंगावर आलें कीं तें निस्तारतां पुरे वाट झाली, आणि वरती रजपूत लोक चाळीस वर्षें मराठ्यांचे पूर्ण पाठीराखे होते, ते तेव्हांपासून त्यांचे वैरी बनले. पानपतच्या संग्रामांत रजपुतांचें पाठबळ असतें तर मराठ्यांचा असा घात खचीत झाला नसता. सारांश, नजीबखान वगैरे मराठ्यांचे द्वेष्टयांस जोर येण्याचें आदिकारण रघुनाथराव होय. स. १७५० नंतर शिंदे होळकर सर्वस्वी पृथक्‌पणें वागत होते. एकाचा उद्योग संपल्यावर दुसऱ्यानें काय तें करावयाचें, संगनमतानें म्हणून वागावयाचें नाहीं, ही त्यांची बेबंदशाही रघुनाथरावानें चालूं दिली. हा प्रकार इतका विकोपास गेला होता की, स. १७५९ च्या अखेरीस दत्ताजी शिंदे अब्दालीच्या पेंचांत सांपडला असतां, (५) मल्हारराव होळकर नजीक असून व शिंद्यांकडून मदतीस

येण्याविषयीं निकडीचीं बोलावणीं येत असतां, होळकर धावून गेला नाहीं; आणि दत्ताजीसारखा शूर मोहरा रणांगणीं पतन पावला. तसेंच (६) नर्जीबरखानाचा बंदोबस्त होळकरानें होऊं दिला नाही. तात्पर्य, पहिल्या दहा वर्षांत अव्यवस्था होऊन अब्दाली व मराठे यांचा संग्राम निफरावर येण्यास रघुनाथराव व होळकर हे दोघे मुख्यतः कारण झाले, आणि पेशव्यानेंही त्याजबद्दलची हयगय केली.

(३) **तात्कालिक कारणें.**–स. १७६० च्या मकारसंक्रान्तीचे दिवशी दत्ताजी शिंदे पडला व अब्दालीनें मराठ्यांचा सर्व उद्योग उलथून पाडिला, ही बातमी, पुढील फेब्रुवारींत सदाशिवराव निजामास उदगीरवर रगडीत असतां, पेशव्यास अहंमदनगर येथें पोंचली. तेव्हां लगेच निजामाची मोहीम पुरी करून सदाशिवराव व नानासाहेब वऱ्हाडांत शिंदखेडनजीक पटदुरावर रंगपंचमीच्या दिवशीं, ह्मणजे ता. ७ मार्च १७६० रोजी, एकत्र झाले. तेथे एक आठवडाभर मोठ्या कडाक्याचा वाद झाला. मागील सर्व चुकांची झडती होऊन रघुनाथरावाची नालायकी उघडकीस आली. महाराष्ट्रांत त्या काळीं सर्व बाजूंनी लायक व अंगावर आलेली बाजू निभावून नेण्यास समर्थ असा एकच पुरुष होता. तो सदाशिवराव होय. अर्थात् त्यासच हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरून ता. १४ मार्च रोजीं त्यानें उत्तरेस प्रयाण केलें. सदाशिवरावास यश आलें नाहीं एवढ्यावरून, वरील नेमणूक चुकीची झाली, असे समजूं नये. वस्तुतः त्यानें अंगीकारिलेली कामगिरी बहुतेक सिद्धीस नेली.

ता. १४ मार्च १७६० पासून १४ जानेवारी १७६१ पावेतों एकंदर प्रसंगाची जबाबदारी सदाशिवरावावर येते. त्याचा विचार करितांना शेवटच्या महिना पंधरा दिवसांची गोष्ट बाजूस ठेविली तर, सदाशिवरावाच्या कारभारांत दोषास्पद असें फारसें कांहीं आढळत नाही. पाहिल्या दोन तीन महिन्यांत तडाख्यासरशी स्वकीय व परकीय बंडखोरांचा त्यानें निक्षून बदोबस्त केला; आणि फौजेची, वसुलाची व एकंदर कारभाराची सुरळीत हुकमत सर्वत्र उत्पन्न केली. रघुनाथरावाच्या वेळचा गोंधळ नाहींसा होऊन सर्वांवर वचक बसला.

नेहमींच्या प्रघातास अनुसरून अब्दाली स्वदेशी निघून न जातां अंतर्वेदींत छावणी करून राहिला, याजबद्दल सदाशिवरावास आनंद वाटून, त्यास धुळीस मिळविण्याची संधि प्राप्त झाल्याबद्दल त्या धैर्यशाली पुरुषाचा हुरूप अत्यंत वाढला. त्या सालीं सर्वत्र सुवत्ता असून सदाशिवरावाने दक्षिणेशी आपले दळणवळण शाबूद ठेविलें होतें. ता. १७ ऑक्टोबरास कुंजपुरा हस्तगत केल्यावर सारंगपुरावर यमुना उतरून अब्दालीस चेंगरणें त्यास अशक्य नव्हतें. मुसलमानांचे बाजूसही अव्यवस्था असून, कुंजपुरा हातचा गेल्यावर अब्दालीस स्वतःची धडगत दिसेनाशी झाली. पेचांत सांपडल्यावर नाइलाजानें यमुना उतरून त्यानें बागपतावर मराठ्यांचा रेषाभेद केला. यांत त्याची सैनिक कर्तबगारी वरचढ ठरते. तथापि नोव्हेंबर महिन्यांत सदाशिवरावाची चांगली सरशी असतां, दक्षिण व उत्तर अशा दोनही दिशांनी चाल करून मध्येंच त्यास मराठ्यांनीं कां चेंगरलें नाही हें एक मोठें गूढ आहे. रसद बंद झाल्याने अब्दाली आपण होऊनच टेकीस येईल अशा भावनेवर, इब्राहीमखानाच्या सल्ल्यानें, पानपतावर ५० हात रुंद व १२ हात खोल असा प्रचंड खंदक खणून व मातीचे उंचवटे बांधून, तोफखान्यावर भिस्त ठेवून, सदाशिवराव बंदोबस्तानें अब्दाली आपणावर चालून येण्याची वाट पाहत राहिला. या वेळी गनिमीकाव्यानें लढून अब्दालीस जेरीस आणावे अशी होळकराची मसलत होती. परंतु फ्रेंचांच्या कवायती तोफखान्याचा प्रभाव सदाशिवरावानें दक्षिणेंत अनेक प्रसंगीं अनुभवलेला असल्यामुळें, इब्राहीमखानाचीच मसलत सदाशिवरावानें स्वीकारिली. इकडे यमुनेपलीकडील सर्व मुसलमान अब्दालीस मनापासून साह्य करीत असल्यामुळे, त्याची रसद बंद न होतां, उलट महिन्या दीड महिन्याचे अवकाशांत त्यानेंच मराठ्यांची रसद सर्व बाजूंनीं बंद केली. पांच पन्नास मैलांतला सभोंवारचा प्रदेश मराठ्यांनी खाऊन उजाड केला. नोव्हेंबर डिसेंबर महिन्यांतलीं मराठ्यांची पत्रें पाहिल्यासारखीं मुबलक नाहींत, व दक्षिणेंत पेशव्यासही कांहीं वर्तमान आलें नाहीं. यावरून मराठ्यांचें टपाल अब्दालीनें कबज केलें खास. कारण

मराठ्यांची हलाकी ओळखूनच तो हळूहळू शेर बनत गेला. एकट्या बुंदेल्याच्या हातून मुसलमानमय मुलखांतील सबंद रसद बंद होणें शक्य नव्हतें. यांत बुंदेल्याची कुचराई म्हणतां येत नाहीं. प्रत्यक्ष सदाशिवराव नजीक असतां त्याजकडून बागपतावर यमुना उतरतांना अब्दालीला अटकाव जर होऊं शकला नाही, तर एकटा बुंदेला मुसलमानांच्या जुटीस केवळ त्यांच्या नजरेखालीं कितीसा पुरा पडणार ! बळवंतराव मेहेंदळ्याने जनकोजीचा पाठपुरावा केला नाही, हाही अपवाद कल्पनाकोटींतलाच होय, असें ता. २८ डिसेंबरच्या नाना फडणिसाच्या पत्रावरून वाटूं लागतें. बळवंतरावाचे व सदाशिवरावाचे पटत नव्हते, असाही नाना फडणिसाच्या आत्मचरित्रांत उल्लेख आहे. होळकरानेंही सदाशिवरावाचा यत्किंचित् आज्ञाभंग न करितां सांगितलेली कामगिरी बरोबर बजाविली. डिसेंबर ता. २२ रोजी गोविंदपंत पडल्यावर सदाशिवरावाची कुचंबणा होऊं लागली. (७) तेव्हांपासून ता. १४ जानेवारीपर्यंत एकदम अब्दालीवर चाल करून निघून जाण्याचा प्रयत्न त्याने केला नाही, आणि अन्नाचा व पैशाचा शेवटचा रज संपेपर्यंत तो तसाच बाट पाहत राहिला, यांतच त्याच्या युद्धकौशल्यावर मोठा दोष येतो. कदाचित् दाक्षिणेतून नवीन फौजा अब्दालीवर चालून येतील व आपली सुटका होईल अशी त्याची अटकळ असेल. कदाचित् आपली पत्रे नानासाहेबास पोंचत नाहीत हे त्यास माहीत नसेल, कांही असलें तरी शेवटच्या क्षणापर्यंत तो वाट पाहात राहिला; (८) शेवटी गोल बांधून शत्रूंस बेसावध पकडण्याच्या बुद्धीनें, त्यांजवर घुसून मारतां मारतां त्यांचे अंगावरून निघून जाण्याचा शेवटच्या रात्रीचा बेत सकाळी एकाएकी त्याने मोडिला; (९) थोडें तरी खाणे शिल्लक ठेवून ताज्या दमाची कांही फौज त्यानें मागें मदतीस ठेविली नाही; तसेंच विश्वासराव पडल्याचे समजल्यावर, (१०) मागचें पुढचें भान सोडून तो अविचारानें संग्रामांत घुसला; या गोष्टी सेनानायकाची नालायकी दर्शवितात. शांत विचारशक्तीस प्रसंगी फांटा देणारा आवेशी गृहस्थ कितीही हुशार असला, तरी सेनापतीचे कामास तो नालायकच होय. मात्र येथें हेंही ध्यानांत ठेविलें

पाहिजे कीं, त्या वेळच्या एकूण एक मंडळींत एकंदर गुणांच्या मानाने सदाशिवरावाइतका योग्य इसम मराठ्यांकडे दुसरा कोणी नव्हता. जनकोजी व महादजी शिंदे त्या वेळी लहान होते. मल्हारराव होळकर गनिमी काव्यांत कल्पक, परंतु विभिन्न मतांच्या अनेक इसमांस हाताखालीं वागवून, संहत कार्य घडवून आणण्यांत त्याची लायकी कधींच बाहेर आलेली नाही.(११)आदल्या वर्षी जनानखान्यामुळें दत्ताजीची झालेली कुचंबणा डोळ्यांपुढे असतां, सदाशिवरावाने तींच चूक केली. जनानखाना शत्रूंचे हातांत पडेल या भीतीने मराठ्यांस अब्दालीचे अंगावरून निघून जातां येईना. स्त्रियांस मारून टाकण्याचाही प्रश्न निघाला होता. परंतु असले क्रूर कृत्य मराठ्यांनीं केलें नाही हें बरेंच झालें म्हणावयाचे. (१२) सकाळीं पांच वाजल्यापासून दोन प्रहरचे तीन वाजेपावेतों मराठी फौजांस सारखी मेहेनत पडून, तोडांत पाणी सुद्धां घालण्यास मिळेंल नाहीं, म्हणून अब्दालीच्या ताज्या दमाची फौज पुढे येतांच मराठ्यांचा धीर सुटला. स० रा० व विश्वासराव हत्तीवरून उतरून घोड्यांवर बसून लढूं लागल्यामुळे गोंधळ उडाला, वगैरे कित्येक मुद्दे विचारार्ह आहेत, परंतु त्यांची शहानिशा करण्यास आधार नाही. सदाशिवरावांत गर्व व हट्ट यांची सांगड होती; पण त्याचे एकंदर कर्तृत्व लक्षांत घेतां, यामुळे राष्ट्राचा लाभच झालेला आहे. बुसीचें कौशल्य पाहिल्यावर गार्दीस नोकरींत घेऊन युद्धकलेत नवीन क्रांन्ति घडवून आणण्याचा त्याचा प्रयत्न पुढें पन्नास वर्षांनी सर्वांनींच स्वीकारिला, यावरून या बाबतींत याचे शहाणपण विशेष वाखाणण्यासारखे असून, पानपतावरून तो बचावून आला असता तर, कवायती फौजेच्या जोरावर मागें पुढे दक्षिणचे मराठे इंग्रजांशींही कदाचित् यशस्वी टक्कर देऊं शकले असते, अशी आशा वाटूं लागते. सदाशिवरावाचें वय मरणसमयी केवल ३१ वर्षांचे होते.

शिंदे घराण्याची देशभक्ति व स्वार्थत्याग हे गुण या संग्रामानें उत्कृष्ट निदर्शनास आले. किंबहुना, पाऊणशे वर्षांचा महाराष्ट्राचा इतिहास या एका घराण्यानें बगचसा बनविला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पानपतानें

सदाशिवरावाचा बळी घेतला, पण महादजीच्या कर्तृत्वास जन्म दिला. उत्तर मराठशाही सावरून धरणारे नाना व महादजी हे दोन पानपतजन्य राष्ट्रपुरुष होत. मागील विपत्तींच्या चिरंतन स्मरणानें व अनुभवानें पुढील राष्ट्रकार्य करण्याची ऐपत व स्फूर्ति त्यांस प्राप्त झाली; आणि त्यांच्याच अस्ताबरोबर मराठशाही संपली.

मल्हारराव होळकराच्या कुचराईमुळे पानपताचा संग्राम विपरीत झाला असे म्हणतां येत नाही. आरंभीच्या घोटाळ्यास मल्हारराव कारण झाला हे वर दाखविलेच आहे; परंतु सदाशिवरावाची स्वारी सुरू झाल्यावर त्याची हुकमत यथायोग्य पाळून, मल्हाररावाने व इतर सरदारांनी आपाआपली कामे वजावण्यांत शिकस्त केली यांत संशय नाहीं. सदाशिवरावास विरोध करून अगर त्याजवर रुसून होळकर किंवा दुसरा कोणी इसम त्यास सोडून गेला नाही किंवा कर्तव्यपराङ्मुख झाला नाही; किंवा शेवटीं प्रत्यक्ष मृत्यु डोळ्यांसमोर दिसत असतां, एकानेंही इतरांस सोडून स्वतःचा जीव बचावण्याचा प्रयत्न केला नाहीं, हें सर्वांसच भूषणावह आहे. शेवटपर्यंत न डगमगतां शूर पुरुषास शोभणारा क्षात्रधर्म सर्वांनी मोठ्या धैर्याने पाळिला, यामुळेच मराठ्यांचा इतिहास आज एवढा उज्ज्वल वाटत आहे. मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड वगैरे बचावून आले, याजबद्दल त्यांस दोष देण्याचे कारण नाही. प्रसंगावधान ठेवून त्यांनी शक्य तितका बचाव केला हें ठीकच झालें. जनकोजी किंवा सदाशिवराव जिवावर उदार होऊन मरून गेले हे म्हणजे त्यांस मोठें भूषण आहे असेही नाहीं. होळकराप्रमाणे तेही जीव बचावून आले असते तर, ग्वाल्हेरीवर पुनः सर्व जमवाजमव करून त्यांनीं अल्पावकाशांत मराठ्यांची सत्ता अटकेपर्यंत वसविली असती. मात्र (१३) मल्हारराव होळकर दिल्लीस आल्यावर नारोशंकरास मदत करून दोघांनी तेथेंच ठांसून राहण्याचें सोडून, ते दक्षिणेकडे त्वरेनें सरकत आले हें त्यांच्या शूर बाण्यास व इभ्रतीस शोभत नाही. माधवराव पेशव्यानें त्यांस पुढें या संबंधानें नरम केलें, तेव्हां त्यांस पुष्कळच पड खावी लागली.

इतकाही प्रकार झाल्यावर, ग्वाल्हेरपावेतों खुद्द नानासाहेब पेशवा आला

होता, (१४) तो हिंमत धरून तसाच पुढें पळणाऱ्या मंडळीस मागें फिरवून दिल्लीवर येता तर येथें मराठ्यांचा जम लगेच बसला असता. परंतु अगोदरच क्षीण झालेल्या पेशव्यास पानपतच्या धक्क्यानें चित्तभ्रम झाला. जगले कोण व मेले कोण हें कळण्यासच कित्येक महिने लागले. धीर देणारा एकही इसम जवळ राहिला नाहीं. व्राइस् म्हणतो, 'संकटसमयी धीर न सोडणें या एकाच गुणावर इंग्रजांची सत्ता आज भूतलावर निर्वेध चालते.' संकटांत भेदरून न जाण्याचा मराठ्यांचा स्वभाव असता तर, पानपतानंतर एक दोन महिन्यांतच दिल्लीस मराठ्यांची सत्ता कायम झाली असती. दूरदूरच्या प्रदेशांत वारंवार फौजा नाचविल्याने प्रत्यक्ष युद्धकलेंत सदाशिवरावाहून अब्दाली निर्विवाद वरचढ दिसतो, तरी हिंदुस्थानचें राज्य संभाळण्याचे कामी त्याची करामत पेशव्यांचे पासंगालाही पोंचण्याजोगी नसून, नानासाहेब किंवा सदाशिवराव उत्तरेच्या कारभारांत आरंभीच लक्ष घालते तर, त्यांजपुढें अब्दालीची मात्रा बिलकूल चालली नसती. पानपतानंतर मराठ्यांचा सामना पाश्चात्यांशीं घडला, हा प्रकार निराळा; परंतु कोणत्याही प्राच्य सत्ताधीशांस मराठे पुरे पडले असते, असें पानपतच्या झगड्याच्या हकीकती वाचून मनांत भरल्याशिवाय राहत नाही.

सदाशिवरावास ह्या स्वारीस पाठविल्यामुळे पानपतचा प्रसंग विपरीत झाला, असेही म्हणतां येत नाही. (१५)अडचणींत शांत वृत्ति ठेवून, सुखदुःखाची पर्वा न करितां, लष्करी व्यवस्था राखणारा कुशल सेनापति क्वचित्च एखादा निपजतो. सदाशिवरावाची वृत्ति अशा धरतीची नव्हती. पाश्चात्यांच्या कारभारांत रणांगणावरील लष्करी हालचाली ठरविण्याची जबाबदारी सेनापतीवर असली, तरी राष्ट्रीय हिताहिताचे दृष्टीनें युद्धाची व्यवस्था ठरविण्याचें काम प्रधान मंडळी रणांगणापासून दूर अंतरावर राजधानींत राहून करीत असतात, आणि साधक बाधक विचार करून ते सेनापतीला हुकूम सोडितात, तशी व्यवस्था मराठ्यांकडे नव्हती, हें वैगुण्य होय. सदाशिवरावास आवरून धरणारा नानासाहेब पेशवा बरोबर असता तर प्रसंग असा निकरावर आला नसता.

सदाशिवरावाची मनोवृत्ति उदगीरच्या विजयानें किंचित् अविचारी झाली होती, असेंही म्हणतां येईल. (१६) पुढें जातांना बागपतावरील ऊताराचा व मागील एकंदर युद्धरेषेचा बंदोबस्त त्याने ठेविला नाहीं ही त्याची चूक होय. बाकी या मोहिमेवर त्यासच पाठविण्याचे एक कारण मागे पृ. १५४ वर सांगितलेलें बादशाही फर्मानही असावें. 'शाहू राजाच्या वंशाची आपण उत्तम व्यवस्था ठेविली आहे त्याप्रमाणें आमचीही व्यवस्था आपण चांगली लावून द्यावी,' अशी बादशहानें सदाशिवरावास गौरवपूर्वक आज्ञा केली होती. पूर्वीच्या स्वाऱ्यांत रघुनाथराव प्रमुख असतां, त्यास ही आज्ञा केली नाहीं, यावरून सदाशिवरावाच्या कर्तृत्वाबद्दल बादशाहींत आदर होता असे दिसते.

(४) **पानपतावरील अरिष्टाचे परिणाम** ठरविण्यांतही मोठमोठ्या लेखकांनीं असाच विपर्यास केलेला दिसतो. हिंदुस्थानचें राज्य हस्तगत करण्याचे मराठ्यांचे कल्पनातरंग या पराजयानें लयास गेले, अशा आशयाचे उद्गार बहुधा सर्व इंग्रज ग्रंथकारांच्या लेखांत आढळतात, (The disaster of Panipat put an end to the dreams of supremacy cherished by the Marathas), ते यथार्थ नाहींत. त्या रणांगणावर अपूर्व संहार झाला, एक सबंद पिढी कापली गेली, अनेक क्रूर व हृदयद्रावक प्रसंग घडले, महाराष्ट्रांत घरोघर दुःखाचे ठाणे कांहीं काळ बसले, यामुळें पानपतच्या युद्धाचें स्वरूप कितीही भीषण वाटलें, तरी त्याचे चिरकालीन परिणाम राज्यावर फारसे झाले नाहींत. मोगल बादशहास दिल्लीस आणून तेथील सुव्यवस्था लावण्याचें काम पुढें दहा वर्षांनी महादजी शिंद्याने सिद्धीस नेले. ठोकळ मानाने विचार केल्यास १७२० पासून ८० वर्षे हिंदुस्थानचें स्वामित्व मराठ्यांकडेच होते, आणि त्यांच्या मध्यस्थीशिवाय कोणतेही राज्यकार्य देशांत घडत नव्हते, ही गोष्ट सिद्ध आहे. वास्तविक पानपतावरील प्रसंगाचा मुख्य परिणाम म्हणजे होतकरू इंग्रजांचे दोन मुख्य प्रतिस्पर्धी मराठे व मुसलमान आपआपसांत लढून हीनबल झाले, आणि तेणेकरून इंग्रजांची सत्ता येथें स्थापन होण्यास अप्रत्यक्ष मदत झाली, हा होय. The fall-

of the Angrias and the disaster of Panipat freed the British from the thraldom of insidious neighbours and hastened their rise.'* अठराव्या शतकांत हिंदुस्थानची स्थिति इतकी खालावली होती की, हा देश मागें पुढें पाश्चात्यांच्या कबजांत जाणार, हें बहुतेक ठरल्यासारखेंच होतें; आणि पानपतावर मराठ्यांचा जय झाला असता तरी हा परिणाम टळला असता असें म्हणतां येत नाहीं. सदाशिवरावाच्या स्वारीनें देशांतील अनेक बंडखोरांना मराठ्यांचा धाक बसला; व सरदार निमूटपणें सरकारची आज्ञा पाळूं लागले. त्यामुळें माधवरावाचे वेळीं त्या बाजूचा उद्योग सुलभ झाला. वास्तविक पानिपतच्या पराभवापेक्षां माधवराव पेशव्याच्या अकालीं मृत्यूनें राज्याचें नुकसान जास्त झालें, ही गोष्ट इतिहासज्ञांस कबूल आहे. पानपतानें मराठ्यांचे राज्यास धक्का बसला ही भावना कोणत्याही तत्कालीन हिंदी लेखांत आढळत नाहीं. कित्येक इंग्रज लेखकांचेंही मत असें आहे कीं पानपतच्या प्रसंगानें मराठ्यांचा अधःपात न होतां उलट त्यांत त्यांचा लौकीकच वृद्धिंगत झाला. मेजर इव्हॅन्स बेल लिहितो. " Even the battle of Panipat was a triumph and a glory for the Marathas. They fought in the cause of " India for the Indians," while the great Mohammedan Princes of Delhi, of Oude and the Deccan stood aside, intriguing and trimming. And though the Marathas were defeated, the victorious Afghans retired and never again interfered in the affairs of India. "

पानपतावर मराठ्यांचे पुष्कळसे अनुभवी सरदार व योद्धे मारले गेले, तथापि लहान मोठे अनेक लोक तिकडील अनुभव मिळवून बचावून परत आले, त्यांचा व एकंदर प्रसंगाचा उपयोग पुढें राष्ट्रास झाल्याशिवाय राहिला नाहीं.

* Gerson da Kunha's Origin of Bombay.

आपण पानपतावर हरलों अशी त्या वेळीं राष्ट्राची भावना झाली नाही, उलट स्वीकृत कार्य तडीस नेण्याचा नवीन हुरूप त्यांस आला. मराठ्यांचें राज्य कायम आहे, युद्धच आहे, त्यांत प्रसंगीं अपजय येणेंही प्राप्य असतें, अशा भावनेचें पुढें सर्व राष्ट्राचें वर्तन राहिलें. खरें म्हटलें तर दत्ताजी, सदाशिवराव, जनकोजी, इब्राहीमखान वगैरे पुरुषांचे मृत्यु हेच राष्ट्रीय दृष्टया भावी उदयाचीं अंतर्भेदी आशाबंधनें होत. अशा स्फूर्तिदायक प्रसंगाची योग्य जोपासना सर्व राष्ट्रें करीत असतात.

कडव्या मुसलमान लोकांशीं समोरासमोर लढण्याची हिंमत व शौर्य मराठ्यांच्या अंगी बिलकूल नाहीं, ते केवळ पळपुटे होत, हा अपवाद सुद्धां पानपतच्या ह्या एकाच प्रसंगानें निरसन झाला आहे. शिंदेहोळकरांची दाणादाण डोळ्यांपुढें असतां, सर्व मराठे सरदार सदाशिवरावाच्या हाताखाली अब्दालीवर घुसले; त्याचा पाडाव केल्याशिवाय परतावयाचें नाही अशा निश्चयानें वर्ष सहा महिने मुसलमानांच्या केवळ घरांत शिरून त्यांनीं त्यांच्याशीं निकराचा सामना केला; बळवंतराव मेहेंदळे, गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार पडल्यावरही पळून जाण्याच्या विचारास थारा न देतां, शेवटपर्यंत खळी खणून सर्व एकत्र बसले; जेव्हां जेव्हां निघून जाण्याचा विचार निघे, तेव्हां लहानापासून मोठ्यापर्यंत सर्व सैनिकांनीं, बायकामुलांनीं, व बाजारबुणग्यांनीं सुद्धां, यजमानाबरोबर अखेरपर्यंत लढून प्राणही देऊं, असा निश्चय शेंकडों वेळां प्रदर्शित केला, आणि एवढा प्रचंड संहार धैर्यानें सहन करून, चिकाटी न सोडतां, पुनः त्यांनीं तोच उद्योग अल्पावधींत सिद्धीस नेला यापेक्षां खऱ्या शौर्याचे दुसरें लक्षण काय पाहिजे ! पानपतचा संग्राम मराठ्यांची कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ उज्ज्वल राखील; कितीही राज्यक्रांत्या किंवा घडामोडी झाल्या, तरी पानपतच्या आठवणीनें मराठ्यांच्या बाहूंस सदैव स्फुरण चढेल; आणि कोणत्याही देशाचें राज्य करण्यास मराठे सर्वथैव लायक आहेत, याची खात्री हा एकच प्रसंग निरंतर पटवीत राहील, यांत तिलमात्र संशय नाहीं.

१२. पानपत नंतरची उत्तरेतील परिस्थिति.–पानपतच्या संहारानें

मराठ्यांचा कारभार म्हणण्यासारखा कोसळला नाहीं आणि नानासाहेबानें आपल्या मुक्कामांत पुनः सर्व जम ठीक बसविला. या गोष्टी व्यक्त करणारे पुष्कळ कागद स्मरणीय आहेत. "दिल्लीहून गिलचा पठाण आपले देशास गेला. रोहिला नजीबखान फौजेनिशीं दिल्लीत आहे. मल्हारराव होळकर माळव्यांत इंदुरी आहेत. गंगाधरपतं तात्या कांहींशी फौज घेऊन जाठापाशीं आहे. खासा जाठाची फौज व तात्या व गाजुद्दीन ऐसे त्रिवर्गांनी मिळून आग्र्याचा किल्ला सोडविला म्हणून वार्ता आहे. किल्ल्यांत अंमल जाठाचा. आजी जाठ जबरजस्त आहे. उभयतां त्याच्या अनुमतें आहेत. अयोध्येचा नबाब श्री काशीस आला. तेथून आठ दाहा कोस पूर्वेस जाऊन पटण्यास पातशहा होता त्यास आणविला. त्यानें नबाबास वजिरी दिली. आज तीन दिवस काशींत आहेत." (२८·६·१७६१, ३·५२३). जाठानें मराठे सरदारांस खूष ठेवून स्वार्थ साधून घेतला. 'जाठाची फौज भदावर प्रांतांत येऊन अटेर घेतली, आणि भिडेरा लागले आहेत. तेथून पुढें सरकारच्या प्रांतांत येऊन उपसर्ग करणार म्हणोन वर्तमान आले' [का. सं. प. या. ५०]. रघुनाथरावाने गोपाळराव बर्व्यासच या प्रांताचा कारभार सांगितला. 'नबाब काशीस आले आहेत, परंतु रयतेवरी बहुत कृपा करितात. शहरांत कोणास काडीइतका उपद्रव नाही (२१·५·६१, ३·५२२). जानोजी भोसले पेशव्याबरोबर आला होता, त्याने काम चांगले करून ठिकठिकाणी बंदोबस्त केला. ता. ८·५·६१ रोजी तो लिहितो. 'आपण आम्हांस व गोपाळराव यांसी खेचवाडियाचे पारिपल्याबद्दल ठेविले होते. त्यास तेथील गुंता उरकून दरकूच सुरंजेस आलों. तेथून मंडले प्रांताचे बंदोबस्ताबद्दल सागराचे सुमारे आलो, तो राजश्री विसाजी गोविंद कमावीसदार दिम्मत बाळाजी गोविंद हे भेटीस येऊन निवेदन केलें की, बुंदेलखंडांत बुंदेले यांनी जमाव करून तमाम ठाणीं घेतलीं. एक सागर व हाटे राहिलें त्यांजमध्यें हाट्यास मोर्चे लाविले आहेत. तें घेतल्याने तर सागरास लागतील, म्हणजे बुंदेलखंडाचा अंमलच उठतो. याची साहित्य केलिया मुलूक रहातो, नाही तर नाही. यास्तव या प्रांतीं येऊन हाट्याचे मोर्चे कापून

काढिले. वरकड ठाणी घेऊन मशारनिल्हेचे स्वाधीन केली. याचा मजकूर सविस्तर पेशजी लिहिलाच आहे. सांप्रत राजश्री हिंदुपत राजे यांचा वकील सौरस्यानिमित्त आला आहे. त्यास कमाविसदार मशारनिलेचा व त्याचा तहरह करून देऊन सत्वरच आपले प्रांतास जावयाचें होईल. जातें समयी उत्तम प्रकारें फौजेत ताकीद करून आपले मुलुखांत पायमल्ली सर्वथैव होऊन येणार नाही.' [का. सं. प. या. ३७५]. अंतर्वेदीतील अंमल उठला होता तो फिरून पहिल्या प्रमाणें बसला. बुंदेलखंड व माळवा येथे जमीदारांनीं धामधूम केली होती, त्यांसही शह देऊन अंमल बसाविला. सांप्रत जानोजी भोसले रेवामुकुंदपुरावर फौजेसमेत आहेत. मल्हारबा इंदुरी आहेत.' [२१·५·१७६१, ३·५२२,]. जून महिन्यांत पेशवा मरण पावला त्या वेळीं उत्तरेकडील स्थितीचा उल्लेख खाली लिहिल्या प्रमाणें आढळतो. 'अंतर्वेदीत बहुत करून अंमल बसला आहे. कड्याकडे अद्यापि दंगा आहे. फर्रुखाबादेपलीकडे रोहिल्यांची फौज आली म्हणून वर्तमान आहे. जाठ व गंगोबा तात्या मथुरेजवळ उतरून कौलास (कोळजळेश्वरास) आले हेही वर्तमान आहे. शहाजादा व सुजातउद्दौला यांचें वैमनस्य आलें आहे. जानोजी भोसले सागराहून नागपुरास गेले [२४·६·१७६१, १.२८५]. इटावे येथीलही ठाणे उठोन आलें. रोहिल्यांचें ठाणें बसलें. गंगाधरपंत तात्या व जाठ कोंबेवर आहेत. नजीबखान पाणिपतावर आहे. त्यास माधवसिंग मिळाला आहे. त्यांनीं जाठाशीं बिघाड केला आहे. गंगापारच्या रोहिल्यांचें सूत्र जाठाकडे लागलें आहे. नजीबखान एकटाच वेगळा पडला आहे. जाठाचे मतें सुजाउद्दौल्यानें वजिरी करावी, व गाजुद्दीनखानाने बक्षीगिरी करावी. हे अलीगौहरचे मनास येत नाहीं. गाजुद्दीनखान अगदीच नसावा, आपल्या हातीं द्यावा. त्यास जाठ देत नाही, त्यामुळें जाठाचें त्याचें बिघडेलसे दिसतें. गणेशसंभाजीनें झांशीची मामलत बाबूराव कोन्हेरकडून करून घेतली [५·८·१७६१; १·२९५, २९७, २९९].

परत निघाल्यावर पेशव्यास हळूहळू पानपतावरील प्रकार कसे व कां घडले, हें समजून त्यास मल्हारराव होळकर, नारो शंकर वगैरे मंडळींचा राग आला.

होळकराचे महाल पेशव्यानें जप्त केले. या कामांत पेशवा रघुनाथरावाचे विचारानें वागत होता. पवारांची व शिंद्यांचीही जप्ती करण्यांत आली, पण ती पेशव्यानें लवकरच उठविली [६·५०७]. परंतु मल्हाररावाचें प्रकरण कैक वर्षे विकोपास गेल्यावर त्यांतच त्या वृद्ध पुरुषाचा अंत झाला, आणि पुढे माधवराव पेशव्याने अहल्याबाईशी समेट केला. गंगाधर यशवंताचा मुलगा कृष्णराव मे १७६१ त लिहितो [इ. सं., ऐ. च. १]. 'हिंदुस्थानची मसलत बिघडली. भाऊ.चा तो प्रकार ! श्रीमंतांचे शरीरी समाधान नाही यामुळे प्रकृत विलक्षण जाली. श्री. विश्वासराव कैलासवासी, हा श्रम मोठा. त्या खेदाकरितां रा. सुभेदारांस त्यांनीं लिहिलें असेल. त्याचें विषम सुभेदारांस वाटेल; उदासीनता मानतील, आपण प्रसंगी आहेत; सूचना असावी, म्हणून विस्तारें लिहिलें. ऐशीयास श्रीमंतांनी यजमानांस लिहावे, आम्ही कळूं न द्यावे, अशा गोष्टी न लिहितां अमलांतच आणिल्या. सुरंजेहून श्रीमंत मागें फिरतां पवारांचे महाल जप्त केले. उज्जनीस जाऊन शिंद्यांकडील ऐवज भक्त व कापड जवाहीर येणे प्रमाणें घेऊन, कारकुनासही पुसावयाचें ते पुसले. रा. गोविंद शिवराम यांसी इंदुरीं पाठवून ऐवज कांही व तोफा मागत होते, तेथें द्रव्यसाधना न झाली. उपरांतीक संवत्सर प्रतिपदेचे दिवशी (६·४·१७६१) खासा स्वारी इंदुरास आली. एक दिवस राहून प्रयत्न करावयाचा तितका करून पाहिला. दुसरे रोजी कूच करून ब्रह्मणपुरास दरमजल गेले. तेथून पत्रे पाठविलीं कीं, देशचे महाल आम्ही जप्त करितों. येणेकरून यजमानांची मर्जी फारच कडू जहाली, त्याचा विस्तार कोठपर्यंत लिहावा. रायापासून आजपावेतों एकनिष्ठेनें सेवा केली, कोणे गोष्टीचा शब्द यजमानांनीं लावून घेतला नाही. हल्लीही कमी केली न केली हें, या प्रसंगी होते त्यांस प्रसिद्ध आहे. यजमान वर्तमान असतां, जाप्ती करावी, हें खावंदापासून दूर असे. आम्ही कित्येक प्रकारें रा. सुभेदारांची मर्जी न कळावी अशा विनंति करून, यथापूर्व चालावे, याच विचारें बोलत असतो. परंतु दिवसें दिवस ० हे विनंति.' याच कृष्णरावाचें खालील पत्र रघुनाथरावास आहे [१९·५·६१]. हिंदुस्थानच्या मनसुबियाचे कित्येक प्रकारें पत्रीं आज्ञा. ऐशियास. तथिरूप

तों राजश्री सुभेदार साहेबीं हिंदुस्थानच्या बंदोबस्तास्तव वजीर गाजुद्दीखान व ठाकूर सुरजमल्ल यांजकडे रवाना केले. स्वामींचीं पत्रें बजिन्नस त्यांजकडे पाठविलीं. सांप्रतही रा. सुभेदारांनी विनंतिपत्रें लिहिलीं आहेत, त्यांवरून निवेदन होईल. हिंदुस्थानचा मदार सर्व सुभेदारांवर आहे, हे आज्ञा पूर्वपासून सर्व कारभार राव कैलासवासी यांनीही रा. सुभेदारांचेच हातीं घेतला. अलीकडेही येणेप्रमाणेच चालत आलें. परंतु अंवदां श्रीमंत सिरोंजेहून माघारे फिरल्यावर खावंदांनी पूर्व लोभास अंतर केलें. चाकरांनी सेवा करावयास अंतर केलें नाही. जे लढाईत होते ते सर्व भेटलेच असतील. त्यांनी वर्तमान निवेदन केलें असेल. मोडल्या झुंजाची शिफारस कश्यास लिहावा ! शिंदे, पवार पूर्वपासून चाकर साहेब कामावर त्यांच्या ह्या गति, अशा समयांत त्यांची जप्ति नसावी. रा. सुभेदार यांजकडील महाल देशचे जप्त केले, म्हणून श्रीमंतांनी येथे लिहिले होतें. तेणेंकरून यांचे चित्तास उदासीनता जाली. आजपावेतों सेवा केली त्याचें फळ हे, पुढें केलिया कळतच आहे, ऐसें वारंवार बोलतात. आज्ञेप्रमाणे आम्हीही यांचे शांतवन करीत असतों. आतां साहेब आले, सर्व बंदोबस्त करतील, सेवक लोकांचें समाधान करून मागती सर्व बंदोबस्त करवावा, ह्या रीती सर्व खावंद जाणतच आहेत. या समयांत पांच चार हजार फौज येती तर थोडा बहुत बंदोबस्त होता. श्रीमंतांनी इकडे कांहीं फौज ठेविली नाही. रा. बाबूजी नाईक, सदाशिव रामचंद्र व रा. गोपाळ गोविंद सर्व देशास गेले. सेवेशीं श्रुत होय ही विज्ञप्ति' [रा. ब. पारसनीसकडून]. विठ्ठल शिवदेव १५·५·६१ रोजी रघुनाथरावाचा माळव्यांतून लिहितों. 'स्वामींचीं पत्रें मल्हारराव होळकर सुभेदार यांस येतात. आम्ही ते एका जागांच आहों. स्वामीस परस्परें कळले असेल. (स्वामीनी आम्हांस) पत्र न पाठवावयाचें कारण इतकेंच दिसोन आलें कीं, **हे वांचून कशास आले ?** त्यास हें प्रमाणच आहे. मरणाच्या खस्तीस कोण्ही चुकलें नाही. कारण आयुष्यापुढें इलाज नाहीं. जखम लागली तेथें खैर होऊन वांचून यावे हे इश्वरी सत्ता. 'आयुरक्षति कर्माणि आयुरन्नं प्रयच्छति' ऐसें आहे. परंतु आम्हीही आपल्या जिवास खातच

आहों. आम्हांसहि सर्व गोष्टी कळतच आहेत. परंतु मेहनत (अगर) गैरमेहनत, सर्व एक इश्वरी क्षोभाने वायां गेल्या ! सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. ग्वालेरीस तीन वर्षे पैसा नाही. मामलेदारांवर वराता दिल्या. त्यांनी माघाऱ्या टाकिल्या ! स्वामींनी किल्याची बेगमी करणे ते करावी. मागील फडशा करून किल्ला सरकारांत ठेवावा. नाहीं तर दुर्निमित्य आहे. सरंजामाचा पैसा, दोन वर्षे जाली, पुण्यास रसदा घेऊन फौजेस दिल्या, त्या तैशाच देणे राहिलें. माळव्यांत अंमलास खलेल, तेथे ग्वाल्हेर तो म्हारवाडा आहे. सरदार नव्या दमाचे आले, ते आम्हां अगोदरच देशास गेले ! हिंदुस्थान राहतां कठीण आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. ता. ९ सवाल मु० गांगरोणी. [रा. श्री. वि. आठल्ये यांजकडून].

प्रकरण एकतिसावें

नानासाहेब पेशव्याची योगता.

१ पेशव्याचा मृत्यु (२३·६·१७६१)
२ कर्तबगारीचा अंदाज.
३ कौटुंबिक परिचय.
४ सामाजिक व धार्मिक परिचय.
५ श्रावणमास दक्षिणा.
६ पर्वतीचा देवदेवेश्वर.
७ पुण्य नगरीचें ऐश्वर्य.

१. अखेरचे दिवस व मृत्यु.—नाना फडणीस लिहीतो, 'शिरोंजेहून आलों ते बऱ्हाणपुरचे मुक्कामी श्रीमंतांची भेट झाली. मर्जीचा प्रकार म्हणावा तर, अस्थि चर्म मात्र राहिले आहे. शरीर फारच कृश झालें. घटकेच्या गोष्टीचें स्मरण राहत नाही. ज्याजवर रागे न भरावयाचे, त्याजवर भरावें, मनास येईल ते करावें, ही प्रकृत पाहून फारच श्रम झाले. उपाय काय ! ईश्वरें कसे तरी त्यांस सलामत राखावें, हेंच ईश्वराजवळ मागणें आहे. तमाम मुत्सद्दी निरोप मागून देवास वगैरे जागां जागां गेले. टिकाव होतां कठीण.

किल्येक बारीक बारकि मर्जी फारच बिघडली आहे, ती लिहितां येत नाहीं. औरंगाबादेजवळ आल्यावर राजश्री देवराव यांचे बंधु तेथें होते ते आले. त्यांची भेट झाली. मग मिसरजीकडील वगैरे सर्व वर्तमान त्याजपाशीच मात्र सांगितलें. त्यांचे आमचे विचारें ठराव जाहला कीं, श्रीमंतांजवळ बोलावयाचें नाहीं. श्रीमंत राजश्री दादासाहेबांसच विनंति करून मग काय ठराव होईल तो करावा. असा निश्चय करून ही गोष्ट तशीच ठेविली. यांचीं कारणें फार आहेत. कोणाजवळ काय बोलतील हा भरंवसा नाही. भलत्याच जवळ बोलले, तर तेथें वर्तमान प्रकटून विकोपास जाईल हें एक, व एके घटकेस एक बोलणें, अशानें परिणाम कसा लागतो ? अशा बहुत गोष्टी चित्तांत आणून ठेविलें. श्रीमंत चार दिवस झाले पुण्यास गेले. आम्ही मातोश्रीचे कार्य करावयास्तव टोकें येथे राहिलों. राजश्री देवराव तात्याही आम्हां जवळच आहेत. श्रीमंतांबरोबर फिरोन खर्चाखालीं मात्र यावें, ते गंगातीरींच कां न राहिले ? यास्तव राहिलों. त्यांनीं तुम्हांस पत्र लिहिलें आहे, त्यावरून कळेल. श्रीमंतांचा यख्तियार प्रस्तुत हिंदुस्थानचा मल्हारबावरच आहे. याप्रमाणे वर्तमान आहे' [६·४१५; १७·६·१७६१]. 'श्रीमंतांस किंचित् भास जाहला होता. त्याजमुळे मर्जी फार कठिण. परंतु पुरुषोत्तमराव यांवर पूर्ण कृपा श्रीमंत रागानें थोर थोरांस कमचीनें (वेताची छडी) मारूं लागले. यामुळें मंडळी जवळ जाईनाशी झाली. एके दिवशीं नर्मदातीरास संध्या करीत असतां अकस्मात् झोंक गेला. पुरुषोत्तमराव दाजीचे बंधु नारायणराव नाना यांनी उठोन श्रीमंतांस धरिलें. तेव्हां मागें पाहून बोलले, दुसरा कोणी असता तर कमच्यांनीं मारिलें असतें. मला यांचा विटाळ झाला. पुरुषोत्तमराव बोलले, पुनः स्नान करावें. तेव्हां श्रीमंत हसून म्हणाले, अरे पुरुषोत्तमराव तूं बोललास म्हणजे माझा राग नाहींसा होतो. पुढें पुण्यास आल्यावर वरचेवर बोलावणें पाठवीत. एके दिवशीं पुण्यास दहा बारा घटका रात्रीं श्रीमंतांचें बोलावणें आलें. दाजी गेले. श्रीमंत दिवाणखान्यांत होते. बाईसाहेबही तेथेच होत्या. आंत गेले. जवळ जातांच हात धरला. हे मनांत म्हणाले कीं तोंडांत मारतात. तों

श्रीमंतांनी ओढून पलंगावर बसविलें. मग पूर्वीच्या गोष्टी काढिल्या. म्हणाले तुला कांहीं द्यावेंसे वाटलें. परंतु आतां जामदार पोतनीस घरास गेले असतील. तेव्हां अंगावरची पांढरी शालजोडी काढून पुरुषोत्तमरावाचे अंगावर घातली. बाईसाहेबांकडून विडे देवविले. याप्रमाणें श्रीमंत नानासाहेबांची पूर्ण कृपा संपादिली.' [हरिवंशाची बखर पृ. १४-१५]. ही बखर वाचली म्हणजे पुष्कळ आख्यायिका व व्यक्तिस्वभाव समजतात. या हकीकतींतील पुरुषोत्तम कृष्ण हा पटवर्धन घराण्यापैकी नानासाहेबाच्या लोभांतला गृहस्थ होता.

परत येतांना वर्षप्रतिपदेस इंदुरास जाऊन नर्मदेवर मुक्काम असतां ११-४-६१ रोजी मांधाता येथे तुलादान करण्यांत आलें. त्या वेळीं ना० सा० चें वजन ४५६८ तोळे म्हणजे ११४ पौड भरलें. स. १७५४ च्या जून माहिन्यांत अशाच तुलादानप्रसंगी तें ७१२२ तोळे म्हणजे सुमारे १७८ पौड होतें. ३३ व्या वर्षी १७८ पौडांचें वजन असणे म्हणजे तो पुरुष भव्य, हाडापेराने थोराड व बराच स्थूल असला पाहिजे. नर्मदेहून पुढें येतांना १६ मे रोजीं गोदातीरीं कायगांव टोक्यास बाजीरावाचें श्राद्ध करून ३ जून रोजी पेशवा पाबळास आला. तेथून पुढे तो एक दोन दिवसांनीं पुण्यास दाखल झाला. याच वेळेस पुण्याचा प्रसिद्ध लकडी पूल घाईघाईनें सहा दिवसांत तयार करण्यांत आला. 'पुलाचे कामावर स्वारी नित्य जात होती' [का. सं. श. पृ. १८-१९]. हळूहळू तब्येत ज्यास्तच क्षीण झाली. १८ जून रोजी स्वारी पर्वतीचे बंगल्यांत जाऊन राहिली. दिवसेंदिवस भाऊसाहेबांच्या शोकें करून शरीर कृश झालें. बुद्धिभ्रंश झाला. लोकांस शिव्यागाळी करूं लागले. कारभार विपरीत होऊं लागला. पुत्रशोक व बंधुशोक (भा. व. श.). अंतकाळी जवळ कृष्णराव पारसनीस व कोन्हेर त्रिबक होते. गोपिकाबाई व नाटकशाळा पलीकडे खोलींत होत्या. काळ जाहला तेव्हां रघुनाथ बाजीराव जवळ आले, त्यांनी मांडी दिली. माधवरावसाहेबही होते. मंगळवार ज्येष्ठ वद्य ६ शके १६८३ रोजी दीड प्रहर रात्री देहावसान झालें. लकडी पुलाजवळ सार्थक वेले. तेथें वृंदावन आहे [का. सं. श.].

'प्रधानपंत क्षयाची व्यथा होऊन वारले' [धा. रा. च. पृ. ३०],

असें स्पष्ट वाक्य उपलब्ध आहे, त्यावरून मृत्यूचे कारण उघड होतें. पानपतच्या संहारानें त्याचें मन उद्विग्न व बेकाबू झालें असेल. परंतु त्याचें शरीर एकाएकी खचण्यास हाच रोग कारण झाला असावा. कुटुंबांत क्षयाचा प्रादुर्भाव असून शेवटच्या तीन चार महिन्यांतील प्रकृतीचा तपशील या व्याधीला विशेष संभवतो. गोपिकाबाईशी त्याचें बिनासलें असल्याचा उल्लेख नानाफडणिसाचा आहे. स. १७६० च्या डिसेंबरांत दुसरी तरुण बायको त्याने केली आणि लवकरच अस्थिचर्मावर शरीरस्थिति आली. बारावर्षाच्या वयापासून २५-२७ वर्षे जबरदस्त उद्योग, दगदग व चिंता यांच्या योगानें त्याच्या शारीरिक व मानसिक शक्ति क्षीण होऊन त्यास अकाली वार्धक्य आलें. कदाचित् शेवटच्या पांच चार वर्षांत त्याची भरभराट व वाहवा झाल्यानें तो थोडासा आरामप्रिय व विषयलोलुप झाला असावा. सदाशिवराव, रघुनाथराव व गोपिकाबाई इत्यादिकांच्या कौटुंबिक कलहांत गुरफटून त्याचें मन उदास झालेले असावे. अशा अनेक कारणांनी क्षयाची वृद्धि होऊन त्यांतच मनःक्षोभानें पेशव्याचा अंत झाला.

शेवटच्या दोन तीन वर्षांत नानासाहेब रंगेल बनून त्यास नाचरंग वगैरेंचा शोक उत्पन्न झाला होता. शके १६८० त 'शिमग्याचा रंग मोठा केला. श्रीमंत कोंकणांतून पर्वतीस आले. भाऊसाहेब भेटीस गेले. भेटी होऊन वाड्यांत आले. रंग सर्वत्रांवर टाकिला. रंगाची चाल वाड्यांत चालू जाली. शके १६७९ व ८१ या सालींही रंग झाले. शेवटचा रंग पटदुरास झाला. कदाचित् कौटुंबिक कलहांनीं मनास आलेली उद्विग्नता दूर करण्याकरितांही हे रंग असतील. पण ते पुढील अरिष्टाचे पूर्वरंग होते असें वाटूं लागते.

'मंगळवारचे दिडा प्रहरा रात्रीस मृत्यु आला. मृत्यु होतांच बंदोबस्ती केली. जागजागां दहा वीस गाडयांच्या चौक्या ठेवून वाड्याभोवतीं हजार बाराशें चौकी ठेवून बंदोबस्ती केली. दुसरे दिवशी बुधवारी अग्नि दिला. ते दिवशीं शहरांत मोठा आकान्त जाहला. तशामध्ये कोणी परसैन्य नव्हते, नाहीं तर मोठा प्रळय झाला असता. इतके असतां जो आंगच्या (तुळाजी)

कैदेमध्यें आहे, त्याणें, व इब्राहीमखान गारद्याचा भाचा चाकरीचे उमेदगारीमुळे सात आठ हजार गारद्यांनिशीं आला आहे त्याणें, श्रीमंत सावध असतांच पैगाम केला होता की, यांचा काळ होतांच तूं व आपण मिळून शहर लुटावें आणि गर्दी करावी. ऐसा पैगाम होताच. तों इकडे काळ झाला. आणि आंगऱ्यानें त्यास पत्र पाठविले कीं आतां हे वेळ आहे. गारदी व तुम्ही येऊन पोचणे. त्यानें तें पत्र बजिन्नस नेऊन श्री. दादासाहेबांस दाखविले. त्याजवरून आंगऱ्यावर आणखी चौकी मजबूत गारद्यांची ठेवून बंदोबस्ती केली. जीवनराव वकिलान मोगलास पत्रे पाठविली होती ती धरली कीं तुम्ही या वेळेस येऊन पोचणे. त्यावरून त्याची अप्रतिष्ठा केली, अशी जन-अफवा आहे, प्रस्तुत कामकाज कुलअखत्यारी बाबूराव फडणीस व सखाराम बापू दोघे जण आहेत. यांज वेगळे काडीमात्र कामकाज होत नाहीं. दादासाहेब चौदावे दिवशी सोमवारचे बारा घटका रात्रीं वाड्यामध्ये मुहूर्त करून दाखल जाले. तोंपर्यंत पर्वतीस होते. श्री. माधवराव व बाईसाहेब बुधवारीं (ता. ८ जुलई) दाखल होणार. पर्वतीस आहेत. पुढे मानस आहे की साताऱ्यास जाऊन ताराबाईचे विद्यमानें राजापासून पांघुरणे घ्यावी व नवे शिक्के करावे, मग पुढे राज्याचा बंदोबत्त करणे तो करावा. ताराबाईनें आपले खुशीनें राजापासून पांघुरणें दिली तर उत्तमच आहे. नाहीं तर आपणच कार्य भाग संपादून सत्वरच यावें ऐसा निश्चय आहे. मंगळवारीं जेजुरीचा मुक्काम होता. चिटकोपंत नाना पुढें स्वार होऊन गेले. तो, मागे फिरून मनसुबा राहिला. चार दिवस मुक्काम झाला. चौ दिवसां करार जातील. सारांश, कारभार उभयतांकडे आहे.' [६·७·१७६१; १·२८६] श्रीमंतांचा आजचा बारावा दिवस आहे. दानधर्म उत्तम प्रकारें दानें वगैरे होतच आहेत. रा. माधवराव क्रिया करितात. तेरावा दिवसही उत्तम होईल. श्री. माधवराव साताऱ्यास जाणार. एक विचार एकटेच जाणार, एक विचार दादाही बराबरीच जातील. अवघे मुत्सद्दी जातील. श्री. नानासाहेबी राजा करावयाचा नेमिला होता, तो राहिलासा झाला आहे. दादांचे व

गोपिकाबाईचे मतें ताराबाईचे विचारे जो राजा बसावयाचा अगर न बसावयाचा विचार जो करतील त्याप्रमाणे, ताराबाईचे विचारें करावे. त्यास रामराजाच बाहेर काढावा असें असे. श्री. माधवराव उद्यांच्या सोमवारी साताऱ्यास जाणार. सप्तमीस पेशवाईचीं वस्त्रे द्यावयाचा मुहूर्त आहे. त्रिबकराव मामा सातारां आहेत. राजा बाहेर काढावा, कऱ्हाड वाई प्रांत त्याजकडे द्यावा. असेंही करतां न ऐकत, तरी जसा कळेल तसा बंदोबस्त करावा. परंतु आधी वस्त्रे द्यावीं, मग मजकूर जो करणे तो करावा. सांप्रत मुख्यत्वें सखारामपंत व बाबूराव फडणीस दोघे एक विचारें आहेत. दादासाहेबांपाशी पेश रामचंद्र गणेश व कृष्णराव काळे या दोघांची चाल बहुत आहे. आबा पुरंदरे व नाना पुरंदरे हेही आहेत. माधवराव यांनी वस्त्रें घेऊन साताऱ्याचा बंदोबस्त करून पुण्यास यावे, त्यांनी घरी देशी दहा हजार फौजेनिशी असावे, दादांनीं स्वारीस जावें असेही आहे. जागां जागां विचार होतच आहेत. [४·७·१७६१, १·२८९]. 'उभयतां कारभाऱ्यांचे एक चित्त आहे. सखारामपंत करार म्हणतात, दादा 'द्यावे' म्हणतात. 'देणे' अद्यापि बंदच आहे नारोशंकराचा पहिला करार जाला होता. अलीकडे म्हणतात, आम्हांस कर्जवाम फार जालें आहे, सबब रसद मागतात शिद्याची मामलत महादजी शिद्याचे नांवे करावी, त्याची दिवाणगिरी रामचंद्र गणेशास सांगावी. दादांचे, गोपिकाबाईचे व दोघे कारभारी यांचें एकचित्त एकत्र जाले आहे. पुढें कसें चालेल पाहवे [६·७·६१, १·२९२].

यावरून अंतकाळचा हकीकत कळते. मोठ्या लोकांच्या मृत्युप्रसंगीं बंडखोराचे कसे फावते याची कल्पना यावरून होते. पेशव्यांनीं राज्याचा अपहार केला किंवा राज्यकारभार बिघडविला अशी सामान्य भावना असती तर, विरुद्ध पक्षास नवीन घडी बसाविण्यास ही संधि चांगली होती. छत्रपति, ताराबाई किंवा प्रधान सरदारांत तशी ताकद असती तर पेशव्यांस बाजूस सारण्यास कोणी कमी केले नसते. तसा कांहीं बनाव घडला नाही यावरून राज्य करण्याचें पेशव्यांचे सामर्थ्य व हुशारी मराठमंडळास मानवली होती असें म्हणतां येतें. यावरून नानासाहेबासारख्या कर्तृत्ववान पुरुषाचा मृत्यु ही वर्धमान राष्ट्रा-

वरील मोठी आपत्ति होय. ताराबाईही पुढें ता. ९ नोव्हेंबर रोजीं वारली. एकंदरींत हें साल मोठें क्रान्तिकारक समजलें पाहिजे.

पानपतचा संहार व नानासाहेबाचा मृत्यु हीं दोन असामान्य अरिष्टें एकाएकीं राष्ट्रावर कोसळलीं, तत्राप त्यांच्या योगानें मराठमंडळाचा धीर खचला नाहीं. तशा संकटांतही त्यांचा दम कायम होता; आणि पुढील घडी नीट बसाविण्याकडे सर्वांचें चित्त वेधलें होतें. त्रिंबक हरि पटवर्धन पुतण्या गोपाळरावास लिहितो. ' मुख्य यजमान परधामास गेले. भाऊसाहेबही नाहींत. दादासाहेबांनीं फौजेचा गाहा सचंतर करून कोटकिल्ले जागजागां पत्रें पाठवावीं. दक्षिणेस तर्तूद करून फौज पाठवावी. दर वर्षास पहिली इकडून फौज जात होती, तेव्हां लोकांत दबाब होता. ते यंदां फौज राखिली आहे यामुळें काटक शेर होतील. रा. हरिपंत व विसाजीपंत यांस बोलावणें आलें होतें. त्यास आतां अमावास्या जाहलीयावर येतील. सर्वांनीं जे आजवर करामत केली त्याचें नवल नाहीं. आतां मोडली बाजू सांवरली तरच कर्तृत्व सर्वांचें ! रा. बाबूराव आणवावे. गडकिल्ले मजबुदीनें राखावे. सिंहगडची, पुण्याची खबरदारी करावी. आळस न करावा. तुम्हींही सांगावें कळेल तसें, चुकों नये. सर्व मंडळी शहाणे आहेत, तितक्यांनीं लोभ धरूं नये. एक वेळ नाइकीस आव घालावा. राजा नवा करणार तो करावा. तेव्हां एकंदर बहुत विचारें करावें. नाहीं तर नवा राजा झाला म्हणजे त्याभोंवतीं आणखी चवघे मिळून फितवाफांदडा करतील. आपण होऊन कलह केला, ऐसें होईल. त्रिंबकराव व माना पुरंदरे ऐसे सर्वांनीं मिळोन एक चित्त असावें. जशी वर्षास दक्षिणा देतात तशी द्यावी. चहूंकडे चिठ्या पाठवाव्या कीं वर्षाप्रमाणें येणें. ऐसें आहे. त्यांत थोर कर्ते आहेत. आमची बुद्धि काय आहे ? श्रीमंत राघोबा सुज्ञ आहेत. तुम्हीं आपणांस कळेल ते बुद्धीस अंतर न करावें. यांत ईश्वर फुरसत देईल तो आव धरील. कोण बळावल्यानें अपाय आहे, हें दृष्टींत असावें. श्रीमंत फत्तेसिंगबाबाची फौज आहे, हे गाहा करून एक गांठी करावी. दिवाणासही बोलवावें. होळकरास वडीलपणें लेहून त्याचें पत्रीं बहुत समाधान करून भर

भरवावा. दमाजी गायकवाडासही पत्रें पाठव्रावीं, कारकून पाठवावे. तांब्रांची बातमी राखावी' [ऐ. ले. सं. १·३३]. 'श्रीमंत कैलासी जाल्याचें वर्तमान लिहिलें. बरें, ईश्वरसत्तेस उपाय काय! आज प्रसंगी भाऊसाहेब असते तर चिंता नव्हती. आतांही दादास्वामी आहेत, माधवराव कर्ते आहेत. चिंता काय आहे! स्थळांची बंदोबस्ती करावी. जितके माणूस असतील तितक्यांचें समाधान करावें. उतरेस होळकर आदिकरून मातबर सरदार आहेत त्यांचें व जो जो संस्थानिक असेल तितक्यांचें राजकारण, बंदोबस्त राखावा' [सदर, ३४]. सदाशिवरावाचें कर्तृत्व व होळकराचा बेभरंवसा हे वरील प्रकार स्मरणीय आहेत. मराठ्यांच्या शत्रूंनीं उवल खाल्ल्याचेही उल्लेख आहेत [सदर, ३२, ३३, ३६, ३८].

२. **कर्तबगारीचा अंदाज.**–यासंबंधानें पूर्वी ठिकठिकाणीं विवेचन केलेलें असल्यामुळें, त्या वेळचेच अभिप्राय दाखल केले म्हणजे पुरे आहेत. बखरकार म्हणतो. 'बाळाजीपंतनानांनीं साहसकर्म करून महाराजांची कृपा संपादिली, त्याजवर रावसाहेब व आपासाहेब यांहीं सरदार व मुत्सद्दी वगैरे लहान मोठे यांजवर ममता वाढवून ज्याची जशी योग्यता पाहून ज्याचें स्वरूप वाढवून, बहुमान करून, परम सदयत्वें कृपा दर्शावित होते. त्यांचे मागें नानासाहेबही पूर्वान्वय दृढोत्तर चित्तांत धरून सर्वांचें मनोधारण करून, गांव मोकासे व हत्ती घोडे, पालख्या, अब्दागिरें, इनाम, बक्षिसें व अलंकार देऊन मनुष्य पाहून उमेदवार केलें, व सेवक लोकांनीं धन्याची कृपा निःसीम सर्वांनीं पाहून कायावाचामनेंकरून एकनिष्ठ सेवा करून महत्पदास योग्य होऊन स्वामिसेवा केली. सरदार व लोक साहसकर्ते, मर्द. आणि नानासाहेब अजातशत्रु, तेणेंकरून शत्रू पराभवातें पाववून महाराजांच्या राज्याची वृद्धि करून कीर्ति भूमंडळीं मेळविली. नानासाहेब अतिपुण्यवान, त्यांच्या तपोबलें करून शत्रु विनयभावें शरणागत होऊन, करभार देऊन, हात जोडून चाकरीस तत्पर राहिले. रामेश्वरापासून इंद्रप्रस्थापावेतों शत्रू पादाक्रान्त करून देवब्राह्मण, प्रजापालन व दानधर्माची कीर्ति कलियुगीं विख्यात केली [पे. ब. खं. ४]. हा अभिप्राय मार्मिक आहे.

'नानासाहेब व भाऊसाहेब अवतारी पुरुष उभयतांप्रमाणें मनुष्य लोकीं या मागें कोठेही जाले नाहींत व पुढेंही होणें कठीण. उभयतांचा ऋणानुबंध की एक मरतांच एकानें मरावें ! पूर्वी बाजीराव साहेब मुक्त जाहलियावर सहा महिन्यांनी चिमाजी आपा गेले. तैसेच भाऊसाहेब गैब झाल्यावर वर्तमान नानासाहेब यांणी ऐकतांच सहा महिन्यांतच मृत्यु पावले. भाऊसाहेब मृत्यु पावले म्हणून कोणी ऐकिले नाही, व पाहिले नाही. भगवंत इच्छेंकरून त्या कहरांतून पार पडून वांचून हरएक कोठे असले तरी निर्माण होतील. बहुत भाऊ आहेत, परंतु श्रीमंत लोकांत यांजप्रमाणे भाऊपणा कोठें नाही. राम भरताची साम्यता' [भा. व पृ. १३५]. रा. नातू म्हणतात. 'पेशव्यांमध्यें नानासाहेबासारखा मुत्सद्दी, कार्यकर्ता पेशवाच झाला नाही. त्याला पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्यापासून त्याचेवर गृहकलहादि मोठमोठीं लचांडें आली, परंतु तीं सर्व निभावून त्यानें जसा प्रसंग येईल तसा उपाय करून, मराठी राज्याचा व विशेषतः पेशव्यांचा अंमल सर्व हिंदुस्थानांत स्थापन केला. हिंदुपद पातशाहीची मराठ्यांस जी इच्छा होती तिची सत्यता होण्याचा समय जवळ आला होता. परंतु पानिपतची लढाई होण्याचे पूर्वी त्याच्या सरदारांनीं ज्या कित्येक मोहिमा व मुलुखगिऱ्या केल्या, त्यांत त्याच्या मसलतीविरुद्ध कामें झाली, व पेशव्यावर कर्जाचा मोठा बोजा बसला. हिंदुस्थानचें राज्य मिळवून त्याचें रक्षण करणें त्या काळी फार कठीण होते. त्यासाठी लाखो फौज पदरी बाळगावी लागे. तिच्या खर्चासाठी, शिंदे, होळकर, बुंदेले वगैरे सरदारांनीं करारप्रमाणें पेशव्याकडे ज्या रकमा पाठवावयाच्या त्या न पाठविल्यामुळें, राज्यकारभार चालविणे पेशव्यास व भाऊंस फार कठिण जाऊं लागले. नानासाहेबानें आपल्या कारकीर्दीत गुजराथ, माळवा वगैरे प्रांतांत मराठ्यांचा कायम अंमल बसविला. त्याने तुळाजी आंगऱ्यासारखे चांचे लोकांची बंडाई मोडली व त्याचे मनांतून इंग्रजांचे मदतीने पोर्तुगीझ लोकांसही हिंदुस्थानांतून घालविण्याचा विचार होता. पेशव्यानें जी म्हैसुराकडे स्वारी केली, त्या वेळीं बेदनूरचा किल्ला जर ताब्यांत येता तर यापुढें मराठ्यांच्या राज्यास नवीन होणारा शत्रु हैदर मुळींच पुढें

आला नसता. परंतु पानिपतच्या घोर प्रसंगामुळें हे सर्व बेत जागच्या जागीं राहिले [म. शिं. च. पृ. ४२].

मनुष्यस्वभावाची पारख करून त्यास आपल्या कबजांत आणण्यांत नानासा० विशेष कुशल होता. स्वभावानें आंतल्या गांठीचा असून, स्वतःचा अंत लागूं न देतां, दुसऱ्याचे इंगित काढून घेऊन आपला शह कायम ठेवणें, अडचणीच्या प्रसंगांतून कांही तरी युक्ति काढून निभावून जाणे, प्रसंगीं पड खाऊन आपला हेतु सिद्धीस नेण्याची संधि उत्पन्न करणें, भिन्न प्रकृतींच्या व्यक्तीस नाना उपायांनी नरम करणें, अशा प्रकारची अष्टपैलू वागणूक नानासाहेबाची होती. हिंमत, साहस, जरब इत्यादि बाबतींत सदाशिवराव वरचढ होता, परंतु तापट व हट्टी स्वभावामुळे त्याचीं कित्येक कामें बिघडत, तसा प्रकार नानासा० चा होत नसे. यमाजी शिवदेव, श्रीनिवासराव प्रतिनिधि, ताराबाई, जिजाबाई, बाबूजी नाईक, रघूजी भोसले, दमाजी गायकवाड, गोविंदराव चिटणीस, मानाजी आंगरे, अशा भिन्न व प्रखर व्यक्तींस कोणत्या ना कोणत्या मार्गाने ताळ्यावर आणून, त्याने आपलें काम पुढे चालविले. राज्यचालकाचें मुख्य कसब यांतच आहे. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव ओळखून त्याजकडून आपलें काम करून घेणे हेंच मोठें कसब आहे: आणि याच कारणामुळें नानासाहेबाच्या हातून राज्याचा एवढा उत्कर्ष झाला. केव्हां झगडून तर केव्हां हार खाऊन, केव्हां गोड बोलून तर केव्हां रागावून, केव्हां बक्षिस देऊन तर केव्हां शिक्षा करून, राज्यचालकास आपला शह ठेवावा लागतो. असें वर्तन ठेवण्यास दूर विचार व शांत वृत्ति हे गुण अवश्य पाहिजेत. म्हणूनच नानासाहेबानें शाहूची मर्जी पूर्णपणें संपादन केली, ताराबाईस निर्माल्यवत् केले, शिंदेहोळकरांकडून दिल्ली अटकेपर्यंत राज्याची कामे घेतली: निजामाचा नकशा मोडिला, आणि थेट कर्नाटकापर्यंत अंमल बसविला. शाहूच्या मृत्युसमयीं राज्यावर मोठेच गंडांतर आले होते, ते त्याने म्हणूनच निभावले. पानपत प्रसंगीं नुसता हात पाय गाळून स्वस्थ न बसतां, हिंमतीने पुढें जाऊन तो दोन महिने ठासून बसला, म्हणूनच नर्मदेपलीकडे मराठ्यांचा अंमल कायम राहिला. प्रकृति ढांसळला

नसती तर अटके पावेतोंचा सर्व बंदोबस्त त्यानें तेव्हांच केला असता. तुळाजी आंगऱ्याची व नानासा०ची प्रत्यक्ष भेट झाली नाहीं हें दुर्भाग्य समजले पाहिजे. भेट झाली असती तर आंगऱ्याचा कलह विकोपास गेला नसता. नीतिदृष्ट्या पेशवा माधवराव कदाचित् वरचढ दिसेल, परंतु राज्याचे दृष्टीनें सर्व पेशव्यांत एकंदर गुणांनी नानासाहेबच ज्यास्त म्हणतां येईल. माधवरावास व सदाशिवरावास हाताखालचे लोक कांपत, नानासाहेबाला ते भजत. माधवरावाने भर दरबारांत गंगाधर यशवंताच्या तोंडांत मारिली, तसा प्रकार नानासाहेबाचे हातून घडला नसता. त्याचे आत्मसंयमन जबरदस्त होते. 'कै. नानासाहेबांनी लोभ केला, त्याप्रमाणें आपणही अकृत्रिमपणे लोभ करून चालवावे,' असे अनेक सरदारांचे उद्गार पुढें कैक वर्षे निघालेले वाचण्यास सांपडतात.

नानासा० व गोपिकाबाई सारखीच सुंदर, सशक्त, तेजस्वी, शहाणी व भाग्यशाली होती. नानासाहेब कोणत्याही प्रकारच्या जुलमाचा कट्टा शत्रु असून त्याच्या वेळीं मराठी राज्यांत सर्वत्र सुख नांदत असून, प्रजा त्यास अद्यापि धन्यवाद व आशीर्वाद देतात असें डफ म्हणतो. भाऊसाहेबानें नाक कान कापण्याकरितां कैदी त्याजपुढें आणिले असतां, नानासा० म्हणाला, 'अरे भाऊ, आपण कृष्णंभटाच्या घरीं मेजवानीस आलो आहो, लोकांचे नाक कान कापण्यास आलों नाहीं' (ह. ब.). तत्कालीन प्रघातास अनुसरून इतरांप्रमाणें त्याच्या रक्षा होत्या, एवढ्यावरून त्यास अनीतिमान म्हणतां येत नाहीं.

नानासाहेबाच्या कारकिर्दीत हिशेबाची व महसुलाची व्यवस्था सुधारली. पोलिसचा बंदोबस्त बरा होऊं लागला. बाळशास्त्री गाडगीळ त्यास मुख्य न्यायाधिशी मिळून त्याने न्यायाचें काम चोख केले; आणि राज्यकारभारांत नानाप्रकारच्या सुधारणा होऊन रयतेची भरभराट झाली, असें स्वतः डफनें सर्व तपासाअंतीं नमूद करून ठेविलें आहे, तें नुसत्या कल्पनेनें लिहिलेलें नव्हे. ह्या सर्व गोष्टी करण्यांत नानासाहेबास मुख्य साह्य सदाशिवरावाचें असून, तो हुशार व दक्ष कारभारी प्रथम रामचंद्रबाबाजवळ हीं कामें शिकला. वास्तविक नानासाहेबाच्या यशस्वी कारभाराचें मुख्य श्रेय सदाशिरावास आहे.

अनेक संकटें, मोहिमा, लढाया व विवंचना चालू असतांही पेशवा व त्याचे हस्तक यांनीं हें कारभाराचें काम निर्वेध व अखंड चालू ठेविलें. फिरतीवर व स्वारींत असतांना सुद्धा हें काम बंद पडत नसे. यशस्वी कारभारभाराचे बीज आयव्ययावर योग्य दाब हें होय, आणि या दाबास मुख्य आधार हिशेब. पेशव्यांच्या राज्यकारभारांत हिशेबाची पद्धत फार नांवाजलेली असून, अनेक विद्वानांनीं या पद्धतीची तपासणी करून प्रशंसा केली आहे. ही पद्धत पुढें नानाफडणिसाचे वेळेस पूर्णत्वास आली. पण तिचा उगम पुण्यास स. १७५० पासून झाला. या पद्धतीचा मूळ उत्पादक रामचंद्रबाबा हा असून त्याचेच जवळ सदाशिवराव, महादोबा, व नाना पुरंदरे वगैरे अनेक इसम ह्या पद्धतींत निष्णात झाले. सखाराम बापू, रामाजी अनंत, गंगाधर यशवंत इत्यादिकांनीं याच पद्धतीचा पुढे परिपोष करून ठिकठिकाणीं फैलाव केला. फड म्हणजेच हिशेबी कचेरी. ही कचेरी पुण्यास असून तिचा मुख्य चालक तो फडनीस. नाना फडणिसास बापाचा दरख्त २९ ११·१७५६ रोजी मिळाला, आणि सदाशिवरावाबरोबर राहून तो हिशेबांत निष्णात झाला. हिंदुस्थानच्या सर्व ठिकाणांहून आलेल्या हिशेबांचे एकीकरण पुण्यास या मुख्य कचेरींत होत असे. स. १७५० पासून नानाफडणिसाच्या मृत्यूपर्यंत देशांत निरनिराळ्या ठिकाणीं कारभार करणारे इसम मूळ पुण्यास या फडांत शिक्षण घेऊन तयार झाले. सरदार, सेनानायक वगैरे बाहेर मोहिमांवर जाऊन तयार होत, परंतु फडणीस, चिटणीस, सबनीस, कारखाननीस इत्यादि शेकडो कामे करणारे कारकुनी पेशाचे इसम प्रथम या फडांतून बाहेर पडत, आणि केव्हां केव्हां ते पुढें सरदारीही करूं लागत. सदाशिवराव, विश्वासराव, माधवराव वगैरे पुरुष याच पद्धतीनें तयार झाले.

नानासाहेबाचा उद्योग जबरदस्त होता. त्याची हजार पांचशें पत्रे तरी उपलब्ध आहेत, त्यांवरून नुसत्या पत्रांसच किती श्रम पडले असतील याची कल्पना होते. शेंकडो पत्रें आज मिळत नाहीत. उदगीर व सिंदखेड या दोन मोहिमांतील पत्रांवरून सर्व गोष्टींचा व्यवधाने ठेवून जबाबांनीं तजविजी

लावणें व सर्वांस खुलासे देणे हें काम कांही लहान नव्हतें. बारीक तपशिलाकडे त्याचें किती लक्ष होतें हेंही त्या पत्रांत उघड होतें. पुण्याहून साताऱ्यास घोडा पाठवितांना मोतद्दारास चार रुपये खर्चास दिले, त्याचा हिशेब त्यानें मागितला आहे [ना. रो. ११४२]. बरसातीचे दोन तीन महिने खेरीज करून इतर वेळीं तो सदैव फिरतीवर असे, पण फिरतांना सुद्धां सर्व व्यवहार घरच्या सारखे सुरळीत चालत. हिंदुस्थानभर संचार करणाऱ्या लहान मोठ्या सरदारांस व त्यांच्या कारभाऱ्यांस दररोज किती पत्रे त्यास लिहावी लागली असतील याची खरोखर कल्पनाच केली पाहिजे. उपलब्ध असलेल्या थोड्या बहुत कागदांवरूनच जर कल्पना केली, तर सामान्यतः वीस वर्षांच्या त्याच्या कारभारांत दररोज सरासरीनें पांच तरी पत्रे त्याने लिहिली असली पाहिजेत. यावरून एकंदर मराठी राज्यांत जबरदस्त लेखक असे दोन पुरुष दिसतात, एक हा नानासाहेब व दुसरा त्याचे खालोखाल नाना फडणीस. शिवाय नानासाहेबाचीं पत्रे उगाच कांही तरी कारकुनांनां लिहून आणलेली नीरस नसत, स्वतःच्या हातचा किंवा कल्पनेचा पत्रांत ठसा उमटला नाही, असें बहुधा एकही पत्र नाही. त्याची भाषा गोड व मोहक असून अक्षरही जलद, सुवाच्य व मनांत भरणारें होतें.

एकाच जातींचे लोक कारभारांत भरले, सर्व जातीस सारखा फायदा मिळाला नाहीं, असा पेशव्यांवर आक्षेप आहे. जातिभेदानुसार कामें वांटलेली होती, त्याप्रमाणें हिशेबाच्या व लेखनाच्या कामांत ब्राह्मण, सारस्वत व प्रभु सर्व बरोबरीने कामें करीत. रामचंद्रबाबा, महिपतराव चिटणीस वगैरे जोवें पाहिलीं तर ते या कामांत ब्राह्मणांचे गुरूच होते. ' महिपतरावांनीं चिरंजीवांचे साहित्य उत्तम प्रकारें केले ' (ऐ. ले. सं. १ पृ. २१). मराठे मंडळीचे लक्ष लिहिण्यावे कामापेक्षां सरदारीचे कामांत ज्यास्त होते; आणि एकही ब्राह्मण सरदार मुलूखगिरीत पहिल्या प्रतीचा झाला नाहीं. मनुष्यस्वभावास अनुसरून भरंवशाच्या कित्येक कामांत पेशव्यांनां आपल्या माहितीचे ब्राह्मण लोक पुढें आणिले याबद्दल वाद असण्याचें कारण नाहीं. परंतु मुद्दाम

होऊन मराठ्यांस किंवा इतर जातीस त्यांनीं मागें टाकिलें, असेंही नाहीं. मराठे मंडळी सरदारींत भूषण मानीत तितकें लेखणींत मानीत नसत. बाकी बहुधा सर्व मराठे व त्यांच्या स्त्रिया अगदी निरक्षर नसत; जरुरी पुरतें लिहिणें वाचणें जाणत. पेशव्यांच्या कारभारांत पुष्कळ माणसें उद्योगानें व अनुभवाने पुढें आली. लायकी अंगांत असणारांस कार्यक्षेत्र भरपूर मिळालें. हरिवंशाच्या बखरीवरून पेशव्यांच्या या उत्तेजनाची कल्पना होते. सर्व जातीच्या संगोपनाची भावना पेशव्यांस किती वाटत होती हे खालील उल्लेखावरून व्यक्त होतें. भास्करराव दादाजीने लिहिलेल्या पत्रावर खालील मजकूर आहे. 'खावंदाचे घरी सर्व लहान मोठे आहेत, बरे वाईट आहेत, परंतु आपपरंत्वे जातीचा अभिमान हा प्रकार कांहीं एक नसावा. सर्वही खावंदाची लेकरे; व सेवक जो दौलतीचा खैरखवाई तो आपला उपयोगी, ऐसें ध्यानांत आणून सर्वांवर कृपा योग्यायोग्य असावी. अशी रीतीस जो आणीक तरेनें वर्तेल व दाखवील त्याचें पारिपत्यच असावें. तरीच बखेडेबंड मिटतील. आम्ही सेवक हें जाणतों कीं देशस्त, कोंकणस्त, कराडे, परभु, सेणवी, मराठे हे सर्व स्वामींचे, स्वामी इतक्यांचे मायबाप, चाकरी मात्र सर्वांनीं दौलतेची करावी, हे जातिभेद अभिमान नसावे.' ही सूचना छत्रपतींस केलेली दिसते. [भा. इ. सं. मं. अप्रकाशित दप्तर].

नानासाहेबाचीं जीं पत्रें मागें दिलीं आहेत त्यांवरून राज्याची कामगिरी करणारांची बूज पेशवा किती दक्षतेनें करी तें दिसून येतें. हत्ती घोडे, पालख्या, जवाहीर, इनामें इत्यादि देऊन लोकांचा गौरव केल्याचे उल्लेख भरपूर आहेत. पानपतावर पडलेल्या इसमांचे कुटुंबांचा परामर्ष पेशव्यांनी फार दक्षतेनें घेतला (इ. सं. ऐ. टि. ३·३२). नानासाहेबाचा स्वभाव शांत, विचारी व दयाळु होता. त्यामुळें लोक त्याजवर प्रेम ठेवीत. [illegible] शिक्षा तो सहसा करीत नसे. राजकीय कैद्यांसही तो सन्मानानें वागवी. तुळाजी आंग्र्याची व्यवस्था चांगली ठेवण्यासंबंधानें त्याचे हुकूम होते.

आंग्र्याचा पाडाव करून राज्याची समुद्रसेवा पेशव्यानें दुर्बल केली, हा

त्याच्या कारभारावर मुख्य दोष आहे. त्यानें शाहूच्या निधनानंतर उत्तरेंत एकदांही प्रयाण केलें नाहीं, त्यामुळें पानपतचा प्रसंग अंगावर आला. फौजेंत बायकामुलें नेण्याचा प्रघात बहुतेक त्यानेच घातला, हे मोठेंच दोषस्थान समजलें पाहिजे. या दोषांचे विचार त्या त्या प्रकरणीं केले आहेत. बाजीरावाप्रमाणें नाना सा० कर्जबाजारी नव्हता. पानपतचे वगैरे सर्व खर्च भागवून, मरणसमयी त्यास पांच पंनास लाखांहून ज्यास्त कर्ज नव्हतें. तथापि सुरळीत कारभाराचे व धनोत्पादनाचे व्यापार वगैरे जे मुख्य मार्ग त्यांजकडे पेशव्याचे लक्ष यत्किंचित् होते असें दिसत नाहीं. व्यापार व लष्कर यांच्या हालचाली निर्वेध राहण्यास सर्व राज्यात मोठमोठ्या ठिकाणांस जोडणारे पक्के रस्ते कायमचे बांधावे लागतात. असे रस्ते पेशव्यांच्या राज्यांत बिलकूल नव्हते. अकबराने सुद्धां असे रस्ते बांधले, पण पेशव्यांस त्यांची जरूर वाटली नाहीं, हें त्यांच्या कारभाराचें एक मोठें व्यंग नेहमीच मानलें जाईल. धर्माच्या दृष्टीनें मंदिरें तलाव वगैरे बांधले जात. परंतु लोकांच्या सोयीच्या दृष्टीनें रस्ते, तलाव किंवा सार्वजनिक इमारती बांधण्याकरितां पेशव्यांच्या राज्यांत स्वतंत्र खात्याची योजना नव्हती, एवढेंच नव्हे, तर आजूबाजूच्या शत्रुमित्रांच्या हालचाली व व्यवसाय समजून घेऊन, त्यांपासून आपली सुधारणा करण्याचे प्रयत्न नानासाहेबानें केले नाहीत. मुंबईस इंग्रजांचे काय उद्योग चालत होते, याची त्यास दाद नव्हती. पुण्याचे व्यापारी मुंबईस राहून धनसंपन्न कां होत, याचें बीज नानासाहेबानें समजून घेतलें नाहीं. या गोष्टींकडे लक्ष देण्यास त्यास अवकाश मिळाला नाही ही सबबही बऱ्याच अंशीं लंगडी आहे. वेळ आपण होऊन चालून येत नाही, ती मुद्दाम उत्पन्न करावी लागते. सारांश, व्यापार व आरमार यांजकडे दुर्लक्ष्य केलें, व धनोत्पादनाचे खरे मार्ग त्यास कळले नाहीत हा दोष पेशव्यावर नेहेमींच येणारा आहे. तथापि राज्यकारभारांत पेशव्यांनी केवळ स्वार्थाची दृष्टि ठेविली होती, असेंही म्हणतां येत नाही. स्वार्थाकडे पाहण्याचा मराठे सरदारांचा स्वभावदोषच आहे, आणि निरनिराळे सरदार जिकडे गेले, तिकडेच आपली

व्यवस्था स्वतंत्र करूं लागले हा प्रकार पाहिला, म्हणजे पेशव्यांनीं या बाबतींत पुष्कळसें आत्मसंयमनच केलें असें म्हणावें लागेल. एकंदरींत पेशव्यांच्या चार पिढ्या पराक्रमी निघाल्या, आणि त्यांनीं राष्ट्रसेवेंत आपलीं आयुष्यें वेचून मराठशाहीचा इतिहास पुष्कळसा नवीन बनवून तो चिरस्थायी केला, याजबद्दल सर्व राष्ट्रास नेहमीच अभिमान वाटेल. त्यांतल्या त्यांत नानासाहेब व सदाशिवराव यांनी अश्रांत श्रम करून, हिंदुपदपातशाहीची शिवाजी महाराजांची कल्पना पूर्णावस्थेस आणिली हें ध्यानांत ठविले पाहिजे. 'नानासाहेब यशस्वी, धारतील तें सिद्धीस नेतील,' असे विश्वासाचे, धन्यतेचे व गौरवाचे उद्‌गार तत्कालीन लेखांत आढळतात.

निरनिराळ्या राष्ट्रपुरुषांची योग्यता ठरविण्याची इतिहासकारांची एक विशिष्ट पद्धत आहे. कित्येक पराक्रमी व्यक्ती आपणास पाहिजे तशी परिस्थिति उत्पन्न करून आपल्या राष्ट्राचा भाग्योदय करतात. उलट पक्षी कित्येक व्यक्तींना परिस्थितिच गडप करून टाकते, आणि कित्येकांच्या अंगीं या दोहींचें थोडथोडें मिश्रण असतें. शिवाजीसारखे कित्येक पुरुष पहिल्या कोटीतले होत. छत्रपति शाहू परिस्थितीच्या वर डोकें काढूं शकला नाहीं. परंतु नानासाहेबाला जरी परिस्थिति सर्वस्वी झुगारून देऊन शिवाजीप्रमाणें अनुकूल काल उत्पन्न करितां आला नाहीं, तरी असलेल्या परिस्थितीतच शक्य तितका राष्ट्रोद्धार त्यानें केला, असें निःसंशय म्हणतां येते. पाश्चात्य इतिहासाच्या अवलोकनानें या मुद्याचे ज्यास्त विवेचन वाचकांस करतां येईल. 'राजा कालस्य कारणं' या न्यायानें प्रत्येक राष्ट्रपुरुषाच्या हाती आपल्या लोकांस वळण लावण्याचें सामर्थ्य थोडें बहुत असतेंच. शिवाजीच्या अनुकरणानें जशी कांहीं विशिष्ट मंडळी राष्ट्रांत पुढें आली, तशीच पेशव्यांच्या अनुकरणानेंही राष्ट्रोद्धार करणाऱ्या असंख्य व्यक्ती पुढे आल्या, आणि या पहिल्या तीन पेशव्यांच्या वेळेस जी पद्धति व जी माणसें निर्माण झाली, त्यांच्या योगानें मराठ्यांचें राज्य पुढे शें पन्नास वर्षें चालून हिंदुस्तानच्या इतिहासांत त्यांचें नांव कायम झालें. 'जनार्दन बल्लाळ व बाबूराव फडणीस, कृष्णराव पारसनीस, अन्याबा मुजुमदार,

महिपतरावें चिटणीस, कोन्हेर त्रिंबक एकबोटे यांस पालखीचीं वस्त्रें व नेमणुका एकाच दिवशी स. १७५४ त मिळाल्या' [पु. रो.], यावरून लोकांस प्रोत्साहन कसे मिळे त्याची कल्पना होते.

नानाप्रकारच्या उद्योगांत अनेक लहान मोठीं कुटुंबें व माणसें या नानासाहेबाच्या वेळेस किती व कशी भराभर पुढे आलीं; आणि राष्ट्रीय उद्योगाच्या हजारो व्यवसायांत लोकांची हांव व त्यांच्या उमेदी कशा झपाट्यानें वृद्धिंगत होत गेल्या, हें त्या वेळच्या कागद पत्रांत वाचून मोठें आश्चर्य वाटतें. स्वराज्याचा मुख्य उपयोग तो हाच आहे. मोहिमेच्या, यात्रेच्या, व्यापाराच्या वगैरे निमित्ताने लाखों लोकांचा संचार हिंदुस्तानच्या एका टोकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सारखा पन्नास पाऊणशे वर्षे होत राहिला, त्यामुळें ठिकठिकाणचे रीतरिवाज, कलाकौशल्य, आहारविहार, देवधेव वगैरे बाबतीत महाराष्ट्राचें जीवन पुष्कळ विस्तार पावलें. उत्तर हिंदुस्तानांतील नकशाच्या व कलाकौशल्याच्या चिजा महाराष्ट्रांत आल्या. आहारविहार व्यवसाय वगैरे बाबतीत सुद्धां नवीन प्रचार उद्भवले, आणि महाराष्ट्रांतील गरीब राहणी बदलून जाऊन सुखोपभोग व ऐषआराम वृद्धि पावले. उत्कृष्ट घोडे, उत्कृष्ट शस्त्रास्त्रें, नाना प्रकारच्या पोथ्यापुस्तकें व ग्रंथ, नाटकशाळा, वगैरे महाराष्ट्रांत आणण्याबद्दल त्या वेळच्या पत्रांतून भरपूर उल्लेख आहेत. [ना. सा. रो. पृ. १·१४६–१४८]. ओळखी व उद्योग वाढत गेले, तशा जरुरी व आकांक्षाही वाढल्या. एकाचे दुसऱ्याकडे वशिले सुरू झाले. देवस्थाने इनामे, दानधर्म वगैरे संपादण्यासाठी लोकांची धडपड सुरू झाली. याचें प्रतिबिंब त्या वेळच्या कागदांत उमटलेले दिसते. एकाच्या अनुषंगाने दुसरा उद्योग, व एका कुटुंबाच्या अनुषंगाने दुसरे कुटुंब, अशा रीतीनें राष्ट्राचा खटाटोप वृद्धि पावला. काम पडले म्हणजे माणसे कशी तयार होतात, याची उदाहरणें पदोपदी मिळतात. नारायण दीक्षित कायगांवकर मूळचा साधुवृत्तीचा गृहस्थ होता, त्यानें काशींत प्रतिमहाराष्ट्र उत्पन्न केलें. त्याच्या मुलांनीं व नातवांनीं मूळचा साधुवृत्तीचा पेशा कायम ठेवून, त्यांत सावकारीची व राज्यकारस्थानाची भर घातली. ही दीक्षित मंडळी म्हणजे उत्तरेंतील

एक महाराष्ट्रीय शक्ति होती. त्यांच्या कृपेची व आशीर्वादाची लालसा महाराष्ट्रीय लोक तर ठेवीतच, परंतु अनेक मुसलमान सरदार व प्रत्यक्ष बादशहासुद्धां ती लालसा धारण करीत. [का. सं. प. या. ३७]. दीक्षितांचा व्यापार व देवघेव सर्व देशभर चालू असून त्यांची किफायतही मोठी होती. बादशहाच्या दरबारांत सुद्धां त्यांचा मान मोठा होता. बाळकृष्ण दीक्षित दिल्लीस गेला तेव्हां त्यास बादशहानें 'आदरपूर्वक सन्मानाने शहरांत आणिलें. भेटीचे दिवशी खुद्द बादशहा दरवाजापर्यंत सामोरे येऊन हात धरून नेऊन बसाविलें. फार सत्कार ठेवून बोलले कीं राजा शाहूचे जे गुरू व ज्या थोरले दीक्षित महाराजांचा पूर्ण आशीर्वाद औरंगजेब बादशहावर जाला, त्यांच्या आशीर्वादानें या बादशाहीची दिवसेदिवस ऊर्जित दशा आहे. आपले वडील पैगंबराप्रमाणें होऊन गेले. आपली तींच योग्यता आहे. तेव्हां आपण येथे येऊन दर्शन दिल्यामुळें आम्ही आज कृतार्थ झालो. वगैरे भक्तिपूर्वक भाषणें करून थोरले नारायण दीक्षितमहाराजांच्याप्रमाणें सन्मान ठेविला. नंतर पंधरा हजारांचा गांव, जहागिरीचे फर्मान व पोषाख, पालखी, मोरचेल, चवरी, जवाहीर, वगैरे खिलत दिली, आणि लिहिले, दीक्षितांस जहागीरचा काय, त्यांचे पुण्य बलवत्तर, त्यांजवर ईश्वराची कृपा, व आपण त्यांचे शिष्य. तेव्हां त्यांस काय कमी आहे ? परंतु रियासतीचे कल्याण व आम्ही कृतार्थ व्हावें या करितां ही यत्किंचित् सेवा केली, याप्रमाणे पत्र आले. दीक्षित लवकर काशीस जातील. शरीरें क्षेम आहेत.' हे पत्र पेशव्यानें वासुदेव दीक्षितास लिहिलेलें आहे, [सन १७५४, खंड ११·८९].

सर्व देशांत प्रमुख ठिकाणीं पेशव्यांचे हस्तक, आप्त, गुरु इत्यादि अनेक मंडळी असून त्यांजकडून अनेक प्रकारची कच्ची बातमी त्यांस मिळत असे. बगाजी यादव पुत्रदुःखामुळें यागी जाले आहेत, तरी हरप्रकारे समाधान करून ते तेथें येत ते गोष्ट करावी. त्यांस पत्र पाठविलें त्याचे उत्तर आले नाहीं, असें पेशवा २४·९·१७५७ रोजीं दीक्षितास लिहितो. 'येथें कालगतीनें दुःशकुनादिक एक दोन जहालीं. पुढें ईश्वर इच्छा प्रमाण. श्रीकृपेनें सर्व विघ्नें परिहार होतील' [३·४९७, ५४०].

पेशव्यांची वंशावली,—मध्यविभाग १ पृ. २० वरून पुढें,—स. १७२०-१७६१.

आधार, तीन शकावल्या, पे. वं. खं. ४, का. सं. प. यां. ४९२ व ४९६.

१. बाळाजी विश्वनाथ=राधाबाई.

२. विसाजी ऊ० बाजीराव ल.काशीबाई. ३. भिऊबाई. ४. अंताजी ऊ० चिमाजी आपा. ५. अनूबाई. रखमाबाई. | अन्नपूर्णा.

६. बाळजी ऊ० नानासाहेब. ७. रामचंद्र. ८. रघुनाथ. ९. जनार्दन. १०. सदाशिवराव. ११. बयाबाई ओंकार. गोपिकाबाई | जानकी व आनंदी. सगुणा. उमाबा. | पार्वती.

१२. विश्वास. १३. माधव. १४. यशवंत. १५. मुलगा. १६. नारायण. २ मुलगे. २ मुलगे.

वंशावळींतील व्यक्तींचा विशिष्ट तपशील अंकानुक्रमें:—

१ मृ. २·४·१७२०. राधाबाई अंताजी मल्हार बर्वे डुबेरकराची कन्या. तिचा मृ. १९·४·१७५३. बाळाजीची बहीण बहिरवभट मेहेंदळे यास दिलेली, तिचा नातू बळवंतराव मेहेंदळे.

२ मृ. २८·४·१७४०. काशीबाई—चासकर महादाजी कृष्ण जोशी यांची कन्या, मृ. २७·११·१७५८. काशीबाईची यात्रा रामेश्वरची मे १७४२, काशीची, जानेवारी—मे १७४६, बंधु कृष्णराव चासकराचा मृ. १·४·१७५४. बाजीरावाची रक्षा मस्तानी, सती गेली. मुलगा समशेर बहादर ज. १७३४, लग्न १८·१०·१७५३; मृ. पानपतावर; नातू कृष्णसिंग ऊ० अलीबहादर, बांद्याचे नबाब.

३ भिऊबाई, लग्न आबाजी नाईक जोशी बारामतीकर. मूल झालें नाहीं. मृ. ७-६-१७४७.

४ मृ. ३१-१०-१७४० क्षयाने, पहिली स्त्री रखमाबाई, त्रिंबकराव पेठ्याची बहीण, मुलगा स० रा०; रखमाबाई मृ० ३१-८-१७३०. दुसरी बायको अन्नपूर्णा सती, मुलगी १ लहान बयाबाई.

५ अनूबाई, लग्न व्यंकटराव घोरपडे–मुले दोन, वडील वेणूताई त्रिंबकराव पेठ्याची बायको, धाकटा नारायणराव. अनूबाई मृ. ३०-१२-१७८३.

६ नानासा० ज. ८-१२-१७२१, मुंज, ११ १-१७२८, ल. १ गोपिकाबाई रास्ते ११-१-१७३०, गर्भाधान जानेवारी १७४०, अपत्ये ५ मुलगे, मुलगी नाही. गोपिकाबाई मृ. ३-८-१७८८ नासिक पंचवटी येथें. दुसरें लग्न २ राधाबाई वाखरे, २७-१२-१७६० व तिचा मृ. १९-११-१७७०. एक लेकवळा हैबतसिंगदादा नांवाचा होता, [म. द. रु. २ पृ. ९७].

७ रामचंद्रबाजी–स. १७२३–१७३३.

८ रघुनाथबाजी–१८-८-१७३४–११-१२-१७८३: मुंज ४-२-१७४०; ल. जानकीबाई गोपाळभट बर्वे २५-२-१७४२, इचा मृ. २२-८-१७५५, प्रसूतीनंतर–मुलगा झालेला लवकरच वारला. दुसरे ल. आनंदीबाई ओक १७-१२-१७५५, इचा मृत्यु १२-३-१७९४, पहिला मुलगा भास्करराव ज. १८-३-१७६२.

९ जनार्दनबाजी–१०-७-१७३५–२१-९-१७४९, मुंज २६-३-१७४०, स्त्री सगुणाबाई रामाजी अनंत भिडे याची कन्या, ल. २०-४-१७४४, इची काशीयात्रा १७५७, मृ. १३-११-१७८३.

१० सदाशिव चिमणाजी ५-७-१७३०–१४-१-१७६१, मुंज ११-२-१७३६; लग्न उमाबाई ७-२-१७४०, पहिला मुलगा कृष्णराव ज. २४-११-१७४६, बारसें ३०-६-१७४७ जगला नाहीं; दुसरा मुलगा ३०-७-१७४८ अल्पवयी. उमाबाईचा मृ. २२-३-१७५०; दुसरें लग्न पार्वतीबाई कोल्हटकर २६-४-१७५०,–इला दोन मुलगे झालेले लहानपणींच वारले. सदाशिव-

पेठेची वसाहत १७५८; मुज्फरखानाकडून खुनाचा प्रयत्न २८·१०·१७५९. पार्वतीबाईचा मृत्यु १६·८·१७८३, नंतर उभय नवराबायकोचें और्ध्वदेहिक एकदम झाले. महादजी शिंद्याचें सांत्वनपत्र इ. सं. ऐ. टि. ३·३७.

११ बयाबाई ओंकार लग्न २४·४·१७४५ साडेचार वर्षे वय असतां; मृ. १८·४·१७५९.

१२ विश्वासराव २२·७·१७४२—१४·१·१७६१, मुंज ९·३·१७४९, लग्न लक्ष्मीबाई दीक्षित पटवर्धन २·५·१७५०, गर्भाधान एप्रिल १७१८, लक्ष्मीबाई मृ. १४·२·१७६३ पुणें येथे, पानपताहून आल्यावर.

१३ माधवराव–जन्म शनिवार १६ फेब्रुवारी १७४५ सकाळीं ११ घटिका मकरराशी, सावनूर येथें; मृ. क्षयाने १८·११·१७७२, मुंज १४·२·१७५२, लग्न ९·१२·१७५३ रमाबाई जोशी, गर्भाधान ३·७·१७६५, मूल झाले नाहीं. सती गेली. पेशवेगिरी १७·७·१७६१ रोजी मिळाली.

१४ यशवंतराव १३·८ १७४८ लहानपणीं मृत्यु.

१५ चवथा मुलगा ज. ५·९·१७५० जगला नाही.

१६ नारायणराव १०·८·१७५५—३०·८·१७७३, मुंज २८·५·१७६२, लग्न गंगाबाई साठे १८·४·१७६३; गर्भाधान १७·७·१७६९; पुत्र माधवराव सवाई ज. १८·४·१७७४. गंगाबाई सकेशा स्थितीत मृ. १२·७·१७७७.

गोपिकाबाई व पार्वतीबाई या दोघी स्त्रिया पुढें पुष्कळ वर्षपर्यंत पेशव्यांच्या अंतःपुरांत अधिकार चालविण्यास वांचल्या. गोपिकाबाई तेजस्वी, शाहाणी परंतु हट्टी होती. मतलबी स्वभावामुळे मोठें कुटुंब चालविण्यास ती राघाबाईप्रमाणें समर्थ नव्हती. तिने सवाई माधवरावास केलेला उपदेश सुप्रसिद्ध आहे [का. सं. प. या. ४५२]. तिच्या उत्तरकार्यास ३२५२९ रुपये खर्च झाला. पार्वतीबाई सौम्य व थोडी भोळसर असावी. सवाईमाधवरावाची लहानपणाची देखरेख तिच्याकडे होती. पेशव्यांच्या घराण्यांतील पुरुषांची आयुर्मर्यादा थोडी दिसते. माधवरावाचा क्षय, नारायणरावाचा खून, व सवाई माधवरावाचा अपघात. हे सोडून दिले तरी, पहिला पेशवा बाळाजी साठीच्या वर व

शेवटचा बाजीराव ७६ वर्षे जगले. पहिल्या बाजीरावाचे वय चाळिशीच्या वर दोन तीन वर्षेंच असेल. चिमाजीआप्पा त्याहून दोन वर्षें कमीच जगला. नानासा० ४१ व्या वर्षी व सदाशिवराव ३१ व्या वर्षी वारले. रघुनाथराव अनेक भानगडीमुळें वृद्धावस्थेस पोंचला असावा अशी आपली कल्पना होते, परंतु तो मरणसमयीं ४९ वर्षाचा होता. दुसऱ्या बाजीरावाचा बंधु चिमाजी ४६ वे वर्षी वारला. एकंदरींत लहानपणापासून कामाचे ओझे व दगदग पडल्यामुळें या पुरुषांची आयुर्मर्यादा बरीच आंखडली असें वाटूं लागते. वयाचे दहा अकराव्या वर्षी त्यांचे विवाह होऊन, बायकोचे वय ७–८ असे. म्हणजे पुरुषांची वैवाहिक राहणी १६·१७ वे वर्षी सुरू होई. हेही एक अल्पायुष्याचें कारण असावें. त्यांस २०–२१ व्या वर्षी मुले होत. सदाशिवरावास १७ व्या वर्षी उमाबाईच्या पोटीं मुलगा झाला होता. चिमाजी आपा, सदाशिवराव व थोरला माधवराव वैवाहिक नीतीत खंबीर होते. सर्वच पुरुषांचा आयुःक्रम हलींहून पुष्कळसा भरीव (Intensive) व फार लवकर वाढीस लागलेला होता.[1]

४. **सामाजिक व धार्मिक परिचय.**—शाहूमहाराजांचे कारकीर्दीत शिवछत्रपतीच्या पद्धतीचेच अनुकरण होऊन पूर्वीच्या देणग्या व वर्षासने पुनः चालू झाली; आणि कवि, सत्पुरुष, स्वधर्मनिष्ठ ब्रह्मवृंद यांचा योगक्षेम यथास्थित चालूं लागला. शाहूचे पदरी अनेक विद्वान थोर पुरुष उदयास आले. कालगांवचे कृष्णाचार्य शिरोमणि, कठापुरचे बाबदेव भट चाव्हरे, श्रीवर्धनचे भानजोशी ज्योतिषी, अष्टयाचे समुद्रभट बिन त्रिबकभट, कऱ्हाडचे रघुनाथभट बिन शंकरभट इत्यादि विद्वान लोक राजाश्रयाचे योगाने प्रसिद्धीस आले. कचेश्वर कवि हाही त्याच वेळी उदयास आला, त्याजकडून शाहूने उपदेश घेतला असल्यामुळें तो 'राजगुरु' या नांवाने प्रसिद्ध होता. पेशव्यांचे कारभारापासून तर राज्याचा व्याप वाढत गेल्यामुळे सर्व शिष्ट लोकांची मुले लिहिण्या वाचण्यांत व हिशेबाचे कामांत तरबेज होऊन तलवार बहादुरीप्रमाणेंच विद्या–संपादनाकडे

---

१ **टीप**–स. १९१० सालच्या मनोरंजनांत 'पेशव्यांच्या स्त्रिया' वर रा. ब. पारसनीस यांचा एक उपयुक्त लेख आहे.

लोकसमाजाची प्रवृत्ति वाढत गेली. बाजीराव पेशवा गुणिजनांचा चहाता होता. निरंजन माधव हा कर्नाटकांतील कवि बाजीरावाच्या आश्रयानें प्रसिद्धीस आला. शाहूच्या व बाजीराव नानासाहेबांच्या रोजनिशा वाचल्या म्हणजे राज्याचे कामीं खपणाऱ्या लोकांप्रमाणेंच देवस्थाने, सत्पुरुष, किंवा विद्वान ब्राह्मण यांस इनामें, नेमणुका वगैरे करून दिल्याचे उल्लेख भरपूर आहेत. यास विशेष उत्तेजन असे एका अर्थे म्हणतां येईल, परंतु ही विद्या म्हणजे केवळ वेदविद्या असून, ब्राह्मणांपुरतेंच हें उत्तेजन असे. इतर जातीयांस सार्वजनिक शिक्षण देण्याची हल्लींची कल्पना त्या वेळी बिलकूल नव्हती, या संबंधाचें विवेचन इतरत्र करण्यांत आलेच आहे. तसेच इतर जातीयांस आपापल्या धंद्यांत पोटाचा भरपूर उद्योग त्या वेळच्या राज्याच्या पसाऱ्यांत मिळत असल्यामुळे, त्यांनाही ब्राह्मणांस मिळणाऱ्या या धार्मिक उत्तेजनाचा हेवा वाटल्याचें एकही उदाहरण नाहीं. उलट मराठे, वैश्य, शूद्र वगैरे मंडळी भाग्यास चढली तेव्हां ते मुद्दां धर्मोपार्जनास्तव नाना प्रकारची इनामे किंवा उत्पन्नें ब्राह्मणांसच करून देत असत. ह्या संबंधांत हल्लींची भिन्न दृष्टि त्या वेळच्या समाजस्थितीस लागू करण्यांत मतलब नाही. सर्व लहान मोठे सरदार स्वतःच्या मुखत्यारीने इनामे किंवा वतने देत, त्यास सरकारच्या परवानगीची अपेक्षा नसे. जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांचीं इनामे, सदावर्ते वगैरे पेशवे जशीच्या तशी चालवीत असत [खं. १ ले. १२३ व ५१ व टीप १०७]. परधर्मीयांचींही उत्पन्ने चालविण्यांत ते कसूर करीत नसत. देवब्राह्मणांचे ठिकाणी शाहू महाराजांची निष्ठा अतोनात असून, त्यांचे उत्सव व उत्पन्ने यथायोग्य चालवावी अशी शाहूची पेशव्यांस अंत-काळची निक्षून आज्ञा होती. शाहूची आज्ञा पेशवे परमेश्वराची आज्ञा समजूनच पाळीत असत. देवब्राह्मणांच्या कृपेनेच आपले उद्योग चालून राज्यवृद्धि होते अशी पेशव्यांची तत्कालानुरूप समजूत होती.

गणपतिपुळें, सिद्धटेक, मोरेश्वर, थेऊर, नासिक इत्यादि ठिकाणी देव-दर्शनास वारंवार जाण्याचा पेशव्यांचा रिवाज होता. तसेंच प्रसंगानुसार हिंदुस्थानांत कुरुक्षेत्रापासून गयेपर्यंतच्या सर्व यात्रा बहुधा सर्व ऐपतवान

स्त्रीपुरुष एकवार तरी करून येत असत. बंदोबस्तासाठी म्हणून बहुधा ही यात्रेच्छु मंडळी फौजांच्या स्वारीबरोबर जात. अन्य प्रसंगीं गोविंदपंत बुंदेले वगैरे कित्येक सरदारांवर शिफारसपत्रे घेऊन लोक यात्रेस जात. सती जाण्याची स्त्रियांची चाल बहुधा सार्वत्रिक होती. तुलादाने, कल्पलतादाने, देवस्थानांच्या स्थापना, तपस्वी ब्राह्मणांचे योगक्षेमास नेमणुका, इत्यादि प्रकार हरहंमेशचे असत. जन्मोत्सव, बाळंतविडे, मृतांचे दुखवटे, मकरसंक्रमणाचे तीळगुळ इत्यादि सामाजिक व्यवहार जारी होते. शकुन व मुहूर्त पाहिल्याशिवाय बहुधा पाऊल पुढे पडत नसे. महत्वाचीं कामें सिद्धीस जाण्यासाठी नवस करण्यांत येत; आणि यशःसिद्धि आल्यावर ते नवस फेडीत. सरदारांच्या नेमणुकांचे किंवा इनामांचे मोबदले करितांना वारसांकडून नजराणे घेत; आणि असे नजराणे मुख्य पेशव्याशिवाय, जवळच्या बायकामुलांच्या नांवाने ज्याची जितकी शिफारस उपयोगास आली असेल तितक्या मानानें द्यावे लागत. विलंबावर निशाण प्रथम चढविणारास मोठीं बक्षिसे देत. कांही दैवी उपायांनाही आपलीं कामे सिद्धीस नेण्याकडे लोकांचा कल असे. पेशव्यांचेही असे इलाज कांही कमी नव्हते. ता. १६·३ १७५० रोजी पेशवा दीक्षितास लिहितो. 'एतदर्थे कांही दैवी उपाय बापूभट टोकेकर या करवी आपण करवावा, की राजश्रीची कृपा चित्तांत आहे ते वृद्धीस पाववून, आम्हांस निरोप देत. महिना पंधरा दिवसांत होय ऐसे असेल तर करावें. द्रव्यवृद्धि अति करतां येत नाही याचा विचार आपल्या विचारे कसा तो करावा' [११·७९].

५ श्रावणमास दक्षिणा.—श्रावणमासांत ब्राह्मणांस विद्योत्तेजनादाखल दक्षिणा वाटण्याचा प्रघात शिवाजीच्या वेळेसच सुरू झालेला शाहूनें पुढे चालविला. प्रथम ते काम तळेगांवास दाभाडे सेनापति करीत, पुढे बाजीरावानें तें पुण्यास चालविलें, तें पेशवाई अखेर चाललें. दक्षिणेचे आंकडे कित्येक सालचे आढळतात ते असेः—

स. १७३६–रु. १६३५४;	सन १७३७—रु. ४९०७१
स. १७४९–रु. १२३५६०;	स. १७५१—रु. अडीचलाख.

स. १७५२–रु. ६२८३५३; स. १७५३—रु. १२०६०१९
स. १७५४–रु. आठलक्ष; स. १७५८—रु. अठरालक्ष.

पुढील पंचविस वर्षांत दोनपासून पांचलक्ष पावेतों दक्षिणा दरसाल वांटण्यांत येत असे. विद्वान पंडितांस सोन्याचीं नाणीं देत. श्रावण शु० ६ स वांटण्याची सुरुवात होई. हा समारंभ प्रथम खबुतरखान्यांत होत असे, पुढे पर्वतीवर स. १७५८ पासून होऊं लागला. 'दरवाजास तट बांधून ब्राह्मण कोडले. ब्राह्मणांची संख्या ८० हजार व देकार अठरा लक्ष झाला. खबुतरखान्यांत भणंग भिकार अठरा पगड जाती यांस देकार देवविला. चौदा प्रहर दक्षिणा वाटली, जवळ जवळ दोन अहोरात्र ब्राम्हण कोंडलेले असत.' दक्षिणे शिवाय शिधे व खिचडी वांटीत.[1]

या शिवाय इतर दानधर्म पुष्कळ असत. शाहू छत्रपतीचे व बाजीरावाचें वृंदावन व श्राद्धपक्ष यांची व्यवस्था नाना सा० मोठ्या दक्षतेनें ठेवी. मंदिरांचे जीर्णोद्धार व नवीन स्थापना हीं कामे सदैव चालूच असत एकंदरींत पेशव्यांचे अंमदानींत कर्मनिष्ठ धार्मिक बाबतीं जोरांत चालू होत्या. अशा बाबतींचे खालील उल्लेख स्मरणीय आहेत—

१८·११·१७४८ थेउरास कल्पलतादान. ऑगस्ट १७४९ बनेश्वर मंदिराची सुरवात.
२६·७·१७५० ब्रह्मांड दान ३३०० तोळे. २५·७·५१ राधाबाईची रौप्यतुला.
२३·७·५२ सुवर्ण हस्तिरथ दान, सवालक्ष; गजगौरी व्रत.
१२ ८ ५३ सुवर्ण धेनुदान पर्वतीवर देवदेवेश्वरासंनिध.
१६·६·१७५४ नानासा० चे तुलादान पर्वतीवर, सुवर्ण, लोह, कारा, शिसे, नारळ व चंदन, खर्च रु. १०३४१२.
१४–२० मे १७५९ वडगांवास शकुंतेश्वराची स्थापना.
११·४·६१ नर्मदेवर मांधाता येथे तुलादान.

---

१ टीप.—[खं. ६ पु. रो. पृ. ६८, ८४, ९४, ११०, १२२ यांत दक्षिणेचे उल्लेख असून या विषयावर वि. ज्ञा. वि. १९१३ जानेवारीच्या अंकांत रा. ब. पारसनीस यांचा लेख आहे].

६. **पर्वतीचा देवदेवेश्वर.**—' पुण्याजवळील एका सुंदर टेकडीवर लहानसें देवस्थान पूर्वीपासून होतें. त्या ठिकाणाहून दिसणारा रम्य देखावा मनांत आणून नानासाहेब पेशव्याने तेथें एक भव्य मंदिर बांधून, त्यांत देवदेवेश्वराची व चार कोपऱ्यांस चार लहान मंदिरें बांधून, त्यांत देवी, गणपति, सूर्य व विष्णु यांची स्थापना केली. जुन्या पर्वताईची मूर्ति अद्यापि देवीच्या मंदिरांत ठेविलेली दृष्टीस पडते. या भव्य पंचायतन मंदिरासमोर चौघड्याची उंच इमारत असून तेथून चौघड्याचा सुस्वर आवाज त्रिकाळ झडून लांबवर पसरतो, व मनास आल्हाद देतो.' या रम्य टेकडीवरील मंदिरावर नानासाहेबाची इतकी प्रीति जडली कीं त्यानें तेथें जवळच एक वाडा स. १७५४ त बांधिला; व विष्णूचें एक स्वतंत्र मंदिरही बांधिले. ' दर एकादशीस खासे जाऊन पूजा करूं लागले.' खालच्या उतारावर मैदानाची जागा पाहून तेथें ब्राह्मणांच्या प्रतिवर्षी वाढत्या देकाराकरितां रमणा तयार केला. सरकारांत होणारीं सहस्र भोजनें आणि श्रावणमासांतील दक्षिणा, या टेकडीवरील वाड्यांत व खालच्या रमण्यांत होऊं लागलीं. शाहू छत्रपतीच्या पादुकाही पेशव्याने देवदेवेश्वराच्या मंदिरांत ठेविल्यामुळें या पर्वतीवरील मंदिरास विशेष महत्त्व व शोभा आली; आणि पेशव्यांचे त्या बाजूस वारंवार जाणें होऊं लागल्यामुळे, तिकडे शहरांतील लोकांच्या बागाही तयार झाल्या. पर्वतीच्या पायथ्याशी एक ओढा असून त्याच्या अलीकडे पेशव्यांनीं स. १७५५ त एक तलाव बांधिला. तेथे खासे जाऊन बसत. त्याजला या ओढ्याचें पाणी घेऊन ते ज्यास्त झाल्यास पुनः त्याच आंबील ओढ्यांत काढून देण्याची व्यवस्था केली. [दु. रं. पृ. ७३-७४]. याच ओढ्यांत सन १७६० साली भाद्रपद मासी पाणी येऊन पक्षाचे ब्राह्मणांपैकीं दोन चारशें असामी बुडून मेले. पर्वतीच्या या मंदिराचें काम १७४' त सुरू होऊन स. १७६१ त संपलें. देवदेवेश्वराच्या मूर्ती स. १७४७ त तयार झाल्या. स्थापना पुढें दोन वर्षांनी झाली. मंदिराच्या कळसास स. १७६१ त सोनें चढविलें, तोळे १०८०. ता. ४-६-१७४९ चा उल्लेख आढळतो तो असा. ' खर्च रु. ९०२० धर्मादाय पोतापैकीं पर्वती येथें श्रीदेवाच्या स्थापनेस श्रीदेव-

देवेश्वर बाण, रुप्याचा महादेव वजन तोळे ६७३४, मांडीवर मूर्ती सुवर्णाच्या, उजवीकडे गणपति, डावीकडे पार्वती वजन तो. ६८६, बाहेर गणपति पाषाणाचा व पर्वताई भवानी' [ना. रो. २·३४३].

नानासा० च्या वेळेस स्वास्थ्य प्राप्त होतांच राजवैभवाच्या पद्धती अनेक बाबतींत अंमलांत येऊं लागल्या. पेशव्यांच्या स्वारीचें वर्णन येणें प्रमाणे केलेलें आढळतें. ' नानासाहेबास बादशाही थाटाची आवडही होती, त्यामुळें त्याजपाशी निरनिराळ्या देशांतील प्रवासाचे उंची उंची सामान एकत्र झालें होतें. पेशव्यां ा तंबू लागावयाची जागा बिनीवाल्यांकडून आगाऊ साफ होऊन तिच्या भोंवतीं चारही बाजूंनीं चित्रविचित्र कापडाची मोठी कनात भिंतीप्रमाणें लावीत. तिला चार मोठे दरवाजे ठेवलेले असत. या कनातीच्या आंत अनेक उंच तंबू उभारले जात. त्यांत मुख्य पेशव्याच्या तंबूस सुवर्णाचे कळस असून ते दूरवर मोठे रमणीय दिसत. तंबू मोठे विस्तीर्ण असून त्यांत निरनिराळी दालने उंची रेशमी जरतारी कापडाच्या कनातींनी केलेली व सर्व सोयींनीं परिपूर्ण अशीं असत. स्नानगृह, स्वयंपाकगृह वगैरे कामितां निराळे लहान तंबू असून त्यांचे भाग लहान कनातीच्या भिंतींनी तोडलेले असत. सारांश, मोठ्या कनातीच्या आंत शिरल्यावर आंतील जागा एखाद्या टोलेजंग वाड्यासारखी भव्य दिसे. मुख्य दरवाजापुढें एक मोठें विस्तीर्ण मैदान मोकळे असून त्यांत शृंगारलेले हत्ती घोडे नेहमी पाळीपाळीने उभे असत. मैदानाच्या चारही बाजूंस निरनिराळ्या रंगांची निशाणे फडकत असत. दर मुक्कामावर फौजेच्या उतरण्याची शिस्त बांधलेली असे. श्रीमंतांच्या तंबूपासून कोस दोन कोसपावेतों दोनही बाजूंना दुकानें लागलेली असत. हीं दुकानें लहान पालांतून मांडलीं असून त्यांत सव तऱ्हेचे जिन्नस विकत मिळत. दुकानांच्या मागें दोनही बाजूंस निरनिराळ्या पथकदारांच्या जागा नेमलेल्या असत. बहुतेक पथके राहुट्याच वापरीत '

७. पुण्यनगरीचें ऐश्वर्य.–' नानासा० पेशव्याच्या अंमदानीत पुण्यांत जें ऐश्वर्य खेळत होतें, तसें पुनः कधीं दिसलें नाहीं. पानपतच्या आघातापूर्वी

मराठशाहीचें राज्य अत्युच्च शिखरास पोंचलें होतें. काशीपासून रामेश्वरापर्यंत पेशव्यांच्या कीर्तीचा डंका वाजत होता. देशोदेशीचे सावकार पुण्यास एकत्र झाले होते. देशोदेशींच्या उत्तम जिनसा, उत्तमोत्तम हत्ती, घोडे, कसबी लोक व राजेरजवाडे त्या पुण्यभूमींत एकवटले होते. हल्लींच्या गाड्यांऐवजीं त्या वेळेस नानाप्रकारच्या सुवर्ण अलंकारांनीं सुशोभित झालेल्या जरीच्या वेलबुट्टानें उन्हांत प्रकाशणाऱ्या व भालदार चोपदारांच्या ललकारण्यानें रस्त्यांस गजबजून टाकणाऱ्या अनेक पालख्या राजमार्गातून फिरत घोड्यांवरून फिरणारांची तर गणतीच नव्हती (दुर्दैवी रंगू पृ. ६०). त्या वेळेस पुण्याची हवा व पाणी या दोनही गोष्टी फारच निरोगी व ताकद देणाऱ्या होत्या. वस्तीही नवीन व मोकळी वसल्यामुळें जमिनीचा स्वच्छपणा व हवेची शुद्धता यांत वैगुण्य उत्पन्न झालें नव्हतें. तशांत ती राजधानी हिंदुस्थानच्या सार्वभौम पदास चढली होती. सारांश, निरोगी हवा, पाचक पाणी, रुचकर अन्न, स्वादिष्ट फळें, सुंगधी फुलें, यांच्या समवायांत राजकीय ऐश्वर्य, कौटुंबिक स्वास्थ्य, व राष्ट्रीय उमेद या पुण्य-नगरांत एकवटल्या होत्या, त्या वेळची शोभा व लोकांच्या तोंडावरची टवटवी काय वर्णावी !'

पुणें शहरावर पेशव्यांचें प्रेम अतोनात होतें. त्याची सुधारणा करण्याकडे त्यांचे लक्ष सदैव असे. हिंदुस्थानभर शें पंनास वर्षें चाललेल्या त्यांच्या संचारांत जे जे प्रकार त्यांच्या नजरेस येत ते पुण्यांत शक्य तितके उठवून देण्याचा त्यांस हव्यास होता. मंदिरें, पेठा, रस्ते, वाडे वगैरे बाबतींत लोकांस सवलती व उत्तेजन देऊन त्यांनीं नगररचना करविली. मंदिरें, हौद, वाडे, पेठा वगैरे स्मारकें त्या वेळच्या स्थितीचीं निदर्शक आहेत. ममत्वाचा झरा सदैव ओला असल्याशिवाय कोणतीही राष्ट्रीय कामें यशस्वी होत नाहीत. पेशवे रसिक, उद्योगी व अनुकरणप्रिय असल्यामुळें त्यांनीं पुणें शहर विशिष्ट प्रकारें सजविलें. याचे उल्लेख साधन ग्रंथांतून भरपूर आहेत [पे ब पृ. ४३, ४५, ५२, ५७; व ना. रो. २ पृ. २०९]. सदाशिव पेठेच्या शेजारी दुसरी पेठ वसवून तिला मुलाचे नांवावरून नारायण पेठ नांव ठेविलें. शहरास

चिरेबंदी कुसूं घालण्याचा कारखाना जिवाजीपंत खासगीवाल्यांचे मार्फत चालविला [स. १७५८, पु. रो.]. पर्वतीसंस्थान केलें. चतुर्थीस थेउरास स्वारी जात असे. थेऊर, आळंदी, गणेशखिंड या मार्गें झाडें लाविलीं. शेतें मोडून पुण्याची वस्ती वाढविली. पेशव्यांनीं कात्रज येथें तलाव बांधून आपल्या वाड्यासाठी नळ बांधून पाणी आणिले. त्याचें काम स. १७२९ त सुरू होऊन आठ वर्षांनीं पुरें झालें. पुढें तेवीस वर्षांनीं मूळचा खापरी नळ काढून दगडी घातला. पश्चात् नानाफडणिसानें दुसरा तलाव बांधून सदाशिवपेठेच्या हौदांत पाणी आणिलें. पेशव्यांचे वाडे, नळाचें पाणी, नगर रचना वगैरे सर्व माहिती येथें थोडक्यांत देणें शक्य नाहीं. केसरी १६·८·१९११ व टाइम्स् ऑफ् इंडिया १८·६·१९१४ यांत कांहीं माहिती आहे.

कर्जाचे कांहीं आंकडे उपलब्ध आहेत [ना. रो. २-२५४], त्यांवरून अंतसमयीं पेशव्याचे कर्ज १६४२०८२ रु. होतें. त्याच्या वीस वर्षांतील कारभाराचे कर्जाचे व व्याजाचे आंकडे व सावकारांची नांवे आहेत त्यांचा उपयोग विशिष्ट अभ्यासकांस होईल. खं. ११ ले. १२, १३, १७, १८, २६, ८०, ८१, यांतही असेच ८० वर्षांचे आंकडे व व्याजाचे दर आहेत. व्यापार, कारखाने, दुकानें, कर, टांकसाळी, टपाल, विहिरी, तलाव, किताब, बहुमान [ना. रो. २·१२५], पुणे शहराच्या पेठा, तिळगुळ पाठविण्याच्या याद्या, वगैरे विषयही अभ्यसनीय आहेत [६·३४९, ३६९].

पुण्याच्या बंदोबस्तासंबंधानें २१·११·१७५९ रोजी पेशव्यानें नानाफडणिसास लिहिलेलें पत्र वाचण्यालायक आहे तें असे. ' जागजागांचे हशमी लोक पुण्यास आणविले होते ते आले न आले त्याचा समाचार घेऊन, आले नसतील त्यांस पत्रें पाठवून जलदीनें आणावणें. तूर्त आळंदीची यात्रा भरत असेल, वाणी उदमी यात्रेस येत असतील, त्यांची रखवाली जाली पाहीजे. तरी लोक जमा जाले असतील त्यांपैकीं दोन तीनशे माणूस आळंदीचे यात्रेचे रखवालीस पाठवून देणें. पुण्यामध्ये चोऱ्या होतात म्हणून कळलें, त्यास चौकीस माणसें ठेवून चोरांचें पारिपत्य करून चोरी न हो तें करणें. फासेपारधी, कोल्हाटी वगैरे चोऱ्या करतात त्यांस मुलखांतून काढून देणें' [३. १४३].

प्रकरण बत्तिसावें.

शाहूकालीन प्रसिद्ध घराणीं.

१. आनुवंशिक प्रयोजन.
२. छत्रपतींचे चिटणीस.
३. अक्कलकोटकर भोसले.
४. पिलाजी जाधव.
५. शंभुसिंग जाधव माळेगांवकर.
६. नागपूरकर भोसले.
७. धारचे पवार.
८. बारामतीकर जोशी.
९. पुरंदरे.
१०. भगवंतराव अमात्य.
११. कोल्हटकर.
१२. दिल्लीचे वकील हिंगणे.
१३. लाला कृपाराम.
१४. कायगांवकर दीक्षित.
१५. यशवंत महादेव पोतनीस.
१६. इचलकरंजीकर घोरपडे.
१७. राजाज्ञा.
१८. विठ्ठल शिवदेव विंचूरकर.
१९. मालेगावकर राजे बहादर.
२०. मुतालिक कऱ्हाडकर.
२१. रास्ते.
२२. चिमणाजी दामोदर.
२३. रामाजी अनंत दाभोळकर.
२४. पानशे सोनोरीकर.
२५. नारो राम मंत्री.
२६. सचिव भोरकर.
२७. थोरात.
२८. विसाजी नारायण जाखी.
२९. धडफळे.
३०. फडके.
३१. महादाजी राम पारसनीस.
३२. रेठरेकर.
३३. सुमंत.
३४. न्यायाधीश.
३५. पंडितराव.
३६. बाजी महादेव प्रभु.
३७. बिवलकर ठाण्याचे.
३८. मेहेंदळे.
३९. ग्वालेरचे शिंदे, वंशावळ.
४०. इंदूरचे होळकर, वंशावळ.

१. आनुवंशिक प्रयोजन.—मराठशाहींत अनेक लहान मोठ्या घराण्यांचे उद्योग राष्ट्रकार्यास पोषक झाले, त्यांचे शक्य तितके उल्लेख राष्ट्रेतिहासांत

आले पाहिजेत. मुख्य ऐतिहासिक विवेचनांत बऱ्याच व्यक्तींचे व घराण्यांचे वृत्तान्त येऊन गेले आहेत, तत्राप त्या घराण्यांचे उदयास्त व अन्य तपशील जे या पूर्वी मुख्य कथाभागांत येऊं शकले नाहींत, तेही बोधप्रद असून स्वतंत्रतेने या कलमांत यावयाचे आहेत. याजवरून एकंदर राष्ट्रास व विशेषतः त्या घराण्यांचे वंशजांस पूर्वजांचे स्मरण ताजे होऊन या त्रोटक हकीकतींत ज्यास्त भर घालण्याची स्फूर्ति व्हावी असा उद्देश आहे.

छत्रपति, पेशवे, शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे कित्येक प्रमुख घराणीं मुख्य भागांतच पूर्णत्वानें घेतल्यामुळे, त्यांच्या हकीकती या कलमांत घेतल्या नाहींत. तसेंच ऐतिहासिक कालांत काम करणारी सर्वच घराणी येथें आलीं असेंही समजाबयाचें नाही. खरे ऐतिहासिक साहित्य अद्यापि फारच थोडें बाहेर आलें असून, त्यांत जे उल्लेख विखुरलेले सांपडले, तेवढेच येथे एकत्र केले आहेत. कित्येक घराण्यांच्या वंशजांकडून पत्रानें वगैरे तपास करितां माहिती मिळाली तिचाही अंतर्भाव येथें केला आहे.

मराठशाही बुडाल्यावर जरी राष्ट्रीय इतिहासाचें कार्य संपते, तरी या ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी मिळाल्या तितक्या, महत्त्वाचे मानानें, प्रस्तुत कालपर्यंत दिल्या आहेत. यांत एक विशिष्ट उद्देश असा आहे कीं, सामाजिक व आनुवंशिक दृष्टीनें आपल्या समाजाचा विशिष्ट विचार होणें अगदीं जरूर आहे. निरनिराळीं ऐतिहासिक घराणी घेऊन, त्यांची उन्नति व अवनति कोणत्या कारणांनी कशी झाली याचा तपास झाला पाहिजे. कांहींचा वंशविस्तार अतिशय झाला, तर कांहींचा वंशक्षयही तितकाच झपाट्याचा दिसतो. कांहीं घराण्यांत अनेक पिढ्यांपर्यंत पराक्रमी पुरुष निपजले, तर कांहीत एकाद-दुसराच पुरुष कर्तृत्ववान दिसतो. उद्योगास क्षेत्र असतां, कांहीं नुसते नामशेष झाले, तर कांहींनीं स्वतःच्या करामतीनें नवीन क्षेत्र उत्पन्न केलें. कांही अल्पायुषी तर कांहीं दीर्घायुषी, कांहींची संतति विस्तृत तर कांहींची दत्तकमालिका फारशी कधीं सुटलीच नाहीं. असे अनेक प्रकार सामाजिक दृष्टीनें विचारांत घेऊन, शेंपन्नास ठळक उदाहरणांवरून एखादा सामान्य बोध आपल्या

राष्ट्रानें घेण्याजोगा निघतो कीं काय, साक्षरता व निरक्षरता, तसेंच व्यसनाधीनता किंवा निर्व्यसनता, यांचा पराक्रमावर व संततीवर काय परिणाम घडतो, लहापणी लग्न झाल्यापासून राष्ट्राचें किंवा घराण्याचें नफानुकसान काय झालें, अशा अनेक बाबतींचा आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें विचार व्हावा, निदान या दृष्टीनें विचार करण्यास जरूर लागणारी अनेक घराण्यांची तपशीलवार माहिती तरी बाहेर यावी, हा एक उद्देशही घराण्यांच्या हकीकती येथे देण्यांत ठेविला आहे. सुप्रजाजननाचा विषय अत्यंत महत्त्वाचा असून, त्याजकडे नुकतें कोठें लोकांचें लक्ष जाऊं लागलें आहे, तेव्हां त्या विचारास चलन मिळण्यास ह्या घराण्यांच्या हकीकती उपयोगी पडतील असें वाटते.

२. छत्रपतींचे चिटणीस,[1] गोविंद खंडो(१७१६-८५).—सन १७२६त खंडो बल्लाळ वारल्यावर वडील पुत्र जिवबा सोळा वर्षांचे, ते मिजासी, दुसरे पुत्र बापूजीबाबा तेरा वर्षांचे, घरीं लिहावयास सांगणेस बहुत असतां, कोणाचें न ऐकतां, घोड्यांचे छंदांत वागावे, याजकरितां त्यांचे मामा गणेश रुक्मांगद यांनीं तोडांत दिली. ते समयीं उत्तर केलें कीं, लिहिण्याकरितां मी भार घेतला, त्यापेक्षां मी लेखणी धरणार नाही. त्यामुळे मामांनी त्यांचे लिहिण्याचा छंद सोडिला. परंतु घोड्यावरील लढाईत कुशल, शूरत्वाविषयी तृतीय राम अशी विद्या शिकले.' नानासाहेब पेशव्याला बापूजीचें साहा नेहमीं असे. तिसरे बंधु गोविंदरावबाबा दहा वर्षांचे, त्यांस मामांनीं लिहिण्यांत हुशार केले. चौथे सापत्न बंधु बाबूराव बाबा, सात वर्षांचे लहानपणी आईचे लाडांनी विद्या राहिली. खंडेराव वारल्यावर प्रथम गणोबामामाच चिटणिसीकडील सरकारी लिहिणें करूं लागले. पुढें कोंकणांतील जिंकिलेल्या मुलखाची चिटणिसी, जमेनिसी व कारखाननिशी, शाहूनें जिवाजी खंडेरावास करून दिली (भा. व. प. या. ले. ६६, ७०, ७१,).

---

१ **आधार.** खं. ६·२, ९३, १३८–१४०, ४४२, ४४४, ४५५, ४५९; महाराष्ट्र साहित्य व. १ अं. १०–११; कुळकर्णी कृ. ऐ. जु. ले. पु. १–२; शा. म. च; भा. व. शा. म. ब;

चिटणिसीच्या कामांत गोविंदराव लवकरच चांगला वाकब झाला. 'गोविंदरावबाबानें रात्रंदिवस महाराजांजवळ असावें, परंतु लिहिण्याचें काम न सांगितले. सेवेंत राहण्यामुळें सकवारबाईसाहेब थोरला महाल यांजकडे जाणें येणें परंतु लोभ नाहीं. दुसरा महाल सगुणाबाईसाहेब यांचा अत्यंत लोभ, पुत्रवत् लालनपालन करणें, काम सांगणें. यामुळें बाईच्या अनुषंगानें वागणें, कचेरींत बाईसाहेबांकडील बातमी राखणें. गोविंदरायाकडे लोभ विरुबाई त्यांचाही होता. त्यांनीं न घडती गोष्ट विरुबाईस समजावून महाराजांस सांगून आपण समजावून शर्थबशर्थ करावें. त्यांनी एकांतीं महाराजांस विनंति करावी कीं महाराज, चिटणिसांचे श्रम या दौलतीविषयीं बहुत, मुलें माणसें जात विजात केली. राज्यास रक्षिलें. त्याचे मुलाची अशी दशा महाराज गरीबनवाज कसे मनांत आणीत नाहींत ! गोविंदरायाची चाल पाहून महाराज संतोषी झाले. नित्य पांचशें डौल (कामांचा निकाल) करून द्यावी. कारभारी यांनीं व्यवस्था समजवावी; अशी चाल असतां, महाराजांनीं प्रसन्न चित्तें कारभाऱ्यांस सांगावें कीं गोविंदरायास सांगितलें आहे. तो सांगेल त्याप्रमाणें कामाचा उलगडा करून डौलें भरून देईल त्याचे सांगण्याप्रमाणें करा. स्वारी अंतर्गृहांत गेली म्हणजे जितकीं कामें उलगडलीं असतील तितकीं गोविंदरायांनीं इत्थंभूत तपशीलवार सांगावीं. कारभाऱ्यांनीं विचारल्यास, रायास विचारा, त्यांचे विचारें करा, असें सांगावें. गोविंदरायांनी रुकार न दिला म्हणजे डौल भरणें राहिलें, तो गिल्ला महाराजांकडे यावा. महाराजांनी समजून घेऊन, 'गोविंदरायाचे मनास न आला तो आम्हास शेवटास कसा जातो, म्हणावें, त्यांची मर्जी बिघडेल; महाराजांनीं सांगितलें त्या अन्वयें रायांनीं मोडला हें मनांत आणून रायांचे मनोदयासारखें केलें पाहिजे. असा उच्चार करून रायाच्या सांगितल्याप्रमाणें करतों. आतां राव तुम्ही खुषी झालां किंवा नाहीं, बोलावें. तो स्वामिमुखींचा गौरव केवळ अमृततुल्य त्या योगानें लहान थोर कारभारी यांनीं राव सांगतील तसें करा, आमची मात्रा त्यांपुढें चालत नाहीं म्हणावें. येणेंकरून कामकाजाचा सर्व ओघ गोविंदराव बाबाकडेच पडला. गोविंदराव चिटणिसांचा

व बाळाजीपंताचा घरोबा फार चांगला. कोणतेही विषयी सरकारचाकरींत अंतर न करितां एक विचारें चालल्यामुळें कित्येकांनीं महाराजांस अनेक प्रकारें समजाविलें. परंतु महाराजांचा लोभ पूर्ण. न्यूनाधिक प्रपंचांतील राज्य घर-संबंधी सर्व गोविंदरायास अवशी पहांटेस समजावून रायाचे विचारें करणें ते करीत असावें.' शाहूचा एवढा मोठा संपूर्ण विश्वास गोविंदरायावर असून, सर्व राज्याच्या उलाढाली त्याचे हातांत असतां, त्यानें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला असे उदाहरण नाही. नाना प्रकारचे उल्लेख बखरींतून आढळतात, परंतु गोविंदरायानें अन्याय केल्याचा एकही उल्लेख नाही. अशा या राजानिष्ठ पुरुषाचें नांव मराठ्यांचे इतिहासांत विशेष स्मरणीय झाले पाहिजे. शाहूच्या अंतकाळी पेशव्यांनीं राज्याची व्यवस्था गोविंदरायाचे सल्ल्याने ठरविली. पुढे राज्यकारभार पुण्यास चालूं लागला आणि गोविंदरावास आपले आयुष्य साताऱ्यास रामराजाचे संनिध कंठावे लागल्यामुळे, यजमानाप्रमाणेच गोविंदरावाचें महत्त्व कारभारांत राहिले नाहीं. तथापि मरेपर्यंत साताऱ्यास तो प्रमुख होता. शेवटीं शेवटी पुतण्याशी कलह उत्पन्न होऊन त्यास फार त्रास झाला, त्यांत त्यानें सर्व कौटुंबिक उत्पन्न पुतण्याचे नांवें लिहून दिलीं. गोविंदराव ता. ८-७-१७८५ रोजीं मरण पावला. त्याचा मुलगा लक्ष्मण गोविंद पेशवा राघोबा याचे तर्फेनें सुरतेस इंग्रजांशी तह करण्यास गेला होता. (धा. रा. च.).

खंडोबाचा धाकटा भाऊ निळोबा कर्नाटकांत राजारामाचा दासीपुत्र राजा कर्ण याजपाशी असे. राजा कर्णाचे पश्चात्ही त्याचा कारभार कांही वर्षे निळोबानें पाहिला [भा. व., शा. म. ब., ५३-५६]. पुढे तो कांही दिवस कोल्हापुरास संभाजीकडे व वारणेच्या तहानंतर साताऱ्यास शाहूकडे आला. गोविंद खंडोनें त्याचें कर्ज वगैरे वारलें, आणि शाहूनें त्यास पेशव्याची चिटणिसी दिली. ' मृत्यु पावले तेव्हां त्यांचें सार्थक गोविंदरावानें केलें. ' निळोपंताच्या वंशास पुणेकर म्हणतात. त्याचा मुलगा आवजी निळकंठ यास बाळाजी वि० ने चिटणिसीची सनद दिली (इ. सं. पु. ७). आवाजी व त्याचा मुलगा महिपत हे नानासाहेब पेशव्यांचें चिटणीसी काम मोठ्या विश्वासानें करीत होते. निळोबाचा दुसरा नातू आनंदराव हा पानपतावर मृत्यु पावला.

वंशावळ, चिटणीस. रा. बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी यांजकडून मिळाली. फार विस्तृत असल्यामुळे केवळ ऐतिहासिक संदर्भापुरती येथें घेतली आहे. म. रि. पू. पृ. ५४९ व खं. ६·४५५ पहा.



जिवाजी खंडेराव ता. ६ जानेवारी १७४३ रोजीं वारला (शा. म. च. पृ. ८३), तेव्हां त्याचा मुलगा रामराव सात वर्षांचा असतांही शाहूनें चिटणिसी वस्त्रें व दरख त्याच्याच नांवानें करून दिला. अर्थात् गोविंदराव सर्व कर्ते काम करीत होता, तरी घराण्याचा दरख त्याजकडे आल्याचें दिसत नाहीं. एकंदरींत या चिटणीस घराण्याची सर्वांशीं गोडीने वागून राष्ट्राकाज करण्याची पद्धत नमुनेदार असून, आजच्या स्थितींतही अशा भावनेची आपणांस मोठी वाण आहे.

सन्मार्गानें वागणारीं जीं कांहीं थोडीं बालबोध घराणीं महाराष्ट्रांत उदयास आलीं, त्यांत चिटणिसांच्या घराण्याची गणना करण्यास हरकत नाहीं. अगदीं अलीकडच्या काळापावेतों व हल्लींही या घराण्यांतील पुरुष बहुधा कर्तृत्ववान, नीतिमान व उद्योगी असे आहेत. बाळाजी आवजी, खंडो, जिवाजी, रामराव, मल्हारराव या पुरुषांची माहिती महाराष्ट्राचे इतिहासास आहेच. मल्हारराववाच्या बखरी हल्लींच्या इतिहासाचा मुख्य आधार होत. मल्हाररामराव हा मराठशाही व इंग्रजशाही यांच्या संधिमर्यादेवरचा पुरुष असून, त्याचा मुलगा बळवंतराव यानें प्रतापसिंहमहाराजांची नोकरी बजावून मान्यता मिळविली. [भा. व. प. या. ले. ७२]. त्यानें अग्निहोत्र घेतलें होतें. त्याचा मुलगा खंडेराव सामान्य परंतु देवभक्त असून तो नुकताच (२०-८-१९१७ रोजीं) आपल्या वडिलार्जित बोरगांवीं ९३ वर्षांचें वय होऊन मरण पावला. खंडेरावाचा मुलगा मल्हारराव जगन्नाथ शंकरशेटची स्कॉलरशीप मिळवून एल. एल. बी. झाल्यावर उमरावतीस वकिली करीत असे, तो १९०८ त वारला. त्याची कविता व ज्योतिषावरचे ग्रंथ उपलब्ध आहेत. त्याचा मुलगा नरहर मल्हार हयात आहे. एवंच बाळाजी आवजीपासून आठ नऊ पिढ्या या घराण्यांत पराक्रमी निघाल्या हे नुसतें महद्भाग्याचें निदर्शक नसून, त्यांच्या सदाचरणाचेंच द्योतक आहे. असें कळतें कीं बहुधा या घराण्यांत व्यसनाचा प्रादुर्भाव नव्हता. सामान्यतः त्यास कोर्टाची पायरी चढावी लागली नाहीं. बरेचसे पुरुष पापभीरु, स्नानसंध्याशील, पुष्कळांनीं मांसान्न सुद्धां वर्ज्य केलेले, असा प्रकार दृष्टीस पडतो.

महाराष्ट्रांतील ऐतिहासिक घराण्यांत दोन तीन पुरुष एकसारखे चांगले निघाल्याचीं उदाहरणें जर दुर्मीळ, तर वरील दीर्घ परंपरेच्या घराण्याबद्दल आपणास आदर वाटला पाहिजे. विपुल संतति व आयुरारोग्य यांचें बीज सदाचारांत असून चिटणीस घराण्यांत दत्तकाची जरूर फारच थोडी भासली आहे. सर्व मराठे सरदारांस चिटणीस पुरविण्याचें काम या घराण्याचें असून, त्यामुळें त्याचा विस्तार व परिचय इतर सर्व ऐतिहासिक घराण्यांस झाला होता. हल्लीच्या वंशजांनीं आपल्या घराण्याचा स्वतंत्र इतिहास लिहून काढिल्यास, त्यामुळें स्वराष्ट्रेतिहासांत मोठीच भर पडेल.

३. अक्कलकोटकर फत्तेसिंग भोसले.-शाहूची स्वारी बादशहाच्या कैदेंतून सुटून दक्षिणेत येत असतां पारद गांवच्या पाटलाचा अल्पवयी मुलगा त्याच्या आईने शाहूच्या पायांवर घातला, तो हा फत्तेसिंग भोसले होय. त्याची हकीकत शाहूच्या कार्किर्दीच्या वर्णनांत ठिकठिकाणी आलीच आहे. शाहूनें त्यास केवळ पोटच्या मुलाप्रमाणे वागविले आणि त्याच्या अंगीं विशेष कर्तृत्व असतें तर त्यास आपल्या पश्चात् राज्याचा मालक करण्यासही शाहूनें कमी केलें नसतें. परंतु त्यानेंच राज्याची जोखीम अंगावर घेण्याचे ना कबूल केलें. तो सज्जन व सालस होता. रघूजी भोसल्याप्रमाणे उलाढाली करण्याचा त्याचा स्वभाव नसून, स्वतःच्या जवाबदारीवर एखादी स्वारी अगर कामगारी तडीस नेण्याचें सामर्थ्य त्याच्यांत नव्हते. परंतु तो निर्व्यसनी, पापभीरु, व राजनिष्ठ होता. शाहूनें त्यास पुढें आणण्याचे अनेक प्रयत्न केले. कर्नाटकांतील स्वाऱ्यांत शाहूनें त्यास प्रमुखपण दिलें, तरी तें त्यास स्वतःच्या बुद्धीनें चालवितां आलें नाहीं. पेशव्याशीं त्यानें विरोध अगर फारसा केला नाहीं, तरी मनाचा कल पाहिला तर तो पेशव्याच्या विरुद्ध पक्षांतच दाखल असे. विरूबाईनें त्याला दत्तक घेऊन आपली सर्व संपत्ति दिली. शाहूनें त्यास अनेक इनामें व उत्पन्नें करून दिलीं. मृत्यूपूर्वी थोडे दिवस फत्तेसिंगाचा बंदोबस्त शाहूनें करून दिला तो असा. 'श्रियासह चिरंजीव रा. रा. फत्तेसिंग भोसले यांसी आशीर्वाद, आज्ञा ऐसीजे. तुमचें मानस, स्वामींनीं पुत्र करून, दौलत देऊन महत्पदारूढ केलें

तेविशीं अक्षय चालण्याचें खास दस्तुर व मुद्रांकित पत्र असावें म्हणोन चिटर्णास यांजपासोन विनंति केली. त्याजवरून स्वामींनीं चित्तांत आणून ठरावून हे पत्र सादर केलें असे. पातशहांनीं स्वामीचे बेजमीस महाल करून दिल्हे, त्यांपैकीं परगणे अक्कलकोट तुमचे बेजमीस पूर्वीपासून चालत आहे, तो तुमचेकडे दरोबस्त इनाम वंशपरंपरेने दिल्हा असे. तुमचे निसबतीस सरदार व महाल व मोकासे नेमून दिल्हे आहेत, त्याप्रमाणे फौज घेऊन त्यांत राज्यसाधनाचे उद्योग करावे. स्वामींनीं तुम्हांस कुळांत घेऊन राजपुत्र केलें. राज्यपदारूढ होतील ते तुम्हांकडे परगणे अक्षयी चालवितील. तुम्ही त्यांजपाशीं राहून राज्यसाधन रोवा करणें. आशीर्वाद. ' [ता. ३ मार्च स. १७४९—इ. स. पे. द. मा. पृ. १७६].

शाहूनें असा बंदोबस्त करून दिला, तरी उतारवयांत नानासाहेब पेशव्याकडून फत्तेसिंगास बराच त्रास पोंचलेला दिसतो. आपाजी राम गाडगीळ या नांवाचा गृहस्थ अक्कलकोटकरांचा दिवाण असून तो नानासा० पेशव्याचा साडू होता. म्हणजे आपाजी रामाची बायको व गोपिकाबाई या दोघी बहिणी. या दिवाणाचे व फत्तेसिंहाचे पटेना, आणि त्याजकडून परभारें कागाळ्या ऐकून नानासाहेबाने फत्तेसिंगाचे बंदोबस्तांत व जहागिरींत बरीच घालमेल केली, त्याची थोडी बहुत कल्पना पुढे दिलेल्या पत्रांतील उताऱ्यांवरून होईल. आपाजी राम यास नवलगें गांव इनाम असून त्याचा वाडा वाईस आहे.

शाहूच्या मृत्यूनंतर लवकरच ताराबाई व रामराजे आणि पेशवे यांजमध्ये वितुष्ट उत्पन्न होऊन सांगोल्याची स्वारी झाली त्यांतच फत्तेसिंग व पेशवे यांचीं घासाघीस सुरू झाली. ता. १६ नोव्हेंबर १७५० रोजी फत्तेसिंग पेशव्यास लिहितो. ' आम्हांकडील सरंजामापैकीं आठ लक्षांचा ऐवज घेणे त्या संबंधानें पुण्यांत आपण करार केला, त्यांत तफावत आली. चांगले परगणे जिवट तेवढे निवडून घेतले. सारांश गोष्टी हेच कीं आमच्या सरदारीचें अगत्य पूर्वी थोरल्या-पंतांनीं धरून हे उभारणी केली होती, त्या उपरांत रायांनींही आमचें साहित्य केलें. तदुत्तर आपले कारकिर्दीस आपणही वडिलांचाच स्वार्थ चित्तीं धरून, हरएकविसीं आमचें साहित्यच केलें. तेव्हां थोरले महाराज होते. त्यांच्या

'पाठीमागें आम्हांस रुसावयास ठाव आपण आहेत. आम्हांस बुद्धिवाद आपण काय सांगतात त्या प्रमाणेच वर्तणूक करावी ह्या आमचा निश्चय आहे. तरी आम्हांस लिहावयाचें तें लिहून पाठवावें. सर्व भरंवसा तुमचा आहे. कळावें.'

यानंतर उदाजी चव्हाणाची समजूत करून पेशव्यांनी त्यास नवीन सरंजाम देऊन ठेविलें. तो फत्तेसिंगाचे मुलखास उपद्रव देऊं लागला. फत्तेसिंग लिहितो, ' उदाजीनी व आपण ऐक्यतेनें असावें, म्हणोन तपशिलें लिहिलें, त्यास आमची ठाणीं कांहीं आज कालचीं नाहींत; आज चाळीस वर्षांपासूनचीं आहेत. उदाजीकडे सरंजाम अलीकडे जाला. आपण या गोष्टींचा शोध न करितां, सांगितल्यावरूनच लिहावें हें विहित नव्हे. सविस्तर वर्तमान आपणांस कळावें म्हणोन लिहिलें आहे.' असें हळू हळू प्रकरण विकोपास जाता शेवटीं खालील पत्र फत्तेसिंगानें निकरावर येऊन सदाशिवराव भाऊस लिहिलें आहे. 'आम्हांकडील सरंजामाचा व स्वकीय अर्थ वरचेवरी श्रुत करीत गेलो, परंतु चित्तांत येऊन कोणे गोष्टीचा निकाल आम्हांकडील तिळतुल्य जाला नाहीं. आमचे सरदारीची उभारणी पहिलेपासून थोरले नानांनींच केली. बाजीरावांनी व आपांनीं संरक्षण केले, त्या प्रमाणें तुम्हीं उभयतांनींही हा काळपर्यंत चालवावयास अंतर केले नाही. शेवटी राजश्रीचा काल जाला ते समयीं तुमचे हाती आम्हांस निरऊन दिल्हें. असें असोन चौघांनी चार गोष्टी, लटिक्या कंड्या सांगोन, आमचेविशी चित्तांत विपर्यास आणून, सरदारी मोडावी, ये सरदारीवरी चार पथके उभी करावी, कांहीं भारी पथकें पाडिली आहेत तीं हुजरातीस लावावीं, अगदीं आमच्या सरंजामाची फांदाफांदी करून जाम्हांस मोडावें, इनाम गांव देखील काढावे, असा प्रसंग दिवसेंदिवस दिसोन आला. जे समयीं तुम्हीं जें सांगितले तें तें आम्ही ऐकतच गेलो. आतांही तुमच्या वचनाव्यतिरिक्त आहों असे नाही. जे वेळेस आज्ञा कराल ते वेळेस दहा पंधरा हजार फौजेनिशी एक बाजूच तुमची सांभाळिली. तुम्हांस तो ईश्वरें दुसऱ्यांच्या फौजांच्या साह्याचा प्रसंग पडों दिल्हाच नाहीं. हा मुलूक व हे सरदारी केवळ तुमचीच आहे. असें आजपर्यंत आम्ही जाणत होतों, आणि

आमचा निश्चय असा आहे की तुम्हां व्यतिरिक्त दुसऱ्या कोणास आप्त म्हणतों असें नाहीं. हा अर्थ आपणही पुरता ध्यानांत आणून, आमचे सरदारीचा जोड जैसा आहे तैसा राखून, कार्य आमच्या हातें घेणे, आणि जसा बंदोबस्त करावयाचा तसा करणें; परंतु मोडून अपेश न घेणें. त्या कितेक गोष्टी बोलोन मनांतील संदेह काढावयास तेथें यावे असा निश्चय केला आहे. तेथें आलियावरी, चार गोष्टी मनांत आहेत त्या बोलोन, आपल्या वडिलांनी दाली बांधिली, ते तुमची तुम्हांजवळी सोडून ठेवावी, आणि आपली आज्ञा घेऊन जे स्थळीं राहवयास सांगाल ते स्थळीं राहूं, अथवा तेंही अनुकूळ न पडे, तरी आपलीं पत्रें घेऊन दस्तकें घेऊन महायात्रेस जाऊं, हाच विचार चित्तांत आणिला आहे. उत्तर पाठवावें. उत्तर आलें न आलें तरी एक वेळ दर्शनास येतों. येथें राहून चार लटकीं दुर्निमित्ये लोकांनी आपल्यास सांगावीं, आपल्या चित्तांत विक्षेप यावा यांत नफा काय आहे ! आणि दुसरे, अव्यवस्थित चित्त ज्यांचें त्यांसमीप मातबर मनुष्यांनीं राहूं नये. आपल्यास ईश्वरें सर्वांचे संरक्षण करावयाची शक्ति दिली आहे. तेथें आम्हीच जड होतों असे नाहीं. लोकांचे बोलें आम्हांस मोडावें हा धर्म नव्हे. ईश्वरें तुम्हांस बुद्ध संमत दिली आहे. परंतु आम्हांजवळ आपले विश्वासू ठेवून, शोध घेऊन मग जे करणें तें करावे. सारांश, आम्ही तुम्हांस सुटत नाहीं. वडिलांनी ओटींत घेतले, लेकांबरोबर वाढविलें ते कैसें सुटेल ! याचा विचार ध्यानांत आणावा. तुमचें तुम्हांस संकट आहे. जे वेळेस तुम्हांस तैसा प्रसंग पडेल, ते वेळेस मालमुलूक जिवानिशी हजर होऊं हे खातरजमा असावी. आमचा कंटाळा जाहला असेल तर महायात्रेस वाटे लावावें हे उचित आहे. फार लिहावें तर आपणांस विषाद येईल. थोरांस उचित तें करावें. बहुत काय लिहिणें.' [इ. सं. पे. द. मा. पृ.१७६-१८१].

या पत्रावर तारीख नाही आणि हा तंटा कसा उपस्थित झाला तें उलगडत नाहीं. तात्पर्यार्थ एक दिसतो तो असा कीं 'शाहूने पूर्वीची व्यवस्था आहे तशीच चालवावी,' ही जी आज्ञा केली ती पुढें जाचक होऊं लागली राज्यकारभारांत नवीन कामें उपस्थित झालीं, नवीन अडचणी आल्या, नवीन उपाय

योजणें प्राप्त झालें. फौजा सरंजामदारांच्या हातांत, ते उत्पन्नें खाऊन फौजा योग्य ठेवीतना, अर्थात् अन्य व्यवस्था करणें कारभाऱ्यांस प्राप्त झालें. आपल्या व्यवस्थेंत ढवळाढवळ केल्यापासून सरदारांस पेशव्यांची चीड आली, अशा स्थितींत राज्याचा कारभार चालावा कसा, आणि दररोज उपस्थित होणारीं नवीन प्रकरणें विल्हेस लागावी कशी ! मराठशाहीच्या मर्यादा वाढत जात होत्या, त्या मानानें उत्पन्न वाढत नव्हतें, आणि उत्पन्नाशिवाय पेशव्यांस कारभार चालवितां येईना. हें या प्रकरणाचें बीज असून, हाच प्रकार इतर सरदारांचा होऊन, ते मनांतून हळू हळू पेशव्यांशीं विरुद्ध होत चालले.

फत्तेसिंग भोसले ता. २० नोव्हेंबर स. १७६० रोजीं मरण पावला; आणि त्याचा सरंजाम पुतण्या शहाजी भोसले याजकडे आला. शहाजीस फत्तेसिंगानें दत्तक घेतलें होतें. फत्तेसिंगबावा वारल्यावर त्रिबक हरि पटवर्धन शहाजी राजास बरोबर घेऊन पेशव्याकडे आला. अक्कलकोटच्या जहागिरीची ही भानगड पुढें दोन तीन वर्षे चालू होती. अक्कलकोटकरांकडे बाबूजी नायकाचे कर्ज येणे होते, त्यासाठी जहागिरीची वहिवाट आपल्या हातीं असावी अशी नायकाची खटपट होती. ती मान्य न करितां पेशव्याने त्रिबक हराच्या सल्ल्यानें जहागिरीचा सर्व अधिकार शहाजीस दिला. त्यामुळे नायकानें शहाजीच्या मुलखांत दंगा उसळून त्रास देण्यास आरंभ केला. फत्तेसिंगबावांस देवाज्ञा जाहल्यानंतर बाबूजी नाईक अक्कलकोटास जाऊन सर्व वित्त विषय होता तितका घेऊन शहाजीसह येथें (पटदुरास) आले, श्रीमंतांची भेट जाहली. तीस हजार मोहरा व जवाहीर अगदीं दिले. सर्व विप्र मंडळी आली आहे. गोपाळपंत आले लाहेत [ऐ. ले. सं. भा. १ ले. २६]. ' यवनानें अक्कलकोट परगणा मारून ताराज केला. शहाजी बाबांची खराबी झाली. चार महिने आबाजी नायकाबरोबर गेले, त्यानें पोटास देखील दिलें नाहीं [सदर ले. ३५ ता. २९ जून १७६१]. अशी धामधूम चालू असतांच पेशवा नानासा० मरण पावला.

वंशावळ. भोसले अक्कलकोटकर.

१ फत्तेसिंह १७०८–६०
| =राणोजी लोखंडे पाटील पारद.
२ शहाजी द०१७६०–८९.
|
३ फत्तेसिंह दुसरा १७८९ १८२२.
|
४ मालोजी १८२२-२८.
|
४ मालोजी.
|
५ शहाजी दुसरा फत्तेसिंह
| १८२८-५६
६ मालोजी दुसरा सुभानजी तुळजाजी.
| १८५६-६६
७ शहाजी तिसरा १८६६–९६
|
८ फत्तेसिंह द० १८९६– चालू.

४. पिलाजी जाधव* –संपूर्ण अर्धे शतकपावेतों हरएक महत्त्वाच्या प्रसंगीं मराठी राज्याची सेवा केलेला आणि शाहू छत्रपतीची समग्र कारकीर्द पाहिलेला असा पिलाजी जाधव हा एकच प्रमुख सरदार त्या वेळचा दिसतो. याचे घराण्यास वाघोली व वाडी हे गांव इनाम असल्यामुळे हल्ली त्यांची वाघोलीकर व वाडीकर अशीं दोन घराणें आहेत. देवगिरीच्या जाधवांशी यांचा संबंध असला पाहिजे; परंतु त्याज दलची वंशावळ उपलब्ध नाही. पिलाजीची वंशावळ.

वाडी व वाघोली येथील जाधव. चांगोजी-हंसाई



---

* **टीप**—इ. स. द० माहिती, व २ ऐति० च० भाग १।२. खं. ६ पृ. १९, ३४, ४९, २७०, २७१.

१. बडोद्याच्या महाराजांची चतुर्थ पत्नी.

२. वियमान असलेल्या घराण्याचे कांहीं कागद खासगी छापले त्यांवरून ही वंशावळ जुळविली आहे.

सन १७०७ त शाहू दक्षिणेत आला तेव्हां त्यास जी मंडळी सामील झाली त्यांत पिलाजी जाधव होता. चंद्रसेन जाधव बाळाजी विश्वनाथाचे पाठीस लागला, तेव्हां पिलाजी जाधव व यमाजी धुमाळ यांनीं चंद्रसेनाशीं लढून बाळाजीची सुटका केली. दमाजी थोरातानें दंगा चालविला, तेव्हां त्याचा पराभव करून त्यास पिलाजीनेच पकडून साताऱ्यास शाहूपुढें आणिलें. त्यावरून त्यास दिवें व नांदेड येथील इनाम शाहूने दिले. तेव्हांपासून पिलाजी सरंजामी सरदार बनला. बाळाजी विश्वनाथाबरोबर पिलाजी दिल्लीस गेला होता; आणि तेथून पुढें प्रत्येक महत्वाच्या मोहिमेंत तो हजर असे. सन १७२४ त निजामाच्या औरंगाबादेकडील प्रदेशावर पिलाजीने मराठ्यांचा अंमल बसविला. निजामुल्मुल्कशींही त्यानें राजकारण बांधिले होतें, आणि निजामाकडून त्यास इनाम गांवही मिळाले आहेत. नानासाहेब पेशव्याने तर त्यास बहुतेक निजामावर देखरेख ठेवण्याचीच कामगिरी दिली होती.

सन १७२८ त माळव्यावर चिमाजी आपाने स्वारी केली तेव्हां त्याजबरोबर पिलाजी जाधव होता, आणि तेव्हांपासून दयाबहादर व महंमद बंगश यांजबरोबरील युद्धांत व बाजीरावानें छत्रसालास मदत करण्याकरितां बुंदेलखंडावर स्वारी केली त्यांत पिलाजी जाधव हजर होता. बाजीरावास झांशी प्रांत मिळाला, तेव्हां पिलाजीसही तिकडे पांच गांव इनाम मिळाले. पुढें कांही दिवस बाजीरावाशीं पिलाजीचा बेबनाव झाला होता, (खं. ६–४९ व श.) बाजीरावाचे व पिलाजीचे वारंवार खटके उडत. स. १७२४ च्या एका पत्रांत बाजीराव लिहितो. 'तुम्ही लोकांस निरोप देतां म्हणून ऐकले. त्या तुमचे लोक गेलियावर लष्कर कैसे राहेल ? यांत लष्करास निरोप द्यावा ऐसे तुमचे सभासदांचे चित्तास आहे असेल तरी आम्ही आलियावर भला गाष्टींचा वाट का. न निरोप द्यावयाचा; त्यास, ते उठण्यांत विचारास येईल लष्करचा ग ( ) हे तें करणें. आम्ही आपले वाईट बुद्धीने यास भरला करूं नये तें बे ( ) तुम्ही तरी सारे विचार चित्तांत आणून ( ) हाई ने करावें. ( ) तरी होऊ, उपाय प्रयास करूं नये ( ) र सरम राहे तें

करावें. एक चुकले तरी दुसरियानें सावरावें. यांत जें तुम्हास योग्य तें कराल. सर्व लष्करचा ओढा तुम्हांसच ओढणें लागेल, छ ४ जिल्काद.'(६·१९) जंजिरा, दिल्ली, वसई वगैरे मोहिमांत पिलाजी हजर होता. त्यानें लिहिलेली वसईची हकीकत वाचण्यालायक आहे (इ. सं. ऐ. च. पृ. ७२). नादीरशहा गेल्यावर मराठ्यांची फौज बुंदेलखंडांत बंदोबस्तास गेली, तिजवर पिलाजीचा मुलगा सटवोजी व व्यंकटराव घोरपडे हे सरदार होते. (व्यंकटरावाचीं दोन पत्रे, स. १७३९ डिसेंबरची, वा. वि. जोशी, सातारा यांजकडून).

पिलाजी जाधवाचे घरण्यांतील एक मुलगा बडोद्याचे माजी महाराज गणपतराव गायकवाड यांस स. १८५० साली देण्यांत आली, त्या संबंधाने जाधवांचे वंशज बडोद्यास आले, त्यांस हल्लीं तेथे नेमणूक आहे. पिलाजी जाधवास नानासाहेबाने लिहिलेली कित्येक अस्सल पत्रे या वंशजांकडून लेखकास मिळाली असून, त्यांवरून नानासाहेबाच्या उद्योगावर कांही ज्यास्त प्रकाश पडतो. यांपैकी कांही पत्रें पुढें यथास्थळीं देण्यांत येतील. एक पत्र चिमाजी आपास ऑक्टोबर ३ स. १७२८ चें असून बाकीची १८ पत्रे २३ ऑक्टोबर १७४६ ते १५ एप्रिल १७४७च्या दरम्यानचीं आहेत. वसईची मोहीम जरी स १७३९ त झाली तरी तिकडील प्रदेशांत बंदोबस्त व व्यवस्था होण्यांत बराच काळ गेला. या कामगिरीवर पाच सात वर्षे पिलाजी वसईकडे असून जव्हार वगैरे उत्तर कोंकणांतील प्रदेश जिंकण्याचे काम करीत होता. पेशवा पिलाजीस लिहितो. 'किले रतनगडकर रायकुवरबाई इणें शिर्क्याचे लोक घेऊन विक्रमपतंगराव जव्हारकर याजवर जावे ऐसे वर्तमान आलें, त्यास हरप्रकारें शिर्क्याची गुंज मोडे, ते उपद्व्याप न करीत, ते गोष्ट विचारें करून केलीच पाहिजे. तुम्ही जवळ आहां, या गोष्टीचा शोध करणे. कोण्ही लबाडी करीत असतील त्यास बरे वजेने धमक देऊन धमकेनेंच वारा पाणी होत, मनसुबा सिद्धीते न जाई तें करणे, व तुम्ही राणीशी राजकारण करून विचारें आपले लगामी लावून घेणे, (२३ ऑक्टोबर १७४६) नंतर ता. २१ नोव्हेंबरच्या पत्रांत पिलाजीचा कांही नाजूक मनसुबा बडवून आणल्याचा उल्लेख आहे. त्या पुढच्या डिसेंबरांत सदा--

शिवरावाची रवानगी पेशव्यानें कर्नाटकांत केली, तेव्हां प्रथम पिलाजीस बरोबर जाण्याची ताकीद केली; परंतु पिलाजीस जातां आलें नाहीं. पोर्तुगीझांनी रेडी घेतल्यामुळे त्यांचा बंदोबस्त करण्याची सूचना नानासा० नें पिलाजीस ९ डिसेंबरच्या पत्रांत केली आणि त्यास वसईच्याच बंदोबस्तास पाठविले. 'तुम्हांसारखे सलाबतीचे सरदार असलियाने गनीम येऊं पावणार नाही. आला तरी तुम्ही सर्व प्रकारें तर्तूद व मर्दुमकी करून नामोहरम करावे हे निशा आहे. तरी तुम्ही वसईस जाऊन वज्रयोगिनीस राहवें. जागा लाग भाग सर्व पाहून शंकराजी पंतास सांगून बंदोबस्त लढाईचा करावा. आरमार जवळच ठेवावें. म्हणजे अर्नाळ्यांत लोक उत्तम राहतील. चांगले लोक असलियावर काय चिंता आहे. सारांश, तुम्ही सर्वे घावदाव मनांत आणून बंदोबस्त करविणे. '

या पत्रांतील व दुसऱ्या अशाच अनेक उडत्या उल्लेखांवरून स्पष्ट दिसते की चिमाजी आपाने वसई काबीज केली तरी कैक वर्षेपर्यंत त्या प्रदेशाचा बंदोबस्त झाला नव्हता. पोर्तुगीझ फिरून अचानक येऊन केलेला उद्योग फुकट घालवितील म्हणून नानासाहेबानें पांच सात वर्षेपावेतों या भरंवशाच्या सरदारास जव्हार वसईकडे ठेवून दिले होते. जव्हारचे राजकारण जोरांत होते (ना. रो. १·१२–१५). जानेवारी ता. २२ सन १७४७ च्या पत्रांत जव्हारकराचे पारिपत्य करण्याचा मजकूर असून वसईसंबंधाने पाण्यांतील गनिमाबद्दल सावधगिरी ठेवण्याविषयीं नानाने पिलाजीस इशारा दिला आहे. त्याच महिन्यांत पिलाजी आजारी पडून वाघोलीस आला, तेव्हां प्रकृतीची काळजी घेण्याबद्दल नानाने खालील कळकळीचें पत्र पिलाजीस लिहिलें.

' राजश्री पिलाजी जाधव गोसावी यांस अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहा बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद. सु।।सबांअबैन मया व अलफ. तुम्हीं पत्र पाठविलें ते प्रविष्ट जाहलें. डोई तिडकूं लागली, जखमांचें अंग तिडकतें, सीत ज्वरही येतो, यास्तव वाघोलीस यावयाचा विचार केला, वाघोलीस आलों, म्हणोन लिहिलें तें कळले. ऐशियास तुम्हां वाघोलीस आलां, उत्तम केलें, तुमचें शरीर अशक्त जाहलें आहे, प्रस्तुत अनारोग्यताही प्राप्त झाली आहे.

तरी औषध उपाय उत्तम प्रकारें करणें; पथ्य करीत जाणें. पाहिले शरीर-दृढतेचा विचार आतां चित्तांत आणून औषध उपाय करावयास अथवा पथ्यपाणी घ्यावयास रेटारेट करून शरीरास अधिक दुखणें करून घ्याल. तरी पहिल्या कटाक्षाचें लक्ष या वर्षांत शरीरास आणून उपाय करून घ्यावयास आळस न करणें. तुम्हांस तेथें बडील कोणी सांगावयास म्हणावे तरी तुम्हींच बडील, यास्तव शरीराची जतन करून पूर्ववत् प्रमाणे दृढीकरणता कटाक्षाची होऊन आरोग्य होय तो विचार करणे. वारंवार आरोग्यतेचे व भावनेचे वर्तमान लिहीत जाणें. रा. सटवोजी जाधव यास फौजेत रवाना केलें म्हणून तरी त्यास फौजेत रवाना केलें. उत्तम केले. परंतु या दिवसांत गनीमाची हालचाल माफीकच आहे. दुसरें, या दिवसांत त्यानी तुम्हांजवळच असीलें पाहिजे. तरी त्यांस पत्र पाठवून साघारे आपलेजवळ आणणे; आणि फौजेत राजश्री जोत्याजी जाधव अथवा सुभानजी जाधव याजबराबर बाबूराव यास देऊन पाठविणें. तेथें राहतील. पथ्य करून वोखद घ्यावयास आळस कराल तर आण असे. वरकड फौज वसईस ठेवून सटवोजी जाधवास बोलावणें.'

सुरतेच्या मोगल अधिकाऱ्यांचें एक जहाज मराठ्यांच्या आरमाराने वसई-जवळ पकडून ठेविलें, तें सोडून देण्याविषयी सुरतच्या अधिकाऱ्यानें पिलाजीस विनंति केली. तें विनंतिपत्र पेशव्यांकडे पाठवून जहाज सोडून देण्याविषयी पिलाजीनें परवानगी विचारिली, त्यावर नानासाहेबानें लिहिलेला जबाब मोठ्या धूर्ततेचा आहे. ' त्या गलबतास आठ महिन्यांचा कौल दिल्हा, त्याप्रमाणें मुदत होऊन गेली, उपरांत गलबत दस्त केले. त्यास बंदरचा शिरस्ता ऐसा आहे, त्यांत त्यांनी रदबदल करावी ऐसें नाहीं. सुरतकरांनी तह करून अमल दिल्हा म्हणजे मग जहाज पुढे कशास धरतील ! त्याने रुजू व्हावें उचित असे. ' सर्वत्र मराठशाहीची सत्ता बसाविण्याचा नानासाहेबाचा उदेश यांत व्यक्त होतो.

पेशव्याचा पिलाजीशीं केवढा घरोबा होता हें तीं पत्रे वाचलीं असतां चांगले कळून येतें. प्रथम चिमाजीचा व पुढें नानासा० चा पिलाजीशी मोठा लोभ असून नानासा० त्यास काका असें म्हणे. पिलाजीस पोटशूळाची व्यथा

असून त्याच कारणाने तो वाघोली येथे ३-७-१७५१ रोजीं मरण पावला, तेव्हां नानासा० समाचारासाठीं वाघोलीस गेला होता. त्याचा मुलगा सटवोजी व पुतण्या सुभानजी बापासारखेच पराक्रमी असून, सटवोजीने चुलत भावास पानपतावरून लिहिलेलीं पत्रे वाचण्यालायक आहेत (६·४०४, ४०६, ४०९). पिलाजी जाधव, शिंदे होळकरांहून जुना व पेशव्यांच्या विरुद्ध पक्षांत कधी सामील होणारा नसतां, इतरांच्या मानानें तो मागें कां पडला ते समजत नाहीं. बाजीरावाचा उपलब्ध तसबीर वाघोलीच्या घराण्यांत सांपडलेली आहे.

५. शंभुसिंग जाधव माळेगांवकर.–धनाजीस दोन बायका असून पहिलीचा मुलगा संताजी, व दुसरीचे मुलगे दोन, चंद्रसेन व शंभुसिंग. संताजीचे व धनाजीचें पटत नव्हते म्हणून त्यानें त्यास बोरगांव पाडळी (साताऱ्या नजीक) वगैरे ठिकाणचे वडिलार्जित उत्पन्न सांभाळण्यासाठी ठेवून दिलें होते. संताजी स्वभावानें तामसी असून स्वतंत्र राहूं इच्छित होता. धनाजीच्या मृत्यूनंतर शाहूनें हीच व्यवस्था कायम ठेवून चंद्रसेनास सेनापतीचीं वस्त्रें दिलीं; आणि शंभुसिंगास त्याचे हाताखाली मुतालिक नेमिले. चंद्रसेनास कोणत्याही उपायानें मिळवून घ्यावे अशी शाहूची मोठी इच्छा होती; पण तो उघडपणें शत्रूकडे गेल्यावर होनोपंत वरेकर, नारोराम मंत्री, जीवनराम सुमंत, आनंदराव रघुनाथ वगैरे मंडळी आरंभी चंद्रसेनाकडे होती, त्यांस शाहूनें हळू हळू फोडून आपल्या बाजूस आणिलें; आणि त्या सर्वांस कांहीं नवीन सरंजाम करून दिले. चंद्रसेनाचें सेनापतिपद काढून तें कांहीं दिवस शाहूनें संताजीस दिलें; [जाधव घरा. कै. दळवीकृत]. ते पुनः त्याजकडून कां काढण्यांत आले तें समजत नाहीं. चंद्रसेनाचा भाऊ शंभुसिंग भावाबरोबर निघून गेला होता, त्यास परत आणण्याचा शाहूचा प्रयत्न प्रतिनिधीमार्फत एकसारखा चालू होता. बरेच वर्षे दोघे भाऊ एक विचाराने चालत होते. परंतु पुढें त्यांजमध्यें वितुष्ट येऊन चंद्रसेन आपणास कैद करणार असें वर्तमान समजल्यावर शंभुसिंग पळून शाहूकडे आला. त्या वेळीं शाहूनें त्यास लिहिलेली पत्रें १४ ऑक्टोंबर १७२९ व ५ जानेवारी १७३०चीं शा० रोजनिशीत आहेत [पृ. १६–१५]. शाहूनें संभाजीवर

पन्हाळ्याकडे स्वारी पाठविली, तींत शंभुसिंगानें चांगली मदत केल्यावरून शाहूची मर्जी त्याजवर प्रसन्न झाली. पुढें संभाजीची व शाहूची भेट होऊन वारणेचा तह ठरला, त्या भेटींत शंभुसिंग दोघां राजबंधूंच्या मागें हत्तीवर खवासखान्यांत बसला होता. जंजिऱ्याचे सीदीवर प्रतिनिधीस शाहूनें पाठविले, त्याजबरोबर शंभुसिंग होता. स.१७३२ता.१७ नोव्हेंबर रोजी शाहूनें शंभुसिंगास माळेगांवच्या इनामाची सनद करून दिली. हा गांव अद्यापि त्या घराण्याकडे चालत आहे. स. १७३९ च्या कर्नाटक स्वारींत फत्तेसिंग भोसल्याबरोबर शंभुसिंग होता. या स्वारींत चंद्रसेन विरुद्ध पक्षाबरोबर होता. तथापि त्याने कांही विशेष पराक्रम केल्याचें आढळत नाहीं. शंभुसिंग स. १७६० त वारला. पश्चात् त्याचा मुलगा अमरासिंग बाबासाहेब यानें माळेगांवास राहून दौलतीचा कारभार करून घराण्याचा लौकिक कायम राखिला. कवि मोरोपंतास अमरसिंहानें आपल्याबरोबर काशीयात्रेस नेलें होतें. बारामती येथें मोरोपंताच्या व अमरसिंगाच्या भेटी वरचेवर होत असत. अमरसिंग स. १८१७ त वारला. वंशावळ.

[दळवीकृत कैफीयतींतून] **धनाजी जाधव** जयसिंहराव.

संताजी ऊ. सुजनसिंह	चंद्रसेन मृ. १७५१	शंभुसिंग मृ. १७६०
धनसिंग. याचा वंश	रामचंद्र, १७६९ त	अमरसिंग मृ. १८१७
बोरगांवास आहे.	निजामाकडून मारला गेला.	रत्नसिंह मृ. १८७९
	खाशेराव.	अमरसिंह मृ. १८७८
	टिपूबरोबरच्या लढाईंत मृत्यु १७९१. उत्पन्न खालसा.	शंभुसिंह द० स. १८८१ हयात.

६. **नागपुरकर भोसले**[1].–मूळ पुरुष मुधोजी शिवाजी महाराजांजवळ शिलेदार होता. त्याच्या सात पुत्रांपैकीं बापूजी, साबाजी व परसोजी हे विशेष प्रसिद्धीस आले, आणि त्यांना शिवाजीने इनामें करून दिलीं. संभाजीनें त्यांस सोयराबाईस सामील असल्याच्या संशयावरून नोकरींतून दूर केलें. पुढें

टीपः–१ आधार ना. भो. ब., मराठ्यांचा दरारा, इ०

परसोजी खानदेशांत जाऊन पुंडावा करूं लागला राजारामानें त्याचा पराक्रम ओळखून त्यास सेनासाहेब सुभा हे पद दिले शाहू सुटून दक्षिणेंत येत असतां परसोजी त्यास वऱ्हाणपुराजवळ सामील झाला, आणि शाहूस राज्य-पद मिळाल्यावर त्याने परसोजीचे सेनासाहेब सुभा हे पद त्याजकडे कायम करून, जरीपटका, साहेब–नौबत व शिकेकटार देऊन वऱ्हाडांत मुलुखगिरीवर रवाना केले. तिकडे त्याने गोडवण, देवगड, चांदा व वऱ्हाड या प्रांतीं अंमल बसविला स १७०९ त परसोजी मरण पावल्यावर त्याचे पद मुलगा कान्होजी यास मिळाले. कान्होजीने अठरा वर्षे कारभार करून शाहूची मर्जी संपादिली. कान्होजीचे बंधु संताजी व राणोजी बाळाजी वि० बरोबर दिल्लीचे स्वारीत होते. पुढें भोसले बंधूंत वितुष्ट पडून शाहूस त्याची तडजोड करावी लागली. ' राणोजी व कान्होजी उभयतांचे समाधान करून सरंजामाची वांटणी करून दिली आहे. मसूरचे मुकामी सरंजाम बाळाजी प्रधानाचे विद्यमानें करार करून दिला, त्यापैकी दोन तक्षिमा कान्होजी, व एक तक्षीम राणोजी व रघूजी यांसी. हल्ली पराभव संवत्सरी (स. १२६-२७), स्वामींनीं सरंजाम दिला, त्यापैकी तीन ताक्षिमा कान्होजी भोसले, व बाकी चौथी तक्षीम राणोजी व रघूजी, येणेप्रमाणें वांटणी करून तुम्हास (म्ह० राणोजीस) व रघूजीस कान्होजी बरोबर दिले आहे. तुम्हीं मान्य करून स्वामींच्या पायांची शपथ केलीत. या उपरी कान्होजीचे विचारे वर्तणूक करणें. सर्वांनीं एक विचारें स्वामिकार्य करणे.' [इ. सं. पे. द. मा. पृ. १८५ व शा. म. रो. १६३, ता. २७·४·१७२७]. स. १७२८ चीं कान्होजीच्या नांवची आज्ञापत्रें असून [६·६०२,०३], त्यानंतरचीं आढळत नाहीत, यावरून स. १७२९ च्या सुमारास शाहूनें कान्होजीस अधिकाराहून काढिले असे दिसतें. ता. ११·२·१७२९ रोजीं कान्होजीच्या कारभारांत दखल न करण्याबद्दल शाहूने बाजीरावास आज्ञा केली आहे [शा. म. रो. ४१].

बापूजीचा नातू रघूजी हुड व पराक्रमी असून कान्होजीबरोबर मुलूखगिरी-वर होता. त्यास दत्तक घ्यावा अशी कान्होजीची इच्छा होती, परंतु कान्हो-

जीस मुलगा झाल्यावर उभयतांचें वैमनस्य आलें. गोंड राजांना कान्होजीनें कबज्यांत आणिलें होतें, त्यांजकडे संधान ठेवून रघूजीनें कान्होजीविरुद्ध खटपट केली, त्यामुळेही उभयतांचे बितुष्ट आलें असेल. एवढें खरे कीं रघूजीनें साताऱ्यास येऊन रामाजी नारायण कोल्हाटकराचे जिफारसीने शाहूची मर्जी प्रसन्न करून घेतली. रघूजीची बायको राणी सगुणाबाईची चुलत बहीण होती. रघूजीने कान्होजीस पकडून सातऱ्यास आणिलें, तेथे तो बरींच वर्षें कैदेत राहून तेथेच मरण पावला. कान्होजीचे कबिल्यांस रघूजी त्रास देऊं लागला, तेव्हां शाहूनें रघूजीचा निषेध केलेला आहे [ता. २०·११·१७३४ शा·म· रो २२२].

शाहूने रघूजीस वऱ्हाडांत रवाना केले, तेव्हां त्याजबरोबर कोन्हेरराम मुजुमदार, भास्करराम बक्षी, शंकराजी रखमाजी पोतनीस, महादाजीपंत प्रभु फडणीस, रखमाजी गणेश चिटणीस, इत्यादि मंडळी शाहूनें नेमून पाठविली. त्यांच्या साह्याने रघूजीनें पूर्वेकडील प्रदेशांत विलक्षण पराक्रम केले, त्यांचें वर्णन पूर्वी आलेंच आहे. या घराण्याची वंशावळ पुढील पानावर देण्यांत येत आहे.

वंशावळ-नागपुरकर भोसले. (बखरी व इतर आधारांवरून).



७. धार देवासचे पवार. वंशावळ. साबाजी [मावजीकृत कैफीयतीतून पृ. ६९-७९].





पवारांचें हें घराणें महाराष्ट्रांत फार पुरातन, अतिविस्तृत व विख्यात आहे. हे मूळचे सुपे पेठ्यांतील कित्येक गांवचे पाटील शहाजीच्या जहागिरींत नांदत असतां शिवाजीजवळ काम करून उदयास आले. ह्यांच्या कित्येक घराण्यांच्या हकीकती मावजींचे कैफीयतींत उपलब्ध झाल्या तेवढ्याच येथें दाखविल्या आहेत. तथापि ह्यांचीं अनेक घराणीं माळवा व महाराष्ट्र वगैरे प्रांतांत कालमानानुसार गुजराण करीत आहेत. येथे तीनच घराणी दाखविली आहेत उदाजीचा बाप संभाजी

यानें जिंजीच्या वेढ्यांत पराक्रम केल्यावरून त्यास रामचंद्रपंत अमात्यानें योग्यतेस चढविलें. पुढें उदाजी व त्याचे बंधु शाहूपाशीं उदयास आले. केरूजी, कृष्णाजी, व संभाजी पवार यांचे उल्लेख शा. म. रो. ले. ९,४३, ६५ येथे आहेत.

८. **बारामतीकर जोशी.**—हे मूळचे कोकणांत केळशी गांवीं राहणारे. त्यांच्या पैकीं केशव नाईक नांवाचा एक पुरुष काशीस जाऊन सावकारी करूं लागला. हा बहुधा शिवाजीचा समकालीन असावा. केशव नायकास सदाशिव, कृष्ण व अंतोबा असे तीन पुत्र. पैकी कृष्णाजी नाईक शाहूबरोबर दक्षिणेंत आला. साताऱ्यास येऊन राज्य मिळेपर्यंत शाहूस पैसा लागला तो नायकांनी पुरविला, म्हणून शाहूचा त्यांजवर लोभ जडून त्यानें नायकांस उदयास आणण्याची खटपट केली. सदाशिव नाईकही सावकारींत हुशार म्हणून गणला जात असे. त्यांच्या पेढ्या सर्व मोठमोठ्या ठिकाणीं देशभर होत्या. महादबा उर्फ बाबूची नाईक हा जरी पेशव्यांचे स्पर्धेमुळे प्रसिद्धीस आला, तरी या घराण्यांतील पुरुष बहुधा उद्योगी, बुद्धिमान व साहसी होते. कृष्णाजी नायकास शनिवार पेठेची चौधरी अंमलदारी होती. कृष्णाजीचा मुलगा विश्वनाथ साताऱ्यास सावकारी करी आणि दुसरा मुलगा नारायणराव नागपुरच्या भोसल्यांकडे दिवाणगिरीवर असून लढाईंत मृत्यु पावला. नारायणरावाचा मुलगा कृष्णराव उत्तरपेशवाईंत प्रसिद्ध असून साताऱ्यास नायकांचा वाडा आहे तो या कृष्णरावाने १७८५ त बांधिला. तो पेशव्यांकडून टिपूजवळ वकील होता. टिपूनें पेशव्याची तसबीर पायखान्यांत टांगून ठेविली, त्या संबंधाने टिपूस दिलेला रोख जबाब या कृष्णरावानें दिला, अशी आख्यायिका आहे. पेशवाई बुडाल्यावर तो महाराजाचा खासगी कारभारी होऊन स. १८२५ सुमारास मृत्यु पावला. याचे वंशज साताऱ्यास आहेत (हतवळणे, सातारा वर्णन, व रा. वा. वि. जोशी).

सदाशिव नाईक हा बारामतीकरांचा मूळ पुरुष समजला जातो. तो व त्याचे मुलगे सावकारीचा धंदा करीत असतां बाळाजी विश्वनाथानें आपली मुलगी भिऊबाई आबाजी नायकास दिली, त्यामुळें नायकांस विशेष पाठिंबा

मिळून त्यांना राज्याचीं कामे करण्यास संधि मिळाली. माळव्याचे कामगिरीवर असल्या वेळचें नाईक बंधूंचें पत्र उपलब्ध आहे, ते असें:—

'रा. तेजकर्ण व न्यहालकर्ण मंडलोई यांसी स्ने० बाबूजी व आबाजी नाईक नमस्कार. सु० सल्लास सल्लासीन मया व अलफ. साल गु० नारोशंकर याजकडे इंदूर होतें त्यास नारोशंकरानें तुम्हांस दिलगील केलें असें जाणोन सालम० परगणे इंदूर आम्ही आपल्याकडे मल्हारजी होळकर यांजकडून केले असे. तर आम्हीं केलें तें तुम्ही केलें ऐसें जाणून चित्तामध्यें दुजा भाव न धरणें.' (रा. श्री. वि. आठल्ये यांजकडून). नाईक पेशव्यांचे कांहीं दिवस वितुष्ट पडलें त्याचा वृत्तान्त मागें ठिकठिकाणीं आला आहे. स. १७४३ त बारामतीस जहागीर मिळवून नाईक तेथें वाडा बांधून राहूं लागले. स. १७५३त नाइकांनी पेशव्याशीं समेट केला. माधवराव पेशव्यास त्यांचें साह्य चांगले होतें. स. १७६२ त नायकानें चंद्रसेनाचा पुत्र रामचंद्र जाधव यास निजामाकडून फोडून पेशव्याचे बाजूस आणिले. (भा. व. १ प. या. २). माधवरावाच मरणसमया बाबूजी नाईक त्याचे जवळ थेउरास होता. रघुनाथरावाची मुलगी दुर्गाबाई बाबूजीचा मुलगा पांडुरंगराव यास दिलेली असून हें लग्न ७.२.१७७३ रोजी झालें. परशुरामभाऊ पटवर्धनाची मुलगी बाबूजीच्या चवथ्या मुलास दिलेली असून, तो मुलगा लग्नाचे पंधरावे दिवशी वारला. याच विधवा मुलीसंबंधानें पुनर्विवाहाचा प्रश्न उपस्थित झाला होता. नारायणरावाचे खुनानंतर बाबूजी नायकानें रघुनाथरावाचा निषेध केला व त्याचा पक्ष स्वीकारिला नाही.

भट घराण्यांत पेशवेगिरी गेल्यापासून सुमारे सत्तर वर्षे मराठशाहीच्या कारभारात वावरत असलेला असा बाबूजी ना० हा एकच पुरुष दिसतो. तो रसिक व गुणज्ञ होता. मोरोपंत कवीचा उद्योग प्रगट होण्यास बाबूजीचा आश्रय कारण झाला, एवढी एकच गोष्ट नायकांची राष्ट्रसेवा ध्यानांत ठेवण्यास पुरेशी आहे. बाबूजी ना० १७८० च्या सुमारास व त्याचा मुलगा पांडुरंगराव १७९४ सालीं वारला. पुढील या घराण्याची वाताहत झाली

वंशावळ, बारामतीकर जोशी.- सातारकर वंशजांनीं तपासून दिली आहे स. १९१८ पावेतों. [रा. वां. वि. जोशी सातारा यांजकडून].



९. **पुरंदरे.**—कोंकणांतून वरघांटी आल्यावर ज्या पहिल्या घराण्याचा आश्रय पेशव्यांस मिळाला तें हें सासवडचे कुळकर्णी पुरंदऱ्यांचें घराणें होय. बाळाजीस पेशवाई मिळाली तेव्हां पुरंदऱ्यांस पेशव्यांची दिवाणगिरी व हुजूरची

मुताालिकी मिळाली. शाहू महाराजांजवळ राहून हे पुरंदरे पेशव्यांचा कारभार करीत असत; आणि जरुरीप्रमाणें स्वारीतही त्यांजबरोबर जात हिशेबाचें व देण्याघेण्याचें कामही तेच पाहत. थोरल्या माधवराव पेशव्याने हे काम पुरंदऱ्यांकडून काढून नाना फडणिसास दिले. पेशवे पुरंदऱ्यांस चिरंजीव म्हणून लिहीत आणि कुटुंबीयांप्रमाणे त्यांस वागवीत. पेशवे बाहेर स्वारीत असतां सर्व घडामोडी उभयतांमध्यें पत्रव्यवहारानें चालत. रा. राजवाड्यांच्या ६ व्या खंडांत पुरंदऱ्यांनी लिहिलेली एक रोजनिशी आरंभीच छापलेली असून, तिचीं सर्व टांचणे उपलब्ध असतीं तर बाजीराव व नानासाहेब या दोन कारकिर्दींचा समग्र इतिहास उपलब्ध झाला असता. बाळाजी पुणे प्रांताचा सरसुभेदार असतां त्याचा व पुरंदऱ्यांचा स्नेह जमला असला पाहिजे. भारतवर्षांत शाहू महाराजांची बखर छापली आहे तीत खालील मजकूर आहे. ' सासवडास अंबाजीपंत पुरंदरे राहत होते. रोजगार-संपन्न, चार रुपये जवळ, घरवाडा चांगला, शेतवाडी करून, कर्जवाम मिळेल ते ठेवून प्रपंच चांगल्या रीतीनें करीत. त्यांचा वाडा थोर, शें पन्नास घोडे माणूस राही असा पाहून बाळाजीपंत त्यांजकडे जाऊन उतरले ' (पृ. ४८). अंबाजीपंतांने बाळाजीस कसकसें साह्य केलें त्याचा उल्लेख शा. ब. त ठिकठिकाणी आला आहे. अंबाजीपंत पुरंदरे स. १७३५ त काशीयात्रेस गेला, तेव्हां मुलगा व नातू लहान असल्यामुळें त्यानें आपला पुतण्या मल्हार तुकदेव यास शाहू महाराजांकडून मुताालिकी देवविली. अंबाजीपंत काशीयात्रा आटपून बाजीराव हिंदुस्थानचे स्वारींत असतां तिकडेच त्यास येऊन मिळाला, आणि परत आल्यावर लवकरच मरण पावला. अंबाजीचा वडील बंधु तुकोपंत याचा मुलगा मल्हार तुकदेव ऊर्फ दादोबा हा अंबाजीबरोबर व त्याचे पश्चात् मुताालिकीचे कामावर शाहूजवळ असे. त्यास शाहू महाराजांनी सन १७४१ त पालखीचा मान दिला. दादोबाचा मुलगा धोंडोपंत ऊ० धोडो मल्हार हा दिल्लीस वकील असून त्याजकडून पेशव्यांस आलेलीं पत्रें पुष्कळ उपलब्ध आहेत. अंबाजीचा मुलगा महादोबा हा दादोबानंतर नानासाहेबाबरोबर पुण्यास व स्वारींत असे,

आणि त्रिंबक सदाशिव ऊ० नाना हा सातान्यास मुतालिकीवर राहून कामकाज पाही. शाहूच्या मृत्यूनंतर नानासाहेबाचे व पुरंदऱ्याचें पटलें नाहीं. नानानें सदाशिवराव भाऊस कारभारावर घेतले, तेव्हां सन १७५०त महादाजी अंबाजी, व धोंडो मल्हार हे सखारम बापू बोकीलच्या मसलतीनें पेशव्यांवर रुसून घरीं बसले, (खं. ६ पृ ६०). परंतु पुढें लवकरच स. १७५१ त त्यांची थोडी बहुत समजूत झाली. (सदर पृ ७१ व ८१). नानासाहबानें पुरंदऱ्यांची उत्पत्ति काढून घेतली नाहींत. कांहीं वर्षांनीं निजामावरील स्वारींत महादोबानें पराक्रम केल्यामुळें त्यास नानासाहेबानें फौजेंत सरदारी दिली; आणि नीळकंठ महादेव यास पुण्याचा सुभा सांगतला. महादोबा स. १७६० त मृत्यु पावला आणि नानासाहेबही पुढे एक वर्षाने वारल्यावर, महादोबाचा मुलगा नीळकंठ यानें माधवरावाबरोबर सातान्यास जाऊन स्वतःसाठीं पूर्वीप्रमाणें पेशव्यांची दिवाणगिरी व हुजूरची मुतालिकी मिळवली. नीळकंठ महादेव स १७६५त मरण पावला. त्यानंतर कारभारांत नाना फडणीस प्रमुख होऊन मुतालिकीचें प्रयोजन राहिले नाहीं.

वंशावळ पुरंदरे. (मावजीकृत कैफीयती व यादा.)

त्रिंबकपंत

- तुकोपंत
  - मल्हार तुकदेव ऊ दादोबा मृ. २९-७-१७-४
    - धोंडो मल्हार
      - मल्हार
        - विठ्ठलराव
      - सदाशिव
      - त्रिंबक ऊ० नानापुरंदरे
        - रामराव
      - महादोबा दनक
        - * नीळकंठराव आबा पुरंदरे १७९१-१८२६
- अंबाजीपंत तात्या मृ. १७३५
  - सदाशिव
    - त्रिंबकपंतनाना
      - आबा पुरंदरे मृ १७९५
      - बाजीराव ऊ. बजाबा
      - महादोबा दनक १७६५ १७९१
      - * नीळकंठराव आबा पुरंदरे १७९१-१८२६
  - महादोबा
    - नीळकंठराव
      - माधवराव ता० १८२६

* नाना व आबा पुरंदर दुसऱ्या बाजीरावाचे वेळेस प्रसिद्ध होते

१०. भगवंतराव अमात्य.–रामचंद्र नीलकंठास मुलगे तीन, भगवंतराव ऊ० बाजीराव, मोरेश्वर ऊ० आपाजीराव, व शिवरामपंत, आणि मुलगी एक व्यंकूबाई. हीं मुलें त्यास उतार वयांत झालीं. भगवंतरावाचा जन्म माघ शु. १५ शके १५९८. (इ. सं. पे. द. मा. पृ. १). रामचंद्रपंत वारला (म. वि. पृ. ४८) तेव्हां भगवंतराव चाळीस वर्षांचा असून तोच कोल्हापुरचे राज्यांत अमात्य झाला, परंतु ह्या घराण्यावर संभाजी व शाहू दोघांचीं इतराजी असल्यामुळें, त्यांचे उद्योगास राष्ट्रांत अवकाश राहिला नाहीं. भगवंतराव तेजस्वी व बाणेदार होता. कोल्हापुरकर जिजाबाई लिहिते,'तुम्हांसही रामचंद्रपंतानी सकलकलाविद्यासंपन्न केलें. त्यांमागें आपण प्रतिदिनीं पुराण–श्रवण, देवब्राह्मणांचे ठायीं भक्ति धरिली. धर्मशास्त्र इत्यादि सर्वही नीति तुम्हांस करतलामल' (खं. ८–९९). भगवंतराव शाहूस वैतागून लिहितो, ' सेवकाचे चित्ताचा हेतु ऐसा आहे जे, साहेबांची सेवा करावी. कालवैपरीत्ये वडिलांचे हातून सेवेसी अंतर पडले. अलीकडे वडिलांप्रमाणें यथाकालानुसार सेवकानें या राज्यांत सेवा जीवाभ्य केली. परंतु. सार्थक नाहीं. दरबारी क्षुद्र माणसांचा पर्वकाळ झाला आहे. यास्तव सेवकाचें मन उद्विग्न आहे. साहेबी दयांतःकरणें साभिमानपुरःसर बहुमानपूर्वक सेवकाचे हातून सेवा घेतली तरी हजीर आहे.' (भा. व. प. या. ५४). परंतु शाहूनें त्याजवर लोभ केला नाहीं. उदाजी चव्हाणास हाताशीं धरून संभाजीच्या तर्फेनें लढण्याची भगवंतरावानें शिकस्त केली, पण त्यास यश आलें नाहीं. आपल्या विरुद्ध हा खटपट करितो असें वाटून संभाजीनें त्याचे गांव जप्त केले. या संबंधांत जिजाबाईशी झालेला त्याचा पत्रव्यवहार स १७२८-३२ चे दरम्यानचा पाहण्यालायक आहे, (खं. ८, ९२–१३५) लेखांक ९९ चें द्वारकोजी यादवाचें पत्र भाषा, राज्यकारस्थान, राष्ट्रीय भावना इत्यादि कारणांनीं महत्वाचें आहे. आंगरे व सावंत यांच्या दरम्यान अमात्याचा प्रदेश असल्यामुळें त्यांच्याशीं याचे युद्ध–प्रसंग वारंवार होत. त्यांचा पुढे मज्कूर झाला, त्याचे कागद (खं. ८-१५१) वाचले असतां, मराठे सरदारांचे अंतर्वैमनस्यें कळून येतात. वारणेच्या तहाच्या प्रसंगीं आपली व्यवस्था लावण्याविषयीं भगवंत-

ाव साताऱ्यास गेला, पण त्याची दाद लागली नाहीं. पुनः स. १७४० त
ो संभाजीबरोबर साताऱ्यास गेला, तेथें शाहूनें दोघांची गोडी करून दिली,
ाणि अमात्याची व्यवस्था यथास्थित चालविण्याची संभाजीकडून शपथ
ावविली. परंतु शिळ्या पराक्रमावर उत्पन्नें खाण्याची चटक महाराष्ट्र-मंडळास
ागल्यामुळें, संभाजीच्या राज्यांत अमात्याची डाळ शिजली नाहीं. तेव्हां
ो वैतागून निजामाकडे जाण्याच्या बेतांत होता (खं. ८ ले. १७२ -१८२).
तक्यांत अंतकाळीं रामराजास आणण्याकरितां शाहूस भगवंतरावाची जरूर
ागली आणि रामराजा गादीवर आल्यावर सातारचें अमात्य-पद त्यास मिळालें.
थापि पेशव्यांनीं सर्व आटोप केल्यामुळें भगवंतरावाचा उत्कर्ष झाला नाहीं.
याची हकीकत मागें ठिकठिकाणीं आलीच आहे. (म. वि. २ पृ. २३९).
ंशावळ (म. रि. पू. पृ. ७०७, व अमात्यांचें वंशवृत्त.)

रामचंद्र नीळकंठ

भगवंतराव १७१८-५५.
| ल. व्यंकूबाई निळोपंत पिंगळे.
कृष्णराव १७५० ६१.
सुबराव १७६१-१८१०.
मोरेश्वर. ५ रामचंद्र द० १८१३-२६ १८११-१३
गोविंदराव १८२६-३४
रघुनाथ द० १८३५-४५
रामराव द० १८४७-४९
मोरेश्वर द० १८५०-६७
माधवराव द० १८६८- चालू.
परशुरामराव

भगवंतराव स. १७५५ त पुण्यास मरण पावला. त्याचा मुलगा कृष्णराव यास कोल्हापुरचें अमात्यपद स. १७५० त मिळालें, तें अद्यापि त्याचे वंशाकडे चालत आहे. भगवंतरावाची बायको व्यंकूबाई हुशार असून तिनें अनेक खटपटी करून पुष्कळ वर्षे जहागिरीचा बचाव चागला केला. घराण्याचें वंशवृत्त छापलेलें आहे.

११. **कोल्हटकर.**-रत्नागिरिजवळ नेवरें येथे रामाजी नारायण कोल्हटकर नांवाचा एक कर्मनिष्ठ ब्राम्हण राहत असे तानें वाई प्रांतांत पाडवगड येथे वतन संपादन केलं. पाडवगडाहून नेवऱ्याला येण्याची वाट कोयना काठानें दक्षिणेस बाहेरवमडापावेतों जाऊन तेथून पश्चिमेस विपळुणावर उतरत असे. बहिरवगडचे खालीं बापूजी, साबाजी व परसोजी हे भोसले बंधू राहत असून,

त्यांच्या घरीं रामाजीपंताचा मुक्काम होऊन उभयतांचा परिचय जडला. एकदां जंजिरेकर हबशानें बहिरवगडावर स्वारी करून भोसल्यांस कुटुंबसह पकडून जंजिऱ्यावर नेऊन ठेविलें; तेव्हां त्यांजबद्दल तीन हजार रुपये दंड रामाजीपंतानें पदरचा भरून भोसल्यांची सुटका केली. त्यावरून भोसल्यांनीं आपलें उपाध्येपण रामाजीपंताचे वंशास कायमचें लिहून दिलें. रामाजीपंताचा प्रवेश शाहूकडे होता आणि त्याचे मार्फत भोसले बंधु शाहूस मिळाले. विठ्ठल कान्हो ठोसर म्हणून शाहूच्या लोभांतला एक गृहस्थ साताऱ्यास होता, त्यास शाहूनें बाकनिशी दिली (वा. इ. वृ. १८३५ ले. ८२), आणि विठ्ठलपंताची एक मुलगी शाहूच्याजवळ वाढलेली होती, तिचा विवाह शाहूनें रामाजीपंताचा मुलगा कोन्हेरराम याजबरोबर करून दिला. येणें करून शाहूचा लोभ कोन्हेररामावर विशेष जडला. पुढें रघूजी भोसल्यास शाहूनें सेनासा० सुभा पद दिलें तेव्हां त्याची मुजुमदारी त्यानें कोन्हेररामास दिली, आणि त्यांस वऱ्हाडांत पाठवून त्यांजकडून कान्होजीस पकडून साताऱ्यास आणिलें. पुढें भास्करराम भोसल्यांची बक्षीगिरी शाहूने देवविली. या दोघां कोल्हटकर बंधूंच्या साह्यानेंच रघूजीनें पुढें बंगाल-पावेतों प्रदेश काबीज करून अनेक पराक्रम गाजविले. भोसल्यांचें राज्य असेपर्यंत नागपुरास कोल्हटकरांचाही लौकिक होता.[1]

वंशावळ, रामाजी नारायण कोल्हटकर.



१२. **दिल्लीचे वकील हिंगणे.** स्वराज्यांत वर्तू वास अवकाश मिळाला

---

१ टीप—आधार, का. सं. ना. भं का २, इ सं. ऐ. गो. २-३२-३३; खं. ३-१८४, १८५, २३०, २३१, २३४.

म्हणजे लायक माणसें कशीं तयार होतात, याचें उत्कृष्ट उदाहरण या हिंगणे घराण्याचें आहे हे पेशव्यांचे नासिकचे तीर्थोपाध्ये. शंकराजी मल्हार सचिवा-बरोबर महादेवभट हिंगणे प्रथम बाळाजी वि०चे स्वारींत दिल्लीस गेला आणि पुढें पंचवीस वर्षेपर्यंत दिल्लींत मराठी सत्तेचा जम बसविण्याची त्यानें विलक्षण खटपट केली. महादेवभट पिशाचलिपी व पारशी भाषा जाणत होता. वक्तृत्व व बहुश्रुतपणा या गुणांचे योगानें त्यानें आपली छाप सर्वत्र बसविली. सन १७३० पासून हा दिल्लीचे मराठी वकिलातीवर असल्याचा उल्लेख सांपडतो. माळवा वगैरे प्रांताच्या सनदा मिळविण्यांत महादेवभटानें मोठी खटपट दिल्लीस केली (खं. ६–९५,९७). या कामगिरीबद्दल संतोष दर्शवून बाजीरावानें त्यास वर्षासन ठरवून दिलें (सदर १२३). हिंगण्याबरोबरच मल्हार दादो बर्वे व त्याचे मुलगे बाबूराव व रामचंद्र मल्हार, तसेंच यादव प्रल्हाद (स. १७३२–३९), मयाराम [१७४२], आसाराम [१७४५–४७] असे आणखी अनेक गृहस्थ दिल्लीच्या मराठा वकिलातीवर असलेले आढळतात. इंग्रजांचें परराष्ट्रीय खाते वाढत गेलें, तसाच प्रकार त्या वेळीं मराठ्यांचाही झाला. सवाई जयसिंगाकडून पैसे मिळवून कर्जमुक्त होण्याची खटपट नानासा०नें महादेव भट हिंगण्याचे मार्फत सिद्धीस नेली. हळूहळू हिंगण्यांनीं सावकारीचाही धंदा आरंभिला आणि सर्व उत्तर हिंदुस्थानांत प्रतिष्ठा मिळविली. स. १७४४ त महादेव भटाचा चमत्कारिक रीतीनें खून झाला, तो प्रकार खालील पत्रांत उपलब्ध होतो. ' चिरंजीव राजमान्य राजश्री धोंडोबा यांसी सदाशिव चिमणाजी आशीर्वाद. उपरी. ता. २५ मोहोरम. विशेष. काल दोनप्रहरां दिल्लीहून इच्छाराम वकिलाचें पत्र तेविसावे रोजीं येथें आले, त्यांतील खुलासा हाच कीं नादीरशहानें रूमच्या बादशाहीवर चढाई केली, त्यास नादीरशहास मारून काढिलें. पिऱ्हून नादीरशहा आपली फौजबंदी करीत आहे, व तोहमारवुलीखान खंदाहारच्या मुलकांत आहे, त्यासही नादीरशहाचें पत्र आलें आहे कीं येणे, व रूमांतही फौजबंदी होत आहे. हें एक वर्तमान लिहिलें; व दुसरे लिहिलें आहे कीं मनसूरअलीखान व अमीरखानही दिल्लीस आले आहेत, त्यास सांप्रत महादेव भटांनी

सवाईजी मेलियावर त्याची वकिली आपणाकडे करून घेतली आहे. पहिला कृपाराम होता, त्यास जयनगरांत ठेविले. महादेव भट मनसूर अलीखान याच्या दरबारी गेले, त्यास बरोबर सवाईकडील जमातदार व प्यादे होते, त्यास त्यांची यांची हकीकविशीं बोली जाहली, त्यास महादेव भटांनी शिवी दिली आणि आपले लोकांस बोलले कीं धरा. त्यावरून त्यांची यांची लटापटी जाहली. महादेव भटास जखमा लागल्या. संध्याकाळीं घरास नेले. मध्यरात्री मृत्यु पावले. पुत्र मात्र वांचले. मोठी गोष्ट वाईट जाहली. पत्रें आलीं तीं तीर्थरूपांकडे रवाना केलीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. (भा. इ. सं. मं. पुणे, पुरंदरे दप्तर). पो. २५ मोहोरम.'

हें पत्र सातार्‍यासच लिहिलेले आहे. जयसिंग १७४३ त मरण पावल्यावरचा मोहोरम १७४४ फेब्रुवारींत येतो. स. १७४५ च्या पुढे महादेव भटाचें नांव येत नाही. ह्मणून त्याचे मृत्यूचा स. १७४४ किंवा १७४५ असूं शकेल.

बादशाही उमरावास तोडावर शिवी देऊन हिंगणे धरा म्हणतो, यावरून मराठ्यांचा जोर किती वाढला होता याचे अनुमान होतें. महादेवभटाचे चारही मुलगे पराक्रमी निघाले आणि त्यांनी आपल्या कर्तबगारीने दिल्लीची वकिलात भरभराटीस आणिली. स. १७५० पासून ६१ पावेतोच्या दिल्लीकडील सर्व उलाढालींत ते अग्रेसर होते. रोहिले, जाठ, रजपूत, नबाब वजीर या सर्वांवर त्यांची छाप होती. अंताजी माणकेश्वर पेशव्यांचे तर्फे दिल्लीत फौज घेऊन होता, त्याचें व हिंगण्यांचें पटलें नाहीं आणि रघुनाथराव दिल्लीस आला तेव्हां त्याचें व हिंगण्यांचेही वांकडे आले. त्यामुळें हिंगण्यांची बरीच वाताहत झाली. [ख. १·१, खं. ३·२३३, खं. ६·१९८, ४९७, ४९९]. तथापि हिंगण्यांशिवाय पेशव्यांचें चालणारें नव्हतें आणि माधवरावानें पुरुषोत्तम व देवराव यांस पुनः स. १७६९ त दिल्लीच्या वकिलातीवर स्थापिलें. पुरुषोत्तम महादेवानें हे काम चांगलें करून नाना फडणिसाची मर्जी संपादिली तो स. १७८२ त दिल्ली येथे मृत्यु पावला. (का. सं. प. या. २९३). त्यानंतर महादजी शिंद्यानें स्वतः दिल्लीतील कारभार हातीं घेतल्यावर हिंगण्यांचे वकिलीची जरूर राहिली नाही, आणि त्यांचे घराण्यास उतरती कळा लागली तींतून ते सावरले नाहींत.

या उत्तरकालान दिल्लींतील कारभाराची म्ह० इ. स. १७८०–९५ पर्यंतची हिंगण्यांनी नाना फडणिसास लिहिलेली पत्रें इ. सं. त छापिलेली वाचण्यालायक आहेत. इतर लेखकांनी लिहिलेल्या हकीकतीचा पडताळा पाहण्यास त्यांचा उपयोग चांगला होतो; आणि इंग्रजांच्या हालचालींचाही त्यांवरून चांगली उमज पडते. बंधिष्ठ बंधु देवराव महादेव, अहिल्याबाई व तुकोजी होळकर यांचा तंटा मिटावण्याकरितां नाना फडणिसाचे सांगण्यावरून महेश्वरास गेला होता, त्या वेळीं त्यानें केलेल्या कामाचीं पत्रें 'होळकर दरबारांतील हिंगण्यांची वकिली' या नांवाने इ. सं. त प्रसिद्ध झाली आहेत. देवराव हिंगणे ता.१७ जून स. १८०७ त वारला. त्याचे वंशज नाशिक जिल्ह्यांत चांदोरी येथें आहेत. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांत नागपुरकर देवाजीपंत चोरघोडे याची गणना नसून तो हा देवराव हिंगणेच होय असें कांही संशोधकांचें म्हणणें आहे. (भा. इ. मं. इ. वृ. १८३५, ले. ४४).

वंशावळ–हिंगणे (खं. ६.४५७).

महादेव गोविंद मृ. १७४४.



१३. **लाला कृपाराम.**—हा एक हिंदुस्थानी कायस्थ ब्राह्मण जयपुरचा प्रसिद्ध राजा सवाई जयसिंग याचे पदरीं हुशार मुत्सद्दी ह्मणून नांवाजलेला होता. बाजीराव व सवाई जयसिंग यांचा स्नेह घडवून आणण्यांत कृपारामाचें साह्य बाजीरावास चांगलें मिळालें; आणि बाजीरावानें त्याजकडे आपल्या वकिलातीचा हुद्दा सांगितला. कृपाराम मृत्यु पावल्यावर त्याचा मुलगा तुळजाराम

यानें मराठ्यांच्या वकिलातीत काम केलें. तुळजारामानें एका पत्रांत कृपारामाच्या कामगिरीचा खालील उल्लेख केला आहे. 'कै. बाजीरावसाहेब हिंदुस्थानांत गेले, त्या वेळेस सेवकाच्या बंडलांचे विद्यमानें, सवाई जयसिंग याजकडील कामलदीची तडमोड झाली, ती सेवकास ठाऊक आहे खानदौरा मीरबक्षी व इमरहीनखान वजीर हे उभयतां राव कै० यांजवर चालून गेले, त्या वेळेस सेवकाचे बंडलांनीं उभयतांचा कज्जा होऊं न दिला. सवाई जयसिंगांनीं इशारा करवून, वालिकेचा मेळा भरला होता तो लुटविला. त्यावर राव कैलासवासी दिल्लीहून निघून जयसिंगाचे मुलखास आले, त्या वेळचीं जाबसालाची माहितगारी सेवकास आहे.' तुळजारामाचा मुलगा लाला सेवकराम हा थोरल्या माधवरावाचे कारकिर्दीत जयपुरास मराठ्यांचे वकिलातीवर होता. त्याला मराठी भाषा चांगली येत असून त्याचीं पत्रें मोडींत लिहिलेलीं आहेत. राजकारणप्रसंगानें त्याचें येणें पुण्यास वारंवार होत असे. पुढें नारायणराव पेशव्याचा वध होऊन इंग्रज मराठ्यांचे युद्ध सुरू झालें तेव्हां पुणे दरबारानें लाला सेवकराम यास आपल्या भरंवशाचा वकील म्हणून स. १७७७ त कलकत्त्यास इंग्रजांचे जवळ ठेविले. पुरंदरचा तह होऊन कर्नेल अप्टन ता. ११ फेब्रुवारी स. १७७७त मुण्याहून कलकत्त्यास रवाना झाला, त्याच वेळेस लाला सेवकराम याचीही परत रवानगी पुरंदराहून झाली. तेव्हांपासून सन १७९३ पर्यंत हा वकील कलकत्त्यास होता असे त्याच्या पत्रांवरून दिसतें. त्यास दरमहा ३०० रुपये (अकॉंटी) वेतन मिळत होते. सेवकरामास चिमणलाल व लाला गुलाबराय असे दोन मुलगे असून तेही कलकत्ता व पुणे येथे जाउन येऊन असत. चिमणलाल यानें नाना फडणिसास लिहिलेल्या एका पत्रांत खालील मजकूर तत्कालीन स्थितीचा निदर्शक आहे. 'तेथून ३०० रु. आर्काटी दरमहा मिळतो. त्याजपैकीं २५ रु. बट्टा व ५ रु. दरबार खर्च व १७५ रु. घराचें भाडें दरमहा लागतो. बाकी १५ रु. राहतात. त्यासी तेथें घोडा एक व पालखी व दिवटा व आदमगिऱ्या वगैरे माणसें, व जातीचे खर्च व तेथील सरकारचे चोपदार, खिजमतगार, ऐसा खर्च आहे. याजमुळें बारा तेराशें

रुपये अधिक लागतात. व येथें कुटुंबाचीं माणसें आहेत. तीन पुस्तांपासून सेवा करितो, दुसरें घर पाहिलें नाहीं. सेवकाचें अंतःकरण हेंच की चरण-सेवा करावी आणि आपले दरिद्र स्वामींजवळ अर्ज करावे. त्यासी स्वामींनी कृपाळु होऊन, ज्यांत सेवकाचें व कुटुंबाचे संरक्षण होय ऐशी रा. बाबुरावजीस मखलसीची आज्ञा करणार स्वामी धनी समर्थ असतात. सेवकासी आज्ञा वंद्य आहे. हे विज्ञापना.' (इ. सं. पर. रा. म. वकील पृ. ५७).

१४ कायगांवकर दीक्षित पाटणकर.--संधि मिळाली म्हणजे कर्तबगारी निर्माण होते याचें दुसरे उदाहरण या दीक्षित घराण्याचें होय. नारायण दीक्षित पाटणकर नांवाचा एक कोकणांतील ब्राह्मण सतराव्या शतकांत इ. स. १६५० नंतर देशावर येऊन गंगातीरी पैठण येथे तपश्चर्या करूं लागला. तो संस्कृतज्ञ, विद्वान व कर्मठ होता. पुढे तो भिक्षावृत्ति-अवलंबन करून औरंगाबादेजवळ सातारें या गावीं राहत असे. कांही काळानें तीर्थयात्रा करीत तो हिंदुस्थानभर फिरला त्याच्या साधुवृत्तीची, तपश्चर्येची व अन्नदानाची कीर्ति बाळाजी विश्वनाथाचे कानावर जाऊन त्याची त्या साधु पुरुषाचे ठिकाणी भक्ति जडली. पुढें शाहू महाराजही त्याचे भजनी लागला. आपल्या कार्यांत अशा सत्पुरुषांचे आशीर्वाद घेण्याचा प्रघात त्या वेळी सार्वत्रिक होता. ब्रह्मेंद्रस्वामी व नारायण दीक्षित समकालीन होते. दक्षिणेतील व कोकणांतील कारस्थानांत दीक्षितांचें अंग होतें. दीक्षितांचें वास्तव्य पुढे बहुधा काशीसच झालें आणि त्यानें अनेक ठिकाणीं अन्नछत्रें सदावर्तें वगैरे घातली. वाराणसी दीक्षित-पुरा म्हणून त्यांनीं बसविलेला एक भाग आहे. आपल्या प्रवासांत ठिकठिकाणच्या राजकारणाची बातमी टेवून ती तो बहुधा पेशव्यांस देत होता असे दिसते. बाजीराव, चिमाजी आप्पा व नानासा० यांचा दीक्षितांशी पत्रव्यवहार होता. चिमाजी आप्पा लिहितो. 'आम्हा लेकरे स्वामींची आहो. आमचे कल्याण व आमची बुद्धि उत्तम कार्याचे ठायी दिवसेंदिवस लागून यशाची अभिवृद्धि होय, ऐसा आशीर्वाद स्वामी देतीलच व देवाची प्रार्थना करतीलच यांत संशय नाहीं.' (का. सं. ५. या. ११). 'कै० बाळाजीपंतापासून आमचे त्यांचे चालत आलें.

आमच्या वचनाचा त्यांस विश्वास असे. त्यापेक्षां तुमच्या तार्थरूपांची निष्ठा आमच्या उभयतांच्या स्थळी असे, जे तीर्थरूपांसारखे मानीत आम्हा क्रोधें करून नाना प्रकारे रागेजून पत्र लिहीत असो. परंतु त्यांस क्रोध तिलमात्र येत नसे. त्यापेक्षां तुमचे नांव उत्कृष्ट व्हावे असा ईश्वरें आम्हांस दृष्टांत झाला आहे. तुमच्या पित्याच्या स्थळी ममता होती, त्यापेक्षां तुम्हावर अधिक आहे. हेच ईश्वराजवळ प्रार्थना करितो कीं यांचे उत्कृष्ट चालो,' (सदर २६). पेशवे किंवा सरदार राज्यांत आपला जम बसवूं लागले म्हणजे हे केवळ तपश्चर्येचें व आशीर्वाद चे फल होय, असें ह साधुपुरुष त्यांस स्मरण देत व त्याचा मोबदला मागत. बहुधा अल्प मोबदला त्यांस पुरत नसे. ब्रम्हेंद्रस्वामी व दीक्षित एकाच वर्गातले दिसतात. 'काशी येथे वैशाख मासी पंचपक्वान्नांचे लक्ष भोजन करावयाचा प्रारंभ करून मग कार्तिक मासपर्यंत वांचलों तर एक वेळ त्या प्रांतास सिहस्थास गोदास्नान करून, उत्तम लक्षभोजन गोदातीरीं करून, सर्वांच्या भेटी घेऊन यावें. दर्शनानंतर सर्व विदित होईल.' नारायण दीक्षिताने बाजीरावाजवळ मथुरेसंनिध धर्मकृत्यास दहा गांव मागितले, याचा अर्थ बाजीरावानें तो प्रांत जिकण्याचा उद्योग करावा असा दीक्षिताचा उद्देश होता. त्या वेळच्या लौकिक भावना कशा प्रकारच्या होत्या हें यावरून दृग्गोचर होतें. गोदाप्रवरासंगमी कायगांवास दीक्षितांनी वास्तव्य केले म्हणून त्यांस कायगांवकर हें नांव पडलें. हें गांव गोदावरीचे कांठीं उत्तर हिंदुस्थानच्या हमरस्त्यावर होतें. दीक्षित सावकारी करीत. निजामाकडील व उत्तरेंतील व्यवहारांत दीक्षितांचा उपयोग पेशव्यांस होत असे. शेदुर्णीचे हल्लींचे जहागीरदार यांचेच वंशज होत. (इ. सं. ऐ. च. २·५) वंशावळ [खं. ३·३७०].

नारायण गोविंद दीक्षित टकले (मृ. १४·१०·१७४८).

- वासुदेव दीक्षित १७४८-६०.
  - गोविंद दीक्षित मृ. १७८७
  - रामचंद्र मृ. १८१३.
    - जगन्नाथ दीक्षित १८१३-१८
- बाळकृष्ण दीक्षित १७६०-७०
  - लक्ष्मीनारायण १७७०-१८१८
    - बाळकृष्ण १८१८-५०
      - **यज्ञेश्वर दीक्षित.**

१५. यशवंतराव महादेव पोतनीस[1]-हे महाडचे देशपांडे प्रभु मुसे खोरेकर. या घराण्याचा मूळ पुरुष मुरारबाजी शिवाजीच्या वेळेस पुरंदरावर पडला. त्याचा भाऊ महादाजी बाजी यास शिवाजीनें योग्यतेस चढवून खासनिशीचा दरख दिला. महादाजीस मुलगे तीन, आनंदराव, बाजा व यशवंतराव. आनंदराव महादेव यास चंदावर मुक्कामी राजारामाने पोतनिशी व खासनिशी हे दरख करून दिले. शाहू दक्षिणेत आल्यावर आनंदराव महादेव ताराबाईस सोडून त्यस मिळाला, तेव्हां शाहूनेही त्याचे पूर्वीचे दरख कायम केले. पुढें आनंदराव महादेवाकडून कांहीं आगळिक घडल्यावरून शाहू त्यास कांहीं शिक्षा करणार होता, असें कळल्यावरून तो आपला भाऊ बाजी महादेव यासह फिरंगणांत गोव्याकडे पळून गेला. पुढें त्याचा सापत्न बंधु यशवंतराव महादेव भोरप येथें होता, त्यास घेऊन त्याची मातुश्री शाहूस भेटली. तेव्हां तो आपल्या बंधूस सामील नाहीं अशी खात्री झाल्यावर त्यास शाहूनें प्रथम हलकें काम देऊन पुढें त्याची कर्तबगारी व निष्ठा दिसून आल्यावरून त्याजकडे पूर्वीचे दरख कायम करून दिले. स. १७२२ च्या एका कागदावर (खं. २० ले. ४४) यशवंतराव महादेवाची खासनीस अशी सही आहे. उदाजी चव्हाणानें बंड केलें तें मोडण्यास शाहूनें यशवंतराव महादेवास पाठविलें. त्याचा मोड होऊन चव्हाणानें त्यास कैद केलें असतां शाहूनें दंड भरून त्यास सोडवून आणिलें. पुढे संभाजीचा तह घडवून आणण्यांत यशवंतराव महादेवाचा शाहूस चांगला उपयोग झाला. ती कर्तबगारी पाहून पुढें शाहूनें त्यास रायगडचा सुभा सांगून जंजिऱ्याच्या मोहिमेंत पाठविलें. त्याने युक्तीनें रायगडचे राजकारण सिद्ध केलें त्यावरून तो किल्ला पुढें प्रतिनिधीनें काबीज केला. तेव्हांपासून त्याजवर शाहूची अत्यंत मेहेरबानी होती. कोल्हापुरच्या संभाजीचाही त्याजवर लोभ होता,(खं. ८ ले. १५४ व १५७). शाहूच्या अंतकालीं पुढील राज्यव्यवस्था ठरविण्यांत यशवंतराव प्रमुख होता. पुण्याचे सरदार पोतनीस हे याचे वंशज होत.

---

१. **आधार.** बखरी, का. सं, व भा. व. व., आणि म. मं. ब. पृ. २६, भा. व.

वंशावळ पोतनीस व खासनीस. [मावजीकृत कै.]



१६. इचलकरंजीकर घोरपडे.—यांचा मूळ पुरुष नारो महादेव जोशी, याचा मुलगा व्यंकटराव नारायण बाळाजी विश्वनाथाचा जांवई झाला, तेव्हां पेशवे व शाहू या दोघांचा त्यास पाठिंबा मिळून त्याचे घराणें प्रसिद्धीस आलें. नारो महादेवाकडे कांहीं दिवस कोल्हापुरचें सचिव पद होतें, तें संभाजीनें व्यंकटरावास दिलें नाहीं आणि घोरपड्यांनींही आश्रय काढून घेतला, तेव्हां व्यंकटराव शाहूचे आश्रयास साताऱ्यास आला. बाजीरावानें त्यास पुण्यास वाडा बांधून दिला, तेथे त्यास दोन अपत्यें झालीं, मुलगी वेणूताई व मुलगा नारायणराव तात्या. वेणूताई ही त्रिंबकराव मामा पेठे याची बायको. स. १७३९ त व्यंकटरावाने इचलकरंजीचे ठाणे बांधिले. चिमाजी आपानें वसईवर मोहीम केली, तेव्हां व्यंकटरावाने गोव्यावर स्वाऱ्या करून जोरानें तिकडे पोर्तुगीझांस चांगला पायबंद दिला. व्यंकटराव स. १७४५ त मरण पावला तेव्हां त्याची आई अनूबाई इनें शहाणपणानें वागून इचलकरंजीच्या जहागिरीची भरभराट केली.

हेरवाडकर पंडित.-इचलकरंजीकरांचे पदरी दुसरें एक ब्राम्हण घराणें उदयास आले, ते हेरवाडकर या नांवानें कोल्हापुरांत नांदत आहे. त्याचा मूळ पुरुष हरिराम व भाऊ येसाजीराम यांची नांवें नानासा० पेशव्याचे कारभारांत वारंवार येतात, म्हणून तीं स्मरणीय आहेत.

वंशावळ.-इचलकरंजीकर, आधार-खरेकृत इचलकरंजीचा इतिहास.

विश्वनाथपंत जोशी.

नारोपंत (हुपरीकर). महादाजीपंत=गंगाबाई

नारो महादेव=लक्ष्मीबाई

व्यंकटराव १७०१-१७४५=अनूबाई

वेणूताई=त्रिंबकराव पेठे नारायणराव तात्या १७२४-७८. मृ. १७८३.

व्यंकटराव दादा १७५०-९५
ल. रमाबाई भिड पुणें; यानें आत्महत्या केली.

नारायणराव द०

१७. राजाज्ञा.-राजाज्ञा हें पद शिवाजीच्या वेळेस नव्हते. औरंगजेबानें रायगड काबीज करून स. १६९० त येसूबाईस व शाहू वगैरे मंडळीस पकडून नेलें तेव्हां त्याजबरोबर उद्धव योगदेव राजाज्ञा हा गृहस्थ होता, असा उल्लेख बखरींतून आहे (शा. म च. पृ. ३, ४, ८). यावरून राजाज्ञा हें पद संभाजीच्या वेळेस उत्पन्न झालें असावे. पुढें याचा समावेश प्रधान मंडळांत होऊन इतर अष्ट प्रधानांप्रमाणें सरकारी कागदावर राजाज्ञाने ' संमत सरकार ' अशीं अक्षरें लिहावी लागत शाहूच्या वेळेस राजाज्ञाची बरीच महती होती. तो बादशहाचे कैदेंत असतां त्याचा राजकीय कारभार उद्धव योगदेव पाहत असे. त्यानेंच शाहूकरितां मुली पाहून त्यांचीं लग्नें केलीं. शाहू सुटून दक्षिणेंत आला, तेव्हां उद्धव योगदेव येसूबाईबरोबर दिल्लीस गेला, तेव्हां इकडे दत्ताजी शिवदेव हा राजाराम ताराबाईचा राजाज्ञा होता, तो शाहूस सामील झाला नव्हता तोपर्यंत म्हणे १७०८—०९ सालीं रंगराव उद्धव शाहूचा राजाज्ञा होता, (इ. स. पे. द. मा. पृ. ३३६), तो उद्धव योगदेवाचा मुलगा असावा. स. १७१२-१३ त नारोराम व स. १७१६-१७ त चिमणाजी दामोदर राजाज्ञा पदावर होते. (वरील पृ. ३३७). चिमणाजी दामोदर पंडित राजाज्ञा यास स. १७२६-२७ वें शाहूचें

पत्र आहे. (शा. म. रो. २८). सन १७२२ तल्या एका कागदावर दत्ताजी शिवदेव व चिमणाजी दामोदर ह्या दोघांच्याही सह्या आहेत. (खं. २०–४४). सन १७२७-२८ त दत्ताजी शिवदेव हा राजज्ञा होता. मिरज येथें बंडखोरी करणारा उदाजी चव्हाण याचें पारिपत्य मोरो जिवाजीनें केलें, म्हणून शाहूने त्यास राजाज्ञा पद दिलें, (भा व. म मंडळाची ब पृ ४०–४१), तें पुढे त्याच्याच वंशांत चाललें. मोरो जिवाजी हा आंधळी बनवडी येथील देशस्थ ब्राह्मण. याचे निमे हिसेदार उंब्रजकर देशपांडे व निमे वाईचे देशपांडे.

वंशावळ मोरो जिवाजी **राजाज्ञा** (स. १७२८–२९).



१८. विठ्ठल शिवदेव विंचूरकर.— यांचें मूळचे उपनांव दाणी असून वतन सासवड येथें होतें. मराठशाहींत प्रसिद्धीस आलेलीं पुष्कळशीं देशस्थ घराणीं पुणें सासवड पट्ट्यांतली आहेत. दाणी कुटुंबाच्या दोन शाखा झाल्याः वडील शाखा मालेगांवास राजे बहादर या नांवानें उदयास आली, आणि धाकटीचा मूळपुरुष विठ्ठल शिवदेव याचे वंशास विंचूरकर असे नांव मिळालें. शिवाजीपंत दाणी यास तीन मुलगे झाले, आबूराव, त्रिंबकराव व विठ्ठल. विठ्ठलचा जन्म स. १६७५ त झाला. हा लहानपणापासून मोठा हूड असे. त्यास घोड्यावर बसण्याचा अत्यंत शोक असून दाडगाई करीत असल्यामुळें बापानें त्यास घरांतून घालवून दिलें. तेव्हां तो साताऱ्यानजीक मर्ढे येथें अमृतस्वामींच्या सेवेस जाऊन राहिला. तेथें असतां शाहूचे बक्षीशी त्याची ओळख होऊन त्यास

बक्षीच्या पागेंत नोकरी मिळाली. एकदां शाहू डुकराची शिकार करीत असतां विठ्ठलाने पळून जाणारा डुकर हातांनीं अडवून धरिला. त्यावरून शाहूची त्याजवर मेहेरबानी होऊन त्यास पागेंत दहा स्वारांची मनसब मिळाली. स. १७२० त चिमाजी आपानें हबशावर स्वारी केली तींत विठ्ठल शिवदेवाने सीदीसाताचे घोडे पकडून चांगला पराक्रम व्यक्त केल्यावरून त्यास शाहूनें पेशव्यांचे हाताखालीं नेमिले [खं. २ पृ. ४३]. पुढें तो बाजीरावाबरोबरच्या बहुतेक स्वाऱ्यांत हजर असे. लवकरच त्यानें आपल्या हाताखालीं मोठी फौज जमा केली, आणि दयाबहादर व बंगसावरील स्वाऱ्यांत मोठा पराक्रम केला. नृसिंह हें त्याचें कुलदैवत असून निरानरसिंगपुरचे मंदिर त्यानें बांधिलें. स. १७३९ च्या बसईवरील मोहिमेंत विठ्ठल शिवदेव हजर असून त्याने अनेक प्रसंगीं चांगला पराक्रम व्यक्त केला. स. १७४० च्या नासिरजंगावरील स्वारींत जी जहागीर बाजीरावास मिळाली तिची वहिवाट त्यानें विठ्ठल शिवदेवास सांगितली. त्याची हकीकत पुढें ठिकठिकाणीं येईल. तो १७६७ त मरण पावला, तोपर्यंत राष्ट्रकार्य करीत होता.

वंशावळ. विठ्ठल शिवदेव साताऱ्याजवळ निगडीचा कुलकर्णी.

शिवाजीपंत.	मल्हारपंत.	बाजीराव.	नरसिंगराव.	खंडेराव.
गणपतराव	अमृतराव.	दाजीबा.		नरसिंगराव अन्या.

(यांची हकीकत का. सं. चे बखरींत छापली आहे) विठ्ठलराव द०

१९ मालेगांवकर राजे बहादर.—माळवा प्रांत जिंकण्यासाठी पहिल्या जोराच्या प्रयत्नांत जी मंडळी दक्षिणेंतून उत्तरेंत गेली तींत नारो शंकर उदाजी पवार चे दिमतीस होता. हाच या घराण्याचा मूळ पुरुष ता. १७-१०-१७२० च्या मंडलोई दप्तरांतील एका पत्रांत नारोशंकर उदाजा पवाराच्या बरोबर असल्याचा उल्लेख आहे. सन १७३० त त्याची दिमत मल्हारराव होळकराकडे झाली. ता. ६-१०-१७३० त नारो शंकरास मा ब्याचे कामावरून काढण्यांत आलें. मल्हारराव होळकर लिहितो, 'रा० तेजकर्ण मंडलोई व कुवर

न्यहालकर्ण प० इंदूर गोसावी यांसी. स्वे मल्हारजी होळकर दंडवत सु. सल्लास सल्लासीन मया व आलफ. तुम्ही ज्येठमल पाठविला त्यास रा नारोशंकर यांजला पेशजीस प्र० मजकूरच्या धंद्यावरून दूर केले होतें हल्ली जेठमल यानें सांगितलें कीं नारोशंकर प्र० मजकुरास गेलीया प्र० उज्याड होईल. त्यास साल मजकूर नारोशंकर यांजकडून धंदा दूर केला असे; तरी तुम्हा आपली खातरजमा राखोन तमाम प्र० म० च्या रयतीस कोल करार देऊन आबादी करणें. बोहरे उज्जनीस पळोन गेले त्यांस घेऊन येणें. तुम्हीं कोणे गोष्टीचा वसवसा न धरणे. जे गोष्टीनें परगण्याची कीर्द आबादानी होय तें करणे. जाणीजे. छ २७ रबिलाखर[1].

नारोशंकर, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदले वगैरे मंडळी आरंभापासूनच शिंदे होळकरांबरोबर उत्तरेतील उद्योगांत थेट पानपतापर्यंत वावरत होती. नारोशंकर होळकराबरोबर असे. स. १७४२ त नाना सा० पेशव्यानें झांशीच्या दक्षिणचे ओर्छा ठिकाण हस्तगत केलेलें हातचे गेलें ते परत घेण्याची नारोशंकरास आज्ञा झाली. या कामावर तो कैक वर्षे होता. शिंदे-होळकरही जाऊन येऊन त्या उद्योगावर असून त्या संबंधांत रामचद्रबाबास लिहिलेली पेशव्यांची पत्रें उपलब्ध आहेत (पारसनीस सग्रह). असेंच एक विस्तृत पत्र नारोशंकरानें पेशव्यास लिहिलेले ता. ३१-५-१७४६ चें रा यशवंत रा० गुप्ते यांजकडून मिलालें आहे. शेवटीं ओर्छा जिकून झांशी सुभा नारो शंकराने हस्तगत केला. [२८-११-१७५०, खं. ११-७५].

नारोशंकरासच पुढें पेशव्यांनीं झांशीच्या सुभ्यावर नेमिलें.त्याने तीस पसतीस लख उत्पन्नाचा प्रांत हस्तगत केला. झांशी खेडें होतें, त्याची वसाहत करण्या बद्दल लाखों रुपये खर्च करून सुभा राहण्यालायक जागा केला पुण्यास श्रीमंतांस कोणा गरवाका रमजाविल्यावरून त्याजला पुण्यास वालावून आणिलें. नौबत बाजवीत शहरांतून थेट पेशव्यांचे वाड्यांत गेल, आणि तेथे उतरण्यास जाग मागूं लागला, अशी आरुयाधका आहे. इतराजीचा डौल दिसण्यांत आला, तेव्ह दत्ताजी शिंद्याच्या मध्यस्थीनें तटा तुटून त्याजबरोबरच स. १७५७ त नारो

१. असेंच पत्र बाजीराव बल्लाळचेंही आहे. रा. श्री. वि० आठल्ये यांजकडून.

शंकराची रवानगी पूनः हिंदुस्थानांत झाली. पानपतांचे प्रसंगी तो दिल्लीचे संरक्षणांस होता. माधवरावाचे कारकिर्दीतही त्याने कामगिरी केलेली आहे. भवानराव प्रतिनिधीवर पेशव्यांची इतराजी झाल्यानें कांहीं दिवस प्रतिनिधीचें काम स. १७६२ त नारोशंकरास देण्यांत आले होतें. नारोशंकराचा मुलगा त्रिंबकराव नारायण कांहीं दिवस शिद्यांचे दिवाणगिरीवर होता. त्याचे भाऊ आबाजी व लक्ष्मण भाबाबरोबर बावरत होते. लक्ष्मणशंकराचा मुलगा विश्वासराव हा झांशीच्या सुभ्यावर बरेच दिवस होता. निजामाशीं लढतांना माधवराव पेशव्याचे वेळेस नारोशंकरानें केलेले काम त्यानें स्वतः विस्ताराने लिहिले आहे. [भा. व. १ प. या. १.२]. शिवाय नारोशंकराची एक बखर रा. राजवाड्यांनीं छापली आहे. (खं. १ पृ. ३१०).

वंशावळ



शिवराव [वरील खं. १ मधील बखर लिहिणार].

२०. **कऱ्हाडकर मुतालिक.**— सातारा जिल्ह्यांतील जावला तालुक्यांत बामणोली गांव आहे, तेथे शिवदेव चावरे नांवाचा एक इसम राहत असे; तो खेड्यांत किरकोळ देवघेवींचा व्यापार करून उदरनिर्वाह करी. त्यास अंताजी व यमाजी असे दोन मुलगे होते. हे मुलगे राजारामाचे कारकीर्दीत परशुराम त्रिंबकाचे हाताखालीं कारकुनी करूं लागले; आणि अंगच्या हुशारीने लवकरच प्रसिद्धीस आले. कैक वर्षांनी म्ह० स. १७४२–४३ त यमाजीस प्रतिनिधीची मुतालिकी मिळाली (सदर पृ. १६७). यमाजी मुत्सद्दी असून शिपाईगडी

होता. शाहूच्या कारकिर्दीत प्रतिनिधीचें वजन खालावत जाऊन पेशव्या वाढत चालले तें या हुशार यमाजीस दुःसह झालें; आणि संधि सांपडेल तेव्ह पेशव्यांशीं स्पर्धा करून त्यानें आपल्या धन्यास प्रमुखत्व आणण्याचा खचून उद्यो केला. परंतु प्रत्यक्ष प्रतिनिधीच्या अंगीं विशेष पराक्रम नव्हता, आणि पेशव्यांप्रमाणें घरांतच तयार झालेली स्वतःची होतकरू तरुण मंडळीह मदतीस नव्हती. तेव्हां यमाजी स्वतः कीतीही हुशार असला तरी दुस ऱ्याचे तर्फेनें त्यास वागावयाचें असल्यामुळें पेशव्यापुढें त्याचें बल चाललें नाही शाहूच्या अखेरच्या भानगडींत यमाजीनें सकवारबाईचा पक्ष उचलिला आणि कांहीं दिवस पेशव्यांस अगदीं दमवून सोडिलें. परंतु शाहू मरण पावतांन पेशव्यांनीं त्यास व प्रतिनिधीस पकडून बंदोबस्तांत ठेविलें; आणि पुढी राज्यकारभाराची व्यवस्था लागल्यावर मग मुक्त केलें. त्यानंतर ताराबाईच हाताशी धरून फिरून यमाजीने पेशव्याशीं विरोध सुरू केला, पण त्यांत त्याल यश आलें नाहीं. पेशव्याच्या वाढत्या सत्तेस आळा घालण्याचें सामर्थ्य त्याच्य ठिकाणीं नव्हतें, आणि फौज व सरदारही त्यास अनुकूळ नव्हते. उलट पक्ष पेशव्यांचा जम तीन पिढ्यांपावेतों सर्वत्र चांगला बसलेला पाहून शेवटीं त्यानं विरोध सोडून दिला. नानासा०नें मृत्युपूर्वी उत्तरेंत स्वारी केली तेव्हां त्याज बरोबर यमाजी शिवदेव होता. त्याच्या पश्चात् मुतालकीचें काम मुलगा गमाजी पाहूं लागला. हा गमाजी विठ्ठल सुंदराशीं संधान करून पेशव्याशी लढण्यास आला असतां राक्षसभुवनच्या लढाईत मारला गेला (स. १७६३). अंताजीचा मुलगा वासुदेव हा प्रथमपासूनच पेशव्याचे बाजूचा असून गमाजीनंतर त्यासच पेशव्यांनीं मुतालकीवर दाखल केलें. गमाजी स्वभावानें क्रूर असल्यामुळें, ' यमाजीस (काळास) न भ्यालें तरी गमाजीस भ्यालें पाहिजे,' अशी म्हण मराठी भाषेंत आली आहे. मुतालिकांचें राहण्याचें मुख्य ठिकाण कऱ्हाड होय.

अंताजी शिवदेवासंबंधानें खालील उल्लेख आढळतो. ' रा. यमाजी शिवदेव यांणीं उंबरजचे मुक्कामीं स्वामीसंनिध विनंति केली. कै., राजाराम महाराज चंदीचे मसलतीस गेले ते समयीं किल्ले जगदेवगढ हस्तगत करावयाचेविषी

अंताजी शिवदेव यांसी आज्ञा झाली. त्यावरून किल्लयावरी हल्ला करून दरवाजावरी चालोन घेतलें. स्वामीचे दृष्टीं ठार झाले, त्याजकारितां महाराजांनीं त्यांची स्त्री मनुवाई यांस मौजे कोरेगांव इनाम करून दिला. त्या वेळची इनामाचीं पत्रें अग्नीचा उपद्रव होऊन दग्ध झालीं. तरी नूतन पत्रें करून देऊन इनाम चालविलें पाहिजे, म्हणून त्याजवरून मौजे मजकूर गांव इनाम करून दिल्हा असे '. [ता. ८ एप्रिल १७३८, इ. सं. पे. द. मा. पृ. २८]. तसेंच स. १७३०–३१ त विशाळगड काबीज करण्याचे कामी श्रीनिवासराव प्रतिनिधीचे हाताखाली अंताजी शिवदेव यास पाठविलेलें असून, अंताजीबरोबर कान्होजीराव पासलकर पाठविलेले होते. पासलकरास शाहूनें विशाळगडच्या कामगिरी बद्दल इनाम करून दिलें, तो बहुधा बाजी पासलकराचे वंशांतलाच असावा. [इ. सं. पे. द. मा. पृ. २५] वरील दोन उल्लेखांतील विरोधावरून अंताजीच्या मृत्युकाळाचा संशय राहतो.

वंशावळ. मृताल्लिक प्रतिनिधींचे. [हतवळणेकृत सातारावर्णन].

अंताजीशिवदेव	१ यमाजीशिवदेव	५ नारायणराव
३ वासुदेव	२ गमाजी	६ अंताजीदादासा० मृ. १८६५
४ अंताजीद०		७ नारायणराव बाळासा०
५ नारायणराव मृ. १८३५		८ अण्णासाहेब.

२१. रास्ते.–आदिलशाहीचे अंमलांत गंगाधरपंत गोखले हा रत्नागिरि जिल्ह्यांत गुहागर नजीक वेळणेश्वर गांवीं महाजन म्हणून राहत असोन, हवेली व जाफराबाद या दोन महालांचा रसदभरणा दाभोळ सुभ्यास करी. त्याचा नातू हरिपंत दाभोळ सुभ्याचा भरणा विजापुरास नेऊन करूं लागला, तेव्हां आदिलशहानें त्यास रसदा असा किताब देऊन विजापुरास ठेविलें, आणि त्याजकडे दुसऱ्या अनेक सुभ्यांच्या रसदा भरण्याचें काम दिलें. हरिपंताचा नातू श्यामजीपंत यास शाहू छत्रपतीनें साताऱ्यास आपलेजवळ आणिलें. त्याचा मुलगा भिकाजीपंत यानें महालचा पोतें-भरणा व व्यापार करून साताऱ्यास

शनिवारांत वाडा बांधिला. त्याची सचोटीची वागणूक व व्यापारांतील हुशारी पाहून 'रसदे' हें पद मोडून शाहूनें रास्ते (रास्तवागणारे) हें पद त्यास दिलें. बाजीराव पेशव्याने भिकाजी नाइकाची सर्वांत वडील कन्या आपला मुलगा नानासाहेब यास केली, तिचें नांव गोपिकाबाई. लग्न वाईंत जाहलें. ह्या विवाहापासून पुढें रास्त्यांचा उदय झपाट्यानें झाला. भिकाजी नायकास सात मुलगे व दोन मुली झाल्या. दुसरी मुलगी सगुणबाई ही आप्पाजीराम गाडगीळ यास दिलेली असून, त्यास नानासाहेबाने अक्कलकोटकर भोसल्यांची दिवाणगिरी दिली. पुढें रास्ते पुण्यास वाडा बांधून राहूं लागले, तेथे त्यांचें वास्तव्य अद्यापि असून त्यांच्या नांवची स्वतंत्र पेठ आहे. भिकाजी नायकाचा पांचवा मुलगा गंगाधरराव याने वाईंत वाडा बांधिला. तो पंचवटीत गोपिकाबाईजवळ राहत असे.

वंशावळ

गंगाधरपंत [मावजीकृत कैफीयती व यादी, भा. व. पृ.२ महाराष्ट्र मंडळाची बखर.]

हरिपंत

श्यामजीपंत.

भिकाजी नाईक आप्पा.

२ मुली व ७ मुलगे.[क]

[क]१ मल्हारराव—० [क]३ आनंदराव. [क]४ लक्ष्मणराव. [क]५ गंगाधरराव.

[क]२ गणपतराव | श्यामराव

कन्या | माधवराव द. | व्यंकटराव | विश्वासराव

लक्ष्मणराव | आप्पा.

काशीराव माधवरावद० यशवंतराव. | ० | ०

दिला | श्यामराव

मल्हारराव गणपतराव भाऊ

बळवंत गंगाधर यशवंत

[क]६ रामचंद्रराव [क]७ जीवनराव.

० अमृतराव.

[क] या खुणेचे ७ मुलगे भिकाजीचे.

२२. चिमणाजी दामोदर.–याचे वंशास रिंगणगांवकर जहागीरदार असे म्हणतात. यांचें उपनांव मोघे. मराठी रियासत पूर्वार्ध पृ. ७४५ वर दिलेली वंशावळ अपुरी असून त्यांचे दप्तरांतील कागदांवरून खालील वंशावळ उपलब्ध होते. [भा. इ. सं. मं. इ. वृ. श. १८३७ ले. १७९ पृ. ३२२].



शाहूच्या आगमनप्रसंगी चिमणाजी दामोदर हा मराठी राज्यांत प्रतिष्ठित पुरुष होता. ताराबाईनें परसोजी भोसले याजबरोबर चिमणाजी दामोदरासही शाहूचा प्रतिकार करण्यासाठीं खानदेशांत ठेवून दिले होते; परंतु शाहूनें त्यास आपल्या पक्षास वश करून पुढें पंडित राजाज्ञा हे पद दिले. [स. १७०८–०९, इ. स. पे. द. मा. पृ. ३३६]. स. १७२४ त शाहूनें त्यास निजामावर पाठविलें असून (शा. म. रो. ४, ६) त्याच सालीं माळव्यांत राजा गिरिधरवर स्वारी झाली, तीतही तो हजर असल्याचा उल्लेख सांपडतो. स. १७२७ च्या फेब्रुवारींत चिमणाजी कलबुर्गे प्रांतीं कान्होजी भोसल्यास मिळाला (शा. म. रो. २३ २४, २६, २८,) आणि त्यांनीं ऐवजखानास नरम केलें. पुढील सालीं शाहूस सोडून चिमणाजी कोल्हापुरच्या संभाजीस मिलाफी झाला आणि संभाजीनें त्यास

पंडितप्रधान पद दिलें, (इसवी सन १७२८). संभाजीच्याच तर्फेनें दाभाड्याचे मदतीस येऊन तो डभईच्या लढाईंत पाडाव होऊन बाजीरावाचे हस्तगत झाला. स. १७३४ पासूनचा पत्रव्यवहार त्याचे मुलाचे नांवचा असल्यामुळें त्यादरम्यान तो वारला असावा. चिमणाजीचा भाऊ शिवाजीपंत व मुलगा बळवंतराव यांचा पुढे बाजीराव व नानासाहेब यांजशीं चांगला स्नेह असून, डभोईच्या लढाईनंतर खालसा झालेले त्यांचे उत्पन्न पेशव्यांनीं मोकळें केले. बळवंतराव रुसून गेला होता, त्यास नानासाहेबानें समजाविशी करून आपल्या पक्षांत आणिले, तेव्हांपासून त्यांनी राष्ट्रकाम केलेलें आहे. या दोन घराण्यांचा लोभ जिव्हाळ्याचा असून नानासाहेब बळवंत चिमणाजीस 'चिरंजीव' लिहितो. त्याचा मुलगा त्रिंबकराव बळवंत पानपतावर होता.[1]

२३. रामाजी अनंत दाभोळकर.—हा सारस्वत ब्राह्मण म्हणून समज असल्यास तो बरोबर नाहीं. हा कोंकणस्थ ब्राह्मण मूळचा रत्नागिरी जवळ बसणी म्हणून गांव आहे तेथचा राहणारा, उपनांव काळे. दाभोळकर टोपणनांव त्यास पुढे प्राप्त झालें. नानासाहेबाच्या हिशेबी कचेरीत हा कारकून असून, हुशार व भरंवशाचा असल्यामुळें रामचंद्र मल्हाराचे पश्चात् ता. २४-६-१७५० रोजीं त्यास शिंद्यांचे कारभाराचीं वस्त्रें देऊन पेशव्यानें हिंदुस्थानांत रवाना केलें. शिंद्यांचा कारभार करून शिवाय त्या वेळच्या रिवाजानुसार तो लढण्याचेंही काम करी. शिंद्यांच्या उद्योगाचीं त्या दहा सालचीं पत्रें रामाजीनें लिहिलेली सविस्तर व मुद्देसूद आहेत. नगरजिल्ह्यांत अकोळनेर येथें याचे वंशास जहागीर असून, तेथे हा वंश अद्यापि नांदत आहे. पानपतावरील पळ सुरू झाल्यावर नानाफडणीस, रामाजी अनंत व बापुजी महादेव हिंगणे ह्यांनीं सर्व वस्तभाव टाकून लंगोट्या लावून रात्र झाल्यावर पळून जात असतां रणभूमीच्या पाश्चिमेस दहा बारा कोसांवर शत्रूंनीं हात लावून झाडा घेतला; रामाजीपंत व बापूजीपंत यांस जखमी करून तोडून टाकिलें. नानाफडणास मात्र वांचला.[का. सं. प. या. ले. ५३].

---

१ टीप. २। श्री. वि. आठल्ये यांनीं रिंगणगांवचें दप्तर चाळून घेतलेल्या नकला मला दिल्या, त्यांवरून ही हकीकत बनविली आहे.

वंशावळ. [घराण्याचें इंग्रजी चरित्र मोरोकृष्णानें लिहिलें त्यावरून].



२४. **पानशे.**—पुरंदर किल्ल्याच्या टापूंतील अनेक देशस्थ घराणीं पेशवाईंत प्रसिद्धीस आलीं, त्यांपैकींच पानसे होत. यांचें मूळगांव सोनोरी पुरंदरजवळ असून पानशांस इनाम आहे. पानसे हे तेथचे कुळकर्णी. इतर अनेक ऐतिहासिक घराण्यां प्रमाणेंच, पेशवाईंत कार्यक्षेत्र मिळतांच या विस्तृत घराण्यांतील तमाम पुरुषांनीं राष्ट्रकार्य करून इतिहासांत आपलें नांव कसें चिरंतन करून, ठेविलें हें खालील हकीकतीवरून ध्यानीं येईल.

सोनोरीकर **पानशे.** (मावजीकृत कैफीयत व यादी पृ. १२२.)



मूळ अर्जक यशवंतराव हा शाहू छत्रपतीजवळ हुजरातीत तीनशें स्वारांचा सरदार होता. शाहूनें त्यास बाजीरावाचे तैनातीस दिलें. बाजीराव व चिमाजी-आप्पा यांजबरोबर राहून मर्दुमकी दाखविली, तेव्हां बाजीरावानें त्यास तोफखान्याचें काम सांगितलें. हें काम यशवंतराव व त्याचा वडील बंधु माधवराव असे करीत असत. ते वसईच्या स्वारींत हजर होते. सावनूरचे स्वारींत यशवंतरावानें तोफखान्याचे काम मोठ्या सिताफीने केलें. लढाईत यशवंतरावाचे पायास भाल्याची जखम लागली, तेव्हां पेशव्यानें त्यास साहेब नौबत व अंबारी दिली. यशवंतरावनाना धाकटा भाऊ रघुनाथरावाच्या गुजराथ स्वारीत तोफखान्याचा अंमलदार होता. त्या स्वारींतील कामगिरीबद्दल नानासाहेबानें ९ मार्च १७५३ रोजीं केशवरावास दोन परगण्यांची मज्मू व फडणिसीचे दरख दिले. निजामावरील तांदुळजाच्या लढाईत केशवराव जोडगोळीनें मारला गेला. यशवंतरावाचा धाकटा भाऊ महिपतराव पानपतचे लढाईत हजर होता. त्या लढाईत तोंडावर तलवारीच्या जखमा लागून तो परत देशीं आला. नंतर कांहीं काळ त्यानें तोफखान्याचा कारभार केला. यशवंतरावाच्या पश्चात् तोफखान्याचा कारभार कांहीं दिवस कृष्णरावानें व पुढें भिवरावानें केला. राक्षसभुवनच्या लढाईत,

तोतयाचे पाडावांत व स. १७७६–७९ मधील इंग्रजांवरील लढायांत भीवराव पानशे आपल्या फौज तोफखान्यासह हजर असून, तळेगांवच्या लढाईतील पराक्रमाबद्दल ता. ११ नोव्हेंबर सन १७७८ त भिवरावास चौघडा जरीपटका व नव्वद हजारांचा सरंजाम पेशव्यांकडून मिळाला. जयवंतरावानेंही त्या युद्धांत अनेक पराक्रम केले कृष्णराव हैदरअलीवरील स्वारीत कामास आला. सखारामपंत हा नानाफडणिसाबरोबर बादामीच्या लढाईत व पुढें खर्ड्याच्य लढाईत हजर होता. विश्वासराव पानसे बारभाईच्या कारस्थानांत व पुढें इंग्रजांबरोबरील युद्धांत प्रमुख होता. महादजी शिंदे हिंदुस्थानांतून दक्षिणेंत आल्यावर त्याचा पक्ष विश्वासरावानें घेतला होता, त्याबद्दल त्यास महादजीनें चाकण पेठ्यांतील नाणवली गांव इनाम करून दिला. पुरुषोत्तमरावही पुण्यांत राहून तोफखान्याचें कामकाज व हिशेब पाहत असे. विश्वासरावाचा मुलगा गणपतराव खर्ड्याचे लढाईत हजर होता. पुढें तोफखान्याचें सर्व काम त्याजकडे आलें. कोल्हापुरकरांबरोबरील युद्धांत गणपतराव प्रमुख होता. सन १८२५ सालीं गणपतराव बारल्यावर त्याचें कांहीं उत्पन्न मुलगा दामोदरराव यास मिळालें.

२५. नारोराम मंत्री.—हा सावंतवाडी नजीक कोचरें गांवचा कुळकर्णी सारस्वत ब्राम्हण. यास नारबा मंत्री म्हणत. स. १७०७चे सुमारास तो धनाजी जाधवाजवळ येऊन राहिला. स. १७१३त त्यास शाहूनें चन्द्रसेन जाधवाकडून काढून मंत्रीपदाचा अधिकार दिला. कारण पूर्वीचा मंत्री पुंडे हा ताराबाईचे पक्षांत होता. नारोमंत्री आपल्या बंधूं सह सातारा जिल्ह्यांत मागणी येथें राहत असे. अद्यापि हा गांव त्या घराण्याकडे इनाम चालतो. नारबा विशेष कर्तृत्ववान नव्हता, तथापि सुस्वभाव असून पेशव्याशीं उघड विरोध करीत नसे. तो सन १७४८ त मरण पावल्यावर भावाचा मुलगा घनश्याम यास दत्तक देऊन त्याचे नांवानें शाहूनें मंत्रिपद चालविलें. रामराजाच्या वेळेस घनश्याम नारायण मरण पावला आणि त्याचा मुलगा रघुनाथ घनश्याम यास मंत्रीपदाचीं वस्त्रें मिळालीं. तो इसलामपुर येथें राहूं लागला. रघुनाथरावाचा भाऊ नारायण

घनश्याम याचा व त्याचा तंटा लागला. त्याचा वंश तुकाईचे वाडीस आहे. रघुनाथराव वारल्यावर त्याचा पुत्र जयवंतराव यास धाकटे शाहूनें मंत्रीपदाचीं वस्त्रें दिलीं. जयवंतरावानें आपला बंधु बचाजी याचा मुलगा रघुनाथराव दत्तक घेतला. जयवंतराव स. १८२९ चे सुमारास मरण पावल्यावर रघुनाथरावाकडे मंत्रीपदाचा अधिकार चालला. रघुनाथरावास मुलगे दोन आनंदराव व माधवराव.



२६. सचिव भोरकर.—शंकराजी नारायण सचिव सन १७०८ त वारला तेव्हां त्याचें वय सुमारें पंचेचाळीस वर्षांचें होतें. त्यास महादजी नांवाचा एक दत्तक पुत्र व नारायण नांवाचा औरस पुत्र मरणसमयीं दोन वर्षांचे वयाचा होता. लगेच शाहूनें नारोशंकर यास सचिव पदाचीं वस्त्रें दिलीं. नारोशंकर यास स. १७०७ त दमाजी थोरातानें धरून हिंगणगांवचे किल्ल्यांत कैदेंत ठेविलें. तेथून पुढें तीन महिन्यांनीं बाळाजी विश्वनाथानें त्याची सुटका केली. शंकराजी नारायण चांगला होतकरू होता, परंतु त्यास पराक्रम गाजाविण्याची संधि मिळाली नाहीं. तो सन १७३७ त (शके १६५९ ज्येष्ठ ?) मरण पावला. त्यास मूल नव्हतें. म्हणून त्याचा वडील भाऊ महादजी याचा मुलगा चिमणाजी

महादेव बहुत करून शाहू जवळ असे, त्यालाच चिमणाजी नारायण असें नांव ठेवून शाहूनें सचिवपदाचा अधिकार व वस्त्रे दिली. नीरा नदीच्या कांठी भोर हें राहण्याचे ठिकाण या चिमणाजी नारायणानें केले; त्यापूर्वी वरोडा येथें ते राहत असत. तेथील वाडा जळाला, तेव्हां तो भोरास गेला. स. १७५७ त चिमणाजी नारायण मरण पावला; त्यास तीन मुलगे होते, सदाशिवराव, आनंदराव व रघुनाथराव. ताराबाईनें स. १७५८ त सदाशिवरावास सचिव-पदाचीं वस्त्रें दिलीं. तो सन १७८७ त मरण पावल्यावर घाकट्या भावास वस्त्रें मिळालीं. त्याचा मुलगा शंकरराव यास सखाराम बापू बोकील व रामशास्त्री प्रभुणे यांच्या मुली दिल्या होत्या. मूल झाले नाहीं.

वंशावळ सचिव. शंकराजी नारायण मृ. १७०८.



२७. **थोरात.**—शाहू व संभाजी यांचे भांडण चालत असतां अनेक मराठा सरदारांचें मधल्या मध्यें चांगलें फावत असे. ते दोघेही एकमेकांचे सर-दार फोडीत. शिवाय त्यांचे व्यवहार एकमेकांशीं कसे चालत हें ले. ४५३ खंड ३ यांतील थोरातांच्या हकीकतीवरून दिसून येतें. या घराण्याचा मास-ल्यासाठीं येथें थोडक्यांत निर्देश केला आहे. सिधोजी थोरात त्यानें शाहूची कामगिरी चांगली करून शाबासकी मिळविलेली आहे. (शा. म. रो. १३ व १६).

सुभानजीनें आष्टयाचें ठाणें घेतले व सर्व बंधु एकत्र राहूं लागले. सिधोजी नारोपंत घोरपड्याजवळ चाकरी करून होता, त्यास मिरज येथे सरंजाम मिळाला. जिवाजी व येसबा थोरात आणि विठोजी चव्हाण हे सर्व एकत्र स्वाऱ्या करीत. हिंगणगांवचा दमाजी थोरात तो या घराण्याहून वेगळा होय.

वंशावळ. शिवाजी थोरात.



२८. **विसाजी नारायण जाखी.**—हे सारस्वत ब्राह्मण पांच पिढ्यांपर्यंत प्रतिनिधींचे चिटणीस होते. 'यांनीं थोरले कैलासवासीपासून निष्ठेनें सेवा केली. औरंगजेब पातशहा विशाळगडास वेढा घालून बसले ते समयीं परशराम पंडित यांजपाशी श्रम साहस केले.' (इ. सै. पे. द. मा. पृ. १९२०). याचा व बाळाजी वि० चा अत्यंत घरोबा होता. पेशवे प्रतिनिधींचीं पुढें चांगली गोडी झाली त्याचें कारण हे जाखी होत. तिसां अशर मया व आलफ छ १५ सवाल (स. १७१८) च्या पत्रांत बाळाजी वि० विसाजीबावास लिहितो. 'पूर्वी अजंनवेलीस असतां आमचें सर्व प्रकारें आपण चालविलें. संकटे आम्हावरी पडलीं त्या प्रसंगी आपण आम्हांवरी कृतोपकार फार केला. आम्हांमुळे सर्वस्वें खराब होऊन आमचे संरक्षण केलें. हल्लीं ईश्वरें आम्हांवरी कृपा केली यास्तव आपण आम्हापाशीं राहवें, आम्हीं सर्व प्रकारे चालवावे, हें आमचें मानस, यास्तव आग्रह बहुत केला, त्यास आपण सांगितलें जे, आपला वृद्धापकाळ आणि योगक्षेम चालत आहे. ज्यांचे संनिध आहों तेही उत्तम प्रकारें चालवितात. मुलें ठेवावीं तर तीं लहान. यास्तव त्यांचे उपयोगी पडे ऐसें पत्र लेहून द्यावें, म्हणोन बोलिलां, त्यावरून हें पत्र तुम्हांस लेहून दिल्हें असे. प्रस्तुत आम्ही आपणास रु. ७०० प्रतिवर्षी करार करून दिले आहेत. दरसाल प्रविष्ट करूं. [भा. इ. सं. वृ. १८३६ ले ९].

जाखींची वंशावळ. गोत्रवत्स, सूत्र आश्वलायन, सारस्वत ब्राह्मण.
(रत्नागिरि जि० बामणोली गांव इनाम चालू आहे.)



२९. धडफळे.–पुण्यांतील जुन्या घराण्यां पैकी धडफळ्यांचे घराणें आहे. त्यांचा पूर्वज रंगो बापूजी धडफळे हा मलिकंबरच्या वेळेस पुण्याचा ठाणेदार होता. दुष्काळानंतर पुण्याची वस्ती वाढवून व पेठा स्थापून जमाबंदीचे वगैरे नियम ठरविण्याचे आरंभींचे काम या धडफळ्यांनीं केलेले आहे. पेशव्यांनी पुणे शहराची पूनर्रचना केली त्यात त्यांस धडफळ्यांनी सर्व मदत केली. (भा इ. मं. इ. वृ. १८३५ पृ. ३७५). बिनायक नारायण व गणेश नारायण व मल्हार गोविंद धडफळे हे बाजीरावाचे वेळेस प्रमुख होते (रा. खं. ३ ले. १६६) थोरातानें हिंगणगांवचे गढीत बाळाजी विश्वनाथास कुटुंबसह अडकवून ठेविले त्या वेळेस मोरो विश्वनाथ व गणेश नारायण धडफळे यांनी कष्ट मेहनत करून, जामीनगिरी पत्करून सर्वांची सुटका केली. पुढें पेशवे पुण्यास आले ते प्रथम धडफळ्यांचे वाड्यांत राहिल्यावर बाजीरावानें स्वतःचा वाडा पुण्यास बांधिला, त्याचें काम धडफळ्यांचे हातचेंच आहे. पेशव्यांनीं धडफळ्यांस वंशपरंपरा इनामें वगैरे करून दिलीं होतीं. पेशव्यांच्या ऋणानुबंधी देशस्थ घराण्यांपैकीं हें एक होय.

नारायण.
बिनायक गणेश.

३० फडके.—हे पेशव्यांचे उपाध्ये पुण्यास राहत होते. त्यांस साष्टी, वसई वगैरे काबीज करण्याच्या कामगिरींत पाठविण्यांत आलें. त्यांनीं श्रम साहस बहुत केलें. शंकराजी केशव कच खाऊन युद्ध सोडून पळाला, त्यावरून बाजीरावानें फडक्यांची खूब निर्भर्त्सना केली. त्यावरून चिडून महादाजी केशव माहिमास पराक्रम करून कामास आला. वसई काबीज झाल्यावर तेथील काम पेशव्यानें शंकराजीस सांगितलें, तें त्यानें पुष्कळ वर्षे चांगल्या प्रकारें केलें, [खं. ३·५५४].

वंशावळ.



३१. महादाजी राम पारसनीस.—या घराण्याचा संबंध आंगऱ्यांचे व्यवहारांत येतो. **वंशावळ.** [रा. रामराव नारायण प्रधान यांजकडून].



कोल्हापुरकर संभाजीचा प्रधान नीळकंठ प्रभु पारसनीस व हा महादाजीराम एकाच महाडकर कुटुंबांतले असावे. महादाजी व त्याचे मुलगे विठ्ठल त्रिंबक संभाजी आंगऱ्या विरुद्ध मानाजीस मिळाले होते, ह्या संबंधांत महादाजीस मानाजीनें पत्र लिहिलेलें प्रसिद्ध आहे (म. वि. १ पृ. २९३). विठ्ठल ब त्रिंबक या दोघां बंधूनीं व त्यांचे पश्चात् जिवाजी विठ्ठल व अनाजी त्रिंबक यांनीं पेशवाईंत राज्याचे अनेक उद्योग केले आहेत.

३२. रेठरेकर.—हें देशस्थ घराणें पेशव्यांचें ऋखानुबंधी होतें. भीवराव रेठरेकर व बाळाजी विश्वनाथ यांचा स्नेह असून, भीवरावास मुलगे झाले, त्यांचीं नांवेंही त्यानें बाजीराव व चिमाजी अशींच ठेविलीं. बाजी भीवराव तारापुरचे हल्लयांत मारला गेला (स. १७३९, इ सं. पे. द. मा. पृ. ३०); त्या वेळीं त्याच्या मातुश्रीस व भावास लिहिलेलीं पत्रें फार प्रेमळ आहेत. (खं. ३·१५५, १६७, १६८). बापूजी बाजी नानासाहेबाचे वेळीं अनेक कामगिरींवर होता. (का. सं. प. या. ६० १०३, १०४, ४९५). याच घराण्यांतील त्रिंबकराव हा दुसऱ्या बाजीरावाचें साह्य करीत होता.

३३. **सुमंत.**—आनंदराव रघुनाथ सुमंत हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण औरंगाबादेस राहत असे. तेथून शाहू दक्षिणेंत येत असतां त्यास सुमंतपद देण्यांत आलें. हा आपल्या कामांत कुशल होता, तथापि बहुधा पेशव्याचे उलट वागत असल्यामुळें राज्याच्या उद्योगांत त्याचा म्हणण्यासारखा उपयोग झाला नाही. पेशव्यांच्या मध्यस्थी शिवाय तो परभारें उद्योग करी, त्यामुळें एकतंत्री उद्योगास न्यूनत्व येई. कदाचित् पेशव्यांवर दाब ठेवण्यासाठींच त्यास शाहूनें मुद्दाम हाताशीं धरिलें असावें. भागानगरास निजामाकडे व नादीरशहाच्या वेळेस जयसिंगाकडे आनंदराव होता. ता. २७·३·१७४१ रोजीं तो निजामाकडे असल्याचा उल्लेख आहे (शा. म. रो. १४९). त्यानंतर तो केव्हां तरी वारला असावा (शा. म. ब. ७३). त्याचा वडील पुत्र सामान्यच असल्याळें सुमंतपद प्रथम माहीपतरावास व नंतर धाकटा मुलगा विठ्ठलराव यास मिळालें. (इ. सं. ऐ. चर्चा. पृ. १४)

वंशावळ सुमंत. रघुनाथपंत भोपळे.



३४. न्यायाधीश. वंशावळ—



३५. पंडितराव. मुद्गलभट उपाध्ये, स. १७१३



३६. बाजी महादेव प्रभु उरवडेकर.—हा मुठे खोऱ्यांतील महादाजी रघुनाथाचा मुलगा. याचा जन्म चैत्र शु० ९ शके १६५१ (२७ मार्च १७१९) रोजीं उरवडेगांवी झाला. सन १७४९ त नानासा० पेशव्याच्या हुजूर फौजेंत याने नोकरी पत्करिली, तेव्हांपासून स्वपराक्रमाने चढत चढत त्याने स. १७९९ पावेतो स्वराष्ट्राची सेवा बजाविली. सांगोल्याच्या लढाईंत सदाशिवरावाच्या हाताखाली राहून त्यानें प्रतिनिधींचा पराभव केला. त्यानंतर निजामाबरोबर व कर्नाटकांत जे युद्धप्रसंग नानासाहेबाने केले त्यांत तो हजर असून स १७५८च्या लाहोरस्वारींत तो रघुनाथरावाबरोबर होता. उत्तर पेशवाईत त्याने अनेक प्रसंगांत पराक्रम गाजविले आणि सवाई माधवरावाचे वेळेस त्याने बडोद्यास येऊन गोविंदराव गायकवाडाची नोकरी केली. (इ. सं. ऐ. चरित्रे २–४).

३७. ठाण्याचे बिवलकर.—साष्टी कल्याणचा सुभेदार रामाजी महादेव हा पुष्कळ वर्षे कोंकणांतील कारभारावर असून, आंगरे यांच्या प्रकरणांत तो मुख्य होता वसईच्या युद्धांत रामचंद्र महादेव जोशी म्हणून गृहस्थ होता, तो हा नव्हे. ठाण्यास विवलकरांचा वाडा असून तेथील कौपीनेश्वराचे मंदिर चिमाजी आपाच्या हुकुमानें रामाजी महादेवानें बांधिलें. कुलाब्यास पुढे अव्वल इंग्रजीत बिवलकर आंगऱ्यांचे कारभारी झाले, ते या रामाजीच्या वंशापैकीं नव्हत.

३८. मेहेंदळे. बहिरव भट्ट, ल० बाळाजी वि० ची बहीण.



३९. ग्वाल्हेरचे शिंदे—शिंदे होळकरांच्या हकीकती मुख्य भागांत परिपूर्ण आलेल्या असल्यामुळे येथे फक्त संदर्भापुरत्या त्यांच्या वंशावळी दिल्या आहेत.

दत्ताजी, कन्हेरखेडचे पाटील.

जनकोजी

मृ. १९-७-१७४५ **राणोजी**, १ मैनाबाई (निबाबाई), २ चिमाबाई (रजपूत).

जयाप्पा,	दत्ताजी,	जोत्याजी,	तुकोजी,	महादजी,[४]	भवानीबाई.
मृ. १७५५.	मृ. १७६०.	मृ. १७४४	मृ. १७६१	मृ. १७२७-१२-२-१७९४.	
सखूबाई.	भागीरथीबाई.	सगुणाबाई.	लक्ष्मीबाई.	स्त्रिया ९.	

जनकोजी,=काशीबाई[१]. ४ मुली.[२]
मृ. १७६१,

केदारजी
मृ. १७७०.
स्त्री तुळजाबाई.

आनंदराव, स्त्री मैनाबाई.[३]
दौलतराव, दत्तक महादजीस.

१. निजामशाहीतील व्यंकटराव निबाळकराची बहीण.

२. पैकीं एक मुलगी वाडीकर खेमसावंतास दिलेली होती.

३. कुलाब्याचे येसाजी आंगरे याची मुलगी.

४. महादजीच्या नंतरचा वंश पुढील भागात येईल.


४०. इंदूरचे होळकर.
१ मल्हार खंडूजी होळकर सुभेदार, स्त्री गौतमाबाई
१६·३·१६९३–१·५·१७६५.
२ खंडेराव मृ. १७५४
३ तुकोजी—पुतणे मृ. १५·८·१७९७
२ स्त्री अहल्याबाई मृ. १३·८·१७९५
मुक्ताबाई
२ मालेराव मृ. १७६५
काशीराव मृ. १७९८
मल्हारराव मृ. १७९७
विठूजी मृ. १८००
४ यशवंतराव मृ. २८·१०·१८११
५ स्त्री तुळसाबाई
६ हरिराव, गादी १७·४·१८३४-१६·१०·१८४३.
९ खंडेराव मृ. १८४४
६ मल्हारराव १८११–३३
७ मार्तंडराव मृ. १८३४
१० तुकोजीराव १८४४–१८६६
भागीरथीबाई
राधाबाई
११ शिवाजीराव (१८८६–१९१०)
यशवंतराव
१२ तुकोजीराव १८९०—प्रस्तुत
१ चंद्रावती रा०
२ इंदिराबाई
मनोरमा
यशवंतराव
स्नेहलता.
तात्यासाहेब
मल्हारराव

सूची.

सूचना. विशिष्ट प्रसंगांचा व घडामोडींचा संदर्भ त्यांतील प्रमुख व्यक्तींच्या नांवाखाली मिळेल. प्रसिद्ध घराण्यांचीं आडनावेंही सूचीत घेतलीं आहेत.

अक्कलकोटकर—भोसले २६८, वंशावळ २७३.

अंताजी माणकेश्वर—दिल्लीतील अव्यवस्था १९; हिंगण्यांशी तंटा २३,४९; शिंद्यांस मदत मारवाड स्वारीत ५९, दिल्लीत तारांबळ ७४, हिशेबाचा तपास व तंबी ९१, पुण्यांत आगमन १११, मृ. २०५.

अंताजी शिवदेव–३०६, वंशावळ ३०७.

अदिनाबेग—पंजाबचा अधिकारी, ५,७२,९७, मृ. ९८.

अब्दुस्समदखान—१६७.

अभयसिंग—५०,५१.

अमात्य—२९०, वंशावळ २९१.

अलीगौहर—शहाआलम, १०९,१५४,१६२.

अहंमदशहा अब्दाली—स्वाऱ्यांचा तपशील ३, पूर्वचरित्र ४,पहिली स्वारी ५; मराठ्यांशी चुरस १८; तिसरी स्वारी ७१–७९; दिल्लीचा पाडाव ७४, मथुरेची लूट ७७, स्वदेशी प्रयाण ७९; स्वाऱ्यांचे हेतु ८७, चौथी स्वारी ११४,१४६–१४८, सुजाचा भेट १५७, बागपतावर उतार १७०, लढाईतील सरदार २०१, पानपतावर नफानुकसान २०८, पेशव्याशी समेट २१०.

अहंमदशहा, बादशहा दिल्लीचा—राज्यारोहण ६; मराठ्यांशी चौथाईचा करार ९; दुटप्पी वर्तन व अव्यवस्था १८–२२; वजिराशी युद्ध २५; पदच्युत व मृत्यु ३८–४०.

आबाजी अगर आबूजी नाईक—२८५.

आलमगीर दुसरा—दिल्लीचा बादशहा, राज्यारोहण ३८, खून ११७; सदाशिवरावास फर्मान १५४.

इब्राहीमखान गारदी—१३४, १३८, १५१, १६७, पानिपतची छावणी १७२, लढाई १८६, मृ. १८९-१९०, गोल बांधून जाण्याची सल्ला १९९

उदाजी चव्हाण—२७०.

उद्धव योगदेव—३०१.

ऊधमबाई—अहंमदशहाची आई २५.

कमरुद्दीनखान वजीर—अब्दालीशीं लढाई व मृत्यु ५-६.

कान्होजी भोसले—२८०.

काशीराय—सुजाचा वकील, बखर १६१, १९२, २१६.

कृपाराम—मराठ्यांचा वकील, २९५-२९६.

कृष्णराव गणेश बर्वे—३५.

कोल्हटकर—२९१, वंशावळ २९२.

खंडेराव होळकर—मल्हारराावाचा मुलगा मृ. ३३.

गंगाधर यशवंत चंद्रचूड—होळकराचा कारभारी ४२, अब्दालीशी सामना १३१, २२८-२२९.

गणेश संभाजी खांडेकर—१४५, २२९.

गमाजी यमाजी—३०६.

गाजी उद्दीन थोरला—मीरबक्ष ६.

गाजी उद्दीन धाकटा—वजीर, दुसरें नांव मीरशहाबुद्दीन, २५, जाठांवर स्वारी ३३, बादशहावर चाल ३७, बादशहाची पदच्युति व खून ३८-४०, ७२, अब्दालीकडून पराभव ७६, रघुनाथरावाची भेट ८५, वजिरीची भानगड १०७.

गोपाळ गणेश बर्वे—३५, ६६, १४५, १५८, १७४.

गोपिकाबाई—२१४, २३४-२३५, २३६, २५१.

गोविंद खंडो चिटणीस—२६३, वंशावळ व घराण्याची योग्यता ३६६.

गोविंदपंत बुंदेले—रोहिल्यांचा पाडाव १४, पूर्ववृत्त ६३, कारभार व पेशव्यांची कानउघाडणी ६४–६७; मुलखाचा बंदोबस्त ६८, पुण्यास प्रयाण ६९–७०, ११८, हिशेबाचा विपर्यास १२८–१२९, सदाशिवरावाचीं पत्रे व ताकिदी १४०–१७५, आरोपांच्या बाबती १४४, अब्दालीचा छापा व मृत्यु १८०, १८१.

चिटणीस घराणें—२६३, वंशावळ २६६.

चिमणाजी दामोदर—राजाज्ञा ३०१, वंशावळ ३०९.

जनकोजी शिंदे—५५, ६१, पेशव्याशीं हिशेबाच्या भानगडी ८८, होळकरांची शिकवणूक १०२–१०४, अब्दालीशीं गानिमी सामना १३०–१३१, पानपतावर पहिला युद्ध प्रसंग १७५–१७८, १९८.

जयापा शिंदे रोहिल्यांशी युद्ध १२, होळकराशीं वांकडें २३, जाठाचा बचाव ३४; नागोरचा वेढा व खून ५०–६२.

जवानबख्त—१५४.

जहानखान—९६, १४६, १४८.

जाठ—पूर्ववृत्त ३१, सुरजमल्ल पहा.

तुळजाराम—वकील २९५.

थोरात—३१५, वंशावळ ३१६.

दत्ताजी शिवदेव—राजाज्ञा ३०१.

दत्ताजी शिंदे—नागोरची स्वारी ५२–६२, ८२, होळकराची शिकवणूक १०२–१०४; लाहोरवर स्वारी १०४, गाजीउद्दीमशीं भांडण १०५, नजीबखानाची भूलथाप १०९–११७; पेशव्यांकडून कानउघाडणी ११०, नजीबखान, शुक्रतालचा पूल व लढाई ११२–११४; अब्दालीशीं सामना व मृत्यु ११७–१२४, उत्तरक्रिया १२५, पराक्रमाची मीमांसा १२७.

दमाजी गायकवाड—१३७.

दामोदर महादेव—हिंगणे, ४६, रघुनाथरावाशीं बेबनाव ४८, दिल्लीतील तारांबळ ७५, हिशेबाच्या भानगडी ९०, वंशावळ २९५.

दीक्षित पाटणकर—२९७.

देवराव महादेव-हिंगणे, ४६, वंशावळ २९५.

देवासचे पवार—पाती १।२ पृ. २८३.

धडपळे—३१७.

धारचे पवार—घराणे व वंशावळ २८३.

नजीबखान रोहिला—७१,७३, अब्दालीस सामील ७६, मल्हारराव्याचा मानीवपुत्र ८६, होळकराकडून बचाव १०२–१०४, १४६–१४८, अब्दालीसुजाची भेट १५७, सुजाशी भांडण १५९.

नागपुरकर भोसले—२७९, वंशावळ २८२.

नानाफडणीस—५७६, १८६, १८९, १९३, २२३, २३२, २३६.

नानासाहेब पेशवा - उत्तरेच्या कारभारांत दुर्लक्ष २, १५-१७, ३४, ३०; बजिराशी स्नेह ७, बादशहाशी चौथाईचा करार ९; हिंदूंचीं पवित्र स्थळे सोडविणे १३; शिंद्यांस सांगितलेले मनसुबे १०, दत्ताजीस सांगितलेली कामे ११०; पटदूरची वाटाघाट १३ -१३८; शेवटची स्वारी २१०–२१४, दुसरें लग्न २११; पानपताने उडालेली तारांबळ २१२-–२१३; प्रकृतीवर परिणाम २१४; पानपतसंग्रामाचा निष्कर्ष २१४-–२२७; अपजयाजी खरी खोटी कारणें २१५–२२४; अपजयाचे परिणाम २२५, अखेर व मृत्यु २३२–३४; मृत्यूचीं कारणें २३४-३५; पुण्यांत बंदोबस्त २३६, मराठ्यांचा धीर २३८, कर्तबगारांचा अंदाज २३९, हिशेब व कचेरी २४२, पत्रव्यवहार २४३, जातिभेदाचा अंदाज २४४, कारभारावर दोष २४६, योग्यतेची कसोटी २४७, महाराष्ट्राचा जीवनविस्तार २४८, वंशावलि २५०, कौटुंबिक तपशील २५१, सामाजिक व धार्मिक परिचय, गुरु व सत्पुरुष २५३, देव-दर्शन व इनामें २५४, श्रावणमास व इतर धर्मादाय २५५, पर्वती २५७, स्वारीचा थाट २५८, पुणेंशहर २५८, नळा व पाणी व कर्ज २६०.

नारायण दीक्षित पाटणकर— २९७–२९८.
नारोराम मंत्री—३१३ वंशावळ ३१४.
नारो व्यंकटेश—इचलकरंजीकर ३००.
नारोशंकर— नामदी ७५, १४८, १५८, २१३, २२३, २२९; ३०३, वंशावळ ३०५.
न्यायाधीश--वंशावळ ३२०.
पंडितराव--वंशावळ ३२०.
परसोजी भोसले--२८०.
पवार धार-देवासचे २८३–२८४ वंशावळी.
पाटणकर दीक्षित--२९७, वंशावळ २९८.
पानशे--३११, वंशावळ ३१२.
पानिपत--ठळक प्रसंग, २ संदर्भ ग्रंथांची यादी ३; मोहिमेची तयारी व संग्राम १३२–२०८; संग्रामाचा निष्कर्ष २१४–२२७, पानपत नंतरची परिस्थिति २२७–२३२.
पाराशर दादाजी—१४३, १८३.
पार्वतीबाई -२०४.
पिलाजी जाधव--२७३ वंशावळ व घराणें.
पुरुषोत्तम महादेव हिंगणे-वकील, वंशावळ २९५.
पुरुषोत्तमराव पटवर्धन--२३३–२३४.
पुरंदरे--२८७, वंशावळ २८८.
फडके--वंशावळ ३१८.
फत्तेसिंग भोसले--२६८, वंशावळ अक्कलकोट २७३.
बळवंतराव मेहेंदळे—१३६, मृ. १७७–१७८.
बाजी भीवराव रेठरेकर--३१९.
बापूजी महादेव हिंगणे—४६, ७७, हिशेबाच्या भानगडी ९०, वंशावळ २९५.

बावूजी नाईक २७२, २८५.
बारामतीकर जोशी २८५ वंशावेळ. २८७.
भगवंतराव अमात्य--२९० वंशावळ २९१.
भवानीशंकर—मराठ्यांचा वकील सुजाकडे १६१.
भास्कर राम—२९२.
भिऊबाई--२८५.
मलिका अज्जमानी-ऊ० बादशाहा बेगम ३७, नजीबखानाशी कारस्थान ७३.
मल्हारराव होळकर—रोहिल्यांशी युद्ध १२,१३; मुख्य कामांत घोटाळा १५, शिंद्यांशीं वांकडे २३, कुंभेरचा वेढा, पुत्र खंडेरावाचा मृत्यु व जयापाशी भांडण ३३-३५, दिल्लीवर चाल ३७; हिंगण्यांशी सख्य ४९, विजयसिंगाशी संधान ५५, जूग फुटलें ५५, अब्दालीवर जाण्यास दिरंगाई ७८-८१, विघातक भाव ८३, नजीबखानाचा बचाव ८६ ८८, १०२-१०४, लाहोरवर स्वारी ९७, नजीबखान धर्मपुत्र १०२, शिंद्याची मदत करण्यास हयगय ११९-१२१, १२६; अब्दालीशीं गनिमी सामना १३०-१३१, २०५; कुचराईचा विचार २२३, महाल जप्त २३०; वंशावळ ३२३.
महादजी शिंदे--२२३, वंशावळ ३२२.
महादाजीराम पारसनीस—घराणें व वंशावळ ३१८.
महादेवभट हिंगणे--खून २९३.
महादोबा पुरंदरे—मृ. २११.
महिपतराव चिटणीस—३१, ४७, १३६, २१३.
माधवराव पेशवा—२१३, पानपतच्या अरिष्टाचा तपास २१६, २३६.
मीरमन्नू--पंजाबचा कारभारी ६, २५, मृ. ७२.
मीरशाहाबुद्दीन धाकटा गाजीउद्दीन पहा.
मुतालिक-कऱ्हाडकर, घराणें ३०५ वंशावळ ३०७.
मोरो जिवाजी--राजाज्ञा-घराणे व वंशावळ ३०२.

यमाजी शिवदेव--३०५, वंशावळ ३०८.

यशवंत महादेव--पोतनीस २९९, वंशावळ ३००.

रघुनाथराव-उत्तरेंत पाहिली स्वारी २८, २९-३१ कुंभेरचा वेढा ३२-३५; पेशव्याने सांगितलेली कामे ३५, दिल्लींत पोकळ कारभार ४०-४४, जाठावरील स्वारीची फलश्रुति ४४, हिंगण्यांशी तंटा ४७, रजपुतांशीं वैर ६२, अव्यवस्थेचे प्रकार ६७, अब्दालीवर जाण्यास दिरंगाई ७८-८१, होळकराचा कावा ८३-८४, दिल्लीत मुक्काम ८५, हिंगण्यांवर सूड ९०-९१, अटकेवरील झेंडे ९३-९७, कामगिरीचा इत्यर्थ ९९-१००, नजीबखानाच्या बंदोबस्ताची तजवीज १०२-१०४, मोहिमेस नालायकी १३५, २११, २३४.

रघूजी भोसले—२८०.

रजपूत लोक—मराठ्यांशी वैर ६२.

राजाज्ञा—३०१.

राजे बहादर--मालेगांवकर ३०३.

राणोजी भोसले--२८०.

राधाबाई—नानासा०ची दुसरी बायको २११.

रामसिंग--जयपुरचा ५१, ६०.

रामाजी अनंत-शिर्यांचा कारभारी ३६, १४८ ३१० वंशावळ ३०८.

रास्ते--३०७ वंशावळ ३०८.

रेठरेकर--३१९.

रोहिले—पूर्वपीठिका ७, पाडाव १०; हिंदूंस उपद्रव ११, नजीबखान पहा

लक्ष्मण शंकर—८२.

वाकनीस--ठोसर २९२.

बिजय सिंग--५१, होळकराशीं संधान ५४.

विठ्ठल कान्हो ठोसर—वाकनीस २९२.

विठ्ठल शिवदेव-- ग्वाल्हेर व गोहदचा पाडाव ४५-४६ बादशहाकडून सन्मान ८६, १९७, २३१, ३०२; वंशावळ ३०३.

विश्वासराव--१३८ दिल्ली कावीज १५२–१५४, मृ. १८६, २०५; स्वरूप-वर्णन २०६.

विसाजी नारायण--जाखी ३१६ वंशावळ ३१७.

व्यंकटराव नारायण घोरपडे—इचलकरंजीकर पृ ३००, वंशावळ ३०१.

शंभुसिंग जाधव माळेगावकर—२७८, वंशावळ २७९.

शहावुद्दीनमीर--गाजीउद्दीनधाकटा पहा.

शाहावल्लीखान--अब्दालीचा वजीर ४, ९७ १५९.

शिंदे--ग्वाल्हेरचे, वंशावळ ३०२.

शिवराम भट साठे--अळीगौहर जवळ वकील १५५.

सखाराम भगवंत ३१, ४७, ४८, २३६ २३७

सदाशिवराव-गोविंदपंतासीं पत्रव्यवहार६५,उत्तरेतील कारभारांत अनवाकबगारी ९४, पटदूरची वाटघाट व मोहिमेवर पाठविण्याची कारणे १३२–१३८, मोहिमेतील मुक्काम व प्रसंग १३९, प्रांताचा बंदोबस्त व युद्धाची तयारी १४०–१४८, शिंदेहोळकरांची भेट १४८, दिल्ली कावीज १४९–१५४, बादशहाचें फर्मान १५४, २२५, उभयपक्षांची परिस्थिति १५६–१५८, तहाचा वाटाघाट १६०–१६३, छत तोडणे १६०, कुंजपुऱ्यावर चढाई व पाडाव १६३–१६८, वलीहदचा समारंभ १६५, कुंजपुऱ्यास दसरा १६८, अब्दाली कडून रेषाभेद १७०, पानपतावरील कुचंबणा १७१–१८५, पानपतचा खंदक १७२, पहिला युद्ध प्रसंग १७५, दुसरा युद्ध प्रसंग १७८, तिसरा युद्ध प्रसंग १८०, मराठ्यांची हलाखी १८१–१८४, शेवटचा संग्राम १८५–२०३, सटवोजी जाधवाचीं पत्रें १९०, १९२, गोल बांधून जाण्याची कल्पना १९९, लढाईतील सरदार २०१, शेवट २०२, प्रेताची ओळख २०४; योग्यता २०६, पानिपतचा निष्कर्ष २१४–२२७, पूर्वकारणें २१७, तात्कालिक कारणें व चुका २१९–२२१; सेनापतित्वास नालायकी २२४; अरिष्टाचे परिणाम २२५, पानपतोत्तर परिस्थिति २२७.

सगुणाबाई--काशीयात्रा ६९, २५१.
सचिव भोरचे—३१४, वंशावळ ३१५.
सफदरजंग–वजीर ६, रोहिल्यांवर स्वारी ८, बादशहाशीं युद्ध २५, मृ. ४१.
समशेर बहादर--७४, १९६.
सुजा-उद्दौला—४५, अब्दालीस सामील १४९, अब्दालीशीं भेट १५९ नजीबशीं भांडण १५९, पळाचा परामर्ष १९४-१९५.
सुमंत--३१९ व वंशावळ.
सुरजमल्ल जाठ--३१, कुंभेरचा वेढा ३२, मराठ्यांसंबंधीं भावना १६६, पळालेल्या मराठ्यांचा परामर्ष १९५, २२८, २२९.
सेवकराम—वकील २९६.
हरिरामपंडित हेरवाडकर--३००.
हिंगणे--दिल्लीत मराठ्यांचे वकील, रघुनाथरावाशीं रुसवा ४६-४८, अंताजी-माणकेश्वराशीं तंटा ४९, घराणें २९२, वंशावळ, २९५.
हेरवाडकर पंडित—३००.
होळकर--इंदूरचे वंशावळ ३२३.

श्री सयाजी साहित्यमाळा

छपायेलां पुस्तक.	किंमत.
१. विज्ञान-गुच्छः—	
२. भूपृष्ठविचार (सचित्र).	०-१०-०
११. देहधर्मविद्यानां तत्त्वो.	१—०—०
१२. विज्ञानप्रवेशिका.	०-११-०
१३. जिंदगीनो विमो.	०-११-०
१७. उद्भिज्जविद्यानुं रेखादर्शन (सचित्र).	१—०—०
१८. करोळीआ (सचित्र)	०-१४-०
२२. प्राणीविद्यानुं रेखादर्शन (सचित्र).	१—०—०
२५. मनुष्यविद्यानां तत्त्वो.	१—०—०
३५. जीवविद्या (सचित्र).	१—०—०
३८. तुलनात्मक भाषाशास्त्र.	१—४—०
४६. राजनीतिनो संक्षिप्त इतिहास.	१—४—०
४७. समाजशास्त्रप्रवेशिका.	१—४—०
४८. बाळउछेर.	१—८—०
५०. बाळस्वभाव अने बाळउछेर	१—८—०
५१. शरीरयंत्रनुं रेखादर्शन. (सचित्र)	१—४—०
६७. प्राणीसृष्टि (सचित्र)	१—८—०
७०. रसायणन प्रवेशिका (सचित्र).	१—४—०
७५. वडोदरानुं अर्थशास्त्र.	०-१२-०
८४. सनईवादन पाठमाला पु. ३ (मराठी).	१—२—०
८५. सदर सदर पु. ४ (मराठी.)	१-१२-०
८६. अवताररहस्य.(हिंदी)	०-१४-०
२. चरित्र-गुच्छः—	
८. प्रेमानंद(सचित्र).	१—०—०
१४. दयाराम.	०-११-०

२०. मीरांबाई.	०-१२-०
३०. गिरधर.	०-१४-०
३३. भालण (सचित्र)	१-०-०
४०. तुकाराम (सचित्र)	०-१४-०
४१. महाराजा शिवाजी (मराठी) (सचित्र)	१-६-०
४५. विष्णुदास.	१-०-०
४९. वीर शिवाजी (सचित्र)	१-०-०
५३. मणिशंकर कीकाणी.	१-६-०
६२. दलपतराम.	१-२-०
७२. समुद्रगुप्त (सचित्र)	०-१३-०
७७. चक्रवर्ती अशोक	०-१४-०
७८. समुद्रगुप्त. (हिंदी)	०-१२-०

३. इतिहास-गुच्छः—

१. संस्कृत वाङ्मयाचा इतिहास (मराठी)	२-८-०
९. जगत्नो वार्तारूप इतिहास, भाग १ लो.	३-८-०
१९. ब्रिटिश राष्ट्रीय संस्थाओ.	०-१३-०
२४. पॅलेस्टाईननी संस्कृति.	०-१२-०
२६. जगत्नो वार्तारूप इतिहास, भाग २ जो	१-०-०
३२. पार्लामेन्ट.	१-४-०
३४. इतिहासनुं प्रभात.	१-४-०
४३. नवीन जापाननी उत्क्रांति.	१-०-०
५५. चीननी संस्कृति	१-६-०
हिन्दुस्थानचा अर्वाचीन इतिहास.	
६५. मराठी रियासत, मध्य विभाग १.	२-१२-०
६६. ,, मध्य विभाग २.	२-१२-०
६८. ,, मध्य विभाग ३.	२-४-०
६९. हिंदुस्थाननी संस्कृति.	१-१२-०
९०. मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया (मराठी)	३-०-०

४. वार्ता-गुच्छः—

३. आपणा लघुबन्धु अंग्रेज (अंग्रेज बालजीवन बीजी आवृत्ति.)	१-०-०
४. अलकानो अद्‌भुत प्रवास (सचित्र). (बीजी आवृत्ति.)	१-४-०
१६. वीर पुरुषो.	०-१२-०

५. धर्म-गुच्छः—

६. हिंदुस्थानना देवो (सचित्र).	० ०
२३. दीघनिकाय (भा. १ ला.) (मराठी)	१ ८-०
३२. तुलनात्मक धर्मविचार	०-१३-०
३६. धर्मनां मूळतत्त्वो.	०-१०-०
४२. विविध धर्मोनुं रेखादर्शन.	० १२-०
४४. उत्तर युरोपनी पुराणकथा.	०-१४-०
८०. **तुलनात्मक धर्मविचार (हिंदी).**	१ ० ०

६. नीति-गुच्छः—

५. मायापने बे बोल (त्रीजी आवृत्ति).	०-६-०
७. नीतिशास्त्र.	०-१४-०
२७. नीतिविवेचन.	१-२-०
२९. कॉवेटनो उपदेश	०-१५-०
३७. नैतिक जीवन तथा नैतिक उत्कर्ष.	०-१५-०

७. शिक्षण-गुच्छः—

१०. बालोद्यानपद्धतीचें गृहशिक्षण (सचित्र) (मराठी).	०-१०-०
२८. बालोद्यानपद्धतिनुं गृहशिक्षण (सचित्र).	०-१४-०
५२. शाळा अने शिक्षणपद्धति.	०-१५-०

८ प्रकीर्ण-गुच्छः—

१५. सुधारणा आणि प्रगति. (द्वितीयावृत्ति) मराठी	३-०-०
२१. शिस्त (मराठी)	१-०-०
३९. हिंदुस्तानचा लष्करी इतिहास व दोस्तराष्ट्रांच्या फौजा (मराठी)	२-८०
५४. संस्कृति अने प्रगति	२-८-०
७३. जबाबदार राज्यपद्धति (मराठी).	०-१३-६

श्री सयाजी बालज्ञानमाळा.

छपायेलां पुस्तको:--

१	गिरनारनुं गौरव (बीजी आवृत्ति) सचित्र	-:६
२	ऋतुना रंग (बीजी आवृत्ति)	०-६-०
३	शरीरनो संचो (बीजी आवृत्ति) सचित्र	०-६-०
४	महाराणा प्रताप (बीजी आवृत्ति) सचित्र	०-६-०
५	कोषनी कथा (बीजी आवृत्ति) सचित्र	०-६-०
६	पाटणसिद्धपुरनो प्रवास (बीजी आवृत्ति)	०-६-०
७	पावागढ (बीजी आवृत्ति)	०-६-०
८	औरंगज़ेब (बीजी आवृत्ति) सचित्र	०-६-०
९	मधपुडो (बीजी आवृत्ति) सचित्र	० ६-०
१०	रणजीतसिंह (बीजी आवृत्ति) सचित्र	०-६-०
११	सुखी शरीर (बीजी आवृत्ति)	०-६-०
१२	श्रीहर्ष ,,	०-६-०
१३	सूर्यकिरण (सचित्र)	०-६-०
१४	वातावरण	०-६-०
१५	ग्रहण. (सचित्र)	०-६-०
१६	बाल नेपोलिअन.	०-६-०
१७	**कोषकी कथा** (हिन्दी) सचित्र	०-८-०
१८	लोहीनी लीला	०-६-०
१९	**श्रीहर्ष** (हिन्दी)	०-८-०
२०	सिकंदरनी स्वारी	०-६-०
२१	सुरत	०-६-०
२२	एशियानी ओळखाण, भाग पहेलो	०-६-०
२३	भूस्तरनी कथा.	०-६-०
२४	लॉर्ड विलियम बेन्टिक	०-६-०
२५	नाना फडनवीस.	०-६-०
२६	चंद्र	०-६-०